करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाचीं साधनें

भाग : ५ ते ७

संपादक
मा. वि. गुजर, बी. ए.

किंमत १० रुपये

103

महामहोपाध्याय प्रा. दत्तो वामन पोतदार
व्हाइस चॅन्सेलर, पुणें विद्यापीठ
यांना
प्रेमादरपूर्वक भेट

ता.
१५।११।१९५२

मा. वि. गुर्जर

करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाचीं साधनें

भाग पांचवा सहावा व सातवा

इ. स. १८१३ ते १८७८



संपादक

मा. वि. गुजर, बी. ए.





शके १८८४ इ. स. १९६२

प्रकाशक :
मा. वि. गुजर
१३२१ कसबा पेठ, पुणें २.

•

पुस्तकें मिळण्याचें ठिकाण—
हिस्ट्री ऑफिस, न्यू पॅलेस, कोल्हापूर
किंवा प्रकाशक यांच्याकडे

•

किंमत

रु. १०

(दहा रुपये)

•

: मुद्रक :
मा. प. तळेकर
श्रीदत्त मुद्रणालय,
३३५ शनवार, पुणें २.

M/५२६

करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाचीं साधनें

(भाग पांचवा)

कोल्हापूर स्टेट रेकॉर्डांतून निवडलेले कागद

छत्रपति संभाजी ऊर्फ आबासाहेब महाराजांची कारकीर्द

इ. स. १८१३ ते इ. स. १८२१

संपादक

मा. वि. गुजर, बी. ए.

शके १८८४ इ. स. १९६२

प्रस्तावना : भाग ५

करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाच्या साधनांचा हा पांचवा भाग आहे. यांत छापलेले कागद कोल्हापूर स्टेट रेकॉर्डातून निवडलेले आहेत. हे कागद छत्रपति संभाजी महाराज ऊर्फ आबासाहेब महाराज (इ. स. १८१३ ते इ. स. १८२१) यांच्या कारकीर्दीतील असून त्यांची संख्या १६९ आहे. या कागदांतील ऐतिहासिक मजकूर सारांशरूपाने पुढे दिला आहे.

सांवतवाडी प्रांत छत्रपति महाराज करवीर यांच्या हुजूर निसबत असतां वाडीकर सांवत यांनीं जबरी करून प्रांत घेतला. अलीकडे हुजूरचें सर्व राज्य आकर्षण झालें सबब महाराजांनीं कुंपणी सरकार इंग्रज बहादर यांची दोस्ती केली. तरी हा मजकूर इंग्रज सरकारास समजावून देऊन पूर्ववत्प्रमाणे वाडीकर सांवतांच्याकडे असलेली केवळ बारा खेडीं त्यांच्याकडे चालवून बरकड प्रांत हुजूरचा हुजूर यावा याविषयीं बोलण्यास कसूर न करता बोलून आपले काम अमलांत येई ते करावे, ही हकीकत सरूपजी खीर-सागर हुजरे वकील यांस पाठविलेल्या पत्रांत आहे (ले. १). पुढे या वकिलानीं पुणें मुक्कामीं बेटांत जाऊन एलफिन्स्टन व कर्नल क्लोज यांचीं भेट घेतली. त्यांनीं साहेब-बहादरास स्पष्ट सांगितले कीं, सिदोजी नाईक निंबाळकर देसाई निपाणीकर हे करवीर राज्यांतील प्रांताची लूट करून तेथील रयत खराब करीत आहेत आणि प्रांत अगदी ओसाड पडत चालला आहे. सबब हा बंदोबस्त करणे साहेबाकडे आहे. ही हकीकत ले. २ मध्यें आहे. कर्नल क्लोजने या वकिलाचे चौकशीस शेवटी उत्तर दिले कीं बाजी-राव रघुनाथ पेशवे यांजकडून जाबसाल होत नाहीत आणि पेशव्यांकडील कारभारी मना-वर घेत नाहीत त्यामुळे करवीर छत्रपति महाराजांच्या कांही महत्त्वाच्या बाबींचा तहा-न्वये निर्णय लागण्यास उशीर होत आहे. ही माहिती ले. ३ मध्यें आहे. छत्रपति महा-राज करवीर याजकडील जाबसाल करू नयेत, उलट ते पाठीमागे पाडावेत हे पेशव्यांचे पूर्ण मानस होते. तेव्हां एलफिन्स्टनसाहेब यास सावध करून, आजपासून महाराजांच्या जाबसालाविषयीं नेट बसवून जाबसाल ठरवून कामकाजाचा फडेशा करण्याबद्दल सक्त ताकीद महाराजांनी स्वरूपजी खीरसागर हुजरे वकील, करवीर यांना केली. ही माहिती ले. ११ व ले. १४ मध्यें आहे.

निपाणीकर देसाई यांनीं छत्रपतिमहाराज करवीर यांच्या गोरगरीब रयतेस हैराण करून व हुजूरच्या तालुक्यांची नासाडी करून इतकी खराबी केली कीं पुढें वर्ष-दोन वर्षे प्रांताची लावणी देखील होणार नाहीं, ही माहिती ले. १६ मध्यें आहे. यासंबंधी अधिक माहिती ले. १७ मध्ये आहे. निपाणीकर देसाई यांजकडील जाबसाल उलगडून घेण्याबाबत

ज्या वाटाघाटी झाल्या व ज्या अडचणी निर्माण झाल्या, त्यांची समग्र माहिती ले. १८,१९,२१ व २२ मध्यें आहे. निपाणीकर देसाई यांना छत्रपतिमहाराज करवीर यांची कन्या देण्याचा आग्रह करून हुजुरांचा बदनक्षा पदोपदीं केला त्यामुळे आबतात्र जाऊन, राज्याची खराबी होऊन शत्रूनें सर्व राज्य आकर्षण केले. इतका पल्ला येण्यास नरहर बापूजी देशपांडे, इंगळीकर यांची कारवाई कारणीभूत झाली ही माहिती ले. २५ मध्ये आहे.

पुढें निपाणीकर देसाई यांची गिल्ला व गुणदोष समजावून देऊन हुजूरचीं कामें झाडेनिसी करून घ्यावी याबद्दल स्वरूपजी खीरसागर हुजरे वकील व दिनकरराव गायकवाड यांना श्रीमन्महाराज मातोश्री आईसाहेब यानीं आज्ञापत्रें पाठविली (ले.३५, ३६). याच विषयासंबंधीं माहिती ले. ३८ मध्ये आहे. नेसरीकर सिंदे व मानसिगराव घोरपडे हे निपाणीकर देसाई यांजपासी राहून निपाणीकरांच्या अनुमतें करवीर प्रांतांत उपद्रव करण्याच्या उद्योगांत आहेत हा मजकूर ले. ४५ व ४६ मध्ये आहे. हुजूरची कामें होऊन यावयाच्या कलमाबद्दल एक यादी उपलब्ध आहे. त्यांत कांहीं कलमांचा तपसील पुढीलप्रमाणे आहे. (१) कागल परगण्यांतील सात गांवांच्या सोडचिठ्या झाल्या असतां ते गांव स्वाधीन झाले नाहींत. तरी सोडचिठीप्रमाणें गांव स्वाधीन व्हावे. (२) रायबाग प्रांताच्या जमीदाराच्या गांवच्या सोडचिठ्या झाल्या असतां कल्याणराव कृष्ण यांनीं हे जमीदार रुजू करून दिल्हे नाहींत. तरी आतां चिंचणीकर जाधव देसाई घोसरवाडकर सिंदे देसाई,जलालपूरकर देशपांडे व संवदुतीकर गोसावी या जमीनदारांनीं हुजूर रुजू व्हावे. मौजे सुलकुड या गांवावरी मानसिंगराव घोरपडे यांनीं स्वारी करून गांव दरोबस्त मारून नेला आणि गांवांत ठाणे घातले. त्यांस आंतून पाठिंबा निपाणीकर देसाई यांचा होता, याबाबत बंदोबस्त व्हावा. (३) अलीकडे निपाणीकर देसाई यांनीं नवीन वतनें जबरीनें करून घेतलीं आहेत. त्यांजविषयीं गांवगन्ना रोखे करून ते उपद्रव करतात. त्यांस प्राचीन असेल त्याप्रमाणें चालेल. ज्यास्ती नवीन वतनें जबरीनें करून घेतलीं आहेत तीं कांहीं निपाणीकर देसाई यांजकडे चालावयाचीं नाहीत याबाबत सुद्धा बंदोबस्त व्हावा. ही माहिती ले. ६९ व ७० मध्ये आहे.

वेदशास्त्रसंपन्न श्री बाबा महाराज व श्री नाना महाराज व श्री भाऊ महाराज यांस महाराज सरकारच्या राज्याचें कल्याण इच्छिण्याकरितां इनाम गांव व जमीन गांवगन्ना महाराज सरकारांतून धर्मादाय दिली असतांना श्री बाबा महाराज व श्री भाऊ महाराज यांनीं सत्कर्माची शरम सोडून, दौलतीचा लोभ करून, बदनीतीने महाराज सरकारांत वर्तणूक केली त्याचा सालवार तपशील ले. ७४ मध्ये आहे. त्रिंबकजी डेंगळे कुंपणी इंग्रज बहादराचे कैदेंतून पळून बंड करीत फिरतात. त्यांचा बंदोबस्त करण्याबद्दल राणोजीराव घोरपडे, सेनापति यांना एक आज्ञापत्र पाठविले (ले. ७८). करवीरकर यांनीं पुणें मुक्कामी इंग्रज बहादर यांजकडे कागल तालुक्यासंबंधीं गैरवाखा बोलणें लाविलें आहे, हें वृत्त हिंदुराव बाबा घाटगे सर्ज्याराव वजारतमाब यांना सिंदोजीराव नाईक

निंबाळकर सरलष्कर ऊर्फ निपाणीकर देसाई यांनीं कळविलें. ही हकीकत ले. ८१ मध्यें आहे.

राणोजीराव घोरपडे यांना सेनापतीचीं वस्त्रें देण्याबद्दल जो ठराव झाला, त्यांच्या कलमांची माहिती ले. ८४, ८५, ८६, ८७, ८८, ८९, ९०, ९१, ९३ या लेखांत आहे. पुढे राणोजीराव घोरपडे सेनापति यांना सरंजामसुद्धां हुजूर येण्याची आज्ञा झाली. हा उल्लेख ले. १०७ व ले. ११६ मध्यें आहे.

मागे वेलस्लीसाहेबाबरोबर माल्कमसाहेब आले होते ते हल्ली कलकत्याहून पुण्यास आले. तेथे बेटावर बहादरानीं करवीरकराच्या वकिलाबरोबर माल्कमसाहेबाची भेट करविली. त्या समारंभाचें वर्णन वकिलानें पुढीलप्रमाणे दिले आहे : "मलकमसाहेब याणी आंगास आंग लाऊन भेटून जवल बसले आणि महाराज छत्रपति यांची तबेत चांगली आहे ना म्हणून विचारले. त्यास तबेद चांगली आहे म्हणून उत्तर केलेवर महाराज छत्रपति यांची दोस्ती बहुत बहुत कदीम पुराणी आहे म्हणून येकदोन वेळा बोलोन हुजूरची तारीफ करून खूप होऊन आम्हांस विचारिले जे महाराज छत्रपति आपले जागेस स्वस्थ आहेत सर्वत्र ठिकाणाप्रमाणे नाही कीं याप्रमाणे मलकम साहेब याणी पुसिले. त्यास आम्ही उत्तर केले जे बाहाद्दर याचे दोस्तचे योगें करून स्वस्थ आहेत. याप्रमाणे बोलतांच बहुतच खूप होऊन महाराज छत्रपति यांसी आमचा मुजरा व आम्ही याद केली याविसी तुम्ही बहुत बहुत विनंतीपत्रीं लिहून पाठविणें; याप्रमाणे बोलोन विडेपान दिल्हे" ही हकीकत ले ९७ मध्यें सांपडते. निपाणीकर देसाई यांजकडील स्वार व पायदळ पटणकुडी व खडकलाट येथें दोन हजारपर्यंत जमा झाले, परंतु ते कोणीकडे जाणार येणार हें वर्तमान कांहीं समजत नाही. हें वृत्त ले. १०८ मध्यें आहे. शंकरराव सिंदे, सेनाखासखेल यांनीं छत्रपति महाराजांना बातमीपत्रें पाठविली त्यांत इंग्रजांच्या हालचालीची हकीकत आहे (ले. ११२, ११४). इंग्रजबहादर यांनीं छत्रपति महाराजांचे चिकोडी व मनोळी हे दोन तालुके महाराजांना परत द्यावयाचें ठरविले हा मजकूर धारवाड येथून पाठविलेल्या पत्रांत आढळतो (ले. ११७). याच विषयासंबंधीं अधिक माहिती ले. ११८, १२० व १२२, १२७, १२९ मध्यें आहे. साताराचे ग्रांट बहादर यानीं मंडरोल बहादरास कळविले कीं, हुजूरच्या तालुक्यांत ठाणें आकीवाट व रुकडी व टाकवडे वगैरे ठिकाणी महार, मांग, बेरड, रामोसी हल्ली आहेत. तरी तेथील बंदोबस्त करून चोरांची पारिपत्यें करावी. तेव्हा मंडरोल बहादर यांनीं कळविले कीं, राज्यांत महार, मांग, बेरड, चोर कोणी असतील त्यांची पारिपत्ये करून त्यापैकीं एक देखील ठेवू नये, याप्रमाणे प्रथम बंदोबस्त करावा. हे झाले नाही तर इंग्रज सरकारकडून पलटणे व लोक रवाना होऊन ज्या ज्या ठिकाणी मांग, बेरड, रामोशी असतील त्यांची पारिपत्यें करून त्या ठिकाणी इंग्रज सरकार ठाणी घालतील आणि ती ठाणी नंतर इंग्रज सरकार कधीही सोडणार नाही. तेव्हा हुजुरांनीं हा बंदोबस्त केला असे हुजुराकडून बातमीपत्र

पुण्यास, सातान्यास व येथें यावें. इतर किल्ल्यांच्या पेठेंत वगैरे गावगन्ना रामोसी, मांग बेरड कांही एक हुजुरानीं चाकरीस ठेवू नयेत. ही माहिती ले. ११९ मध्यें आहे.

चिकोडी हुकेरी वगैरे तालुका श्रीमन्महाराज छत्रपति यांनी कुंपणी सरकारांत दिला आहे हें वृत्त जनरल तामस मंडरोल साहेबांनी राणोजीराव घोरपडे सेनापति याना कळविलें (ले. १२३, १२४) पुढें घोरपडे सेनापतीची वर्तणूक हुजुरांच्या आज्ञेनें होत नाहीं. त्याकरितां हुजुराची मर्जी असेल त्याजकडे सेनापतीचा हुद्दा सांगून त्यास वहिवाट सांगण्यांत यावी हा मजकूर इंग्रज बहादर याचे कानावर घालण्याबाबत श्रीमन्महाराज मातोश्री आईसाहेब यानी मोरो बाजीराव चिटणिवीस यांना आज्ञा केली (ले. १२५).

कागल तालुका हुजुराचा आहे असे कुंपणी इंग्रज बहादर यानी ठरवून दिले आहे व त्याप्रमाणे इंग्रज बहादरांची कागदपत्रें आणून लाविली आहेत. ही माहिती ले. १३० मध्यें आहे. या विषयासंबंधी अधिक माहिती ले. १३८, १४१ मध्यें आहे. चिकोडी व मनोळी हे दोन तालुके महाराजांचे सरकारांत ठेवून राज्याची बढती झाली त्यांत कुंपणी सरकारची फार खुषी आहे. हा मजकूर माउन्ट स्टुअर्ट एलफिन्स्टन यानी छत्रपति महाराजांना पाठविलेल्या पत्रांत आहे (ले. १३२).

नारायणराव रत्नाकर राजाज्ञा यांजकडे भूदरगड किल्ला मामलतीनें होता. पुढे तो किल्ला भाऊमहाराजाचे जिमेस घेतला होता. हल्लीं तो हुजुराचे स्वाधीन केला, हा मजकूर ले. १३६ मध्यें आहे. अलीकडे नारायणराव घोरपडे यांना सेनापतीचा अधिकार हुजुरांनी दिला होता; परंतु त्यानी निपाणीकर देसाई यास मिळून स्वामीच्या पायाशीं बदमामली करून राज्याची खराबी केली, आणि तेही मृत्यु पावले. नंतर त्यांचे पुत्र राणोजीराव घोरपडे यांना सेनापतीचा अधिकार दिला होता. ते देखील सदरप्रमाणे वर्तणूक करूं लागले. सबब त्याजकडील अधिकार दूर करून, सेनापतीचे वडील घराणे ओळखून पूर्व वहिवाटीप्रमाणे सेनाधुरंधर विश्वासनिधि संताजीराव घोरपडे सेनापति यांना सेनापतीचा हुद्दा सांगून वस्त्रें देऊन सरंजाम स्वाधीन केला, हा मजकूर ले. १३७ मध्यें आहे.

राणोजीराव घोरपडे व त्यांना सामील असलेले मुरारराव घोरपडे यांचे पारिपत्य करण्याबद्दल व कापशीचे ठाणें हल्ला करून घेण्याबाबत हुजुरानीं एक योजना आंखली हें वृत्त छत्रपति आबासाहेब महाराज व छत्रपति बाबासाहेब महाराज यांनीं श्रीमन्महाराज मातोश्री आईसाहेब यांना कळविलें (ले. १४२). या विषयासंबंधीं अधिक माहिती ले. १४३ व १४३ (अ) मध्यें आहे.

कोंकण प्रांताचे मुलुखांत तालुके रत्नागिरी वगैरे ठिकाणी दुतर्फा अंमल फार दिवसापासून होता. तेथे दोन्हीकडील अंमलदारांच्या दुहीमुळे रयतेस उपद्रव होऊं लागला. याजकरिता दर्याफ्ती पाहून जिकडील तिकडे एकतर्फ अंमल करावयास

महाराजांकडून वकील रवाना व्हावा याबद्दल च्यापलीन साहेब कमिशनर बहादर यांनी छत्रपति महाराजांना पत्र पाठविलें (ले. १४८). तालुके भरतगड येथील महाराजांकडील किल्लेदार दुतर्फा गांवाचे रयतेस वगैरे लोकास कैद करून फारच उपद्रव करतात असा बोभाटा आला तेव्हां बंदोबस्त करण्याबद्दल च्यापलीनसाहेब कमिशनर बहाद्दर यांनी छत्रपति महाराजांना पत्र पाठविलें (ले. १४८). या विषयासंबंधी अधिक माहिती ले. १४९ व १५४ मध्यें आहे. भोज, लाट, रांगोंली, येकसंबे व कागल तालुका यासंबंधी जाबसाल होऊन यावयाचे होते. तेव्हां श्रीभाऊमहाराजांची स्वारी मुंबईस गेल्यानंतर तेथे त्यांच्याकडून जाबसालांचा उलगडा होण्याबद्दल प्रयत्न व्हावा; हा मजकूर मातोश्री आईसाहेब महाराज यांनी मोरो बाजीराव चिटनिवीस यांना पाठविलेल्या आज्ञापत्रांत आहे (ले. १५७).

वाडीकर सावंत व करवीर छत्रपतिमहाराज यांच्या मध्यें प्रांत व प्रांतांतील ऐवजाची वांटणी होण्याबद्दल जो तंटा चालला होता. त्याचा निकाल मौंट स्टुअर्ट एलफिन्स्टन यांनीं दिला (ले. १६५, १६६). छत्रपति आबासाहेब महाराज यांनीं कैलासवास केला त्यासंबंधीं माहिती ले. १६८, १६९ व १७० मध्यें आहे. अशा रीतीनें या पुस्तकांत आलेले १७० कागद मी वाचकांपुढें मांडीत आहें.

१३२१ कसबा पेठ, पुणें २
विजयादशमी शके १८८४
ता. ८-१०-१९६२

मा. वि. गुजर

श्रीमन्महाराज सर श्री शहाजी छत्रपति, जी. सी. एस. आय., बी. ए.,

हिंदुपद्‌पातशहा महाराज सरकार करवीर



जन्म :

फाल्गुन कृष्ण ९ शके १८३१

समर्पण

श्रीमन्महाराज सर श्री शहाजी छत्रपति, जी. सी. एस्. आय्., बी. ए

हिंदुपदपातशहा महाराज सरकार करवीर

यांना

महाराजांच्या प्रतापशाली राज्यकर्त्या

पूर्वजांसंबंधीं ऐतिहासिक माहिती देणारीं

करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाचीं साधनें, भाग ५

हें पुस्तक

संपादकानें प्रेमादरपूर्वक समर्पण केलें असे.

मा. वि. गुजर.

करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाचीं साधनें

(भा ग पां च वा)

कोल्हापूर स्टेट रेकॉर्डांतून निवडलेले कागद

लेखांक १ तारीख २०-४-१८१३

श्रीरामचंद्र

रु. नं. २
अ. नं. ३२१

चिरंजीव राजश्री सरूपजी खीरसागर हुजरे वकील यासी असीर्वाद उपरी वाडीकर सांवत यानी बाहादर यासी रेडी द्यावयाचा करार केला असता पुरे घेतल्यामुळे पलटणे जाऊन तंबी पोहोचविली आहे त्या पक्षी संस्थान घेतात ऐसीयास वाडी प्रांत हा हुजूर नि॥ असता देशकत यानी जबरी करून प्रांत घेतला त्यास हुजूरचे सर्व राज्य आकर्शन जाले येविसी इंग्रज बाहादर याची दोस्ती केली त्याहे त्या पक्षी हा मजकूर तुम्ही तेथे बहादर यासी समजाऊन देऊन पूर्ववत प्रभाणे बारा खेडी देसक याची याजकडे चालून वरकड प्रांत हुजूरचा हुजूर यावा येविसी बोलणेस कसुर न करिता बोलून काम आपले अमलात येई ते करणे या कार्याचा समय हाच आहे वरकड मजकुराविसी श्रियासह चिरंजीव विजयभव राजश्री छत्रपति याचे आज्ञापत्र तुम्हास सादर जाले आहे त्या प्रमाणे मेहणतीस आलस न करिता काम करून दाखवणे तुम्हाविसी सर्व ध्यानात आहे इकडून कमती पडावयाची नाही खातरजमा समजोन पराकाष्टा करून मनोदयानरूप कार्य व्हावयाचा समय जाणून लिहिले प्रमाणे मेहणत करून कार्य करून घेणे र॥ छ १८ माहे रबिलाखर सुा सलास आशर मयातैन व आलफ वाडीचे मजकुराची पत्रे चिरंजीव राजश्री नानाकडून आली त्याच्या तालका चिरंजीव राजश्री भाऊ माहाराज याजकडे पाठविल्या आहेत त्याजवरून तिकडील सविस्तर मजकूर तपसीलवार तुम्हास कळोन येईल छ मजकूर बहुत काय लिहिणे हे आसीरवाद. पौ छ २२ र॥कर चैत्रमास सुा सलास आशर मयातैन आलफ डाकवरून.

लेखांक २ तारीख २८-४-१८१३

श्री

रु. नं. २

अ. नं. २८४

यादी हणराबल मोट इस्टवारीट इलफीसतन बहादर यासी सरूपजी खीरसागर हुजरे वकील याचे बोलणे झालेला मजकूर सुा सलास आशर मयातैन व आलफ माहे रबिलाखर उर्फ चैत्रमास

१ छ. २५ रबिलाकर रोज मंगळवारी वकील बेटात जाऊन कुलूस साहेब याची भेटी जाहाली कुलूस बोलिले जे आबासाहेब याची उमर कीत पर्यंत आहे आणि राज्यभार चालवयाजोगे आहे की काय आणि बुवासाहेब हेही किती उमरींत आहेत आणि थोरली बाईसाहेब याचे पुत्र आणि धाकटीबाई साहेब याचे पुत्र कोणते ऐसे विचारिले त्यास वकील बोलिले जे आबासा थोरले बाईसाहेबाचे बुवासाहेब धाकटे बाईसाहेबाचे यैसे आहे तेव्हा ते बोलिले जे राज्यभार आबासाहेबानीच चालवावे ऐसे तुम्हामध्ये चाल आहे कीं नाही तेव्हा वकील बोलिले जे हीच चाल आम्हामध्ये आहे तेव्हा ते बोलिले जे आबासाहेब मसलतीत हुशार आहेत कीं काय तेव्हा वकीलानी उत्तर केले जे आजपर्यंत महाराजाचे जीवावरी खेळून होते व तेथून खाना शिकार करून होते तेव्हा माहीत कैसी सांगावी परंतु हे पुत्र माहाराजाचे त्यास सांगावे ऐसे लागणार नाही महिने दोन महिनेन सर्व माहितगिरी होऊन आपणासही समजेल तेव्हा विचारिले जे उभयतामध्ये हुशार कोण आहेत हे बोलावे तेव्हा वकील बोलिले जे उभयता खबरदारच आहेत परंतु बुवासाहेब हे आजून वय थोडके आहे थोर जाहाले नंतरी समजेल तेव्हा वर्षे विचारिल तेव्हा वकील बोलिले आबासाहेबास वर्षे तेरा चालली आहेत व बुवासाहेबास नऊ वर्षे आहेत तेव्हा कुलूस बोलिले जे तेरा वर्षांत झाडून राज्यभार त्यानी चालवावे ऐसे आम्हास दिसते तेव्हा वकील बोलिले जे हे खरच आहे हेही चालवजोगेतच आहेत तर मग तुमचे दौलतीचा बखेडा व्हावयाचा नाही ऐसे असलेचे दिसण्यात आले यावरून आम्हास संतोष जाहाला इतके बोलून विडे आणविले नंतर वकील बोलिल जे दाहा रोज झालेशिवाय विडे आम्हास घेता येत नाही खरे असो आता दाहा वाजले तुम्ही पुढे जावे आणि श्रीस व आपासाहेबास सांगावे जे साहेबाची स्वारी आपले बिन्हाडी येत आहे याप्रो कुलूस बोलून नंतरी वकील आले तो इतक्यात मागाहून भादर व कुलूस व हुरमोजीसेट व बापू साने असे स्वारीसुध्दा श्रीचे बिन्हाडी आले श्रीस व दिनकरराव आपा याचे शांतवन करून नंतरी येकांती बोलणेस खोलीत श्री व दिनकरराव आपा व बहादर कुलूस वकील ऐसे पांच आसामी खोलीत बसून एक घटका बोलणी जाहाली नंतरी आस्तमानी बाहादर निघोन आपले बेटास गेले. कलम

१ छ. २६ रबिलाखर रोज बुधवार वकील बेटात जाऊन बाहादर व कुलूस याची भेटी

होऊन बोलणी जाहाली बाहादर बोलिले जे आज आम्ही पेशवेकडील वकीलास बोलाऊन सांगितले जे तुम्हाकडून व तुमचे सरदाराकडून व हरकोणाकडून माहाराज छत्रपति कोल्हापूरकर यासी उपद्रव केल्यास आम्हास वाईट दिसेल यास्तव तुम्ही दरोबस्त राखाव तेंव्हा पेशवेकडील वकील बोलिले जे आमचे श्रीमंतास किंवा सदासिव पंत भाऊस त्यांचे राज्याची व हरयेक विषियीचा लोभ नाही आणि आम्हाकडील कोणी सरदारही उपद्रव करणार नाहीत आणि श्रीमंतानी व सदाशिव पंतानी पत्रे निपाणकर यास पाठविलेली दाखविली तेंव्हा आम्हास दिसते जे पेशवे करारात शाबूत आहेत ऐसे बाहादर बोलिले नंतरी वकील बोलिले जे ऐसे खरच त्यापेक्षी निपाणकरच आमच्या प्रांताची लूट करून रयत खराब करीत आहे व प्रांत अगदीच वसाड पडीत चालिला आहे हे व बंदोबस्त करणे साहेबाकडे आहे इतक बोलतोच बहादरानी थोरात याजकडील यादी पेशवे यानी आणून दिलेली वकीलास देऊन बोलिले जे गंगाधर जोशी तुमचे अटकेत आहेत तो असो द्याव आणि ही यादी हुजूर पाठवावी आणि श्रीस व दिनकरराव आपा यास सांगावे जे तुम्हाविसी व तुमचे काजकामाविसी पेशवे याचे वकीलास आम्ही निक्षून ताकीद केली आहे बरे म्हणून वकील निघोन आले ... कलम

आम्हास मात्र अडचणी पाडतो यास्तव आपण आमचे तर्फे जे साहेबास बोलाव जे निपाणकर यासी दटा पोचल्याशिवाय कामे नमोद्यात येत नाहीत तेंव्हा कलोस बोलिले जे तैसेच होईल नंतरी वकील बोलिले जे कालचे जाबसालाचे उत्तर काय आहे पेशवे याजकडे सांगून साहेबानी पाठविले आहे याप्रमाणे बोलणेची उत्तरे जाहाली नंतरी वकील बोलिले जे निपाणीहून दारूगोळ्याचें बैल तीस व पांचशेहे पायदळ घाटाखाली गेले इंग्रज बहादर याचे लष्करात जातो म्हणोन बोलिले ऐसे लिहिने आले आहे तेंव्हा कलोस बोलिले जे कोणत्या घाटाने व मार्गाने गेले याचा तपसील आहे कीं काय तेंव्हा वकील बोलिले जे तपसीलवार लिहून आणवितो परंतु साहेब आता आम्हास बहुत आबानुग आहे कीं माहाराज छत्रपति याची मर्जी नकी आहे याजकरिता लवकर काजकामे करून गेलो असता मरजी पसंद होईल नाहीतर कोणीकडे जाईल कळत नाही छत्रपति कैलासवासीही मर्जी आम्हास येक दोन वेळा कामे करून कळली होती यास्तव लवकर गेले असता याची मर्जी संतोष होईल यास्तव साहेबास अर्ज केला आहे नंतरी कलोस बोलिले जे बरे आहे कामेही हुजूरचे मर्जीनरूपच होतील याप्रमाणे बोलणे होऊन वकील उठून आले. कलम.

लेखांक ३ तारीख २-५-१८१३

हू.

रु. नं. २

अ. नं. ३२२

यादी हनराबल मोठ इष्टवारीट इलफीसतन बहादर याचे बेटात सरूपजी खीर-

सागर हुजरे वकील जाऊन बोलणी जाहाली सुा सलास आशर मयातेन व आलफ छ १ माहे जमादिलवल उर्फ वैशाख श्रु॥ द्वितीया रोज रविवार ....
१ छ मारी वकील बेटात जाऊन कुलूस याची भेटी होऊन कुलूस बोलिले जे मुंबईहून जनराल साहेबाचे लिहिणे मालवणविसीचे आले आहे कीं गोपालसेट कुसे याजकडे येवज तुम्ही पांच हजार येकदा आणखी पाच हजार येकदा यैसे दोन तीन वेला हुजूरून खत देऊन रुपये त्याज पासून घेतले आहेत आणि त्यायैवजी कदलगाव व दुसरे येक गाव व त्याचा बेपाराचा म्हसूल जकाती बदल येसा ध्यावा त्यास त्याप्रमाणे आम्ही त्यास चालवणे प्राप्त आहे याचे उत्तर काय ते सांगावे आणि हैबतराव गाईकवाड यास तेथे जमीने वगैरे चालत आहे त्यास ते चाकरी हुजूर करितात आणि मालवणातून त्यास चालवणे कारण काय व श्रीमन्माहाराज मातुश्री बाईसाहेब याचे चौथाईचा आमल पैकी मीठ वगैरे पोहचते होते त्याआन्वये मालवनास त्याचा म्हसूल जमा करून ठेविला आहे नंतरी वकील बोलिले जे आपण सांगितले प्रमाणे कुसे याचे देणेघेणे चालत होते हे खरच आहे परंतु त्याचा शोध करून काय तो जाबसाल सांगू व हैबतराव दादा याचाही माहितगिरी पाहून उतर करू येकून सारांष तह पाहून काय तो जाबसाल श्री————स जाऊन विनंती करून हुजूर श्री————चे पत्र पाटऊन तहआन्वये जाबसाल होईल आपल्यासी म्हणोन आम्हाकडून हरयेकविसी वाकडेपणा वागणार नाही वाजबी तह-अन्वयेच होईल परंतु कालचे जाबसालाचे उतर जाहाले नाहीं काय हे तेव्हा कुलूस याणी उत्तर केले जे पेशव्याकडून जाबसाल होत नाही त्यास आम्ही काय करावे आम्हास येसे दिसते जे पेशवे आल्याविना काम कोणतेही होत नाही त्याजकडील कारभारी मनावर घेत नाहीत तेव्हा पेशवे आल्याविना होत नाही येसे मजला दिसते परंतु साहेब मात्र आगोदरच करतील की काय हे न कले नंतरी वकील बोलिले जे याणी आठ रोजाचा करार केला असता कारभारी बोलत नाहीत. तेव्हा साहेबानी त्यास बोलावे यातील आम्ही काय सांगावे तेव्हा ते बोलिले जे खरे आहे मग हे बोलिले जे हे साहे-बास विचारून आम्हास उदईक यातील भाव समजला पाहिजे आम्ही तो सर्व गोष्टी-निशी लाचार आहो हुजूर लाख दीड लाख रुपयेचा खर्च आला आहे त्यास आदा कोठे कांही येक नाही व खर्चाची येथील तेथील तंगच्याई आहे ही साहेबास वारंवार सांगतच आहो. याप्रमाणे बोलिलो नंतरी खरच आहे म्हणून उतर केले.————कलम..

लेखांक ४ तारीख ३–५–१८१३

श्री

रु. नं. २

अ. नं. ३२३

यादी हणराबल मोट इस्टवारीत इलफीसतन बहादर याचे बेटात सरूपजी क्षीर-सागर हुजरे वकील जाऊन बोलणी जाहाली सुा सलास आशर मयातेन व आलफ

छ २ जमादिलावल उर्फ वैशाख शुध्द त्रितीया रोज इंदुवार

१ छ मजकुरी वकील जाऊन कुल्रुस साहेब याची भेटी होऊन बोलणी जाहाली जे भरतगडाविसीचे हुजूरून लिहिणे आले आहे कीं राजश्री उदाजी घाटगे सर्ज्याराव याने हुजूर विनंती पत्र लिहिले होते त्यात मजकूर मालवणकरी याजकडून दुतर्फा अमलात मालवण तर्फे पैकी कारकून माहालात आला आहे त्यासही चाल पहिलेपासून नाही भरतगडाकडून ताकीद पत्रे जात असोन ऐवज नेमून दिल्याअन्वये नेहत होते ते न करिता किलेचे परभारा वकील केल्यास किल्याचा आबे रहाणार नाही त्यास कुल्रुस बोलिले जे यैवजाचे कसे करावे म्हणता तेव्हा त्यानी उत्तर केले (फाटलें) ऐसी साहेबाची ताकीद जाहाली जावी नंतरी पुढे तह पाहून काय करणे ते येथेच ठरवून दिल्यानंतर मालवणास वहिवाट करणेस ठीक पडेल सध्या मालवणाकडे म्हणून आमचे बोलणे कांहीएक न घालावे नंतरी कुल्रुस बोलिले जे बार आहे तेव्हा फिरोन वकील बोलिले जे तहत लिहिले आहे जे जमीन किलेचे खर्चाची मात्र मालवण किल्याचे खर्चाची किल्याकडे असावी याचा अर्थ कसा आहे नंतरी कुल्रुस बोलिले जे किल्याचा खर्चाची वहिवाट पेशजी प्रमाणे किल्याकडे चालत असेल ते जमाबंदी पाहून खर्चास आम्ही द्यावी तेव्हा वकील बोलिले जे हे खरे परंतु तहत कांहीं जिल्हे खेडी ऐसी रुजविली नाहीत तेव्हा हुजूर मुत्सुदी समजले आहेत कीं जी जमीन व बागबागाईत किल्याचे आसपासी असेल तीच घेतील बाकीची गाव खेडी जिल्हेसुध्दा आम्हाकडे राहातील तेव्हा कुल्रुस बोलिले जे हे बोलणे निभवणार नाही तहतही ऐसी अर्थ नाही तेव्हा वकील बोलिले जे हे बोलणे व ठरवणे यास तह दरम्यान साहेब असतील ते दिवसी ठरवून करावी यास अंदेशा पडणार नाही परंतु मजला ऐसे दिसते कीं जो ऐवज किल्यास खर्च न लागता हुजूर करवीरास जात असेल व धर्मादाव देवस्थानह खर्च पेशजीचे अन्वये जिकडील तिकडे द्याव लागेल नंतरी कुल्रुस बोलिले जे मालवणातील हली धनीपणा कोणाकडेस आहे तेव्हा वकील बोलिला जे आपणाकडेस आहे परंतु तुमच्या आमच्या विचारे ठरणे ही गोष्ट तहकूब आहे नंतरी कुल्रुस बोलिले जे आम्हास काय किल्याचा खर्च दिला म्हणजे जाहाले तेव्हा वकील बोलिले जे हे बोलणे कैसे घडेल आपला अमल त्यापेक्षा आलबत लाख दोन लाखचा खर्च किल्यास लागेल तो आम्ही कोठून द्याव आणि दुसरी तहनामा बरा नाही हक किल्यापैकी हुजूर (फाटलें आहे) मी आपले तर्फेने सांगतो कीं किला जंजिरायात नारळाची झाडे आहेत याचाच केवळ सलाह्य हक हुजूर घेतात ऐसे नाही आम्हीही आपणास केवळ घसावे हाही अर्थ नाही परंतु कोकणांतून जिन्नस हुजूर येण्याचा जागा तोच आहे बाहादरास म्हणून कोणत्या जिनसास कमी नाही हे समजोन करावे आदी हुजूरचे सर्व प्रकारे चालवणे साहेबाकडे आहे नंतरीं वकीलानी विचारिले जे आज हुजूरून लिहिने आले आहे व थैलीही श्रीची साहेबास आली आहे परंतु घोसरवाडकर पाटील याचे घर आमचे ठाणे बसल्या नंतरी त्याचे लोक जाते समयी पाटिलाचे घर लुटून नेले व इंगळी ठाणे प्रांतातील शेत जोसीराव

घोसरवाडकर याचे वतन निपाणकर यानी अंतस्थ याजकडून घेऊन वतन सोडून दिले आणि तैसेच इचलकरंजीकर याचे आठ रोजात खेडी सोडून देत आहेत तेव्हा ऐसे वर्तणूक त्याची आणि आपणाकडून तगादा कांहीं त्यास जाहालेविणा कामे उलघडणेत येत नाहीत आणि तो श्रीमंतास भलतच सला (फाटलें आहे) करण्यात आणिकच करितो तेव्हा (अपूर्ण)

लेखांक ५ तारीख ५-५-१८१३

श्री

रु. नं २
अ. नं. २८६

यादी हनराबल मोटइस्टावारीट इलफीसतन बहादर याचे बेटात सरूपजी खीरसागर हुजरे वकील जाऊन बोलणी जाहालेला मजकूर सुा सलास आशर मयातेन व आलफ माहे जमादिलावल उर्फ वैशाखमास

१ छ ४ जमादिलावल रोज बुधवार वकील बेटात जाऊन कुलूस साहेब याची भेटी होऊन बोलणी झाली त्याचा मजकूर छ मजकूर हुजूर तपसीलबार यादी लिहून पाठविली आहे त्याची तालीक बापूजी शिवराम याजकडे आहे. ———————— कलम

१ छ ५ जमादिलावल रोज गुरुवार वकील बेटात जाऊन कुलूस साहेब याची भेटी होऊन बोलणे जाहाली कुलूस बोलिले जे मालवणच्या गुराबा वगैरेबिसी साहेब पत्रे लिहीत आहेत भरतगडाचे तालुकची वहिवाट आम्हाकडून जाहालेस चांगले पडेल आणि तुमचाही फायदा होईल नंतरी वकील बोलिल जे मालवणाची चत्ती आम्हाकडे द्याल किंवा परभारे पाटवणे कुलूस बोलिले जे हे कांही कळले नाही तेव्हा वकील भरतगडाविसीचा मुलाजा × × कडोन वहिवाट जाहाली असता आमच्या म्हणण्याचा आब राहणार नाही यास्तव आमची वहिवाट पूर्वी प्रमाणे भरतगडाकडे चालावी नंतर तह पाहून तहआन्वये करणेस येईल उदईक श्रीची स्वारी येणार साहेबास विचारूण ठेवाव पुढे मी येऊन आपली भेट घेऊन स्वारीस बोलावणे पाटववयासी येईल परंतु हुजूर श्रीमन्महाराज मातोश्री बाईसाो यासी थैली साहेबाची एक द्यावी आणि त्यात दस्ताऐवज मर्जी संतोष येई ऐसे लिहावे नंतरी कुलूस बोलिले जे साहेबास विचारून काय ते सांगू याप्रमाणे बोलणे जाहलेला मजकूर. ———————————— कलम

१ छ ६ जमादिलावल रोज भृगुवार वकील बेटात जाऊन कुलूस साो याची भेटी होऊन बोलणे जाहाली कुलूस बोलिले जे मालवण प्रकर्णी पत्र साहेबानी बोलाऊन मुंबईस गेले आहे नंतरी वकील बोलिले जे मालवणचे लिहिणे भरतगडाविसीचे काय जाहाले त्यास कुलूस बोलिल जे काल आम्ही बोलिलो तेच बरे आहे वकील बोलिले जे तो भाव ठीक नाही आम्हीही कालच आपल्यासी बोलिलो आहो स्वारी येण्याचा हुकूम काय आहे

त्यास कुल्स बोलिले जे उदईक सायंकालचे पाच वाजले नंतरी स्वारी घेऊन यावी वकील बोलिले जे उदईक स्वारी येईल त्यावेळेसच साहेबाची समक्ष भरतगडाविसी समक्ष बोलणे होईल कुल्स बोलिले जे स्वारी तूर्त येणार हे बोलणे काय आहे त्यास वकील बोलिले जे हमेशा ज्या कामास बोलणेस येतात तेच बोलणे दुसरे काय आहे नंतरी कुल्स बोलिले जे आमचे म्हणणे असे आहे कीं भाऊ माहाराजास घडीघडी येण्याविसी आयास नसावे तसेच बोलणे कांही जरूर असल्यास चिंता नाही नंतरी वकील बोलिले जे हली मजला ऐसे बोलणे दिसते जे पूर्वी तह आपण केले आहेत त्याचे बोलणे चालणेचा करार होऊन गेला त्या पेक्षा सात कल्माचा तह खरा करावा ऐसे म्हणतील नंतरी कुल्स बोलिले जे सात कल्माची तह हा बरा होता परंतु तुम्हाकडून गोष्ट गेली तुम्ही चवदा कल्माची यादी लिहून आमचेही सात कलमाचे खालीं कल्म लिहिले तेव्हा आता ते कैसे घडेल नंतरी वकील बोलिले जे सात कलमाशिवाय × × × जरी आम्ही × × कमजास्ती केल्या होत्या परंतु साहेबास मालवण देण्याचा करार त्यात कांही किलाप पडला नव्हता परंतु तह मोडून दुसरा करावयाची जलदी जाहाली यास्तव साहेबाचे ऐकोण आज आम्ही आठ महिने वाट पाहिली तेव्हा महिन्या दोन महिन्याच्या कामास दिवस गुदरले म्हणोन श्री येवून बोलणार आहेत जे दोनीही तह खोटे जाहाले प्रांताचा साहेबानी चवकसी करून ज्याचा होईल त्यासच द्यावा नंतरी तह ठरवाव यापमाणे वकील बोलिले त्यास कुल्स त्यानी उत्तर केले नाही नंतरी वकील बोलिले जे थैलीविसी रोजगुदस्ता आपणास सांगितल होत त्याचे काय जाहाले त्यास कुल्स यानी उत्तर केल जे हुजूरच्या थैल्या येणार आहेत त्या आल्या नंतरी तुम्ही सांगितल्या अन्वये उतरे देऊ त्याप्रमाणे बोलणे जाहाले. —— —————— कल्म.

लेखांक ६ तारीख ६-५-१८१३

रु. नं. ५

अ. नं. ४४१

दरीविला हुजूर चिरंजीव राजेश्री छत्रपति याचे चिताचे शांतवन करणे करिता राजश्री शंकरराव शिंदे सेनाखासकील किल्ले तोरगलाहून येत आहेत त्यास आ शोकत पन्हाहाणी रहदारीचे दस्तक व हरकारे जोडी एक सेनाखासकील याजबराबर देऊन पोहचते होय ते करावे. सु॥ सलास आषर मयातेन व आलफ र॥ छ ५ माहे जमादिलावल जियादा काय लिहिणे हा आसीरवाद.

लेखांक ७ तारीख २२-५-१८१३

श्री

रु. नं. २
अ. नं. ३२४

श्रीमन्महाराज राजश्री छत्रपति स्वामीचे शेवेसी

शेवक मल्हारराव होळकर कृतानेक विज्ञापना येथील क्षेम तागायत वैशाख व।। ७ पर्यंत महाराजाचे कृपेकरून यथास्थित असे विशेष तीर्थरूप माहाराज बाबासाहेब याचे शरीर स्वस्त नव्हते दैवी मानवी उपचार बहुत केले परंतु गुणास न येता कैलासवासी जाले येविसीचे वृत्त तुम्हास कलावे म्हणोन आज्ञापत्र सादर जाले ऐसीयासी माहाराज परलोक पावल्याचे वर्तमान कळताच चितास परम खेद जाला आयुष्य मर्यादा व ईश्वरी इच्छेस उपाय नाही स्वामीनी विवेक चिताचे सांत्वन करून शेवक लेकाचा सांभाळ केला पाहिजे शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना पौ छ १ माहे रजब सु।। आर्बा आशर मयातेन व आलफ ऊर्फ आषाढमास.

लेखांक ८ तारीख २४-५-१८१३

श्री

निवडी दप्तर रुमाल नं. २
अ. नं. ३५२

श्रीमन्माहाराज राजश्री संभाजी राजे
छत्रपति स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक वामनराव गोविंद आपटे नि।। श्रीमंत पंतप्रधान विज्ञापाना ऐसीजे गंगाधर लक्ष्मण जोसी माजी मामलेदार तालुके वालवे हे करवीरी ठेविले होते ते आमचे स्वाधीन कर्णेविसी श्री भाऊ माहाराज याचे पत्र व इंग्रेज बाहादूर याचे पत्र राजश्री कृष्णराव वकील यास आणिले त्याजवरून जोसी यास आमचे स्वाधीन करून दिल्हे ते आम्हास पावले आम्ही पत्राअन्वये पुण्यात बेटात नेऊन रूजू करून देऊ मिा शके १७३५ श्रीमुखनाम संवत्सरे वैशाख वद्य ९ ऊर्फ छ २२ जे।।वल सन सलास आशर मयातैन व अलफ सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक ९ तारीख ३-६-१८१३

श्री

रु. नं. २
अ. नं. ३३०

आबासाहेब छत्रपति व बाबासाहेब छत्रपति राजश्री महिपतराव पारसनवीस रावजी

गोसावी यासी अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य श्ने॥ स्वरूपजी खीरसागर हुजरे रामराम विनंती येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिले पाहिजे विशेष येथ राजश्री पुतोबा आनंत बाबा याही हुजूरचे शेवेसी आपलयाकडोन काही लभे पोचावी म्हणोन गलबत विलायती सामज्यामसवे लवगाचा केला आहे ते हुजूर पाटवावे तर गलबते हल्ली चालत नाही गलबते चालती जाहाली म्हणजे गलबतामध्ये लवगाचे गलबत पाठवून देऊ गलबताचे वर्तमान मुखजबानी विठू सांगेल त्याजप्रमाणे हुजूर विनंती करावी राजेश्री धोंडोपंताविसी आजम जनराल बहादर यास इनाथतेनामेची थैली पाट-वावी कीं धोंडोपंत याजकडे रुपये चार हजार मुंबई शिका स्वरूपजी खीरसागर दिले आपणाकडेस बोलण्याकरिता पाटविले होते तेव्हा त्याचे खर्चाकरिता रुपये चार हजाराची मुसी धोंडोपंताकडेस पाटविली होती ते तुम्ही त्यास खर्चास दिले सबब त्याजकडे रुपये तैसेच राहिले हुजूरूहून आज्ञापत्र पाटविल्यावरून खीरसागर याही मागितले त्यास ते बोलिले कीं पेशजी आम्ही तुमचे काम जनराल बाहादर यासी बोलणे करून दिले त्याचे खर्चाबद्दल रुपये काय जाहाले आहेत ते देऊन तुम्ही आपले रुपये घेऊन जावे नाहीतर रुपये देणार नाही म्हणोन हुजरे याजवळ सांगितले आणि त्याचे खर्चाचे रुपयाचा मजकूर तर पेशजी तुम्ही पत्रात लिहून हुजूर पत्र आले होते आणि हुजरे यासी तुम्ही सांगि-तल्यावरून एक पैसा खर्च न करिता रुपये आणिले आणि मशारनिले याचे खर्चाचे रुपये घ्यावे म्हणतात तेव्हा तुमचे मर्जीस येते कीं काय ? नाहीतर त्यास ताकीद करून रुपये द्यावे आपण तर मना केले आणि धोंडोपंत मागतो हे ठीक नाही याजकरिता लिहिले आहे म्हणोन जनराल यासी पत्र पाटवावे म्हणजे रुपये येतात नाहीतर रुपये तो देत नाही हे पुर्ते समजले आहे वरकड मजकूर विठोजी राजवाडे सांगतील त्याजवरोन कलो येईल समजून घेऊन पत्राचें उतार देऊन सत्वर रवाना कराव आपण कोणते गोष्टीचा मनात संकोच न आणिता हुजूर विनंती करून पत्र सत्वर येई ते करावे बहुत काय लिहिणे लोभ करावा ही विनंती र॥ छ ३ जा॥खर.

लेखांक १०	तारीख १४–६–१८१३

श्री

रू. नं. २

अ. नं. २८९

यादी सादुल्लाखान पठाण समधी कागदपत्र सुा आर्बा आशर मयातैन व आलफ छ १४ जा॥खर

१ सदर पावती रुपये व घोडी व वारणापार करावे येकून तीन कलमाची सर पावती येक

१ हैबतराव गाईकवाड विश्वासराव याची साडेसात हजार रुपयाची चिठी येक

२ सरलष्कर व जप्तनमुलूख वगैरे सरदार व जमातदार सिदी आरब याचा कागद येक पठाण यास नदीपार करू देणेविसी उपसर्ग न कर्ण्याचा कागद लिहून दिल्हा तो

१ बाबा महाराज याणी पंधरा हजार रुपयाचे व पठाणास वारणापार करून देणेविसी निशा चिठ्या दिल्या त्या
१ हुजूरचे आज्ञापत्र दोनशे रुपयाची घोडयाचे येवजा पैकी
१ हुंडी घोडयाचे रुपये पौ आमचा हवाला देऊन आमास बहिरजी भोसले याजवर पुण्यास हुंडी लिहूण दिल्ही ती हुंडी पटली नाही सा परत आली ती
१ राजाआज्ञा याणी स्वदस्तुरची चिठी साडेयकवीस हजार रुपयेची व घोडी देणेविसी लिहून दिल्ही ती

लेखांक ११

तारीख १६–६–१८१३

श्री रामचंद्र

रु. नं. २

अ. नं. २९०

चिरंजीव राजश्री सरूपजी खीरसागर हुजूरे वकील यासी असीरवाद उपरी अलीकडे तुम्हाकडून विनंती पत्र येऊन सविस्तर लेहून येत नाही हे काय ते कलत नाही असो इकडील सविस्तर मजकूर चिरंजीव राजश्री भाऊ माहाराज याचे पत्री लिहिला आहे त्याजवरून तुम्हास कलेल हली राजश्री पंतप्रधान याची स्वारी तेथे येऊन दाखल जाहाली व मोदी व राजश्री सदासिव पंत भाऊ वगैरे निपाणकरसुधा च्यारी तोंडे येक होऊन आली आहेत अश्यास पेसजी बहादर याजकडून इकडील कामकाजाचे बोलणे नेटाचे लागताच कोपरगावचे स्वारीचे उपस्थित करून मागे चिंतोपंत यास कामकाजाचे बोलणेस ठेविलेसे करून स्वारी जाण्यापुर्ती फडपोसीची समज पाडून स्वारी गेली नंतर मागाहून चिंतोपंतही गेले त्यानी चोल्कर यास जाबसालास ठेविलेसे केले आणि ते गेल्यानंतर चोल्करही गेले असे कित्यक मतलब करून आजपर्यंत जाबसाल पाटीवर पाडिला हा अनुभव आलाच आहे त्यास हलीही श्री पंढरीस स्वारी जाण्याचे टिपण समीप आलेच आहे अशास पेशजी सारखेच आपले जाबसालाचे पाटीवर टाकाव याबा। नाना प्रकारची निमित्य योजून चौघास च्हूकडे कामगारीस म्हणोन रवाना करून फुटाफूट करावी आणि जाबसालासमयी अमुक नाहीत म्हणावे आणि तूर्त श्रीचे यात्रेस जातो म्हणोन निघोन जावे याप्रकारे मतलब होतील इकडील जाबसाल करू नयेत पाटीवर पडावे हा पूर्ण मानस त्याचा आहेच हा तुमचे ध्यानात नाहीस? नाही यास्तव बहादर यास तुम्ही सावध करून आजपासून आपले जाबसालाविसी नेट बसऊन कोणीही कोठे जाऊ नये व आमचा जाबसाल ठरून कामकाजाचे फैसले जाल्याखेरीज स्वारीही जावयाची नाही याप्रो आतापासोन बहादर याजकरवी बंदोबस्त करवणे येविसी चिरंजिवास व चिरंजीव राजेश्री दिनकरराव गो (गायकवाड) यासही पत्री तपसीलवार लिहिले आहे परंतु मेहनत करणे हा इरादा तुमचा आहे येथील व तेथील चिरंजीव राजश्री भाऊ माहाराज याचे

मुखत्यार तुम्हीच आहा त्यास हा समय काजकामे व्हावयाची संधी यात मेहनतीविसी आलस तुम्हाकडून जाहाला असता येक आणि चुकली तरी बारा वर्षांची हयात असे म्हणणे आहे त्याप्रमाणे होईल याजकरिता विस्तरे लिहिले आहे तरी मेहनतीस कसूर न करिता लिहिलेप्रमाणे बंदोबस्त करून कामकाजाचे नेट बसवून लवकर उलगडयात आणोन निर्वेधपणा होये तो अर्थ करणे इतके दिवस राहून मेहनत केल्याची सार्थकता आता या संधीस जलद जलद करणे येथून फार कोठवर लिहोन कलवावे तुमचे मेहनतीचे रूप तुमचे मनोदयानरूप व्हावयाविसी इकडून हुजूरसुध्धा कोणाचेही गैरलक्ष नाही येविसी कालजी न करिता हुशारीने लिहिले प्रमाणे जलदी करणे. रा। छ १६ माहे जा।कर सुा आर्बा अशर मयातैन व आलफ. बहुत काय लिहिणे हे आसीरवाद.

लेखांक १२ तारीख १८-६-१८१३

श्री

रु. नं. २

अ. नं. २९१

यादी तूर्त सोडचिठया येणेचा तपशील सुा आर्बा आशेर मयातैन व आलफ

१ सिंदेचा तह जाहाला त्या तालेबंदावर हुकूम चिकोडी तालुका खेरीज करून हुकेरी परगना हुजूरचा हुजूर याव

१ मनोली तालुका खेरीज करून मुरगुड परगणा व सतीगिरे व वटनाळ वगैरे आमल हुजूरचे हुजूर चालावे १ परगणे मजकूर पैकी सरंजामी व इचलकरंजीकर व दुमालेसुधा हुजूर रुजू होऊन चाकरी करीत जावी २७ परगणे रायबाग

२० किता

१ कसबा रायबाग	१ मौजे निलजी
१ मौजे यलगूड	१ मजरे हुंबरवाडी
१ मौजे नांदणी	१ कसबा येकसंबे
१ मौजे भोज	१ मौजे नसलापूर
१ मौजे मोरब	१ मौजे बोमनाल
१ मजरे लाट करवाडी	१ मौजे भिरडी
१ मौजे दानवड	१ मौजे सिरगाव
१ मौजे शिरगूर	२ सितोले नि॥
१ मौजे यडराव	१ मौजे आंकली
१ मौजे निडगुंदी	१ मजरे शिरुपूरवाडी
	——
१ मौजे डिगेवाडी	२
——	——
११	९

३ किता

१ मौजे चिंचली का। हवेली देसाई जाधवराव

१ मौजे घोसरवाड का। येकसंबे देसाई शिंदे

१ मौजे जलालपूर का। रायबाग देशपांडेकडे

३

३ धर्मादाय

१ मौजे संवदुती का। हवेली कर्णगिरी गोसावी याजकडे

१ मौजे नागराल का। हवेली चिकोडीकर ब्राम्हणाकडे

१ मौजे तेरवाड का। शिरोल श्री येकनाथ बावा याजकडे

३

१ मौजे हेरवाड का। शिरोल हरीपंत याजकडे

२७

९ मामला मिरज प्रा पनाला पैा

१ मौजे लाट

१ मौजे रेनदाल

१ मौजे इंगळी

१ ठाणे हुपरी

१ मौजे सुल्कूड

५

१ मौजे टाकळी वाडी सुधा

१ मौजे बस्तवाड

१ मौजे शिरदवाड

१ मौजे हेरवाड

४

देह ९

६ आजरे तर्फ

१ मौजे शिपूर

१ मौजे इंचनाळ

१ मौजे किणे

३

१ वौंजे जरळी खुर्द

१ मौजे महागाव

१ मौंजे वाटंगी

३

देह ६

१ परगणे कागल झाडेनिशी खेडी व ठाणी सुधा
७ कटकोळ तालुका

१ कसबा मजकूर
१ मौजे भेंडकट्टर
१ मौजे भंडारहळीं
१ मौजे च्यारबागी

४

१ मौजे तोरणकटे
१ मौजे करकटनाळ
१ मौजे बोचबाळ

३

देह ७

२ मौजे लक्किटे व मोजे मलगाड तर्फ हेरे येकून देह
१ किले गंधर्वगड नि॥ बाबा

४ तर्फ खानापूर
१ मौजे खानापूर
१ खानापूर मजरेवाडी खेरीज करून

२

१ मौजे गंगापूर
१ मौजे निलपण या.ची सोडचिठी दिली आसता गाव सोडून दिला नाही

२

--- देह ४---

१ तह जाहाले तारखेपासून वसूल हुजूरचा याने घेतला आहे तो हुजूर देवावा
१ नेरलीकर याजकडील बायामुले मानसासुद्धा व बापू नरहर देशपांडे व दत्ताजीराव खानवेलकर व मानसिंग माने व गावमनाच्या बोली व बंद सुधा झाडेनिशी सुटोन यावी

१३

येकून कलमे तेरा याची यादी आलफिष्टन बहादर याजपासी सरूपजी खिरसागर हुजरे वकील यानी नेऊन दिली असे छ १८ जमादिलाखर उर्फ जेष्ट वद्य ५ रोज भृगुवार.

लेखांक १३ तारीख २३–६–१८१३

श्रीरामचंद्र

रु. नं. १
अ. नं. २०३

वेदमुहूर्ति राजश्री बापू चिपोलणकर यासी प्रतिवासुदेव पंडित नमस्कार व दिनकरराव

गाईकवाड दंडवत विनंती उपरी विशेष आम्ही तुम्हापासून पुण्याचे मुकामी खर्चाकरिता घेतले कर्ज मुद्दल रुपये २००० दोन हाजार चांदवडी आंकुसी व्याज दरमाहा दर सेहे रुपये येकोत्र्याप्रमाणे देऊ सदरहू ऐवजास मुदत आजपासून तीन महिन्यानी व्याज व मुदल हिशेब करून देऊ मिती शके १७३५ श्रीमुखनाम सवंत्सरे माहे जेष्ठ वा॥ १० देशमी बहुत काये लिहिणे हे विनंती.

लेखांक १४ तारीख २३–६–१८१३

श्री

रु. नं. २

अ. नं. २९२

यादी हनराब्ल मोठईष्टवारीठ इलफीस्तन बहाद्दर याचे बेटात सरूपजी खीरसागर हुजूरे वकील जाऊन आजम करनेल कुलूस याची भेटी होऊन बोलणी कुलूस स॥ याची जाहालेली सुा आर्बा आशर मयातैन व आलफ छ २३ जमादिलाखर उर्फ जेष्ठ वद्य दशमी रोज बुधवार

१ वकील बेटात आज जाऊन कुलूस याची भेटी होऊन हुजूरची थैली आलली दिल्या तेव्हा कुलूस बोलिले जे थैलीत मा॥र काय आहे तेव्हा वकील याणी उत्तर केले काल साहेबाचा खलिता आम्ही घेऊन करवीरास माहाराजास पाटविला होता त्याचे उत्तराची थैली असे तेव्हा कुलूस बोलिले जे बर आहे परंतु निपाणकर हा कोठे × फा × ट × ले × ले × आ × हे × × × × समजले आहे कीं काय तेव्हा वकील बोलिले जे आम्ही ऐकतो कीं श्रीमंताचा निरोप आठ रोजाचा घेऊन लग्नास गेला आहे नंतरी कुलूस बोलिल जे लग्न कोणते गाव होणार हे कांहीं तुम्हास कलले कीं काय तेव्हा वकील बोलिंले जे सातारास लग्न करणार आहे यैसे येकितो मग कैसे आहे कोण जाणे आम्हास हुजूरून पत्रे श्रीस व दिनकरराव आपा याच्यापासी आली आहेत कीं पेशजी राव पंडित प्रधान याणी काजकामाविसीचे मतलब करून गेले तसेच हलीही श्री पंढरीस जाणार याविसीचा बंदोबस्त बाहदराच्या कानावरी घालून राखाव नाहीतरी पुन्हा बाजीराव यासी सोडलेस कामास हिसके पडतील तेव्हा कुलूस बोलिंले जे काल सारा दिवस साहेब तुमचेच कामात होत आणि आजही तुमचेच कामात आहेत आणि येसा इरादा आमचा आहे कीं तुमची कामे जाहालेविना राव पंडत प्रधान बहादर याची स्वारी जाऊ देऊ नये कदाचित गेलेस त्याचा आमचा तहाचा बिघाड होईल तेव्हा वकील बोलिले जे बहुत बरे आहे परंतु हुजूरच्या पत्रात आणखी काम आहे जे आम्ही बहादराचे दोस्तीने शत्रुविसी आराम आहो परंतु रयेतस बहुत दुख होत आहे बहादुराचे इकडे येणे जाहालेपासून सर्वत्र ज्याहणातील रयतेस सुख आहे आमचे राज्यात मात्र

रयतेस सुख नाही याचा अभिमान बहादरास असाव नंतरी कुल्स बोलिले जे आमचाही इरादा हाच आहे जे तुमचे मुल्कातील रयतानी (फाटलें आहे) साहेब याचा यत्न चालिला आहे काल पेशवेकडील वकील आले होते त्यास साहेबाचे बैठकीचे बेत परवा केला आहे यावेलेस ते बोलिले जे निपाणकर हा येथून गेला तो आम्हास कोणांस ठाऊक नाही आसो परवा साहेब तुमच्या कामाकरिता जाणार तोपर्यंत किव्हा तुमचे काम नमोदयात येई तोपर्यंत श्रीची स्वारी व आपासोच्या येण्याचे तहकुबी आसावी काजकामे सुरलतीने उलगडलेस पंत प्रधान देवास जातील इतक्यावर नायेकिता गेल्यास बिघाड होईल पुढे ईश्वरसता कैसे होईल पाहवे नंतरी वकील बोलिले जे स्वामीनी आजपर्यंत इतक्या मेहणती केल्या सारख्या लौकीकच करतील परंतु गावात बातम्या पंत प्रधान या कामास हिसके देतील म्हणून बोलतात त्याजवरून श्री व आपासो आजुरदा होतात कुल्स बोलिले जे आम्ही कामास जलदी करणेस आलस किमपी करीत नाही आणि पेशवेकडील कारभारी हिसके देतात त्यापेक्षा बिवाड होऊन तहतले करार मागे पडतील मग पुढे ईश्वर आहे नंतरी वकील बोलिले जे काल वाडीकर याजकडील आनंदराव व कृष्णाजीपंत आले होते साहेबाची भेटीस ते समई बोलणी साहेबाची काय जाहाली कुल्स बोलिले जे बोलणे म्हणून काय नाही आमचे साहेब तेथे बोलणार आहेत यासी काय बोलणे ते बोलावे येथे आम्हासी बोलणेची माहितगारी नाही येणे प्रमाणे बोलणे होऊन विडे दिल्हे.

लेखांक १५ — तारीख ३०–६–१८१३

श्री

रु. नं. २

अ. नं. २९४

राजश्री व्यंकाजी सदासीव ठाणे हुपरी गोसावी
यासी

श्नो। सिदोजीराव नाईक निंबाळकर सरलष्कर दंडवत विनंती उपरी मौजे मजकूरचे ठाणे सरकारात स्वाधीन कराव ऐसे ठरावात येऊन हे पत्र लिहिले असे तरी हे पत्र घेऊन सरकार तर्फचे कारकून येतील त्याचे स्वाधीन करून कबज घेणे राजश्री गुंडो जिवाजी व नारो वेंकाजी याजकडील कारकूनही येईल त्याचे विद्यमाने हवाली करणे. र॥ छ १ माहे रजब सुा आरबा आशर मयातैन व आलफ बहुत काय लिहिणे हे विनंती.

लेखांक १६

तारीख १-७-१८१३

श्री

रु. नं. २

अ. नं. २९६

चिरंजीव राजमान्य राजश्री दिनकरराव भोसले यासी आज्ञा केली ऐसीजे तुम्ही राजेश्री सदासीव अनंत याजबरोबर विनंतीपत्रे पाठविली ती प्रविष्ट होऊन लेखनार्थ निवेदन जाहला हुकेरी तालुकेत वगैरे कर्यातीत गांवगनानी निपाणकर यानी वसुलाची निकड बसवून मारामार करीत आहे ठाणे हुपरी येथील जखीरा वगैरे काय होत ते काढून नेहून गावास दाहा हाजार रुपये घेतले गावची कुल धरून मारहाण करीत आहेत काय उत्पन्न होईल ते करून घेऊन नंतर गावचा बंद धरून कोगनोळीस नेऊन ठेवणार याप्रमाणे करीत आहेत गोरगरीब रयत याची हैयराणगत करून तालुकेची नासाडी करून खराबी करावी म्हणजे पुढे वर्षे दोन वर्षे प्रांताची लावणीदेखील होऊ नये याप्रमाणे आरंभिले आहे येविसी श्रीस निनंती पत्र लिहिले आहे तेच बहादरासी दाखवून वसुलाची मनाई सत्वर होई ती गोष्ट करावी येविसी दिबसगत होऊ नये वरकड मजकुराची आज्ञा होणे ती मागाहून आज्ञापत्री होऊन येत आहे त्यावरून कलेल जाणिजे सु॥ आर्बा अशर मयातेन व आलफ रा॥ छ २ माहे रजब बहुत काय लिहिणे.

लेखांक १७

तारीख ७-७-१८१३

श्री

रु. नं. १

अ. नं. २०४

यादी ———————————————— नकल

———————————————————

१ मौजे हिंगणगाव कर्यात कुंभोज येथे हुजूरचे ठाणे असता कुंभोज कर्यातीची सोडचिटी जाहाली त्याप्रा॥ ठाणी बसवितेवेलेस मौजे मजकुरी निपाणीकर याजकडून विश्वासराव घाटगे सर्जेराव याणी लोक पाटवून हुजूरचे ठाणे जबरीने उठवून ठाणेत लोक आपले घातले आहेत.

कलम

१ मौजे येळगुड प्रा रायबाग हा गाव श्रीकडेस हुजूरुन चालत होता तो निपाणीकर याणी ठाणे बसविले होते नंतर रायबागचे कर्यातीपैकी सोडचिट्या जाहाल्या सबब मौजे मजकुरी ठाणे बसवावयासी लोक जाऊन ठाणे बसले होते नंतर निपाणीकर याणी आपले लोक पाठऊन ठाणे उटवून दिले आणि लोकाची बेआब्रू करून लाऊन दिल्हे.

कलम १

१ को रुकडी हा गाव हुजूरचा सोडचिटी देऊन ठाणे बसतेसमयी संदी पाहून मौजे मजकूर येथील पाटील परागंदा होऊन माणगावाला होता त्या पाटलाचें दाव्हेचे निमित्य करून मौजे मजकुरावर लोक पाटऊन गाव लुटून नेला. कलम

१ येशवंतराव घाटगे सर्जेराव याज नि॥ कारकून राजश्री चिमणाजी मुजूमदार कागलात सर्जेराव याचे घरी असता त्याजवर हिंदुराव घाटगे सर्जेराव याणी विनाकरणी पांचशेहे रुपयेचा रोखा व शंभर रु॥ मसाला करून लोक पाठवून बेआबरू करून बसविला आहे या गोष्टीस एक महिना कमबेश जाहला आहे. कलम

१ मौजे निलपण तो खानापूर याची सोडचिटी असता ठाणे सोडून दिल्हे नाही जबरी करून ठेविले आहे. कलम

१ मौजे खोची येथील खंडणीचा कतबा हिंदुराव घाटगे सर्जेराव याणी घेतला आहे त्यास हाली तगादा बसविला आहे तो मना होऊन कतबे माघारे यावे. कलम

१ का॥ येकसंबे येथील रैता आ॥ च्यार नेहून बाळगोंडा पाटील याणी मारल्या आहेत या गोष्टीस पंधरा दिवस जाहाले आहेत. कलम

१ मौजे बस्तवाड येथील पाटलाचे घर लुटून चीजवस्तसुद्धा घेऊन गेले आहे सोड-चिट्या जाहाल्या नंतर. कलम

१ मौजे नांदणी प्रां रायबाग येथील सोडचिटी असता ठाणे हुजूरचे बसले होते ते माघारे उठवून दिल्हे. कलम

१ बोली कैदेत आहेत त्या यावयाच्या

१ बापू नरहर देशपांडे इंगळीकर यासी

नाईक याणी सोडोन देणे म्हणोन करवीराहून विच्यारावयासी गेला असता पेशजी मोकला होता त्यास आग्रहाने बेडी घालून बेडकीहालचे ठाण्यात ठेऊन हाल करीत आहेत

२ दत्तबा खानवलेर आा

१ मानसिंगराव माने

१ जोत्याजीराव कदम त्याचा बंधु

२ यादोराव जाधव याची मेहुनी आईसुद्धा धरून नेली आहे किलातून हिंदुराव यानी

१ नेरलीकराची मुल माणसे

४ मुल आा

१ आपा

१ बापू

१ भाऊ

१ तात्या

४

७ बैका

१ काकुबाई

१ सकुबाई

१ सुंदराबाई

१ लक्ष्मीबाई

१ भगवतीबाई

१ सौ आमाआकाबाई

१ सौ भवाणीबाई

७

१२ कारकून वगैरे

१ येसाजी कृष्ण कुटुंबसुद्धा

१ खंडो महिपत कुटुंबसुधा

१ आबाजी मल्हार कुटुंबसुद्धा

१ बाळकृष्ण आबाजी वाडीकर कुटुंबसुद्धा

१ माहादाजी रामाजी याचे कुटुंब

१ आपाजी रामचंद्र याचे कुटुंब

१ नागो रायाजी

१ नारो हरि

१ अंताजी विश्वांभर

१ कासी खंडो

१ सखंभट

१ भगवंत त्रिंबक

१२

१ बटकी कोण असतील त्या

१ चाकर कुटुंबसुद्धा जे असतील ते

२५

कारकुनास बेड्या घालून तस्ती करून पैका मागतात.

....

१ मौजे बहिरेश्वर ता। हवेली येथील पाटील परागंदा होऊन निपाणीकर याचे तालुक्यात राहून मौजे मजकुरावर दावे करून मनस्वी गावची नासाडी केली व मोकासी याचा बंधु जीवे मारिला आहे कलम १

१ मौजे कडोली प्रांत मिरज या गावच्या रयतास निपाणीकर पुण्याहून गेल्यानंतर मारहाण करून ऐवज घेतला आहे. कलम

१ मौजे हेर्ले येथील उसाचा फड निपाणीकर पुण्याहून निपाणीस जाते समयी मौजे मजकुराचे फडानजीक खुद्द आपण उभे राहून दरोबस्त फड लुटिवला. कलम

१ किले सामानगड येथे निपाणीकर याजकडील मामलेदार बाळगोंडा लोक घेऊन किले नजीक जाऊन किले सभवता फिरत ताकीद करीत गेला जे कोणी किल्याखाली माणूस उतरल्यास पारपत्य करून बेडया घालीन याप्रमाणे बोलला. कलम

१४

एकूण कलमे चौदा सरूपजी खीरसागर हुजरे वकील याजपाशी यादी देऊन आलफीसतनबहादर याजकडे होणेस पाठवून दिली सुा अर्बा आशर मयातेन व अलफ रा॥ छ ८ माहे रजब ऊर्फ आशाढ शुध्य ९ नवमी रोज बुधवार.

लेखांक १८ तारीख २५-७-१८१३

श्री.

रु. नं. २

अ. नं. ३२६

श्रीमन्महाराज मातोश्री आईसाहेब यानी

चिरंजीव राजमान्य राजेश्री दिनकरराव भोसले यासी आज्ञा केली ऐसीजे काजकामाचा प्रकार लौकर उलगडून येणेचा अर्थ दिसत नाही कामाची मंदी दिसती यातील अर्थ काय आहे हे कांही निवेदनात येत नाही निपाणकर मतलबी लबाड आहे चार रुपये कबूल करून कामास हिसका देईल बहादर यानी नेठ बसवून सभोवता पाहारा पल्टणाचा दिल्हा इकडे अजम कर्नेल डोस बहादर याचे लष्करची तयारी होताच निपाणी वगैरे त्याजकडील ठाणी गडबडली होती ती सांप्रत काली स्वस्त आहेत त्याजवरून काज-कामाची मंदी दिसोन येती राजश्री नारो गिरमाजी याजकडील विनंती पत्र वद्य एका-दसीचे आले त्यात विनंती लिहिली कीं निपाणकर याजकडील स्वालजाब बोलण्या चाल-ण्याने उलगडावे असा भाव येथील दिसतो आगोधर तयारीची गडबड जाहाली होती तो मजकूर आता कांही दिसत नाही अजम कर्नेल डौस बाहादर याणी निपाणकर यास हुजूरून सनद पंचवीस हजाराचा सरंजाम आहे त्याची तालीक व सरंजामास कोणकोणते गांव दिल्हे आहेत त्याची माहितगारी सांगणे म्हणोन विचारिले त्यासमयी आम्ही उत्तर केले कीं आपणास कांही माहितगारी पुर्ती नाही तेव्हा डौस बहादर यानी सांगितले जे करबीरास लेहून पाठवून सनदेची तालीक व गाव कोणकोणते दिल्हे आहेत याची यादी याप्रमाणे आणवून आम्हास समजाऊन देणे यातील काय मतलब आहे समजत नाही याप्रमाणे विनंतीपत्र आले त्याचे आज्ञोतर दिल्हे कीं यादी व सनदापत्रे सर्व पुणीयास श्रीबरोबर नेहली आहेत तुम्हीही तिकडे लेहून पाटवणे म्हणजे उत्तर काय ते येईल याप्रमाणे मशारनिलेचे पत्राचे आज्ञोतर देऊन पाठविले हे तुम्हास कलावे करिता लिहिले

आहे सरंजामाची यादी व सनद मागणेचे कारण काय यातील जमव कांहीं समजत नाही तरी सविस्तर विनंती पत्री लिहावे तुम्हास जाऊन नऊ महिने जाहाले अद्यापि काजकामाचा उलगडा नाही हाली इंग्रज बहादर याणी निपाणकर यास नेट बसविला असता प्रांतातील वसूलही निकड करून घेत आहेत तुम्हास तो कामे × × या प्रमाणे निखालस बहादर बोलतात आणि निदर्शन × × तेव्हा यातील काय मनोदय आहे हे पुर्तेपणे समजून घेणे निपाणकर यासभोवता पलटणाचा पाहरा दिल्हा तेव्हा हुजूरचा मनोदय होता कीं निपाणीवर पाच गोले तरी उडावे ऐसा होता तो बहादर याणी सिधीस न्हेणेचा उद्योग केला आहे यैसे दिसण्यात आले होते परंतु नारो गिरमाजी याचे विनंतीपत्रावरून व दिवसगत होत चालली या आर्थावरून तो संकेत घडून यावा ऐसे दिसत नाही आणि काजकामेही उलगडोन येण्याची जिकर दिसती त्या पेक्षी पुढील परिणाम काय बाहादर याचे भरोशेवर आजीपर्यंत मार्ग प्रतीक्षा होत आली आता कामकाजे उलगडोन येण्यास मंदी जाहल्या पेक्षा सर्वोपरी पेचात येऊन पुढे निर्वाहाची जागा राहिली नाही तरी आता दिवसगतीचा प्रकार न होता बाहादर यासी निक्षून बोलोन यातील काय ते उत्तर सत्वर विनंतीपत्री लेहून पाठवणे वरकड सविस्तर मजकूर श्री याणी व चिरंजीव राजेश्री हैबतराव गायकवाड विश्वासराव यानी लिहिला आहे त्यावरून कलेल जाणिजे सुा आर्बा आशर मयातेन व आलफ रा। छ २६ माहे रजब बहुत काय लिहिणे.

लेखांक १९ तारीख २५-७-१८१३

श्री

रु. नं. २

अ. नं. ३२५

श्रीमन्महाराज मातोश्री आईसाहेब याणी चिरंजीव राजमान्य राजश्री दिनकरराव भोसले यासी आज्ञा केली ऐसीजे साहेबाचे शेवेसी तुम्ही विनंती पत्र छ १६ छ १७ रजबची पाठविली ती प्रविष्ट होऊन लेखनार्थ निवेदन जाहला छ १५ रोज बुधवारी पेशवेकडील राजेश्री आनंदराव मल्हार व मल्हार रेनूराव व बाबा चोलकर व दप्तरदार तीन आसामी रुमालसुधा व निपाणकर याजकडील आपाजी लक्ष्मण व लिंगो मल्हार ऐसे सर्वत्र बेटात बाहादर याजकडे आले होते प्रथम पेशवेकडील वकीलासी बोलणे जाहाले नंतर निपाणकर याजकडील वकील यास आत बोलाऊन नेऊन उभयता वकीलाची बोलणी ६।७ घटका पर्यंत बहुत हर्षामर्षाची जाहाली त्यातील भाव सविस्तर तुम्ही विनंती पत्री लिहिला तो निवेदन जाहला बहादर यानी उभयताकडील वकीलाची बोलणी ऐकून घेतली उत्तर म्हणून कोणासही केले नाही नंतर सायंकाळ होताच सर्वत्रास विडे देऊन लाऊन दिले आणि हुजूरचे वकीलासही बोलाऊन विडे देऊन निरोप दिला म्हणोन विनंती पत्री लिहिले मुख्य गोष्ट हुजूरची काजकामे व पेशवेकडील कामे उलघडोन घेतलेशिवाय

निपाणकर याचे लष्कराभोवता पाहरा आहे तो उटवीत नाहीत आणि निकडही आहे तैसीच आहे म्हणोन सविस्तर विनंती लिहिली ती निवेदन जाहाली अशास काजकामे सत्वर उलघडोन येणेचा अर्थ होय तो करणे व सविस्तर वृत दररोजचे होईल ते विनंतीपत्री लिहून पाठवीत जाणे वरकड सविस्तर मजकूर श्री यानी व चिरंजीव राजश्री हैबतराव गायकवाड विश्वासराव यानी लिहिले आहे त्यावरून कळल जाणिजे सुा आर्बा अशर मयातैन व अलफ रवाना छ २६ माहे रजब बहुत काय लिहिणे पो छ ११ माहे शाबान सन आर्बा आशर मयातेन अलफ.

लेखांक २० तारीख २६–७–१८१३

श्री व्यंकटेश प्रसन्न

रु. नं. ५
अ. नं. ४४७

राजेश्री स्वरूपजी खीरसागर गोसावी यासी

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्ने।। संभाजीराव सिंदे सेनाखासकील रामराम विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लिहीत जावे विशेष अलीकड तुम्हाकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाही तरी वरचेवर पत्र पाठवून चित्त संतोषवीत असाव कडकोलची सोडचिटी अद्यापि आली नाही तुम्ही तेथे प्रसंगी आहा सोडचिटी लवकर पाटवून द्यावी वारंवार पत्र पाठवून तुम्हाकडील बरवेपणाच वृत्त लिहून संतोष याव बहुत काय लिहिणे लोभकीजे हे विनंती.
पौ छ २७ माहे रजब सुा अर्बा आशर मयातेन व आलफ उर्फ आषाढ.

लेखांक २१ तारीख १४–८–१८१३

श्री.

रु. नं. २
अ. नं. ३०४

चिरंजीव राजेश्री दिनकरराव गायकवाड यासी प्रति हैबतराव गाईकवाड विश्वासराव आसीरवाद उपरी येथील कुशलता श्रावण शु।। १२ पावेतो जाणोन स्वकीय कुशल लेखण करीत असावे विशेष आलीकडे तुम्हाकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाही त्यासंबंधे सविस्तर लिहून पा। यानंतर ठाणे अकीवाटकर याणी मौजे टाकलीचे वाडीची रयत निपाणीकर नि।। कमावीसदार यानी मारामारी करून गुरढोरसुद्धा विकून जितका उत्पन्न होईल तितका ऐवज घेतला आणखीही उपद्रव करून मारामारी करून लागल ते पत्री कोठवर लिहावे सबब अकीवाटास रयत येऊन तेथील लोक घेऊन रयत व कमावीसदार यास ठाणेस घेऊन आणि सखाराम हरबाजी यास पत्र लि।। तेच

बजिनस पाटविले आहे त्यास तेविसी बहादर यास निपाणीकर याजकडून कलेल्च आणि व्यतय आणतील यास्तव प्रसंगानुसार बोलणे बोलून व्यतय न ये ते करावे आणि लेहून पाठवावे येथून अकीवाटास सखाराम हरबाजी यास पाटविले आणि परशराम नाईक व रामचंद्र पंत नेन यास आणविले आहेत आणि टाकलीचे वाडीतून कमावीसदार आणला आहे त्यास सोडून द्यावे याप्रो सांगून मशारनिलस आताच रवाना केले आहे या प्रो निरयाण जाहाला यास्तव यातील जसा प्रसंग पडेल तैस बहादर यासी बोलणे होऊन व्यतय न ये ते करावे आणि सरकार आज्ञा न सांगता त्यानी असे केले त्याजवरून त्याचेही पारपत्ये योजिल आहे कळावे कमावीसदार व कुले सोडून देणेबद्दल हुजूरचे आज्ञापत्र व हुजरे रवाना केले आहेत रोजच्च रोज डाके बराबर पत्रे रवाना करीत जावी आलीकडस चार पांच दिवस पत्रे येत नाही. पौ छ १६ माहे शाबान सन अर्बा आशर मयातेन व आलफ

लेखांक २२

तारीख–२५–८–१८१३

श्री गजानन

रु. नं. २

अ. नं. ३०६

राजश्री वेंकाजी यसवंत गोसावी यासी

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्रो॥ त्रिंबकजी पाटील डेंगळे रामराम विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणे विशेष राजश्री सरलष्कर याजकडून सोडचिठ्या जाल्या तेथे आमल तुम्ही बसवावा दुसरे कोठे उपद्रव देऊ नये असे असता श्रीमंत माहाराज करवीरकर याचे गावास उपद्रव तुम्ही दिला म्हणोन बोभाट सरकारात आला त्याजवरून आम्हास आज्ञा जाली याकरिता सोडचिठ्या प्रमाणे अमल तुम्ही घ्यावा करवीरकर याजकडील गावास उपद्रव तुम्हाकडून जाला असल्यास तेथील तसनस जाली असेल ते जराबाजरा भरून देऊन पुन्हा त्याजकडील गावास वगैर व दुमाल्याचे कोणाचेही गावास येकंदर उपद्रव देऊ नये र॥ छ २७ माहे साबान सु॥ आरबा आशर मयातेन व आलफ बहुत काय लिहिणे ही विनंती.

लेखांक २३

तारीख ३–९–१८१३

श्री रामचंद्र

रु. नं. १

अ. नं. २४०

चिरंजीव राजश्री सरूपजी खीरसागर

हुजरे वकील यासी आसीरवाद उपरी इकडील सविस्तर मजकूर चिरंजीव राो

सदासीव अनंत यास समजाऊन देऊन पाठविले आहेत त्याप्रमाणे समजोन घेऊन चिरंजीव राजश्री भाऊ माहाराज तुम्हास सांगतील त्याअन्वये बेत होऊन उतरे पाटवणे यानंतर तुम्ही आजपर्यंत सरकार काजकामाविसी एकनिष्टपणे इमानेइतबारे लक्ष धरून या मजलीस कामकाजे आली त्यास सदरहू तुम्हाकडून तुमचा यत्न चालू देऊ नये येविसी कोणकोणाचे उद्योग प्रयत्न पुरःसर होत आले व तुमचे यत्नास पुरवणीचे बल देऊन तुमचे हातूनच यत्नसिधीस न्याव अशाप्रकारे कोणाकडून उद्योग पाटपुरवणीचे बळाने कसकसे होत आले हे उभयपक्ष तुम्हास तपसिले लेहून आज कलवावे असे नाही तुमचे ध्यानात असोन तुम्ही माहितच आहा तरी पूर्वी तुमची येथे समक्ष बोलणी होऊन तुम्ही वचन घेतलेच आहे ते पुरतेपणे स्मरणात राखोन त्याचअन्वये चिरंजीव राजेश्री भाऊ माहाराज व चिरंजीव राा दिनकरराव याचे विचारे काजकामाचे उलगडे अंती सत्वर होऊन येत असे करणे काजकामे लांबणीस पडोन विलंबामुळे येथे बहुतप्रकारे बहुत नाना प्रकारच्या वल्गना करीत आहेत. र।। छ ७ माहे रमजान बहुत काय लिहिणे हे असीरवाद.

लेखांक २४

तारीख ३–९–१८१३

श्री रामचंद्र

रु. नं. १

अ. नं. २०५

श्रियासह चिरंजीव विजयभव राजश्री राजे आबासाहेब छत्रपति यासी असीरवाद उपरी येथील कुशल तागायत भाद्रपद श्रुध्द ८ रोज भ्रगुवासर वर्तमान यथास्तित असे विशेष आपण छ १ माहे रमजान तेरखीचे पत्र पाटविले ते पाऊन लिहिला मजकूर कल्ला वाटारकराकडून ऐवज आपलेकडे कसकसा पावला त्याच्या तेरीखवार यादी सत्वर करवून पाटवून द्याव्या वाटारकर याचे देणेचा फडशा उल्गडणे आहे याजकरिता हिशेब करणेस्तव तेरखा पाहिजेत म्हणोन लिहिले त्यास आपले लिहिल्या प्रमाणे या तपसील तेरीखवार जमा ऐवज पावला आहे त्या प्रा़ो मागाहून सरकारच रवाना होतील + + + शा उल्गडणेचे एकूण संतोष जाहाला निपाणीकर + + (याणी) प्रांतातील वसूल घेतला आहे तो माघारा देणेचा बहादर याणी ठरवून यादी ठरविली असेल त्या प्रा़ो तो ऐवज वाटारकर याचे देणेच्या उपयोगी पडल आगर न पडल याचा विच्यार तपसीलवार लिहून पाटवणे म्हणोन लि।। त्यास वसूलचा ऐवज यावयाचा खराच परंतु तूर्त या + ण्याचे म्हणोन उपयोगी नाही आलियानंतर आपण सांगतील तिकडे द्यावयासी येईल बहुत काय लिहिणे आसीरवाद पै।। छ १४ माहे रमजान सु।। आर्बा अशर मयातेन व आलफ.

लेखांक २५ तारीख ९-९-१८१३

श्री मार्तंड प्रसन्न

रु. नं. २

अ. नं. ३४९

पौा छ २७ रमजान सन आर्बा

आशर मयातैन व अलफ

आसीर्वाद उपरी येथील कुशल तो छ १३ माहे रमजान पर्यंत इकडील वृत यथास्थित असे विशेष पूर्वील वहिवाटदार यानी रो स्वरूपजी खीरसागर यासी आपलासा करून घेऊन पत्रे आणविली जी पूर्ववतर प्रमाणे वहिवाट याची याजकडून घेत जावी ऐसी पत्रे आली ती काली सात तास रात्रीं तिर्थस्वरूप श्रीमन्महाराज मातोश्रीसाहेब यासी निविदने केली असे तथ्यच समजणेत आले त्यास तेथे श्री भाऊ माहाराज व तुम्ही प्रसंगी असोन चारी संधाने रक्षित असता सदरहू प्रमाणे पत्रे घेऊन पाठवणेचा काट कसा जाहला हा मजकूर नेहमी सहवासामुळे चर्येमुद्रेत रंग ध्यानात येऊन त्याअन्वये बंदोबस्त व्हावा तो न होता आसी गोष्ट जाहाली बरे असो इतक उपरी तरी स्वरुपजीस हरप्रकारचे स्वार्थ दाखऊन आपले मिलणीत घेणेविसी श्री व तुम्ही हरयत्न करून कशपी लाऊन घ्यावा लाहाण मनुष्य त्याचा कद तो किती म्हणोन अव्हेर सहसा न करिता त्याजकडून वेलभंडार घेऊन श्रीचे व तुमचे विचारा खेरीज कोणताही विचार न करावा येविषीची पुर्तेपणे खातरजमा करून घ्यावी पूर्वील वहिवाटदार याजकडून येथे बहुतेक प्रकारे करून कारस्थाने चालली आहेत कोणतेही प्रकारे विक्षेप घालून आम्हावर गैरमरजी व्हावी आणि आपला मतलब सिध्ध व्हावा ऐसे विचार चालले आहेत ऐसीयासी बाहादर याजपासी बोलणे व्हावे जे राजश्री नरहर बापूजी देशपांडे इंगळीकर यासी भाणभाष-क्रियापुरस्कर कृष्णोदक घालून विश्वास दिला आणि निपाणीकर याजकडे देशपांडे मशार-निले याचे चिरंजीवास स्वाध्धीन करून दिल्हे यात बदलौकीक होताना हुजूरचा जाहाला तैसेच निपाणीकर यासी कन्या देणेचाही आग्रह त्यानीच करून हुजूरचा बदनक्षा पदोपदी केला तेणेकडून आबताब जाऊन राज्याची खराबी होऊन शत्रूने सर्व राज्य आकर्षन केले इतकाही पला येणेस मूळ हेच ग्रहस्त ऐसे कित्येक प्रकारचे मजकूर जबानी राजश्री सदासिवपंत यासी समजोन दिल्हे आहेत हे बोलतील त्या अन्वये राजश्री नरहरपंत देशपांडे यासीच बेटात बाहादर याजकडे नेऊन युक्तीचे मार्गे सदहू पर्याहे बोलणेत आणोन काय जी नासाडी जाहाली ती याचे योगे करून जाहाली ऐसे पुर्तेपणे ध्यानात भरावयाचे रीतीने बोलून आपले साधनाचे उपयोगी बहादर याची थैली हुजूर घेऊन पाठऊन द्यावी येविसी हैगई जाहालेस क्षणाने क्षण त्याची काटगिरी अधिकच होत आहे त्यापक्षी पुढे निरोपा-यच पडणार हाल्ली आम्ही इंग्रजी राज्यकारणाचे कामात या जरबावर दुसरेस दाब पडून कामे सुरलीत चालावी ते येकीकडे राहून आम्हीच दुसरेचे जरबाने असावे ऐसे जाहा-लेस चिंता नाही राज्याचे तरी कल्याण व्हावे ते न होता आपेशाचे समयी आम्हीच

संकटी पडावे ऐसे होईल याजकरिता मशारनिले यानी कामात नसावे ऐसे तेथून लिहिणे आले असता तेच्क्षणी बंदोबस्ताचा विचार पाहिजे तैसा करावयासी येईल हाल्ली सदरहू मजकूर समजणेत आलेमुळे सदासिवपंत यासी सर्व मजकूर समजोन देऊन हुजूर परवानगी करून पाठविले आहेत मु॥ग बोलतील ते आशय सविस्तर ध्यानात घेऊन त्याअन्वये बेत जलद् करावा सादुल्लाखान याने तनातेचे जाबसाला करिता धरणेत बैसविले त्याणे चाकरीच केली होती त्यापक्षी वाजबी हिशेब करून त्यात पाच रुपये सोडसांड घेणेचे बोलणे केले असत तरी न होते ऐसे नाही परंतु देणेस घसघस पाडून चिघळीस न्याहावे आणि नासाडीच करावी हा पुरतेपणे मनोदये धरून सरकार इमारतीसही आपाय जाहाला पांच रुपये देणे तेही दिले त्यात आम्हावरही कसाला पाडिला गावातून बाहेर गेले नंतर घोडेचे जाबसाला करिता म्हणोन आम्हास लोकाचे धरणेत ठेऊन आपण मोकले होऊन येऊन तोफा व सरंजाम आणविला ऐसी नाना प्रकारची कृत्ये केली तेव्हा यासी कामातून काढिलशिवाय नीट पडत नाही ऐसे हुजूरने ध्यानात आणोन याजला वहिवाटीतून काढिले म्हणोन पत्र पाठविले आहे हे सविस्तर बहादर यासी बोलून पत्रही दाखवावे आणि सदरी लिहिले प्रमाणे थैली घेऊन पाठऊन द्यावी बहुत काय लिहिणे ठाणे हल्कर्णी व करमली नि॥ गावगनाचा वसूल निपाणीकर याजकडे पावला त्याच्या सालोसालच्या यादी आणऊन पाठविल्या आहेत पावलीयाचे उत्तर पा॥ देणे हे आसीरवाद ठाणे हलकरणी व करमळी येथील गावगनानी निपाणीकर याने वसूल घेतला व कांही बाकी राहिलेले ऐवजाच्या निशा चिठ्या साहुकाराकडे गुंतविल्या आहेत त्याजकडून सावकरास तसदी जाहाली आहे हा मजकूर बहादर याचे कानावर घालून डौस साहेब यासी खते सोडऊन देणेविसी चकती घेऊन पाठऊन देणे नाहीपक्षी सावकाराचे देणे द्यावे लागते काय ते जल्द करावे हे आसीरवाद.

लेखांक २६ तारीख २२-९-१८१३

श्री

रू. नं. २
अ. नं. ३१७

श्रीमन्महाराज मातोश्री आईसाहेब याणी राजश्री स्वरूपजी खीरसागर हुजरे वकील यासी आज्ञा केली ऐसीजे सुा आर्बा अशर मयातेन व आलफ साहेबाचे शेवेसी तुम्ही विनंती पत्र पाठविले ते प्रा॥ होऊन लेखनार्थ निवेदन जाहाले साहेबाकडून तुम्हास दोन महिनेत आज्ञापत्र सादर होऊन सांभाळ होत नाही म्हणोन विनंतीपत्री लिहिले आशास दोन महिनेत दोन चार आज्ञापत्रे तुम्हास सादर जाहाली होती ती पोहोचली अगर न पोहोचली हे विनंतीपत्री लेहून पाठवणे कागल प्रांताविसीचे बोलणे बाहादर याजपासी पडले होते त्यास हिंदुराव घाटगे सर्जेराव याजकडे चालवावे चाकर तुमचे

आहेत त्यास आम्ही उत्तर केले जे कागल देणे किंवा न देणे ते हुजूरने होईल येथे आमचे हाती नाही सोडचिटी मात्र आम्ही हुजूर पाटवून देऊ दोन दिवस कमजास्त लागलेस चिंता नाही बाहादरानी वचन देतो म्हणोन करार केला आहे परंतु त्याजविसी रद्बादली करून पाहातात कां तरी चहूकडून पत्रे त्यास आली आहेत म्हणोन बोलावे म्हणोन बोलतात ऐसें विनंतीपत्री लिहिले ते निवेदन जाहाले अशास पत्रे कोणाची कोणकोणास आली आहेत व रद्बदल्या कोणकोण करीत आहेत हे तपसीलवार विनंती-पत्री लिहून पाटवणे याजविसी अंदेशा न घेणे वसूलाचा ऐवज साहेबाकडे याव ऐसा करून घेतला आहे म्हणोन विनंती लिहिली ते निर्वेद न जाहाले कामकाजी चालली आहेत परंतु बहादर यासी थैली वरचेवरी यावयाची आज्ञा होत आसावी म्हणोन विनंती लिहिली त्यावरून थैली वरचेवरी सादर होतील बाहादर याचे लक्ष काजकामात चांगले आहे म्हणोन विनंती लिहिली त्याजवरून संतोष वाटला तरी काजकामे सत्वरी उलगडोन निदर्शनास येई ते करणे जाणिजे र॥ छ २६ माहे रमजान लेखनसीमा.

पौ छ ४ माहे शोवल सुा आर्बा आशर मयातेन व आलफ ऊर्फ आश्विन मास शके १७३५.

लेखांक २७

तारीख ५-१०-१८१३

श्री

रु. नं. २ तालीक

अ. नं. ३२७

राजश्री गुंडो जिवाजी व नारो व्यंकाजी गोसावी

यास

सेवक सिदोजीराव नाईक निंबालकर संरलष्कर दंडवत विनंती उपरी सरकारात गाव हवाली करणेची आज्ञा जाहाली याजवरून हे पत्र लिहिले आहे तरी सरकारचे कारकून हे पत्र घेऊन येतील तरी आमल ज्यारी करून देणे बी ता

२५ कर्यात नेसरी नि॥जिवराव शिंदे

७॥ नारायणराव घोरपडे शेनापति

६॥ कर्यात कापशी पैकी

१ मौजे मडीलगे इनाम क॥ नूल

———

७॥

२ मानसिंगराव घोरपडे

१ मौजे हेबाल क॥ नूल

१ मौजे हसूर क॥ नूल

———

२

१ मौजे इंचनाल तर्फ आजरे देशपांडे याचे इनाम
४ देशमुखी बाबेचे इनाम आहेत ते
२ खासगीकडील
१ मौजे तारदाल का। आलते
१ मौजे कडगाव का। नूल
——
२
२ देसाई नूल्कर
१ मौजे हिडदुगी
१ मौजे कल्वीकटे
——
२
३ पा। रायबाग
१ का। रायबाग नीलकंठ शामराव याचे इनाम
१ मौजे दानवाड नारायणराव सांवत याचे इनाम
१ मौजे येलगुंड दौलतराव बागल याचे इनाम
——
३
१ मौजे जखबाल तर्फ ककोल तालुके मनोली श्री स्वामी संखेश्वर याजकडील इनाम
१ मौजे शिरगांव कोणते कर्याती पैकी चौकशी होणे आहे चौकशीने ठरवून सांगतील तो हवाली करणे
——
४४॥
येकून साडेचंवतालीस गाव सरकारचे कारकूनाचे हवाली करऊन पावती घेणे ता छ ९ माहे शौवल सन आर्बा आशर मयातेन व आलफ बहुत काय लिहिणे हे विनंती.

लेखांक २८

तारीख १७–१०–१८१३

हू

रु. नं. २ तालीक
अ. नं. ३२८

अजम हनराबल मोठ इष्टवारीट इलफीसतन
बहादर दाम मोहबत हू

शौकत व अवाली पनाह शाहामत व इजलाल दस्तगाह वाआदज इस्तियाक फिरावा

मशहूद आंके आ शौकत पनाहाचे नजदीक कागल प्रांताचा जवाबसवाल होत आसता दरिविला राजश्री हिंदुराव घाटगे सर्जाराव उरसास कागलास येणार सबब त्यानी कागलास लोक इबलाग करून चिरंजीव राजश्री यशवंतराव घाटगे सर्जाराव देसाई याचा वाडा रिक्वामा करून देणे बाबे दरज व मरज केला आहे अशास चिरंजीव राजश्री येशवंतराव घाटगे सर्जाराव देसाई हे वडील आणि हुजूर शेवशी येखलासमंद येसीयास कागल प्रांताविशीचा जवाबसवाल जुद आं शाहामत पनाहासी बोलोन कागल प्रांताची सोडचिठी व हुजूर च्या ताअलुकेच्या सोडचिठ्या मरकुम करावयाबाबे श्री रावराज श्री दिनकरराव गाईकवाड व राजश्री सरूपजी खीरसागर हुजूर वकील यास कलमी जाहाले आहे त्यास हुजूर च्या तालुकेच्या सोडचिठ्या व कागल प्रांताची सोडचिठी फिरिस्ताद करून राज्याची जियाद ती सत्वर होय ते आं शौकत पनाहानी करावे फिलहाल राजश्री कल्यान कृष्णाजी निसबत राजश्री बाजीराव पंडित प्रधान याणी खत राजश्री सदाशिव मानकेश्वर यास निगारीष केले आहे त्या खताची तालीक आ शाहामत पनाहाकडे इबलाग जाहाली आहे त्यावरून हुजूर च्या प्रांताचे खराबीचा मजमून आ शौकत पनाहास माअलूम होईल सुा आर्बा आशर मयातैन व आलफ रवाना छ २१ माहे शौवाल जियादचे निगास्त आयद अयाम मुदाम बाद.

लेखांक २९ तारीख १४–११–१८१३

श्री

रु. नं. २
अ. नं. ३२२

श्रीमन्महाराज मातोश्री आईसाहेब याणी राजश्री स्वरूपजी खीरसागर हुजरे वकील यासी आज्ञा केली येसीजे सुा आर्बा अशर मयातेन व आलफ राजेश्री कल्याणराव कृष्ण नि॥ राजेश्री पंत प्रधान व राजेश्री सदाशिव बापट नि॥ इंग्रेज बहादर या उभयता बरोबर हुजूरने हुजुरे व कारकून व लोक यैसे देऊन हल्लीच्या सोडचिठ्याची ठाणी बसवणे बद्दल रवाना केले होते त्याणी जाऊन ठाण्यास सोडचिटी लावताच ठाणेदारानी दुमाल चिठ्या आलेसिवाये ठाणे द्यावयाचे नाही याप्रमाणे फेरजाब सांगितला म्हणून कल्याणराव याचे विनंतीपत्र हुजूर आले तेच तुम्हाकडे पाठविले आहे तसेच सामानगडाहून हुजूर विनंतीपत्र आले तेही सादर जाहाले आहे वरकड सविस्तर मजकूर श्री याचे पत्री व चिरंजीव राजश्री दिनकरराव भोसले याचे आज्ञापत्री आज्ञा जाहाली आहे त्यावरून कळेल तरी श्री व दिनकरराव भोसले सांगतील त्याप्रमाणे हा सविस्तर मजकूर बहादर याचे कानावरी घालून बंदोबस्त सत्वर होय ते करणे जाणिजे र॥ छ २०. माहे जिल्काद लेखन सीमा.

लेखांक ३०

तारीख २०-११-१८१३

श्री

रु. नं. २

अ. नं. ३२४

श्रीमन्महाराज मातोश्री आई साहेब याणी राजश्री स्वरूपजी खीरसागर हुजरे वकील यासी आज्ञा केली ऐसीजे सुा आर्बा आशेर मयातेन व आलफ चिरंजीव राजेश्री यशवंतराव घाटगे सर्जाराव व चिरंजीव सकल सौभाग्यादिसंपन्न वज्रचुडेमंडित आऊबाई घाटगे सरज्याराव ऐसे श्रीचे दर्शनाकरिता तुळजापुरास जात आहेत त्याची रवाणगी हुजूरने सरंजाम देऊन कार्तिक वा एकादसीस करून दिली तुळजापुरास जाऊन तेथून जेजोरीस देवदर्शनास येणार त्यासी जेजोरीस आले नंतर श्री व चिरंजीव राजश्री दिनकरराव भोसले व तुम्ही व राजश्री मोरो बाजीराव चिटणिवीस ऐसे सर्वत्र जेजोरीस येऊन उभयतास भेटून तेथून पुढे इंग्रज बहादर याचे भेटी करिता × × राव मशारनिले सडेनिसी येतील त्याचा बेत यथास्थित करून सन्मानयुक्त जाणे होऊन तेथील समारंभ पद्धतीप्रमाणे यथास्तित होणेचा बेत करून भेटीचा योग होऊन येणे व्हावे ऐसा बेत होऊन रवाणगी जाहाली आहे येविषी सविस्तर राजश्री सदासिव अनंत आज्ञे प्रमाणे सांगतील त्या प्रमाणे मेजवाणीचा वगैरे बेत करवून सदासिव अनंत यासी तुळजापुरचे मुकामास पाठवून देणे आणि सवस्तर मजकूर साहेबाचे शेंवेसी विनंतीपत्री लेहून पाठवणे राजश्री कल्याणराव कृष्ण यासी सोडचिठ्या प्रमाणे गावगना ठाणी घालणेस पाठविले त्यानी जाऊन आकरा गावास ठाणी घातली बाकीचे गावगना ठाणी घालावी त्यास राजश्री गुंडो जिवाजी याचे नावची सोडचिठी चवेचाळीस गावची होती त्याजकरिता मशारनिलेकडे निपाणीस कल्याणराव कृष्ण गेले त्यासी गुंडो जिवाजी याने सोडचिटी प्रमाणे ठाणी घालणेस हिसका दिला म्हणोन कल्याणराव कृष्ण याचे विनंतीपत्र हुजूर आले तेच तुम्हाकडे पाठविले आहे तरी येविसीचा बंदोबस्त करून घेऊन पाठवणे जाणिजे रा। छ २६ माहे जिलकाद लेखनसीमा.

लेखांक ३१

तारीख २८-११-१८१३

श्री

रु. नं. २

अ. नं. ३२७

श्रीमन्महाराज मातोश्री आईसाहेब यानी राजश्री स्वरूपजी खीरसागर हुजरे वकील यासी आज्ञा केली ऐसीजे सुा आर्बा आशर मयातेन व आलफ राजेश्री कल्याणराव कृष्ण याचे विनंतीपत्र हुजूर आले त्याची तालीक तुम्हाकडे पाठविली आहे मौजे गंगापूर व वाघापूर ह्या दोन्ही गावचे गावकरानी निपाणकर याजकडील वसूलाचा मार सोसवेनासा

जाहाला सबब गावकरानी हुजूरची ठाणी घातली सोडचिठ्यात घाणवट गाव पैकी मौजे गिजवणे व दुंडगे व खणदाळ ऐसी तीन गावे आली आहेत याजमुळ ही दोन गाव हवालदिल जाहाली आणि त्याचे माराखाली कांही माणसाची दशा ठेविली नाही जीवे माणसे मारावी ऐसा प्रकार वसूल घेणेचा जाहाला याजमुळे दोन्ही गावचे गावकरानीच हुजूरची ठाणी घातली याजमुळे निपाणीत कल्याणराव कृष्ण व अंताजी गंगाधर यासी आज्ञापत्रे सादर जाहाली कीं ही दोन्ही ठाणी तुम्हाकडे तहकुबात असू द्यावी याप्रमाणे आज्ञापत्र सादर जाहाले त्याचे विनंतीपत्र हुजूर पाठविले त्याची तालीक तुम्हाकडे पाठविली आहे हीच इंग्रज बाहादर यासी दाखवून निपाणकर याजकडील अमलदार खटलेस आरंभ करणार याप्रमाणे बोलोन याजविसी आजम कणल डऊस बाहादर याची चकती येऊन या गोष्टीचा बंदोबस्त होय ऐसे करणे निपाणकर याजकडील पेंढार सामानगडप्रांती व भुदरगड प्रांती गेले आहे म्हणून कल्याणराव यानी विनंती पत्री लिहिले आहे ते तालीकेवरून कलो येईल बाहादराची दोस्ती केली असता आता पेंढार सुटणेच प्रयोजन ते काये गंगापूर व वाघापूर हे दोन्ही गाव सोडचिठ्यात नऊते निपाणीकर यान हुजूरची ठाणी आहेत ते गाव सोडचिठ्यात लेहून हे गाव राखिल ऐसा प्रकार जाहाला आहे त्यासी सोडचिठ्या नसता ठाणी बसू नयेत हे खरच परंतु गावकरी यासी वसूलाचे माराखाली माणसे जीवे मरावी ऐसा प्रकार जाहाला तेव्हा गावकरी यासी न सोसवे याजमुले हवालदिल होऊन हुजूरची ठाणी गावकरी याणीच घातली यास्तव हा सविस्तर मजकूर बाहादर याचे कानावरी घालोन याजविसीचा बंदोबस्त होये ऐसे सत्वर करणे जाणिजे र।। छ ४ जिल्हेज सदरहू बाहादर याची थैली कागल प्रांताविसीची हुजूर आली त्याचा दरजबाबाची थैली मागाहुन रवाना होऊन येत आहे. छ. मजकूर लेखनसीमा. पौ छ १० माहे जिलेज ऊर्फ मार्गसीर्ष.

लेखांक ३२

तारीख ३०–११–१८१३

श्री

अ. नं. ३५३

श्रीमन्महाराज मातुश्री आई साहेब याणी राजश्री स्वरूपजी खीरसागर हुजरे वकील यासी आज्ञा केली यैसीजे सु।। आर्बा आशर मयातैन व आलफ तुमचे व इंग्रेज बाहादर याचे बोलणे छ २७ जिल्कादी व छ माहे जिल्कादी बेटात बोलणे जाहाले त्याचे मजकुराचे यादी तपसीलवार लेहून साहेबाचे शेवेसी पाठविलेप्रमाणे निवेदन जाहाले कागल प्रकर्णी व शेनापतीचे वगैरे बोलणी जाहाली तो मजकूर लिहिलेवरून निवेदनात आला अशास कागलचा व सेनापतीचा स्वालजाब तुम्ही बाहादर यासी बोलला आहा त्याप्रमाणे उलगडणेत येई यैसे कर्णे वरकड इकडील मजकुराची आज्ञा तपसीलवार यादी सादर होऊन श्री व चिरंजीव राजेश्री दिनकरराव भोसले याजकडे रवाना करून पाठविली आहे व तुम्हासहि

आज्ञापत्र सादर जाहाले आहे त्याप्रमाणे श्री व भोसले मारनिले सांगतील त्याअन्वये बाहादर यासी बोलोन जाबसाल उलगडून घेणे. जाणिजे र।। छ ६ माहे जिल्हेज लेखन सीमा

लेखन
सीमा

लेखांक २३ माहे नोव्हेंबर इ. स. १८१३

२ पुरवणी

रु. नं. १

अ. नं. २०६

कलमे सुा आर्बा आशर

मयातेन माहे जिल्काद उर्फ कार्तिकमास

१ हिंदुराव घाटगे सर्ज्याराव यानी कदमाची मुलगी जबरदस्तीने नेहली आहे ती व तिची आई व तिचा भाऊ कागलास ठेविला आहे या सुद्धा मुलीस सोडून देणे-विसीचे बोलणे. कलम

१ भिवाजी पडवल याजकडे सरंजामास मौजे कोरकोप परगणे सतीकीरे पैकी या विसीचे बोलणे. कलम

१ व्यंकट नाईक याजकडे मौजे गारवेन काले तर्फ वठनाल मामला तोरगल पैकी गाव सरंजामास याविसीचे बोलणे

१ सुबराव घाटगे याजकडे मोजे बासेढोणी सरंजामाबद्दले ताो वठनाल पैकी याविसीचे बोलणे. कलम

१ बारी पलीकडील वगैरे मोकासबाबची येवज येणे याविसीचे बोलणे. कलम

१ निपाणीकर याणी जबरदस्तीने सनदापत्रे व यादी करून घेतल्या आहेत त्या झाडे-निसी माघाऱ्या याव्या याविसीचे बोलणे.

१ कमतनूरकर देशपांडे याचे वतन च्यार कर्याचे निपाणीकर जबरीने खात आहेत येविसीचे बोलणे. कलम

१ मुतनाल्कर देशपांडे याचे गांववार काटकपटीचे रोखे निपाणीहून होऊन गावची गुरे म्हैसी नेहली आहेत त्यास म्हैसी सोडून ध्याव्या व पुन्हा उपद्रव होऊ नये येविसीचे बोलणे.

१ देवजी नाईक दुभासी याजकडून गुराबेचा यैवज येणे त्याजवर वराता जाहल्या आहेत त्यास गोवेतील बहादरास थैली देणेविसीचे बोलणे. कलम

१ सोलापूर येथील नाईकीचे वतन बनाबाई निंबालकर बहादूर यांजकडे चालत होते त्याविसी बोलून जाबसाल करून घेणेविसीचे बोलणे. कलम

१ भरमापा सिद्रामराव देसाई नाडगोंडा का। रायबाग याचे वतनाचा जाबसाल बोलणेचा. कलम

१ वलभगडचा जाबसाल बोलणेचा बेविसीचे बोलणे कलम

५ किल्ले सामानगड नि।। जाबसालची कलमे

१ ठाणे सेडुराहून किले नि।। तनखेत काटकपटीचे रोखे होऊन मौजे मुंगली तर्फ नूल येथील गुरे चालीसपनास नेहली त्याची सुटका होई ते करावे छ २१ शोवाली किलेची अर्जी आली.

१ लिंगनूर तर्फेत जबरदस्तीने सरदेशमुखींचे वतन सरनाईकीचे वतन कमत सुद्धा करून घेतले आहे त्याजविसीचे रोखे गावगना गुंडो जिवाजी याने आपले नावचे केले आहेत गावे बी ता।। तर्फ

१ तर्फ मार	१ डुगणवाडी
१ मुगरवाडी	१ सांवतवाडीमांगनूर
१ मासेवाडी	१ जांबूलवाडी
१ तेगीनहल	३
४	

.... देह ७ गावगना रोखे जाहाले आहेत त्यास मनाई व्हावी.

१ बालगोंडा पाटील गवाणकर हा खणदालहून मौजे बसरगे येथील श्रीदेवीचे दर्शनास येऊन मौजे मजकुरचे पाटिलास धरून घेऊन जावे म्हणून मसलत करून आला होता परंतु पाटील देवास आला नाही माघारा जाताना बकरीची खांडे लुटालूट केली आणि कुने येका धरून नेहेले तेव्हा ठाणे हलकर्णीचे धावणे व इदरगुंची येकून गोलागोली होऊन बालगौंडाचे हातातील कराचली व पालखी भोईसुद्धा व आबदागिरी येणेप्रो पाडाव जाहाले ते हलकर्णीकर घेऊन गावास गेले.—— कलम

१ मौजे मुतनाल येथील म्हैसी च्यार शेंडूरकर याणी नेहल्या.—— कलम

१ भरमाजी कोन्या गडकरी याचे लेकास चेनीकुपीच्या रामोसीने इगलजकर याणी धरून नेहला आहे त्याचे सुटकेविसीचे बोलणे.

५

लेखांक ३४ माहे नोव्हेंबर इ. स. १८१३

श्री

रु. नं. ५
अ. नं. ४२३

नारायणराव व्यंकटेश घोरपड इचलकरंजीकर याजकडील सन अर्बा आशर मयातेन व आलफ माहे जिल्हेज मार्गशीर्ष मास.

१००० रसानगी उदाजी घाटगे सरज्याराव राजश्री नारायणराव व्यंकटेश घोरपड इचलकरंजीकर याजकडील मखलासीबाबत यैवज मा॥ हुजूर पागेकडे दाणा खास (खरेदीस) देविला वि॥ वे॥संपन्न राजश्री जोसीराव याजकड. हतचिटी ता धोंडो कृष्ण रुो येक हजार दिलही सर्ज्याराव म॥रनिलची नांवची छ १८ जिल्हेज

२०० छ ३ माहे सफर रसानगी बाबाजी हर्ष नि॥ श्री याजकडील मौज किणे ता आजरे यासी मौजे मजकुराकडून राजश्री नारो गिरमाजी यासी खर्चाबद्दल रुपये दोनशेहे दिविले आहेत देणेविसी वरात

१ छ २० सफर पौष्य मास सन सीत आषर हुजूर यासी इचलकरंजी येथील नारायणराव व्यंकटेश घोरपड याजकडील हजार रुपये आणवणेची कामगारीस पा त्यास जाबसाल हुजूर जाहला सबब तगादा न करिता उठोन येणेविसी.

लेखांक ३५ तारीख ६-१२-१८१३

श्री

रु. नं. २
अ. नं. ३३१

श्रीमन्महाराज मातोश्री आईसाहेब याणी राजश्री स्वरूपजी खीरसागर हुजरे वकील यासी आज्ञा केली ऐसीजे सुा आर्बा असेर मयातेन व आलफ अजम डौस बहादर याचे लष्करात राजश्री नारो गिरमाजी याजकडे राजश्री बच्याजी यासी आज्ञा करून पाटविले होते ते लष्करात गेले तो निपाणीहून राजश्री अंताजी गंगाधर नि॥ इंग्रज बहादर हेई लष्करास बहादर याजकडे जावयासी गेले तेही नारो गिरमाजी याजकडे जाऊन दाखल जाहाले हे उभयता व नारो गिरमाजी यानी बोलून बहादर याजकडे जाऊन बोलणी बोलून बहादर यानी निपाणीकराचे अमलदारास पत्र लेहून अंताजी गंगाधर याजबरोबर दिले जे तीन रोजात साडेचिट्या प्रमाणे ठाणी खाली करून देणे नाहीतरी तैसच लिहून पाटवणे याप्रमाणे तीन रोजाचा नेम करून अंताजी गंगाधर यासी निपाणीस पाटविले त्या समागमे बच्याजी आनंतही गेले निपाणीस जाऊन तेथे बोलणी होऊन

काय जाबसाल जाहाला त्या विसीची हुजूर विनंतीपत्रे उभयताची आली त्याच्या ताल्का तुम्हाकडे पाहावयासी सादर जाहल्या आहेत त्याजवरून निपाणकर याचे वर्तणुकेचा अर्थ ध्यानात येऊन त्याप्रमाणे तेथे शाहामत पन्हाह अजम मोट इष्टवारीट इलफीसतन बहादर यासी समजाऊन देऊन याचे पोटी काय बोलावयाचे असेल ते श्री व चिरंजीव राजश्री दिनकरराव भोसले सांगतील त्याप्रमाणे बोलून घेणे जाणिजे. रा॥ छ १२ माहे जिल्हेज लेखन सीमा

लेखांक ३६ तारीख ६-१२-१८१३

श्री रामचंद्र

रु. नं. २

अ. नं. ३२९

चिरंजीव राजश्री दिनकरराव गाईकवाड यासी आसीरवाद उपरी येथील वृत ता छ १२ जिल्हेज पर्येत यथास्थित असे विशेष इकडील सविस्तर मजकूर चिरंजीव बाईसो यानी चिरंजीव राजश्री भाऊ माहाराज यासी व तुम्हास लि॥ आहे व इकडील पत्रे चिरंजीवास लि॥ आहेत व चिरंजीव राजश्री हयबतराव दादा यानी तुम्हास लि॥ आहे त्यावरून सविस्तर कळेल सारांष डौस बहादर याचे व निपाणीकर याजकडील कारभारी याचे विरुध वाढोन ठाणी घालवयास बहादर कूच करून जाणार हे सविस्तर चिरंजीव रो नारोपंत नाना याची पत्रे आली तीच तुम्हाकडे पाटविली आहेत तरी तुमच्या पेशजीच्या लिहिल्याअन्वय आणायासे ओघास आले आहे यासहित तुमच्या प्रयत्नाची व कारस्थानाची परीक्षा आहे अशा समयी निपाणकर याची गिल्ला व गुणदोष समजाऊन देऊन हुजूरची कामे झाडेनिसी करून घ्यावी. बहुत काय लिहिणे हे आसीर्वाद पौ छ १९ माहे जिल्हेज सन आर्बा आशर मयातैन व अलफ मार्गसीर्ष वा। ६

लेखांक ३७ तारीख ६-१२-१८१३

श्री रामचंद्र

वासुदेव पंडित

अ. नं. २०८

रु. नं. १

राजश्री मानचंद्र फत्तेचंद मु-
काम पुणे यासी———

———आसीर्वाद उपरी व दिनकरराव गाईकवाड रामराम विनंती उपरी आम्ही तुम्हापासून पुण्याचे मुकामी खर्चाबदल घेतले कर्जाऊ रुपये ४००० चार हजार हाली सीका यासी व्याज दर शेकडा रुपये येक प्रमाणे दरमहा देत जाऊ यासी मुदत आज-

पासून दोन महिन्याने व्याज व मुद्दल हिशेबसुद्धा फडशा करून देऊ सदरहू पै।। येक महिन्याचे व्याज रुपये ४० चालीस तुम्हास अगोदर दिल्हे आहेत वजा घेऊन बाकीचा उलगाडा करूण देऊ मिती शके १७३५ श्रीमुखनामसंवसेर माहे मार्गसीर्ष शुद्ध १३ उर्फ जिल्हेज छ १२ रोो सुाा आर्बा आशर मयातेन आलफ बहुत काय लिहिणे हे विनंती.

लेखांक ३८ तारीख ८-१२-१८१३

श्री मार्तंड प्रसन्न

रु. नं. २

अ. नं. ३३३

पौ छ १९ माहे जिल्हेज सन आर्बा आशर मयातेन व आल्फ मार्गषीर्स वा।। ६

श्रियासह चिरंजीव राजमान्य राजेश्री दिनकरराव आपा यासी प्रति हैबतराव गायकवाड विश्वासराव आनेक आसीरवाद उपरी ताा छ १४ माहे जिल्हेज पर्यंत वर्तमान यथास्थित असे विसेष निपाणीहून राजेश्री बच्याजी पंत याजकडून पत्र आले त्याची तालीक पाटविली आहे निपाणीकर याचे कारभारी बाहादर याचे सांगणेसही टालाटाल करून त्यासीही घसघस लाऊन मतलबी कारभार करता आहेत येविसी हुजूरचीही आज्ञापत्र श्रीस व तुम्हास आहे त्याजवरून सविस्तर समजणेत येईल बहादर यासी बोलणेचे विचारे बोलून सविस्तर लिहून कळवावे कलावे बहुत काय लिहिणे लोभ कीजे अजम कर्णेल डोस बहादर यासी मतलब निपाणीकर याणी कारभारी याणी केलेवरून त्याणी पत्रे पाटवून निपाणीत राजश्री कल्याणराव व त्याचे कारकून व हुजूर नि।। कारकून होते त्यास लस्करास नेहले त्याचा मोकाम आतुलावर येणार ऐसा बेत आहे याजवरून निपाणीचे गुले × × आहे तरी बहादर यासी समजावून देणेचे पर्याये समजावून देऊन मर्जीचा कल पाहून पूर्वसंकेताप्राो चौघास आणावे आणयासे आजचा समय आला आहे यात काय कारस्थान करावयाचे असेल ते करावे हैगई करणेची ही बेल नव्हे याजकरिता उगडून लिहिल आहे हे आसीरवाद.

लेखांक ३९ तारीख ११-१२-१८१३

श्री रामचंद्र

रु. नं. १

वासुदेव पंडित

अ. नं. २०९

चिरंजीव राजश्री राये बलवंतराव नाना माहालेकर यासी आसीर्वाद उपरी व दिनकरराव गाईकवाड याचा दडवंत विनंती उपरी आम्ही तुम्हापासून पुण्याचे मुकामी खर्चीबद्दल घेतले कर्जाऊ मुदल रुपये दोन हाजार २००० चांदवड चलणी यासी व्याज दर शेकडा रुपये १।। प्रमाणे दरमहा देत जाऊ व मनोती एकबेळ दर शेकडा रुपये दोन

प्रमाणे देऊ यासी मुदत आजपासून दोन महिन्याने सदरहू मुद्दल व व्याजसुधा हिशेब करून फडशा करून देऊ मिती शके १७३५ श्रीमुखनासंवछरे माहे मार्गषीर्ष व॥ ४ छ १७ जिल्हज सुा आर्बा आशेर मयातैन व आलफ बहुत काय लिहिणे हे विनंती.

लेखांक ४० तारीख १८-१२-१८१३

श्री मार्तंड प्रसन्न

रु. नं. २

अ. नं. ३३९

पौा छ २९ जिल्हेज सन अर्बा अशर मयातेन व अलफ पौष शु॥ १

श्रियासह चिरंजीव राजेश्री दिनकरराव आपा याप्रति हैबतराव गायकवाड विश्वासराव आसीरवाद उपरी येथील कुशल ताा छ २४ जिल्हेज पर्यंत वर्तमान यथास्थित असे विशेष शिवाजी मान्या याने तलबेचे ऐवजाचे निमित्य करून राजश्री उदाजी घाटगे सर्जेराव यासी अजी प्रातकालचे चार घटका दिवसास बिन्हाडी गाठून पोटास जंबिया लाऊन धरून बसला तेव्हा हिशेब होईल त्याप्रमाणे रुपयेचा पर हवाला देतो ऐसे म्हणत असता ऐकना तेव्हा हाजार रुपये रोख नेऊन दिले तरी तोड न पडता गैरहिशेबी आफाट बोलणे बोलू लागला आणि सात आठ तास दिवस पर्यंत तसाच जंबिया लाऊन वर्दळीस आला त्यास रोजमरेचेच ऐवजाकरिता निकस करीत असलेसे ऐवजाचा फडशा करून देऊन तोड काडावी म्हणोन ऐवज रोकड नेहून बहुत प्रयत्न केला कोणतेही अर्थे ऐकेना त्याने बोलले गोष्टीस आग्रही मान्य व्हावे तो त्याने ते बोलणे सोडून अधिकच बोलणे घालावे ऐसा गैरहिशेबी मनस्वी दंगा केला इतकेत आम्हास हुजूर वाड्यातून बोलावणे आले म्हणोन वाड्यात गेलो नंतर शिवाजी मान्या याने सर्जेराव याजवर जम्बीयाचे दोन हात चालविले तेव्हा गर्दी जाहाली त्यात शिवाजी मान्या ठार जाहाला उदबास जखमा बहुतच कहरी आहेत यातून पार पडणे इश्वराधीन आहे सदरहू वर्तमान हुजूर वाड्यात आलेनंतर उदबाचे बिराडात येऊन त्याजला घरास घेऊन येऊन शेकताव करून जखमा सिवल्या पथ्य पाणी घरीच होत आहे परंतु आयुषमर्यादा प्रमाण ऐसी जखमेची कहरी आहे तुम्हास लोक व शिवाजी मान्या याचा भाऊ माणसिंग मान्या तेथे आहे त्याजला हे वर्तमान समजलेवर हरयेक दगाफटका करणेस चुकणार नाही याजकरिता त्याचा सहवास न करावे आणि बहादराकडील येक पाहारा आणोन ठेऊन बहुत बहुत सावधपणे असावे याजकरिता हुजूराच पत्रे देऊन गडी रवाना केले आहेत तरी लिहिले-प्रमाणे हयगयी न करिता बंदोबस्तीने सावध असावे बहुत काय लिहिणे राजश्री बहिरजी भो व दिनकरपंत याची रवानगी जाहाली आहे सत्वरच येऊन पोहचतील हे आसीरवाद.

लेखांक ४१ इ. स. १८१३

श्री

रु. नं. २

अ. नं. ३३८

यादी विशाळगडाकडून नाना फडणीस यास गाव इनाम आहे ते सुा अर्बा असेर मयातेन व अलफ

१ मौजे आजणारी ताा देवले

१ मौजे देवधे ताा लांजे

—

२

लेखांक ४२ तारीख ३–१–१८१४

श्री

रु. नं. २

अ. नं. ३४०

श्रीमन्महाराज मातुश्री आईसाहेब यानी राजमान्य राजेश्री बहिरजी भोसले यासी आज्ञा केली ऐसीजे सादुलाखान याजकडील पठाणाचे घोड्याबाबत देणेबाकी नख्त रुपये पनाली १७०७॥• सतरासे साडेसात देणे ठरले त्या रुपयेचा हवाला राजश्री कृष्णराव गोपाळ नि॥ बाहादर यासी देऊन खटला तोडला आहे त्यासी मशारनिलेचा ऐवज देणेची निकड पडली याजकरिता तुम्हाकडून पनाली सतरासे साडेसात रुपये कृष्णराव गोपाळ याजकडे देविले असे तरी मशारनिलेचे पुत्र राजश्री आपाजीराव कृष्ण पुणेत आहेत त्याजकडे आज्ञेप्रमाणे ऐवज त्याचे पदरी घालून आपाजीराव कृष्ण याची पावती घेऊन सत्वर हुजूर पाठवून देणे ऐवज देणेविसी विलंब न करणे पुन्हा आज्ञेचा हुजूर न धरिता हे आज्ञापत्र सादर होताच ऐवज निकडीने पदरी घालोन पावती घेऊन सत्वर पाठवू देणे जाणिजे सुा आर्बा अशर मयातेन व आलफ र॥ छ १० माहे मोहरम बहुत काय लिहिणे.

लेखांक ४३ तारीख ४–१–१८१४

श्री स्वामी

रु. नं. २

अ. नं. ३४१

मेहरबान दोस्तान कृष्ण रावजी

नि॥ इंग्रज बहादर यासी

रसीद बै॥ बदकशा पठाण नि॥ सिदुमखान रिसिलदार मु॥ करवीर सलाम आमाहाराज

छत्रपति याजकडे आम्ही रिसिलासमवेत साल गुा नौकरीस होतो त्याचा आमचा तंटा पडला सबब तुम्ही आम्हास दरम्यान जाहला कलमे बी ताा

१ तलबेचा येवज ठराव रुपये चवेचालीस हजार ४४००० ते झाडेनिशी घ्यावे ते तेच वेलेस देऊन रवाना करोन दिल्हे..

१ वारणापार करोन द्यावे ते ते वेलेसच करोन दिल्हे.

१ घोडी लढाईत राजमंडलकर याणी काढून घेतली ती सस ४० चालीस पौा १ तेच समये दिल्हे.

१ फतुमचा घोडा नाना पाटणकर याणी आपले पागेचा म्हणून ठेऊन घेतला..

५ सूट घोडे पांच आम्ही आपले संतोषानी दिली.

१५ बाकी घोडे पैा पंधरा आमची आम्हास दिली छ ९ जिल्हेज..

१८ बाकी आठरा रास

८ थोर दर २०० प्रा १६००

१० तटे दर २५ प्रमाणे २५०

—

१८

— येणे प्रमाणे फडशा करोन घेतला

३

सदरहू तीन कलमे यास तुमची जिमा होंतीं ते तुम्हीं करार मोंजींब फडशा करोंन दिल्हें आम्ही भरोन पावलो तुमची जिमेचिठीं तीन कलमाची रिसिलदार याजपासी राहिली आहे ती रद असे सादुलखान यानी या फैसलाती करिता मुखत्यार करोन पो सबब साहेबानी तुम्हास ईनाइतनामा करोन आम्हाजवल देऊन पो त्याजवरोन तुम्ही आमचा फडशा करोन दिल्हे तुम्हाकडील राजमंडळाकडे आमचा कांहींयेक लढा राहिला नाही हे रसीद लिहून दिल्हे सहे तारीख छ ११ माहे मोहरम सन आर्बा आशर मयातैन व आलफ शके १७३५ पौष श्रुा। १३

हस्ताक्षर विश्वास — साक्ष

पांडुरंग बावडेवर — हणमंत गोविंद निसबत

१ राय राजेश्वरराव देसाई — श्री

सरकार कौलास

शिक्का

लेखांक ४४ तारीख २२-१-१८१४

श्री

रु. नं. २
अ. नं. ३४२

राजश्री कल्याणराव कृष्ण नि॥ राजश्री पंतप्रधान यासी आज्ञा केली ऐसीजे सु॥ आर्बा आशर मयातेन व आलफ अजम शामत पनाहा मोट इष्टवारीट इलफीसतन बहादर याणी हुजूरच्या प्रांतापैकी मौजे इंगली ता। ठाणे या गावची सोडचिटी देऊन पाठविले प्रो। तुम्ही रामजी सिंदे हुजरे व घनःशाम गोपाळ याचे स्वाधीन ठाणे केल प्रो। हुजूर पावले जाणिजे र॥ छ २९ माहे मोहरम.

लेखांक ४५ तारीख २९-४-१८१४

श्री रामचंद्र

रु. नं. १
अ. नं. २१२

पैा छ १२ जोवल
सन आर्बा आशेर
मयातैन व अलफ
वैशाख शु॥ १४ ता।

श्रियासह चिरंजीव सुंदराबाई वहिनी यासी आसीरवाद उपरी येथील कुशल वैशाख शुद्ध १० वर्तमान येथास्तित असे विशेष आपण छ २६ र॥खरची दोन व छ २९ र॥खरची दोन ऐसी च्यार पत्रे पाठविली ते पाऊन लिहिला मजकूर सविस्तर कलला त्याचीं उतरे व इकडील मजकूर कलमबंदी बी त॥

१ चिरंजीव राजश्री दिनकरराव गाईकवाड याचे प्रकृतीचे वर्तमान लिहून पाठवणे म्हणोन लिहिले त्यास हाली प्रकृत आराम आहे परंतु थोडी थोडी तिडक आहे ते जागेस तसीच आहे त्यास उपाये करीत आहेत आरोग्य होईल चिंता नाही. कलम

१ वसूलाचे रुजुवातीस इंग्रेज बाहादर याजकडील राजश्री आंताजी गंगाधर गेले आहेत त्यास तो राजश्री कल्याणराव यानी नवी ठानी बसविली आहेत त्या गावची मात्र रुजुवात करून बाकीचे गावची रुजुवात करावयाचा हुकूम नाही असे म्हणतात म्हणोन लिहिले आले त्याजवरून बाहादर यासी विचारिले तेव्हा त्यानी राजश्री बापू साने यासी समक्षे ताकीद केली कीं हुजूरचे येकंदर प्रांतातील तहचे आलीकडे वसूल निपाणीकर याणे घेतला असेल त्याची रुजुवात करून आणवणे तुमचे पत्र आंताजी

पंत यासी लिहून देणे ऐसे सांगितलेवरून बापू साने याणी आंताजी पंतास पत्र लिहून दिल्हे ते आपणाकडे रवाना केले आहे ते आंताजीपंत यासी देऊन रुजुवातीचे काम निकडीने चालते व्हावे राजेश्री कल्याणराव कृष्ण येथे आले होते आमची व चिरंजीव राजश्री दिनकरराव गाईकवाड याची भेट जाहाली त्यानी वर्तमान सांगितले कीं राजश्री सदाशिव पंत भाऊ याची भेट घेतली वसूलाच्या यादी आणिलेल्या गुदरल्या आणि भाऊनी सांगितले कीं येकंदर हुजूरचे प्रांतातील रुजुवात करणे ऐसी आज्ञा जाहली आहे या प्रों वर्तमान सांगोन येथून निरोप घेऊन तिकडे आले आहेत आता येकंदर हुजूरचे प्रांतातील रुजुवात करावयासी दिकत पडावयाची नाही उभयतास हुजूरून ताकीद होऊन काम निकडीने चालते होये ते करावे. कलम

१ वसूलाचे रुजुवातीच्या यादी दोन वेळा रवाना केल्या त्या प्रों येऊन पावल्या त्याची रुजुवात बेटात जाऊन करीत आहेत आणखी जस्या जस्या रुजुवातीच्या यादी हुजूर येतील तश्या विनाअवकाषे पाठवून दिल्या पाहिजेत. कलम

१ राजश्री गोविंद अनंत फडणीस यास मालवनास रवाना केले म्हणोन लिहिले त्यास तिकडे कैसा काये मजकूर होईल तो वरचेवर लिहिण्यात येत आसावा.

१ चिरंजीव राजश्री पंतप्रतिनिधि कराडकर हुजूर येऊन गेले त्याचा मजकूर बिस्तारे करून दिला तो सविस्तर कलला त्या प्रों बाहादर याचे कानावरी घातले.

१ इंग्रेज बाहादर यासी इनामयेतनामेची थैली हुजूरून सादर जाहली आहे त्याची नक्कल पाटविली आहे ही पाहून थैली बाहादर याजकडे गुदरून हरजबाब घेऊन पाठवून देणे म्हणोन लिहिले त्याप्रो थैलीतील अन्वये समजून घेऊन थैली बाहादर याजकडे प्रविष्ट केली दरजबाब घेऊन मागाहून पाटवून देऊ. कलम

१ पेशजी इंग्रज बाहादर यासी कागल तालुकेविसी थैली सादर जाहाली होती त्याचा हरजबाब आला नाही म्हणोन लिहिले त्यास जे समयी थैली आली ते समयी गुदरून हरजबाब घ्यावा म्हणोन विचारिले तेव्हा बोलले जे आम्ही कागल तालुकेविसी थैली लिहिली होती त्याचा हरजबाब आमचा आम्हास येऊन पोचला याप्रो बोलले आपणास कलावे. कलम

१ बाहादर याणी परशराम रामचंद्र याचे वैवाटीचे दाखलेवरी चिकोडी व मनोलीची सरहाद ठरविली आहे ते मंजूर करू नये म्हणोन लिहिले त्या वैवाटीवर आम्ही मान्य नाही ऐसे साफ उत्तर देत असावे म्हणोन लिहिले त्या प्रोंच बाहादर यासी हरवख्त दर बैटकीचे बोलणेत बोलत आहो कैलासवासी छत्रपति याणी आपली दोस्ती करून राज्याचे ओझे आपल्यावरी ठेऊन गेले आहेत त्यापक्षी कलेल तैसे राज्याचे ऊर्जित करावे याप्रमाणे उत्तर करीत आहे. कलम

१ किले भुदरगड येथील लोक माळवणास गेले आहेत त्याजविसीचे बोलणेविषी लिहिले त्याप्रो बाहादर यासी बोलून खातरजमा केली हुजूरुन जे केले आहे ते देश आंदेशे पाहून केले आहे दुसरेकडील गैरवाखे समजोन घेत जाऊ नये याप्रमाणे बोलले. कलम

१ राजश्री कृष्णराव गोपाळ यानी इंग्रेज बाहादर यार्जावसीचा पर्याये लिहिला तो कलला त्याप्रो बाहादर याजकडे बोलवून उत्तर होईल त्याप्रो मागाहून लिहून पाटऊ. कलम

१ नेसरीकर सिंदे याणी नेसरी तालुक्यात उपद्रव केला आहे त्याजविसी बाहादर याचे कानावरी घालून उत्तर होईल त्याप्रो लिहून पाटवावे म्हणोन लिहिले त्याप्रो बाहादर याचे कानावरी घातिले त्यानी कोटे कोटे उपद्रव कसाकसा केला आहे हे लिहून देणे म्हणोन सांगितले त्याजवरून यादी लिहून दिल्ही आहे आणि बोलले जे नेसरीकर निपाणीकर याजपासी राहून आसा उपद्रव करितात ऐसे खचित लिहून पाटवून शोध आणवने त्यास निपाणीकर याणे गाव खेडी राहावयासी कोणती दिल्ही आहेत त्याची यादी नांवनिसी ऐसे पद्धतवार लिहून आणवणे म्हणजे त्याचा बंदोबस्त करून देतो ऐसे बोलले आहेत त्यास लिहिले प्रो नेसरीकराचा शोध निपाणीकर याचे तालुकेत राहिला असा पुर्ता आणवून तपसीलवार लिहून पाटवणे म्हणजे त्या प्रो बाहादर यासी बोलून बंदोबस्त करून घेऊ. चिरंजीव राजश्री पंतप्रतिनिधि कराडकर यासी हुजूर विनंतीपत्र लिहिणेचा आक्षेप घेतला त्याजवरून पेशजी पंताचे विनंतीपत्र हुजूर आले होते त्याची नकल पाटविली ते पावली सदरहू पत्र त्यास दाखविले तेव्हा त्याचा संशये दूर होऊन पूर्वील पधतीप्रो हुजूर विनंतीपत्रे पाठवितो ऐसे बोलणेत येऊन निरोप दिल्हा म्हणोन लि॥ ते कलले. कलम

१ इंग्रज बाहादर याही पंढरपूरचे मुकामीहून सातबंदी पत्र पाटविले होते त्याची नकल पाटविली ती प्रविष्ट होऊन चिरंजीव राजश्री मोरोपंत चिटणीस याजपासी ठेविले आहे संधीनसार त्यातील मजकूर जमेस धरून बोलावयाचे तैसे बोलतात. कलम

१ किले सामानगड येथील पत्र हुजूर आले त्याची नकल रवाना केली त्या प्रो येऊन पोहोचली त्याअन्वये बाहादर यासी मजकूर समजोन दिल्हा. कलम

१४

येकूण कलमे चौदा लिहिली आहेत त्याजवरून कलो येईल बहुत काय लिहिने हे आसीरवाद.

लेखांक ४६ तारीख ८-६-१८१४

श्री रामचंद्र

रु. नं. १

अ. नं. २१३

याद कलमीबंदी करवीराहून यादी आली त्याची प्रत्योत्तर बीतपसील सुा खमस आशेर मयातेन व आलफ जेष्ट बहुल पंचमी

१ वसुलाचा ऐवज येईल त्याज पौ

१ प्रकर्णी दागिने गहाण पडल आहेत ते सोडवून पाटवून देणेविसी

१ हुजूरचा मुखोटा करणेबद्दल सोने वजन पांच सेर पुतलीच पा। देणेविसी

१ हुजूरचे देवालयाचे कामास पंचवीस रुपये रोख पाठवून द्यावे म्हणोन

१ सोनेची काकणे सुमार २४ त्याजवर करून चिरंजीव सकल सौ आऊबाई (फाटलें आहे) व चिरंजीव बाळाबाई यासी पत्र देणेविसी

१ उंट नफर १० दाहा डेरे व शामिने करणे बा। खडक पाव छिटे दोनशेहे व राहुट्या ४ येणे प्रो पा। देणेविसी

—

५

येणे प्रमाणे नख्ती वगैरे पाटवून द्यावे म्हणोन लि। त्यास वसुलाचे ऐवजाविसी बाहादर यासी निकड लाविलीच आहे

ऐवज हातास आला म्हणजे आपण लिहिले प्रो घेऊन पा।ला

तो ———————————————— कलम

१ इंग्रजी राजकारण पेशजी धोरणे प्रमाणे चालावा म्हणोन लि। त्या अन्वयेच सिलसिला चालला आहे ———————————————— कलम

नेसरीकर सिंदे व माणसिंगराव (फाटलें आहे) प्रांतात उपद्रव करणेच उद्योगात निपाणीकर याचे आनुमते आहेत म्हणोन लि। त्याप्रमाणे बाहादर यासी साद्यंत मजकूर समजोन दिला आहे त्याजवरून बाहादर याणी पेशवेकड बहुतच नेटाने बोलणे घातले त्याजवरुन पेशवे याणी आपाजी लक्ष्मण यास बहुतच जरब देऊन ताकीद केली या गोष्टीचा बंदोबस्त जाला आम्ही करितो म्हणोन बोलला याप्रो परभारे मजकूर समजणेत आला तो लि। आहे. कलम

१ रदकर्जाचा साहा गाव त्याचे दस्ताऐवजी कागद वाडा दग्ध जाहाला तेव्हा दग्ध जाहाले म्हणोन लि। त्या प्रोच बाहादर याजकड बोलतो. कलम

१ हिंमतबहादरीचा तालुका साहावर्षे अनभविला त्याचा वसूल साहा वर्षांचा माघारा यावा येविसी बहादरासी बोलावे म्हणोन लि। त्याप्रमाण बोलत आलो बाहादराची

दोस्ती जाहाली सबब जिकडील तिकडे दबले परंतु आतले बेतानी नेसरीकर व इत्यादि यासी पुरवणी लोक कलापाला चिडवून हुजूरचे प्रांतात उपद्रव करीत आहेत याजविषयी चकती येऊन जिकडील तिकड खोडी मोडाव्या म्हणोन लि॥ त्याप्रमाणेच बाहादर याजकड बोलोन चितात भरऊन दिले आहे व बाहादर यानीही नेटानेच पेशवेकड बोलणे घातले आहे. कलम

१ कागलकर खेरीज करून वरकड सरंजामी याची बोलनी तेथे आलेस हुजूर पा। द्यावी म्हणून लि। त्याप्रमाण जी बोलणी येतील ती आपलकड पा। देतो. कलम

१ तलीगार पलीकडे जाऊन निपाणीकर याचे प्रांतात राहून तेथून अलीकडे उपद्रव करितात म्हणोन लि॥ त्यास झाडेनिसी बाहादर यासी वरचेवरी समजोन दिल आहे व पुढेही वरचेवरी समजोन देत आहो बहिरेश्वर येथील पाटील सुळगावात राहून तेथून बहिरेश्वरावर दावे करितो गावचा मोकासी ब्राह्मण जीवे मारिला वगैरे नासाडी बहुतच केली याप्रमाणे हारवख्त चहूकड उपद्रव मनस्वी करितात म्हणोन समजोन दिले त्याजवरून यादी लिहून मागितली त्याजवरून वाकिबीगिरीसी यादी सदरी लिहिले प्रमाणे मजकुराची लिहून दिली ती यादी बाहादर यानी घेऊन पेशवे याजकडे दिली आहे जाबसाल होऊन येतील तसे मागाहून लेहून कळवितो —— कलम

१ निपाणीकराकड सनदा पत्रे व दस्ताऐवजी कागदपत्र गुंतले आहेत त्याजविषयी बोलणे बोलतच आहो. —— कलम

१ वाटारकराकड रांगणेची सनद व सर्वत्राचे ऐवजीचे पत्रे गुंतली आहेत ती मागोन घेऊन प॥ देणे म्हणोन लि॥ त्यास वाटारकर याचे म्हणणे आपला बाकी ऐवज राहिला आहे त्याचा फडशा झालेशिवाय कागदपत्र द्यावयाचे नाहीत सरकारातून तो झाडेनिसी ऐवजाचा फडशा झाला परंतु राजेश्री बहिरजी भोसले याजकड ऐवज राहिला आहे त्यास ताकीद होऊन निकडीने वाटारकर याचा ऐवज पोहोचता होय ते करावे म्हणजे सनद व दस्ताऐवजी पत्रे मागोन घेऊन प॥ देतो व आमची खते गुन्तली आहेत तीही काढून घेतो निकडीने भोसले यासी ताकीद होऊन ऐवज पोहोचता करवावा —— कलम

१ कागल प्रांत ठाणी घालून द्यावी म्हणून बहादर यास हारवख्त बोलणे बोलत आहो —— कलम

१ तोरगलाहून पत्र हुजूर आले तेच इकड प॥ त्यास त्याप्रो जाबसाल करून मागाहून लिहून कळवितो —— कलम

हुजूर खासगीकड तिवट कोरे दारवाडी × × × म्हणोन लि॥ त्यास दोन पोशाख चिरंजीव राजेश्री दिनकर याजसमागमे प॥ आहेत पोहोचलेच असतील —— कलम

१ सरंजामी इत्यादिक यात कोणी हुजूरची दहशत खाऊन येणेस अनमान केलयास आपण येथे बोलणे बोलोन उलघडून घेऊन हुजूर पाठवून देत असावे आपला लेख येईल त्याप्रमाणे बंदोबस्त करून देविला जाईल म्हणोन लि॥ त्याप्रमाणे येथे जे बोलणेस येतील त्यासच ठरवून आपलेकड पत्रे देऊन पा॥ देऊ त्या अन्वये आपण बंदोबस्त करून देत जावा. ——————————— कलम

१ वसूलाचे रुजुवातीस इंग्रज बहादर याजकडून राजश्री अंताजी गंगाधर गेले आहेत त्याचे पत्र येते राजश्री बापू साने याजकड आले कीं प्रजन्यकाळ जवळ आला वसुलाची रुजुवात निकडीने व्हावी म्हणोन श्रीस व हुजूर व राजश्री हायब्रतराव दादास पत्रे पाठविली × × तू चितावर घेऊन जाबसाल होत नाही व पत्रा × × देखील येत नाहीत याप्रमाणे × × कड पाठविले त्यास आमचे कामाविषयी दुसरे × × धरावी आणि आम्हाकडून हेळसांड व्हावी ऐसे × बाकी राहिले असतील ते गावाकडे गावकर हुजूर करवीर आणवून अंताजीपंत यासीही करवीरसच आणवून रुजुवातीचे काम निकडीने आटोपात येईल ऐसे करावे — कलम

—

१५

एकूण कलमबंदी कलमे मुमार पंधरा लिहिली आहेत त्याजवरून कलो येईल हे आसीरवाद–

लेखांक ४७ तारीख १८–६–१८१४

हू

अ. नं. ३५६

श्रीमन्माहाराज छत्रपतिसाहेब एकवाल
पन्हाहूं

आजीसवाब हनराबल मोट इष्टवारीट इलफीसतन साहेब बाहादूर बाद सलाम खैरीत आऊर दे मारूज आके येथील खैरीयत जाणून हमेशा तलजुफनामा फिरस्ताद फर्मावीत जावा दरीवला माहाराजाकडून दोन आलथाफनामे येक मरहूसे छ १ माहे जमादिलावलचा व दुसरा छ २१ माहे मिनहूस

मजमून दर्यात्फ जाला माहाराजाची कामेकाजे मालुमे जलदीने उलगडयात येऊन व सरकार दौलतमदार कुंपणी इंग्रज बाहादूरचे दोस्तीचा भरवसा आहे म्हणोन बयावार कलम

मरकुम फर्माविला व श्री बाबा माहाराज व हैबतराव गाईकवाड विश्वासराव याणी माहाराजाचे सरकाराचे बंदोबस्तकरिता कलमी केले होते त्याजला इकडून हरजवाब लिहिले आहेत तेही हुजूरात जाहीर करतील त्यासी इतके दिवस राव पंडत प्रधान बहादूर व

सदासिवपंत भाऊ थेथे नव्हते हाली पुणीयास दाखल जाहाले आहेत इनशाआलाहूताला माहाराजाचे संरकारचे आमारत आनकरीब ज्यारी होतील बाकी मजकुरात श्री भाऊ माहाराज व दिनकरराव गायकवाड व वकील याचे लिहिल्यावरून खातर मुबारकेस रोशन होईल   ता॥ छ १८ माहे जून

(सही इंग्रजी एल्फिन्स्टन)
साहेबाची

लेखांक ४८   तारीख २४-६-१८१४

श्री

अ. नं. ३६४

राजमान्य राजश्री कृष्णराव घोरपडे अमिरूलउमराव यास आज्ञा केली येसीजे राजश्री ब्रहिरजी भोसले यासी ठाणे नेसरी येथे रवाना केले आहेत त्यास तुम्हाकडील लोक आसामी २५ पंचवीस घेऊन जाण्याची तुम्हास आज्ञा जाहाली आसे तरी आज्ञे प्रो पंचवीस लोक घेऊन तुम्ही ठाणे मा॥रास निघोन जाणे जाणिजे सु॥ खमस आशर मयातैन व अलफ रा॥ छ ५ माहे रजबू यास खर्चास देणेविसी मा॥रनिलेस आज्ञा जाहाली असे तरी आज्ञे प्रो लोकसुधा मारनिलेकडे जाऊन खर्चास घेणे जाणिजे छ मार बहुत काय लिहिणे मोर्तब आसे.

लेखांक ४९   तारीख २-७-१८१४

श्री

रु. नं. १   तालीक
अ. नं. २१५

सेबेसी अमृतराव सिंदे सुा खमस आशेर मयातेन व अलफ कारणे लिहून दिल्ये ऐसीजे आम्ही सरकार कामामुळे गोवे मुकामी हातो ते वेलेस राजश्री सभापति मुदलीयार नि॥ इंग्रेज कंपणी याची व आमची दोस्ती जाली इतक्यात महाराज वारल्याचे वर्तमान गोवे मुकामी आले नंतर श्रीचे पत्र आम्हास आल होते त्यात मार कीं स्वतंत्र कारभारी आम्ही हाताखाली वागतो आणि गैर असल्यास तुम्ही गोव्यात व श्री पुण्यास व नारोपंत लस्करात यैसे आसोन भेट काये यैसे पत्र आम्हास मुकामी आले तो पुणे जेस्टमासी सभापतीची नेमनूक लष्करात जाली याजवरूण मुकामी त्यास पुसिले कीं श्रीनी इंग्रेजाची दोस्ती केली यारतव तेथे सरबत्र ठीक पाहात नाही याचे कांहीं कुमक आपण

करविल्यास संवेस्थानी तुम्हास येक आसामी देऊन सोइ श्री करिवितील यैसा मार त्यास बोलिलो त्याजवरून दुभासी याची चकती साईत्य पत्राची आम्हास मिलाली व सभापतीने उत्तर केले जे तुम्ही करवीरास जाऊन श्रीचे पत्र आम्हास पाटवावे तुम्ही तथे जाऊन मा।र समजून द्या त्या सारिखा आम्ही येण्याचा बेत करविरी करून इतके मात्र भाशन तेथे जाहाले होते करवीरी आम्ही आल्यावर श्रीनी सर्व मार पुसून घेऊन सभापतीचे वि।। जाबसाल करवाव म्हणोन बोलिले त्याजवरून मी विनंती केली कीं त्यास येथे येण्यास हुजूरचे आज्ञापत्र व तुमचे पत्र पाहिजे त्याजवरून हुजूर विनंती केली आज्ञापत्राची परवागनी जाहाली तो राजश्री उदबाआपा याणी उत्तर केले कीं त्याचे विनंती पत्र हुजूर आल्याशिवाय आज्ञापत्र देणार नाहीं ऐसे ठरल्यावर श्रीचे पत्र सभापतीस व आमचे पत्र येसे लस्करात पुढे रवाना केले आणि मागाहून आमची रवानगी करून देतो येसे राजश्री नानास श्रीनी लि।। तेव्हा आम्ही पुसिले कीं त्यास येथे आणोन पर्याय आपण समजावणार ते ठरविणार त्या बा।। त्यानी आम्हास पुसिले कीं यात आम्हास व कंपणीस नफा काय असा मुद्दा घातल्यास त्यास काय द्यावे याचा जाबसाल आम्हासी बोलू लागल्यास आम्ही उत्तर काय करावे त्यावरून त्यानी आज्ञा केली जे पांच हजाराचा गाव त्यास व इंग्रेजास पंचवीस हजाराचा सरंजाम देवऊन येसा भाव बोलून रवानगी करण्याच्या बेतात होते तो राजश्री नाना याणी पत्र पाटविले की तूर्त सिंदे यास लष्करात पाठवू नये व कोणी ग्रहस्त श्री देखत बोलिला कीं पंचवीस हजाराचा मुलूख आम्ही कबूल करावा येसे श्रीनी आम्हास कमी काय केले आपणही या गोष्टीस रुकार देऊ नये नंतर तीं गोष्ट आमचे वि।। बोलण्यात होती ती हाली सभापति येथे येईतोपावतो मोघम जाबसाल होता आम्ही वाडयातून निघालो तो सभापतीही येथे आले नंतर त्याची व आमची भेट होताच त्यानी वर्तमान दुसरे रोजी पुसिले कीं तुम्ही श्रीचे कामाविसी पूर्वीपासून जपत होता व आम्हासी कितीक मा।र बोलत होता त्याचा पर्याय हाली आसा का व तुम्ही तेथून निघाबयास कारण काय तेव्हा आम्ही उत्तर केले की त्याचे व आमचे बनत नाही श्रीमंत मातोश्री आकासाहेब याजकडे आहो आपणास कोणताही पर्याय काढून श्री वचनास गुंतवितील तर महाराज आईसाहेब याचे आज्ञे खेरीज वचनास गुंतू नये यैस त्याणी येकताच येथील कारभारी जुने कोणते व नवे कोणते थार्ची नांवे लिहून ध्यावी त्याजवरून आम्ही त्यास पुसिले कीं याचे कारण काय त्यावरून ते बोलिले कीं आम्हास जुने नवे माहीत असावी म्हणोन पुसतो त्यावरून जुने कारभारी राजश्री आपा व सरनोबत व पाटणकर व हाली राजश्री हैबतराव दादा व उदाजीराव घाटगे व श्री येसे आहेत त्याजवरून तितकी नांवे त्यानी लिहून घेतली आलीकडे श्रीस आम्ही पुसिले कीं या द्वंद्वात काय आहे त्यानी उत्तर केले कीं त्याच्या चिठ्या आम्हाजवल निपाणकर प्रकर्णी आहेत त्या इंग्रजाजवल देऊ येसे आम्हाजवल बापू महाराज बोलत होते हा लिहून दिल्हा करीणा सही

मिती आषाढ शु।। १५ छ १३ माहे रजब.

लेखांक ५० तारीख १४-९-१८१४

श्री

राजमान्य राजेश्री आबाजी घोरपडे अमिरूलउमराव यासी आज्ञा केली यैसीजे मौजे बुजवड येथील वलतीची गुरे राजश्री आपाजी देसाई ता॥ चंदगड याणी आणलेली तुम्हाकडे आहेत ती हुजूर पाठऊन देणेची आज्ञा होऊन हुजूरने
यासी पाठविले आहे तरी सदरहू गुरे झाडेनसी हुजरे याचे स्वाधीन करून हुजूर पाठऊन देणे जाणिजे सु॥ खमस आशर मयातैन व आलफ र॥ छ २९ माहे रमजान बहुत काय लिहिणे मोर्तब आसे.

लेखांक ५१ तारीख २१-९-१८१४

श्री तालीक

अ. नं. ७९७

म॥ अनाम जाधव देसाई मौजे
चिंचणी प्रांत रायबाग यासी

सदासिव माणकेश्वर सु॥ खमस अशर मयातैन व आलफ मौजे भजकूर हा गाव तुम्हाकडे इनाम आहे त्यास श्रीमंत माहाराज करवीरकर याचे जिल्ह्यातील सबब तुम्ही करवीरकर याजकडे रुजू राहून सुदामत वर्तणूक करणे जाणिजे
छ ६ शवाल मोर्तब सुद मोर्तब.

लेखांक ५२ माहे नोव्हेंबर इ. स. १८१४

श्री

अ. नं. ३६३

सेवेसी सुंदराबाई साहेब सेवेसी विज्ञापना ता॥ छ माहे जिल्हेज पर्यंत सकल वृत येथास्थित असे विशेष हुजूरने राजश्री दिनकर आपाजी यासी मालवणास जकायेतीचे बोलणेकरिता व गीर्दागीर्दीचे जाबसालाकरिता पाठविले आहेत त्याणी मालवणास जाऊन तेथील अजम पंडलोप बाहादर यासी बोलणे जाहाले त्या मजकुराची विनंतीपत्रे व त्याजकडील गीर्दागीर्दीचे मजकुराचा तरजमा म्हराटी लिपीचा करून दिल्हा तो मशारनिले याणी हुजूर पाठविला त्याची तालिक व दिनकर आपाजी याचे विनंतीपत्राच्या तालका येशा येकंदर आपणाकडे पाठविल्या आहेत त्यावरून सविस्तर मजकूर ध्यानात येईल व मालवणसमधे बोलण्यातील माहितगार विठोजी नाईक जाधव आहेत त्यासी आज्ञा करून + + + + ले आहे तरी सविस्तर मजकूर समजोन घेऊन गीर्दागीर्दीचे बोलण तेथे आहे इंग्रज बाहादर यासी घालावे तरजमेत भाव लिहिला जे राजश्री रत्नाकर पंडित

राजाज्ञा जंजिरा द्यावयासी गेले त्यासमई प्रांत सुधा जंजिरा स्वाधीन केला आहे येसे खिसा लाविला आहे त्यास राजाज्ञा याणी जंजिरा स्वाधीन केला ते समई इंग्रज याची पावती घेऊन हुजूर आले त्या पावतीची तालीक हाली आपणाकडे पाठविली आहे या पावतीत चार किले दिल्हे हे पावतीवरून आपले ध्यानात येईल तरी तेथे बाहादर यासी बोलणे घालोन करारा प्रो चारी किल्याची जमीन गीर्दागीर्द खर्चाची घेऊन बाकीचा प्रांत रसदेचा हुजूरचा हुजूर सोडून द्यावा दुसरे कलम सालसी माहाल तर्फेच आचरे येथे राजश्री पंतअमात्य याजकडील व हुजूर निसबत यैसे दीड तक्षिमेचा ऐवज हुजूर येत होता तो यैवज साहेबाचे खासगीचा परंतु येलीकड जंजिरा मामलेदार राहात होते त्याजक + हुजूरून आचरे येथे कोटातील यैवजाची वैवाट सांगितली होती याजमुले जंजिराकड वसूल देऊन तिकडून येकंदरात हुजूर यैवज येत होता त्याचे आगोदर त्या यैवजाची वैवाट परभारे हुजूरने आमलदार जाऊन वैवाट हुजूर येत होता या प्रो पैली वैवाट व आलीकड जंजिराकडील मामलेदार याजकडे वैवाट सांगोन यैवज हुजूर येत होता याप्रो वैवाट आसता जंजिरा इंग्रज यासी दिल्हा त्यापासोन जंजिराचा यैवज म्हणोन इंग्रज वसूल मालवणास नेहतात याजकरिता येविसीचे बोलण पेसजी आपण व चिरंजीव राजश्री दिनकरराव भोसले यैसे पुणेत बाहादर याजपासी बोलणी जाहली आहेतच परंतु बोलणेचा भाग तुटोन यैवजाची मोकलीक जाहाली नाही याजकरिता हाही जाबसाल आपण बोलोन आचरे येथील यैवजाची मोकलीक होऊन मालवणचे अमलदारास चकती येऊन यैवज हुजूर येई ते करावे दिनकर आपाजी याणी मालवणात अजम पंडलाप (दंडलाद ?) याजकडे बोलणेची यादी हुजूरची करून दिल्ही आहे त्याची तालीक मा॥रनिले याणी हुजूर पाठविली आहे त्याची तालीक आपणाकडे पाठविली आहे आपण पाहावी म्हणजे मालवणात बोलणे जाहले आहे व याद दिल्ही आहे त्याचा मा॥र आपले ध्यानात येईल आणि तेथेही बोलणेस माहितगारी ठीक पडेल सदरहू यादीस कलम पाचवे मा॥रनिले याणी हुकुमासिवाये लिहून दिल्हे आहे जे वे॥ राजश्री रघुनाथभट बिन बालक्रुष्णभट सादले (सापले ?) याजकडे हुजूरने धर्मादाव बाग बंदर तड मालवण ही बाग भटजीकड धर्मादाय दिल्ही आहे चालवावी म्हणोन गैर यादी तीन कलम लिले आहे त्यास सदरहू बाग + + पेशजी हुजूरने इनाम करून देऊन राजपत्रे दि + + + याजकरिता यादीस कलम लिहिले आहे ते गैरमाहितीने लिहिले म्हणोन आपण बोलोन श्री ची बाग + + + करार करून घ्यावी किले भरथगड येथील बोलणे + + + करून कलमबंदीची आलाहिदा करून पाठविली आहे + + + तोही जाबसाल बोलोन उलगडोन येई ते करावे रा + + नारायेण व राजश्री आंताजी गंगाधर याजकडून + + + + यादी वसूलाच्या हुजूर आल्या त्या आपण + + + विल्या आहेत. कलावे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक ५३ तारीख १४-१२-१८१४

श्री

रु. नं. ५

अ. नं. ४६५

यादी राजश्री जीवनराव सिंदे याजकडील सरंजामात कसबे नेसरी व गावखेडी पेशजी चालत होती त्याप्रमाणे सरंजामास चालवून सेवा घ्यावी म्हणोन राजश्री सटोजीराव यादव यानी हुजूर विनंती केली त्यावरून हली सरंजामास कसबा मजकूर व गाव पेशजी प्रमाणे सोडून दिले त्याचे नजराणेबद्दल नक्त रुपये पांच हजार हुजूर घेतले ते पावले

५०००

असेत जाणिजे सुा खमस आशर मयातेन व आलफ र।। छ. १ माहे मोहरम रुजू.

लेखांक ५४ तारीख १८-१२-१८१४

श्री

अ. नं. ३६०

समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री भगवंतराव पंडित प्रतिनिधि यासी आज्ञा केली येसीजे राजश्री बाजीराव पंडित प्रधान याचा मुकाम निपाणीस जाला आहे याजकरिता आपणाकडील स्वार व लोक सरंजामसुधा राजश्री आंताजी माहादेव याजसमागमे पुढे रवाना करून द्यावे आणि मागून आपण हुजूर यावयाचे करावे येविसी तीर्थस्वरूप मातुश्री बाळाबाई आका निंबालकर बाहादूर याणी लिहिले आहे त्याप्रमाणे पाठऊन द्यावे.

लेखांक ५५ इ. स. १८१४-१५

श्री

रु. नं. १

अ. नं. २१०

यादी काजकामाची वगैरे

वर्तमान सुा खमस आशर मयातैन व आलफ

१ आलफीष्टान बहादर व कर्णेल कल्स असे उभयता वागाचे सिकारीस म्हणून बोरघाटास मुंबईचे आर्धमार्गास बोरघाट आहे तेथे गेले आहेत त्यास जाऊन आज चाररोज जाहाले आगोदर डेरे वगैरे सामान लाऊन देऊन नंतरी आपण निघोन गेले जातेसमई आम्ही काजकामाविसी बहादर यासी समक्ष विचारिले याणी सांगितले कीं आम्ही सिकारीस जातो मागे रसूल साहेब ठेविले आहेत त्यास तुम्ही विचारीत जावे याप्रमाणे त्याचे समक्षता करून देऊन आपण निघोन गेले सोमवारी मध्यांन रात्रीं

अधिक श्रु चतुर्थदसीस निघोन गेले पंधरा रोज याजला येण्यास लागतील आतील बातमी कीं बागाचे निमित्य करून बोरघाटास गेले आहेत तेथे मुंबईचे साहेबास आणून नंतरी ते व आपण मिलोन पुणेस येणार यैसी बातमी आहे

१ भाऊ याजकडे काजकामाची यादी बहादर याणी पेशजी दिल्ही आहे त्याप्रमाणे दानवाड व लिंगनूर व देसाई याचा गाव चिंचणी जलालपूर व घोसरवाड व संवदुती या गावच्या सोडचिठ्या याव्या यैसा भाव छोटा कर्नल कुलूस याचे बोलणेत आले परंतु आद्यापि सोडचिठ्या आल्या नाहीत दररोज यास विचारीत आहे ते शिकारीस गेले तेव्हा सध्या ते येईपर्यंत तहकूब आहे काणराव यासी वसूलाची रुजवात करणे-विसी भाऊचे पत्र गेले आहे म्हणून कुलूस सांगत होता

१ श्रीमंत पंतप्रधान याची स्वारीही आजी भृगुवारी तीसरेप्रहरा वाईस कृष्णा स्नाना-करीतां निघोन गेली आठ दहा रोजी येतील येसा वर्तमान आहे.

लेखांक ५६

इ. स. १८१४–१५

श्री

रु. नं. ५

अ. नं. ४५१

यादी मखलाशा राजश्री प्रतिनिधि पंत याजकडील बोलणेच्या सुा खमस आशर मयातेन व आलफ

१ पेरीड हा गाव पेशजी महागावचे मोबदला आपणाकडे दिला होता हल्ली माहा-गाव आपणांस दिले आहे त्यापेक्षी पेरीड गाव हुजूरचा हुजूर असावयाचा त्या पक्षी ऐसी विनंती लिहू नये.

१ परखंदळे हा गाव शेवकाचा म्हणोन विनंती लिहिली त्यासी कैलासवासी तीर्थरूप माहाराज साहेब याचेवेळेस वैवाट चालली असेल त्याप्रमाणे पुढे वहिवाट चालणेची आज्ञा होईल.

१ बाबतीचा ऐवज पेशजी वहिवाटी प्रमाणे चालवणेची आज्ञा जाली असे.

१ रेटर व मालेवाडी मल्हारराव सरखवास याजकडील × गाव दूर करून हिमत-बहादर याजकडे दिल्ही × हली आपणाकडून हिमतबहादर याची हुरमतली आहे त्यापेक्षी सदर्हू दोनी गावावरी आपणाकड बाबतीचा ऐवज येणे तो ऐवज हिमतबहादर यासी दरोबस्त बक्षीस करावा.

१ राजेश्री हिमतबहादर यानी कांही कारण उपस्तीत केलेस हुजूरुन उपराळा होऊ नये म्हणोन विनंती लि॥ अशास उभयताही सरकारचे सेवक त्या पेक्षी उभयताचाही उपराला हुजूरने करणे प्राप्त.

१ पागेस दोन गाव द्यावे म्हणोन विनंती लि॥ अशास पेशजी पलीकडील शिरोल

तालुके पैकी गाव आपणाकडील पागेस दिले आहेत त्यासी शिरोल तालुका हुजूर आले-नंतर सदर्हू पेशजी दिलेली गाव ती देणेची आज्ञा होईल.

१ पेशजी शेवकाकडील पांच गाव हुजूर ठेविली आहेत ही सोडून द्यावी म्हणोन विनंती लिहिली अशास लोक सबंधे तीर्थस्वरूप श्रीमन्माहाराज मातोश्री आईसाहेब यांचेवेळेस आपण गाव हुजूर दिला आहेत त्याप्रमाणे हुजूरने त्याचवेळेस संस्थान किल्ले पनाल्केडे पूजाउर्जेस दिली आहेत ती गाव देवाकडील माघावयाची नाहीत.

१ किल्ले पनाळा येथील कारखानसीची आसामी पूर्ववत प्रमाणे शेवकाची शेवकाकडे चालावी म्हणोन विनंती लि॥ अशास तीर्थरूप माहाराज साहेब याचे वहिवाटी प्रो चालवणेची आज्ञा होईल.

१ अंताजी माहादेव कारकून यासी आज्ञापत्र येऊन पूर्ववत प्रमाणे कामात वागवून बहुमान व्हावा म्हणून विनंती लि॥ अशास आपणाकडून कारकून दुसरा मर्जी रक्षून राहावयाजोगा हुजूर पाठवून द्यावा.

१ करवीरी वाडा व बाग व कुरुण देणेची व्हावी म्हणोन विनंती लि॥ अशास वाडा बांदणेची आज्ञा जाहाली आहे कुरण व बाग पेशजी वहिवाटी असेल त्याप्रमाणे आज्ञा होईल.

१ पेरीडचे गावकर याची खते निशा घेतली असल ती देणेची आज्ञा जाली असे.

१ एकंदर हुजूरचे तालुकेत वसूल घेतला असेल व गावगन्नाची खतपत्रे व बोली व निशाचिठ्या याने घेतली असतील ती जराबाजरा माघारे घ्यावी.

१ मौजे पिशवी तर्फ सातवे श्रीचे देवघराकडील गाव तेथील घरेदारे दग्ध करून गावची नासाडी जाली तरी देवघराकडील गावची अवस्था ऐसी आपणाकडून घडो नये गावचा जागा हा व हल्ली व खतेपत्रे जराबाजरा माघारे द्यावी गावचे पाटील जीवे मारिला आहे त्याजला खूनकाट आपणाकडील गावात नेमून द्यावे.

लेखांक ५७ तारीख ६-२-१८१५

श्री

अ. नं. २३२

राजश्रियाविराजीत राजमान्य राजेश्री

रत्नाकर पंत अपा राजआज्ञा स्वामीचे शेवेसी

पो यमाजी दिनकर स॥ नमस्कार विनंती येथील कुशल त॥ छ २५ मोहरम जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असल पाहिजे विशेष आम्ही आपला निरोप घेऊन सांगलीस आलो च्यार दिवस कामा करिता लागल येथून लवकर याव तो सदर गावी निपाणकर याचा रोखा नाइकी व पाटिलकी जप्ती करून च्यार अ॥ वरातदार येऊन मनस्वी दंगा गावी करीत आहेत आणि मौजे किणे हा गाव ठाणे घालाव म्हणोन लोक पाठविले आहेत आणि वंटमुरीकर देसाई यासी तगादा लाविला आहे कीं परभार

वतनाकरिता स्वाऱ्या शिकाऱ्या कराव्या आपण कुमक देतो त्याजवरून वंटमुरीकर थाचें निमित्य करून स्वारी केली आणि पुढ करणार असा चोहूकडोन उपद्रव लाविला आहे सांप्रत पुणेत आमच कोणी नाही आपणाकडोन वरचवर बोभाट जाऊन बंदोबस्त व्हावा तोही विचार घडत नाही शंभर जणाची लचांड बगलस धरून हुजूरचे तात उपद्रव होतो ही माहीत सविस्तंर आपणास आहेच आजचे प्रसंगी हुजूरून बोभाट इंग्रज बहादर याजकडे गेला असता तेथ वकीलास ताकीद होऊन पाहिजे तसा नेट बसल परंतु हुजूरून वरचवर बोभाट लिहिणेच जाऊन वकीलास समजोन वकीलानी मेहनत केली असता पुढील साधन असो परंतु आहे त्यास निर्वेद यस्थास्तित होईल नित्य उठोन किरकीर तरी तुटेल आपण वडील मी लिहून कलवावस नाही सर्व आपल्या लक्षात वागतच आहे आम्ही कोणता विचार करावा तो वडीलपण लिहिणेस आज्ञा व्हावी त्या प्रमाणे वर्तणूक करू आम्ही राहात होतो ते घर सरकारातून आपण देविल होत हली श्री भाऊ माहा-राजानी हुजूर विनंती करून घरापैकी घोडी गुर बांधावयाची जागा होती ती घेतली. म्हणून पुरा। विनंती विशेष जे

तेथील कारकुनाच पत्र आल त्यास आम्ही हुजूर राहूच नये सेवा चाकरीचे उपयोगी नाही असीच हुजूरची मरजी असल्यास आमचा उपाय काये माघील वडलार्जीत वेव्हार येकींकड ठेऊन स्वामी कार्याबद्दल कोण दशा जाहाली पुणे मोकामी हुजूरच बोलणत नसाव म्हणजे वतन वगैरे सोडोन देतो याप्रमाण निपाणकर याची बोलणी आली ती बोलणी प्रत्यक्ष श्री भाऊ माहाराज यासी रुजू केली परंतु हुजूरचे पायासी अंतर नसावा सबब बोलणे न घेता होईल तितकी सेवा केली हा मौसबा श्रीने हुजूर गुदरावा तो अर्थ घरची परवाणगीच आपण घेतली तेव्हा बक्षिसी भरून पावलो पुणे मोकामी लोभ करीत होत तेव्हा कारण पडत होत हाली घरी आले तेव्हा तेथील उपयोग तेथ राहिला परंतु आम्ही सेवा केली ती हुजूरची केली आहे पुढही सेवा करून दाखवणेची उमेद बाळगतो तो अर्थ स्वामीचे चित्ती नसल्यास हुजूर विनंती करून उत्तर कलवाव स्वामीचे नांव समर्थ आहे कोठ तरी पोट भरून अन्नवस्त्रापुरता उद्योग करू आमच दैवी स्वामी सेवा-वर खराबी व्हावी आणि पुढे सेवाही घडो नये असच दैवी असल्यास आपण तरी काय करतील बहुत काय लिहिणे कृपा लोभ करावा ही विनंती.

लेखांक ५८ तारीख ६-२-१८१५

श्री

अ. नं. ३६५

राजश्री सिदोजीराव नाईक निं

बालकर सरलस्कर गोसावी यासी

सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्ने।। सदासिव माणकेश्वर आसीरवाद विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष पा

कागल माहाल पै।। राजश्री येशवंतराव घाटगे याजकडील सात गाव आपण घेऊन राजश्री हिंदुराव घाटगे याजकडे वहिवाटीस दिल्हे आहेत म्हणोन समजले त्याजवरून हे पत्र आपणास लिहिले आसे तरी पे।। मजकुर पैकी सात गाव आपण घेऊन घाटगे याजकडे दिल्हे आहेत ते मशारनिलेकडे द्यावे. र।। छ २५ सफर बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

लेखांक ५९ तारीख ८–२–१८१५

श्री

अ. नं. ३६५

चिरंजीव राजश्री कल्याणराव कृष्ण या प्रति दादो आनंदराव आसीर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष राजश्री आपाजीराव निंबालकर सर-लस्कर यास मौजे लिंगनुराविसी पत्र वडिलानी लिहिले आहे हे पत्र तुम्ही त्यास पावते करून दुसरी सोडचिठी त्याजपासून घेऊन गाव आपले हस्तगत करून घेऊन दानवाड सुध्धा दोनी गाव करवीरकर माहाराज याचे स्वाधीन करावे आणि गाव पावल्याची पावती घेऊन पाठऊन द्यावी र।। छ २७ माहे सफर सन खमस आशर मयातैन व अलफ. बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे आसीरवाद.

लेखांक ६० तारीख १५–२–१८१५

श्री

रु. नं. २
अ. नं. ३३२

राजमान्य राजश्री नारायणराव व्यंकटेश घोरपडे यासी आज्ञा केली ऐसीजे स्वामीचे शेवेसी तुम्ही विनंती पत्र पाठविले तेथे लिहिले जे मौजे सिराढोण येथील देसकतीचे हकाचा ऐवज दुसरीकडे न देता राजश्री भरमाजी जाधव देसाई चिंचणीकर याजकडे देवणेविसी आज्ञा जाहाली त्यासी मौजे मजकुराकडील देसकतीचा ऐवज राजश्री सुब्राव जाधव देसाई याजकडे देणेविसी निपाणीकर याजकडील पत्र आणोन वरातदार गावास पाठविले आहेत याजकरिता याजकडे ऐवज देता येत नाही ज्यानी हकाचा ऐवज घ्यावा त्यानी दुसरेकडील ऐवजाविसी तगादा लागो देणार नाही म्हणोन खातरजमा करून दिली असता ऐवज द्यावयासी चिंता नाही म्हणोन विनंतीपत्री लिहिले ते निवेदन जाहाले अशात पेशजी तुम्हास आज्ञापत्र सादर जाहाले आहे त्याप्रमाणे भरमाजी जाधव देसाई याजकडे ऐवज देवावा सुब्राव जाधव देसाई याजकडे देणेविसी रोखापत्र आलेस माघारे देवणे सदरहूचे ऐवजाविसी निपाणीकर याजकडील उपसर्ग लागावयाचा नाही तरी

आज्ञेप्रमाणे भरमाजी देसाई याजकडे ऐवज देवणे. जाणिजे सुा खमस आशर मयातेन व आलफ र।। छ ५ रोवल.

लेखांक ६१

तारीख १८-२-१८१५

श्री

रु. नं. २

अ. नं. ३३३

राजश्री कल्याणराव कृष्ण नि।। राजश्री प्रधान पंत यासी आज्ञा केली ऐसीजे सुा खमस आशर मयातेन व आलफ पुणेहून कागल प्रांता पैकी सात गावच्या सोड-चिठ्या हुजूर आल्या त्या तुम्हाकडे पाठविल्या आहेत तरी सात गावात ठाणी घालून राजश्री सदासिव आनंत याच्या स्वाधीन करून पावती घेऊन हुजूर पाठवून देणे. जाणिजे र।। छ ८ माहे रबिलावल लेखन सीमा.

लेखांक ६२

तारीख २-४-१८१५

श्री रामचंद्र

अ. नं. ३६८

चिरंजीव राजश्री आपा देसाई चिंचणीकर यासी आसीर्वाद उपरी राजश्री सुब्राव व्यंकटराव जाधवराव भरमदेव देसाई नाडगौडा प्रां। रायबाग याजकडील जाबसाल परभारे राजश्री पंतप्रधान याजकडे बोलणे लागले होते तो मजकूर आम्हास समजला नंतर त्याज कडील बोलणार यासी आम्ही आपणाकडे आणऊन त्याचा बंदोबस्त करून द्यावयाचा करार ठरऊन तुम्हास लिा असे तरी तुम्ही व सुब्राव हे मिलोन येकविच्यारे राहावे हे चांगले आहे राजश्री नरसो आणाजी यासी कैद करून बेडी घातली आहे त्यास सोडोन मोकले करून त्याचे विच्यार सुब्राव यासी आणऊन घेऊन वेव्हार होऊन पुन्हा बखेडा न पड ऐसे करणे तुमचे उभयेताचे समजुतीविसी येथे आणून समजोत करावी असा बेत होता परंतु तुम्ही इकडे आलेनंतर पाठीमागे बखेडेखोर आहेत तिकडे मिलोन तुम्हासही थारा नाहीसा करतील याजकरिता सावधगिरीने सुब्राव यासी मिलोन बंदोबस्त राखावा पुन्हा पत्राचा उजूर न करिता लिा प्रो नरसीपंतास मोकले करून त्याजकरवी सुब्राव यासी आणऊन नरसीपंतासुधा येक विच्यार होऊन काम चालवावे नरसीपंतास न सोडता काम विलग पडिले तरी आम्हाकडे सेब्द नाही सुब्राव याचें संधान परभारे होते ते आम्ही व चिरंजीव राजश्री दिनकरराव गायकवाड याणी आपले लगास मिलाऊन घेऊन तुम्हास लिा आहे येविसीचे सविस्तर दिनकरराव गाईकवाड याणी लिा आहे त्याजवरून कलेल बहुत काय लिहिणे रवाना छ २१ माहे रबिलाखर सुा खमस आशर मयातैन व आलफ हे आसीर्वाद.

लेखांक ६३ तारीख २-४-१८१५

रु. नं. २

अ. नं. ३३४

अजम हणराबल मोट इष्टवारीट इल्फीसतन बहादर दाम मोहब्बत हू

शौकत व अवाली पनाह शाहामत ब इजलाल दस्तगाह बाअदज इस्तीयाक फिराबा मशहूध आंके दरिविला आ शौकत पनाहानी कागल प्रांतील हप्त (सात) देह व मौजे लिंगनूर सोडून द्यावे आणि राजेश्री सुल्तानराव कदम यास सोडावे म्हणोन राजेश्री सदासिव माणकेश्वर याची खते निपाणकर याचे नांवची इबलाग केली त्यास ती खते राजश्री कल्याणराव कृष्ण निसबत × × × फिरिस्ताद झाली आसता निपाणकर यानी × × कीकरून खेते वाफस कल्याणराव कृष्ण याचे नजदीक दिली बाईसबाब हुजूर तून अलथापनामेची थैली आ शाहामत पनाहास फिरिस्ताद जाहाली आहे त्यास सर्वपरी हुजूर राज्याची या पतीची शरम व हमीयत आ शोकत पनाहास अस्तानी निगारीश होणे वाजीब नसे वरकड मजमून हुजूर राहून श्री यासी व राजेश्री मोरो बाजीराव चिटणीस यास × × × वाफस खते आली तीही इबलाग जाहाली आहेत त्यास श्री याचे व चिटणीस मोमिइलेचे गुप्तगोईवरून आ शाहामत पनाहास मालूम होईल सुा खमस आशर मयातेन व आलफ रवाना छ २१ माहे रबिलाखर जियादचे निगास्त आयंद आयाम मुदाम बाद.

लेखांक ६४ माहे एप्रिल इ. स. १८१५

श्री

अ. नं. २२४

यादी नख्ती जमाखर्च मुा पुणे विा श्री भाऊ माहाराज व दिनकरराव गाइकवाड सुा खमस आशेर मयातैन व अलफ ञा माहे रमजान ऊर्फ आधिक भाद्रपद ताा माहे जावल ऊर्फ चेत्रमास यो माहे

येकून जमाई नख्त चांदवड

९८४०० वसूलाचे यैवज पो जमा

हुजूरचा व इंग्रज बाहादर याचा तह जाहालानंतर निपाणीकर याणी हुजूरचा तालुकेतील वसूल घेतला तो माघारा द्यावा यैस आजम आलपिसतन बाहादर याणी करारात आणून निपाणीकर याजकडील मोकाशाचे माहलची जप्ती साल गुदस्ता राजश्री सदासिव माणकेश्वर याजकडून करून वहिवाट राजश्री सखाराम चिमणाजी निा माणकेश्वर याजकडे सांगितली त्याचा ठराव साल मारी साल गुासुधा दुसाला बाहादर याणी सखाराम चिमणाजी याजकडे करून दिल्हा याजपैां इंग्रज बाहादर याणी यैवज देविला विा खुरषदजी शेट मोदी रुपये चांदवड पुणे चालणी बरहुकूम पावल्या

४३८७५ सालगुास्ता सन आर्बा अशरचे मामलतीचा ठराव रुा ४५००० पंचेच्यालीस हाजार बाा पावती माघ श्रुाा १ सन खमस आसेर पेाा येवज पावला तो जमा आबा पांडुरंग नाईक पिपडी याचे रद कर्जास रुा

१३८७५ कार्तिक शुाा १३ आजम इलफीतन बाहादर याणी अवरंगाबादेस आजम सीडल बाहादर याजकडून देविले रुा १५००० पंधरा हाजार

....

....

लेखांक ६५

तारीख ६-५-१८१५

श्री

रु. नं. १

अ. नं. २११

यादी बापूराव माहोलकर याचे कर्ज शा अधिक भाद्रपद ताा चेत्र अखेर सन खमस आशेर मयातेन यादीत जमा आहेत चांदवड मिाा चेत्र वाा १२ ——रुपये ८५१८=

यासी तपशील रुपये

७९१।= श्री भाऊ महाराज याजकडील रु.

५०० चेत्र वाा १ ताा वाा ३१ येकूण रोज ०१५ नेमणूक दरमहा रुपये १००० प्रमाणे पैकी

१८५।।।= कापड शिलके पैकीं देणगीस दिले त्याबाबत

३५ खंडू शिंपी—सेला तिवट

१० बापू बिसू तिवट

१५ जीवनराम मारवाडी सेला तिवट

१७५ दुपटा दोरवी देणे त्रिंबकजी डेंगले

२३५

पैकी रोख पावती निाा रुपये ४९८= बाकी.

१०० त्रिंबकजी डेंगल्यास सनगे दिली त्याबाबत नगदी.

५।। मारकस व गोणपाट हत्तीकडे बोहरी याजकडून देविला त्याचे रुपये आम्ही दिले सबब.

७९१।=

२२। बापूराव माहोलकर याजकडील खासगत रुपये २४०० द्यावयाचे त्या ऐवजी मोरेश्वरभाई याजकडून सिका आट रुपये शेकडा बऱ्याने पावला त्यास बाजारात भाव दर ७ प्रमाणे आला त्याचे तुटीबाबत.

३७॥ बाबा फडणीस नेमणूक पौ चैत्र वा। १ ता। वा। ३० पावेतो पंधरवडा

८५१६८=

लेखांक ६६ तारीख १८-६-१८१५

हू

अ. नं. ३५८

असमत पन्हा माहाराजगी राणी

साहेब दाम षजाकत हू

अजीसवबा हनराबल मोंट इस्टवरीट इलफीसतन साहेब बहादूर बाद सलाम नियाज मारुज आंके येथील खैरीयत जाणून हमेशा नामा फर्मावीत आसिले पाहिजे द्रिविला आ माहाराजाकडून दोन अलताफनामे येक मरहुमे छ १ माहे जमादिलावलची व दुसरा छ २१ माहे मिनहूस हमरा मोरोपंत चिटणवीस वसूल होऊन मजमून दर्याप्त जाहाला राज्याची कामेकाजे मालुमे जलदीने उलगडण्यात येऊन व सरकार दौलतमदार कुंपणी इंग्रेज बाहादुरचे दोस्तीचा भरवसा आहे म्हणोन बयावार कल्मऊन सियेत रकम हरदो अलताफनाम्यात मरकूम फर्माविला त्यासी इतके दिवस येथे रावपंडत प्रधान बाहादूर व सदासिवपंत भाऊ नव्हते हाली पुण्यास दाखल जाहाले आहेत इनशाअलाहूत-अला माहाराजाचे सरकारची अनकरीब ज्यारी होतील बाकी मजकुरात श्री भाऊमाहाराज व दिनकरराव गाइकवाड व वकील याचे लिहिल्यावरून खातर मुबारकेस रोशन होईल र॥ छ १८ माहे जून जियादाच निगास्त आयंद आयाम मुदाम बाद.

(सही इंग्रजी, एल्फिन्स्टनची)

लेखांक ६७ तारीख ७-७-१८१५

श्री

राजमान्य राजश्री कृष्णराव घोरपडे अमिरुलउमराव यासी आज्ञा केली यैसीजे तुम्हास हुजूर येणेची आज्ञा होऊन आज्ञापत्र सादर जाहाले असे तरी आज्ञेप्रो निघोन हुजूर करवीरचे मुकामी येणे जाणिजे सु॥ सीत आशर मयातैन व अलफ र॥ छ २८ रजब बहुत काय लिहिणे मोर्तब आसे.

लेखांक ६८ तारीख ११-८-१८१५

हु

रु. नं. ५

अ. नं. ४७२

हजरत श्रीमन्महाराज राजश्री राजे छत्रपति कोल्हापूर सलमुल्लाहुताला अमारत व आयालत यकबाल पनाह

अजतर्फ एखलास ज्याज अद्रब दडकन रिसिडेंट सुभा जंजिरे सिंधुदुर्ग बाआदज शोकत मुलाकात सलमहुल हुताला छ ५ माहे रमजान येथील नेकी हजरत पन्हा माहाराजानी खुषी कैफीयत कलमी नविस्ता दरविला माहाराजानी अजम गोविंदपंत फडणीस या हमराह खत फिरस्ताद केले ते रसीद होऊन लिहिला मजकूर बयाजवार मालूम जाहाला राजेश्री हैबतराव गाईकवाड विश्वासराव यासी सेत घुमडे व बागाईत इनाम पूर्वापार हुजूरतून चालत आले × × × फिकरा व मशारनिल्हे याजकडे इनाम चालवावे व गलबत राजश्री सिदरामराव भोसले सुभेदार यानी राजश्री देवीनाईक दुभाषी यासी प्रोक्त दिले त्याचा ऐवज पावला नाही ते गलबत व सामान मावारे यावे व राजश्री दिनकर अपाजी याणी बोलणेची यादी दास्त करून दिली ती आं नी मुंबईस ईबलाक केली आहे त्याचा जवाब ऐकोन रसीद जाहला असेल त्या मजमुनाचे खतूत हुजूर फुरगुरात फिरिस्ताद करावे व किले भरतगड येथील सेखहुसन जेमातदार याचे औरतीचे जाबसालाविषी आज्ञा फडणीस यासी फर्माविली आहे येविसी माहाराजानी कलमे केले प्रमाणे इजहार जाहाले येसेयासी तहचे पांचवे कलमाविसी मुंबईस लिहून पाटविले होते त्याचा जबाब तारीख ३१ माहे मेचा आला त्याचा तरजमा करून मराठी नक्कल पाटविली आहे त्यावरून जाहीर होईल बरकड मजकुराचा जबाब आला नाही वरून हल्ली अजम विश्वासराव याने इनामती बिषयी व गलबताविषी व नरसीगड येथील जाबसालाविसी मुंबईस लिहोन पाठविले आहे तेथून हुकूम येईल त्याप्रमाणे माहाराजास कलमी करून जाईल सेखहुसेन जमातदार जंजिरा आला नाही आलेस त्याजविसीची चौकसी करून जबाब होईल माहाराजसाहेबी मेहरबान होऊन हमेशा खत किताबत निगारस करीत गेले पाहिजे हे किताबत. सही इंग्रजी

पौ छ २२ माहे रमजान सु॥ सीत आशर मयातेन व आलफ.

लेखांक ६९ तारीख ३१-८-१८१५

श्री

रु. नं. २

अ. नं. ३६१

नकल

यादी हुजूरची कामे होऊन यावयाची
कलमे बी तपशील

१ कागलचे सात गावच्या सोडचिठ्या जाहाल्या असता गावे स्वाधीन जाहाली नाहीत त्यास सोडचिठ्या प्रमाणे गावे स्वाधीन व्हावीत. कलम

१ मौजे लिंगनूर का। सांवगाव या गावची सोडचिठी जाहाली आसता गाव स्वाधीन जाहाला नाही त्यास सोडचिठी प्रो गाव स्वाधीन व्हावा. कलम

१ राजश्री सुलतानराव कदम यासी कैदेत निपाणकर याणे ठेविला आहे त्याची सोडचिठी दिल्ही आसता त्याची सुटका होत नाही त्यास मशारनिलेची सुटका व्हावी. कलम

१ रायबाग प्रांताचे जमीदाराच्या गावच्या सोडचिठ्या जाहाल्या आसता राजश्री कल्याणराव कृष्ण याणी जमीदार रुजू करुन दिल्हे नाहीत त्यास जमीदार हुजूर रुजू व्हावे. कलम

१ चिंचणीकर जाधव देसाई
१ घोसरवाडकर शिंदे देसाई
१ जलालपूरकर देशपांडे
१ संवदुतीकर गोसावी
—
४

१ वसूलाच्या रुजवाती जाहाल्या आहेत त्यास येकंदर बेरजेचा ठराव व्हावा. कलम

१ मौजे सुलकूड या गावावरी मानसिंगराव घोरपडे याणि स्वारी करून गाव दरोबस्त मारून नेहला आणि गावात ठाणे घातले आहे त्यास आतून पुस्तपन्हा निपाणकर याचा आहे येविसीचा बंदोबस्त व्हावा. कलम

१ कंकणवाडी तालुक्यात आडगल तालुका यात हुजूरचे तालुकेतील तलीकर दावेकरी जाऊन राहिले आहेत तेथून हुजूरचे तालुकेत उपद्रव करितात याजकरिता राजश्री त्रिंबकजी डेंगले याजकडील मामलेदार पाच्छापुरचे सुभेत आहेत त्यास ताकीद होऊन दावेकरी तयाचा बंदोबस्त व्हावा. कलम

१ सप्तसागर येथे हुजूरचे प्रांतात तीन दावेकरी जाऊन राहिले आहेत तेथून कसबे रायबाग येथे स्वारी करुन गुरे वळून नेली व हरवक्त उपद्रव करितात येविसी सप्तसागरचे मामलेदार यास पेशजी त्रिंबकजी डेंगळे याची ताकीद दिली होती ती सप्तसागरास पाटविली मामलेदार याणी ताकीद घेऊन लोक व कारकुन गेले होते त्यास गावात न घेता व जाबसालही न सांगता माघारी लाऊन दिल्हे येविसी पुन्हा ताकीद होऊन बंदोबस्त व्हावा. कलम

१ निपाणकर याणी काटक पटीचे रोखे हलकर्णी व सामानगड तालुकेत केले

आहेत त्याची वैवट पहिल्यापासून नसता हाली नवीन उपद्रव होतो येविसीचा बंदोबस्त व्हावा. कलम

१ का। कोडोली येथील बापूजी पाटील गावातुन परागंदा होऊन शिरोल तालुकेत व मौजे काकेरी येथे राहून गावावरी दावे करीत आहेत येविसीचा बंदोबस्त व्हावा. कलम

१ ठाणे हासूर येथीस पाटील कुलकर्णी निपाणकर याजकडे राहून दावे गावावरी करितात त्याचा बंदोबस्त व्हावा. कलम

१ मौजे वालकी तालुका कापशी येथे हुजूरच्या तालुक्यातील वतनदार ठेऊन भुदरगड तालुकेतील मौजे धामणे या गावची गुरे स्वारी करून नेली याचा बंदोबस्त व्हावा कलम

मौजे दुडगे व मौजे गीजवणे ब मौजे खनदाल या तीन गावच्या सोडचिठ्या होऊन स्वाधीन गाव व्हावे. कलम

१ मौजे मांगूर येथील निपाणकर याने ओली धरून नेहल्या आहेत याजविसी पेशजी याद दिल्ही आहे त्याप्रमाणे ताकीद येवून वोली सुटून याव्या. कलम

१ निपाणकर याणी येलीकडे नवीन वतने जबरीने करून घेतली आहेत त्याजविसी गावगना रोखे करून उपद्रव करितात त्यास प्राचीन असेल त्याप्रमाणे चालेल जाजती नवीन वतने जबरीने करून घेतली आहेत ती कांही चालावयाची नाहीत येविसीचा बंदोबस्त व्हावा. कलम

येणे प्रमाणे यादी इंग्रजी बहादर याजकडे दिल्ही असे तारीख छ २५ रमजान सुा सीत आशर मयातैन व आलफ.

लेखांक ७० तारीख ९-९-१८१५

श्री

रु. नं. ५

अ. नं. ४६६

पौा छ ९ शवल सीत

विज्ञापना ताा भाद्रपद शुद्ध ६ वर्तमान कुशलरुप असे विज्ञापना ऐसीजे राजेश्री मोरोपंत चिटणीस येथे आलीया नंतर तीनचार वेळा बेटात गेलो होतो त्यात दोन वेळा गाट पडली नाही तिसरे खेपेस अजम रसील साहेब याची गाट पडली चिटणीस यानी हुजूरची थैली आणिली होती ती बाहादर याजपासीच द्यावी रसील साहेब पासी देऊ नये ऐसा अंदेशा घेऊन ते दिवसी खैरखुषी बोलणे होऊन घरास आलो चौथे खेपेस गेलो तेव्हाही बाहादर याची गाट पडली नाही रसील साहेब याची गाट पडली तेवेळेस थैली

त्याजपासी देऊन कामकाजाचा मजकूर बोलले त्याजवर त्यानी उत्तर केले कीं तुमचीं कामेकाजे काय जी आहेत त्याची यादी लिहून आणावी म्हणजे थैली व यादी बाहादर यासी दाखवून त्याचा हुकूम होईल त्याप्रमाणे तुम्हास जाब सांगू नंतर श्रावण व।। १२ गुरुवारी कामकाजाची यादी कागलचे सात गाव व मौजे लिंगणूर व राजश्री सुलतानराव कदम व रायबागचे जमेदार रुजू जाले नाहीत व मौजे मांगुरच्या ओली निपाणीकर यांनी नेल्या आहेत व दावेकरी निपाणीकर याच्या तालुक्यांत राहून हुजूरच्या प्रांतात दावे करितात येविसी व मालवणाकडील सागवानी लाकडाचा डंग मालवणाहून तोडवितात व राजेश्री हैबतराव दादा याचे शेत याजकडे चालवावे असी कलमबंदीवार यादी लिहून घेऊन त्रिवर्गही बेटात गेलो तो ते दिवसी बाहादर अलीकडील बैटकीच्याच बंगल्यात बसले होते त्याचीच गाट पडली भेट होऊन परस्परे खैरखुषी बोलणे होऊन चिटणीस बोलले जे परवाचे दिवसी हुजूरची थैली ऐवजाचे कामाविसी आणिली आहे ती रसील साहेब याजपासी दिली आहे व त्यानी कामकाजाची यादी आणविणेविसी सांगितले होते त्याप्रमाणे यादी आणिली आहे आपण पाहावी असे बोलून यादी वाचून दाखविली ते त्यानी ऐकून उतर केले जे या यादीत कागलचे सात गाव मौजे लिंगनूर व सुल्तानराव कदम वगैरे कामे लिहीली आहेत त्यासही कामे पयलीच ठरली आहेत ती आमचे ध्यानात आहेत पेशजी आम्हीं ××× गेलो ते समयी या कामाची यादी श्रीमंताकडे करून दिली आहे तिकडून जाबसाल होऊन येईल त्याप्रमाणे उलगडतील शिवाये दावेकरी वगैर कामे लिहिली आहेत त्याची दर्याप्ती करून उत्तर सांगू व थैली-तील ऐवजाचा मजकूर बोलले तो ऐकून घेतला येक दोन दिवसी जाब देऊ ऐसी उत्तरे जाहाली ती ऐकूण घेऊन घरास आलो नंतर श्रावण वद्य १४ शेनवारी कुसोजी नाईक बोलावणेस आला त्याजवरून त्रिवर्गही नित्य क्रमाप्रमाणे बेटात गेलो बाहादर याची गाट पडली नाही रसील साहेब याचीच गाट पडली त्यानी बाहादर याज-पासी यादी दिली होती ती काढून वाचून दाखवा म्हणोन बोलले त्याजवरून सदहू यादी वाचून दाखविली नंतर त्यानी उत्तर केले कीं मालवणाकडील लाकडाचा डंग मसुरे तालु-केतील व सेत मालवणचे तुमच्या तालुक्यातील नाहीत ते पक्षी त्याचे बोलणे नवीन पडू नये कागलचे सात गाव व लिंगनूर सुल्तानराव कदम हा जाबसील तरी श्रीमंताकडून होऊन येईल त्याप्रमाणे उलगडेल तिकडून काम उलगडून येई तोपावेतो गावचा वसूल जाईल तो मोकाशाचे ऐवजी ध्यावयासी येईल म्हणोन पेशजी उतर जाहाले होते त्या-प्रमाणेच आताही सांगितले वरकड रायबागचे दावेकरी व पाच्छापुरासकडे गेले आहेत त्याजपासी व मौजे मांगुरचे ओलीविसी व किरकोळ गांव खेड्यास निपाणीकर वगैरे उपद्रव होतो येविसी व जमेदार याजविसीची कलमे होते ती मजकूर विचारून मात्र घेतली उत्तर जाहले नाही वसुलाचे रुजवातीची बेरीज ठरावी हा मजकूर बोललो त्याचे उत्तर जाहले जे या गोष्टीची दरकार श्रीमंतास आसावी ते नाही तेव्हा तूर्त हा जाबसाल देत नाही ऐवजाचा मजकूर बोललो जे हुजूरची थैली आहे त्याप्रमाणे पेस्तर ऐवजी तीस

हजार रुपयेचे काम सावकारास सांगून करून देवावे आणि हुजूरचे दागिने सावकाराकडे गाहाण आहेत ते सुटून येईसे करावे त्याजवर त्यांनी उत्तर केले कीं मामलत राजश्री सदासिवपंत भाऊ याजकडे त्यानी सालगुदस्ता कित्येक तंटे सांगितले हली कमीजास्त काय म्हणतात न कले त्यात दंगा बखेडा जाहाल्यास कलत्नच आहे यास्तव हांगामसीर जसा मामलतीचा ऐवज ठरल त्याप्रमाणे त्यावेळेचा जाबसाल त्यावेळेस जसा होणे तैसा होईल त्यास ऐवजाचे काम होणे मुषकल आहे नंतर चिटणीस यानी थैलीचा जाब मागितला तेव्हा त्यानी जाब देतो म्हणोन बोलले थैलीचा जाब कसा देतात त्याप्रमाणे शेवेसी लिहून पाठवितो मौजे सुलकूडचा मजकूर बोललो त्याचे उत्तर जाहाले जे तुमचा गाव असता त्यानी ठाणी घातले असे असल्यास तुम्ही आपले ठाणे घालावे हल्ली मागाहून लुटीच्या वगैर यादी आल्या त्या बाहादर याजकडे नेल्या नाहीत येक दोन दिवसी घेऊन जावयाचा बेत आहे यादी दाखविल्यावर काय उत्तर करतील त्याप्रमाणे शेवेसी लिहितो येथील मजकूर जाहाला तो वडिलास कळावे करिता विनंती लिहिली आहे. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक ७१ तारीख १५-९-१८१५

रु. नं. १

नं. ३७१

श्रीमंत माहाराज राजश्री छ
त्रपति शाहामत अवाली पनाहा सलमुल
हुताला

खुल्त व मवाकत दस्तगाहा आज दिल्येखलास कोर्टलांड इस्केवेर इस्तुनवैर ब्रिटिस इन्वाई बंदर गोवा सलाम बाआदज सलाम आंकी दरिविला येथील खैरीयत जाणोन
आजमाकडील शादमानी निगारीष होऊन दिलआराम करीत असिले
पाहिजे दरिवला इज्यानीबाचा इरादा आं शाहामत पनाहानी
हे खत रसीद असावे माअलूम व्हावे आं पनाहास हा खतुत कामाचा आहे इज्यानेबास इसवख्त रोशन जाहाले की किल्ले रांगणा व किले नरसिंव्हगड येथील हरदो किलेदार आपआपणामधे कज्यात आहेत या बारता नरसिंव्हगडचे किलेदार याणे येक कारकून वाडीस आजम दुर्गाबाईसो याजकडेस रवाना करून दिला की आपली खुषी किल्ला बाईसो याचे स्वाधीन देणे म्हणोन कारकून मार वाडीस पोहचून च्यार रोज जाहाले लेकीन कलतल्मा बाईकडून जवाब जाहाला नाही हे आकबार जाहिरातीत आल्यावरून इतीला केला आहू आ हाल शौकत पनाहानी तहकीकात आणोन किला वाडी भोसलेचे हात ना होई तो अच्छीवजे मुस्तकीम बंदोबष्त करावा हरवख्ते मेहर इजीलायेके

उमेदवार आहे ता। १५ माहे सपटंब्र सन १८१५ छ ११ माहे सवाल जियादा काये निविस्तन करावे.

पौ।। छ २० माहे शोवाल (इंग्रजी सही)
सु।। सीत आशर मयातैन (एन्हॉय टू गोवा)
व अलफ.

लेखांक ७२ तारीख ५-१०-१८१५

श्री

रु. नं. २
अ. नं. ३६३

पौ छ २३ माहे जिल्काद सन सीत आशर मयातेन व आलफ
श्रीमन्माहाराज राजेश्री छेत्रप-
ति स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक आज्ञाधारक रायाजी जाधव जप्तनमुल्क कृतानेक सेवेसी विज्ञापना ताा छ १ माहे जिलकाद पर्यंत स्वामीचे कृपावलोकनेकरून शेवकाचे वर्तमान यथास्थित असे शेवेसी प्रार्थना ऐसीजे राजश्री चिंतामणराव आपा याजकडे आज्ञापत्र प्रविष्ट करून तिकडील उत्तरे आलेली व माझे नांवे पत्र आलेल शेवेसी हुजूर पाठविले आहे लोक व पागा पाठविणेविसी त्यानी सांगो पाठविले आहे त्यास हुजूरून आज्ञा येईल त्याजप्रमाणे वर्तणूक करीन सेवेसी श्रुत होय ही विज्ञापना.

लेखांक ७३ तारीख ९-१०-१८१५

श्री

तालीक
रु. नं. १
अ. नं. २२६

वडिलाचे शेवेशी विज्ञापना यैसीजे

श्वरूपजीचे वर्तमान आसे केलेवरून सरकारातून दुसरा कोण्ही हुजऱ्या आगर हरकोणी येणेचा बेत होईल त्यास कारस्थान करून येथून कोणी न येई आसे करावे येथील कारस्थान आमचे आम्ही जे करावयाचे ते करितो कांहीयेक चिंता करू नये आजपावेतो श्वरूपजी काम करीत होता आता पुढे काम होईल किंवा न होईल हे पाहावे हरतऱ्हा करून तेथून कोणी न यावयाचा बेत राखावा येध्यपि यावे येसे जाहालेस आपले ल्गतेचा तरी आसावे परंतु तोही पाठवावयाचा तो राजश्री येसवंतराव आपा व सौ आऊबाई आका व मातुश्री बालाबाई आका जेजोरीस येऊन त्याची आमची भेट होऊन

ठरेल त्याप्रमाणे वडिलास लेऊन कलवितो उपरांत बेत काये करणे तो करावा हे पत्र वेगळे वाटेने पाहून विसर्जन करावे सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना

सुा सीत अशर मयातैन व आलफ छ ५ माहे जिलकाद उर्फ आश्विन मास आसल पत्र राजश्री रामचंद्र नाईक गाईकवाड याजवळ दिल्हे असे अस्सल पत्राचे आक्षर राजश्री बावा फडणीस याचे आहे व विज्ञापना राजश्री दिनकरराव गाईकवाड याचे स्वदस्तूरची आहे.

लेखांक ७४

माहे नोव्हेंबर इ. स. १८१५

श्री

अ. नं. ३५५

वेदशास्त्रसंपन्न श्री बाबा माहाराज व श्री नाना माहाराज व श्री भाऊ माहाराज यास माहराज सरकारचे राज्याचे कल्याण इच्छिण्याकरिता धर्मादाय इनाम गाव व जमीन गावगना माहराजसरकारातून दिल्ही आसता श्री बाबा माहाराज व श्री भाऊ माहाराज याणी सत्कर्माची शरम सोडून दौलतीचा लोभ करून व बदनीतीने माहराज सरकारात वर्तणूक केली आहे त्याचा सालवार तपसील

१ सनइहिदे आशर मयातैन व आलफचे साली (इ. स. १८१०) नारायणराव बाजी घाटगे नागपूरकर हे दोन हजार जमावानिसी निपाणकर यासी लढाई देणेस आले ते समई मा।रनिले घाटगे बाजी नागपूरकर व हैबतराव गाईकवाड विस्वासराव येकत्र होऊन श्री बावा माहाराज यासी सामील करून घेऊन कैलासवासी श्रीमन्माहराज शिवछत्रपति साहेब यासी श्री बाबा माहाराज याणी आपले वाडयात बोलाऊन नेहऊन आटक करण्याची मसलत केली होती. कलम

१ सनसलास आशर मयातैन व आलफचे साली (इ. स. १८१२–१३)

१ आस्विनमासी सन १८१२ इसवी माहाराजसरकारचा व कुंपनी सरकारचा तहनामा जाहला ते समई माहाराजसरकारातून श्री बाबा माहाराज याणी मौजे आंबरी निम किंले भरतगडा निसबत गाव चिरंजीव बापू माहाराज याचे नांवे करून घेऊन सनद घेतली आहे त्या सनदेत तहनामा होण्याचे पूर्वीचे सन घातले आहे हीच निमकहारामी कुंपनी सरकारात कलम

१ श्रीमन्माहाराज शिवछत्रपति ताहेब याहेब याणी कैलासवास छ २१ माहे रबिलाखर ऊर्फ चैत्र वद्य आष्टमी साली केला आहे ते समई बाबा माहाराज व हैबतराव गाइकवाड विस्वासराव याणी श्रीमन्माहाराज मातोश्री आईसाहेब व माहाराजसरकारचे हुकुमासिवाये माहाराजसरकारची थैली अजम आलफिष्टीनसाहेब बाहदूर याचे नांवे पारसनीस याजकडून लेहून घेऊन पुणेस पाठविली आहे हाच गुन्हा उभयताकडे कलम

१ माहाराज सरकारानी छ २१ माहे रबिलाखर ऊर्फ चैत्र वद्य ८ आष्टमी रोजी कैलास-वास केल्यावर श्री भाऊ माहाराज व दिनकरराव गाइकवाड याचे चितातील माहा-राज सरकारची जरब दूर होऊन पुणे मुकामी श्री भाऊ माहाराज याणी बदकर्म कसबिणी बराबर करून माहाराज सरकारचा ऐवज दरमहाचे नेमणुकी सिवाय मनमानील तसा खर्च करून कसबिणीचे घरी जाऊन दुधानी संध्या करून फराल केल्या-मुळे भ्रष्ट जाहाले आहेत कलम

३

[इ. स. १८१३-१४]

१ सन आर्बा आशर मयातैन व आलफचे साली पुणे मुकामी मोसुफसाहेब बाहादूर याजजवल माहाराज सरकारातून वकीलीचे कामावर सरूपजी खीरसागर वकील असता श्री भाऊ माहाराज व दिनकरराव गाइकवाड याणी कत्रीम करून जेवणात जहर घालून मा।रनिले खीरसागर यास मारला आणि मोसूफसाहेब बाहादूर यास खबर जाहीर होऊन डाकतर याजकडून चौकशी होईल म्हणोन पाहाटेची तोफ होताच खीरसागर वकील याचा मुडदा शेहराबाहेर नेहऊन जालला आहे हा गुन्हा उभैताचा कलम

१ सन खमस आशर मयातैन व आलफ (इ. स. १८१४-१५)

१ साहेब मेहेरबा आलफिष्टनसाहेब बाहादूर याचा निरोप घेऊन पुणे मुकामाहून दिनकरराव गाइकवाड जेष्टमासी माहाराज सरकारात आले ते समई निपाणकर याणी माहाराज सरकारचे प्रांतातील गावगनेचा ऐवज घेतलेला परत देणेचा ठराव ठरविला त्या पैा मोसुफसाहेब बाहादूर याणी पांडुरंग नाईक पिंडडी यास खातरीखत देऊन रुपये ५०००० पनास हाजार देविले त्या रुपयाचे दागिने व जवाहीर व घोडी रास माहाराज सरकारात गुजरली मशारनिले गाइकवाड याणी येतेसमई श्री भाऊ माहाराज यास आपल्या बराबर माहाराज सरकारात चलावे म्हणोन सांगितले असता श्री भाऊ माहाराज माहाराज सरकारात आले नाहीत. कलम

१ श्री भाऊ माहाराज यास माहाराज सरकारात रुकसत करून पाठवावे म्हणोन माहाराज सरकारची थैली मोसूपसाहेब बाहादूर याचे नावे छ ५ माहे शाबान सन मा।री गेल्यावर श्री भाऊ माहाराज याणी मोसुफसाहेब बाहादूर याचा निरोप घेऊन माहाराज सरकारात छ १५ माहे जमादिलाखरी आले ते समई माहाराज सरकारात थैली मोसुफसाहेब बाहादूर याची आणली जे श्री भाऊ माहाराज इज्यानीबासी आडीच वर्ष होते यास हुजूरची काजकामे बहुत दुरुस्तीने आमलात आली ही तमाम कैफीयत श्री भाऊ माहाराज इजहार करतील त्याजवरून खातर मुबारकेस दर्याफ्ती होईल थैलीची तारीख १८ माहे येप्रेल सन १८१५ इ॥

१ मौसूफसाहेब बाहादूर याणी कृष्णराव गोपाल वकील यास सन सलास आशर मया-तैन व आलफचे साली माहाराज सरकारात पाठविले होते मा।रनिले वकील दस्तुर

मवाफीक चालणार श्री बाबा माहाराज म॥रनिले गाइकवाड विस्वासराव हे उभयता कारभारात बेदस्तूर वागू लागलेमुले म॥रनिले वकील याचे व कारभारी लोकाचे वैमनस्व पडले म॥रनिले वकील याणी रत्नाकरपंत राजाज्ञा याचे स्नेहानी वागू लागले राजाज्ञा याचा निश्चय कुंपनी सरकारची व माहाराज सरकारची दोस्ती कायम राहून दौलतीचा कारभार चालावा ही गोष्ट श्री बाबा माहाराज व गायकवाड विश्वासराव यास नाकबूल सबब कृष्णराव गोपाल वकील याची बदली होऊन दुसरा आखबारनिवीस आणणेची तजवीज करून मोसूफसाहेब बाहादूर यास बातील म॥र पुणे मुकामी श्री भाऊ माहाराज व दिनकरराव गाइकवाड याणी जाहीर केला ते समई सदरहू म॥राची रुजुवात न होता दुसरा आखबरनवीस माहाराज सरकारात मोसूफसाहेब बाहादूर याणी पाठविले कलम

१ मोसुफसाहेब बाहादूर याची रुकसत घेऊन दिनकरराव गाइकवाड पुणेहून माहाराज सरकारात आलेवर माहाराज सरकारची थैली मोसूफसाहेब बाहादूर यास पाठऊन श्री भाऊ माहाराज यास पुणेहून माहाराज सरकारात आणविले. कलम

---

१ सन सीत आशर मयातैन व आलफ (इ. स. १८१५–१६)

१ श्री भाऊ माहाराज पुणे मुकामाहुन करवीरी आल्यावर श्रीबाबा माहाराज व गायकवाड विस्वासराव व दिनकरराव गायकवाड याचे कारभारात कामामुले बिघाड आलेवरी श्री भाऊ माहाराज याणी दिनकरराव गाइकवाड याचे पत्र सरूपजी खीरसागर हुजूर वकील यास पुणे मुकामी जहर घाल्न म॥रनिले सन म॥र छ १२ माहे जिल्काद ऊर्फ आस्विन मासी माहाराज सरकारात आणून दिल्हे त्या दिवसी माहाराज सरकारची गैरमर्जी गायकवाड विस्वाराव व दिनकरराव गाथकवाड याजवर होऊन कारभाराचे काम दूर करून घरी राहाणेविसी हुकूम जाहाला आणि श्री भाऊ माहाराज याजकडील वकीलीचे काम दूर करून वकीलीचे कामावर मोरो बाजीराव चिटणीस यास मोसूफसाहेब बाहादूर याजकडे पुणे मुकामी जाणेविसी आज्ञा होऊन रवाना जाहाले आणि खीरसागर वकील यास जहर घाल्न मारलेले पत्र श्री भाऊ माहाराज याणी माहाराज सरकारात आणून दिल्हे हा म॥र आखबारीवरून मोसूफसाहेब बाहादूर यासी जाहीर जाहालेवरी साहेब बाहादूर याची मर्जी श्री भाऊ माहाराज याजवर व दिनकरराव गायकवाड याजवर रुष्ट होऊन बरोरा वर्तणूक केल्याची खातरदास्त पुरे जाहाली कलम

० लंग

१

१ सन आर्बा आशर मयातैन व आलफ

माहाराज सरकारात थैली छ ११ मोहरमी आजम आलफिष्टीन साहेब बाहादूर याची येऊन रसीद जाहाली जे पुणे मुकामी इकडील कारकून राहात होता त्याचे घरी

एक कारकुनानी जाऊन सांगितल जे मी करवीराहून कांही कामाकरिता साहेब बाहादूर याजकडे आलो आहे त्या कारकुनाची बातमी मोरोपंत चिटणीस याणी राखून या ब्राम्हणास जबरदस्तीने नेहून कैद केले म्हणोन जाहीर जाहालेवर हुकूम कारकुनास सोडून देणे येविसी जाहालेवर चिटणीस याणी सोडून दिल्ह आहे श्रीमंत पेशवे बाहादूर याचे शहरात जबरदस्तीने ब्राम्हणास कैद केले सबब साहेब बाहादूर याची गैरमर्जी मोरोपंत चिटणीस याजवर होऊन कचेरीस न येणे म्हणोन हु॥ जाहला त्यावक्ती माहाराज सरकारचे गरमर्जीत श्री भाऊ माहाराज होते त्याजकडे आबाजी राम मामलेदार किले पनाळा व बलवंतराव चिटणीस जाऊन श्री भाऊ माहाराज यास सामील करून घेऊन माहाराज सरकारची थैलीत श्री भाऊ माहाराज व बलवंतराव चिटणीस याची नांवे लिहून घेतली तारीख छ १९ मोहरमची सन मा॥रची (ता. १२-१-१८१४) श्री भाऊ माहाराज व मा॥रनिले चिटणीस पुणे मुकामी जाऊन साहेब बाहादूर याजवल मोरोपंत चिटणीस याचे प्रकर्णी जबाबसवाल जाहाले ते समई श्रीमंत पेशवे बाहादूर याची तबीयेत बेआराम जाहाली होती सबब साहेब बाहादूर याणी श्री भाऊ माहाराज यास सलह सांगितली जे पंडित प्रधान यास स्वस्थ नाही त्यास आपण व चिटणीस जाऊन समाचार घेऊन यावे ते साहेब बाहादूर याचा हुकूम कबूल करून माहाराज सरकारात सदरहू मा॥र लेहून नंतर भेट घ्यावी हे न करिता श्रीमंताचे वाडयास जाऊन भेट घेऊन अ॥लेनंतर श्रीमंतानी श्री भाऊ माहाराज यास व मा॥रनिले चिटणीस यास मेजवानी करून खैरखुषीची भाषण होऊन उभयपक्षीचा खुलासा होऊन दोस्तीची सफाई जाहाली श्री भाऊ माहाराज याणी पुणेहून येते समई माहाराज सरकारात साहेब बाहादूर याची थैली आणली आहे जे इज्यानीबाचे सांगण्यावरून श्रीमंत पेशवे बाहादर याची मुलाकात श्री भाऊ माहाराज याणी घेतली.

लेखांक ७५ — तारीख ७-१२-१८१५

श्री

रु. नं. २
अ. नं. ३७३

पौ॥ छ १० माहे मोहरम

यादी इंग्रज बहादर यासी बोलणे जाहालेला
मजकूर व इकडील वर्तमानाचा मजकूर कलम
बंदी बी तो॥ सु॥ सीत आशर मयातैन आलफ

१ कसबा सावगाव व खुर्द सावगाव व तलणगे व टाकवडे येथे जाजती कमताचे विसीचा मजकूर व ठाणे हुपरी येथील कुले धरून नेहली या विशीचा मजकूर व कायमपटीचा मजकूर येसे तीन मजकूराचे आज्ञापत्र आले निपाणकर याणी उपद्रव

केला म्हणोन तेच आज्ञापत्र इंग्रज बहादर यासी दाखऊन आज्ञापत्राप्रमाणे सर्व मजकूर बहादर यासी समजोन दिल्हे त्यानी यैकून घेऊन उत्तर केले की या तीन कलमाची यादी लिहून आम्हापासी देणे त्याजवरून दूर होईल सदरहू तीन कलमाची यादी लिहून बाहादर याजपासी नेऊन दिल्ही श्रीमंताकडे यादी पा बंदोबस्त करून देतो म्हणून बोलिले आहेत काय बंदोबस्त करून देतील तसा शेवेशी विनंती पत्रानी लिहून पाटवितो निवेदनार्थ विनंती....... कलम

१ राजश्री मानसिंगराव पाटणकर याजबिषीचे मजकुराचे आज्ञापत्र आले तेच आज्ञापत्र बाहादर यासी नेऊन वाचून दाखऊन सर्व (फाटले आहे) कूर आज्ञे प्रमाणे बहादर यासी समजोन (फाटलें) याणी सविस्तर यैकून घेऊन उत्तर केले कीं आम्ही कांहीं तुम्हास निपाणकर यासी मिलते घेणेविसी सांगत नाही त्याचा दाखला मात्र दिल्हा की आम्हासारिखे दोस्त महाराजास असता त्याने किलेत येऊन काय करावयाचे आहे त्यास तुम्ही किलेत घ्याल कीं नाही म्हणोन तुम्हास दाखला दिल्हा त्यास किलेत घेणेविसी आम्ही कांहीं सांगितले नाही आता मानसिंगराव पाटणकर याजविसी मात्र तुम्हास सांगितले कीं त्यास आत घ्यावे त्यास हल्ली आज्ञापत्र त्याजविसीचे मजकुराचे आले आज्ञास लढाईचे वखती (फाटलें) पाटणकर यानी तुमचे वाईट केले व तुम्ही त्याचे वाईट केले त्या वेलेची गोष्ट धरून आता त्यासी आकस धरणे हे आम्हास चांगले दिसत नाही का म्हणाल तरी तुमचा तह होऊन सर्वांसी चांगले आसावे असे जाहाले आहे त्यापेक्षा मागली गोष्ट तहाचे पूर्वील कांहीं काढू नये लढाईचे वेलेस जाहाले ते जाहाले त्याविसी महासजानी आकस धरू नये त्याजकडून फंदफितूर कांहीं जाहला नाही यापेक्षा त्यास येण्यास दिकत ती काय पैले त्यानी निपाणकर याजकडे मिलोन हुजूरचा बदनक्ष केला तो महाराजानी मंजूर न धरिता मानसिंगराव पाटणकर यासी करवीरास आणावे याप्रमाणे बाहादरानी सांगितले त्याजवरून शेवेशी विनंती लिहिली आहे यास बहादरानी सांगितले प्रमाणे त्यास आणवावे नाहीपेक्षा बहादर याची मर्जी राहाणार नाही सेवकास बहादर याचा लक्ष दिसला तसा सेवेशी लिहिला आहे यात साहेबाचे मर्जीस येईल तैसे व्हावे. कलम

१ राजश्री सदाशिवपंत भाऊ आलंदीहून येथे आले आहेत मेन्यातून पडले सबब त्यास दुखणे आले आहे दाने वगैरे काली ब्राम्हणास दिल्ही आनुष्टानास सहश्रचंडीचे ब्राम्हण घालावे याप्रमाणे श्रीमंतानी सांगून भाऊकडे पा याजवरून भाऊनी पन्नास ब्राम्हण आणुष्टाणास घातले आहेत गोप्रदानेही शंभर शंभर पुतलेची दिल्ही आहेत वगैरे दान धर्मही केला आहे हाली कांहीसे आराम आहेत वसूलाचे यैवजासी काल बहादर यासी भाऊने विचारिले त्यास बहादर याणी सांगितले कीं भाऊ आलंदीहून आले आहेत त्याजकड कोणी पा देऊन तुमचा यैवजाचा जाबसाल करून घेतो त्याणी निशा दिल्हेस उत्तम नाहीपेक्षा सोडचिठ्या तरी माहालच्या घेतो या दोनी तून कोणता तरी जाबसाल चौ रोजात ऊलगडून देवितो याप्रमाणे बहादर बोलिले आहेत

याजकरिता संक्र कदम याजला ठेऊन घेतला आहे काय जाबसाल ठरल तसा लेहून त्याज-बरोबर पा देवितो भाऊकडील आतील बातमी आम्हास समजली आहे कीं भाऊ कांहीं मामलत सोडीत नाहीत माहाल झाडून सारे भाऊनी विलेस लाविले आहेत आणि मामलेदार यासी सांगितले कीं तुमची निशा असो द्यावी तिकडे द्यावयास पाहिजे त्याजवरून त्यातील एकदोघे मामलेदार आम्हासी येऊन बोलत होता कीं आम्हाकडे आठ हजार रुपयेचे माहाल आहेत त्याची निशा तुम्हास देऊ तुम्ही पटवून घ्यालं कीं काये म्हणू बोलत होता त्यास आम्ही उत्तर केले कीं इंग्रज बहादर याजकडे येकंदर पासष्ट हजार रुपयेची निशा पटलेवर मग आम्ही तुम्हास ज्या साऊकराची निशा घ्या म्हणू त्या सावकाराची निशा तुम्ही आणून दिलेवर मग बहादरास आठ हजार रुपये पावले म्हणून पावती देऊ अगोदर आम्ही कांहीं तुम्हासी बोलत नाही पासष्ट हजाराची निशा बहादर याजकडे पटलेवरी मग काय ते सांगू याप्रो यासी बोलणे जाहलेला मजकूर लि॥ आहे त्यापेक्षा ते निशा देतात यैसें वाटते माहाल कांहीं ते सोडीत नाहीत याप्रो समजले ते लिहिले आहे. कलम

१ आजम कर्णेल कुलूस छोटा यासी गालेरहून हुकूम आला आहे जे तुम्ही सिंदेचे लस्करात वकलातीचे कामावरी जाणे याप्रो हुकूम आला आहे त्यास आठ चौ रोजी ते तिकडे जाणार जाणेचे तयारीस ते लागले आहेत याचे कामावरी येथे पाटंजर साहेब नेमिले आहेत घोडनदचाही इंग्रज बहादर काल रविवारी बेटावरी येऊन उतरला आहे राहुट्या डेरे पाहून उतरले आहेत मदरासाहून थोरला साहेब येत आहे तो आवरंगाबादेस आला आहे यैसे वर्तमान आहे तेथूनही पुढे येकदोन मजला निघाला यैसे वर्तमान उडते यैकतो समजले ते सेवेशी लि॥ आहे. कलम

१ श्री स्वामी मठ करवीर याजविसीचा मजकूर आज्ञापत्रा प्रमाणे बहादर यासी सांगितला त्यानी यैकून घेऊन उत्तर केले कीं हे वर्तमान आम्हास आकबरीहून पूर्वी आले आणि तुमचे सरकारचे लिहिणे आता आले यास काय म्हणावे यैसे शब्द लाऊन विचारले तेव्हा त्यास बोलावयाचे तसे बोलिलो नंतरी बहादरानी उत्तर केले कीं श्री स्वामीकडे सरंजाम आहे तो तुम्हाकडील कीं काय म्हणून विचारले यास उत्तर केले कीं आम्हाकडीलच सरंजाम स्वामीस दिला आहे म्हणून बोलिले नंतरी उत्तर केले कीं स्वामीचे मजकुराची यादी लिहून आम्हापासी देणे म्हणजे श्रीमंताकडे पाटवून देऊन बंदोबस्त करावयासी येईल याप्रो बोलिलेवरी आम्ही उत्तर केले कीं स्वामी-कडील कारकून येथे येऊन श्रीमंताची भेट घेऊन श्रीमंताकडून त्याचे वकीलास ताकीद करविली आहे म्हणून यैकीले व निपाणीकर याणीही कारकून स्वामीकडे समजाविसी करणेकरिता येत आहे त्यास कसे काय जाहाले समजाविसी जाहाली किंवा नाही याचा बयाज कसा काय जाहाला हे मागाहून हुजूरून सविस्तर लिहेणे येईल याप्रो आपणापासी यादी लिहून देऊ या प्रमाणे बोलणे जाहाले त्यास आज्ञेशिवाय कैसी यादी लेहून

घ्यावी आणि त्याचा बयान कसकसा मुलपासून जाहाला हे सेवकास ठाऊक काय हुजूरची आज्ञा येईल त्याप्रमाणे बहादराशी बोलून बंदोबस्त करावयासी येईल. कल्म

१ राजश्री बापू गोखले यासी इंग्रज बहादर ज्याफत आज आथवा उदेक करणार आहेत सनगाची व जवाहीर वगैरे याची तरतूद बेटावरी होंत आहे गोखले यासी येथे बेटावरी आणून ज्याफत करणार सेवसी निवेदनार्थ विनंती.. कल्म

येणे प्रमाणे कल्म यादी लिहिले आहे त्याजवरुन निवेदनात येईल..छ ५ माहे मोहरम..

लेखांक ७६ तारीख ३०–४–१८१६.

श्री

रु. नं. २

अ. नं. ३७७

याद हुजूर पुत्रोत्साह प्राप्त जाहाला संतोषाचें शर्करा प॥ पत्रे सुा सीत आशेर मयातैन व आलफ छ. १ माहे जमादिलाकर ऊर्फ वैशाख शु॥ त्रितीया भोमवासरे प्रातकाल चार घटका दिवस शुभदिनी पुत्ररत्न प्राप्त राज्याभिषेक शके १४२ धाता नामसंवत्सरे

श्री देवास पत्र

१ श्री जगदंबा तुळजापूर
१ श्री महादेव सिखर
१ श्री ,, [फाटलें आहे]
  १ श्री आंबा
  १ श्री रामवरदायनी
  २
१ श्री मार्तंड जेजूरी
१ श्रीपाद स्वामी
१ मालवण
  १ श्री रामेश्वर
  १ श्री शिवसागर
  २
१ श्री रागनाई प्रसिद्धगड
१ श्री केदारलिंग
२ संस्थान

किल्ले

१ किले पनाळा
१ किले पावनगड
१ किले प्रसिदगड
१ किले मनोहरगड
१ किले भैरवगड
१ किले भुदरगड
१ किले सोनगड
१ किले भरतगड
१ किले सामानगड
१ मालजी निकम व पांडुरंग चिद्या
१ बळवंतराव गाईकवाड व आबा

अष्टप्रधान वगैरे

१ राजश्री पंतअमात्य
१ राजश्री प्रतिनिधि
१ सा॥ सेनाखासकील
१ नारायणराव बाजी घाटगे

१ संस्थान पनाळा	१ रघोजीराव भोसले
१ संस्थान संभापूर	सेनासाहेबसुभा मयत
२	१ नागोजीराव पाटणकर
१ श्री स्वामी भट करवीर	१ वटारकर
१ श्री हणमंतबावा चाफळकर	१ सिदराव भोजराव देसाई
० किता पत्र	१ सदासिव माणकेश्वर
१ चिंतामणराव पांडुरंग	पुणेस पत्र
१ माधवराव गंगाधर मिरजकर	१ पंतप्रधान
१ नारायणराव व्यंकटेश	१ बहादर
१ माणसिंगराव पाटणकर	१ मोरो बाजीराव चिटणीस
१ त्र्यंबकराव रघुनाथ कुरुंदवाडकर	१ जयवंतराव रघुनाथ विसलापूर
१ व्यंकटराव भास्कर बागणीकर	१ गोखले बापूजी गणेश
१ लक्ष्मणराव सिंदे	१ इंग्रजाकडील मंडळी येकंदर
१ सौ पार्वतीबाई सिंदे	१ कासीराव कामेर
१ बाबूराव बल्लाळ वेंगरुळकर	१ बापूजी गणेश गोखले
कराडकर	१ नाना माणकेश्वर
१ भवानराव पंडित प्रतिनिधि	कृष्णाजी माणकेश्वर
कराडकर	सिंदे
१ सौ. लक्ष्मीबाई कराडकर	१ दवलतराव सिंदे
गायकवाड गुजराथ	१ इंदूराव घाटगे सरजाराव
१	होळकर
किता पत्र	१ मल्हारराव होळकर
१ रमाबाई पाटणकर	
१ गजेंद्रगडकर घोरपडे	

लेखांक ७७ तारीख १७-५-१८१६

रु. नं. १
अ. नं. २३३

यादी इकडील मजकुराची कलमबंदी सुा सीत आशर मयातेन व आलफ

१ बावडे प्रकर्णी मजकूर बाहादर याणी सांगितला जे आम्हास गोखले कडील तगादा बसला आहे त्यास बावडेकरी यानी अलीकडे दरवडे घातले आहेत त्याची यादी तुम्हापासी दिल्हीच आहे त्याप्रमाणे येलीकडील दरवडेचा व पेशजीचा येमा बंदोबस्त

बावडेकरी याजकडून हुजूरून करून घेऊन गोखलेकडील जाबसाल उलगडून टाकावा याप्रमाणे सांगितले त्यास उतर केले जे पेशजीचा जाबसाल त्याचा आमचा झगडा-रगडा लागलाच होता त्याविसी बहादरानी कांही बोलू नये मागे होऊन गेले ते गेले एलीकडे दरवडेची आपण यादी (फाटलें आहे) च आहे त्याची चौकसी होऊन हुजूरून बंदोबस्त होईल येसे बोलिलेवर बाहादरानी उत्तर केले जे पेशजीचा जाबसाल पुणे मुकामी बावडेकरी याजकडील कारकून आणून येथे उलगडून देऊ गोखलेकडील कारकून बावडेस तगादा करीत बसला आहे त्यास उटवून आणावे याप्रमाणे श्री नी आम्हासी करार केला त्याप्रमाणे आम्ही राजश्री सदासिवपंत भाऊ यासी बोलोन त्याचे पत्र घेऊन तुम्हास दिल्हे आणि कारकून उटवून आणिला आसे असेता बावडेकरी याजकडील कारकून येऊन मागील जाबसाल उलघडून जावा तो न जाता आणखी दरवडे घालतात त्यास याचा बंदोबस्त हुजूरून बावडेकरी (फाटलें आहे) घ्यावा अथवा बावडेकरी याजला जे कोणी मुखत्यार बोलणेस हिकडे (फाटलें आहे) म्हणजे आम्ही उभयपक्षी चौकसी पाहून मनास आणू याप्रमाणे बंदोबस्त जरूर होऊन यावा हे न जाहालेस दिवसगत लागलेस गोखले आपलेकडील कारकून व लोक पा। देऊन बावडेकरी याजकडून जाबसाल भरून घेणार इकडे तुम्हास सांगावे याचे कारण तर दुसरा कोणी तुम्हावरी आलेस त्याचा इनसाफ आम्ही करून फैसला करावा आसे आहे याजकरिता तुम्हास सांगतो त्यास याचा जाबसाल हुजूर तरी उलगडून बंदोबस्त होऊन यावा अथवा बावडेकरी याजकडील कारकून तरी मागील उजूर न धरी ऐसा आणाव हे न जाहलेस मग आम्हाकडेस कांही नाही गोखलेकडील कारकून × × गेले असता तुमची × × × × याजकरिता याचा बंदोबस्त सत्वर करावा म्हणोन बहादर यानी सांगितले ते सेवेसी विनंती लिहिली आहे येविसीचा सविस्तर मजकूर राजश्री कृष्णाजी मंडलीक रुपाजी जाधव हुजूरे स्वामीचे शेवेसी विनंती करिता निवेदनात येईल येविषीची शेवकास आज्ञापत्री आज्ञा करविणार धनी समर्थ. कलम

१ वसूलाचे रुजवातीस कारकून अद्यापि आले नाहीत त्यास आज्ञा होऊन सत्वर पावे ऐसी आज्ञा व्हावी. —————————————————— कलम

१ गोखले बंडाचे पारपत्य करावयाकरिता नाशकाहून येथे येऊन परवती पासी फौजे-सुद्धा उतरले होते त्यास × × × गोखलेकडील फौज बंडावरी पुढे गेली ती त्यानी मसुरचे ठाणे घेऊन बेरड पाच पंचवीस मारले नंतरी तेथून बंडाचे फौजे-वरी चालोन गेले तेथे लढाई होऊन गोखलेकडील दाहा पांच मनुष्ये जाया जाहाले व बंडाकडील पांच पंचवीस मनुषे जाया होऊन बंडाचा मोड जाहला कांही स्वार होते ते पळून गेले पायचे लोक होते ते किलेवरी जाऊन रात्रौ तेथून पळून गेले नंतरी दुसरे रोजी गोखलेकडील फौज कराडावरी जाऊन उतरून तेथून ठाणी व किले घेतले बंड पळून गेला याप्रमाणे गोखलेचे फौजेकडून वर्तमान येथे आले त्याजवरून खुद गोखले

जाणार होत ते राहून परवतीपासी राहिले होते तेथून गाव × × × हिले यामप्रमाणे बंडाचे × × × शेवेसी निवेदनार्थ लिहिले असे.————कलम

१ राजश्री पंतप्रधान याची स्वारीही लवकरच येणार आहे वर्तमान आहे ——— कलम

१ नागपुरचे वर्तमान तरी रघूजी भोसले याचे पुत्र अंधले आहेत त्यास धनी करून सारा काम कारभार मन्याबापू याचे चिरंजीव करीत आहेत याप्रमाणे वर्तमान येथे ऐकिले ते शेवेसी लिहिले आहे. ————————— कलम

——

५

येकूण कलमे पांच सेवेसी निवेदनार्थ विनंती. छ १९ माहे जाखर.

लेखांक ७८ तारीख ९–६–१८१६

श्री

रु. नं. २

अ. नं. ३७८

समस्तसेनाधुरंदर विश्वासनिधी राजमान्य राजेश्री

राणोजीराव घोरपडे सेनापति यासी आज्ञा केली ऐसीजे त्रिंबकजी डेंगला कुंपणी इंग्रज बहादर याचे कयदतून पळून बंड करीत फिरतो याजकरिता इंग्रज बहादर यानी राजश्री बाजीराव पंडित प्रधान याची पत्रे तालुकेस तालुकेस घेतली त्यापैकी एक पत्र इंग्रज बहादर यानी हुजूर निवेदनार्थ पाटविले त्याची नक्कल करून आपणाकडे पाठविली आहे त्यास आपले तालुकेतील कोणी लोक डेंगला मा।र याजकडे गेले असलेस त्यास आणवून घेऊन हुजूर विनंती पत्री लिहून पाठवावे गेले लोक न आलेस तालके अन्वये त्याचे पारपत्य हुजूरने होईल तरी आपण तालुकेतील लोकाचा शोध करून तालके अन्वये बंदोबस्त करावा जाणिजे सुा सबा आसेर मयातेन व आलफ र।। छ १२ रजब बहुत लिहिणे–

लेखांक ७९ तारीख ११–६–१८१६

श्री

नकल

आज्ञापत्र राजमंडळ ता। मोकादमानी देहाय गावगन्ना प्रांत हुकीरी सुा सबा आशेर मयातैन व आलफ राजश्री यमाजी दिनकर मुतालीक देसाई याचे वतनी गांव वगैरे निंबालकर राजश्री सिदोजीराव यानी जप्ती केले होते त्यापौ गाव हुजूरून मोकलीक केले बी तपशील

१ मौजे शिरगाव

१ मौजे हुंबरवाडी

१ मौजे किने तर्फ आजर

——

येणे प्रमाण तीन गाव मोकलीक केले अस तरी सालाबाद प्रमाणे मुतालीक देसाई याजकड वहिवाट करीत जाणे जाणिजे ता छ १४ माहे रजब निशाने मोर्तब

लेखांक ८०

तारीख २५-६-१८१६

श्री

रु. नं. १

अ. नं. २३९

यादी इकडील मजकुराची कलमें सुा सबा आशर मयातेन व आलफ

१ गोखले कडील फोज वारणेच्या पैलतीरास जाऊन उतरले आहेत अलीकडे हुजूरच्या प्रांतात उपद्रव करितात त्याजविषयी बाहादर याजपासी बोलोन हुजूरचे प्रांतातील कुले डोळ वगैरे नेहली आहेत सोडून देऊन पुन्हा प्रांतात उपद्रव करू नये याप्रमाणे गोखले याचे पत्र राजश्री बाळाजी कृष्ण यासी घेऊन पाटवून द्यावे म्हणून आज्ञा त्यास आज्ञेप्रमाणे बहादर यासी बोलोन त्याजविसीची यादी बहादर याजपाशी करून दिल्ही नंतर दुसरे रोजी राजश्री पंत राजाआज्ञा याची पत्रे आइतवडेच्या मजकुराविषयी जासूद घेऊन आलेवर ———————बाहादर याजकडे जाऊन पत्राप्रमाणे सविस्तर मजकूर समजोन दिला आणि बहादर यासी बोलिलो जे गोखले याची फौज वारणेच्या पैलतीरास जाऊन उतरली असता पुन्हा वारणे अलीकडे गावगन्ना व पलीकडे ऐतवडेस रोखे पत्र करुन गावची कुले धरून आणून त्याजपासून ऐवज घेत आहेत आणि उपद्रव चालला आहे तसाच आहे याप्रमाणे बहुत बोलणी जाहाली नंतर गोखलेकडील वकीलास आम्ही तेथे बसले आहो तोच बोलाऊन आणून बाहादर यानी त्यासी सांगितले जे तुमची मनाई घेऊन पाटविली असता त्यानी हुजूरच्या तालुकेतील कुळे धरून आणोन रुपये घेत आहेत व कहीकबाडाचा उपद्रव वगैरे वारणे अलीकडे बसून करीत आहेत म्हणून हुजूरची बोभाट आली याची पत्रे आली तीच बजिनस पाहावी याप्रमाणे बोलोन आम्ही यादी बाहादर याजपासी दिली होती तीच यादी त्याजपासी देऊन बोलले जे यादीप्रमाणे कुले गावगन्नाची खतपत्र ऐवजसुद्धा हुजूरची हुजूर माघारे स्वाधीन करून पुन्हा हुजूरच्या तालुक्यात एकंदर उपद्रव करू नये याप्रमाणे तुमची ताकीद बाळाजी कृष्ण यासी द्यावी याप्रमाणे ताकीद केली त्याजवरून त्यानी उत्तर केले जे आपण सांगितले याप्रमाणे गोखले यासी बोलोन उदईक ताकीद आणून देतो याप्रमाणे बोलोन गेलेवर तिसरे रोजी त्याजकडील वकील यानी ताकीदपत्र बाहादर याजपासी आणोन दिले नंतर बहादर यानी ताकीदपत्र आम्हापासी दिले ते स्वामीचे शेवेसी पाठविले आहे त्यास राजश्री बाळाजी कृष्ण याजकडे कारकुनाबरोबर देऊन पाटवून देणेची आज्ञा होऊन त्यानी गावची कुले व खतपत्रे व रुपये काय घेतले असतील ते माघारे स्वाधीन करून घ्यावी याप्रमाणे × × × व्हावी परभारे गोखले यानीही बाळाजी कृष्ण यासी

लेहून पाटविले आहे कीं हुजूरच्या तालुकेतील कुळे डोले वगैरे आणिली असतील ती सोडून देऊन पुन्हा एकंदर हुजूरच्या तालुक्यात उपद्रव करू नये याप्रमाणे पत्र पाठविले आहे म्हणोन वकील गोखलेकडील याणी बहादर याजपासी सांगितले ते समजलेवरून लिहिले असे शेवेसी निवेदनार्थ. कलम

१ नागाव्याची यादी मागाहून आटचार रोजी रवाना होऊन येईल म्हणोन आज्ञा त्यास हल्ली ताकीद पाठविली आहे या ताकीदीवरून त्याजकडून कुले व खतपत्रें वगैरे रुपय घेतले असतील ते त्याजकडे हुजूरून शाहाणा कारकून पाटऊन देउन माघारे देतील ते घेऊन बाकीची नागाव्याची यादी पाटवून देणेची आ + + + + ऊन रवाना व्हावी म्हणजे त्याप्रमाणे बाहादर यासी बोलावयासी येईल.———————कलम

१ गोखले याजकडील पाच कलमाची यादी बाहादर यानी दिली ती हुजूर पाटविली त्याची प्रतिउत्तरेची यादी एक व बंड प्रकर्णी सांपडले ते हुजूर कैद करुन ठेविले त्याची यादि एक येकूण दोन यादी हुजूरून आल्या त्या बाहादर यासी वाचून दाखविल्या त्याच्या तालीका बाहादर यानी लिहून घेऊन यादी माघारे दिल्या व त्या यादीची तालीक कैद करून ठेविले त्याची गोखले याजकडे बहादर यानी दिली आहे आणि बाहादर यानी आम्हास सांगितले जे याप्रमाणेच तुम्ही आपल्या प्रांतात चवकसी करून हे धरिले तैसे मांगबेरड वगैरे सामील बंडात असतील ते वरचेवर शोध करून कैद करून ठेऊन जैसे सापडली तसे वरचेवर यादी इकडे पाटवून देत जावी हे काम आम्ही आपले जिमा घेऊन केले आहे त्यासारखे कोणाची मुलाहिजा न धरिता कैद करून ठेवावे येणे करून श्रीमंतासही संतोष व तुमच्या राज्यात ही चोरचिरटीचा वगैरे बंदोबस्त होईल दोहीकडील चांगलेच आहे याप्रमाणे बहादर याणी सांगितले त्याजवरून सेवेसी लिहिले आहे त्यास चोर मांग बेरड वगैरे शोध करोन सांपडतील त्यास कैद करून ठेवावे हल्ली तीन असामी कैद करून ठेविले त्याची यादी बाहादर याजपासी दिली त्याची तालीक बहादर यानी आपणापासी ठेविली आहे त्यास तीन असामीचा बंदोबस्त चांगला करून किल्यात अटकेत ठेविले असावे त्यातील × × वजा जाहाले असे होऊ नये. कलम

१ इकडील काजकामाची यादी बाहादर याणी श्रीमंतापासी दिली त्यास श्रीमंतानी राजश्री मोरदिक्षीत यासी कामे उलगडून देण्याविसी काय सांगणे ते सांगितले आहे त्यास आम्हाकडून फोट साहेबही मोरदिक्षीत याजकडे व श्रीमंताकडे दररोज जात आहेत × × × चालली आहेत जसी उलघडून येतील तसी तुम्हास कळवितो याप्रमाणे बाहादर तिकडे याचे बोलणेत आहे कागलचे सात गाव आधी सुटून यावें याविसी तिकडे बोलणे त्यानी नेटाचे लाविलेच आहे व आम्हीही वरचेवर बाहादर यासी सूचना करीतच आहो कामे होत येतील तसे सेवेसी लिहून पाटवावे. कलम

१ बसूलाच्या रुजवातीकरिता राजेश्री कृष्णाजी रामचंद्र याची रवानगी करून पाटविले ते येऊन पोचलेच आहेत गावगन्नाच्या वसूलाच्या यादी रुजवातीच्या पेशजी हुजूरून येथे आल्या आहेत व इंग्रज बाहादर याजकडेही आल्या आहेत त्यापैकी गावच्या यादी वसूलाच्या आम्हाकडे आल्या नाहीत त्याची यादी करून पाठविली आहे त्याप्रमाणे यादी राजश्री हरि नारायण याजपासी असतील त्याचा शोध करून ज्या असतील त्या हरि नारायण येणार त्याजबरोबर पाठवून देणेची आज्ञा व्हावी हरि याजपासी नसतील त्या + + कडून आणऊन तेरीखवार पा देणेची आज्ञा व्हावी.

१ कागल तालुकेविसीची आज्ञा राजश्री बालाजी बाजीराव चिटणीस यासी जाहाली आहे तुम्हास लिहितील त्याप्रमाणे बंदोबस्त करून घेऊन जाबसाल उलघडून घ्याव म्हणून आज्ञा त्याप्रमाणेच बहादर यासी बोलिलो आहो त्यानीही त्याप्रमाणेच बंदोबस्त करून देऊन नंतर तुम्हास सांगणे ते सांगो याप्रमाणे बोलले आहेत त्यास वरचेवर विचारीत आहो ते याविसीचा विचार करून सांगतील त्याप्रमाणे सेवेसी लिहून पाटवितो. कलम

१ पालकीचे गोंडे जोडया दोन व रेशमी काढण्या येणे प्रमाणे खरेदी करून हुजूर पा देणेविसी आज्ञा त्यास आज्ञेप्रमाणे खरेदी करून पा देतो. कलम

१ बावडेकरी यानी हल्ली जेष्टमासी दोन दरवडे घातले म्हणोन त्याची यादी गोखलेकडील वकील यानीं बाहादर याजपासी आणून दिली नंतर बहादर याणी आम्हास विचारिले जे पेशजी तुम्हापासी दरवडेची यादी दिलीच आहे त्याचा बंदोबस्त आज दोन महिने होऊन येतो त्याचीच चौकसी हुजूर होत असता हल्ली बावडेकर यानी आणखी दोन दरवडे घातले याची वाट काय त्यास तुमच्या हातून हा बंदोबस्त होत असल्यास लवकर करून बावडेकरी याजकडील कारकून सत्वर आणवाव नाही होत असल्यास तैसेच सांगावे त्याप्रमाणे आम्ही त्यास सांगो म्हणोन बोलले त्यास उत्तर केले जे बावडेकरी याजकडील बंदोबस्त होऊन कारकून येत आहे येविसी आपणास सांगितलेच आहे त्यास कारकून येथे आलेनंतर दरवडेची चवकसी जसी पाहिजे तसी करावी याप्रमाणे बोलली त्यास त्यानी उत्तर केले जे आम्ही येथे बोलत आसता बावडेकरी यानी दरवडे घालणेचे कारण ते काय तरी ही यादी हुजूर पा देऊन या दोनी यादीचा बंदोबस्त बावडेकरी याजकडून हुजूरून होऊन येऊन त्याजकडील कारकून सत्वर आणवावा म्हणोंन सांगितले व त्यानी यादी दिली ती शेवेसी पाठविली आहे त्यास येविसीचे तपसीले पेशजी विनंती पत्री लिहिलेच आहे त्याप्रमाणे सत्वर होऊन बावडेकरी याजकडील कारकून माहितगार बोलणार मागील उजूर न धरी ऐसा सत्वर पाठवून देणेची आज्ञा व्हावी म्हणजे याची चौकसी समक्षच करून जसी पाहिजे तैसी घेतील त्यास कारकून बावडेकरी याजकडील सत्वर याव. कलम

१ पासष्ट हजाराची पावतीचा मसुदा पेशजी पाठविला आहे त्याप्रमाणे पावती सत्वर आणवावी म्हणजे हरेश्वर भाईची कर्जाची वगैरे गुंता उरकून देवितो याप्रमाणे बहादर यानी सांगितले आहे व पावती आली कीं नाही म्हणून वरचेवर विचारीत आहेत त्यास मसुदेप्रमाणे पावती सत्वर पा देणेची आज्ञा व्हावी. कलम

१ साडेएकवीस हजाराची पावती दुसरी हुजूरून आली ती देऊन पेशजीची पावती माघारे घेऊन शेवेसी पाठविली आहे शेवेसी प्रविष्ट जाहाल याची आज्ञापत्र आज्ञा सादर सेवकास व्हावी. कलम

१ राजश्री आत्माराम खंडो याचे स्त्रीस पा देणेविसी राजेश्री रामराव दि॥ बंदुखबारदार यासी आज्ञा निक्षून होऊन तिजला पुनीयासी प॥ द्यावी येविसी स्वामीचे सेवेसी विनंतीपत्र पाटविले होते परंतु रामराव यासी निक्षून आज्ञा होऊन त्याची स्त्री आली नाही रामराव याचे देणे घेने असल्यास त्यानी कागद कतबे देऊन प॥ द्याव म्हणजे आत्माराम खंडो याजकडोन रुपयेचा उगावा होऊन येई ऐसे करितो याप्रमाणे रामराव यासी आज्ञा होऊन मशारनिलेचे स्त्रीस व त्याजकडील खते पत्रे घेऊन येणार त्यासुद्धा प॥ देणेची आज्ञा व्हावी. कलम

११

येकूण कलमे अकरा छ २८ रजब.

तारीख १५-७-१८१६

लेखांक ८१

श्री

रु. नं. २
अ. नं. ३३६

पौ छ १९ शाबान सन सबा आशर
तीर्थरूप मातोश्री नानीसाहेब घाटगे वडिलाचे शेवेसी

आपत्य सिदोजीराव नाईक निंबाळकर सरलष्कर दंडवत विनंती ऐसीजे येथील कुशल ताा छ १९ माहे शाबान जाणोन स्वकीय लेखन करीत असले पाहिजे विशेष कागल तालुकेस गैरवाखा करवीरकर याणी पुणे मुकामी इंग्रज बहादर याजकडे बोलणे लाविले आहे ते वर्तमान राजश्री आपाजीराव लिंगोपंत यानी लिहिले त्यास येविसीचे सविस्तर चिरंजीव राजश्री हिंदुराव बाबा घाटगे सरज्याराव वजारतमाब यासी लिहिले आहे आपणही चिरंजीवास लेहून पाठवून तिकडून पत्रे निकडीने येऊन पोचसी आणवावे पत्रे लिहून निकडीने डाकेतून रवाना करून देवावी आणि कागल तालुकेचे सनदेच्या तालका पुणेस पाठवावेयास पाहिजे त्यास निकडीने आणवणेविसी राजश्री सखोपंत यासी कालच सांगितले आहे त्यानी वडिलासी लिहिलेच असेल त्याजप्रमाणे

ताल्का अजीच निकडीने काढून पाठवून द्यावे पुणेस सत्वर रवाना करावयासी पाहिजे यास्तव लिहिले असे निरंतर पत्री कुशल वृत लेहून चित्त संतोषवीत असावे विशेष काय लिहिने लोभ करावा हे विज्ञापना.

लेखांक ८२ तारीख १७-९-१८१६

श्री.

रु. नं. १

अ. नं. ३२३

श्रीमंत माहाराज छत्रपति सलमुल हुताला आर्जासबबा करनेल कलोस साहेबबहादूर बांद येथील खैरीयेत ता छ १७ माहे शपटंबर पावेतो आफीयत जाणून हमेशा तलदुफनामा पाठवून शादमानी लक्षीत जावी दिगर सरकार दौलतमदार कुंपणी इंग्रज बहादूर याची कौली सावकारी गलबते हरि बलाल केल्कर यानी सुवर्णदुर्गी बंड करून सावकारी गलबते धरून नेली याजवर म॥रनिले पुणीयास आलीयावर सदहू सावकारी गलबते याचा फडशा करावा म्हणोन तगादा लाविला त्यासी केल्कर मजकूर जाबसाल न करिता येथून पलोन बावडेकर अमात्य याचे आश्रयास जाऊन राहिले तरी हरि बलाल केल्कर व भास्कर कृष्ण व ब्रहिरो लंब्रोदर याजला पुणीयात पाटवून देण्याविसी अमात्य मजकूर याजला ताकीद होऊन येथे येऊन पोहोचेत तो अर्थ जाला पाहिजे याबाबे श्रीमंत राव पंडत प्रधान बहादूर यानी खिदमतेत कलमी केले आहे त्याजवरून दर्याप्त होईल ज्यादा काय लिहिणे प्यार व आल्ताफ असो देणे.

लेखांक ८३ तारीख २२-९-१८१६

श्री

रु. नं. २

अ. नं. ३८२

पौ छ १२ माहे मोहरम

सन सबा आशेर मयातेन

व आलफ

श्रीमंत माहाराज राजेश्री छत्रपति

स्वामीचे शेवेसी विनंती शेवक सदासिव माणकेश्वर कृतानेक विनंती विज्ञापना तागाईत छ २९ माहे शवालपावेतो स्वामीचे कृपावलोकने करून शेवकाचे वर्तमान यथास्तित असे विशेष रा तूळदास भोपे पाटील मुकदम क्षेत्र तुळजापूर यानी समजाविले कीं आमचा व भगवंतराव पाटील भोपे याचा क्षेत्र मजकूर येथील पाटिलकीचे मानपानासंबंधे खटला पडून आम्हा उभयताकडील गुमास्ते हैदराबादेस जाऊन नबाब याचे सरकारातून राजश्री

देवराव बहादूर व नवाजखा बहादूर याचे नांवे क्षेत्रीचे व दुसरे तालुक्यातील जमेदार मेळवून श्रीचे देवालयात पंचाईत करावी येविषी आणले त्याप्रमाणे पंचाईत व्हावी तो भगवंतराव क्षेत्र करवीरास गेले व त्याचे गुमास्ते होते तेही त्याजला घेऊन येतो असे बोलून गेले त्यास भगवंतराव यास आणऊन पंचायत व्हावी म्हणोन त्याजवरून शेवेसी विनंती लिहिली असे तर उभयताकडील गुमास्ते हयद्राबादेस जाऊन नबाब याचे सरकारातून अमलदाराचे नांवे पत्रे आणली त्याअन्वये पंचाइतीस क्षेत्र तुळजापुरास येण्याविसी भगवंतराव पाटील भोपे यास आज्ञा जाली पाहिजे शेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक ८४ तारीख २१-११-१८१६

श्री

रु. नं. २

अ. नं. ३६५

यादी राजश्री राणोजीराव घोरपडे यासी शेनापतीची वस्त्रे देणेबद्दल ठराव कलमे

१ प्रथम येते दिवसी स्वारी आडवी जाऊन भेटीस चादर द्यावी. कलम

विनंती लिहिले प्रमाणे स्वारी सामोर जाऊन चादर पद्धतीप्रो देणेची आज्ञा होईल.

१ वस्त्रे शेनापतीचे पधती प्रो देऊन जरीपटका व हात्ती करारा प्रो द्यावा. कलम

सेनापतीची वस्त्रे व हात्ती व जरीपटका देणेची आज्ञा होईल.

१ सिकेकटार व सनदा द्याव्या. कलम

सिकेकटार व सनदा देणेची आज्ञा होईल.

१ मौजे कडलगेची सोडचिटी द्यावी. कलम

आपण हुजूर आलेनंतर आज्ञा होईल तीर्थस्वरूप मातोश्री बाळाबाई आका निंबाळकर बहादूर याचे विद्यमाने कडलगेचा जाबसाल करून देणेची आज्ञा होईल.

१ सरदेशमुखीची सोडचिटी द्यावी. कलम

सरदेशमुखीच्या सोडचिटया देणेची आज्ञा होईल.

१ कारकुनास व भले यासी वैवाटीप्रो वस्त्रे द्यावी. कलम

पूर्वील वैवाटी प्रो वस्त्रे देणेची आज्ञा होईल.

६

येकून कलमे साहा आज्ञा जाहाले प्रमाणे करून देणेची आज्ञा होईल जाणिजे सुा सबा आशर मयातैन व आलफ र॥ छ १ माहे मोहरम रुजू मोर्तब.

लेखांक ८५ तारीख २५-११-१८१६

श्री

रु. नं. १

अ. नं. २००

चिरंजीव विजयभव राजमान्य राजश्री राणोजी-

राव घोरपडे यास प्रती बालाबाई निंबालकर

बहादर आशीर्वाद उपरी येथील कुशल ता छ ५ मोहरम पावेतो वर्तमान यथास्थित असे विशेष आपणास येणेविसी वाडीचे मुकामाहून पत्र जैसे पाठवावयाच ते पाठविल आस्ता आद्यापि आला नाही त्यास हली पत्र पावताच याव आम्ही वाडीहून रविवारी रात्रौ आलो व राजश्री पंत राजाज्ञाही भुदरगडाहून मधरात्री येऊन पोहचले आपण विलंब न करिता आजीच रातोरात येऊन पोहचावे बहुत काय लिहिणे सदरहू पंत राजाज्ञेचही पत्र खातरजमेचे घेऊन हुजूरचे आज्ञापत्राबरोबर पाठविले आहे त्याप्रमाणे कोण गोष्टीविसी संशय न घेता हुजूर सत्वर यावयाचे कराव हे आशीर्वाद.

लेखांक ८६ तारीख-२५-११-१८१६

श्री

रु. नं. १

अ. नं. २१८

राजश्री राणोजीराव घोरपडे गोसावी यासी

सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नो नारायणराव पाटणकर सरलष्कर राम राम विनंती येथील कुशल ताा छ ५ माहे मोहरम जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असिल पाहिजे. विशेष तुम्हास हुजूर आणऊन सेनापतीची वस्त्रे द्यावी याजविसी पेशजी पत्रे पाटविली आहेत त्याप्रमाणे दिकत न घेता निघोन यावे हेविसी श्रीचे पत्र आलाहिदा आहे तरी कोणताही संषय न घेता हुजूर निघून यावे वस्त्राचा समारंभ होऊन कापसीस पोहोचऊन देऊ कळावे बहुत काय लिहिणे लोभ करावा सदरहू लिहिले प्रमाणे जिमा आमची असे लोभ असो द्यावा हे विनंती.

लेखांक ८७ तारीख २६-११-१८१६

श्री राम समर्थ

रु. नं. १

अ. नं. २२७

राजश्री नरहरपंत भाऊ देशपांडे गोसावी यासी

स्नो राणोजीराव घोरपड सेनापति दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लेखन करीत जाव विशेष आजी करवीराहून पत्र आली ती आपणाकड पाठविली

आहे त्याजवरून कलल राजेश्री रत्नाकरपंत राजाज्ञा याचे पत्र खातरजमच आल नाही भुदरगडाच्या मजकुराकरिता पंत राजाआज्ञावरी सरकारची मर्जी कडची जाहाली आहे तीा मातोश्री बाळाबाई आकाच पत्र मात्र खातरजमाच आल आहे त्याच तालीक काढून पाटविली आहे मुख्य राज्यमंडळचा कारभार त्याचा विश्वास नाही जे सांगन ते पक्कपण समजून सांगाव राजश्री दिनकरपंत व हावलदार हुजूर करविराहून बोलावणे करिता आल आहेत त्यासी करवीरीच पत्र आली आहेत की सेनापति आल असता घेऊन याव नाहीपेक्षा तुम्ही लवकर निघोन याव म्हणोन ते आजी निघोन जात होत त्यासी आजी बहुतप्रकार सांगोन ठेऊन घेतल आहे आपण राजश्री आपासाहेब सरलष्कर याच कानावरी घालून पत्र दाखवण ते आज्ञा ज्या प्रमाण करतील त्याज प्रमाण वर्तणूक होईल आम्हास सर्व प्रकार पैल्यापासून देवत राजश्री आपासाहेब सरलष्कर याच पाये यासिवाय दुसर दैवत नाही करवीरीची पत्र राजेश्री आपासाहेब सरलष्कर यासी पत्र पावताच दाखवण अनभान न करण अनमान करून पत्र मधे ठेविले असता आम्हावरी शब्द नाही दिनकरपंत व हुजूर माघार आजी जात होत त्यासी जेवण करून जाव म्हणोन ठेऊन घेतले त्यासी येण म्हणोन करवीरच जासूद व पत्र वरचेवरी येतात ते राहत नाही यास्तव लिहिल आहे वरकड मजकूर राजश्री रामाजीपंत वडीगरी सांगता कलल बहुत काय लिा लोभ कराव रा छ. ६ मोहरम हे विनंती.

लेखांक ८८

तारीख २७-११-१८१६

श्री

रु. नं. १
अ. नं. १९७

राजश्री राणोजीराव घोरपडे सेनापति
गोसावी यास

सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री सिदोजीराव नाईक निंबाळकर सरलष्कर रामराम विनंती येथील कुशल ता॥ छ ७ माहे मोहरम जाणून स्वकीय कुशल लेखन करीत आसिल पाहिजे विशेष आपण पत्र पाटविले ते पावले करवीराकडील पत्रही पाहिली त्यास आपली खातरजमा जाहाली आसलेस जाऊन कार्यसिद्धी करून यावे निरंतर पत्र पाटऊन चित संतोषवीत आसावे बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनंती.

लेखांक ८९

माहे नोव्हेंबर इ. स. १८१६

श्री

रु. नं. १
अ. नं. २०१

चिरंजीव विजईभव राजमान्य राजश्री राणोजीराव घोरपडे प्रति बाळाबाई निंबाळ-

कर बहादर आनेक आसीर्वाद उपरी विशेष तुम्हास करवीरास नेऊन सेनापतीची वस्त्रे देऊन कापशीस पोहचती करून देऊ तुम्हाविसी तजावजा येखादे जाहालीया आम्ही जातीनिशी निभावणी करून देऊ कोणी गोष्टीची तोसीस होणार नाही अंदेशा न घेता यावे कळावे बहुत काय लि॥ हा आशीरवाद.

लेखांक ९०

तारीख ६-१२-१८१६

श्री रामचंद्र

रु. नं. १
अ. नं. २११

छत्रपति

राजश्री राणोजीराव घोरपडे. सेनापति

गोसावी यास

सकल गुणाल्ंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्ने॥ मोरेश्वर सुब्राव आमत्य हुकमतपन्हा आसीरवाद विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत गेले पाहिजे विशेष पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन लिहिले वृत कळो आले ऐसेच सदैव पत्र पाटवून संतोषवीत जावे यानंतर श्रीमन्महाराज राजश्री स्वामी यानी सेनापतीची वस्त्रे आपणास मार्गशीर्ष शुद्ध दशमीस भ्रगुवारी दिल्ही म्हणोन लिहिले त्याजवरून बहुत संतोष जाहाला इकडील मानस होताच त्याअन्वये श्री कृपेने योग घडला उत्तम जाहाले र॥ छ १६ माहे मोहरम बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

लेखांक ९१

तारीख १७-१२-१८१६

श्री.

तालीक
रु. नं. २
अ. नं. ३८३

राजमान्य राजेश्री बाळाजी बाजीराव चिटणिवीस यासी आज्ञा केली ऐसीजे राजश्री संताजी घोरपडे याजकडील कारकून सेनापतीचे बोलणे करिता हुजूर न येता परत ते पुण्यास आला आहे त्यासी त्याचे बोलणे तेथें होऊ न देता हुजूर पाठवून द्यावे येविसी श्रीस विनंतीपत्री लिहिले आहे व राजश्री राणोजीराव घोरपडे सेनापति याजकडील कारकून आज्ञा होऊन तुम्हाकडे पाठविले आहेत तुम्हास मजकूर समजोन देतील त्याप्रमाणे समजून घेऊन त्या कारकुनाचे तेथे बोलणे होऊ न देता हुजूर पाठऊन देणे परभारे तेथे बोलणे होऊ देऊ नये जाणिजे सुा सबा आशर मयातेन व आलफ र॥ छ २७ मोहरम बहुत काय लिहिणे मोर्तब असे.

लेखांक ९२

तारीख ११-१-१८१७

श्री व्यंकटेश प्रसन्न

रु. नं. २

अ. नं. ३७४

श्रीमन्महाराज राजेश्री छत्रपति स्वामीचे

शेवेसी

विनंती शेवक नारायणराव व्यंकटेश घोरपडे कृतानेक विज्ञापना ताा छ २२ सफर पावेतो स्वामीचे कृपावलेकरून सेवकाचे वृत्त यथास्तित असे × × लस्कराकडील वर्तमान लिहिणे हुजूरची आज्ञा आहे त्यास मिरज चिंचणीस लष्करातून लिहिले आहे तो मजकूर वेदशास्त्र संपन्न राजश्री जोसीराव भाऊ याचे पत्री सविस्तर लिहिले आहे ते शेवेसी विदित करतील सर्व प्रकारे सांभाल करणार स्वामी समर्थ आहेत स्वामीचे पायासिवाय दुसरा लक्ष नाही.

लेखांक ९३

तारीख ३१-३-१८१७

श्री

रु. नं. १

अ. नं. २२८

राजश्री राणोजीराव घोरपडे सेनापति

गोसावी

सकल गुणालेकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्ने॥ सिदोजीराव नाईक निंबाळकर सरलष्कर राम राम विनंती उपरी येथील कुशल ताा छ १२ माहे जे॥वल जाणोन स्वकीय लेखन करीत असिले पाहिजे विशेष आपण पत्र पाठविल ते पावल राजश्री राजाज्ञाच पत्र आलेची तालीक पाटविली ती पावली दस्तोवजी पत्र बरच आहे पुढ प्रसंग पडल तस करावयास येईल वरकड मजकूर सर्व आपणास रुबरु सांगितलच आहे कोणत अर्थ पाच रु॥ उत्पन्न होतील तैस कराव निरंतर पत्री कुशल वृत लेहून पाठवीत असाव बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

लेखांक ९४

पौ तारीख ७-५-१८१७

श्री

रु. नं. २

अ. नं. ३६८

श्रीमंत माहाराज राजश्री छत्रपति स्वामीचे शेवेसी विनंती सेवक मुधोजी भोसले सेनासाहेबसुभा कृतानेक विज्ञापना ऐसीजे सेवकाचे वर्तमान तागाईत चैत्र शुद्ध १ पावेतो

माहाराजाचे कृपावले करून यथास्थित असे विशेष राजश्री रामचंद्र वाघ याची स्त्री व नात श्री रत्नागिरीचे यात्रे करिता आले आहेत त्यास देवदर्शन करून माहाराजाचे पाय पाहाण्याकरिता येतील ज्या पक्षी माहाराजाचा लोभ सेवकावर तेव्हा याची यात्रा होऊन निर्वेधपणे रवाना करणार माहाराज आहेत आज्ञापत्री सेवकाचा सांभाल करणार माहाराज समर्थ आहेत शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

पौ छ. १९ माहे जमादिलाखर सुा सबा आशर मयातैन व आलफ.

लेखांक ९५ तारीख १०–६–१८१७

श्री

पौ छ २९ रजब

रु. नं. २

अ. नं. ३८८

यादी इकडील मजकुराची कलमबंदी बी तो

सुा समान आशर मयातेन व आलफ

१ काल इंदुवारी आम्ही व राजेश्री दिनकरपंत मिलोन बेटावरी गेलो होतो तेथे मिरजकर याजकडील वकील आले होते त्यास आत बहादर याणी बोलाऊन नेले नंतरी आम्हास बोलावणे आलेवरी आम्ही उभयता व × × बापूजीपंत ऐसे आंत बंगलेत गेलो तेथे रसूल साहेब व मिरजकर याजकडील वकील बसले होते तेथे आम्ही जाऊन रसूलसाहेब याची भेटी जाहाली नंतरी रसूलसाहेब यानी गोष्ट काढली जे मिरजेवरी दरवडा पडून दाहा पाच हजाराचा विषय गेला त्या दरवडेतील दोन आसामी मिरजकर यानी धरून त्याजपासून जबान्याची यादी लिहून घेतली त्यात लोक का। रुकडीचे शेतसनदी पयादे आहेत राजश्री माधवराव निंबाळकर याणी सांगून दरवडा घातला म्हणोन दोन आ। सापडले त्यानी यादीत लेहून दिल्हे आहे हुजूरचे तालुकेतून दरवडा पडला याप्रमाणे मिरजकर याजकडील वकील बोलतात बोभाट आम्हाकडे आला आहे त्यास असे हुजूरचे तालुकेतून होऊ नये येविसी तुम्ही हुजूर विनंतीपत्र लिहून पाटवून याचा बंदोबस्त जरूर केला पाहिजे ही गोष्ट कांही लाहाणसान नाही बंडासारखीच आहे ऐसे ठाईठाई होत गेल्यास बंडे होतील तरी याचा बंदोबस्त हुजूरून आधी होऊन दरवडेतील विषय काय गेला आहे तो जराबाजरा याजकडून भरून देवावा येविषयीतील प्राये हुजूरोन उपेक्षा न होता आधी जरूर बंदोबस्त करावा याप्रमाणे बहादर यानी दोन चारदा फिरफिरोन सांगितले त्यास आम्ही उत्तर केले कीं ही गोष्ट आम्हास कांही ठाऊक नाही आपण सांगितले त्याप्रो हुजूर विनंतीपत्र लिहून प। याचा बंदोबस्त आपण सांगितल्या अन्वयेच करितो दरवडेकराचा कांहीं मुलाजा हुजूरून होणार नाही याचा बंदोबस्त हुजूरून होईल याप्रो

बोलोन यानी यादी दिल्ही ती स्वामीचे शेवेसी पाटविली आहे त्याजवरून निवेदनात येइल त्यास यादीची वाच्यता ब्राहीर होऊ न देता हुजूरून स्वार व लोक रुकडीस रवाना होऊन यादी प्रो मांग बेरड व सेतसनदी प्यादे याची घरे तेथे असतील त्यासुधा त्यास धरून कैद करावे नंतरी दरवडेची चवकसी होणे ती हुजूर आणून समक्ष व्हावी हे न होता अगोदर बोभाट झाला असता मांग बेरड प्यादे पळून जातील बंदोबस्त होणार नाही याजकरिता स्वामीचे शेवेसी विनंती लिहिली आहे यादीस रुकडी व आणखी एक दोन गाव आहेत त्याप्रमाणे बंदोबस्त हुजूरून होऊन येविषीचे मजकूरचे आज्ञोतर सेवकास सादर होंऊन यावे त्याप्रमाणे बहादर यासी सांगावेयासी येईल.

१ सदरी कलम लिहिले आहे त्याप्रमाणे बोलणे जाहालेनंतरी मिरजकर याजकडील वकीलास निरोप देऊन आम्हास विचारले जे तुम्हाकडील बोलणे काय त्याजवरून आम्ही बोलिलो जे राजे आप्तरीत आले आहे खर्चवेच निभावेत नाही जमेपेक्षा खर्च विशेष आहे यामुल साउकरी देणे वरचेवरी होऊन राज्याची पद्धात तुटत नाही सर्वत्रानी नानाप्रकारे उपेदाप देऊन खराबीत आणिले आहे बहादर याचे मांडेवरी उसे ठेविले आहे तेव्हा राज्याची बडती करून बहादर याने दाखवाबी हलीच्या प्रसंगात कांहीं राज्याच्या उपयोग बहादर यानी होये येसे करून दाखवावे आम्हास सर्वस्व आधार भरवसा बहादरचा आहे म्हणोन बोलिलो त्याप्रमाणे त्यानी इंग्रेजीत लेहून घेऊन उतर सांगितले कीं तुम्ही बोलिला त्याप्रमाणे बडेसाहेब यासी विचारून घेऊन एकदोन दिवसी याचे उत्तर काय ते तुम्हास सांगतो याप्रमाणे बोलणे होऊन बिराडास आलो त्यास आणखी एकदोन रोजी बेटावरी जाऊन बोलणे काय होईल तो मजकूर मागाहून शेवेसी विनंतीपत्री लेहून पाठवितो. कलम

१ येथील दिनचर्येचा मजकूर तरी वरचेवरी शेवेसी विनंतीपत्री लेहून पाठविलाच आहे पलटणेच्या खर्चास छतीस लक्षाचा तालुका लाऊन द्यावा त्यास माहाल अहमदाबाद व जंबूसर डबई पंचमाहाल वसई कल्याण किले सुद्धा व करनाटक सरसुभे पैकी पुरवणीस चार लक्षाचा प्रांत येणे प्रमाणे बोलण्यात येऊन यादी तयार होत आहेत व इकडून बोलणे पडले आहे कीं छत्तीस लक्ष रुपये पोतेतून देत जाऊ तालुके आहेत तसे आसावे पलीकडील बोलणे सदरहू प्रमाणे तालुके लाऊन द्यावेत ऐसे आहे या बोलण्यात पलीकडून फोटसाहेब व इकडून जे राजश्री मोरदिक्षीत व बालोबाबा विंचूरकर आहेत आज चार रोज बोलण्याचा घाट चालिला आहे अद्यापि निश्चय कोणताही ठरला नाही ठरेल त्याप्रमाणे मागाहून शेवेसी लिहून पाठवितो

१ शिंदेकडील वर्तमान तरी ते आपले मुलीचे लग्नाचा समारंभ गालेरीस करावयाचा निश्चय करून सर्वत्र मंडळीस पत्रें पा। सरदार वगैरे जमवीत होते हे वर्तमान तेथे इंग्रज यासी समजोन त्यानी शिंदे यासी बोलने घातले जे तुम्ही लग्न येथे गालेरीस करू

नये उजणीस जाऊन तेथे लग्नाचा समारंभ करावा याप्रमाणे बोलणे पडले त्याजवर शिंदे याचे म्हणणे कीं आम्ही येथेच लग्न करतो उजणीस कांहीं जात नाही याप्रमाणे बोलणे पडलेवरून उभयपक्षी वैमनस येऊन तेथे पलटणे होती ती तेथून गोलीबाहेर दोन कोसावरी उतरली आहेत लग्न आम्ही येथे करून घेतो नंतरी तुमचा आमचा मोकाबला होईल याप्रमाणे वैमनस पडून समारंभ लग्नाचा होत आहे याप्रमाणे वर्तमान ऐकिले ते शेवेसी लिहिले आहे कलमी कांहीं नाहीं निवेदनांत विनंती.

कलम

१ श्रीमंताकडून कारकून राजश्री राघो खंडेराव एकबारीचे कामावरी बेटावरी होते त्याजवरी गैरमर्जी होऊन त्यास घरास जाणेविसी निरोप जाहाला त्याच्या कामावरी दुसरा कारकून राजश्री परशरामपंत म्हणून योजिला आहे निवेदनार्थ विनंती.

कलम

१ सोनेर व रुपेरी वर्णी कागद व बहादरखानी कागदाची गड्डी येणे प्रमाणे पाठऊन देणेविषी आज्ञापत्री आज्ञा जाहाली त्याप्रमाणे कागद वगैरे जिन्नस जासूद जोडी यासमागमे सेवेसी पा। आहे बी त।

१ बहादरखानी कागदाची गड्डी १
१ सोनेरी कागदाचा दस्ता १
१ रुपेरी कागदाचा दस्ता १
१ जायफले वजन पल्लो ८८।। अच्छेर एकूण सुमारी
१ पत्री वजन पल्लो ८८। पावसेर एकूणं कलम

५

एकूण कलमे ५ शेवेसी प्रविष्ट जाहाली याची आज्ञापत्री आज्ञा व्हावी आणि जायफले व पत्री वजनी करून घेणेविसी आज्ञा व्हावी. कलम

६

येकूण कलमे साहा छ २४ माहे रजब रोज भोमवार

लेखांक ९६ तारीख ७-७-१८१७

श्री

अ. नं. २५२

यादी इकडील मजकुराची कलमबंदी बि ता सुा समान आशर मयातैन व अलफ

१ काल रविवारी आष्टमीस बेटावर जाऊन बाहादर याची भेट जाहाली नंतर कसबा रायबाग येथील कुले वगैरे राजश्री नारो गोविंद आपटे याणी नेहली त्याविसीचा मजकूर व दुसरा मौजे दानवड येथे चोरीने घोडा गेला त्याविसी मौजे मजकुरास आपटे याचे फौजेकडून उपसर्ग लागला आहे त्याविसीचा मजकूर व तिसरा

तोरगलकर याच्या तुल्या (कुले?) मुरगुडकर याणी आटकाव केल्या आहेत त्याविसीचा मजकूर येकून तीन मजकूर बाहादर यासी सांगितले जे पेशजी आपणासी बोलिलो होतो ते समई आपण सांगितले जे आमची सुरवात जाहाली म्हणजे जाबसाल उलगडणेत येतील त्याप्रमाणे सांगितले होते त्यास ही कामे उलगडून यावी याप्रमाणे बोलोन तीन कलमाची यादी बाहादर याजपासी दिल्ही नंतर मिरजेवरी दरवडा पडला त्या विसीचे मजकुराचे आज्ञापत्र व करीना सादर होऊन आले तो मजकूर सविस्तर आज्ञापत्राआन्वये बाहादर यासी समजोन दिल्हा जे दरोडेची चौकसी हुजरून केली त्यास मिरजकर याजकडील नोकर सुभाना सूर्यवंसी याचे घर कुरुंदवाडी आहे त्याणे माणसे चाकरीस ठेवून मिरजेत नेहून आपले घरी बसवून हे कृत्ये केले आणि विषय काय आणिला होता तो त्याणे आपण घेऊन यासी चाकरीचा पैसा कबूल केला होता तितका देऊन लाऊन दिल्हे त्यास चाकरीस जे गेले होते त्याचा बंदोबस्त हुजरून केला आहे त्यास सुभाना सूर्यवंसी याजला मिरजकर याणी कारकून व लोक बरोबर देऊन हुजूर पा द्यावे म्हणजे येविसीची चौकसी हुजरून होईल याप्रो सविस्तर मजकूर बोलिलो त्यास यैकून घेऊन बरे म्हणोन बोलिले व या प्रमाणे मिरजकर याजकडील वकीलासही आम्ही परभारे सांगितले त्यास त्याणी समजोन घेऊन उत्तर केले जे तूर्त आम्ही आपले येजमानाकडे जाणेची निकड आहे. तिकडून जाऊन येतो नंतरी तुमचे आमचे विचारे करावयासी येईल याप्रमाणे बोलिले आहेत व याप्रमाणे बाहादर यासीही वकीलासी बोलिलो म्हणून सांगितले आहे उतम आहे म्हणून बोलिलेवर बाहादर याणी यादी किले भरथगडाहून रयतेस उपसर्ग होतो तो होऊ नये म्हणून यादी दिल्ही ती स्वामीचे सेवेसी पाठविली आहे त्याप्रमाणे भरथगडचे मामलेदार यासी निक्षूण ताकीद हुजरून होऊन यादी प्रो बंदोबस्त करणेची आज्ञा व्हावी व येक ताकीद इकडे पा देणेविसीची आज्ञा होऊन यावी म्हणजे बाहादर याजकडे द्यावयासी येईल याप्रो बोलणे जाहाला तो मजकूर सेवेसी लिहिला आहे मागाहून आणखी बोलणे काय होईल तो मजकूर नरचेवरी विंनंती पत्री लेहून पाठवितो.

कलम.

लेखांक ९७ तारीख ७-८-१८१७

श्री

रु. नं. १

अ. नं. २५६

यादी इकडील मजकुराची कलम

सुा समान आशर मयातेन व अलफ

१ मागे वसली साहेबा बरोबर मलकमसाहेब आले होते ते हली कलकत्याहून चेन्नपटणास येऊन तेथून हैदराबादेस येऊन बेदराहून येथे पुणेस चवथे रोजी आले त्यास पुढे सामोरे बहादर याणी येथून सरंजाम व बावटा पा देऊन आपण उरली पर्यंत दहाबारा कोश सामोरे सर्वत्र पदरचे सुधा जाऊन समारंभाने आजम मालकमसाहेब यासी घेऊन येथे वा ८ मंगळवारी प्रातःकालचे प्रहर दिवसास आले संतोषाच्या तोफा खुषीच्या येताच केल्या निवदेनार्थ विनंती ———————— कलम

१ काल नवमीस बुधवारी आम्ही बेटावर गेलो होतो बहादर याची भेटी होऊन हुजूरचे खैरखुषीचे वर्तमान बहादर याणी विचारिले त्यास नित्ये पाठंतरा प्रमाणे परस्परे बोलणे जाले नंतरी आम्ही बहादर यासी मालकम साहेब आले आहेत म्हणून पुसिले त्यास बहादर याणी आले आहेत म्हणून सांगितले तुमची त्याची ज्यानपचान आहे म्हणून बोलिले त्यास आम्ही उत्तर केले की आमची ज्यानपच्यान नाही त्यास ते बोलिले जे तुमची त्याची मुलाकत व्हावी की काय त्यास आम्ही उत्तर केले आपले विचारास येईल तैसे करावे म्हणून बोलिलो नंतरी बहादर याणी आतील बंगलेत मलकम साहेब बसले होते त्यास बोलावून आणून आमची भेटी करविली मलकम साहेब याणी आंगास आंग लाऊन भेटून जवल बसले आणि महाराज छत्रपति याची तबेत चांगली आहे म्हणून विचारिले त्यास तबेत चांगली आहे म्हणून उत्तर केलेवर महाराज छत्रपति याची दोस्ती बहुत बहुत कदीम पुराणी आहे म्हणून एक दोन वेला बोलोन हुजूरची तारीफ तारीफ करून खूष होऊन आम्हास विचारिले जे महाराज छत्रपति आपले जागेस स्वस्थ आहेत सर्वत्र ठिकाणा प्रमाणे नाही कीं याप्रमाणे मलकमसाहेब याणी पुसिले त्यास आम्ही उत्तर केले जे बाहादर याचे दोस्तचे योग करून स्वस्थ आहेत याप्रमाणे बोलताच बहुतच खूष होऊन महाराज छत्रपति यासी आमचा मुजरा व आम्ही याद केली याविसी तुम्ही बहुत बहुत विनंतीपत्री लेहून पाठवणे याप्रमाणे बोलोन विडेपान दिल्हे बोलणे जाहालेला मजकूर सविस्तर सेवेशी निवेदन व्हावा याजकरिता विनंती लिहिली आहे. ——— कलम

१ काजकामाची यादी पेशजी बहादर याजकडे दिल्हीच आहे याची नक्कल स्वामीचे शेवेशी पाटविलीच आहे या काजकामाविसी बाहादर यासी विचारिले त्यास त्यानी सांगितले जे यादी तिकडे पा आहे तिकडून कामे उलगडून आली नंतरी तुम्हास सांगू याप्रमाणे बोलणे जाहालेला मजकूर निवेदनार्थ विनंती. ———————— कलम

१ मालकम साहेब येथे चार पाच रोज राहून नंतर माघारी जाणार या प्रमाणे वर्तमान आहे श्रीमंतासही बोळावणे मालकमसाहेब याचे भेटी करिता गेले आहे म्हणून ऐकीले ते सेवेसी निवेदनार्थ विनंती. ———————————— ——— कलम

१ श्रीमंताची स्वारी माहुलीस आहे वोसंपन्न राजश्री दीक्षित व पाट × ×
हेब तिकडे श्रीमंताकडे जाऊन काल येथे आले आणखी आज उद्या मागती जाणार कारण तर बहादर याजकडे माहल लाऊन दिल्हे आहेत त्या बेरजेस कमी

पडतात त्याचे भरतीस दुसरे माहल लाऊन देण्या करिता गेले आहेत या प्रमाणे वर्तमान ऐकले ते सेवेसी निवेदनार्थ विनंती. ———————— कलम.

१ वरकड वर्तमान संक्रू कदम विनंती करिता निवेदनात येईल. ———————— कलम

(फाटले आहे) कलमे साहे छ २३ माहे रम (फाटलें आहे

लेखांक ९८ तारीख १७-८-१८१७

रु. नं. २

अ. नं. ३९१

श्री

पौ।। छ. ८ माहे रोवल

सन समान व अशर मयातेन

व अलफ

यादी इकडील मजकुराची कल्म बंदी बी तो।

सुा समान आशर मयातेन व अलफ

१ राजश्री दौलतराव सिंदे याची मातोश्री मैनाबाई उजयनीहून लग्नाकरितां गालेरीस आली होती लग्नाचा समारंभ होऊन उलवडले नंतर तिचा काल छ ७ रमजानी जाहला याप्रमानें वर्तमान ऐकिले ते निवेदनार्थ कल्म

१ भरतगडचे मजकुराविषी बहादर यानी यादी दिली ती पेशजी हुजूर पा।च आहे त्याचे आज्ञातर येण्याविषी आणखी दोनतीन वेळा विनंतीपत्री लेहून पा। परंतु आज्ञातर आले नाहीं त्यास येविषीचे मजकुराची आज्ञापत्री आज्ञा होऊन यावीं त्याप्रमाणे बाहादर यासी सांगणेस येईल त्यानी सांगून बहुत दिवस जाहाले याजकरिता विनंती लिहिली आहे आज्ञा करविणार धनी समर्थ कल्म.

१ मिरजेवर दरवडा पडला याजविसीचा मजकूर स्वामीचे शेवेसी पेशजी विनंती पत्री लेहून पा।च आहे त्यास येथे त्याचे वकीलाचे बोलणे पडले आहे जे दरवडेस रुकडीची वगैरे गावची माणसे गेली होती ती हुजूरुन बरोबर कारकून व लोक देऊन मिरजेस पा। द्यावी म्हणजे आम्हाकडे सापडली आहेत त्याची याची चवकसी करून आम्ही आपला ऐवज त्याजपासून भरुन घेतो हे न होये तरी तुम्हाकडे आम्ही आम्हाकडे सापडले आहेत ते त्याजबरोबर कारकून व लोक देऊन हुजूर पा। देतो हुजूर चवकसी करून आमचा ऐवज उगवून द्यावा या दोन्हीतील कोणते ते बोलावे याप्रमाणे बोलणे पडले आहे त्यास येविसीचे उत्तर

× त्याची आज्ञापत्री आज्ञा होऊन यावी त्याप्रमाणे बोलावयासी येईल आज्ञा करविणार धनी समर्थ ———————— कल्म

१ रामदुर्गकर व त्याचे कारभारी यात वैमनस येऊन श्रीमंताकडे फिरयादीस कारभारी गेला होता त्याजवरून श्रीमंताची गैरमर्जी रामदुर्गकर याजवरी होऊन त्याचे घरी चवकी परवा बसविली होती तेच रात्री परसातील वाटेने निघोन पळून गेले म्हणून ऐकिले ते निवेदनार्थ

१ काजकामाचे मजकुराविसी वरचेवरी बाहादर यासी विचारीत आहो उलघडणेत येतील तसे स्वामीचे शेवेसी वरचेवरी विंनतिपत्री लेहून पाटवितो ———— कलम

१ नारायण पेटेचे कापड खरेदीचे दस्तक बाहादर याजकडील आज्ञेप्रमाणे घेऊन शेवेसी पाठविले आहे. ———————— कलम

१२

एकूण कलमे १२ छ ३ माहे शेवाल

लेखांक ९९ तारीख २९-८-१८१७

रु. नं ३

अ. नं. ७३९

साहेब

शंभु माहाराज छत्रपती साहेब आजतर्फे जेन तामस मंडोले सो सलाम बादज सलाम खेर आफीयत आंकी ब तारीख छ २ माहे मार्चीपावेते खैर जाणोन आसाहेबी आपली शादमानी कलमी करून दिल ताजा करीत आल पाहिजे दरिविला आ. साहेबानी खत इरषाद केले ते पोहोच्चून खुषी हासल जाहाली आमची कुंपणी सरकारच लष्करसुद्धा या प्रांती आल खबरी आसाहेबास साहेबास साहेब मेहरबा शंखराव सिंदे सेनाखासकील यानी आसाहेबास जाहीर केल मजमून इरषाद केला होता खुषी जाहली जियादगी जबाबस्वाल जे काये असली याही सेनाखासकील यास खत पाटविल म्हणोन जे आसाहेबास जाहीर होईल म्हणून खरी इरषाद जाहल होत बदस्तुरजियादती जबाबस्वाल जे काय असलीयाही सेनाखासकील यास खत पाटवीत आहो म्हणिजे आसाहेबास ज्याहीर होईल हामेषा साहेबी खत दोस्तीची तरकी करीत असाव जियादा लिहिणे प्यार मोहबत असून दिजे हे किताबती पौ छ १५ शोवाल सु॥ समान आषर मयातेन व आलफ.

लेखांक १०० तारीख ८-९-१८१७

श्रीआईआदिपुरुष

रु. नं. ३

अ. नं. ४४७

पौ छ २९ माहे शवाल सु॥ समान आसेर मयातेन व आलफ.

श्रीमन्महाराज राजश्री छत्रपति स्वामीचे

शेवेसी

विनंती सेवक भगवंतराव आबाजी कृतानेक विनंती विज्ञापना ता।। छ २५ शोवाल पर्यंत स्वामींचे कृपावलोकने करून सेवकाचे वर्तमान यथास्तित असे विशेष कसबा संगमेश्वर येथे बंडवाले याचा जमाव येऊन गोखले याकडील लोकावर गर्दी केली नंतर सेवकाकडील जमाव जाऊन गोखले याकडील लोकास कुमक करून बंडवाले याकडील लोकास माघारे घालविले हेविसीचे सविस्तर पेशजीचे विनंतीपत्री लिहिले आहे त्या अलीकडील वर्तमान तरी राजश्री बापूजी पंत गोखले याकडून पाटणकर म्हणोन सरदार साडेतीनस माणस बादेसी दोन-बरागा घेऊन कारस्थानीन फौजेस फाटा जाहाला त्याबराबर आम्ही बाद पडिलो तुम्ही लोक येविणार म्हणोन ऐकण्यात आले त्यावरून लोकसुध्धा आम्ही आलो तुम्ही येवीत नसल्यास कुटरे येथे रा।। यशवंत शामजी लोक ठेवीत आहेत त्याकडे जातो ऐसे बंडाकडे बोलणे घातले तेव्हा बंडवाले यानी पाटणकर यास सांगितले कीं गोखले याकडील लोकाबराबर एक लढाई देऊन येणे म्हणजे येऊ ऐसे सांगितल्यावरून पाटणकर लोक सुद्धा येऊन भोमवारी लढाई दिली आणि माघारे जाऊन लोक जखमी जाहाले व ठार पडिले त्याचे खर्चाचे व रोजमुरा द्याव म्हणोन बापया रामोसी व बालाजी हरि शेणवी व एक दोन मराटे सरदार ऐसे श्रींगापूर किल्ले प्रचीतगडानजीक आहे तेथे तळबेकरिता आडऊन बसविले आणि मौजे कुटरे येथे यशवंत शामजी होते त्यास अडिच्चन सूचना कलविली त्यानी सात आठशे पर्यंत जमाव घेऊन येऊन बापया रामोसी व बाळाजी हरि यास व त्याचा लेक व आणखी एक दोन असामी धरून वरकड लोक सुटोन रामोसी व सेणवी यास घेऊन कुटऱ्यास आले खुद बंडवाल्या व डंबल किल्यावर आहेत गोखले याकडील लोक येऊन बंडाकडील लोक लुटिले त्याचा पळ सुटला आहे गोखले याकडील लोक कुटऱ्याहून श्रंगारपुरावर मुकामास येऊन राहणार पुढे होईल वर्तमान ते मागाहून शेवेसी लेहून पाठवितो सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक १०१

तारीख २१-९-१८१७

श्री आईआदिपुरुष

रु. नं. २
अ. नं. ३९६
पो छ १३ माहे
जिल्काद सन समान
आशर मयातेन व अलफ

श्रीमन्महाराज राजेश्री

छत्रपति स्वामींचे शेवेसी

विनंती शेवक भगवंतराव आबाजी कृतानेक विज्ञापना विनंती तागायत छ ९ जिल्काद पर्यंत स्वामींचे कृपावलोकने करून शेवकाचे वर्तमान यथास्तित असे विशेष

स्वामीचे आज्ञापत्र म्हालोजी निक × व लक्ष्मण मोरे याजसमागमे सादर जाले तेथे आज्ञा जे आपणाकडील तालुक्यातील गावगन्नाचे लोक वगैरे बंडाकडे जाऊन मिलाले आहेत व आणिखी वरचेवर जात असतात म्हणोन गोखले याजकडील फौजेतील कारकून यानी गोखले यास पत्र पाटविले तेच पत्र गोखले यानी इंग्रज बहादर यास दाखविले आणि बंदोबस्त करावा म्हणोन हुजूरचे वकीलास सांगोन पत्र दिले ते पत्र व वकील यानी हुजूर विनंतीपत्र लेहून पाठविले कीं येविसीचा बंदोबस्त सत्वर व्हाव व त्याजवरून गोखले याचे पत्राची तालीक सादर जाहाली आहे तरी हुजुरे याचे विद्यमाने गावगन्नाचे लोक अगर कोण बंडाकडे गेले असतील त्याची चवकसी करवून त्याचे घरी चौक्या बसऊन कोण गेले असतील ते माघारे आणऊन बंदोबस्त करावा व याउपरी कोणी बंडाकडे जाऊ नये याप्रो गावगन्ना ताकीदी करवाव्या म्हणोन आज्ञा त्यास शेवकाकडील गावगन्ना पैकी घरंदाज बहुत करून कोणी बंडाकडे गेले नाहीत परंतु आज्ञापत्र सादर जाहाले त्याजवरून चवकसीस कारकून व लोक पाटवून चवकसी करवून बंदोबस्त करविला आहे व या उपरी बंडाकडे कोणी गेल्यास पारपत्ये करविले जाईल म्हणोन ताकीद करविली आहे बंडाचे मिलाफी सांपडतील त्याचे पारपत्यास सेवकाकडून दिरंग व्हावयाचा नाही गुदस्ता बंडाकडील मिलाफी सांपडले ते इकडील स्वारीचे लोक यानी धरून आणिले ते चीजबस्तसुद्धा गोखले यानी आपले हवाली करून घेतले व कांही सांपडले त्याची पारिपत्य इकडूनही जाहाली याजमुले साल मजकुरी बंडाकडे जाणेस दहशस्त आहे तथापि कोणी गेले असल्यास आज्ञेप्रमाणे बंदोबस्त करविला आहे
व साल मजकुरीही कोंकण प्रांती बंडवाले याजकडील लोक मोड पेसजी कसब संगमेश्वर येथे इकडील लोक याणी केला ऐसे असोन गोखले याजकडील कारकुनाची खात्री होतच नाही इकडील संस्थानावर आदावतीची लिहनी लेहून विनाकारणी प्रांताची खराबी करावी हा गोखले याजकडील कारकुनाची माणस येविसीची विनंतीपत्री लिहिता विस्तार आणिखी बंडा × × कडील वर्तमान होईल त्याची विनंती वरचेवर सेवेसी लिहोन पाठवितो सेवेसी श्रुत होय
हे विज्ञापना.

लेखांक १०२ तारीख २२–९–१८१७

श्री

रु. नं. ३
अ. नं. ६८९

पौ छ १२ माहे जिल्काद
सुासमान इशरे मैयातैन
व आलफ

श्रीमन्माहाराज राजश्री
छत्रपति स्वामीचे शेवेशी

विनंती शेवक भगवंतराव आबाजी कृतानेक विज्ञापणा विनंती तागायत छ १० जिल्काद पर्यंत स्वामीचे कृपावलोकान करून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष इकडील वर्तमान तरी गोखले निसबत जमाब कांहीं कुटरे येथे व कांहीं संगमेश्वरी आहे व इकडील जमाव संगमेश्वर येथे आहे बंडाकडील जमाव तीनचारशे पर्यंत आहे तो किल्यावर तेथून कोशी दोनकोशी शे दोनशे माणूस येऊन तलाव करून जातात वरघाटी गोखले याकडून जमाव होता तो किल्याखालेकडे म्हणोन गाव आहे तेथील बंडाच मेढा होता तो उधळून देऊन त्या मेढ्यात जाऊन बसले आहेत त्याजवर बंडाकडील लोकानी येक दोन वेल येऊन हुलड केली परंतु मेढा उठला नाही आलीकडे चौदिवसात निपाणीकडून शे दिडशे पर्यंत आरब लोक व पंधरा पर्यंत राऊत व पाच चार तटे व बैल परवालीच्या येणे प्रमाणे थेरगाव येथे वारणा उतरून आमणीच्या वाट्याने आल कुल भेडवडयावरून बंडाकडे गेले मलकापुरी दोनशे माणूस ठाण्यात इकडून आहे व आलीकडे येथून पनास माणूस व कारकून बंडाकडे कोण गेले त्याचे चौकशी करिता पाटविले आहेत त्यास कैक आमेनीचे पठाराने गेले असी बातमी समजताच पाठलागास गेले त्यानी ऊदगीरीपर्यंत पाठलाग केला परंतु चुकाचुक पडोन गांठ पडली नाही याप्रो वर्तमान आहे याऊपरी आधिकऊणे आढलेल ते शेवेशी विनंती लिहितो शेवेशी श्रुत होय हे विज्ञापणा.

तारीख २६-९-१८१७

लेखांक १०३

श्री

रु. नं. २

अ. नं. ३७२

राजमान्य राजेश्री मोरो बाजीराव चिटणिविस यासी आज्ञा केली ऐसीजे इकडील मजकुराची कलमबंदी बा। हु।

१ बावडेकर राजेश्री पंत आमात्य हे आज्ञेशिवाय वर्तणूक करू लागले सबब हुजूरून त्याजकडील सरंजामात ठाणे वलवन व बाघे रासीवडे या दोन्ही जाग्यास लोक पाटवून ठाणी हुजूरून घातली आहेत त्यास तेथे इंग्रज बहादर याजकडे आकबरीतून लिहिणे गेले असेल याजकरिता तुम्ही हा मजकूर बहादर याचे कानावर घालावा रामचंद्र सांवत भोसले आचरेकर नाईकवाडी त। साळसी याचे मजकुराविसी बहादर यानी यादी दिली ती यादी तुम्ही हुजूर पाठविली हुजूरून ती यादी व त्या मजकुराची आज्ञापत्रे देऊन हुजरे बावडेस पाठविले आहेत म्हणून तुम्हास पेशजी आज्ञापत्री आज्ञा जाहाली आहे त्यास आज्ञापत्रे व यादी देऊन हुजरे पाठवण्याचे होते परंतु बावडेकर याची वर्तणूक सरलपणाची दिसण्यात येईनासी जाहली सबब हुजरे व आज्ञापत्रे न पाठविता हुजूरने लोक पाटवून दोन्ही जाग्यास टाणी घातली आहेत पुढे बावडेकर याचा

बोलण्याचालण्याअंती समेट होईल त्यावेळेस रामचंद्र सांवत आचरेकर याचे मजकुराविसीचे यादीची चौकसी होऊन बाजवी असेल तसा बंदोबस्त होऊन तुम्हास आज्ञापत्री आज्ञा होईल तोपर्यंत हा जाबसाल चवकसी होणेची तहकूब राहिली आहे याप्रमाणे बहादर यास सविस्तर मजकूर समजून द्यावा म्हणजे ठीक पडेल.——— कलम १ बंड प्रकरणी गोखले यानी बाहादर याजकडे दिली होती ती यादी तुम्हाकडे बहादर यानी दिली तुमची यादी हुजूर पाठविले प्रो तीच यादी व विशालगडकरी राजश्री पंतप्रतिनिधी यासी आज्ञापत्रे देऊन हुजरे ठेविले होते त्याचे उत्तराचे विनंतीपत्र घेउन हुजरे आले त्याची तालीक तुम्हाकडे सादर जाहाली आहे तीच तालीक बाहादर यास वाचून दाखवावी म्हणजे समजणेत येईल.——— कलम येकूण कलमे दोन आज्ञे प्रमाणे बहादर यासी समजाऊंन देऊन विनंतीपत्री लिहून पाठविणे बातमी वर्तमान अधिक अगल काय असल तसे वरचेवर लिहून पाटवीत जाणे जाणिजे सुा समान आशर मयातेंन व आलफ रा। छ १४ माहे जिल्काद बहुत काय लिहिणे.

(मोर्तब)

लेखांक १०४ तारीख १२-१०-१८१७

श्री

रु. नं. २
अ. नं. ४०१

श्रीमन्माहाराज राजश्री
स्वामी स्वामीचे सेवेशी

विनंती शेवक शंकरराव शिंदे सेनाखासकील कृतानेक शेवेशी विज्ञापणा ऐसीजे ताा छ १ जिल्हेज पो स्वामीचे कृपावलोकन करून सेवकाचे वर्तमान येतास्थित असे प्रति विनंती इकडील मजकूर तर राजश्री नारायणराव रामदुर्गकर पुणीयाहून आले त्याचे पाटी——घेऊन येणार म्हणून पेशजी विनंती लिहिलीच आहे त्या आलीकड वर्तमान यादवाडचे मुकामास फौजेसह राजश्री बापू नारायण रामदुर्गकर याचे मावळे व्हावे ते त्याजबरोबर गोखल कडील काशीराव कोकरे आसै मिलोन आले आहेत जमाव हजार स्वार व दोन हजार पायेच आसै आहे आणखी वरचेवर जमावे ठेवितात सेजारी कलह प्राप्त जाहल रामदुर्गकरही जमाव ठेऊन घेऊन बदोबस्तान आहे बाहीरल्यानी नवी आन पुणीयाहून आणखी त्याचे सामिनेस तोफा वगैरे जमाव येणार म्हणे याप्रमाणे वर्तमान आहे स्वामीस निवेदनार्थ विनंती लिहिली आहे जमाव ठेवणेचे वर्तमान यैकून येथील उमेदवार स्वार वगैरे चाकरीस जातात याशिवाय पेशजीचे शिलेदारानी वाढीमुळे त्याचे प्रोःक्षम चालेना सबब तेही जातात आणि पुणेत कांहीं जमाव ठेवितात सिबेये इंग्रज

बहादर यानीही जमाव मिलवितात त्याचे वकील लिंगो भगवंत याचे पत्र कांही स्वार ठेऊन पाटवणेविसी सेवकास लि॥ होतें हे वर्तमान यैकून चिरंजीव राजश्री लक्ष्मणराव शिंदे व गिरधरराव शिंदे हे उभयता येथील वोढ सोसवेना सबब भाऊ म्हणतात त्यास आम्ही हुजूरचे सेवक दुसरकड जाता नये म्हणोन कितीप्रकार समजोन सांगितल आसता त्याचे चितास येत नाही परंतु गेल्यावर पुन्हा वरचेवर येणे कस होईल घर स्वाधीन जाहले आसे विचार आहे काल कठीन उपाये नाही यास काये आज्ञा होणे ते व्हावी स्वामीनी कृपाळु होऊन उभयता चिरंजीवास हुजूर आणऊन घेऊन कांहीं सरंजाम लाऊन देऊन सेवा घेणार स्वामी समर्थ आसा येथील तगादा कोठवर विनंती ल्याहवी याशिवाय निपाणकर खताचे यैवजा करता वरचेवर आठवण काढितात म्हणून वर्तमान आहे स्वामीस दोनचार वेल विनंती लिहिली परंतु खत सुटून येईना सेवठी गावच यैवज घेतलेले ते गेल पुन्हा किती यैवज देऊन चिठी घ्यावी हे तरी आज्ञा केल आसता आहे ते चालेना त्यात याही यैवजाचे निर्गम करून घेऊन चिठी घेणे प्राप्त चिठीची कालजी सेवकास आहे शरात्र कालजी लागली आहे काय होतो समजेना हरप्राप्त जाहलेले अनभवल पाहिजे सर्व विस्तार स्वामीचे चरणास निवेदन केले आहे स्वामीनी सर्वे पुरील × रक्षून बचावे करणार धनी समर्थ असा येविसी आधिकोत्तर विनंती लिहिणेस शक्त नाही हे विज्ञापणा.

लेखांक १०५ तारीख १२–१०–१८१७

श्री

व्यंकटेश प्रसन्न

रु. नं. २

अ. नं. ३९९

श्रीमंत चिरंजीव जीविताधिक आईसाहेब यासी प्रति शंकरराव शिंदे सेनाखासकील कृतानेक आशीरवाद विनंती येथील क्षेम ता। छ १ जिल्हेज पैा साहेबाचे कृपेकडून वर्तमान यथास्थित असे विशेष इकडील मजकूर रामदुर्गकरानी कल्हा वाडविलेले पेशजी विनंती लिहिलीच आहे त्यास हल्ली फौंजेजवळ यादवडच मुकामेस आले जमाव हजार स्वार व दोन हजार पायदळ आहे शिवाय वरचेवर जमाव ठेवितात हे वर्तमान ऐकूण येथील कदीम चाकरीचे शिलेदार व उमेदवार स्वार चाकरीस जातात याचे विस्तार हुजूरची विनंतीपत्री लिा आहे आणि पेशजी येथे येणेचे वहिवाट समजोन भेटीसही येणार त्याजवरून श्रुत होईल येथील तगादा अणीवार अगदी खर्च चालीना यास्तव चिरंजीव राजश्री × × शिंदे व गिरदरराव शिंदे हे उभयता पुणेस जमाव ठेवितात व शिवाय इंग्रजबहादर यानीही ठेवितात हे कळून जातात दिवस कठीण उपाय नाही प्रीतीप्रकार आम्ही सांगितली असता ऐकत नाही त्याच लक्षात हा

तगादा वगैरे समजोन येथ राहावयाचे होईना सबब जाणार यास्तव साहेबास निवेदनार्थ विनंती लिहिली असे गेल असता पुन्हा वरचेवर येणे कस होतो कधी प्रवास केल नाही आणि आम्ही हुजूरचे शेवक दुसरकडे जाता नये परंतु प्राप्त जाहालयावर अनभवले पाहिजे याजकरिता साहेबी कृपाळी होऊन उभयतास सरंजामकडील देऊन बाहीर न जाऊ देता ठेऊन वेऊन सेवा वेणार साहेब समर्थ असा येविसी विस्तारपूर्वक विनंती हुजूर लिहिल आहे काय ते आज्ञा निरूपिली पाहिजे निपाणीकराकडील खतही सुटून आल नाही चिठीची फार काळजी लागली आहे साहेबाकडून अर्जावर सोडवून देणेचे होईना पुढ यातील मजकूर कस करावयाचे ते आज्ञा व्हावी वरकड कित्येक मजकूर हुजूरसी विनंती पत्रावरून निवेदनात येईल शेवेसी श्रुत होय विशेष लिा शक्त नव्हे आसीरवाद..

लेखांक १०६ पै॥ तारीख १५-१०-१८१७

श्री

रु. नं. २
अ. नं. ३९८

पौ छ ४ माहे जिल्हेज सन
समान आशर मयातेन व
आलफ

श्रीमन्महाराज राजश्री छत्रपति
स्वामीचे शेवेसी

विनंती शेवक भगवंतराव आबाजी कृतानेक × × × स्वामीचे कृपावलोकने करून शेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष राजश्री बापूजीपंत गोखले याकडील रा यशवंत शामजी यानी बंडवाले याकडील बापया रामोसी व बाळाजी हरी शेणवी वगैरे धरून नेल्याचे वृत पेशजीचे विनंतीपत्री लेहून पाठविले आहे त्या अलीकडील मजकूर तर रामूसी धरिल्यापासून किल्याखाले कोंकण प्रांती बंडाकडील लोक राहिले नाही यशवंत × × × लोक किल्याखाले उतरून मौजे सोनवडे तर्फ संगमेश्वर येथे येऊन गावातील ब्राम्हणाची घरे लुटून ब्राम्हण स्त्री एक व दोन ब्राह्मण धरून किल्यावर नेले त्यापासून कोंकण प्रांती बंडाकडील उपसर्ग नाही येशवंत शामजी जमाव सुद्धा किल्या नजीक श्रृंगारपूर येथे येऊन राहिले आहेत जमाव पायदल बादेसी आठशेहे आहेत त्यानी गावगन्नाचे बोगारी पांचसेहे पर्यंत जमा करून किल्या नजीक अर्धकोशावर भात खले पर्यंत रान तोडून मोर्चे बसविले आहेत

शेवकाकडील दोनसेहे पायदळ त्याचे कुमकेस कोंकण प्रांती आहेत याप्रमाणे कोकणातील मजकूर आहे बंडवाले यानी वरघाटी मौजे केढ येथे मेढा घालून पांचशहे पर्यंत जमाव करून होते त्यावर गोखले याकडील रा गोपाळ जिवाजी घानवडकर चरण व

आरले येथून चालोन दोन टोव्या करून मेढ्यावर येऊन येक टोली पुढे करून लढाईचे तोंड लाविले त्या लोकाची व बंडवाले याचे लोकाची लढाई होऊन बंडवाले यानी गोखले याचे लोक माघारे घालून त्याचे पाटीस लागले तो दुसरी टोळी मेढ्यावर येऊन बंडाचा मेढा घेऊन पाठीवर बंडाचे लोक गेले त्यावर चालून जाऊन त्या लोकास × × आणखी बंडाचे लोक होते त्यास शिकस्त करून पनास साठ असामी पर्यंत जाग्यास ठार केले व जखमीही पांच पंचवीस करून घानवडकर मेढावर राहिले बंडाकडील लोक बाकी राहिले ते पळून गेले घानवडकर यानी मेढ येथून इकडील वारून महालचे गावावर स्वारी करून सिवारली जालली व मौजे चांदेळ व मौजे ढाकाले व मौजे निवले हे गाव लुटिले सेवकाकडील गावची खराबी बहुत जाहाली बंडाचे लोक किल्याखाले नाहीत किल्यावर सेपन्नास आहेत ऐसे वर्तमान आहे शेवकाकडील आडीचशे पायदल व स्वार बंडवाले याचे तोंडावर रवाना होऊन गेले आहेत व हाल्ली गोखले याजकडून कारकून राजश्री बाबाजी गोखले पांचसेहे स्वार व पांचशेहे पायदलानिसी चरणावर आले आहेत तेही बंडवाले याचे बंदोबस्ताकरिता मेढावर येणार म्हणोन बातमी आली आहे शेवेसी श्रुत होय ही विज्ञापना.

लेखांक १०७ तारीख २६-१०-१८१७

श्री

रु. नं. २

अ. नं. ४०२

समस्त सेनाधुरंदर विश्वासनिधी राजमाने राजेश्री राणोजीराव घोरपडे सेनापति यासी आज्ञा केली ऐसीजे आपणास सरंजामसुद्धा हुजूर येणेची आज्ञा जाहली असे तरी आज्ञ प्रमाणे हुजूर सरंजामसुद्धा निघोन याव येविषयी हुजूरून बावाजी गाईकवाड व रामजी भो हुजूरे पार्टाविल आहे यासमागमे निघोन येणेच करावे जाणिजे सुा समान आशर मयातेन व आलफ र॥ छ १५ माहे जिल्हेज बहुत लिहिणे तरी सूज्ञ असा-

लेखांक १०८ तारीख ७-११-१८१७

श्री

रु. नं. ३

अ. नं. ६९३

पौ छ ३० माहे जिल्हेज सुा समान आसेर मयातेन व आलफ

श्रीमन्माहाराज राजश्री छत्रपति स्वामी-

स्वामीचे चरण सेवेसी

विनंती शेवक आज्ञांकित मोरो गोविंद किले समानगड कृतानेक शेवेसी विनंती

विज्ञापना तागायत छ २७ माहे जिल्हेजपावेतो स्वामींचे कृपावलोकन करून किलाचे व सेवकाचे वर्तमान यथास्थित असे ऐसी विज्ञापना ऐसीजे निपाणीकर याजकडील स्वार व पायदळ पटणकुडी व खडकलाट येथ दोन हजार पर्यंत जमा जाहाले आहेत आणखी आपले तालुकेतील पायदळ वगैरे स्वार व लोक वरचेवरी जमा होत आहेत कोणीकडे जाणार येणार हे कांही वर्तमान समजत नाही आणि वंटमरी व चिकलदिनी व मौजे सुतकटे व बिरजहवेली व येमकणमुरडीत जमाव जाहाला आहे याजमुळे किल्ला नि।। मौजे नरेवाडी व मनवाड वगैरे दाहापांच खेडी धास्तीन गुली जाहाली आहेत गुदस्ता तेरणीकर देसाई यानी गाव खेडेची जाळपोळ करून खराबी केली याजमुळे गावकरास धीर भरवसा लागत नाही आणि किला नि।। तर्फ लिंगनूर येथील आणू देसाई परागंदा होऊन गेला आहे तो शाहापुराकड मौजे भादूरवाडीत जाऊन राहिला आहे त्यान हली काटक जमा केले आहेत लिंगणूर तर्फेत स्वारी शिकारीचा उपद्रव करून बखेडा करणार म्हणोन नित्य बातमी येत आहे त्याजमुळे तर्फ मजकुरची गावखेडी गडबडली आहेत तेरणीकरही लोक राऊत जमा करितात इकडे काटकी तालुका सिलसिला कांही तुटत नाही शेवेसी निवेदनार्थ बातमी वर्तमान विनंतीपत्री विनंती लिहिली आहे किले नि।। गावगनाचे लोक व देशक याजकडील लोक हुजूर पाटवणेविसी आज्ञापत्र सादर जाहाले त्यास किलाकडे सरीची जागा येथील गडकरी लोक हुजूर आले आहेत जागेस लोकाची पातली आहे शिवसेजारी नजीक गनीम आणि स्वारीशिकारीची दर-रोज आवयी येती यास्तव विनंती लिहिली आहे स्वामी कृपाळु होऊन राजश्री देवजी जाधव हुजरे व गडकरी लोक हुजूर आले आहेत त्यास आज्ञा होऊन जागेस पाटविणार कृपावंत धनी मायबाप समर्थ सालाबाद नेमणुकचे ऐवजाविसी गडकरी लोक येथ नित्य उपद्रव करीत आहेत सालगुदस्तापासोन किले मजकूरचे गडकरी लोकाचे पोटापाण्याची बहुत हलाखी आहे सविस्तर हुजरे व गडकरी लोक शेवेसी अर्ज करतील अर्ज निवेदनात आणोन आज्ञा करणार साहेब धनी समर्थ सालमजकुरी जागेस सर्व गोष्टीची गैरसोय आहे किल मजकुरी सरकार वाडेत नित्य कृत्याचा विचार न व्हाव तरी राजश्री आबाजी भोसले किला आले होत ते समयी सर्व मजकूर द्रिष्टीन पाहून गेले आहेत हुजूर अर्ज करतील त्याजवरून निवेदन होईल सेवक आज्ञांकित आहे आज्ञा होईल त्या अन्वय वर्तणूक करीन किलेवरी घस्त चवकी पाहारेचा बंदोबस्त करून सर्वत्र रात्रंदिवस जागेस सावधगिरीन आहा राजश्री अमृतराव खानवलकर हावलदार व सेवक दररोज रात्री येकवेळ किलेवरी घस्त करीत असतो प्रजन्यान सालमजकुरी दोन तीन ठिकाणी किल्ल्याचा तट पडला आहे त्या जागेस खाली व वरते चवकी ठेऊन बंदोबस्त केला आहे हुजरे व गडकरी लोकास आज्ञा होऊन जागेस पाटविणार साहेब धनी समर्थ कडसरीचा किला यास्तव विनंती लिहिली आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक १०९ तारीख ९-११-१८१७

श्री

रु. नं. २

अ. नं. ४०७

पौ छ १ माहे मोहरम
सु॥ समान आशर मयातेन
व आलफ

शेवेसी सखाराम बाजीराव किल्ले सोनगड कृतानेक विज्ञापना ता छ २९ माहेजिल्हेज पावेतो साहेबाचे कृपेकरून किले मजकूरच व शेवकाच वर्तमान यथोस्तित असे विज्ञापना ऐसीजे सांवताचे वाडीकडील बातमी वर्तमान फिरंगी याचा जमाव आहे तेथेच आहे अद्यापि कांही समजीचा विचार नाही सांवता निसबत जमाव व रेडीचे किलेस व जागोजाग आहे माणगाव येथे दोन आडीच × × भेऊन तेथतून पुढ पाटगाव म्हल निसबत × तीवर रोखा राजश्री तात्या कान सांवत याचे नांवे करून गोसावी यास आठ रुपये पीरखानी जकातीचे ऐवजी देणे म्हणून दोन असामी रोंज तिघस्ता पाटगावी आले आणि जकात कटेवर रोखा दिला त्याचे देणे नाहीतर रोखा माघारे देणे म्हणोन बसले नंतर जकायतदार याणी रोखा माघारा दिला आणि ते जावयास गेले मागती रोखापत्र करून पाटगाव तर्फेत खटला करावा ऐसे वर्तमान आहे आणखी बातमीस गडी पाटविले आहेत येताच सविस्तर विनंती लिहितो किले मजकुरी चौखी पाहारेचा व घाटमेटाचा बंदोबस्त करून लोक पाली गैरपालीच गडकरी व नामजाद जमवून रात्रंदिवस हुशारीन आहो शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक ११० तारीख १४-१२-१८१७

आईआदिपुरुष

रु. नं. ३

अ. नं. ६९७

छ ८ सफर समान आशर

श्रीमन्महाराज राजश्री छत्रपति स्वामीचे शेवेसी विनंती शेवक भगवंतराव आबाजी कृतानेक विज्ञापना विनंती तागायत छ ५ सफर पर्यंत स्वामीचे कृपावलोकने करून शेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष प्रचीतगडास बंडवाले आहेत त्याचे पारपत्याकरिता गोखले याकडून पेशजी राजश्री यशवंत शामजी आले त्याच्याने पारपत्याचा विचार होणे राहिला बंडाकडून प्रांतात उपसर्ग मनस्वी होऊ लागला याकरिता यशवंत शामजी यानी व पुणीयाहून वैद्य म्हणोन कारकून तहचे बोलण्यास × × यशवंत शामजी निसबत

बोलणारे व वैद्य जाऊन किल्या खाली सरंजामास गाव आहेत तितका वसूल घेऊन किल्यावर राहावे ऐसे बोलणे बोलिले नंतर बंडवाले यानी सांगितले की इतक्या सरंजामावर खर्चाची निभाबणी व्हावयाची नाही आणखी सरंजाम द्यावा त्यावरून एक महिना प्रांतात उपसर्ग करू नये किल्या खालील गावचा वसूल घेऊन राहावे महिन्यानंतर बोलणे ठरोन बंदोबस्त होईल ऐसा तह ठरोन बंडवाले याकडील कारकून रा। बाळाजी हरि व त्याचा मुलगा व मराठे पेशजी नेऊन कैद केले होते त्यास मोकले करून किल्यावर नेऊन स्वाधीन केले व गोखले याकडील कारकून बंडवाले यानी धरून नेला होता तोही स्वादीन गोखले याचे जाहला यशवंत शामजी आंब्या घाटाने चढोन जमावासुद्धा जाणार वरघाटी गोपाल जिवाजी आहेत त्यानी गावगन्ना उपसर्ग मनस्बी मांडिला आहे हे वर्तमान शेवेसी श्रुतच्च झालेच आहे मल्कापुरावर यावे ऐसे आवई आहे काय होईल त्याची विनंती लेहून पाटवितो इंग्रज बहादर यानी कोंकणातील किल्ले जलमार्गातून गलबते येऊन सुवर्णदूर्ग घेतला अंजन्यवेलीस चार गलबते व रत्नागिरीस च्यार गलबते याप्रा। आली आहेत ऐसे वर्तमान आहे बंडवाले याकडून शेवकाकडील प्रांतात उपसर्ग होणार ऐसी बातमी आहे शेवेशी मासे शरमाई सुमार २० पाठविले आहेत प्रविष्ट जाहालीयाचे आज्ञोतर द्याव्या आज्ञा करणार स्वाम धनी मायबाय समर्थ आहेत शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक १११

तारीख १८-१२-१८१७

श्री व्यंकटेश प्रसन्न

रु. नं. २

अ. नं. ४११

श्रीमंत चिरंजीव ————————————— आईसाहेब यासी प्रति शंकरराव शिंदे शेनाखासकील कृतानेक आसीर्वाद विनंती येथील क्षेम ता। छ ९ सफर पो साहेबाचे कृपेकडून वर्तमान यथास्थित असे विशेष साहेबी फतेमा।द याजबरोबर आज्ञापत्र सादर केलेत सुसमई प्रविष्ट होऊन परम संतोष जाहाला पत्री इंग्रजाकडे थैली देवून कारकून व हुजरे मागाऊन रवाना होतील तुम्ही आपले जागी बंदोबस्तीन आसोन वरचेवर विनंती पत्र पाटवीत असावी म्हणोन निरोप येत्यास हालीचे वर्तमान इंग्रजाचे ठाण उगरगोल पडले संवदती व नवलकुंद वगैरे फार हावलदिल्ह होऊन सत्वर आल आसता इकडून कोणी बरोबर देणारास देऊन पोहचऊन देऊ दिवसगत होऊ नये वरकड पोषाख व कारकून हुजरे वगैरे मागाऊन रवाना करणेचे करून पाटवावे तूर्त मात्र थैली व जासूद आला म्हणजे ठीक पडेल सुचेल ते साहेबास विनंती लिहिली असे आज्ञा करनार साहेब समर्थ असा विशेष लिहिण शक्त नव्हे वरकड बातमी वगैरे————हुजूरची विनंती पत्री लिहिली आहे त्याजवर————येईल सेवेसी श्रुत होय हे आसीरवाद.

लेखांक ११२ तारीख १८-१२-१८१७

श्री

रु. नं. २

अ. नं. ४१९

छ १२ सफर समान
आशर मयातेन व आलफ

श्रीमन्माहाराज राजश्री छत्रपति स्वामीचे
शेवेसी

विनंती सेवक शंकरराव सिंदे सेनाखासगील कृतानेक विज्ञापन्ग ऐसाजे ताा छ ९ सफर पावेतो स्वामीचे कृपेकडून शेवकाचे वर्तमान यथास्तित असे प्रति विनंती स्वामीनी कृपाळु होऊन फतेमााद याजबरोबर आज्ञापत्र सादर केले ते मस्तकी वंदोन सनाथ जाहल आज्ञापत्री आज्ञेने इंग्रजाकडे थैली व कारकून हुजूरे मागाहून रवाना होऊन मागाऊन येतील तुम्ही तुमचे जागी सावधगिरीने राहून वरचेवरी विनंती लि।। पाटवीत असाव म्हणोन आज्ञा त्यास सांप्रत त्याजकडील वर्तमान तर मेंडराल साहेब हे धारवाडास आहेत उगरगाल ठाण्यातले निपाणीकरानी उगरगोलाच सोडचिटी जाहाली म्हणोन मनोलीहून लोक जमाव होऊन ठाण घालवयास गेले होते परंतु गावकरानी ठाण न देता गोली मारून माघार लाऊन दिले नंतर गावकर धारवाडास जाऊन इंग्रज यास सांगून घेऊन त्याचे ठाणे घालविले गोखलेकडील संवदती व नवलगुंद वगैरे फार गडबडून × होत आहे दोचऊ रोजात नेऊन ठाणी घालणार म्हणोन दाट अवाई आहे तूर्त नवलगुंद तालुक पैा सिवली म्हणोन ठाणे घातले निपाणीला याचे तालुक पौा बेटनाळ वगैरे एक दोन खेडीची ठाण घालणेस येणार व येकंदर पडवेचे वगैरे तालुकेची तमाम ठाणी घालणार म्हणोन वदंता आहे मागाहून होईल तो आणखी विनंती लिहून पाठविते राजश्री लक्ष्मण सुदो हेबाळकर इंग्रजाकडे रुजू जाहाले आहेत त्याचे मिलणीत मिळवून लोक वगैरे जमा करितात नरगुंदावर राजकर्ते करणार असे वर्तमान आहे आशात हुजुरोन कारकून व हुजरे व पोषाखसंह येणेस अवकास असलेस तूर्त येक आज्ञापत्राची थेली एक जासुदा समागमे सत्वर पाटविणेस आज्ञा व्हावी म्हणजे इकडोन त्याजकडे रुो करणेस येईल मागाहून हुजरे कारकून व पोषाख वगैरे पाटविणार धणी समर्थ असा तूर्त इंग्रजाचे जमाव तर धारवाडावर कर्नाटकी या प्रांताचे लोक येक हजार व सोलासहे चेचेकरी व पंचेवीस गोरी व खुद मडरोन साा आहेत त्यापैकी कांहीं जमाव संवदती पलीकडे आमीनभात्रीस उतरले आहे तिकड बलारीकड च्यार पलटणे जमून इकडे

येत होते ते परभारे तिकड मठाकडें जाण्यास गेलें स्वामीस निवेदनार्थ तपसीलवार विनंती लिहिली आहे सत्वर जासूद व थैली रवाना करणार स्वामी धणी समर्थ असा शेवेसी श्रुत होय विशेष लिहिणे शक नव्हे हे विज्ञापना.

मु॥ माधवरावजी

सही मोडी

कारकून

लेखांक ११३

तारीख १९-१२-१८१७

श्री आईआदिपुरुष

रु. नं. ३

अ. नं. ६९९

पौ छ १३ सफर समान

आसर मयातैन

श्रीमन्माहाराज राजश्री— ———

————————छत्रपति स्वामीचे

सेवेशी————————————

विनंती शेवक भगवंतराव आबाजी कृतानेक विज्ञापणा विनंती ता॥ छ १० सफर पर्यंत स्वामीचे कृपावलोकने करून सेवकाचे वर्तमान यथास्थित आसे विशेष किले प्रचीतगड येथील बंडवाल्ये याचा व गोखले याकडील कारकून याचा तह होऊन रा॥ येशवंत शामजी जमावसुद्धा श्रृंगारपुराहून निघोन संगमेश्वर येथे आले आहेत बंडवाल्योयाकडील कारकून कैदेत होते त्याच्या बेडया तोडून मोकले केले परंतु किल्यावर पोचविले नाहीत व गोखले याकडील कारकून बंडवाल्ये याणी सोडिले नाहीत येशवंत शामजी याणी राजश्री प्रधानपंत याकडील सनदेशिवाय प्रांतात रोखे करून दर गावास शंभर दोनशे गाव पाहोन येवज घेत आहेत कोकणातून मा॥रनिल्हे लौकर जातात येसे नाही वरघाटी राजश्री गोपाल जिवाजी आहेत त्यानी गावगन्ना मनस्वी उपसर्ग मांडिला आहे आपराध रआपराध न पहाता डावी उजवी बहुत केली व आणखी करीत आहे इंग्रज बहादर याणी सुवर्णदुर्ग घेतला रत्नागिरी व आंजनवेल येथील किल्यास गल्बते येऊन समुद्राची पासये जोकून माघारे गेली शेवेशी नारळ कोवली शाहाली सुमार २ दोन पाटविली आहेत शेवेशी श्रुत होय हे विज्ञापणा.

लेखांक ११४ तारीख १०-१-१८१८

श्री

रु. नं. २

अ. नं. ४१६

श्रीमन्महाराज राजेश्री छत्रपति स्वामी

स्वामीचे शेवेसी

विनंती शेवक शंकरराव शिंदे सेनाखासकील कृतानेक विज्ञापना ऐसाजे ता छ २ राल पावेतो स्वामीचे कृपेकडून शेवकाचे वर्तमान यथास्तित असे प्रति विनंती अलीकडे इकडील वर्तमान तर इंग्रजकड रोजसाहेब यानी गदग डंबलास जाऊन ठाणी घातली राजश्री कासीराव कोकरे गोखलेकडून हजार दोन हजारानिसी बदामीस आहेत ते कुमकेस गेले होते परंतु याचे तोंडास न लागता माघार मोडून बदामीस आल इंग्रजाकडील बल्लारीहून आणखी जमावच येकेरी पांच सातसेहे व रिजमीचे व पांच साहा तोफा सु॥ येऊन मिळाल झाडून गोखलेचे तालुका ठाणी घातली संबधती मात्र अद्याप गोली उडती पेंडारी गोकाकचे मार्गावरून हजार दोन हजार सुमार मुरगोडास तालुकेस येऊन धांदल करीत फिरतात कोणीकडील हे इत्यार्थ समजत नाही पेशवेकडील म्हणोन बाजारी आवाई आहे हुजूरोन कारकून व थैली येणार होते परंतु अद्याप आल नाही सत्वर पाठविणार स्वामी धनी समर्थ असा हली रामदुर्ग-करानी शिवसेजार विनाकारण खटला मांडिला आहे तलीखूर व चोरास आश्रा देऊन तालुकेवर उपद्रव करितात शिवाय येथील पेटेचे कौलेही पाठवित आहे येविसी त्यास कागद पा आहे कौले सोडिलेस उत्तम नाही तर एक हात दाखविणेचे आहे स्वामीनी करून बंदोबस्त करणार स्वामी समर्थ आहा विशेष लिहिणे शक नव्हे हे विज्ञापना.

पो छ ६ रावल समान आशर

लेखांक ११५ तारीख १३-४-१८१८

श्री आई आदि पुरुष

रु. नं. २

अ. नं. ४२०

पौ छ ८ माहे जमा-
दिलाखर सन समान
आशेर मयातेन व आलफ

श्रीमन्महाराज राजश्री छत्रपति स्वामी
चे शेवेसी विनंती सेवक

भगवंतराव आबाजी कृतानेक विज्ञापना विनंती ता छ ६ जमादिलाखर पर्यंत स्वामीचे

कृपावलोकनेकरून शेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष किल्ले प्रचीतगड येथील बंडवाले खुद्द वरघाटी होते ते कोंकण प्रांती येऊन संगमेश्वरचे ठाणे घातले व हली कसबा लांजे येथील ठाणे घेतले आणि महालातील गावगन्ना ब्राह्मण थोर थोर धरून नेले आहेत व आणखी दररोज स्वाऱ्या पाळीन ब्राह्मण धरून नेतात व लुटून नेतात व खंडण्या घेण्याची स्थित ठेविली नाही राजेश्री प्रधानपंत याकडील चौदा हत्ती परली नजीक होते त्यास रखवाली इंग्रज बहादर याची होती ते हत्ती बंडवाले यानी आणिले त्याचे पाटलागास इंग्रज याकडील फौज येऊन काले हातातून हत्ती माघारे घेऊन गेलेवर बंडवाले + + यानी उपद्रव मनस्वी जाहला आहे चार हजार पर्यंत जमाव जाहला आहे गोखले नि॥ कारकून पारपत्याकरिता होते ते सिदाल्या पलीकडे आहेत याप्रमाणे बातमीचे वृत आहे शेवेसी निवेदनार्थ विनंती शेवेसी पोफले सुमार पंचवीस पाटविली आहेत प्रविष्ट जाहलीयाचे आज्ञोतर

२५

द्याव्या आज्ञा जाहाली पाहिजे बंडवाले रत्नागिरी घेणार ऐसी अवई आहे कोंकण प्रांती वस्ती व्हावयाची राहिली प्रां उज्याड जाला सेवकाकडील एकतर्फी अमलातीलही गावगन्ना सिलसीला एकदोन रोजात लावाव ऐसे केले आहे परंतु स्वामीचे कृपे करून होईल ते खरे शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक ११६ तारीख १८–४–१८१८

श्री

रु. नं. २

अ. नं. ४२५

समस्त सेनाधुरंदर विश्वासनिधी राजमान्य राजश्री राणोजीराव घोरपडे सेनापति यास आज्ञा केली ऐसीजे आपणास सरंजामसुधा हुजूर येणेची आज्ञा होऊन केदारजी यादव हुजरे व बापू सिंदा हुजरे पाठविले आहे तरी आज्ञेप्रमाणे आज्ञापत्र सादर होते क्षणी सत्वर सरंजामसुद्धा हुजूर करवीरचे मुकामी यावयाचे करावे जाणिजे सु॥ समान आशर मयातेन व अलफ रा छ ११ माहे जमादिलाखर बहुत लिहिणे तरीख सुज्ञ–

लेखांक ११७ तारीख १५–६–१८१८

श्रीरामचंद्र

अ. नं. २६२

पौ छ १५ शोवाल
तिसा आशर मयातैन व अलफ
श्रि यासह चिरंजीव बहिनी यासी आसीरवाद उपरी येतील वृत

ता जेष्ठ शु॥ ११ पर्यंत मुकाम धारवाड येथे येथास्थित आसे विशेष काल रविवारी येकादसीस इंग्रज बाहादर याकडे जाणे जाले होते च्यार घटकापर्यंत बहुतेक बोलणी जाली त्यात बोलले जे माहाराजाचे दोन्ही तालुके द्यावयाचे ठरले आहेत त्यास तहान-प्रमाणे काम उलगडून देतो परंतु निपाणकराने पंचवीस तीस गाव आपले वतनाचे म्हणोन ठेऊन घेतले आहेत त्याची दर्याफ्ती करून त्याचे मामल जे आसतील ते त्याजकडे राहून बाकी फैसला करून देवितो ऐसे बोलिले आणि त्याणी माहितगारी विच्यारिली त्याजवरुन जबानीवरूनही समजोन द्यावयाचे तैसे दिल्हे व जिवाजी भोसले याचेवेळेस तह जाहला आहे तो तहच काहाडून समक्ष दाखविला त्यात नंदीकराचे वतनाचे कलम होते त्याजवरूनही समजाविले त्याजवर राजश्री लक्ष्मणराव नि॥ बाहादर यासी बाहादर याणी सांगितले जे राजश्री आपाजी लक्ष्मण बरोबर आहेत त्यास ताकीद करून त्याज-कडील कागदपत्र वगैरे काय आहेत ते आणवावे व इकडीलही कागदपत्र घेऊन दोहीचा मुकाबला करावा व तालुकेतील वगैरेही ठिकाणी या गोष्टीचा शोध करून दर्याफ्ती करून मजला समजवावे व जे त्याजकडे जी गावे आहेत त्याची जप्ती करावी याजप्रमाणे त्यास सांगून आम्हास सांगितले कीं उदईक कूच होऊन + + वरी जात आहो तेथे छयावणीस रहात आहो तेथे म्हणजे निपाणकराकडील वतनाची दर्याफ्ती करून आदी सारा फैसला करून देतो या कामासिवाय दुसरे काम हाती धरीत नाही चार रोज आपले कामात आसून उलगडा करून देतो याजप्रमाणे बोलले व दुसरे बोलणे बोलले जे माहाराज याचे तालुकेचे वसुलाचा यैवज निपाणकर याजकडून येणे त्यास हाली ते तालुके माहराज याजकडे आले तेपक्षी जो ऐवज पावला तो पावला येथून जो ऐवज बाकी येणे राहिला तो मागू नये याची पावती कुंपणीस द्यावी याजप्रमाणे बोलले त्याजवर त्यास संतोष वाटे याजप्रमाणे बोलण्याचे ते बोलून सेवट उतर जाले जे जैसी मर्जी आसेल तैसेच करावयास येईल याजप्रमाणे बोलणे होऊन स्वारी ठिकाणास आली सोडचिट्या घेते समई ऐवजाची व ती दिल्ही पाहिजे आज कूच होऊन हुबली मुकामी जात आहेत स्वारीही होत आहे तेथे गेलेवर जसजसी बोलणी होतील तैसे तैसे वरचेवर लिहिणेत येत जातील खर्चव्यचाची तारांबला बहुत याजमुले भलेलोक व पागा व बंदुखबारदार पायेचे लोक व कारखानेचे लोक याचा गवगवा बहुत पडला याजकरिता राजश्री सभापति मोदलीयार याजकडून पाच हजार रुपये कर्ज घेऊन चिठी लिहून दिल्ही येविसीचा मा॥र चिरंजीव राजश्री बलवंत रावजी याचे पत्रावरून कलेल लस्करात हुकेरी प्रांती दरवडा पडला व हाली धारवाड मुकामी दोन घोडी चोरीस गेली याजमुले बेरड्याचे तलसात आहात व जागा जागा शोध करीत आहेत व आम्हासीही बोलणेत येत आहे त्यास येविसीचा बंदोबस्त होऊन पारपत्य जेथे जेथे आसतील तेथे शोधना (मात्र) व्हावा नाहीपेक्षा त्याच्या बातम्या आतून बाहेरून फिरत आहेत आणि या लोकास चीड बहुत आहे व ते वरचेवर बोलतही आहेत त्यास येविसी बंदोबस्त चांगला व्हावा नाहीपेक्षा या गोष्टीने दोष येऊन दोस्तीत खलेल पडेल याकरिता लिहिले आहे यात आपले युक्तीस येईल

तैसे व्हावे श्री स्वामी याजकडील कारकून लस्कर मुकामी येऊन पेशजी पासून जैसा मा।र जाला तैसा समजोन दिल्हा व सोलापूर येथील मामलदार याजकडील येथे कोणी आहेत याजकडोनही समजोन देविला त्याजवरून बाहादर यास सविस्तर समजले त्याजवरून लिहिले आहे तरी काये यैवज घेतला असेल तो माघारे देऊन ज्यात श्री स्वामीचा संतोष राहे ते करावे सरकारचे तालुकेत ब्राह्मणाचा प्रतिपाल बहुत होत आहे याज-प्रमाणे वरचेवर बोलत आहो हे संवस्थान देवब्राह्मणाचे असे बोलनेतही येत आहे त्यास संवस्थानास उपद्रव होतात व यास लोभ आहे ऐसे दिसते त्या + ती गोष्ट सहसा करू नये याज प्रमाणे होऊन बंदोबस्त + + (व्हावा) वरकड सविस्तर मा।र रावजीनी लिहिला आहे त्यावरून कलेल बहुत काय लिहिणे हे आसीर्वाद.

लेखांक ११८ तारीख १८–६–१८१८

श्री

रु. नं. २

अ. नं. ४२४

राजश्री बालाजी बाजीराव व मोरो बाजीराव चिटणवीस यासी आज्ञा केली ऐसीजे चिकोडी व मनोली तालुकेतील जहागीरदार व इनामदार वंटमुरीकर व नणंदीकर व नेरलीकर वगैरे देशक व देशपांडे व फूट इनामदार व दुमाले गाव यासुद्धा सोडचिठ्या घेऊन हुजूर येणे नंतर तीर्थरूप श्रीमन्महाराज मातोश्री साहेब यासी निवेदन करून आज्ञा होईल त्या अन्वये बोलणे करावयाची तसी घेऊन आज्ञा होईल त्या प्रमाणे करावयासी येईल परभारे तुम्हाकड कोणी यातील बोलणेस आलेस हुजूर करवीरास जाऊन अर्ज करून आज्ञा होईल त्याप्रमाणे करावयासी गेईल म्हणोन सांगणे तैसेच कागल तालुकेविषी बाहादर यासी बोलोन त्याचीही ठाणी घालावयाचा रुकार बहादरा घेऊन हुजूर विनंतीपत्री लिहून पाठवणे सोडचिठ्या घ्याल त्याजबरोबर चपरासी घेणे म्हणजे फिरोन लडा पडणार नाही जाणिजे सुा तिसा आशर मयातेन व आलफ रा। छ १३ शाबान बहुत काय लिहिणे.

लेखांक ११९ तारीख १८–६–१८१८

श्री रामचंद्र

पौ छ १९ माहे शाबान

सु।। तिसा आसेर

श्रियासह चिरंजीव विजईभव राजश्री राजे आबासाहेब छत्रपति व चिरंजीव विजईभव राजश्री राजेबाबासाहेब छत्रपति यासी अनेक आसीर्वाद उपरी येथील क्षेम तागायेत छ १३ माहे शाबान रोज गुरुवार पर्यंत सकलवृत्त येथास्थित असे विशेष आजम जर्नेल तामस

मं(ड रो) + + लबाहादर याचें फौजेचें कूच निपाणीहून होऊन मौजे बारगल येथे मुकामास आले तेथे रात्री फौजेत दरवडा पडून लस्करची चीजबस्त व घोडी वगैरे यैवज गेला त्याजवरून मंडरोल बाहादर याणी येथून पुणेस इनग्रेज मोट ईष्टवारीट इलफीसतन बाहादर यासी व सातारेस आजम ग्रांटबाहादर यासी पत्रे लेहून पाठविली त्यावरून ग्रांट बाहादर याणी तमाम प्रांतात चोर मांग रामोसी बेरड याच्या शोधास जासूद जोडया व बारवाले चोरपालतीने रवाना केले त्याणी शोध करीत करीत हुजूरचे तालुकेत गेले त्यास मौजे रुकडी व टाकवडे व ठाणे आकीवाट येथे म्हार मांग बेरड रामोसी आहेत हे कर्मे करीत असतात हे त्याणी पता शोध लाऊन आपले द्रिष्टीने पाहून पता लावीत लावीत दरवडेपैकी घोडा लस्करचा गेला तो चोराने नेऊन किले समानगडाखाली जाऊन चोर घोडासुधा राहिला होता चोराने गडकरी यासी सांगितले जे घोडासुधा आम्हास किलेवर राहणेस जागा देणे त्याजवरून समानगडकरी याणी चोरास उतर केले जे हा घोडा इंग्रजबाहादर याच्या लस्करचा दिसतो येथे राहणेचे कारण नाही निघून जाणे याप्रमाणे गडकरी याणी चोरास सांगून घोडासुधा लाऊन दिल्हा त्याचे बातमीस बाहादर याजकडील त्याचे पाठीवर होते त्याणी हा पता लाऊन येथे लस्करात येऊन मंडरोल बाहादर याचे कानावर घातले त्याजवरोन ग्रांट बाहादर याणी येथे मंडरोल बाहादर यासी लिहिले जे हुजूरचे तालुकेत ठाणे आकीवाट व रुकडी व टाकवडे वगैरे ठिकाणी म्हार मांग बेरड रामोसी हली आहेत त्यास तेथील बंदोबस्त करून चोराची पारपत्ये करावी याप्रमाणे लिहिले सातारेची व सा + + गडची बातमी यैसी येकंदरच काल मंडरोल बाहादर याजपासी आली त्यास इकडून राजश्री सदासीव आ + व नारो गिरमाजी बोलणेस गेले होते त्याजवल मंडरोलबाहादर याणी सांगितले जे लस्करात दरवडा पडला त्यापैकी घोडयाचा पता सामानगडास लागला आहे त्यास आमचा घोडा तुम्हास समजले असता तुम्ही त्यास अटकाव करून आम्हास इसारा करावा ते न करिता चोरासुधा घोडा लाऊन दिल्हा त्यापेक्षा चोर घोडासुधा आमचे हावाली व्हावा ठाणे आकीवाट व रुकडी व टाकवडे वगैरे हुजूरचे तालुकेत चोर म्हार मांग बेरड रामोसी बहुत आहेत येविसी ग्रांट बाहादर याची लिहिणी आली आहेत त्याप्रमाणे आम्हास बंदोबस्त जरूर करावा लागेल परंतु दोस्तीची जागा जाणून येकवेला इसारा केला आहे याउपरी बंदोबस्त होऊन म्हार मांग बेरड चोर कोण आसतील त्याची पारपत्ये होऊन राज्यात येक असू नये याप्रमाणे आधी बंदबस्त करावा हे न जाहले पेक्षा इकडून पलटणचे लोक रवाना होऊन ज्या ज्या ठिकाणी मांग बेरड रामोसी आसतील त्याची पारपत्ये करून त्या ठिकाणी आम्ही ठाणी घालू ते ठाणे कधीही सुटणार नाही हे जाणून आधी बंदोबस्त करावा हे उतम न जाहलेस आम्ही बोलिलो प्रमाणे करीतच आहो याचे उतर काय ते सांगावे म्हणून मंडरोल बाहादर बोलिले त्याजवरून हे बोलिले जे आम्ही हुजूर लेहून पाठवून बंदोबस्त करवितो तेव्हा ते बोलिले जे या गोष्टीस बहुत दिवस लागू नये आठरोजाचे आत बंदोबस्त होऊन उत्तर कलवावे याप्रमाणे बोलणे होऊन

बिराडास उभयेता आले त्याणी हा सविस्तर मजकूर सदरी लिहिले आन्वये सांगितला त्याजवरून हे पत्र आपणास लेहून उभयेताबरोबर लस्करात जासूद गेले होते त्याणी हा मजकूर पाहिलाच आहे तेच जासूद व राजश्री सो + + जाधव हुजरे यैसे पाठविले आहेत सविस्तर आपणास सांगतील याजवरोन कलो येईल त्यास सामानगडास आमच पत्र हुजरे समागमे पाठऊन देऊन चोरसुधा घोडा आसेल तेथे ठिकाणी लाऊन आणून पाठवून द्यावा पता लाऊन तुमचे हातास नच पडे आसे आसिलेस पता पका खरा लाऊन लेहून पाठवावे व ठाणे आकीवाट व टाकवडे व रुकडी वगैरे गावगना हुजूरचे तालुकेत चोर म्हार मांग बेरड रामोसी आसतील त्याची पारपत्ये दरोब्रस्त तालुकेत शोध करून कोणाची रुरया न धरिता करावी हे उतम येविसीचे सोनजी जाधव हुजरे याजबराबर आतील सविस्तर पर्याय सांगून पा आहेत व त्याणीही समक्ष पाहिलेच आहे ते सांगितील त्याजप्रमाणे बंदोबस्त होऊन हुजूरने बंदोबस्त जाहला यैसी लिहिणी आकबारीची पुणेस व सातारेस व येथे यावीत अशा बंदोब्रस्त जाहला पाहिजे म्हणजे ठीक पडेल नाहीपेक्षा त्याणी बोलिले आहेत त्या प्रमाणे पलटणचे लोक जाऊन जेथे चोर म्हार मांग बरड निघतील त्याची पारपत्ये करून तेथे ठाणी घालतील मग गोष्ट आवरणार नाही सिबंदीचे लोकात चाकरीस म्हणूनदेखील आसू नयेत हे पत्र आम्ही आपणास लिहिले याचे उतर बंदोबस्त न होता उडवाउडवी करून लिहिले आथवा दिवसगतीवर घालविलेस निर्वाह + + आसा आर्थ नाही दोस्तीत आंतर पडून गोष्ट जाती याचा शेब्द आम्हाकडेस नाही नाजूक + +
विपर्यासास पडली जाणून सोनजी जाधव हुजऱ्या मुदाम पाठविले आहेत त्यास पत्र पावतेक्षणी + चा बंदोबस्त व्हावा चोर मांग म्हार बेरड याचा +
षय लाहन सरकारचा बदनक्ष होऊन दौलती + + पाय होतो याजकरिता चाकरलोकाची व + + + + ही भीड न धरिता लिहिले प्रमाणे बंदोबस्त केला पाहिजे तरी परिणाम नाहीपेक्षा दौल्तीस आपाय आहे याणी आठरोजाची मुदत केली आहे यात बंदोबस्त होऊन उतर यावे तमाम हुजूरचे तालुकेत कलावे कारकून रवाना होऊन चोर म्हार मांग बेरड रामोसी जेथे आसतील त्यासी धरून पारिपत्य करीत जावी याजप्रमाणे हुजूरून करावे आजचे (समई) कोणाचा मुलाजा न राखता चोर म्हार मांग बेरड रामोसी जेथे आसतील
+ + +
त्याची पारपत्ये लागलीच + + त जावीत मंडरोल बाहादर याजकडील राजश्री
(करी)
रंग + + मुनसी याणी हातचिठी पाठविली तीच बजिनस आपणाकडे पाहावयासी पाठविली आहे त्याजवरून + + + येविसी चिरंजीव राजश्री बालाजीपंत नातू + + + चे मुकामी सांगितले जे हुजूरचे तालुकेत मांग बेरड दरवडेकरी व दावेकरी याचा बोभाट हा + + आलफीष्टीन बाहादर व ग्रांटबाहादर याजपासी

पडत आहेत यास येविसीचा बंदोबस्त आधी व्हावा न जाहालेस दोस्तीत खलेल पडेल: यैसे घरोबेच्या रीतीने वगैरे बहुतेक प्रकारे बोलिलो तो मजकूर आम्ही तेथे आलेवर समक्ष सांगू म्हणून पत्री लिहिले नव्हते त्याचा हाली आनभव सत्वरच आला येविसी सोंनजी जाधव हुजरे यासी समक्ष नातू याणी हुजूर सांगावे म्हणून सांगितले होते तो मजकूर हली सोनजी जाधव सांगता कलो येईल याचा बंदोबस्त आती सत्वर लिहिले प्रमाणे आधी करून नंतरी मग दुसरा उद्योग करावा काजकामाचा मजकूर तरी पेशजी आपणास लेहून पाठविलाच आहे त्याजवरून कलो आले असेल दोही तालुकेचे देहे झाडे त्यास दाखऊन त्याच्या नकला त्याजकडे दिल्या आहेत जिकीर म्हणून कांहीं नाही सतावीस गाव निपाणकर याणी आपले इनाम लेहून दिल्हे आहेत त्याची मात्र जिकर आहे त्याणी निपाणकर याजकडील आपाजी लक्ष्मण यासी बोलाऊन आणून ताकीद केली कीं पुरातन तुमचे वतनदारीचे गाव किती आहेत त्याचा दाखला पुरवावा त्याजवर त्याणी उतर केले कीं मला याची माहिती नाही निपाणीस लेहून + येऊन कारकून माहितगार आणवितो याप्रमाणे त्याणी उतर केले त्याजवर आमचे बोलणे पडले जे मूल साहा गावे त्याजकडे आहेत ती चालवावी बाकी जाबसाल उलगडून द्यावा याप्रमाणे बोलिले त्याजवर बाहादर याणी उतर केले जे त्याजकडे यामागे काय गाव आसतील तेच चालतील याप्रो बोलिले आ + + आपणास कलावे याहून मजकूर होईल तो आपणास लेहून पाठवू येथे खर्चाची बहुत आडचण पडली तेव्हा राजश्री सभापती मोदलियार याजकडून पाच हाजार रुपये चांदवडी आकुसी कोरे घेतले त्यासी करार केला जे तुम्हास हुजूरचे आज्ञापत्र आणून देतो या प्रो करार करून यैवज घेतला आहे त्यास आज्ञापत्र सभापती याचे नांवे पाठवावे जे तुम्हाकडून श्री नी सरकार खर्चाबदल पाच हजार रुपये चांदवडी आकुसी कोरे कर्जी घेतले आहेत त्याचा उलगडा हुजरून करून दिल्हा जाईल याप्रो आज्ञापत्र पाठऊन द्यावे म्हणजे यासी द्यावयासी येईल किले पनाला येथील पेटत रामोसी रखवालीकरिता चाकरीस ठेविले आहेत त्यास-देखील चाकरीस ठेऊ नयेत हुजूरचे तालुकेत दरवडा पडल्यास त्याचा पता आम्ही लाऊन जे दरवडे घालतील त्याजकडून भरून देऊ परंतु चोर मांग बेरड रामोसी हे चाकरीस ठेऊ नयेत यैसे त्याचे म्हणेत आहे कागल प्रांतातून मौजे निगवे येथून + व बिडावरी जाहाला त्याजविसीचा मजकूर येथे (बोलि) लो त्यास याणी उतर केले जे

\+ +

आधी तुमचे तालुकेत चोर मांग बेरड रामोसी आहेत त्याचा बंदोबस्त करावा नंतरी आम्ही कागल तालुकेतील बंदोबस्त करितो याप्रो बोलितात त्यास इतर किलेचे पेटेत वगैरे गावगना रामोसी व मांग बेरड कांहीं येक चाकरीस ठेऊ नयेत जेथे सांपडतील तेथे पारपत्ये करीत जावी याप्रमाणे बोलणेत येऊन ठरले आहे त्याजप्रमाणे हुजरून बंदोबस्त व्हावा वरकड मजकूर सतावीस गावचा वगैरे याची बोलणी येथे पडली आहेत त्याज-विसीचा मजकूर चिरंजीव राजश्री बलवंतराव चिटणीस याणी आपणास लिहिला आहे

त्याजवरून कलो येईल * आपण सर्वे गोष्टीविसी मागाहून पुरवणी लिालीच आसो आता तरी इकडून लिहिणी येतात त्याची हैगाई न होता त्याप्रा सर्व होत आसावे नाहीतरी इकडे शब्द नाही लिहिणे येईल त्याप्रा घडलेस सर्व यथास्थित आहे. बहुत काय लिहिणे हे आसीर्वाद.

....

लेखांक १२० तारीख १९-६-१८१८

श्री

अ. नं. २५८

राजमान्य राजश्री बालाजी बाजीराव व मोरो बाजीराव चिटणीवीस यासी आज्ञा केली यैसीजे स्वामीचे सेवेसी तुम्ही विनंती पत्र पाठविल ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ निवेदन जाहाला जिवाजी जासूद यासमागमे आज्ञापत्रे सादर जाहली ती काली पौर्णिमेस गुरुवारी हुबलीचे मुकामास येऊन पोहचली तेथे आज्ञा जे चिकोडी व मनोली या दोनी तालुकेतील जमेदार व ज्याहागीरदार याच्या सोडचिठ्या तालुकेबरोबर होतील परंतु त्याची बोलणी तेथे इंग्रज बाहादर याजकडून पडल्येस साफ उतर करावे कीं जी बोलणी होणे ती हुजूरने होतील तुम्ही बोलू नये यैसे उतर करावे व तुम्हाकडूनही कोणाची बोलणी पडू नयेत ऐसी आज्ञा जाहाली ती सिरसा येविसीची विनंती तीर्थरूप श्रीमन्महाराज मातुश्री साहेब याचे सेवेसी विनंती लिहिली आहे त्यावरून निवेदनांत येईल म्हणोन विनंती पत्री लिहिले ते निवेदन जाहाले सोलापुरास राजश्री नीलंकठ कालो बाहादराकडील आहेत त्यास + (च) कती पेशजी आलेली तुम्हाबरोबर रुमालतून गेली होती ती चकती हुजूर पाठविली ती येऊन प्रविष्ट जाहाली वरकड मजकूर तीर्थरूप श्रीमन्माहाराज मातुश्री + + + + आज्ञापत्री आज्ञा केली आहे + + + + + + सु॥ तिसा आशर मयातैन + + + + + +

लेखांक १२१ तारीख २०-६-१८१८

श्री

रु. नं. २

अ. नं. ३७७

जाहीरनामा सरकार दौलत मदार कंपणी इंग्रज बाहादर सु॥ तिसा आशर मयातेन व अलफ तमामलोकास जाहीर व्हावयाकरिता जाहीरनामा लिहिला जातो जे बाजीराव-

* येथून पुढील मजकूर निराळे वळणाचा. बहुतेक लेखकाचे हस्ताक्षरांत असावा. लेखक "श्री" = भाऊ महाराज.

साहेब यानी जनराल माल्कम साहेब बहादूर यासी जाबसाल ठरविला कीं जातीचे वगैरे खर्चास नख्त कंपणी सरकारातून दरमाहा घेऊन येकजाग्यास राहावे राज्यासी दावा ठेवणार नाही याप्रमाणे करार करून भेट घेऊन ज्यास जवल ठेवावयाचे त्यासी ठेऊन बाकी लोकास कंपणी सरकारची दस्तके देऊन रुकसती केले हे वर्तमान सर्वास समजोन बाजीराव साहेब याजकडील इलाखा बिलकूल सोडून देऊन कंपणी सरकारासी रुजू राहावे जे कोणी रुजू न राहातील व फंदफितूर करतील ते बंड असे समजोन त्याचे पारपत्य होऊन प्राणानिसी जातील तेरीख छ. २० माहे जून सन इसवी मुताबिक छ १५ साबान बमोजीबहुकूम इलफीसीतन साहेब बहादूर.

लेखांक १२२ तारीख ७–७–१८१८

श्री

रु. नं. २

अ. नं. ३३९

श्रीमन्हाराज राजश्री छत्रपति स्वामींचे शेवेसी

विनंती सेवक बालाजी बाजीराव कृतानेक शेवेसी विज्ञापना तागायत छ २ माहे रमजान रोज भोमवार मुकाम हुबली येथे स्वामीचे कृपावलोकने करून शेवकाचे वर्तमान यथास्तित असे शेवेशी विज्ञापना ऐसीजे स्वामींनी कृपाळु होऊन सोनजी जाधव हुजरे याजबरोबर व मागाहून दुसरे जासूद जोडीबरोबर ऐसी आज्ञापत्रे सादर केली ती मस्तकी वंदून सनाथ जाहालो आज्ञापत्री आज्ञाजे चोराचा बंदोबस्तास हुजूरने कारकून व लोक रवाना होऊन बंदोबस्त चालला आहे व मौज मा।र येथील राम्या माहार जमेतसुद्धा धरून हुजूर आणिला आहे म्हणोन आज्ञापत्री आज्ञा जाहाली ती सरकार व आपण चोराचा बंदोबस्त यथास्तित जाहाला म्हणजे या इंग्रजी सरदारास बहुत कुसी आहे काजकामाचा मजकूर तरी चिकोडी तालुकेच्या सोडचिट्या द्यावे याच्या तलासी निपाणकरानी इनामी म्हणोन सतावीस गाव राखिले आहेत त्याचे बोलणेस राजश्री लिंगोपंत येथे आले आहेत व पहिले नरहर पंत आलेले होत उभयता या बोलणेस आले आहेत तेव्हा सतावीस गावची रुजवात अमर चौकसी होणेचा क्रम चालवतो चिकोडीहून अमलदाराचे पत्र बाहादरास आले कीं सतावीस गावात ठाणी घालणेस लोक होत त्यानी कांही ठाणी घातली कांही घालीत असता मौज आळत येथे निपाणीकराकडील आरब होते त्यानी आा लोक इंग्रजाकडील जंबयाने ठार मारिले याप्रमाणे बहादर यानी पत्र पावताच लिंगोपंत व नरहरपंत यास पाटवून देऊन पाहारेत बसविले ते प्रातःकाल पासून प्रहर पाहरा तैसाच होता नंतर राजश्री लक्ष्मणराव व नजापा कारभारी याजकडोन रद्दबाद्दल करवून पाहारा उटविला तेसमयी करार करवून घेतला कीं अरब लोकानी आमचे लोकास मारिले आहे ते लोक व त्या गावचा कादार ऐसे लस्करात आणून चवकसी व्हावी

लोकानी निपाणकराच्या हुकमाशिवाय केले असे जाहलेस निपाणकराचे फौजेतून असे जालेस याचा जाबसाल निपाणेकराने करून द्यावा ऐसे ठराऊन नंतर पाहारा उटवून मोकले केले त्याजवरी सत्तावीस गावचे बोलणेचा नेट बहादरानी बेजरब उभयतास बसवून त्याची आमची चौकशीची दर्यांप्त अजी चाररोज चालली आहे सत्तावीस गावा पैकी सतरा गाव सुटतील ऐसे बाकी दाहा गावाची जिकीर पडोन बोलणे चालले आहे दाहा गावची जिकीर उटून फैसला जाला म्हणजे सतावीस गावे मोकले होतात याप्रमाणे अदमास आहे हा फैसला करून देऊन एकंदर सोडचिटया द्याव्या किंवा सत्तावीस गावचा दर्यांप्त ठेऊन बाकीच्या सोडचिटया द्याव्या परंतु सत्तावीस गाव जिकरीत टाकले असता पाठीवरी म्हणोन लवकर उलगडा होणार नाही याजकरिता तुमचे विचारास कसे येत हे बहादराकडोन बोलण्यात निघाल्यावरी इकडोन उत्तर जाले कीं सतावीस गावचा फैसला बाहादरानी करार करून देऊन साराच जाबसाल उलघडोन दिलेस फार चांगले आहे त्याप्रमाणे उत्तर जालेवरून त्यानी ह्या जाबसालची मोहसबा करून चवकसी चालली आहे असे चार रोज अधिक लागले तरी चिंता नाही परंतु पुन्हा हे बोलणे राखून ठेऊ नये हे जाणोन सदरहू विनंती लिहिलीअन्वये क्रम चालला आहे लौकरच येऊन जाबसाल तुटेल याजविसी चिंता नाही स्वामीचे इंग्रज सरदार बहुत अगत्य धरून करीत आहेत परंतु निपाणीकराचा प्रमाणीक कोठे नाही सनदा पत्रे हुजूरने करून घेतली आहेत त्यासुद्धा माघारी याव्या याप्रमाणे घडत आहे तीन रोज अधिक लागले म्हणोन साहेबानी चितास अंदेशा काडीमात्र आणू नये पुणेहून अलफीस्टीन साहेब याजकडोन बहादरास लिहिणे आले आहे जे माहाराज छत्रपति याचे दोन्ही तालुकेचा दर्यांप्त येथास्तित करून पुणे तंटा न राखिता झाडेनिसी फैसला करून द्यावा याप्रमाणे लिहिणी आली आहेत याजमुळे आमचे कामाचा उलगडा दरोबस्त करून देणेचा लोकार चालला आहे येथून पुढे कसे उलघडणेत येईल तैसे वरचेवरी विनंतीपत्री लिहून पाठवितो तालुके मनोली येथील दाहा गाव नवलगुंदाखाली वहिवाटीस गेली आहेत त्याचीहि चौकशी पडली आहे नवलगुंदकरानीही गाव प्राचीन सरसुभेकडे वहिवाटत आहेत मनोलीकडील नव्हेत असे समजोन दिले आहे तेव्हा देह झाडेवरून अगर वहिवाटीच्या यादीबदीवरून याची खातरी न पटे तेव्हा मनोलीतील देशपांडे वतनदार यासी अर्नावले आहेत त्याचे माहितगारीने त्या गावची झाडपिछाडी होऊन जाबसाल उलवडले परंतु यासी जमेदारासिवाय दुसरेचा दाखला अगर माहितगिरी प्रमाणे वाटेत नाही याजमुळे जमेदार आणविले आहेत गाव सोडावीत याप्रमाणे रुजवातीवरून व चौकसीवरून ठरण्यात आली आहे परंतु जमेदाराचा दाखला पाहावा याजकरिता आणविले आहेत व सेढोणी येथे सुबेहून ठाणे घालणेकरिता लोक गेले होते त्यानी रोखा माघारा सेनाखासकील याचे बळावरी टाकिला आहे याजमुळे स्वा × व पन्नास पावणासे लोक पाटवून ठाणे घालणेविषयी चिरंजीव मोरोपंतास लिहून पाठविले आहे त्याप्रमाणे ते ठाणे घालतील व किले याजकडून बोभाट हुजूर येईल याजकरिता बहादराकडे बोभाट आलियास येथे आम्ही आहो

येथून दिक्षीतबावाकडे दोन गावे चालत आहेत तेथीलही रोखे माघारेत परंतु तो मजकूर बहादराचे कानावरी घातलेशिवाय करिता याजकरिता बहादरासी बोलोन याचा मजकूर काय होईल तो मागाहून शेवेसी विनंतीपत्र लिहून पाटवितो निरलीकरानी परभारे सोड-चिटया देऊन ठाणी घातली ऐसे राजश्री गोविंद रघुनाथ यानी हुजूर निवेदन केले त्याजवरून ठाणी घातले गावची यादी सादर जाहाली ती पाहिली त्यास बहादराकडोन सोडचिटया अगर हुकूम गेलेले नाहीत याचा यथे संमंध ज्या ठिकाणी पाहावयाचा तो पाहिला परंतु ही गोष्ट येथून जाहालेली नाही ऐसे असता मध्येच ठाणी कोण घालून देणार आहेत त्यास येविसीची बातमी पकी आणून आज्ञापत्री आज्ञा व्हावी म्हणजे ज्यानी ही गोष्ट केली असेल त्याचे पारपत्य होणेस क्षणमात्र लागणार नाही गोविंदराव नेरलीकर प्रमाणीक काय आहेत हे स्वामीचे लक्षात आहे त्याचे विनंतीवरून आज्ञा होऊ नये बातमीस मुजरद पाटवून त्यानी ठाणी घातलेले गावची नांवनिसी सांगितली आहे त्यातील एका दुसरे गावास पाटवून त्या गावात ठाणे इंग्रजाचे आहे किंवा नेरलीकर सर्ज्याराव याचे आहे याचा पका शोध आणऊन आज्ञापत्री आज्ञा होऊन सत्वर येऊन पोचावे म्हणजे कसे घडेल ते स्वामीचे निवेदनात येईल आजचे प्रसंगी धनी साहेबाचे पुण्यप्रतापे करून दुसऱ्याने साहेबाचे हुकमाशिवाय परभारे करावे ऐसी कोणाची ताखत नाही निवदेन व्हावे शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना नेरलीकर याजकडील मजकूर आता कांही समजला त्याविसीची विनंती श्रीमन्महाराज मातोश्रीसाहेब याचे सेवेसी विनंतीपत्री विनंती लिहिली आहे त्यावरून निवेदनात येईल पू पाठविणे करिता चिरंजीव राजेश्री मोरोपंत व राजश्री बापोजीपंत देणेविसी आज्ञा जाहाली त्यासी येविसी श्रीनी आसीरवाद-पत्री त्यावरून निवेदनात येईल शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

पौ छ ८ माहे रमजान सन तिसा आसेर मयातेन व आलफ.

लेखांक १२३

तारीख २–८--१८१८

अ. नं. १६७

सो मेहरबा करम फर्याय दास्ता राणोजीराव घोरपडे सेनापति सलमुहूल हुताला आज तर्फ जर्नल तामस मंडरोल सो सलाम बादज सलाम मोहबत मषहूद आंकी ब तारीख २ ऑगष्ट पावेतो खैर जाणून आपली खैरियतेस कलमी करीत आले पाहिजे दरिविला चिकोडी व हुकेरी वगैरे तालुका श्रीमन्माहाराज छत्रपति यास कुंपणी सरकारातून दिल्हा आहे तरी तुम्ही श्रीमन्माहाराज याचे रजातलबेत[१] आसून मामुल[२] बा जाहगीर वगैरे आनभऊन वर्तणूक करावी जियादा लिहिणे काय आहे हे किताबती.

(इंग्रेजी सही)

१ आज्ञेत. २ वहिवाट, चाल

को, घ. ५...८

लेखांक १२४ तारीख २-८-१८१८

अ. नं. ४२८

श्रीमन्माहाराज छत्रपति साहे-

ब दाम अल्ताप हू

नियाजमंद जर्नेल तामस मंड्रोलसाहेब नियाजमारुज आंकी नियाजमंदेवी खैरियत रोषन होऊन हमेशा अल्ताफनामा पाठऊन सरफराज करीत असिले पाहिजे दिगर चिकोडी व हुकेरी तालुका दरोबस्त कुंपणी सरकारचे हुकुमेवरी श्री भाऊ माहाराज याचे सुपूर्द करून तेथील कुंपणी सरकार इलाका मामलेदारास ताकीद व देसाई व देशपांडे वगैरे जाहागीरदाराचे नांवी पत्रसुद्दा लिहून श्री भाऊ माहाराज याचे सुपूर्द करून आं मेहर-बानाकडे पाठविले आहे तरी कुंपणीकडील मामलेदार लोकास ताकीदपत्र वगैरे पाठवून तालुका सुपूर्द घेऊन आल्ताफनामा पाठऊन दिलखुषी करावे सदरहू चिकोडी व हुकेरी वगैरे तालुकेबाबे श्री भाऊ माहाराज याणी माहिती वगैरे विचारिले त्यास दाखला देऊन फारच मेहनत केली आहे ते आं मेहरबानास रोषनच आहे बाजे हकीकत श्री भाऊ माहाराज याणी समजावितील त्यावरून जाहीर होईल सदरहू चिकोडी व हुकेरी तालुकेचे गावगनेवरी यादाष्त पटीहि पाठविले आहे मुलाहिजा फर्मावितां रोषन होईल हमेशा अल्ताफनामा पाठवून दिलखुषी कराव जियादा लिहिणे प्यार मोहबत असून दीजे हे किताबती छ २ माहे अगोष्ट सन १८१८ इसवी.

सही इंग्रजी

लेखांक १२५ तारीख १२-८-१८१८

श्री

रु. नं. २

अ. नं. ४३०

श्रीमन्महाराज मातोश्री आईसाहेब यानी राजमाने राजेश्री मोरो बाजीराव चिटणवीस यासी आज्ञा केली ऐसीजे सांप्रत तुम्हाकडून हुजूर विनंतीपत्र येऊन सविस्तर वरचेवरी विनंतीपत्री लिहून पाटवीत जाणे आलीकडे काजकामाचे उलघडे होऊन श्रीची स्वारी निघणेचा बेत केव्हा जाहला असेल ते तपसीलवार लेहून पाटवणे चिकोडी तालुकेच्या सोडचिट्या येतील त्याजबरोबर सेनापति याजकडील तालुकेत हुजूरची ठाणी बसून हुजूर × × × घोरपडे सेनापति यानी निपाणकरासी मिलोन हुजूर हुकमतीने वर्तणूक करीत नाहीत याजकरिता येविषीचे मा।राची आज्ञा हली राजश्री बालाजी बाजीराव चिटणिवीस व राजश्री नारो गिरमाजी याजपासी जाहाली आहे आज्ञे-

प्रमाणे तुम्हास लिहितील त्यावरून कळेल तरी हा मजकूर तेथे इंग्रज बहादर याचे कानावर घालाव कीं सेनापतीची वर्तणूक हुजूरच्या आज्ञेन होत नाही आणि निपाणकरासी मिलोन आमर्यादा वर्तणूक केली आहे याजकरिता हुजूर चिठी घालून द्यावी म्हणजे हुजूरची मर्जी असेल त्याजकडे सेनापतीचा हुद्दा सांगोन वहिवाट सांगावयास येईल या बहादरासी इतक करून सदरहू आज्ञेआन्वये बहादराकडील अमलदार चिकोडीत आहेत त्यास ताकीद × सेनापतीकडील दरोबस्त सरंजामात ठाणी हुजूरची घालून द्यावी निपाणकरानी गडहिंग्लज व पटणकुडी व सरनायकीस नागरगाव ऐस तीन गाव आहेत त्यासुद्धा ठाणी हुजूरची घालून द्यावी याप्रमाणे ताकीद राजश्री रामराव सुभेदार यासी ध्यावी तयसच हमदाचा वडा येथील पाटीलकीचे व नाईकीचे वतन जबरीने घेतले आहे त्याची मनाई व्हावी बहादराकडील राजश्री निळकंठराव काली वलभगडास आहे त्याज नि॥ जमातती मिरजत आहे त्यानी इचलकरंजीकराकडील सरदेशमुखीचे रोखे गावगना केले आहेत त्याविसीच मजकुराचे पत्रे × × आहेत व मामले नि॥ घालवाड येथे रोखा आला त्याची तालीक तुम्हाकडे पा॥ आहे त्यास बहादराचे कानावरी घालोन मा॥रनिलेस ताकीद द्यावी जे हुजूरचे तालुकेत तुम्हाकडोन रोखापत्र करणच कारण नाही ऐसी निक्षून ताकीद घेऊन पाटवणे त्याजकडील जमातदाराच रोख खेडयास आल होत ते माघार देविले आहेत तुम्हास कलावे जाणिजे सुा तिसा असेर मयातेन व आलफ र॥ छ ९ माहे शवाल बहुत काय विहिणे.

लेखांक १२६ तारीख १२-८-१८१८

हु॥

रु. नं. ५

अ. नं. ४९१

श्रीमन्महाराज छत्रपति साहेब दाम अलताफ हू

नियाजमंद ग्रांटसाहेब बहादूर नियाज मारुज येथील खैरयत रोषण हमेशा खत किताबत रवाना होऊन सरफराज करीत असले पाहिजे दरविला मेहरबा मुरारराव घोरपडे सेनापति कापसीकर याजकडील दोन असामी पठाण बारगीर मेहरबा कुसाजी राजे माहाडीक याजवळ चाकरीस राहिले होते ते महाडीक याची घोडी घेऊन पलोन गेले म्हणोन म्हाडीक याजकडून जाहीर जाहाले त्यास घोरपडे मजकूर आ माहाराजाचे सरकारचे पदरचे याजकरिता त्यास हुकूम होऊन त्या बारगिराचा ठिकाण लागोन महाडीक याची घोडी त्यास पोहचत असे जाहाले पाहिजे र॥ तारीख १२ माहे आगष्ट सन १८१८ इ॥ मु॥ छ ९ सवाल जादाचे अयाम मुदाम बाद.

सही इंग्रजी

पौ छ १७ माहे शोवाल सु॥ तिसा आशर मयातेन व आलफ ऊर्फ श्रावणमास दर जागा करवीर.

लेखांक १२७ तारीख १५-८-१८१८

श्रीमन्माहाराज छत्रपति सा-
हेब दाम अल्ताफ हू

नियाजमंद मेस्तर च्यापलन साहेब कलकटर जिल्ला धारवाड वगैरे नियाज मारुज आंके नियाजमंदेची खैरीयत रोषन होऊन हमेशा अलताफनामा पाठऊन सरफराज करीत असिले पाहिजे दिगर चिकोडी व मुनवली तालुके दरोबस्त गावगनेच जर्नेल तामस मंड्रोल साहेब याणी दर्यांप्त करून त्यांपै।। सिदोजीराव नायक निंबालकर सरलष्कर यास निपाणी वगैरे मौज बाहाल ठेऊन बाकी दरोबस्त मौजे आपलें गुरु श्री भाऊ माहाराज याचे सुपूर्द केले आहे याबाबे आं मेहेरबानाचे नांवे जर्नेल साहेब यानी खत लिहिले आहेत कीं त्यावरून जाहीर जाहाले असेल लेकीन हरदो तालुका आं मेहेर-बानाकडे पोहचेले माारास जवाब अलताफनामा येऊन पाहचेले नाही करिता इलतीमास केले जाते जे हुकेरी व चिकोडी मुनवली वगैरे दरोबस्त तालुका आं मेहरबानाकडे पोहचले माारासही आईदा हुकेरी चिकोडी तालुके व मुनवली तालुकेचे दावा बिलकुल राहिले नाही म्हणून इज्यानीबाचे नांवी अलताफनामा सादर फर्मावावा हमेशा अलताफ-नामा पाठवून दोस्तीची तरकी करीत असावे बाजे दोस्तीचे कैफियत बयावार

श्री भाऊ माहाराज यानी सांगितल त्यावरून जाहीर होईल आं मेहरबानाचे कामास श्री भाऊ माहाराज यानी फारच साधक करून हरब्राबेस जवाब सांगून कामाची बंदोबस्ती केली ते तो खती लिहिणेचे काय आहे फार थोर आहेत आं मेहरबानाचे कामाविषईं येथून कांहीं दिकत पडणार नाही जियादा लिहिणे प्यार मोहबत असून दीजे हे किताबती ब ता।। छ १५ माहे अगोष्ट सन १८१८ इसवी.

(सही इंग्रजी.)

लेखांक १२८ तारीख ८-९-१८१८

श्री

रु. नं. २

अ. नं. ४३१

आज्ञापत्र राजमंडळ ता।। मोकदमानी मौजे खानापूर का।मजती प्रां हुकेरी यासी आज्ञा केली ऐसीजे सु।। तिसा आसेर मयातेन व आलफ वेदशास्त्रसंपन्न राजश्री वासुदेव पंडित गोत्र कृष्णात्री सूत्र कात्यायन शाखा वानसनी उपनाम देव हे बहुत थोर विद्या-संपन्न सत्पात्र याचे योगक्षमाचे अनुकुलतेस धर्मादाय इनामगाव करून दिलीयाने श्रेयस्कर जाणोन मौजे मजकूर हा गाव मजरेसुद्धा धर्मादाय इनाम कुलबाब कुलकानू हली पटी पेस्तर पटी जलतरुनिधीनिक्षेपसहित खेरीज हकदार व इनामदार करून पूर्व मर्यादे

प्रमाणें चतुःसिमापूर्वक करार करून दिला असे तरी तुम्ही सदरहू धर्मादाय इनाम गाव मजरे सुद्धा याचे स्वाधीन करून त्यासी व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेन चालवीत जाणे साल दरसाल नवीन सनदेचा उजूर न करिता या पत्राची तालीक लेहून घेऊन असल पत्र भोगवटियासी देणे. जाणिजे रा॥ छ ६ माहे जिल्काद मो सुद्र.

लेखांक १२९ तारीख १३–१०–१८१८

श्रीमन्माहाराज छत्रपति सा-

हेब दाम अलताफ हू

नियाजमंद मेस्तर च्यापलेन साहेब बाहादर सर कलकटर व पोलटक्याल येजींट सुभा धारवाड वगैर नियाजमारूजआंकीं नियाजेमंदेच खैरीयत रोषन होऊन हमेषा अलताफनामा पाठऊन दिल आराम करीत आले पाहिजे दरिविला आं माहाराजास चिकोडी मुनवली दोनी तालुकेची सोडचिटी जर्नेल तामस मंड्रोल साहेब्र यानी दिले जे हाली रायबागचे खेडे व वलभगड सोलापुरचे खेडेस देखील सोडचिटीला ते दोनी इजत दस्तगाह वकील सदासिवपंत याजमारफतीने पाठविले आहे आंमेहरबानानी कुंपणी सरकारचे मामलेदारास सोर्डचिठी इनायत करून रायबागचे खेडे वलभगड व सोलापुरसुदा सुपुर्देस घेऊन सुपूर्द जाहाले त्यास इज्यानीबाचे नांवी अल्ताफनामा पाठवून दोस्तीची तरकी करावी हमेशा अल्ताफनामा पाठऊन दिल अराम करीत आले पाहिजे. जियादा काय लिहिणे छ १३ माहे अकटंबर सन १२२८ फसली.

(सही इंग्रजी.)

लेखांक १३० तारीख २७–१०–१८१८

श्री

रु. नं. ५

अ. नं. ५०३

तालीक रामराव सुभेदार याच भाऊ माहाराजास आसीरवाद उपरी तुम्ही पत्र पाठविल ते पाहून लिहिला मजकूर कळला राजेश्री सखाराम नाईक यासी पाठवून द्यावविषी लिहिल त्यास तुमचे पत्र यावयाचे पोर्वीच मशारनिले निघोन तुम्हाकड गेल आहेत येऊन पोचल असतील हुजूरून कागलचे गावात ठाणी घालतात म्हणून कागलकर याजकडील कारकून आम्हापासी येऊन बैसल आहेत त्यास मनाचिटी देवाव्या आम्हावर शब्द न येई अस कराव म्हणोन विस्तारे करून लिहिल ते कळल असीयासी कारकून तुम्हापासी येऊन बसावयाच कारण ते काय? कागल तालुका हुजूरचा अस बाहादर याणी ठराऊन दिल्ह आहे व चकल्याही त्यास बहादर याच्या आणून लाविल्या आहेत

येविसी तुम्हाकड शब्द यावयाजोग कांही दिसत नाही तुम्हाकडे शब्द यावयाजोग इकडून कांही जाहाल नाही व होणार नाही मनाचिठीविसी आता बाहादर याच पत्र माहाराजास याव म्हणजे माहाराज मंजूर करतील याप्रमाणें त्याजकडील कारकुनास उत्तर सांगाव हिकडील जो मजकूर होतो तो वकील बहादर याचें कानावर घालीतच आहोत येविसी तुम्ही काळजी करू नये वरचेवर पत्र पाठवून कुशलतर कळवीत जाव बहुत काय लिहिणे रा। छ २६ माहे जिल्हेज सु॥ तिसा आसेर मयातेन व आलफ हा आसीरवाद.

लेखांक १३१ इ. स. १८१७–१८

श्री

रु. नं. २
अ. नं. ४१३

यादी मौजे आयतवडे खुर्द प्रां पनाला वारणा उत्तरतीर हा गाव सरकारातून रामचंद्र व्यंकटेश याचे सरंजामास असता राजश्री रत्नाकर पंत नि॥ करवीरकर यानी जबरदस्तीने गाव घेतला व कुलकर्ण आपले म्हणोन पुरातन कुलकर्णी याची घरे मोडून गावातून लाऊन दिले आणि गावची आज १७ वर्षे उपभोग करीत आहेत सन तिसा तिसेनात जप्ती आबाजी महादेव काले याजकडे सांगितली असता अमल बसो दिला नाही स॥ करवीरकर वकीलास ताकीद होऊन गावी सरकारचा अमल बसवयाचा सुा समान आशर मयातेन.

लेखांक १३२ इ. स. १८१८–१९

श्री हु॥

रु. नं. ३
अ. नं. ५७३

श्रीमन्महाराज छत्रपति साहेब दामअलता

फ हू

नियाजमंद आनरावळ मोट इष्टवारीट इलफीसतन साहेब बहादर बाद नियाज मारूज ची खैरयेत रोषन होऊन हमेशा अल्ताफनामा फिरस्ताद होऊन सरफूराज करीत असिले पाहिजे दरिविला आ माहाराजाचे हुजूराहून

श्री • भाऊ माहाराज याची रवानगी जाहाली त्याचे हमराह अजम मोरो बाजीराव चिटणवीस व नामे इबलाग जाले ते होऊन मुलाकात जाहाली त्याचे वरून आ माहाराजाचे मिजाजेची खैरयेत व मेहरबानी इजाहर होऊन कमाल शादमानी व खुषी हासल जाहाली कंपणी सरकारातून हुजूर चे राज्याची ज्यादती व तरकी केल्याचा नामनामोस

एल्मात मशूहर जाला म्हणोन निगारीष केले व श्री महाराज मवसुफ याचे जवाबसाला-वरून महसूर जाहाले ऐसीयास चिकोडी मनोळी दोन तालुके माहाराजाचे सरकारात ठेवून राज्याची बडती जाहाली यात कंपणी सरकारची फार खुषी आहे आपले राज्याची बंदोबस्त करून रयतेचा परवरस व आबादी व हकइनसाफ उत्तमप्रकारे केल्याने दवल-तिची तरकी व नेकनामी दरपेश महशूर होईल आसे करणे आं माहाराजाकडे आहे यांत कंपणी सरकारचीही खुषवख्ती होत जाईल याबाबे मुफसल मजमून श्री भाऊ माहाराज याचे वरून माअलुँम होईल अजम नागोजीराव पाटणकर व आस्मत पन्हा दस्तगाह बालाबाई साहेब निंबाळकर याचे मुकदम्याबाबे निघारीष केले व श्रीचे जवाबसवालावरून मालूम जाहाले त्यास पाटणकर याचे कामकाज दरयाप्ती पाहून बंदोबस्त करण्याविसी मेहरबा ग्रांटसाहेब यास कलमी केले आहे निंबाळकर याचे काम नबाबाचे सरकारातील आहे व जप्त होऊन फार दिवस जाहाले सबब इकडून शिपारस करणे याची दस्तुर नाही हमेशा नामा रवाना होऊन खुषवख्ती करीत असिले पाहिजे ज्यादेचे आईयाम शादमानी मुदाम बाद.

सही इंग्रजी

मौंट स्टुआर्ट एलफिन्स्टन

लेखांक १३३ तारीख २४-१-१८१९

श्री

रु. नं. ५

अ. नं. ५१५

नारायण स्वामी

पौ छ २४ माहे रबिलाखर सु॥ तिसा असेर

श्रीमन्माहाराज राजश्री छत्रपति

स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक सदासिव अनंत कृतानेक शेवेसी विनंती विज्ञापना ता। छ २७ रबिलावल पावेतो साहेबाचे वृ पावलोकने करून सेवकाचे वर्तमान यथास्तित असे शेवेसी प्रार्थना वेदशास्त्र-संपन्न राजेश्री रामाचारे शास्त्री वास्तव्य क्षेत्र सदलगे येथे असतात यास कसबा मजकुरी धर्मादाय जमीन मामलदारानी बिघे आडीच दिली आहे त्यास हल्ली जमीनीस अडथला जाहला आहे म्हणोन स्वामीचे शेवेसी विनंती लिहिली आहे अशा शास्त्रीबावा बहुत योग्य आहेत श्री स्वामीचे आनुग्रही आहेत स्वामीनी कृपाळु होऊन नूतन आडीच बिघे व पेशजी आडीच बिघे माळ जमीन आहे ती असी येकंदर पाच बिघे जमीन अवल देणेची आज्ञा होऊन सनद करून देणार स्वामी समर्थ विनंतीचा अव्हेर न होता धर्मकार्य सिद्धीस नेणार धनी समर्थ येविषयीची विनंती राजेश्री बळवंत रावजी चिटणि-वीस करतील त्याजवरून सविस्तर निवेदनात येईल शेवेसी श्रुत होय ही विज्ञापना.

लेखांक १३४ तारीख ७-४-१८१९

श्री

अ. नं. २६७

पौ छ ११ माहे जमादिलास्वर सु॥

तिसा आशर मयातेन व अलफ

श्रियासह चिरंजीव विजईभव राजश्री राजे आबासाहेब छत्रपति व राजे बावासाहेब छत्रपति यासी

आनेक आसीर्वाद उपरी येथील क्षेम ता॥ छ ११ जार रोज भोमवार प्रहर रात्रपर्यंत यथास्थित असे विशेष आजम मेजर क्लीन बाहादर हे दोन कुंफन्या व तुरक स्वार यैस्या सरंजामान इसलापुराहून शाहापूर बेलगावास आजम आलविष्टीन बाहादर याचे भेटीस जाणार म्हणोन राजश्री बालाजी बाजीराव चिटणिवीस यासी पत्र क्लीन बाहादूर याचे तरसिले आले त्याची तालीक पाहणेकरिता पाठविली ती पाहिली आशास हुजूर तालुकेत ज्या मार्गाने बेलगावास जातील त्यासी येकंदर ताकीद उस्तवारी कर्णविसी जासुदाबराबर देऊन पाठऊन द्यावी श्री भाऊ म्हाराज यासी हुजूरची पत्र सांडी स्वाराबराबर आथवा चालणार जासुदाबराबर या मजकुराची देऊन आति सत्वर पा॥ द्यावी स्वारीही प्राथःकाली द्वादसीची ताट होऊन करवीरास होत आहे बहुत काय लिहिणे हा आसीर्वाद.

लेखांक १३५ तारीख २७-७-१८१९

श्री

रु. नं. २

अ. नं. ४४३

राजश्री बच्याजी अनंत यासी आज्ञा केली ऐसीजे

सुर सन आशरीन मयातेन व अलफ किले प्रसिद्धगड × × वाकनीस याची सबनिसीची असामी आहे त्याचे × तालकीची वहिवाट पेशजी तुम्हाकडे चालत होती त्याप्रमाणे हली स्वामी कृपाळु होऊन मुतालकीची सेवा तुमची तुम्हास हुजूरने करार करून देऊन असामी बा॥ तुम्हाकडून नजराणा नक्त रुपये पनास वेऊन पेशजी

५०

प्रमाणे मुतालकीची सेवा करणेची आज्ञा जाहली असे तरी आज्ञे प्रमाणे मुतालकीची सेवा करून सुखरूप राहाणे जाणिजे र॥ छ ४ माहे शोवाल लेखन सीमा

लेखांक १३६ तारीख १-८-१८१९

श्री

रु. नं. २
अ. नं. ४४८

तीर्थस्वरूप श्री भाऊ महाराज वडिलाचे शेवेसी

अपत्य शंभुराज छत्रपति चरणावर मस्तक ठेऊन कृतानेक शेवेसी विज्ञापना ता। छ ८ माहे शोवाल पर्यंत यथास्तित असे विज्ञापना ऐसीजे हुजूरचा किला भुदरगड राजश्री नारायणराव रत्नाकर याजकडे मामलतीने होता तो आपण जिमेस घेतला होता तो हल्ली हुजूरचा किल्ला हुजूर आपण राजश्री सदासिव अनंत याजकडून स्वाधीन करून दिल्याप्रमाणे दंरोबस्त किल्ला जखेरेसुध्दा हुजूर पावला असे आपणाकडे किलेविषी कांही ल्ढा राहिला नाही शेवेशी श्रुत होय ही विज्ञापना मि। मु। आसरीन मयातेन व आलफ शके १७४१ प्रमाथीनामसंवत्सरे श्रावण शु।। १०

पौ छ १३ माहे सवल
सु। आषरीन मयातेन व
आलफ.

लेखांक १३७ तारीख २-८-१८१९

श्री

रु. नं. २
अ. नं. ४४५

समस्त सेनाधुरंदर विश्वासनिधी राजमान्य राजेश्री संताजीराव घोरपडे सेनापति यासी आज्ञा केली ऐसीजे सेनापतीचा अधिकार तुमचे वडलोपार्जीत तुम्हाकडे चालत आला अलीकडे दरम्यान नारायणराव घोरपडे यासी अधिकार हुजूरून दिला होता परंतु त्यानी निपाणीकर यास मिळोन स्वामीचे पायासी बदमामली करून राज्याची खराबी केली आणि तेही मृत्यु पावले नंतर त्याचे पुत्र राजेश्री राणोजीराव घोरपडे यासी अधिकार दिल होता त्यानीही सदर प्रमाणे वर्तणूक करू लागले सबब त्याजकडील दूर करून सेनापतीचे वडील घराणे तुमचे वडिलाचे वडीलही स्वामी कार्यावरी खर्च जाहाले जाणोन स्वामी तुम्हावरी कृपालु होऊन पूर्व वहिवाटी प्रमाणे सेनापतीचा हुद्दा तुम्हास सांगोन वस्त्रे देऊन सरंजाम स्वाधीन केला आहे तरी सदरहू सरंजाम अनभत्रून स्वामीसेवा एकनिष्टपणे करीत जावी जाणिजे सु।। अशरीन मयातेन व अलफ र।। छ १० माहे शवाल बहुत लिहिणे तरी सुज्ञ असा मोर्तब.

लेखांक १३८ तारीख १७-८-१८१९

श्री

रु. नं. २

अ. नं. ४५१

पौ छ २५ माहे शवल
सन आसरेन मयातेन
व आलफ

तीर्थस्वरूप मातोश्री मामीसाो घाटगे

वडिलाचे शेवेसी

अपत्य सिदोजीराव नाईक निंवाळकर सरलष्कर दंडवत विनंती ऐसीजे येथील कुशल ता॥ छ २५ माहे शवाल जाणोन जाणोन स्वकीये लेखन करीत असिले पाहिजे विशेष वडील पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ कळू आला त्यास तुमचे लोक ठाणेत होत त्यानी असी गाफिली करून ठाणी कसी गमाविली हल्ली निंगवेचा बंदोबस्त यथास्थित राखावा आणि त्याचे पत्राच उत्तर द्यावे जे तुम्ही पत्री श्नेहाचा मजकूर लिहिला तो कळला इतका श्नेहाचा विचार असून इकडे न कळविता इकडील लोकासी मारामारी करून ठाणी च्यारी घ्यावयाचे कारण ते काय तुम्ही जबरदस्तीन ठाणी घेऊन हली निगवेची सोडचिटी पाठवून द्यावी म्हणोन लिहिणेच कारण काय होत आम्ही आमची खेडीकरास ताकीद करून तुम्हाकडील तालुकेत अथवा हरकोटेही खटला नसता तुम्हीहूनच खटलेस प्रारंभ केला हे उत्तमच आहे याजप्रमाणे उत्तर द्यावे आणि त्याचे पत्र आले त्याची तालीक देऊन कारकुना समागमे ताबडतोब धारवाडास साहेबादोस्ता चापलेन साहेब बहादूर याजकडे पाटवून द्यावे तेथे राजेश्री लिंगोपंतही आहेत लोकाविसीच लिहिले त्यास ज्यावलेस पाहिजे त्यावेलेस सिध्दच आहे वडिली खेडीकरास ताकीद करून हुशारीन राहाणेविसी सूचना करावी विशेष काय लिा लोभ कीज ही विज्ञापना.

लेखांक १३९ तारीख १५-९-१८१९

श्री

रु. नं. २

अ. नं. ४५३

आज्ञापत्र राजमंडळ यानी सुभा चिकोडी यासी आज्ञा केली ऐसीजे सुा आशरीन मयातेन व अलफ वो राजश्री नरहराचार्य बिन केशवाच्यार्य गोत्र विश्वामित्र सूत्र आश्वलयन कटी पुराणी यासी सन सबा तिसेन मया व अलफचे साली मार्गषीस

पोर्णिमा चंद्रग्रहण पर्वकाली धर्मादाय भूमिदानकाली कीर्द बिगे पाच करार करून देऊन ५ चाल्त असता ऐलकडे हल्ली मानीमुळे चालत नाही म्हणून हुजूर विदित जाहाले त्यास सदरहू जमीन पूर्ववत प्रमाणे पाच बिगे यासी व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने चालवणेविसी मामलेकडील ताकीद मौजे बिदरहली का॥ मनोली प्र॥ हुकेरी येथे देणे आणि या पत्राची तारीख लेहून घेऊन असल पत्र भोगवटेस वेदमूर्तीकडे देणे जाणिजे र॥ छ २४ माहे जिलकाद मो सुद्र.

लेखांक १४० तारीख १७-९-१८१९

श्री

रु. नं. ५

अ. नं. ५२७

पौ छ १ माहे जिल्हेज सन आशरीन मयातैन व आलफ

शेवेसी अर्जी आज्ञांकित बाळाजी कृष्ण कृतानेक शेवेसी विनंती विज्ञापना ता छ २६ माहे जिल्काद भृगुवार पर्यंत चवकी अंबेघाट येथे साहेबाचे कृपावलोकनेकडून शेवकाचे वर्तमान यथास्तित असे विज्ञापना घाटमाथे चोर व ठाणाचे साहा ठिकाण होती ती मल्कापुराहून बेलदार किल्लेहून आणऊ मार्ग बंद करून घाटमार्ग वाटेन यावे जावे या प्रा येक मार्ग रहदारी हावी दुसरे वाटे जाऊ नये पांजीनजीक गाव जवळ आहेत त्यास ताकीद करून चोरवाटेन कोणी जाऊ नये आणि लोकही नित्यानी जाऊन मार्गाची चवकसी करीत आहेत किलकडून बंदोबस्त यथाथित आहे किल्ले निसबत कारकून राजश्री नारो कासी व आम्ही उभयता रात्रीदिवस सावधपणे राहून रात्रंदिवस चवकसी करीत आहो लोकाची हजीर पेशजीचे विनंतीपत्री लिहिली आहे त्याप्रमाण लोक घाटमाथा चौकीस आहेत रहदारीचे लोक येतात जातात त्याची झाडाझडती पाहून ठावठिकाण पुसून लाऊन देतो अधिकउण आढाल होईल ते शेवेसी अर्जी लिहितो काली बुधवारी साखरपे यथ इंग्रज बहादर याचे चवकीवरून दोन असामी शिपाई वाटसुराच सोंग घेऊन मिरजेस आपले भावास भेटावयास जातो म्हणोन आंबेच चवकीस आले त्याची चवकसी केली तेव्हा चवकसीत फेर पडला तेव्हा एक रात्र पाहरत होत दुसर दिवसी कबूल जाहाले कीं आम्हास हुकूम आंबे घाटास लोक किती व मल्कापुरास लोक किती व करवीराहून तपासणीस आल आहेत त्याचे लोक किती याचे बातमीस साखरपेहून पाटविल आहे म्हणोन सांगितल त्याजवरून येक असामी त्याबराबर आमचे चौकीचे लोक देऊन त्याजकड साखरपेस पा दिल्हे त्याणी आपल म्हणोन हवा (ला) करून घेतल मग दोनप्रहरा चवकीचा शिपाई माघारी आलेनंतर त्याचा दुसरी आसामी त्याजकड पाटऊन दिली शेवेसी निवेदनार्थ विनंती शेवेसी श्रुत होय ह विज्ञापना.

लेखांक १४१ तारीख १०-१०-१८१९

श्री गैबी प्र॥

रु. नं. ५

अ. नं. ५३५

पौ छ ७ माहे सफर सन आसरीन मयातेन व पत्र डाकमुळे

तीारूप मातोश्री नानीसाहेब वडिलाचे सेवेसी बालके जयसिंगराव घाटगे सर्जेराव वजारतमाब दोनी कर जोडून दंडवत विज्ञापना ताा छ १९ माहे जिल्हेज पर्यंत क्षेम असे विशेष वडली छ १५ जिल्कादचे पत्र पाा ते पावले लि॥ मा॥र कळला राजमंडलकरानी माहाकवेत जमाव पाचच्यारशे केला आहे व वरकड जागी आहे परंतु म्हाकवेच जमाव चिखलीनजीक आहे त्यास आपण तेथे आहा जागा म्हणावी तरी खेडगाव तेथून निघोन दुसरीकडे जावे तरी तालुकेस धीर पुरवणार नाही त्या करिता विनंती लिहिली आहे तरी कागदपत्र दस्तऐवजी व चीजवस्त जी असल ती निपाणीस पोचवून देऊन आपण सडेनिसी चिकलीत सावधपण जमाव करून असावे जवळ राजश्री लक्ष्मण हणमा यास आणून ठेऊन घ्याव व आंदोजी पाटील यमगेकर यास आणून ठेवण वडिलाप्रति विषेस काय लिहिण हे विज्ञापना.

लेखांक १४२ पौ तारीख १८-१०-१८१९

श्री

रु. नं. २

अ. नं. ३८४

पौ छ २७ जिल्हेज सन आशरीन मयातेन व आलफ

तीर्थरूप श्रीमन्महाराज मातोश्री

आईसाो वडिलाचे शेवेसी

आपल्ये राजे आबासाहेब छत्रपति व राजे बाबासाहेब छत्रपति चेरणावरी मस्तक ठेऊन शेवेसी विज्ञापना तागायत छ २७ माहे जिल्हेज रोज रविवार पर्यंत वडिलाचे आसीरवाद प्रभाव करून बालकाचे सकलवृत्त येथास्तित असे + रोज मजकुरी आकोलाहून फौजसहित कूच करून कापसी नजीक कोसावरी नंद्याल व करड्याल या दोनी गावच्यामध्ये नदीवरी मोकाम जाहाला चिकोत्र। नदीचे नाव आहे उदईक इंदुवारी येथून ताटे होऊन फौजसहित कूच करून आलाबादेवरी स्वारी व्हावी तेथून पुढे कापसी जेजालाचे मारणी इतकी लांब राहाती तेथून पायदलाच्या पाचचार टोल्या करून पैल्या हुलडीस नेट करून गाव घेऊन ठाणेस मोर्चे द्यावे म्हणजे नदीच पाणी मोकळे होईल याप्रमाणे बेत ठरवून नंतर स्वारीचे कूच व्हावे ऐसे आहे यात उदईक कसा

मजकूर होईल मागाहून वडिलांचे शेवेसी लिहिण्यात येईल वडिली आसीरवाद पत्र छ २६ रोजची पाठविली ती प्रा। होऊन लेखनार्थ श्रवण जाहाला पत्री आज्ञा जाहाली कीं पटणकुडीचे ठाणेतून राजश्री मुरारराव घोरपडे यासी कौलानें उतरोन लाऊन दिल्हा त्यास कोणकोणते दरम्यान जाहाले आहेत त्याची नांवनिसीवार यादी पाटवून द्यावी घोरपडे यानी हुजूर असावे राजश्री राणोजीराव घोरपडे याजकडे मिळू नये ऐसा बंदो-बस्त मुरारराव घोरपडे याचा करून घ्यावयाचा होता तो येकीकडेस ठेऊन कौलानें उतरोन लाऊन दिल्हे हे काय तेव्हा तो लाटेस गेलाच असेल तेणेकरून लाटेस बल विशेष जाहाले असेल ही गोष्ट आपण केली ती ठीक जाहाली नाही येसी × × पत्री आज्ञा जाहाली ती खरीच आहे परंतु पटणकुडीचे ठाणेस शह देऊन बसून रिकामे खर्चाखाली यावे ठाणेत घोरपडे मशारनिले यानी अरब लोक घेऊन होते तेव्हा निकड करून हाला करावी तेव्हा कार्य घडणे ते घडेल त्याशिवाय ते उगेच हातासी कसे लाग-तील हला करावी तेव्हा सेंडा माणूस जाया होईल तेणेकरून पुढील मसलतीस विलग पडेल हे जाणोन तोफेच मारणीत जेरदस्त करून कौलास आलेवरी कौलाने उतरोन लाऊन दिले आता तेच मुरारराव घोरपडे व राणोजीराव घोरपडे येकत्र होऊन लाटेचे ठाणेत राणोजी घोरपडे गेले आहेत कापसीच ठाणेत मुरारराव घोरपडेच आहेत येसे वर्तमान निवेद-नात आले आहे वडिलांचे आसीरवादे करून घडेल ते खर राणोजी घोरपडे व मुरारराव घोरपडे या उभयतास निपाणकरानी येकत्र करून देऊन दोन्ही ठाणेस दोघे गेले आहेत धारवाडाहून राजश्री नारो गिरमाजी याची पत्रे व बाहादर याची थैली निपाणकरास आली आहे कीं घोरपडे यासी तुम्हाकडोन कुमक देऊ नये व पेंढारही देऊ नये या प्रो थैली आली त्याची तालीक वडिलांचे शेवेसी अवलोकनार्थ पाठविली आहे थैली

× × त्याजबरोबर श्रीचे पत्र देऊन श्रीकडील माणसे × × देऊन अजी

निपाणीस रवाना केली आहे व बाद + + याणी आपले तालुकेतील मामलेदार

बेळगाव व पाच्छापूर वगैर यासी चकत्या दिल्या आहेत कीं स्वार व लोक अगर पेंढार हरकोणी घोरपडे याजकडे चाकरीस तालुकेतून जाऊ देऊ नये कोणी गेले असिलेस ताकीद करून माघारे आणवणे या प्रमाणे चकत्या आल्या त्या आजी बेळगावास व पाच्छा-पुरास रवाना करून दिल्या याप्रमाणे जाहालेला मजकूर वडिलांचे शेवेसी लिहिला आहे येथून पुढे होईल तो मजकूर वडिलांचे शेवेसी लिहिण्यात येईल खडकाचा वाडा येथे अजी हुजूरची ठाणी घातले चिखलीस पुण्यशील नानीबाई घाटगे यासी आज्ञापत्र पाठविले आहे त्याची तालीक शेवेसी पाठविली आहे. शेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक १४३ तारीख ६-११-१८१९

श्री रामचंद्र

अ. नं. ४५९

भाऊ माहाराज छत्रपति

चिरंजीव राजश्री राणोजी घोरपडे यासी आसीर्वाद उपरी तुम्हास श्रियासह चिरंजीव विजईभव राजश्री यांणी च्यार गाव[1] दिल्हे आहेत तेथे कुटुंब ठेऊन गाव अनभवून येकनिष्ठपणे सेवा करून सुखरूप राहणे तुम्हास छत्रपति कडून व तुमचे भावबंदाकडून उपसर्ग होऊ देणार नाही जाहालेस श्रियासह चिरंजीव विजईभव राजश्री छत्रपति याजकडून बंदोबस्त करून देणेची आज्ञा होईल रवाना छ १७ मोहरम सु॥ अशरीन मयातेन अलफ बहुत काय लिहिणे हे आसीर्वाद.

लेखांक १४३ (अ) तारीख ७-११-१८१९

यादी राणोजीराव घोरपडे व मुरारराव घोरपडे व दिनकरराव घोरपडे याची बायकोस हुजूरने सरंजाम गावखेडी नेमून दिल्ही सु॥ अशरीन मयातैन अलफ

....

१ मुरारराव घोरपडे यासी

१ खडकाचा वाडा १ काळामाची वाडी १ मुगली का॥ कापसी

३

१ दिनकरराव घोरपडे याचे बायकोस मौजे सिपूर ता॥ आजरे हा गाव दिल्हा असे.

लेखांक १४४ तारीख १८-१२-१८१९

हू॥

रु. नं. १

अ. नं. २७६

हजरत श्रीमन्माहाराज राजश्री

————राजे छत्रपति कोलापूर सलम

उला हुताला

---

१ टीप :— चार गांव :— १ मौजे नागनूर का॥ जुगल

३ का॥ कापसी

१ मौजे हसूर खुर्द १ मौजे बोळावी

१ मौजे नेन्याल

३

अमारत व अयालत येकबाल पनहा अज तर्फ येखलास ज्यान आंद्रवशा इस्कोयर आसीष्टण कोलक्टर व माजिश्रेट जिल्हा दक्षण प्रांत कोकण मुकाम सुभा मालवण तालुके जंजिरे सिंधुदुर्ग बाअदज शौक मुलाकात सलमउला हुताला छ २९ माहे सफर येथील नेकी जाणोन हजरत पन्हाः महाराजानी खुशी कैफयत कलमी नविस्ता दरविला तर्फ मसूरे येथील किले भरथगडाकडे जो वसूल जावयाचा तो जात आहे यैसा आसोन दोन वर्श मौजे मालगाव तर्फे मजकूर येथे सतर रुपये पटी म्हणोन ज्याजती वसूल घेतात त्याजमुले रयतेस द्यावयासी ताकत नाही म्हणोन फिर्याद येती बंदोबस्त न जहालेस रयत परागंदा होऊन सरकारची नुकसानी होती त्याविसीचे बंदोबस्ताविसी भरथगडचे अमलदार यासी पत्र पाटविले असता बंदोबस्त होत नाही जंजिरे मजकूर येथील आमल कुंपनीचे स्वाधीन जाहाला त्या समई जी वैवट चालत होती त्या प्रमाणे न चालता ज्याजती वसूल मागतात येणे करून तहनामेस विरुद्ध दिसते हा मजकूर माहाराजास ज्याहीर व्हावा ईसबाब हे खत कलमी करून फिरिस्ताद केले आहे याबाब माहाराजानी भरथगडचे अमलदार यासी हुकूम फर्माऊन जी पहिली वसूलाची वहिवाट चालत आली त्याप्रमाणे वसूल घेत जाणे ज्याजती वसुलाविसी रयतेस उपसर्ग न करणे म्हणोन ताकीद सादर होऊन ज्याजती विसी रयतेस उपसर्ग न होई ते महाराजानी केले पाहिजे माहाराज साहेबी मेहेरबान होऊन हमेशा खत किताबत करीत गेले पाहिजे हे किताबत.

(सही इंग्रजी)

पौा छ ५ माहे रबिलावल
सुा अशीरीन मयातेन
व आलफ दरमकान करवीर
उर्फ पौष्यमास

लेखांक १४५ इ. स. १८१९–२०

श्री

रु. नं. २
अ. नं. ३८६

यादी इकडील मजकुराची कलमे
बि ता॥ सुा आशरीन मयातैन व आलफ

१ इचलकर्जीकराचे कामाविसी पेशजी राजश्री बापूजी पंत येथे होते त्यास समक्ष सांगितले होते त्यानी हुजूर विनंती केलीच असेल व मागाहून थैलीही पाटविली परंतु त्याचा जाबसाल उलगडला नाही म्हणून इचलकर्जीकरानी बाहदर यासी इतला केला त्याजवरून त्यानी कारभारी थासी सांगितले जे करवीरकर वकील यासी इचलकरंजीकराचे कामाविसी सांगोन जाबसाल उलगडणेत येई ते करावे त्याजवरुन मुनशी याणी आम्हास

बोलाऊन सांगितले कीं इचलकर्जीकराचे जाबसालाविसी वारंवार जिकीर (फाटलें आहे) हे टीक नाही त्यास जाबसाल त्याचे उलगडून घ्यावे म्हणून सांगितले त्याजवरुन शेवेशी विनंती लिहिली आहे त्यास त्याचे जाबसाल नमोदात आले प्रमाणे उलगडून घेणेची आज्ञा व्हावी येविसी इचलकर्जीकराकडेही सेवेशी विनंतीपत्र लेहून दिल्हे आहे. —— कलम

१ वाडी प्रकर्णी मजकूर बहादर याची व आमची बोलणी जाहाली तो मजकूर पेशजीचे विनंतीपत्री लिहून पाटविलीच आहे त्याजवरून निवेदनात आला आसेल हाली हुजूरुन यादी वाडी प्रकर्णी आली तो मा।र बहादर यासी बोलण याप्रमाणे वाडीस लिहिले जावे येविसी राजश्री रावजी यासी सविस्तर समजाऊन दिल्हे आहे त्यानी बहादर यासी सोईन समजाऊन देऊन त्याप्रो वाडीस लिहिले जाईल येसे करितो म्हणून रावजी बोलिले आहेत व यादीची नकलही करावयाची तशी करून रावजीपासी दिल्ही आहे राजे बहादर वाडीकर यासी पूर्वीपासून सरकारची चाल नाही वा प्रो येथे बोलिले आहे त्याणीही उत्तर केले कीं पेशजी प्रो लिहिणेचा सांप्रदाय आसेल त्या प्रो लिहित जावे नवीन करू नये याप्रो बहादर यासी बोलून वाडीस लिहवितो याप्रो बोलिले आहेत वाडी प्रकर्णी जाबसाल येथे होईल त्याप्रो वाडीस लिहितील व आपलेकडील कारकून येथे आहेत त्यास इशारा होईल ते हुजूर लिहून पाटवितील याप्रो बोलणेत आले आहे शेवेशी निवेदनार्थ विनंती. —————— कलम

१ आजम च्यापलीन साहेब मंडलीसुधा परवाचे दिवशी गुरुवारी येथून निघोन खानदेशांत मुल्क पाहवयासी जाणार आहेत दरोबस्त सरंजामाची वगैरे तयारी जाहाली आहे समागमे कारभारी सुध्दा जाणार दोन महिने येण्यास लागतील सेवेशी निवेदनार्थ विनंती. —————— कलम

१ आम्ही आज शुध्द १० इंदुवारी निघोन पुढे मुंबईस जावयाकरिता गेलो तेथे पोहचताच आज्ञेप्रमाणे मजकूर बोलून टरण्यात येईल त्याप्रो जासूद जोडी याची रवानगी सत्वर करून सेवेशी पा देतो.

१ बाहादर यांजकडून कारकून व स्वार स्वारीसमागमे जाणेस परवा येथून रवानगी करून देऊन पा। आहेत ते येऊन पोहचले असतील त्याची उस्तवारी येथास्थित हुजूरून होत आसावी वारंवार याणी याविसी अर्ज कराव येसे होऊ नये येकवेलच येखादे-कडे उस्तवारी कर्णेविसी आज्ञा होऊन बंदोबस्त आसावा स्वारी माघार आले नंतरी कारकून याची व स्वाराची रवानगी हुजूरून बहुमान युक्त व्हावी व कारकुनास कांही नक्ती बक्षिसी व्हावी सारांष हुजूरचा येथे लौकिक आहे त्याप्रमाणे व्हावे. —— कलम

१ स्वारि तुळजापुरास जात आहे त्यास मार्गान फौजे वगैरे जाणार त्यास राणात पिकापाण्यास व गावात वेटेबिगारेविसी व घासलकडीविसी वगैरे कोणताही उपसर्ग न लागे यैसा बंदोबस्ताची आज्ञा फौजेत आसोन उपसर्ग न लागे येसे व्हावे————

६

येकून कलमे सहा.

लेखांक १४६ इ. स. १८१९-२०

श्री

रु. नं. २

अ. नं. ३८६ पैकीं

यादी हुजूर निवेदनार्थ कलमे

सु॥ आशरीन मयातैन व आलफ

१ रामचंद्रराव डफले हे करवीराहून हुजूरचे स्वारीसमागमे राहून जतेस खटला हुजूर विनंती करून करणार म्हणोन वर्तमान आले याविसी बहादर याणी सांगून पा॥ जे हुजूरची स्वारी मार्गान जावी देवदर्शन करुन यावी मार्गी कंपणी सरकारच्या आमलात कोणाचेही येकून खटला पडू नये खटला पडल्यास चांगल नाही याप्रो सांगितले.-कलम

१ उदाजीराव चव्हाण याचा घरगती खटला आहे याजविसीची चौकशी मनास आणावी म्हणोन राजश्री चिंतामणराव आपा याजकडे बहादर याणी सांगितले आहे त्यास उदाजीराव यास आज्ञा सांगलीस जावयाची व्हावी तेथे खटले विलहे लागेल उदाजीराव राव न गेलीयासी येथून त्यास बोलावणे होईल त्यास या मजलीस न येता त्याणी आगोदर जाऊन सांगलीकर याचे लिहिणे येथे यावे- कलम

१ वंटमरीकर याचे दोन गाव कर्जात म्हणोन सिरगावकर वंटमुरीकर याचे गुमास्ते त्याणी आटकाविले आहेत त्याची वाजवी चौकशी हुजूरुन व्हावयाची आज्ञा जाहाली पाहिजे.

१ कंपणी सरकारच्या तालुकीयातून मोगलाईत स्वारी देवदर्शनास जाहली आहे त्यास कंपणी सरकारचे तालुकीयात व मोगलाईत गावगन्ना गैर कांहींयेक उपसर्ग न व्हावा बोभाट येऊ नये. कलम

४

येकून कलमे चार बहादर याणी यादी लिहून पा याजवरुन साहेबाचे शेवेशी विनंती लिहून यादी पा आहे त्याप्रो आज्ञा होऊन बंदोबस्त असावा.

लेखांक १४७ तारीख २६-३-१८२०

हू

अ. नं. २७२

रफअत व आवाली पनाह तहऊर व जलादत दस्तगाह आजम अचीसन इनच्यार्ज्य अफेती पोलीतिकाल दुतीस बाहादर मवहूद बाशंद दरिवला हुजूर राजश्री रामचंद्र मल्हार व बच्याजी अनंत वकील याचे विनंतीपत्र येऊन मजमुन इजहार जाहाला जे किले मनोहरगडचे तनखेचे आमलाचा जवाबसवालाचा व कसबा माणगाव तर्फेतील नदी-

पलीकडील खेडी पाच येथील किले प्रसिध्धगडाकडील अमल येणे त्याचा फैसला आ रफअत पनाहानी करून दिल्हा त्यावरून हुजूर शादमानी हासील जाहली हुजूर कमअनूरचे राज्याची शरम आवाली पनाहास असता मरकूम कलम होणे काय आहे किले प्रसिध्धगड व सोनगड येथील तनखेचे अमलाचा जवाबसवाल फैसल व्हावयाचा आहे त्यास पनाहानी हरदो किलेचे तनखेचे अमलाचा जवाबसवालाचा फैसला जुध्ध होये ते करावे वरकड मजकुराची आज्ञा मोमिइले वकील यास कलमी फर्माविली आहे जुबानी करितील त्यावरून पनाहास माअलूम होईल जाणिजे सु॥ अशरीन मयातैन व अलफ रवाना छ ११ माहे जमादिलाखर जियादा काय लिहिणे.

लफापेवरी

रफअत व आवालीपनाह अजम अचीसन इनच्यार्ज अफती पोलितिकाल मुतीस ब्राहादर मषहूद बाशंद.

लेखांक १४८ तारीख २-७-१८२०

रु. नं. ७

अ. नं. ५५३

श्रीमन्महाराज छत्रपति साहेब

दाम मोहबत हू

नियाजमंद उलीयम च्यापलीन साहेब कमिशन बहादर बाद नियाज मारुज सलाम आंके नियाज मंदाची खैरीयत रोषण होऊन हमेशा फिरस्ताद होऊन सरफराज करीत असिले पाहिजे दरविला कोकणचे मुलकांत तालुके रत्नागिरी वगैरे ठिकाणी दुतर्फा अमल फार दिवसा पासून आहेत तेथे दोहीकडील अमलदाराच्या दुईमुळे रयतेस उपद्रव लागतो याजकरिता दर्यात्फी पाहून जिकडील तिकडे येकतर्फा अम्मल करावयाविसी अजम पिली साहेब बहुत तजविजीत आहेत या कामाचे बंदोबस्ताविषयी आ माहाराजाचे सरकारातून वकील रवाना व्हावा म्हणोन दोनतीन वेळा पिली साहेब यानी पत्रे पाठविली परंतु हरकत होते वकील त्याजपासी जाऊन जाबसाल ठरवीत नाही ऐसीयास मुलूख एकतर्फा होऊन बंदोबस्त जाल्याने दोहो सरकारचा उपयोग आहे म्हणोन गोरनर साहेब याचा हुकूम आला कीं आ माहाराजाचे सरकारात लिहून त्याजकडील वकील पिली साहेब याजकडे पाटवून द्यावा म्हणोन त्याजवरून लिहिण्यात येते कीं दुतर्फा मुल्काचे फैसल्या करिता आ माहाराजाचे सरकारचा वकील पिलीसाहेब याजकडे अति सत्वर रवाना व्हावा इतक्यावर दिवसगत लागलीया पिलीसाहेब त्या मुल्काचा बंदोबस्त जेसा मुनासब दिसेल तैसा करतील दुसरा मजकूर तालुके भरतगड येथील आ माहाराजाकडील किल्लेदार दुतर्फा गावचे रयतेस वगैर लोकास कैद करुन फार उपद्रव

करितात म्हणोन बोभाट आला आहे त्यास किलेदार यास ताकीद होऊन हरएक उपद्रव न लागे असा बंदोबस्त व्हावा रयतेस गैरवाजबी उपद्रव लागू नये असे सरकार हमेषा पाहात आहे त्यापेक्षा आ माहाराजाचे सरकारचे लोकाची चाल खराब ब त्याची चौकसी राहात नाही असे सरकारचे मनात न येई असे व्हावे जादेचे आयाम मेहरबानी मुदाम

(सही इंग्रजी)

पौ छ २६ रमजान सु।। इहिदे आशरीन मयातेन व आलफ लफाफेवरील तेरीख २ जुलाई सन १८२० इसवी मु।। छ २० रमजान.

लेखांक १४९ तारीख २१–७–१८२०

हु।।

रु. नं. ५

अ. नं. ५५९

अजम उलीयम चापलीन कमिशनर बहादर कामयाब बाशद

शौकत व अवाली पनाह शाहामत व दस्तगाह बाअदज इस्तियाक फिरावा मशहूद आंके दरिविला हुजूर आ शौकत पनाहानी मरतिबा छ २ जुलाईची दोन फिरिस्ताद केली ती छ २६ रमजानी रसीद होऊन मुफसील मजमून इजहार जाहाला दरिविला कोंकणचे मुल्कात ताअलुके रत्नागिरी वगैरे ठिकाणी दुतर्फा अमल बिसीयार दिवसापासून आहे त्यास ज्यानूबैन अमलदाराचे दुही मुळे रयतेस हरजमरज होतो हा इसबाब दर्यात्फी पाहून जिकडील तिकडे येकतर्फा अमल करावा याबाबे अजम बडेपिली इस्कोयर कालेक्टर व माजिस्त्रेट बिसीयार जी तजविजीत जिकिरीत आहेत मुल्ख येकतर्फा होऊन बंदोबस्त जाहाल्याने सरकारचा उपयोग आहे म्हणोन गवरनर बहादर याचा हुकूम आला कीं हुजूर मरकूम कलम करून वकील दुतर्फा मुल्काचे फेसल्याबाबे बडे पिली इस्कोयर याजकडे जुद इरसाल व्हावा म्हणोन आ अवाली पनाहाणी निघारीष केले ते जाहीर जाहाले त्यावरून बडे पिली इस्कोयर याजकडे वकील मरसूल होत आहे ताअलुके भरतगड येथील किल्लेदारानी दुतर्फा गावचे रयतेस वगैरे लोकास कैद करून हरजमरज केला म्हणोन बोभाट आला आहे म्हणोन

त्यावरून किले मजकुरास दुसरा अमलदार इबिलाग जाहला आहे रयत लोकास गैरवाजवी उपसर्ग होणार नाही आ शामहत पनाहास मालूम व्हावे बईसबब निघारीस जाहाले आहे हुजूर चे मुलकातील चोरटे व दरवडेकरी इन्सान याचा बंदोबस्त करणे बाबे तपासणीस मुकर होऊन रवाना जाहाला आहे म्हणोन जवाबाचा येऊन रसीद जाहला असता ताहाल बंदोबस्त होत

नाही हुजूर चे मुल्खातील चोरटे व दरवडेकरी इन्सान कोकणात जाऊन बिसीयार खराबी करितात बोभाट बहुत आहे बईसबब पुन्हा कलमी केले आहे त्यास जुद चोरटे व दरवडेकरी याचा तलास लाऊन चौकसीन मुदेचोर सांपडतील त्यास दहशतलायख नसीहत होऊन कोकणचे मुलकात चोऱ्या व दरवडे न पडे ऐसा बंदोबस्त व्हावा म्हणोन आ पन्हाहानी केले ते इजआर जाहाले त्यास अजी आ शौकत पन्हाहाचे रसीद जाहाले हुजूर चे सरहद्दचे घाटास चौक्या ठेऊन व तपासणीस मुकर होऊन चोरटेचे बंदोबस्ता बाबे तालुकेत रवाना तपासणीस यानी गावगन्नाची चवकसी करून दाहापंधरा चोरटे धरले आहेत त्याचे दर्याप्तीत कोकण प्रांतातील दरवडेचा पत्ता ताहाल लागला नाही चोरटे सापडल ते त्यापैकी चारपाच असामी चोरास नसीहत दहशतीलायख जाहाली आहे हुजूर चे ताअलुकेतील चोरटे लोकांचा बंदोबस्त जुदबाजूद करणे बाबे तपासणीस यास व मामलेदारास ताकीद सक्त जाहाली आहे मागाहून आअवाली पनाहाकडे वकील हुजूर तून फिरस्ताद होत आहेत आशे मवाफीक मजमुनाची करतील त्यावरुन आशोकत पनाहास माअलूम होईल सु॥ इहिदे आशरीन मयातेन व आलफ रवाना छ १० माहे शवाल जियादयेचे निगाष्त आयेद आयाम मुदाम बाद

लफाफवरी

शोकत व अवाली पनाह अजम उलीयम चापलीन कमिशनर बाहादर कामयाब बाशद

चिटीवरी

अजम उलीयम चापलीन कमिशनर बहादर कामयाब बाशद–

लेखांक १५० तारीख २९–७–१८२०

हु॥

रु. नं. ५

अ. नं. ५६२

श्रीमन्महाराज छत्रपति दाम मोहबत हू

नियाजमंद मेस्तर ताकरीन साहेब बाहादूर आकटींग सर कलक्टर व पोलटक्याल येजंट सुभा धारवाड आंके येथील खैरीयेत रोषण होऊन हमेशा आलताफनामा इबलाग होऊन सरफराज करीत आल पाहिजे दरिअबिला विशाळगड नजदीक त्रिअनाली असा कोणी गाव आहे तेथे बंडवाले लोक जमा होत आहेत त्याच नांव गणपतराव पोवार १ रावजी पाटील काजगावकर १ मकाजी नाईक गाईकवाड १ बावाजी नाईक सिध्देश्वरकर सदरहू चार असामी बंडात मिलाल आहेत त्याच सरदार नरासिगराव राजे भोसले लोक जमा करुन घाटाखाली उतरोन कोंकणच मुलकात बंड कराब म्हणोन

तजवीज केल आहेत ऐस जाहीरेत आल आहे याच्च बंदोबस्ताविसी पुणेहून आ माहा-
राजास आल आसेल त्याप्रमाणे सदरी लोकास व सामीलातच्च लोकास
कोणकोणास धरून काये नसीयत जाहल ते निघारीष जाहाली पाहिजे माहाराजाच्च
तालुकेत ऐस लोक जितक असतील तितक्यास धरून च्चांगल तंबी पोहोच्चवाव आ
माहाराजाच सरकारातून बंदोबस्त न जाल्यास येकीन सरकारातून त्याच्च बंदोबस्त
होईल जिआदाचे अर्ज थैली रा।ना २९ माहे जुलाई १२३० फसली पौा
छ २३ माहे शोवाल सु॥ येईहिदे आशरीन मयातेन व आलफ.

लेखांक १५१ माहे जुलै इ. स. १८२०

श्री

अ. नं. ४७२

श्रीमन्माहाराज राजश्री छत्रप
ति स्वामीचे शेवेसी

विनंती शेवक मोरो बाजीराव चिटणीस सुभा मनोली च्चरण × × मस्तक ठेऊन कृतानेक शेवेसी विज्ञापना तागायत × × × माहे रमजान पर्यंत स्वामीचे कृपावलोकने करून शेव × × व ठाणे मजकुरचे वर्तमान यथास्थित असे विज्ञाप × × × हुजूरून राजश्री सरूपजी भोसले हुजरे व बाजी × × × × समागमे शंभर आसामी लोक सुधा ठाणे मजकु × × × न पाठविले त्यास ठाणे मजकुरी येताच्च स्वामीचे × × आज्ञे प्रमाणे त्यासी लोक सुधा ठाणेत घेऊन दरवाजेची क × × × कुलपे हुजरे याचे स्वाधीन केली आणि नवे लोकास निरोप दिल्हा येथील जखीरा काय आहे नाही त्याची यादी शेवेसी पेशजी पाठविलीच्च आहे त्याप्रमाणे जखीरा काय आहे तो हुजरे याचे स्वाधीन केला आहे येथील ठाणेतील दरवाजेस व तटबंदीस व बुरुजावर व बाहीर रेवणीवर चौकी पाहरेस काय लोक नेमून द्यावयाचे ते देऊन चौकी पाहरेचा बंदोबस्त केला आहे तैसेच्च पेठेतील दरवाजेस व नदीवर चौकीस संदी वगैरे ठेऊन बंदोबस्त केला आहे सरूपजी भोसले हुजरे समागमे मोर्तबी यादी लोकास खर्चास देणेकरिता सादर होऊन आली त्या यादीप्रमाणे हुजरे यैवज खर्चास मागत आहेत त्यास येथे उत्पन्न म्हणून सध्या कांहीं नाही लावणी संचणी करणेचे दिवस त्याप्रो गावकरी याशी कौल्करार अभयपत्रे देऊन लावणीसंचणी करणेस लाविले आहेत त्यास तूर्त कोणताही उपद्रव करिता येत नाही लावणी संचणी होऊन पुढे हंगामी × वसूल च्चालीस लागेल तोपर्यंत येथील ठाणेचा सिबंदी × वगैरे खर्च चालिला पाहिजे त्यासी येविसीची आज्ञा × × न येईल त्याप्रमाणे शेवक वर्तणूक करील × × × × त होय हे विज्ञापना दारुगो × × × ×

आहे म्हणून आज्ञापत्री आज्ञा जाहाली परंतु × × × ली आली नाही यास आज्ञा होऊन दारुगोली पाट × × × (विणार) धणी समर्थ सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक १५२ पौ तारीख ४-८-१८२०

श्री

रु. नं. ५
अ. नं. ५६३

श्रीमन्महाराज छत्रपति साहेब दाम मोहबत हू नियाजमंद उलीयम चापलीन साहेब कमिशनर बाहादर बाद नियाज मारुज आंके नियाजमंदाची खैरीयत रोषन होऊन हमेशा फिरस्ताद होऊन सरफराज करीत असिले पाहिजे दरविला विशाळगडानजीक बंड जाले आहे त्याचे बंदोबस्ताविसी पेशजी आ माहाराजास खत इजानिबाकडून इबलाग जाले आहे याशिवाय दुसरा मजकूर मालवणास जे चोर वगैरे लोक कैदेत होते त्यानी शिपाई यास मारून पळून गेले त्याचे नांवनिसीची याद आलाहिदा या पत्रात महसूर करून रवाना केली आहे या लोकाचा व विशाळगडाकडील बंडवाल्याचा कांही संदर्भ असेल व हे तेथे गेले असतील असे दिसते याजकरिता आ माहाराजाचे सरकारातून याची चांगली चवकसी होऊन या लोकापैकी ज्याचा शोध लागेल त्यास धरून कैद करून मालवणास पाटवावे आणखी सातारीयाचे माहाराजाकडील मुलकात ऐसा जाहीरनामा जाहाला आहे कीं जर कोणी लोक या बंडास मिलावया करिता आपले गावातून बाहेर निघतील तर त्यास धरून खचीत मारले जातील आणि पाटील वगैर गावचे कारभारी याणी या गोष्टीचा जाब करावा लागेल बंडवाल्याकडून कोणी फंदफितूर करावयासी किंवा बातमीस कोणास पाटवतील त्यास धरावे या बंडात मिला-वयाकरिता जे कोणी लोक गेले असतील अथवा पुढे जातील ते न सांपडले तर त्याचे घराची व सुलामाणसाची जप्ती करावी म्हणोन सातारचे मुलकात हुकूम जाहाला आहे याप्रमाणे आ माहाराजाचे मुलकात बंदोबस्त व्हावा हे चांगले दिसते विशाळगडाकडील बंड आ माहाराजाकडून लवकर न मोडले व मालवणचे बंदीवान पळाले आहेत त्यास आ माहाराजाचे मुलकात आश्रय होऊन राहिले आहेत असे समजण्यात आले तर कुंपणी सरकारातून बंड मोडावयासी व बंदीवान लोक धरावयास फौज रवाना होईल ज्यादाचे अयाम मेहरबानी मुदाम बाद.

(सही इंग्रजी)

पौ छ २४ माहे शोवाल सु॥ येहिदे अशरीन मयातेन व अलफ.

लेखांक १५३ तारीख ५-८-१८२०

हु०

रु. नं. ५

अ. नं. ५५१

अजम उलीयम चापलीन कमिशनर बहादर
कामयाब बाशंद

शौकत व अवाली पनाह शाहामत व दस्तगाह बाआदज इस्तियाक फिराव। मशहुद आके दरिविला हुजूर आ शोकत पनाहानी फिरिस्ताद केले ते छ १२ शोवाली रसीद होऊन बयावर मजमून इजहार जाहला हुजूर चे मुल्कातील चोर कोंकणात जाऊन दरबडे घालतात त्याचा बंदोबस्त जाहला पाहिजे बई-सबब कीं हाल इजानिबाकडून हुजूर इबलाग जाहाले आहेत लेकीन तहात कोकणेच मुलकात दरवडेचा बोभाट आहे त्याचे बंदोबस्ता-बाबे गोवरनर बहादर याचा हुकूम मुंबईहून आला त्यास ज्या घाटाने चोर उतरून कोंकणात जातात ते घाट बी तपसील निघारीष जहाले व याखेरीज आणखी बाऱ्या व खेडीच्या वाटा असतील त्या ठिकाणी मजबूद चवक्या इरसाल होऊन आमदरफ्त कुणी दगा लोकाची चवकसी दुरुस्त राहून चोरटे व मवास सापडतील त्यास नसीहत होत असावी रामोसी व बेरड व मांग याजवर बहुत जरब राहून चोरी कोठे न होय व कोक-णात चोर न जात ऐसा बंदोबस्त व्हावा राजश्री मोरेश्वरराव राजेश्री मोरेश्वरराव पंडित अमात्य बावडेकरी व राजेश्री माधवराव पंडित प्रतिनिधि विशाळगडकरी याजकडील तालुकेत चोर राहून दरबडे घालतात त्याचा बंदो-बस्त होत नाही याजवरून चोरास आश्रय त्याजकडून होत असेल असे नजरेस येत बइसबब हुजूर तून ताकीद निक्षून होऊन त्याचे मुलकात चोरटेस व मवास इनसानास थारा न मिले ऐसे जाहाले पाहिजे म्हणोन आ अवाली पनाहाणी मरकूम कलम केले ते जाहीर जाहाले त्यास हुजूर चे इलाखेतील घाट आंबा व घाट अणस्कुरा व घाट बावडा येथे चौक्या पेशआजी आशाहामत पन्हाहाचे येऊन रसीद जाहाले दरोबस्त सदरहू घाटास चौक्या ठेविल्या आहेत व चोर वाटेस चौक्या रवाना होऊन आमदरफ्त कुणी दगा लोकाची चवकसी दुरुस्त राखणेबाबे बंदोबस्ती जाहाली आहे आणि पंडित मोसूफ यासी चोरटेचा बंदोबस्त जुद करून आपले तालुकेत चोरास थारा न मिले ऐसे करणेबाबे दरविला आज्ञापत्री निक्षून आज्ञा जाहाली असे येविषीचे वगैर मजकुराची आज्ञा राजश्री मोरो बाजीराव चिटणीस यास होऊन आ अवाली पनाहाकडे रवाना केल आहेत त्यास आज्ञे मवाफीक करतील त्यावरून अशोकत पनाहास मालूम होईल सु॥

इहिदे आशरीन मयातेन व आलफ रवाना छ० २५ माहे शोवाल जियादेयेच निगारत आयद आयाम मुदास बाद

लेखांक १५४ तारीख १५-८-१८२०

श्री

अ. नं. ४७६

श्री भाऊ माहा

राज वडिलाचे शेवेसी

चरणरज आबाजी बलाल व येसाजी कृष्ण नि॥ इचलकर्जीकर घोरपडे दोनी कर जोडोन सं॥ नमस्कार विज्ञापना तागायेत छ ५ जिल्काद क्षेम असे विशेष किले सामानगड व भुदरगड व मनोहरगडचे वगैरे दुतर्फा आमल आजरे तर्फेत आहेत व आजरे तर्फेचा वगैरे बाबतीचा आमल किले नि॥ खेडयात आहे त्याची चौकसी आपले विद्यमाने होऊन वाजबी आमल जिकडील तिकडे द्यावा घ्यावा येसी हुजूरची आज्ञा जाहाली त्यास हारदू आमलाची चौकसी आपले विद्यमाने वाजबी होऊन आजरे तर्फेचा आमल किले निसबत खेडयानी निगेल तो त्याणी द्यावा किले नि॥ आमल तर्फ मजकुराकडे निवेल तो आजरेकर याजकडून देऊ सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

सन इहिदे अशरीन मयातैन व आलफ

लेखांक १५५ तारीख ७-१०-१८२०

श्री

रु. नं. २

अ. नं. ४०३

दस्तक श्रीमन्महाराज राजश्री छत्रपति सरकार राजमंडळ हुजूरुन ता॥ कमावीसदारानी व चौकीदारानी व रहदारानी व बाजेलाकानी व नावाडी पेटेकरीहाय यासी आज्ञा केली ऐसीजे दाहा आसामी चोर व बरोबर रखवालीस शंभर आसामी शिपाई हत्यारबंद व पाय स्वार करविराहून सातारीयास आले ते सद्रहू आसामी परत करवीरास जातात त्यास मार्गी हरकोणेविसी मुजाइम न होता जाऊ देणे हे दस्तक दाहा दिवसाचे मुदतीने दिले असे मुदत जाल्यानंतर नामंजूर मानणे जाणिजे छ २८ जिल्हेज सुा इहिदे आशरीन मयातेन व आलफ दुमत तरीख ७ अक्टोबर सन १८२०

लेखांक १५६ तारीख २५-१०-१८२०

श्री

रु. नं. १

अ. नं. २७४

यादी इकडील मजकुराची कलमबंदी बीत॥

सुा इहिदे आशरीन मयातेन व आलफ छ १७

माहे मोहरम रोज बुधवार

१ आम्ही पुणीयास येऊन पोहोचले नंतरी सविस्तर मजकूर स्वामीचे शेवेसी विनंतीपत्र लिहून जासूदजोडी पाठविलीच आहे त्याजवर मुंबईहून अजम पाटंजर साहेब नगरास जाणेकरिता येथे आले ते दापोडी पापोडीवर उतरले होते पुणे पासून दोन कोष आहे हे वर्तमान कळतच आम्ही व बापूजी पंत मिळोन त्यास भेटावयास करिता गेलो त्याची भेटी घेऊन खरखुषीची बोलणी परस्परे झाली नंतरी श्रीमन्महाराज मातोश्री आईसाहेब याचे व हुजूरचे खरखुषीचे वर्तमान व तुमचे तालुकेत आबादी आहे कीं नाही आता निपाणकर कसा आहे म्हणून सविस्तर मजकूर विचारिला त्यास आम्ही उत्तर केले कीं सरकार कुंपणीतून दोनी तालुके दिलेपासोन आबादनी आहे आता निपाणकर याणे उपद्रव करणेचा कथ तो किती आहे सरकार कुंपणी सारखे दोस्त आम्हास असता कांहीं चिंता नाही आपल्या ह्यावर स्तुत आहे याप्रमाणे बोलिलो नंतर बहुत खुष झाले श्रीची स्वारी मुंबईस जाणेकरिता येथे आली आहे म्हणोन बोलिलो त्यास त्यानी उत्तर केले मुंबई जावयाचे असलेस लवकर जावे म्हणजे बडे साहेब याचे भेटी होईल नाहीतरी बडे साहेब एका महिनेन गुजरातीत जाणार आहेत तिकडे गेले नंतर माघारी येण्यास तीन महिने लागतील याजकरिता निकडीने जावे म्हणजे भेट होईल याप्रमाणे बोलिले अजम च्यापलीन साहेब आटनऊ रोजानी येथे येणार त्यानी आपले लग्न केले व यानी आपले लग्नही मुंबईतच केले तुमचे आमचे भेटी बहुत दिवस जाले याप्रमाणे खरखुषीची बोलणी •च्यार घटकापर्यंत होऊन निरोप घेऊन आलो ते तिकडे कूच करून नगरास जावयाकरिता गेले निवेदनार्थ विनंती. कलम

१ अजम रांबसन साहेब याचे भेटीस श्रीचे स्वारीसुद्धा शनवारचे वाड्यात गेलो होतों भेटी होऊन खरखुषीची बोलणी परस्परे होऊन विडेपान घेऊन बिऱ्हाडास आलो पोर्णिमेचे दिवसी गेलो होतो निवेदनार्थ विनंती. कलम

१ अजम पाटंजर साहेब यासी बोलणे जाहालेला मजकूर सविस्तर श्रीसी सांगितला आणि बोलिलो कीं आता लवकर मुंबईस जावयाचे करावे म्हणजे गाट पडेल नाहीतरी पडणार नाही याप्रमाणे बोलून लवकर च्यार रोजात निघोन जावे त्यास राजश्री बाळाजी पंत दादा यासी बोलून त्याचे विचारे जावे याप्रमाणे श्रीनी ठरून दादासी बोलून ठरण्यात आणिले जे अजम चापलीन साहेब लवकर येतच आहे चारपांच रोजी येणार ते आले नंतरी त्याची भेटी घेऊन मुंबईस जातो म्हणोन सांगोन रांगणे प्रकर्णे राजश्री बच्याजीपंत याची येथे येऊन बोलणे चालीस लाऊन लवकरच निघोन जाऊ व सातारेहूनही अजम ग्रांट साहेबही तो पर्यंत आलेस येईल हे पाहून मग निघोन जावे याप्रमाणे श्रीनी ठरविले आहे दिपवाली जाहाले नंतर प्रतिपदेस अथवा द्वितीयेस निघणेचा मुहूर्त पाहात आहेत आम्ही लवकर निघोन जावे दिपवाली पर्यंत राहू नये गाट पडणार नाही याप्रमाणे दररोज बोलून जाणेची निकड करीत आहे निवेदनार्थ विनंती. कलम

१ अरबस्थानाकडील वकील मुंबईस येऊन तहचे बोलणे बोलोन तह झाला पलटने मुंबईस जमली होती ती जिकडील तिकडे रवाना होऊन जात आहेत याप्रमाणे वर्तमान ऐकले ते निवेदनार्थ विंनती. कलम

१ राजेश्री बालाजी पंत दादाही श्रीचे स्वारीसमागमे मुंबईस येत आहेत निवेदनार्थ विंनती. कलम

१ मुंबईस राजश्री बिसाजी पंत कारकून यासी श्रीनी पाठविले होते ते तेथे जाऊन त्याजकडून जासूद पर्वाचे दिवसी येथे आले त्यात मजकूर बडे साहेब याची भेटी घेऊन थैली दिली आणि श्रीची स्वारी आपले मुलाकतीकरिता पुणीयास आली आहे तेथून मुंबईस येत आहेत फक्त आपली भेटी घ्यावी हेच मानस आहे वरकड कामकाजाचा मजकूर च्यापलीन साहेब यासी बोलतच आहे ते करून देत आहेत याप्रमाणे ते बोलिले त्यास उत्तर आणवा म्हणून बोलिले त्याप्रमाणे मजकूर लिहिला होता स्वारी लवकर यावी ऐसे बिसाजीपंत याणी लिहिले होते निवेदनार्थ विंनती. कलम

६

लेखांक १५७ तारीख ८-११-१८२०

श्री

अ. नं. ४७८

श्रीमन्माहाराज मातुश्री आईसाहेब याणी राजमान्य राजश्री मोरो बाजीराव चिटनिवीस यासी आज्ञा केली ऐसीजे साहेबाचे शेवेसी तुम्ही विनंतीपत्र व कलमबंदीची यादी यैस संक्रू कदम याजबरोबर पाठविली ती साहेबाचे शेवेसी प्रविष्ट होऊन लेखनार्थ निवेदन जाहाला श्री नी.कारकुन मुंबईस गौरनर बाहादर याजकडे पाठविला होता त्याची भेट होऊन बोलणे जाहालेला मजकूर वगैरे मजकुराची कलमबंदी लेहून पाठविली ती सविस्तर निवेदनात आली अशास श्री ची स्वारी मुंबईस सत्वर निघोन जाण्याविसी श्री स विनंती पत्री लिहिले आहे तरी तुम्ही विनंती करून स्वारी सत्वर मुंबईस घेऊन जाणेच करावे दिवसगत होऊ नये मौजे भोज व येकसंबे व लाट रांगोली व कागल तालुका यैसे जाबसाल होऊन यावयाचे आहेत याजविसीची माहितगारी तुम्हास आहेच तरी श्री ची स्वारी मुंबईस गेलेनंतर तेथे बोलण्या चालण्यात श्री स सूचना वरचेवर करून हे जाबसाल उलगडणेत येत येसे बोलणे बोलोन उलगडे तो अर्थ करणे यातील कांही तरी कामे उलगडोन द्यावी यावी यैसे व्हावे श्रियासह चिरंजीव विजईभव राजश्री छत्रपति याचे स्वारी सुधा साहेबाची स्वारी श्री चे वाडीस श्री गुरुद्वादसीकरिता जाहाली होती द्वादसी होऊन त्रयोदसीस स्वारी करवीरास आली तुम्हास कलावे वरचेवर तिकडील सविस्तर वृत विंनती

पत्री लेहून पाठवीत जाणे जाणिजे सु॥ इहिदे आशेरीन मयातैन व आलफ रवाना छ १ माहे सफर बहुत काय लिहिणे.

लेखन

बार

सीमा

लेखांक १५८

इ. स. १८२०-२१

श्री

रु. नं. ५

अ. नं. ५४५

यादी बोलण्याची कलमबंदी सु॥ इहिदे अशरीन मयातेन व अलफ

२ वाडीकर सांवत प्रकर्णी जाबसाल होणे

१ किल्ले प्रसिदगडचा तनखा आजपावेतो चाळीस वर्षे वहिवाट चाल्त आले प्रमाणे चालू व्हावा.

१ किले सोनगडचे तनखेत वाडीकर उपद्रव करितात त्यास ताकीद होऊन वाडीकर याचा उपद्रव न होता किलेचा तनखा किलेकड चालाव. कलम

२

२ सालसी महाल पैकी जाबसाल माल्वणास अजम शा साहेब यासी पत्रे

१ किल्ले बहिरवगड येथील गिरदागीर्द सभवतील झाडीचे रान शिवशाई पासून आजपावेतो दरोबस्त किल्ला निसबत गडकरी लोक यानी तोडून अनभवावे याप्रमाणे चालत असता हल्ली मौजें (नेरली ?) नरडवे ता॥ सालसी येथील गांवकर यानी ते रान तोडू लागले सबब किल्ला निसबत गडकरी यानी मनाई केली त्यास नरडवेकरी यासी रान न तोडणेविसी ताकीद व्हावी हेविषी पेशजी नरडवेकर (नेर्लीवकर ?) यानी सन इहिदे सितेनचे साली रानाविसी खटला केला होता तेसमयी नारो त्र्यंबक सुबेदार जजेरे विजेदुर्ग नि॥ पेशवे यानी गावची पाहाणी केली त्या जमाबंदीत किल्ले निसबत रान वजा देऊन किल्लेकडे चालले प्रमाणे चालो देणे म्हणोन सुभेदार निसबत पेशवे यानी ताकीद दिली होती हल्ली सालसी माहाल सरकार कुंपणीचा आहे त्यासी नरडवेकर (नेरली-वकर ?) यासी ताकीद होऊन पेशजी वहिवाटी प्रमाणे चालवावे म्हणोन पत्र

१ किल्ले प्रसिद्धगड येथील वरघाटचे गाव मौजे असणे व शेलप व सावर्डे तिन्ही गावचे रान खाली आहे त्यास सालसी माहालचे गावालगत आहेत मौजे जाकर-

वडे (भिरवडे) व मौजे कुबवडे व मौजे नाटल व मौजे नरडबे हे गावकरी खटला करितात त्यास खटला न करणेविसी ताकीद पत्र द्यावे.

२

१ विशाळगडकरी हुजूर इलाखेतील त्याचा अमल खाली कोकणात रत्नागिरी तालुकेत आहे त्यास दुतर्फा अमलाची वाटणी होऊन येकतर्फ अमल व्हावयाचा त्याचा जाबसाल हुजूरचे कारकुनाचे विद्यमाने एकतर्फी अमल तोडून द्यावा आणि विशाळगड निसबत कोणताही जाबसाल पडेल तो हुजूर नि॥ कारकून याचे विद्यमाने होत असावा म्हणोन बाणकोटचे साहेबास पत्र.

१ हलकर्णी येथील ठाणेतील हिमतबहादरीचा बाबचा ऐवज हेरे गंदर्वंगड तालुकेत येणे ती बाब पेशजीपासून चाल्त आली आहे मध्ये निपाणकर यानी हुजूरचा तालुका घेतला तेवेळेस हलकर्णीचेही ठाणे घेतले होते तेव्हा बाबेही त्याजकडे चाल्त होती नंतर पुणे मुकामी बडे साहेब यानी दर्याप्ती पाहून एकशेहे दीड गाव बा॥ सन सलासचे साली सोडचिटी दिली आहे त्याप्रमाणे बाब आजपर्यंत चाल्त आली अलीकडे तीन वर्षांत बाबेचा ऐवज देत नाहीत येविसी धारवाडास टाकरीन साहेबासही वकील बोल्त आहेत त्यासी गंधर्वगडकरी यासी ताकीद होऊन बाबेचा ऐवज चाल्त आल्या प्रमाणे हुजूरचा हुजूर द्यावा म्हणून टाकरीन साहेबास पत्र. कलम

१ मेहरबान बडे साहेब मुंबईस जातेसमयी ईश्वरभाई याचा ऐवज उलगडा करून देणेविसी साहेबास सांगितले होते त्याप्रमाणे ऐवज पोचलाच असेल तरी त्यास ताकीद करून खते देवावी. कलम

१ किल्ले भरतगड प्रकर्णी मजदूर गावगन्ना ब्राबीविसीचा जाबसाल मालवणास विचारिला असता कोडतात अर्जी घालावी तेथे दर्यात्फ होऊन कामे सोयीस लागतील असे म्हणतात येविषी मालवणचे साहेबास पत्र वाजबी बाकी असेल ती देणेविसी. कलम

१ निळकंठराव सिंदे हुजूरचे इलाखेतील सरंजामी यानी हुजूर रुजू होऊन हुजूरचे आज्ञे प्रमाणे वर्तणूक करीत जावी हे न करिता सेनाखासकील याचे × × मारीले तली वगैर येऊन खटले करितात त्याचा बंदोबस्त हुजूरून होत आहे त्यास मशारनिलेस हुजूर रुजू होऊन हुजूरचे आज्ञे प्रमाणे वर्तणूक करणेविसी ताकीद व्हावी. कलम

१ दत्तवाडकर घोरपडे हे हुजूरचे सरंजामी त्यास हुजूर बोलाविले असता येत नाहीत त्यास जे समयी बोलावणे येईल तेवेळेस हुजूर येत जावे हेविषी ताकीद व्हावी. कलम

१ मौजे म्हापणे व आंबेरी हे दोन्ही गाव श्री बाबा माहाराज याजकडे इनाम आहेत त्यास निमे अमल आंबेरीचा भरतगडा पैकी चालतो व निमे अमल मालवण पैकी चालत नाही तो चालवाव म्हापणचा अमलही चालाव येविषयीचे कागदपत्रे बडे साहेब याजकडे पाठविली होती त्यानी आपणाकडे पाटविली आहेत त्यास दोन्ही गावचा अमल श्रीकडे चालता होई ते करावे. कलम

१ मौजे यमगर्णी प्रांत कागल हा गाव पन्हे याजकडे इनाम हुजूरुन बहुत दिवस चालत आहे तो गाव हल्ली कागलकर यानी खठला करून घेतला आहे तो गाव हुजूरने त्याचा त्याजकडे पेशजी प्रमाणे देविला जाईल आपणास समजावे म्हणोन इतला केला आहे. कलम

१ दादो आनंदराव यानी आपला ऐवज भिरडी व सिरगुराकडे येणे आहे म्हणोन दोनी गावास तगादा बसवून उपद्रव करितात त्यास सदर्हू दोन्ही गाव हुजूरचे इलाखेतील असता परभारे गावास उपद्रव करणेंचे कारण काय देणेवेणे असलेस हुजूर येऊन मजकूर समजून द्यावा ते न करता परभारे गावासी खटला करितात त्यास गाव खराबीस आले आहेत कुलास देणेस ताकद नाही असी देणी बहुत आहेत त्यास ताकद नसलेस कसे निभावेल ऐसे जाहलेस प्रांताचा उटाव होईल यास्तव कर्जदाराची फिर्याद मनावर घेऊ नये येविसीचा बंदोबस्त असावा. कलम

२ दस्तके

१ श्री याची स्वारी व आकाराम यादव हवलदार माहायात्रेस जाणार त्यास दस्तक माफीचे व सांभाळून नेण्यास पाहारा असावा.

१ बळवंतराव चिटणिवीस खाली कोंकणात देवदर्शणास जाणार त्यास आलाहिदा यादी आहे त्याप्रमाणे दस्तक

२

१ शामराव पागे याचे येणे मिरजकर व लकडे याजकडे आहे त्यास सुरळीतपणे फडशा करून देत नाहीत त्यास वाजबी फडशा करून देणेविषी तार्कीदपत्र.

१ मौजे गलतगे प्रांत हुकेरी हा गाव साठे याजकडे चालवणेविसी ताकरीन साहेब याची थैली हुजूर आली त्यास गाव साठे याजकडे बहुत दिवस चालला नाही येविसी मंडरोल साहेब यानी चवकसी करून गाव साठे याजकडे न चालाव ऐसे धरून गाव हुजूर आहे त्यास येविसी मनावर घेऊ नये.

लेखांक १५९ तारीख ४-१-१८२१

हु०

रु. नं. ५
अ. नं. ५८८

श्रीमन्माहाराज छत्रपति साहेब दाम मोहबत हू
आज नियाजमंद ग्रांटसाहेब बहादूर

मरकुम होत असावी दिगर ठाणे मलकापूर प्रांत करवीर येथील मांग श्रीमन्महाराज छत्रपति साहेब याचे इलाख्यात मौजे आयतवडे तर्फ सिराळे येथे राहून आसोचे तालुक्यात दावा व लूट करितात म्हणोन विशाळगडकर याचे पत्र पेशजी आले त्यापैकी हली चार आसामी मांग सापडले ते कैद करून जबान्यासुद्धा पाटविले तरी त्याचे गुन्हया प्रमाणे पारपत्य व्हावे आणि त्याज पैकी जिवाणसी सोडावेयाजोगे असामी असतील त्याचे जामीन घेऊन जामीनकतबे इकडे पोचवून द्यावे रा। ता। ४ जानेवारी सन १८२१ इसवी मु॥ छ २८ रोवल

(सही इंग्रजी)

पौ छ १ माहे रा॥कर उर्फ पौषमास सन इहिदे आसेरीन मयातेन व आलफ शके १७४२ मु॥ करवीर.

लेखांक १६० तारीख ८-२-१८२१

श्री

अ. नं. ४८१

पुण्येसील सुंदराबाई घाटगे यासी आज्ञा केली यैसीजे राजश्री नारायण पिसाल यास मुलेमाणसेसुधा चिखली येथे ठेऊन घेऊन तेथून तुम्ही जमाव करून देऊन मौजे मतेगे येथे ठाणे घातले म्हणोन हुजूर निवेदनाल आले तरी तुम्ही पिसाल याजला आश्रा देऊन गैरहुकुमी हुजूरचे तालुकेत ठाणे घातले ही गोष्ट ठीक नव्हे तरी हली हुजूरने आज्ञा करून गंगाजीपंत कारकून व राजश्री सखाराम नीलकंठ पाठविले आहेत याचे स्वाधीन पिसाल यास व त्याचे मुलेमाणसास स्वाधीन करून हुजूर पाठवून देणे आणि मतेगे येथे तुम्हाकडील लोक गेले आहेत ते माघारी सत्वर आणवणे जाणिजे सु॥ इहिदे आसेरीन मयातैन व आलफ रा॥ छ ४ माहे जोवल बहुत काय लिहिणे.

विलस

लेखांक १६१ तारीख ७-५-१८२१

श्री

अ. नं. ४८३

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके १४७ वृषा नामसंवत्सरे वैशाख शु॥ शष्टी रविवासरे क्षेत्रिय कुलावतंस श्री राजा शंभू छत्रपति स्वामी याणी

राजश्री

सिका सिका देशमुख व देशपांडे का॥ई-
चलकर्जी यासी आज्ञा केली ये-

सीजे राजेश्री नारायणराव बिन रनोजीराव खानवेलकर याणी करवीरचे मुकामी स्वामी-सनिध विनंती केली कीं आपण कुटुंबवछल आणि साहेबाच शेवा एकनिष्ठेन केली आहे आपले कुटुंबाचे बेजमीस येक गाव इनाम करून देवून चालविणार साहेब धनी समर्थ आहेत म्हणून विदित केले त्याजवरून मनासी आणिता सेवा निष्ठेने केली हे जाणोन स्वामी याजवरी कृपालु होऊन कुटुंबाचे बेजमीस मौज रेणदाल का॥ इचलकर्जी हा गाव देहे रास येक आजरामरामत इनाम कुलबाब कुलकानू हालीपटी व पेस्तरपटी जलतरु-पाषाणनिधिनिक्षेपसहित खेरीज हकदार व इनामदार करून दिल्हे आसे तरी तुम्ही मौजे मा॥र हा गाव पूर्णमर्यादे प्रो चतुःसीमापूर्वक स्वाधीन करून इनामगाव यासी व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने चालवीत जाणे आणि सालदरसाल नवीन सनदेची उजूर न धरिता या सनदेची तालीक लेहून घेऊन आसलपत्र भोगवटेस खानवीलकर याजकडे देणे जाणिजे निशेष.

मोर्तब आसे.

लेखांक १६२ तारीख २१-५-१८२१

श्री

अ. नं. ४७०

आईसाहेब माहाराज

दाम

नियाजमंद मेस्तर ताकरीनसाहेब बाहादर आकटिंग सर कलक्टर व पोलटक्याल येजंट सुभा धारवाड यानी नियाजमारूज आंकी नियाजमंदेच खैरीयत रोशन होऊन हमेषा आलताफनामा पाठऊन सरफराज कराव दरीवला सादर केल ते रसीद होऊन मसरुल हासल जाहाल श्रीमन माहाराज छेत्रपति याणी सिंव्हासनारूढ होऊन नवसिका ज्यारी केलेत मुबारकबादीच खिलआत पारचे व जवाहीर इजत दस्तगाहा नारो गिरमाजी वकील व मोरोजी कणसे व जुई (?) याज हमराहा इनायेत जाहाल ते पोहचून बिसिया व खुषी हासल जाहल

श्रीमन्माहाराज छत्रपति यानी नवसिका ज्यारी केल त्यास सरकारातून खिलआत पाचें व जवाहीर वकील याज समेत रवाना केल आहे येऊन दाखल जाहाल त्यास आल्ताफ-नामा इबलाग व्हावा जियादा आयाम कामरानी मुदाम

बाद तारीख छ २१ माहे मे १२३० फसली.

(सही इंग्रजी)

लेखांक १६३ तारीख २-६-१८२१

हु॥

रु. नं. ४

अ. नं. ६१६

श्रीमन्महाराज छत्रपति साहेब दाम मोहबत हू

अज न्याजमंद हनराबल मौट इष्टुवार्ट इल्पीष्टन प्रजिदेत गवरनर जंजिरे मुंबई बादनियाज मारुज मशहूद आंके नियाजमंदाची खैरीयत रोशन होऊन हमेशा फिरस्ताद करून सरफराज करीत असिले पाहिजे दर्रावला मौजे वझरखोल तर्फ संगमेश्वर तालुके रत्नागिरी हा गाव रामचंद्रसेट पाथरे साऊकर यास इनाम करून दिला होता तो हुजूर चे पाथरे साहुकार कदीम पदर आहेत बईसबब साहुकार याचा इनाम गाव कदीम सनदे मवाफिक चालवावे म्हणून आ माहा-राजाही छ २७ जिलकादचा अलताफनामा इबलाग केला तो बवख्त नेक रसीद होऊन शादमानी हसील जाहाली ऐसीयास सरकार इंग्रेज याचे दोस्त आहेत त्याचा मनोदय असेल तो पूर्ण करावयाकरिता बहुत खूष आहो परंतु या सरकारचा शिरस्ता असा आहे जे हल्ली मुल्क काबीज केला तेथील इनाम पेशवे सरकारातून फार दिवस जप्त जहाले असेल ते मोकले करून देत नाही रा। छ १ माहे रमजान सु॥ इहिदे इष्षरीन मयातेन व आलफ मुताबिक ता २ जून सन १८२१ इसवी जादेचे अयाम कामरानी मुदाम बाद

(सही इंग्रजी)

पौ छ ७ माहे शोवाल सु॥ इसने आष्षरीन मयातेन व आलफ मु॥ करवीर.

लेखांक १६४ तारीख २-६-१८२१

श्री

अ. नं. ४८९

श्रीमन्माहाराज राजश्री छत्र
पति स्वामीचे शेवेसी

विनंती शेवेसी आज्ञाधारक राघो जगनाथ ठाणे चिकोडी कृतानेक शेवेसी विज्ञापना

तागायत छ १ माहे रमजानपावेतो साहेबाचे कृपावलोकने करून सेवकाचे व ठाणे मजकूरचे वर्तमान येथास्थित असे शेवेसी विज्ञापना येसीजे गनीमाकडील लोक थोडेबहुत रायबाग व लगतचे खेडयास आले म्हणून वर्तमान कलताच ठाणे मजकूरचे लोक जमाव करून सवेच रातोरात रवाना केले लोक जाऊन भिरडीनजीक राहून भिरडीकरास सावध असणे आम्ही सुभेहून कुमकेस आलो आहो पाहीजे असल्यास लोक थोडेबहुत ठाण्यात घ्यावे आणि आम्ही तुम्ही मिलोन गनीमाचे लोकावर जाऊ ऐसे म्हणत असता ठाणे मजकुरचे लोक व कारकून आमचे लोकास ठाण्यात घेतले नाहीत आपणहि अवसान धरून राहिले नाहीत ठाणे टाकून गेले त्या ठाण्यात गनीमाचे लोक येऊन सिरले रायबाग येथील मजकूर ठाण्यात कमाविसीस सिनापा म्हणून जकात्या येथील राहाणार त्यासीच कमावीस सांगितल होते तो ग्रहस्त गनीमाचे लोकास लोक सुमार दाहा आत घेऊन दुसरे दिवसी मागून त्याचे लोक आणऊन ठाण्यात घालून बलकाविले आहे त्या गावचे लगतेस सुभेकडील खेडी पाच च्यार होती त्यातहि लोक घातले आहेत या प्रांतात दंगा उठून खेडी तजावजा जाहाली आहेत साहेबाचे कृपेकडून निवारण होईल हशेम लोकाचा नित्यानी तंटा बहुत यैवज तो नाही सेवकाच लक्ष साहेबाचे पायासिवाये दुसरे दैवत नाही. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक १६५ पौ तारीख १४–६-१८२१

हु.

रु. नं. ४

अ. नं. ६१८

अस्मत पनाहा खुलतईफत दस्तगाहा फर्याय जीशाण बुलंद मकान महाराज आईसाहेब दाम षजाकत अजहू न्याजमंद अनरावल मोट इस्टवार्ट इलफीस्टन प्रजिदेंत गवरनर बहादूर जंजिरे मुंबई बाद नियाज मारुज मशहूद आंके नियाजमंदाची खैरीयत रोषण होऊन हमेषा

फिरस्ताद करून सरफराज करीत असिले पाहिजे दरबिला करवीरकर माहाराज व त्याचे वारीष व न्यायनिसी याच्या आणि इतर कोणी संस्थानिक याच्यामध्ये काहीयेक तफावत पडला असता त्याचा फैसल करून द्यावयास इंग्रजी सरकारने दखलगिरी करावी म्हणोन करवीरकर छत्रपति माहाराज याजबराबर तह ठरला आहे त्या नववे कलमात करार आहे कोटकिल्ले स्वाधीन घ्यावे व किल्याचे खर्चाबद्दल तनखा तोडून वसूल दिला होता तो आदा व्हावा हेविषई करवीरकर व संस्थान वाडी यामध्ये लढा पडून कित्येक साले वैमनष्य व लढाईचा मुखदमा चालला होता तो फैसल करून द्यावयास्तव सदरहू येकतीयारा प्रमाणे फार दिवस सरकार इंग्रजाकडून तजवीज चालली आहे आणि बहुत दिवस प्रयत्न आहे परंतु त्या लढयाविषयी कोणतेही संस्थानाकडून वाजबी हिषेब मिळाले नाहीत म्हणून इजानेबास जरूर होऊन तनखा न द्यावयाचा दावा व ज्याकडे प्राचीन

भोगवटा त्याकडे चालवाव हे मनास न आणून हल्ली सेवटची कित्येक साले भोगवटा चालला आहे तो वाजबीचे रुहीने इन्फीसाल होऊन खचीत केला आहे किल्ले नरसिंव्हगड व प्रसिद्धगड व भरतगड हे करवीरकर याचे असे ठरऊन दिले ते तहचे नऊ कलमाचे करारावद्दल व वाजबी प्रमाणे आहे सांप्रत किल्याचे खर्चास कित्येक तर्फेतील वसूल होतो त्याचा सरासरीमात्र वसूल कोल्हापुराकडेस लाऊन द्यावयाचा तो न देता वांध्याचे गावचे नकी वसूला पैकी किल्यास दरसालचे उत्पन्न किंवा गावचे आकाराचे बेरजे पैकी निमोनिम हिसा द्याव हे गफलतीने ठरले होते त्यास कलमे करितो जे सदहू प्रमाणे फैसला करून द्यावा म्हणून आपणाकडील वकीलास निक्षून ताकीद पाठवावी त्या मध्ये कांहीं तपावत होणार नाही किल्यास ऐवज किती द्यावयाचा ठरेल तो सालदरसाल आदा होण्याचा बंदोबस्त केला जाईल कदाचित खातीरखा हमीदार मिलोन तसा बंदोबस्त न जाल्यास मुलूख लाऊन देविला जाईल इनामदाराचा बंदोबस्त भजम रीड साहेब यासी मिलोन करून द्यावयाकरिता आपणाकडील वकीलास ताकीद व्हावी ज्यादेचे अयाम कामरानी मुदाम बाद

(सही इंग्रजी)

पौ छ १३ माहे रमजान सु।। इसने आषरीन मयातेन व आलफ जेष्ट शु।। पौर्णिमा मुकाम करवीर.

लेखांक १६६

पौ तारीख २४–६–१८२१

श्री

रु. नं. ४

अ. नं. ६२१

श्रीमन्महाराज छत्रपति साहेब दाम सोहबत हू नियाजमंद उलीयं च्यापलीन साहेब कमिशनर बहादर बाद नियाज मारुज आंके नियाजमंदाची खैरीयत रोषण होऊन हमेशा फिरस्थाद करून सरफराज करीत असिले पाहिजे दरविला किल्ले प्रसिधगड व नरसिंव्ह गडकरी यानी गावगना पासून ज्यास्ती घेतात प्राचीन मर्यादा प्रमाणे घ्यावे म्हणोन वाडीकर याजकडून तक्रार पडून त्याचे फैसल्याकरिता किल्लेकरी यानी हिशेब समजाविले त्यावरून फैसल करण्यास संशय येऊन या विद्यमानास गौरनरसाहेब बाहादर जंजिरे मुंबई यास लिहिण्यात आले या विद्यमाने गोरनर साहेब बहादर याचे हुकूम बमोजीब कलमी करण्यात येत आहे कीं सदरहू मुकदमा फैसल करणेबद्दल मालवणात राहणार सरदार यास हुकूम केले आहेत साहेब मवसूफ यानी तकरार आहे ते गावकरी मार्फत किलेकरी याजकडे व वाडीकराकडे वसूलाचा भोगवटा कैसे चालत आहे त्याची चवकशी करून भोगवटा चालिले प्रमाणे सरासरी पाहून दुतर्फेचा ऐवज निवडून किलेकरी घेणेचे ऐवजास निराळे गाव

तोडून देऊन आईदा तकरार येईनासे फैसल करून देतील बाकी गाव वाडीकराकडे राहातील म्हणजे बीन तकरार दुतर्फा खलष राहाणार नाही हमेषा फिरस्ताद होऊन नियाजमंदाचा दीलताजा करीत असिले पाहिजे ज्यादाचे मेहेरबानी मुदाम

(सही इंग्रजी)

छ २३ रमजान सु॥ इसन असेरीन मयातैन व आलफ

लेखांक १६७ माहे जून इ. स.१८२१

श्री

तालीक

रु. नं. १

अ. नं. २७६

यादी श्री कडे पुणे व मुंबईस गेले तेथे मेहेजवानी बहादर लोकास केली त्याबद्दल खर्च जव्हाहीर व कापड खरेदी केले त्याची यादी आलाहिदा श्रीकडून आली आहे त्या देणेस ऐवज नेमून देविला सु॥ इसने आश्रीन मयातेन व आलफे माहे रमजान उर्फ जेष्ट मास शके १७४३ वृषानाम संवत्सरे चांदवडी बेरीज रुपये

यासी येवज नेमिला बो

किता चांदवडी रुपये	किता चांदवडी रूपये
२००० किले सामानगड	५००० सुभा चिकाडी
१२५० किले भुदरगड	५००० सुभा मनोली
२५० संस्थान पनाला	२५० किले मनोहरगड
१२५० ठाणे सिरोल	७५८ खासगी मामला
२५० किले प्रसिद्धगड	२०० ठाणे आलते
२०० खोची	२०० धर्म संवस्थान
२०० हलकर्णी	२०० लहू पवार हुजरे याजकडील गावगना पौ
५४००	११६०८

तेरीज रु चांदवडी

१७००८

लेखांक १६८ तारीख १७–७–१८२१

अ. नं. ४९१

फयुजात इलाही शामिल हाल आजम उलीयम
च्यापलीन कमिशनर बाहादर रोज आफजुबाद

अजीसोब श्रीमन्माहाराज मातुश्री माहाराजगिसणी सुंदरा आईसाहेब बाआदज दुआ आंके दरिविला श्रियासह चिरंजीव विजईभव राजश्री राजे आबासाहेब छत्रपति याजवरी गर्दी मोहिते सिलेदार याणे आशाढ वद्ये द्वितीया बुधवारी तिसरे प्रहरी करून तमंचेची गोली पोटात मारली ती पार जाहाली बाआदज तास रात्री राजे आबासाहेब छत्रपति याही कैलासवास केला

बरकड मजकुराची आज्ञा राजेश्री बापोजी सिवराम यास फर्मावून इबलाग केले आहेत जुबानी करतील त्यावरून आं बाहादरास माअलुम होईल सु॥ इसने अशरीन मयातेन व अलफ रवाना छ १६ माहे शोवाल जियादा काय लिहिणे.

आषाढ वद्ये द्वितीया इंदुवार छ १५ माहे शोवाल
सु॥ इसने अशरीन मयातेन व अलफ श्रीमन्माहाराज माहाराज याही तास रात्री केलासवास कला.

जन्मशक	वर्षे	माहे	दिवस
	२०	.३	.२४
थोरले माहाराजानी कैलासवास केल्यावर राजे आबासो माहाराज याही राज्य केले. सन साल सदरहू मजकूर.	८	.२	.२४

लेखांक १६९ तारीख १८–७–१८२१

श्रीगणपती जयंति

रु. नं. २

अ. नं. ४०५

पौ छ १८ माहे शोवल शु॥ इसने आशेरीन मयातेन व आलफ
श्रीमन्महाराज मातोश्री आई
साहेब साहेबाचे सेवेसी

टीप :—छ १५ सवाल इंदुवार हा तारीख १६–७–१८२१ इसवी रोजी आहे.

विनंती शेवक चिंतामणराव पांडुरंग कृतातेक विज्ञापना ता। छ १७ सवाल पर्यंत आपले कृपावलोकने करून वर्तमान यथास्छित आसे विशेष मोहिते याची कटकट राजवाड्यात होऊन कांही मारामारी जाहाली म्हणोन ऐकिले त्याजवरून मुजरद माणसे पाटविली आहेत तर सविस्तर त्याहावयासी आज्ञा जाहाली पाहिजे सेवेसी विदित होय हे विज्ञापना.

लेखांक १७० तारीख १८-७-१८२१

श्री गणपती जयंती

रू. नं. २

अ. नं. ४०८

पौ. छ. २ माहे जिल्काद सु॥ इसने आशेरीन मयातेन व अलफ

श्रीमन्मातोश्री आईसा-

हेब साहेबाचे शेवेसी

विनंती शेवक चिंतामणराव पांडुरंग कृतानेक विज्ञापना ता। छ १७ सवाल पर्यंत आपले कृपेकरून क्षेम असे विशेष मोहिते व भोसले याची राजवाड्यात कटकट होऊन श्रीमन्माहाराज यास गोळी लागोन ते कैलासवासी जाहाले म्हणोन समजले त्याजवरून चितास बहुत खेद जाहाला ईश्वरे अनुचित केले होणारास उपाय नाही विवेक करावा येविसी राजश्री केसो गणेश पाटविले आहेत विनंती करतील शेवेसी विदित होय हे विज्ञापना.

सूची भाग ५

व्यक्तींपुढील आंकडे लेखांकांचे आहेत.

अचिसन, इंग्रज बहादर करवीर छत्रपति महाराजांचे जाबसाल उलगडून देणें १४७

अमृतराव सिंदे, ऐतिहासिक मजकूर असलेला करीणा ४९

अंताजी गंगाधर ३१, ३५; ४५, ४६, ५२

आऊबाई घाटगे, सर्ज्याराव तुळजापूर यात्रा ३०, ७३

आनंदराव मल्हार १९

अप्पा देसाई जाधव, चिंचणीकर ५१, ६२

आवाजी देसाई तालुका चंदगडे ५०

आपाजी लक्ष्मण, निपाणकरांकडील १९, ४६, ११७, ११९

आपाजीराव कृष्ण ४२

आवाजीराव लिंगोपत ८१

आबाजी घोरपडे, अमिरुलउमराव ५३

आबाजी बलाल, इचलकरंजीकराकडील आजरे तर्फेतील दुतर्फा अमलाबाबत चौकशी १५४

आबाजी भोसले १०८

आबाजी महादेव काळे १३१

आंताजी माहादेव ५४, ५६

आंदोजी पाटील, यमगेकर १४१

इलफिरस्तन, मोट इष्टवारीट करवीर छत्रपति महाराजांचे जाबसाल उलगडून देणें, २, ३, ४, ५, १२, १४, १७, २५, २६, २८, ३१, ३५, ४४, ४५, ४६, ४७, ५२, ५५, ६३, ६४, ६६, ७४, ७५, ८०, ८१, ९५, ९६, ९७, ९८, १२२, १३२, १४५, १४८, १६५, १६६, चोर, मांग, बेरड यांचा बंदोबस्त ११९, १३४, १६३; कोंकणच्या मुलुखांतील बंडवाल्यांच्या बंदोबस्ताबाबत १५०; १५२, १५३, १५६

उदाजी घाटगे, सर्ज्याराव मालवणबाबत इंग्रज बहादराशीं बोलणें ४, ३४, ४०

उदाजीराव चव्हाण १४६

कल्याण कृष्णाजी पेशव्यांकडील २८, २९, ३०, ३१ निपाणकरांच्या उपद्रवाचा तपशील ३१, ३८, ४४, ४५, ५९, ६१, ६३, ६९

कासीराव कोकरे, गोखल्याकडील लष्कर घेऊन बदामीस कामगिरीवर ११४

कुल्स कर्नल, छत्रपति महाराजांचे जाबसाल उलगडून देण २, ३, १४, ५५, ७५, ८२, मालवण किल्ला व परगणा त्याबाबत बोलणें ४, ५

कुसाजी राजे महाडीक १२६

केसो गणेश, छत्रपति संभाजीमहाराजांच्या मृत्यूचें वृत्त १७०

कोर्टलांड, ब्रिटिश एन्व्हॉय, बंदर गोवा करवीर छत्रपति महाराजांचे जाबसाल उलगडून देणें ७१

कृष्णाजी रामचंद्र ८०

कृष्णराव गोपाळ, इंग्रजाकडील ४२, ४३, ४५, ७४

कृष्णराव घोरपडे, अमिरुलउमराव ४८, ६७

कृष्णराव वकील ८
क्रीन बहादर, मेजर १३४
खुरशेदजी शेट मोदी, करवीरकर छत्रपतींचे जाबसाल उलगडणें १ , ६४
गणपतराव पवार विशालगडनजीक बंडांत सामील १५०
ग्रांटसाहेब, रेसिडेंट बहादर सातारा-चोर, मांग, बेरडांचा बंदोबस्त ११९, १२६, १५६
गुंडो जिवाजी १५, २७, ३०, ३३
गोपाळ जिवाजी घानवडकर बंडवाल्यांचा बंदोबस्त १००, १०१, १०२, १०३, १०६, ११३
गोपालसेट कुसे २
गोविंद रघुनाथ १२२
गोविंदपंत फडणीस ६८
गंगाधर लक्ष्मण जोशी ८
घनःशाम गोपाळ ४४
च्यापलन साहेब कलेक्टर व पोलटिकल एजंट धारवाड चिकोडी, मनोली करवीर-छत्रपतिमहाराजांच्या स्वाधीन १२७, १२९, १३८, १४५, कोंकणच्या मुलखांतील दुतर्फा अंमल जाऊन एक तर्फा अंमल होण्याबाबत १४८, १४९, चोर, मांग, बेरड, दरोडेखोरांचा बंदोबस्त १४९, विशाळगड, मालवण वगैरे कोंकणच्या मुलकांतील बंडाचे बंदोबस्ता-बाबत १५०, १५२, १५३, १५६, करवीर छत्रपतिमहाराजांना वाडीकर सांवत प्रकरणीं मुंबईचे इंग्रज गव्हर्नर बहादराचा हुकूम १६६, छत्रपति संभाजीमहाराजांच्या मृत्यूचें वृत्त १६८
चिंतामणराव आपा ७२
चिंतामणराव पांडुरंग पटवर्धन, करवीर छत्रपति संभाजीमहाराजांच्या मृत्यूचें वृत्त १६९, १७०
जयसिंगराव घाटगे सर्जाराव, बजारतमाब राजमंडलकरांच्या फौजेचा शह लागण्याचा संभव १४१
ज्याज अद्रव दडकन, रसिदेंट सुभा सिंधुदुर्ग ६८, १४४
ज्यान आंद्रवशा, पाहा ज्याज अद्रव दडकन.
जिवाजी भोसले तहाबाबत हकीकत ११७
जीवनराव सिंदे, नेसरी ५३
डौस, कर्नल निपाणकरांचा बंदोबस्त १८, २५, ३१, ३५, ३६, ३८
ताकरीनसाहेब, पोलिटिकल येजंट, धारवाड, विशाळगड वगैरे कोकणच्या बंडवाल्यांचे बंदोबस्ताबाबत १७०, करवीर छत्रपति महाराजांनीं नवशिका जारी केला १६२
तामस मंडरोल जनरल इंग्रज बहादर कंपनीसरकारचे लष्कर सुद्धा धारवाड प्रांतांत आल्याबाबत करवीर छत्रपतींना पत्र ९९; लष्करी हालचालीची बातमी ११२, चोर, मांग, रामोसी, बेरड यांच्या बंदोबस्ताबाबत ११९; करवीर सेनापतीस पत्र १२३, चिकोडी मनोली ताळुका करवीर छत्रपतीचे स्वाधीन १२४, १२७, १२९
त्रिंबकजी पाटील, डेंगळे निपाणकरांचा बंदोबस्त व करवीरकरांच्या प्रांताचें संरक्षण २२, ६५, ६९, इंग्रजाचे कैदेंतून पलायन ७८
तूळदास भोपे, तुळजापूर–मानापानासंबंधीं खटला ८३
दत्ताजीराव खानविलकर १२, १७
दादो आनंदराव ५९

दिनकर आपाजी मालवणबाबत जाबसाल ५२, ६८

दिनकरपंत ४०, ८७, ९५

दिनकरराव आपा पाहा दिनकरराव गायकवाड

दिनकरराव गायकवाड करवीर छत्रपति महाराजांचे जाबसाल इंग्रज बहादराकडून उलगडून घेणें २, ११, १३, १४, २१, २३, २८, ३६, ३७, ३८, ३९, ४०, ४५, ४७, ६२, ६४, ६६, ७३, ७४

दिनकरराव घोरपडे हुजरून सरंजाम मिळाला १४३ अ

दिनकरराव भोसले करवीरकरांच्या प्रांतास निपाणकरांचा भयंकर उपद्रव १६, निपाणकरांच्या बंदोबस्ताबाबत इंग्रजांशीं वाटाघाट १८, १९, २९, ३०, ३२, ३५, मालवणबाबत जाबसाल ५२

दुर्गाबाईसाहेब भोसले सरदेसाई प्रांत कुडाळ ७१

देवीनाईक दुभाषी ६८

दौलतराव शिंदे, अलिजाबहादर कन्येचें लग्न ९५, ९८

नरसिंगराव राजे भोसले बंडवाल्यांचे सरदार कोंकणचे मुलुखांतील १५०

नरसो आणाजी ६२

नरहरपंतभाऊ देशपांडे राणोजीराव घोरपड्यांना सेनापतीचीं वस्त्रें देण्याबाबत ८७

नरहराचार्य केशवाचार्य, धर्मादाय जमीन इनाम १३९

नागोजीराव पाटणकर, १३२

नाना फडणीस ४१

नाना महाराज श्री महाराजांचे राज्याचे कल्याण इच्छिण्याकरितां गांव इनाम ७४

नारायणराव घोरपडे सेनापति २७, निपाणीकर यास मिळून स्वामीच्या पायाची बदमामली व राज्याची खराबी १३७

नारायणराव पाटणकर, सरलष्कर राणोजी घोरपड्यांना सेनापतीचीं वस्त्रें देण्याबाबत ८६, ८७

नारायणराव रत्नाकर राजाज्ञे, भूदरगड किल्ला हुजूर स्वाधीन करण्याबाबत १३६

नारायणराव रनोजीराव खानवीलकर गांव इनाम १६१

नारायणराव व्यंकटेश घोरपडे इचलकरंजीकर ३४, ६०, ९२, सरदेशमुखी वतनाबाबत १२५, छत्रपति महाराजांकडून जाबसाल उलगडून घेणें १४५

नारो कासी, आंबेघाट चौकीवर चोरांचे बंदोबस्ताकरिता १४०

नारो गिरमाजी १८, ३४, ३५, ३६, चोर, मांग, बेरड, रामोशी यांचा बंदोबस्त ११९, १२५, १४२, महाराजानीं नवशिक्का जारी केला १६२

नारो वेंकाजी १५, २७

निपाणकर पाहा सिदोजी नाईक निंबाळकर निपाणी

नीलकंठ कालो, इंग्रजबहादराकडील १२०, १२५

नीलकंठराव सिंदे, सरंजामी हुजूर रुजू होण्याबाबत १५८

परशराम नाईक २१

पंडलोप, इंग्रजबहादर मालवणाबाबत जाबसाल ५२

पाटंजर साहेब, इंग्रज बहादर ७५, १-६,

पिलीसाहेब इंग्रज, कोंकणचे मुलुखांतील दुतर्फा अंमल जाऊन एकतर्फा अंमल होण्याबाबत १४८, १४९, चोर, मांग,

बेरड यांचा बंदोबस्त १४९
पुतोबा आनंत बाबा ९
बच्याजी आनंत वकील ३५, ३८, सोनगड प्रसिद्धगड तनख्याचा जाबसाल इंग्रज बहादराकडून उलगडून घेणे १४७, १५६; प्रसिद्धगडाच्या मुताल्कीबाबत १३५
बलवंतराव नाना माहालेकर सावकार ३९
बहिरजी भोसले ४०, ४२, ४६, ४८
बहिरो लंबोधर; सुवर्णदुर्गी बंड केले ८२
बळवंतराव चिटणीस ७४, ११९
बाजीराव रघुनाथ पेशवे करवीरकर छत्रपतींचे जाबसाल उलगडणें २, ३, ११, १४, १९, २८, ४४, ४७, ५४, ५५, ६१, ६२, ६६, ७०, ७४, ७५, ७७ ७८, ८०, ८२, ९७, ११३, राज्य देऊन कंपनी इंग्रज सरकारकडून खर्चास नख्त रक्कम घेण्याचा ठराव १२१
बापया रामोसी बंडवाले १००, १०१; १०२; १०३, १०६
बापू गोखले ७५, बंडवाल्यांच्या बंदोबस्ताचे कामगिरीवर ७७, ८०, १००, १०१, १०२, १०३, १०६, ११०, ११३, ११५
बापू चिपळूणकर, वेदमूर्ति सावकार १३
बापू नरहर देशपांडे इंगळीकर १२, १७, २५
बापू साने २, ४५, ४६
बापूराव माहोलकर सावकार ६५
बापोजी सिवराम, छत्रपति संभाजी महाराजांच्या मृत्यूचें वृत्त १६८
बाबा चोलकर ११, १९
बाबा फडणीस ७३
बाबामहाराज, श्री महाराजांचे राज्याचे कल्याण इच्छिण्याकरितां गांव इनाम ७४
बाबाजी गोखले, बंडवाल्यांचा बंदोबस्त १०६
बावाजी नाईक सिद्धेश्वरकर, विशाळगडनजीक बंडांत सामील १५०
बालाजी बाजीराव चिटणीस कागल तालुक्याविषयीं कामकाजे उलगडणें ८०, ९१, चिकोडी, मनोली तालुक्यांबाबत ११८, १२०, १२२, १२५, १३४, १५६
बालाबाई आक्का निंबाळकर, जेजुरीची यात्रा ७३, राणोजी घोरपडयांना सेनापतिपदाची वस्त्रें देण्याबाबत ८४, ८५, ८७, ८९, १३२
बाळाजी कृष्ण ८०, आंबेघाटचौकीवर चोरांचे बंदोबस्ताकरितां ११०
बाळाजी हरि शेणवी, बंडवाले १००, १०१, १०२, १०३, १०६
बाळाजीपंत नातू, चोर, मांग, बेरड, रामोशी यांचा बंदोबस्त ११९
भगवंतराव आबाजी प्रतिनिधि ५४, ५६, बंडाबाबत, बातमीपत्रें १००, १०१, १०२, १०३, १०६, ११०, ११३, ११५
भगवंतराव पाटील भोपे तुळजापूर मानापानासंबंधी खटला ८३
भरमाजी जाधव देसाई चिंचणीकर ६०
भाऊमहाराज श्री-वाडीकर सांवताचा मुलूख परत मिळविण्याबाबत इंग्रजबहादराशीं बोलणे १, छत्रपति महाराजांविषयीं इंग्रजबहादरांशी बोलणे २ महाराजांचे जाबसाल उलगडून घेण्याबाबत इंग्रजबहादराशी बोलणे ३, ५, ८, ११, १८, २३, २५, ३२, ३६,

३८, ४७, ४९, ५५, ५७, ६४, ६५, ६६, ७४, १५६, १५७, चिकोडी मनोली तालुक्यांचे कारभाराबाबत १२४, १२७, १३२
कागल तालुका हुजुरांचे मालकीचा याबाबत १३०, १३४
भूदरगड किल्ला हुजूर देण्याबाबत १३६, भूदरगड व मनोहरगडचे दुतर्फा अंमलाबाबत १५४, पुणे-मुंबईस इंग्रज-बहादराचे भेटीस गेले त्याबाबत खर्चासाठीं ऐवजप्राप्त १६७
भास्कर कृष्ण सुवर्णदुर्गी बंड केले ८२
मकाजी नाईक गायकवाड विशाळगड नजीक बंडांत सामील १५०
मडरोनसाहेब किंवा जेनतामस मंडोले, पाहा तामस मंडरोल जनरल.
मल्हार रेणूराव १९
मल्हारराव होळकर ७
महिपतराव पारसनीस ९, ७४
माधवराव पंडित प्रतिनिधि विशाळगडकर चोर दरवडेखोरास आश्रय न देणे १५३
मानचंद्र फत्तेचंद, सावकार ३७
मानसिंग माने १२, १७, ४०
मानसिंगराव घोरपडे, २७, ६९
मानसिंगराव पाटणकर इंग्रजबहादराकडून करवीर छत्रपति महाराजांचे जाबसाल उलगडून घेणे ७५
माल्कमसाहेब इंग्रजबहादर, करवीर छत्रपति महाराजाच्या वकीलाच्या भेटीचे वर्णन ९७, पेशव्यांचे राज्य घेऊन खर्चास नख्त रक्कम देण्याचा ठराव १२१
मुधोजी भोसले सेनासाहेबसुभा करवीर छत्रपति महाराजांना पत्र ९४
मुरारराव घोरपडे सेनापति १२६, छत्रपति महाराजांविरुद्ध कापशी व लाट हीं ठाणीं लढविण्याची तयारी १४२, हुजूरून सरंजाम मिळाला १४३ अ
मैनाबाई सिंदे, मातोश्री उज्जयनीहून ग्वालेरीस लग्नाकरिता, ९८
मोर दीक्षित पेशव्यांकडील, करवीर छत्रपतीची कामकाजे उलगडून देणे ८०
मोरेश्वर सुबराव अमात्य हुकमतपन्हा, बावडेकर पेशव्यांचे मुलुखांतील बंडवाल्यांस आश्रय ७७, ८०, ८२; राणोजी घोरपड्यांना सेनापतीचीं वस्त्रें मिळाल्याबद्दल ९०, करवीर छत्रपतीविरुद्ध अमर्यादा वर्तणूक १०३, चोर-दरोडेखोरांना आश्रय न देण्याबाबत १५३
मोरो गोविंद, किल्ले सामानगड करवीर छत्रपतिमहाराजांस बातमीपत्र १०८
मोरो बाजीराव चिटणीस ३०, ४०, ६३, ६६, करवीर छत्रपति महाराजांचीं कामें इंग्रज बहादराकडून उरकून घेणे ७०, ७४, १०३, १५७; चिकोडी मनोली तालुक्यांचे कारभाराबाबत ११८, १२०, १२२, १२५, १३२, १५१, चोर व दरवडेखोरांस आश्रय न देणे १५३
यमाजी दिनकर मुतालिक देसाई ५७, ७९
यशवंत शामजी बंडवाल्यांच्या बंदोबस्ताचे कामगिरीवर १००, १०१, १०२, १०३, १०६, ११०, ११३
येशवंतराव घाटगे सर्ज्याराव १७, २८, ३०, ५८, ७३

येसाजी कृष्ण, इचलकरंजीकरांकडील आजरे तर्फेतील दुतर्फा अंमलाबाबत चौकशी १५४
रघूजी भोसले सेनासाहेब सुभा नागपूर दरबाराचीं बातमी ७७
रत्नाकरपंत राजाज्ञा ५२, ५७, राणोजी घोरपडयांना सेनापतीचीं वस्त्रें देण्याबाबत ८५, ८७, ९३; आयतवडे गांवाच्या कुलकर्ण-वतनाबाबत १३१
रसूलसाहेब ५५, करवीर छत्रपति महाराजांचें जाबसाल उलगडून देणे ७०, ९५
राघो जगनाथ, ठाणे चिकोडी गनीमाकडील लोकांच्या हालचालींबाबत बातमी १६४
राणोर्जराव घोरपडे, सेनापति ७८; वस्त्रे देण्याबद्दल ठराव ८४, ८५, ८६, ८७, ८८, ८९, ९०, ९१, ९३, हुजूर येण्याबद्दल आज्ञा १०७, ११६, १२३ निपाणकरास मिळून अमर्यादा वर्तणूक १२५, स्वामीचे पायासी बदमामली व राज्याची खराबी सबब सेनापतिपदावरून दूर १३७, छत्रपति महाराजांविरुद्ध कापसी व लाट हीं ठाणीं लढविण्याची तयारी १४२, हुजूरून सरंजाम मिळाला १४३, १४३ अ
राबीसन साहेब, इंग्रज १५६
रामचंद्र नाईक गायकवाड ७३
रामचंद्र मल्हार, वकील सोनगड, प्रसिद्धगड तनख्याचा जवाबसवाल इंग्रज बहादराकडून फैसला करून घेणें १४७
रामचंद्र व्यंकटेश १३१
रामचंद्र बाघ कोल्हापूर, रत्नागिरी जोतीबा यात्रा ९४
रामचंद्र सांवत, आचरेकर १०३
रामचंद्रपंत नेने २१
रामचंद्रराव डफले १४६
रामचंद्रशेट पाथरे, सावकार १६३
रामराव सुभेदार १२५, कागल तालुका हुजुरांचे मालकीचा याबाबत १३०
रामाचार्य शास्त्री वेदशास्त्रसंपन्न धर्मादाय जमीन इनाम १३३
रायाजी जाधव, जप्तनमुल्क ७२
रावजी पाटील काजगांवकर, विशालगडनजीक बंडांत सामील १५०
रीडसाहेब, इंग्रज बहाहर वाडीकर सांवत प्रकरणीं जाबसाल उलगडून देणें १५, १६६
रोजसाहेब, इंग्रजबहादर गदग, डंबल हीं ठाणीं घेतली ११४
लक्ष्मण सुदो हेबाळकर इंग्रजाकडे रुजू ११२
लक्ष्मण हणमा १४१
लिंगो मल्हार निपाणकराकडील १९, १२२, १३८
व्यंकाजी सदाशिव, ठाणें हुपरी १५
वामनराव गोविंद आपटे ८
वासुदेव पंडित १३
वासुदेव पंडित देव; वेदशास्त्रसंपन्न धर्मादाय गांव इनाम १२८
विश्वासराव घाटगे, सर्ज्याराव निपाणीकरांचे पक्षास सामील १७
वेंकाजी यसवंत, करवीरकरांच्या मुलखास उपद्रव न देणे २२
शहाजी महाराज छत्रपति ऊर्फ बुवासाहेब महाराज इ. स १८२१ ते १८३८; २ हुजूरचीं कामें इंग्रज बहादराकडून, पेशव्यांकडून, निपाणकरांकडून करवून घेण्याबाबत ९, ७४, चोर, मांग, बेरड

यांच्या बंदोबस्ताबाबत ११९, १४९. १३४; कापशी ठाण्यास मोर्चे देणें व राणोजी घोरपडे मुरारराव घोरपडे यांचे पारिपत्य करणें १४२
शिवाजी माने ४०
शंकरराव शिंदे, सेनाखासखेल तोरगल छत्रपति महाराजांच्या दुःखाचें शांतवन ६; इंग्रजांच्या धारवाड वगैरे प्रांतांतील लष्करी हालचालीबाबत महाराजांना बातमीपत्रें ९९, १०४, १०५, १११, ११२, ११४
सखाराम चिमणाजी, पेशव्यांचे कारभाऱ्यांकडील ६४
सखाराम बाजीराव, किल्लेसोनगड फिरंगी व सांवतवाडीकर यांच्याबाबत बातमी १०९
सखाराम हरबाजी २१
सखोपंत ८१
सटवोजीराव यादव ५३
सदासिव अनंत, करवीरकरांच्या प्रांतास निपाणकरांचा भयंकर उपद्रव १६, २३, २५, ३०, ६१; चोर, मांग, बेरड यांचा बंदोबस्त ११९, १३३; भूदरगड किल्ला हुजूर स्वाधीन १३६
सदाशिव बापट, इंग्रजाकडील २९
सदाशिव माणिकेश्वर ऊर्फ सदाशिवपंत भाऊ, पेशव्यांकडील कारभारी, करवीर छत्रपति महाराजांचे जाबसाल उलगडणें २, ११, २८, ४५, ४७, ५१, ५८, ६३, ६४, ६६, ७०, ७५, ७७, ८३
सभापति मुदलियार, इंग्रजांकडील ४९, ११०, ११९
सरूपजी किंवा स्वरूपजी खीरसागर हुजरे वकील, वाडीकर सांवताचा मुलुख परत मिळण्याबाबत इंग्रज बहादराशीं बोलणें १, छत्रपति महाराजांविषयीं बोलणें २, छत्रपति महाराजांचे जाबसाल उलगडून घेण्याबाबत इंग्रजबहादराशीं बोलणें ३, ४, ५, ९, ११, १२, १४, १७, २०, २३, २५, २६, २८, २९, ३०, ३१, ३२, ३५, ७३, मृत्यु ७४
सरूपजी भोसले, ठाणे मनोलीच्या चौकीपाहाऱ्याचा बंदोबस्त १५१
सादुल्लाखान पठाण सुटकेबाबत १०,२५, ४२, ४३
स्वामी श्री, मठ करवीर सरंजामाबाबत बोलणीं ७५
सिदरामराव भोसले सुभेदार, सिंधुदुर्ग ६८
सिदोजीनाईक निंबाळकर सरलष्कर निपाणी करवीर छत्रपति महाराजांच्या मुलुखास उपद्रव २, ४, ११, १४, १५, १६, १७, १८, १९, २१, २२, २५, २७, ३०, ३१, ३३, ३५, ३६, ३८, ४५, ४६, ५७, ५८, ५९, ६०, ६३, ६४, ६९, ७०, ७४, ७५, ७९, ८१, १०४, १०५, ११७, ११९, १२२, १२५, १२७ १५६; ८८, ९३
घाटग्यांची ठाणीं परत मिळवून देण्याबद्दल खटपट १३८, राणोजी व मुरारराव, घोरपड्यांना करवीर छत्रपति महाराजांविरुद्ध चिथावणी १४२
सुब्राव व्यंकटराव जाधवराव, भरमदेव देसाई, नाडगौडा प्रांत रायबाग ६०, ६२
सुंदराआईसाहेब, महाराणी ऊर्फ श्रीमन्महाराज मातोश्री आईसाहेब मालवणच्या चौथाईच्या अमलाबाबत ३, ५; निपाणकराकडून उपद्रव १८; पेशव्या

कडून जाबसाल उलगडून घेणें १९,२५, २६, २९, ३०, ३१, ३२. ३५, ४२, ६६, ७४, १२२, १५७, १६५; इंग्रजांच्या धारवाड प्रांतांतील लष्करी हालचालीबाबत सेनाखासखेलकडून बातमीपत्रें १०५, १११; चिकोडी, मनोली तालुक्यांच्या कारभाराबाबत ११८, १२०, १२२, १२५, कापसी ठाण्यास मोर्चे देणें व राणोजी घोरपडे, मुरारराव घोरपडे यांचें पारिपत्य करणें १४२; महाराजांनीं नवशिक्का जारी केला १६२, छत्रपति संभाजीमहाराजांच्या मृत्यूचें वृत्त १६८, १६९, १७०

सुंदराबाई ऊर्फ नानीसाहेब घाटगे ८१, ठाणी परत मिळविण्याबाबत निपाणकरांकडून खटपट १३८, चिखली मुक्कामी असतांना करवीरकरांचे फौजेपासून संरक्षण करणें १४१, आज्ञापत्र १४२, हुजूरचे ठाणें परत देण्याबाबत आज्ञापत्र १६०

सुंदराबाई वहिनी ४५, मालवण बाबत जाबसाल ५२,

संताजी घोरपडे सेनापतीपदासाठी हुजूरांच्या विरुद्ध इंग्रजबहादराकडे तक्रार ९१, सेनापतिपद प्राप्त १३७

संभाजीमहाराज छत्रपति ऊर्फ आबासाहेब महाराज (इ. स. १८१३ ते १८२१) २, ६, ७, हुजूरची कामे इंग्रज बहादराकडून पेशव्यांकडून व निपाणकरांकडून करवून घेण्याबाबत ८, ९, २४, ४७, ६८, ६९, ७१, ७४, ७५, ८१, ८२, ९५, ९६, ९७, ९८, ११७, ११९, १२२, १२७, १४४, १४५, १४६, १५६, १५८; ७२, ८३, पुत्रप्राप्ती ७६, राणोजी घोरपडयांना सेनापतिपद देण्याबाबत ८४, ८५, ८६, ८७, ९०, ९१, ९२, १२३, मुधोजी भोसले, सेनासाहेबसुभा यांचें पत्र ९४, ९९, प्रतिनिधीकडून बंडाबाबत बातमीपत्रें १००, १०१, १०२, १०३, १०६, ११०, ११३, ११५; पंत अमात्य बावडेकरांची अमर्यादा वर्तणूक १०३, सामानगड किल्ल्याबाबत तिकडील प्रांतांतील बातमी १०८, भरतगडचा किल्लेदार दुतर्फा गांवाच्या रयतेस उपद्रव देतो त्याबद्दल इंग्रजबहादराची तक्रार १४४, १४८, १४९, कंपनी सरकार इंग्रज यांच्या धारवाडप्रांतांतील लष्करी हालचालीबाबत सेनाखासखेलकडून बातमीपत्रें ९९, १०४, ११२, ११४; चिकोडी मनोली तालुक्यांच्या कारभाराबाबत ११८, १२०, १२२, १२४, १२७, १२९, १३२, १५१, १६४; चोर, मांग, बेरड यांचा बंदोबस्त ११९, १२६; कागल तालुका हुजुराचे मालकीचा या बाबत १३०, भुदरगड किल्ला हुजूर पावला १३६: १३३, १३४, १५७, १६१, १६३

कापशी ठाण्यास मोर्चे देणे व राणोजी घोरपडे, मुरारराव घोरपडे यांचें पारिपत्य करणें १४२, १४३, त्यांना सरंजाम दि । १४३, १४३ (अ), तुळजापूर यात्रा १४५, १४६; राजेबहादर किताब वाडीकर सांवतांना लिहिण्याचा प्रघात नाहीं याबाबत इंग्रज बहादराशीं बोलणें १४५; कोंकणचे मुलकांतील दुतर्फा अंमल जाऊन एकतर्फा अंमल होण्याबाबत १४८; विशाळगड, मालवण वगैरे

कोंकणचे मुलकांत होणाऱ्या बंडाचे बंदोबस्ताबाबत १५०, १५२, १५९.

वाडीकर सांवत प्रकरणी जाबसाल इंग्रज बहादरांचे विद्यमानें उलगडून घेण्याबाबत १, १४, १४५, १५८ १६५, १६६

महाराजांनीं नव शिक्का जारी केला १६२,

मृत्यू १६८, १६९, १७०

संभाजीराव सिंदे, सेनाखासखेल २०

हरि नारायण ८०

हरि बल्लाल केलकर, सुवर्णदुर्गी बंड केले ८२

हिंदुराव घाटगे, सर्ज्याराव अमर्यादा वर्तणूक १७, २६, २८, ३२, ३३, ५८, कागल तालुक्याबाबत करवीरकराचे इंग्रजबहादराशीं बोलणे ८१,

हैबतराव गायकवाड, विश्वासराव १०, मालवणांतील जमिनीबाबत इंग्रजबहादराशीं बोलणें ३, ६८, ७०, निपाणकरांचा बंदोबस्त १९, २१, ३६; ३८, ४०, ४७, ७४

करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाचीं साधनें

(भाग सहावा)

कोल्हापूर स्टेट रेकॉर्डांतून निवडलेले कागद

छत्रपति शहाजी ऊर्फ बुवासाहेब महाराजांची कारकीर्द

इ. स. १८२१ ते इ. स. १८३८

संपादक

मा. वि. गुजर, बी. ए.

शके १८८४ इ. स. १९६२

प्रस्तावना : ६

करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाच्या साधनांचा हा सहावा भाग आहे. या भागांत छापलेले कागद कोल्हापूर स्टेट रेकॉर्डातून निवडलेले असून त्यांची संख्या १८४ आहे. हे सर्व कागद छत्रपति शहाजी ऊर्फ बुवासाहेबमहाराज (इ. स. १८२१ ते इ. स. १८३८) यांच्या कारकीर्दीतील आहेत. या कागदांतील ऐतिहासिक मजकुराचें सारांशरूपानें वर्णन पुढें केलें आहे.

हुजुरांच्या तालुक्यांतील किल्ले प्रसिद्धगड व किल्ले सोनगड येथील तनख्याचा ठराव मालवणास करून द्यावा असा मुंबईचे गव्हर्नरबहादराचा हुकूम प्रसिद्ध झाला. हा उल्लेख ले. २ मध्यें आढळतो. ताकरीन साहेबबहादूर यांनीं नारायणराव व्यंकटेश घोरपडे, इचलकरंजीकर यांना कळविलें कीं मागून चालत आले त्याप्रमाणें छत्रपति-महाराज यांचे रजातलबेत चालणे हें बरें आहे. आपण समजदार आहां. तेव्हां इचल-करंजीकर घोरपडे यांनीं त्यांना जबाब लिहून पाठविला कीं, श्रीमन्महाराज छत्रपति यांच्या आज्ञेखेरीज कांही वर्तणूक होत नाही, हा मजकूर ले. ३ मध्यें आहे. इचलकरंजी-कर घोरपडे याजकडून अमर्यादा झाली सबब लाट व रांगाळी येथें हुजुरांचीं टाणी बस-विण्यास लोकांना आज्ञा केली. आतां ही दोन्ही ठाणी हुजुराच्याकडे कायम रहात असा बंदोबस्त मुंबईच्या गव्हर्नरबहादराकडून करणे; हा मजकूर श्रीमन्महाराज मातोश्री आईसाहेब यांनी बाळाजी बाजीराव चिटणिवीस यांना पाठविलेल्या आज्ञापत्रांत आढ-ळतो (ले. १०). याच विषयासंबंधी अधिक माहिती ले. ११ ते ले. १५ मध्यें आहे. इचलकरंजीकर घोरपडे यांना कोणी कुमक देऊं नये, व परइलाखेतील स्वार व पायदळ व पेंढारी मदतीस येऊं नये याबाबत बंदोबस्त व्हावा ही हकीकत ताकरीनसाहेबबहा-दूर, ॲक्टिंग सरकलेक्टर व पोलिटिकल एजंट सुभा धारवाड यास श्री भाऊमहाराज यांनीं लिहिलेल्या पत्रांत आढळते (ले. १६). या विषयासंबंधी अधिक माहिती गोपाळराव गोविंद यांनी बागलकोटचे मुक्कामाहून पाठविलेल्या बातमीपत्रांत आहे. (ले. १७). श्रीमन्महाराज राजश्री बाळासाहेब छत्रपति यांस गोवर उठून ते कापशीस शांत झाले हें वर्तमान देखील सदर पत्रांत आहे. ले. १८, १९, २४ व २५ हे लेख इचलकरंजी प्रकरणाची माहिती देणारे आहेत.

करवीरकर व संस्थान वाडी यांच्यामध्ये लढा पडून कित्येक वर्षें वैमनस्य व लढाईचा मुकदमा चालला होता त्याचा अलीकडे निर्णय केला. त्याप्रमाणे नरसी-गड, प्रसिद्धगड व भरतगड हे किल्ले करवीरकर यांचे स्वाधीन करण्याचें ठरलें; परंतु या किल्ल्यांचे खर्चासाठी कित्येक तर्फेतील जो वसूल मिळत होता तो मात्र कोल्हापुराकडे

लावून दिला नाहीं. सबब या गोष्टीचा निर्णय इंग्रज सरकारकडून व्हावा. हा मजकूर ले. २७ मध्ये आहे. या विषयासंबंधी माहिती ले. २८, ६५, १६१ या लेखांत आहे. श्री भाऊमहाराज यांनी सत्कम आचरण सोडून, बदराह चालण्याची खुषी मानून दौलतीची तमा करून, हुजूरची बदनामी करून व महालमुलुकांतील रुसूम घेऊन नुकसानी केली सबब त्याजकडील वकिलीचे काम दूर करून आनंदराव त्रिंबक यांस हुजुरून वकील नेमलें. ही माहिती ले. २९, ३०, ३१ मध्यें आहे. बाळाजी बाजीराव चिटणीस व श्री भाऊमहाराज यांनी मुंबई येथे परळच्या बंगल्यांत गव्हर्नरबहादर इंग्रज सरकार यांची भेट घेतली हा मजकूर छत्रपतिमहाराजांना लिहिलेल्या पत्रांत आढळतो (ले. ३२). मुरारराव घोरपडे गोळी लागून मृत्यु पावले हें वृत्त ले. ३६ मध्ये आहे. घाटगे व सेनापति यांनी निपाणकर यांस सामील होऊन राज्यास अपाय केला ही एक गोष्ट आहे आणि तुळजोजीराव घाटगे सर्ज्याराव यानी कागलचें ठाणे ज्या वेळी हुजूरांची आज्ञा होईल त्याक्षणी हुजुरांना देऊं याबाबत श्री भाऊमहाराज व मोरो बाजीराव चिटणीस यांना विनंतीपत्र लिहून दिले. ही दुसरी गोष्ट आहे. याप्रमाणें वरील दोनही गोष्टींचा उल्लेख ले. ३९ मध्ये आहे घाटगे यांच्याबरोबर जे जाबसाल व ठराव झाले त्यांची माहिती ले. ४० व ले ४४ मध्ये आहे. ‘ काळदशेनुरूप मर्जीस व्यत्यय कोणी आणिल्यावरून सेवकावर अवकृपेचे भाव उत्पन्न होऊन सेवकाची कोणतीही विनंती न चाले.’ हें उद्गार माधवराव भगवंत प्रतिनिधि यांचे आहेत.प्रतिनिधीनी छत्रपति महाराजांना लिहिलेल्या पत्रावरून ही स्थिति कळून येते (ले. ४१). कितूरकर देसाई हे हल्ली लढाई करीत आहेत, तरी महाराजाच्या इलाख्यांतील स्वार ब्गर लोक यांनी त्याजकडे चाकरीस जाऊं नये अशी आज्ञा छत्रपतिमहाराजांनी केली. हा मजकूर ले. ४५ व ले. ४६ मध्यें आहे. जरीपटका साहेबनौबत अंबारी, पागा वगैरे सरंजाम आणि मानकरी बरोबर घेऊन हुजुरांची स्वारी च्यापलीनसाहेब, कमिशनर धारवाड यांच्या भेटीस गेली; त्या भेटीचें वर्णन ले. ५३ मध्यें आहे. हिंदुराव घाटगे, सर्ज्याराव यांचे जहागिरीवर छत्रपतिमहाराजांनी जुलूम, जबरदस्ती केली ती खबर ऐकून त्यांचे मेहुणे दौलतराव सिंदे अलीजाबहादर यांनी फौज पाठवावी असें योजिलें होतें; परंतु त्यांनी महाराजांवर फौज पाठवावी अशी सरकार इंग्रजबहादर यांची मर्जी नव्हती. सबब महाराजांनी कागलची जहागीर हिंदुराव घाटगे यांसी सुपूर्द करावी असे गव्हर्नरसाहेबांचे म्हणणें होतें, ही हकीकत ले. ५७ मध्ये सांपडते.

या विषयासंबंधीं अधिक माहिती ले. ६१ मध्यें आहे. हुजूरची स्वारी किल्ले विशाळगड पाहण्याकरितां सडी, केवळ हुजरे बरोबर घेऊन, पुढें गेली असतां, महाराजांची बेअदबी करून चौकीदारांनीं गोळ्या मारल्या. सबब हुजूरस्वारीचा मुक्काम गजापुरास होऊन महाराजांनीं आज्ञापत्रें देऊन हुजरे पाठविले; परंतु महाराजांनीं जे रवाना केले त्यांजवरहि गोळ्या घालून बदमामली केली. त्याकरितां पंडित प्रतिनिधि

यांजकडील तालुका जप्तींत ठेवला ही माहिती ले. ५९ मध्यें आहे. या विषयासंबंधी अधिक माहिती ले. ६४ मध्यें आहे. शंकरराव सिंदे व लक्ष्मणराव सिंदे,सेनाखासखेल, किल्ले तोरगळ यांनी हुजुरांच्या आज्ञेप्रमाणें हुजुरांच्या लष्करांत यावें तें न करितां किल्ला सोडून पलीकडे निघून गेलें. त्याजवरून हुजुरची स्वारी किल्ले तोरगलास गेली. तेव्हां तेथील लोकांनीं किल्ल्याचे बाहेर येऊन हुजुरांना आतां रुजू व्हावे हा मजकूर ले. ७३ मध्यें आहे. अशा प्रकारें हुजूरस्वारी फौजसुद्धां शत्रूची हालचाल देखरेख करण्यासाठीं तोरगलनजीक गेली असतां किल्ल्यांतून हुजुरांचे फौजेवर गोळी उडाली; सबब हुजुरांचे फौजेकडूनहि गोळागोळी झाली. हें वृत्त ले. ७७ मध्यें आहे. याच विषयासंबंधीं अधिक माहिती ले. ७६, ७८, ९४, १२१, १२९, १३१, १३२, १३४, १३५, १३६ या लेखांत आहे.

हुजूरच्या स्वाऱ्याशिकाऱ्या होऊं लागल्या व शिरढोण वगैरे ठाणीं घालणें सुरू झालें हें वर्तमान ऐकून निसबट साहेबबहादूर सरकलेक्टर व पोलिटिकल एजंट सुभा धारवाड यांनीं निकडीने बेळगांवास जाऊन तेथील साहेबबहादराशीं खलबत करून व मसलत ठरवून फौजेच्या तयारीविषयीं हुकूम जारी केला. त्यांनीं नावा तयार करण्याचा कारखाना चालीस लाविला अशा प्रकारें आठ दिवसांचे अंत बेळगांव मुक्कामाची व आवंतर पलटणें तुरूप वगैरे जितका जमाव जमेल तितका फौजतोफासुध्दां घेऊन राजमंडलावर अर्थात् करवीर राज्यांवर चाल करून जाण्याची सिध्दता झाली, हा मजकूर ले. ८५ मध्यें आढळतो. या प्रकरणासंबंधीं अधिक माहिती ले. ९९ ते १०१, १०३, १०४, १०६, १०७ ते ११५, ११७ ते १२१, १२३, १२४, १३८ या लेखांत आहे. राणोजी घोरपडे यांजकडे निनीहाळ, हसूर, बोळावी व नागनूर हीं चार गांवे सरंजामाबद्दल हुजुरांनीं दिलीं होतीं. त्यास राणोजी घोरपडे यांचा काळ झाला. तेव्हां पुण्यशील लक्ष्मीबाई घोरपडे यांच्या स्वाधीन हे चार गांव करावे अशी आज्ञा हुजुरांनीं केली. ही माहिती ले. १४४ मध्यें आहे. फोंड सांवत तांबूळवाडीकर यांनीं दादीबाई सांवत-वाडीकर यांना सामील होऊन बंड माजवून राजे खेमसांवत भोसले, सांवतवाडीकर यांच्या इलाख्यांतील महादेवगड व नारायणगड येथें ठाणीं घालून काटकाई सुरू केली; सबब कुंपणीसरकारचें लष्कर जाऊन त्यांना तंबी पोंहचविली, हें वृत्त अंडरसन साहेबबहादूर सरकलेक्टर व पोलिटिकल एजंट सुभा धारवाड यांनी छत्रपतिमहाराजांना कळविले (ले. १४८). याच विषयासंबंधीं अधिक माहिती ले. १४७ ते १५१ व १६० या लेखांत आहे. विशाळगड प्रतिनिधीचे दत्तकप्रकरणीं इंग्रज सरकार मुंबई, यांचा ता. २५-४-१८३३ इसवीचा हुकूम सादर झाला कीं, जो दत्तक झाला तो कायम करण्याची अगर दुसरा दत्तक करण्याची मुखत्यारी महाराज छत्रपतिसांहेबांकडे आहे.हें वृत्त जॉर्ज उइल्यम अंडरसन साहेब बहादूर,सरकलेक्टर व पोलिटिकल एजंट सुभा धारवाड यांच्या पत्रांत आहे (ले.१५२). आपाजीराव जाधव, जप्तन मुलुख यांनीं हुजूरआज्ञेप्रमाणें किल्ले मनोहरगड

येथील फंदखोरास हुजूरचे अभयपत्र व खात्रीपत्र पाठवून त्या किल्ल्याचा बंदोबस्त केला. ही हकीकत ले. १५४ व १५५ मध्यें आहे.

वेबरसाहेब बहादूर, सरकलेक्टर व पोलिटिकल एजंट सुभा धारवाड यांच्याकडे ज्या तक्रारी निवाडयासाठीं जात त्याची हकीकत ले. १५७, १५८, १५९, १६२ व १६६ या लेखांत आहे. छत्रपतिमहाराजांचे राज्यांत राज्यकारभार चांगल्या रीतीने चालावा या हेतूनें झालेला पत्रव्यवहार ले. १६३, १६४, १६५ मध्ये आहे. लक्ष्मणराव सिंदे, तोरगलकर यांजकडून राधाबाई, संस्थान रामदुर्ग यांस किरकोळ उपद्रव होतो, त्या गोष्टीचा बंदोबस्त छत्रपतिमहाराजांनीं करावा हा मजकूर डनलापसाहेब बहादूर, सरकलेक्टर व पोलिटिकल एजंट सुभा धारवाड यांचे पत्रांत आहे (ले.१६९). राज्यकार-भारासंबंधीं हकीकत ले. १७० ते १७७ व ले. १८० व १८२ या लेखांत आहे. अशा रीतीनें या पुस्तकांत आलेले १८४ कागद मी वाचकांपुढें मांडीत आहे.

१३२१ कसबा पेठ, पुणें २
विजयादशमी शके १८८४
ता. ८-१०-१९६२

मा. वि. गुजर

श्रीमन्महाराज सर श्री शहाजी छत्रपति, जी. सी. एस. आय., बी. ए.,

हिंदुपदपातशहा महाराज सरकार करवीर



जन्म :

फाल्गुन कृष्ण ९ शके १८३१

समर्पण

श्रीमन्महाराज सर श्री शहाजी छत्रपति, जी. सी. एस्. आय्., बी. ए

हिंदुपदपातशहा महाराज सरकार करवीर

यांना

महाराजांच्या प्रतापशाली राज्यकर्त्या

पूर्वजांसंबंधीं ऐतिहासिक माहिती देणारीं

करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाचीं साधनें, भाग ६

हें पुस्तक

संपादकानें प्रेमादरपूर्वक समर्पण केलें असे.

मा. वि. गुजर.

करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाचीं साधनें

(भाग सहावा)

कोल्हापूर स्टेट रेकॉर्डांतून निवडलेले कागद

लेखांक १ तारीख ३-८-१८२१

अ. नं. ५००

फयुजात इलाही व तवज्यहात नामत न्हाही शामिल हाल अजम हनराबल मोट इष्टुवट इलफीष्टन प्रजिदेत गवरनर बाहादर जंजिरे मुंबई रोज अफजुब्राद अजीसौब श्रीमन्माहाराज मातुश्री माहाराजगिराणी सुंदरा आईसाहेब बाआदज दुवा आंके

श्रियासह चिरंजीव राजे आबासाहेब छत्रपति याही कैलासवास केला हा मजमून आं बाहादरास माअलुम व्हावा बइसबब राजश्री बापूजी सिवराम याहमराह खतुत इबलाग जाहाले आहे व जुदखबर पोहचणे बाबे डाकेवरून खतुत इरसाल येऊन रसीद जाहाले असेल कीं थोरले माहाराजे बुलंददरजे याही आं बाहादराचे मांडीवर उसे ठेविले आहे म्हणोन निगारीष करोन बाआदज माहाराजे बुलंददरजे याही

श्रियासह चिरंजीव राजे आबासाहेब छत्रपति व श्रियासह चिरंजीव विजईभव राजश्री राजे बावासाहेब छत्रपति उभयताची उमर लाहान आसता आं बाहादरानी सर्वोपरी राज्याची हमीयेत व शरम धरून दौलतीची तरकीवर जायदी करून कोण्याचा हात चालू दिल्हा नाही बईसबब दोस्तीचा नामनामोस तमाम अलमात मशहूर जाहाला आहे श्रियासह चिरंजीव राजे आबासाहेब छत्रपति याची हयात निकमी केली सबब

श्रियासह चिरंजीव विजईभव राजश्री राजे बालासाहेब छत्रपति व श्रियासह चिरंजीव विजईभव राजश्री राजे बावासाहेब छत्रपति उभयता आहेत याजवर नजर देऊन अफसोस

होत आहे श्रियासह चिरंजीव विजईभव राजश्री राजे बालासाहेब छत्रपति व श्रियासह चिरंजीव विजईभव राजश्री राजे बावासाहेब छत्रपति याची उमर लहान आहे

बईसबब यावख्ती सर्वोपरी राज्याचे संवरक्षण थोरले माहाराजे बुलंददरजे याचे पाठीमागे आं बाहादरनी केले आहे त्या मवाफिक दिनबदीन करून राज्याची तरकी व तजायदी केली पाहिजे हेच आं बाहादरास वाजीब व लाजीमतंर असता जियादा मरकुम कलम होणे काय आहे ? फिलहाल दौलतीचा बंदोबस्त श्री याचे विच्यारे व कदीम यअतीबारी लोकाचे सलहने केला आहे आणि मुफसील मजमुन श्री याणी आं बाहादरास कलमी केला आहे व वरकड मजकूर बापोजी सिवराम यास कलमी फर्माविला आहे त्यास जुबानी करितील त्यावरून बयावार मजमून आं बाहादरास माअलुम होईल सु॥ इसने अशरीन मयातैन व अलफ रवाना छ ४ माहे जिल्काद जियादा काय लिहिणे.

लफाफावरी ल्याहावयाचे

फयुजात इलाही शामील हाल अजम हनराबल मोट इष्टुवर्ट इलफिष्टन प्रजिदेत गबरनर बाहादर जंजिरे मुंबई रोज अफजुबाद.

लेखांक २ तारीख ३–८–१८२१

श्री

रु. नं. ४

अ. नं. ६२७

रफाआत व आवली पनाह बिसालत व अयालत दस्तगाह अजम एहे लेक इष्टब्रास इष्कायर रेजिस्टर इंच्यार्ज ऑफ धी अदालत सोथर्ण मषहूद बासंद दरविला हुजूर तालुकेतील किल्ले प्रसिद्धगड व किले सोनगड येथील तनखेचा ठराव मालवणास करून द्याव म्हणोन अमारत व आयालत पनाह अजम गोवरणेर बाहादर जंजिरे मुंबई याचा हुकूम येऊन प्रसिद्ध जाहाला आहे त्यास सद्दहू दोनी किल्लेचे तनखेचे बोलणे बाबे हुजूर वकील मालवणास इबलाग व्हावे म्हणजे कामकाजाचे फैसले होऊन येतील म्हणोन शोकत व अवली पनाह अजम उलीयम चापलीन कमिशनर बाहादर याची थैली खतूत हुजूर येऊन रसीद जाहाली बईसबब फिलाहाल राजेश्री रामचंद्र बलाल व बच्याजी अनंत वकील यासी अरफअत पनाकडे फिरस्ताद केले आहेत त्यास सद्दहू किलेचे तनखेचा वगैरे जवाबसवालाचा मजमून उभयता मोमियले आवाली पनाहास माआलूम करतील त्यास हुजूर किल्लेचे तनखेच वगैर जवाब-सवाल फैसले होय ते आबिसालत पनाहानी करावे हुजूर राज्याची हमीयत व शरम आ अयालत पन्हाहास असता जियादा निघारीस होणे वाजिबी तर नसे सुहुरू सन इसने आशरीन मयातेन व आलफ रवाना

छ ५ माहे जिल्हेज जियादयचे निघास्त आयंद रवाना जंजिरे सिंधेदुर्ग आधालतीकडे

लखोवर लिहिणेचे-

रफअत व आवाली पन्हा अ-अजम इस्कोयर रेजिस्टर इंचार्ज आफ धी आदाल्त सोथर्न मषहूद बाशंद -

चिटीवर लिहिणेचे

अजम इस्कोयर रेजिस्टर इंचार्ज आफ धी आदाल्त सोथर्न मशहूद बाशंद थैली ताबू मुसेजरीचा थैली रवाना

छ. २३ जिल्हेज भाद्रपद व॥ १०

राजेश्री बच्याजी अनंत याजसमागभे

लेखांक ३ तारीख १३–८–१८२१

श्रीव्यंकटेश

अ. नं. ५०२

साहेब मेहरबा करम फर्याय दोस्ता
आजम ताकरीन साहेब बहादुर
सलमुल हूताला

अजि दिल येखलास नारायणराव व्यंकटेश सलाम आंके येथील खैरखुषी ता॥ छ ११ जिल्काद जाणोन कल्मी करून दिलाराम करीत जावे दरिविला साहेबी खत पाठविले ते पावले तेथे लिहिले जे आपला इलाखा कोलापूर आसून तेथून हरयेक सरकारी कामास खुत पाठविले त्या बमोजिब काम चालत नाही आसे जाहीर जाहालेवरून कल्मी केले जाते जे मागून चालत आले बमोजीब माहाराज छत्रपति याचे रजातलबेत चालणे हे बरे आहे आपण समजदार आहा म्हणोन लिहिले ऐसीयास येथून श्रीमन्माहाराज राजश्री छत्रपति स्वामी याचे आज्ञेसिवाय कांही वर्तणूक होत नाही कांहीं कामकाजाविसी आज्ञापत्र आले तरी त्यातील वाजबी मजकूर आसेल त्याची हुजूरचे सेवेसी विनंती करावयासी कारकून पाठवीत आसतो व विनंती वरचेवरी लिहितो साहेबास जाहीर जाहाले पाहिजे ज्यादा काय लिहिणे प्यार मोहबत आसो दीजे हे किताबत.

छ १३ माहे आगष्ट सन १२३१ फसली

नकलेवरून नकल रुजू पाहणार रामचंद्र धोंडी चिटणीस
नि॥ सरकार करवीर.

लेखांक ४ तारीख ३०–८–१८२१

रु. नं. ४

अ. नं. ६३०

यादी नारोपंत नाना वकील नि॥ माहाराज छत्रपति यास

१ तवारीख फिरस्ता म्हणून येक किताब आहे त्यात साहेबानी संानिक थोरथोर सरदार लोकाची वंशावळी व त्या त्यानी दवलत मिळविली ती कैफीयत व कोण कोण किती वर्षे दवलत केली याच दाखला तमाम लिहिला आहे परंतु बहुत रोजा खाले किताब तयार जाली आहे करिता यलीकडे दोनशे वर्षापासून चालली ती कैफीयत किता-

२००

बेत नाही याजकरिता येथील मुलकातील तमाम संा व सरंजामीदार व सरदार लोकाची कैफीयतीस किताब तयार करणेच इरादा बहुत आहे लेहाजा कलमी केल अस श्रीमाहाराज छत्रपति यानी दौलत मिळविली त्यास व अष्टप्रधान व शेनापति घोरपडे व शेनाखासकील व इचलकरंजगीकर व कागलकर आणखी थोर थोर लोक कोण कोण असतील त्यास दौलत कैसी आली ती समजावया करिता बादषाही वगैर सनदपत्रे जाली असतील ती देऊन पाटवितेस कराव म्हणजे नकल घेऊन परत पाटविल जाईल आणि दौलत मिळवल त्याजपासून ताहाल काय कायच फर्जदा पो वंशावळ व काय काय जाहाल तारीख व गादीवरी बसल तेरीख व साबकच लोक इंतिकाल जाहाल तारीख व कोण कोणते साली कोणते मोहीम केले कोणते मुल्क जियादा मिळविले व कोणकोणते काम भारीच केले आहेत त्याची कैफीयत लिहवाहून पाटवीतसे करणे म्हणजे किताब तयार होणेस बहुत कुमक होईल ऐस किताब तयार करवणेकडून मुलकाची अहवाल तमाम समजणेत येत आहे त्याच नकल पाहिजे तरी पाटविल जाईल येणे प्रो आई माहाराजास व भाऊ माहाराजास अर्ज करून तमाम सरदारा वगैरच व माहाराज याच दौलतीच सनदे व वंशावली वगैर कैफीयत तुम्ही येताना घेऊन याव म्हणजे बहुत बेहत्तर आहे तारीख ३० आगष्ट सन १२३१ फसली पौ. छ ९ जिल्हेज सु॥ इसने अशरीन मयातेन व आलफ शके १७४३ भाद्रपद श्रु॥ १०

लेखांक ५ तारीख ८-१२-१८२१

श्री

रु. नं. २

अ. नं. ४१२

श्रीमन्माहाराज मातोश्री आईसाहेब साहेबाचे शेवेसी

विनंती सेवक बाळाजी बाजीराव चरणावरी मस्तक ठेवून कृतानेक शेवेसी विनंती विज्ञापना तागायत छ १२ माहे रोवल पर्यंत साहेबाचे कृपावलोकने करून सेवकाचे वर्तमान यथास्तित असे. शेवेसी विज्ञापना श्रीची स्वारी व राजश्री आकाराम यादव हवलदार माहायात्रेस जाणे बद्दल तेथून निघाले ते शु॥ नवमीस पुणीयास येऊन दाखल जाहाले येथून उदईक पोर्णमा करून प्रतिपदा अगर द्वितीयेस येथून पुढे चालते होणार नंतर

श्रीची स्वारी मुंबईस जाणेचा बेत त्रितीया अगर चतुर्थीस जाला आहे त्याप्रमाणे मुंबईस जाऊन पोचल्यानंतर तेथे काय मजकूर होईल तो वरचेवर विनंती लेहून पाटवितो राजश्री राय बळवंतराव विठल मोहोलकर याजविसी श्रीनी असीरवादपत्री लिहिले आहे त्याप्रमाणे आज्ञा करणार साहेब धनी समर्थ आहेत शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.
पौा छ १६ रोवल सन इसने आशरीन मयातेन व आलफ मुाा करवीर.

लेखांक ६ तारीख १३-१२-१८२१

श्री रामचंद्र

रु. नं. २

अ. नं. ४१३

श्रियासह चिरंजीव सुंदराबाई वहिनी यासी अनेक आसीरवाद येथील कुशल ताा छ १७ माहे रबिलावल पावेतो मुकाम पुणे वर्तमान यथास्तित असे विशेष आपण छ २ सोवलचे तेरखेचे पत्र येक जासुदजोडी बरोबर व छ १० माहे मजकूरचे तेरखेचे पत्र जासुदाचे डाके वरून एक अशा दोन रवानग्या पत्रे पाटविली ती पाऊन लिहिला मजकूर सविस्तर कळला इचलकरंजीकर हुजूरचे आज्ञे प्रो वर्तणूक करीत नाहीत येविसी व किल्ले बहिरवगडचे घेऱ्याचे रानाचा मजकूर व मौज आयतवडविसी व बहिरजी मोहिता गोटखिंडीत राहून मौजे मोहुरेवर दावे करितो येविसीचा वगैरे मजकूर लिहिला तो सविस्तर कलला आशास आमारत पन्हाहा अजम उलीयम च्यापलीन साहेब कमिशनर बहादर तालुके पहावयासी गेले आहेत त्याजकडे आपण लिहिल्याप्रमाणे कामाचे मजकूर चिरंजीव राजेश्री विसाजी नारायण यासी सांगोन त्याजकडे रवानगी आजच केली आहे मशारनिले पोचून बहादर याची भेट होऊन बोलणी होतील आणि मशारनिलेचे लिहिणे इकडे येईल त्या प्रमाणे आपणास मागाहून लिहून पाठवू मोहिता गोटखोंडीत राहून माहुरेवर दावे करितो येविषीचे मजकुराची थैली शोकत पन्हाह अजम ग्रांट साहेब बहादर यास लिहून पाटवावी म्हणजे त्याचा बंदोबस्त होईल यात्रेचे मजकुराची थैली पाटविली ती पाहिली मुंबईस पोचल्यावर बाहादर यासी बोलोन मागाहून लिहून पाटवू शोकत पन्हाहा अजम राबिसन साहेब बहादर तालुका पाहावयासी गेले होते ते छ १४ रोजी पुण्यास आले आण गुरुवारी तिसराप्रहरी तीर्थस्वरूप श्री याचे दर्शनास बिऱ्हाडी येऊन वडिलास शालजुडी येक व रुमाल शालनामेचा ऐसे दिले आम्हीही तेथेच होतो येक तास बसोन खैरखुषी बोलोन नंतर गेले आपणास कलावे उदईक शुक्रवारी वडिलाची स्वारी येथून निघोन आलंदीस जात आहे व आम्हीही मुंबईस जाणेकरिता शुकरवारी उदईक निघोन आलंदीस जात आहे तेथूनच परभार मुंबईस जाणे होत आहे आपणास कलावे चिरंजीव राजेश्री बापूजी शिवराम व चिमणाजी सखदेव याचे मागील खर्चाबद्दल येकूणतीससेहे रुपयाच्या वराता आपण चिरंजीव राजश्री सदासिव आनंत याजपासी

दिल्या होत्या त्याची तहकुबी जाहाली व चिरंजीव राजेश्री नारू गिरमाजी याचे खर्चा-बद्दल व बाराशेहे रुपयाचे भरण्यास चारशे रुपयाची वरात कबुरावर दिली होती त्याची मनाई जाहाली म्हनोन ऐकिले त्यास वराती प्रमाणे ऐवज देणेविसी ताकीद देऊन ऐवज पोचे ऐसे व्हावे स्वारी बरोबर पागा व लोक वगैर आहे त्याचे खर्चाविसी व इकडील खर्चास पाठविणेविसी पेशजी एक दोन पत्री लिहिले आहे त्याप्रो दोन महिन्याचे खर्चाच्या चिठ्या करून पाठविल्या पाहिजेत ऐवजाची खर्चाविसी बहुत अडचण आहे बहुत काय लिहिणे हे आसीरबाद. पौ छ २ रा॥खर उर्फ पौष शु॥ ४ शके १७४३ सन इसने आसरीन.

लेखांक ७ तारीख १९-१२-१८२१

श्री

रु. नं. २

अ. नं. ४१६

श्रीमन्माहाराज मातुश्री————————————आई साहेब साहेबाचे शेवेशी

विनंती शेवक बालाजी बाजीराव चेरणावरी मरतक ठेऊन कृतानेक सेवेशी विज्ञापणा ता॥ छ २३ माहे रा॥वल प्रातकाल मो॥ वडगाव नजीक तलेगाव येथे साहेबाचे कृपावलोकने करून सेवकाचे वृत यथास्थित असे सेवेशी विज्ञापणा श्री चे स्वारीसुधा पुणेहून वद्ये शेष्टीस मंदवारी प्रातःकाली निघोन आलंदीस आले तेथे रविवारी मोकाम जाहाला नंतरी इंदुवारी आष्टमीस श्री बाबा महाराज व राजश्री आकाराम यादव हवलदार व खंडोजी ना॥ भोसले सुधा यात्रासहे प्रातःकाली आलंदीहून निघोन पुढे गेले नंतर दोनप्रहरा भोजने करून श्री चे स्वारी सुधा आम्ही मुंबई जाणेबदल देहूरास वस्ती करून तेथून काली भोमवारी निघोन तलेगाव नजीक वडगाव येथे मोकाम जाहाला अजी येथून पुढे कारलेस जात आहो पाचचार मोकामोन मुंबईस जाऊन पोहचतो तेथे गेलेनंतर आज्ञे प्रो॥ होईल तो मजकूर वरचेवरी विनंतीपत्री विनंती लेहून पाटवितो कासीची यात्रा बहुत निघाली आहे आलंदीवरी दोन हजार सुमार जमली होती आणि वरचेवर यात्रा जात आहे सेवेशी निवेदन व्हावे सेवेशी श्रुत होय हे विज्ञापणा.

पौ छ २ रा॥खर शके १७४३

लेखांक ८ तारीख २२-१२-१८२१

हु॥

रु. नं. ४

अ. नं. ६४१

श्रीमन्महाराज सुंदराबाई साहेब सलमेहुताला रफाअत व अवली

जिमीस जोज फईस्थारा इस्कोयर कालेक्टर व माजिस्त्रेट जिल्हा दक्षण प्रांत कोकण

दरविला मोहिबा पन्हाकडून छ १४ शोवलचे खत फिरीस्ताद जाले ते छ २४ मिनहूचे रोजी बाणकोट मकाणी रसीद होऊन खुष जाहाली असेच हमेशा खत खतुतीचा राबिता ज्यारी राखून शादमानी हसील होत नाही मोहिबाकडील खतात मजमून जे किल्ले भैरवगड येथील गडकरी लोक याजकडे किले मजकुरचे घेऱ्यातील रानाची पैवस्त चालत असता मौजे नरडवे तर्फ साळसी येथील वतनदार हे फिल्हाल ते रान आपले म्हणोन हरकत करितात वगैर कलमी केले ते मालूम जाले त्यास येबाबे पेशजी अजम शा साहेब यानी दर्यात्पी करून बंदोबस्ताविसी सरकारचे मामिलेदार यास हुकूम गेला आहे व हल्ली अजम रीड साहेब त्या मुलका नजीक गेले आहेत त्याजकडे मोहिबाकडील मुलखाचे बंदोबस्ता करिता वकील रवाना होतील त्यास सदहू मजकूर मालुम करण्यास हुकूम फर्मावला नंतर साहेब सिलसिले प्रमाणे बंदोबस्त करतील रवाना छ २६ माहे रोवल इंग्रजी तारीख २२ दिजंबर सन १८२१ जियादा काय लिहिणे प्यार मोहबत असो द्यावी हे किताबत

(सही इंग्रजी)

पौ छ ३ माहे रबिलाखर सु॥ इसने आसेरीन मयातेन व आलफ ऊर्फ पौषमाष शु॥ ५ मंदवार मु॥ करवीर.

लेखांक ९ तारीख २२-१२-१८२१

श्री

रु. नं. २

अ. नं. ३९०

पौ छ ४ माहे रबिलाखर सन इसन आशरीन

शेवेसी विनंती सेवक गोपालराव गोविंद कृतानेक विज्ञापना ता॥

मार्गसीर्ष बहुल १३ पावेतो मु॥ जुने हुबली येथ स्वामीचे पुण्येकरून शेवकाचे वर्तमान यथास्तित असे विज्ञापना स्वामीनी आज्ञापत्र सादर केले ते सिरसा वंदून सनाथ पावलो पत्री आज्ञा जे हुजूरचे तालुकेतील मौजे तारदाळ या गावावरी इचलकरंजीकर यानी सरदेशमुखीचे रोखा करून स्वार व लोक पाटवून गांवावरी गोलागोली करून इकडील

लोक जखमी करून घोडी व गुरेढोरे व मेंढरी वलती करून घेऊन गेले येविसीची अर्जी हुजूर आजी रविवारी अस्थमानी आली त्याची तालीक व रोखेची तालीक पाटविली आहे तसेच त्याज नि॥ ठाणे हुनूर येथून जमाव येऊन हुजूर नि॥ जखेवाडीस येऊन गोलागोली करून तेथील पाटील धरून घेऊन गेले येविसीची यादी बजिनस पाटविली आहे म्हणोन आज्ञा प्रमाणे हुजूरूची पत्रेच बजिनस साहेब बहादर यासी दाखविले त्याजवरून उत्तर जाहाले जे याप्रमाणे थैली हुजूरची आली नाही थैली आल्यावरी जाबसाल होईल राजश्री नारो × × लवकर येणेविसी
हुजूर लिहून पाठवणेविसी मजला निरोप जाहाला त्याजवरून शेवेसी विनंती लिहिली आहे गोलागोलीचे काम यावेळेस नाना यास जलद आणवणेविसी सांगितले त्याजप्रमाणे नानास येण्याविसी आज्ञापत्र सादर व्हावे व तिकडील कैफियत लिहून साहेबाचे नांवे थैलीही यावे म्हणजे मजकूर समजून घेऊन समर्पक उत्तर सेवेसी लिहिणेत येईल रेणदाळ व रांगोली या दोनी गावचा सिमांतराचा खटल्याची जमीनीची महसूल जबरीन नेणार जमाव केला आहे इकडोन जमाव पाटवून लाट व रांगोळी दोही गावास ठाणे घालणेची आज्ञा जाहाली आहे व सरदेशमुखीचे वतनाची जप्ती करणेविसी आज्ञा जाहाली आहे ऐस सविस्तर तुम्हास कलावे याजकरिता आज्ञापत्री सादर जाहाले असे तरी सदरहू प्रमाणे मजकूर अजम ताकरीन बहादर याचे कानावरी घालोन समजोन देऊन उत्तर सत्वर हुजूर विनंतीपत्री लिहून पाठवणेविसी आज्ञा आज्ञेप्रमाणे सर्व मजकूर आक्षरशाहा वाचून दाखविले त्याजवरून थैली आल्यावरी याचे मजकूर समजोन घेऊन जे सांगणे ते सांगू याजप्रमाणे उत्तर जाहलेवरुन शेवेसी विनंती लि॥ आहे थैली पाठऊन देणेविसी आज्ञा व्हावी बेलकुंड व डोणवाचे मजकूरहि विनंती केली करारा प्रमाणे गावकरी मेलऊन व गावकर बोलोन घ्यावे याप्रमाणे उत्तर जाहाले भरमाजी भिरडी बस्तवाडकर याचे भावास व भाकजई कैदेत ठेविले आहेत त्याजबिसी हुजूरून भिरडीस रोखा सादर होऊन कारकून व लोक रवाना केले आहेत राजेश्री लिंगो नरसिंव्ह यासही हुजूर आणविले आहे तिकडून कुले आणली म्हणजे तुम्हाकडे रवाना करणेची आज्ञा होईल म्हणोन आज्ञा जाहाली त्याज प्रो रवाना व्हावे वरकड मजकूर चिरंजीव राजश्री श्रीपत भिमाजी यास लि॥ आहे शेवेसी विनंती करतील सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक १० तारीख २८–१२–१८२१

श्री

रु. नं. २
अ. नं. ४१९
श्रीमन्माहाराज मातुश्री आईसाहेब याणी राजमान्य राजश्री बालाजी बाजीराव

चिटणिवीस यासी आज्ञा केली येसीजे इचलकरंजीकर घोरपडे याणी हुजूरचे तालुकेत खटला लाविला येविसी मजकुरोची विनंती पत्रे श्री स व तुम्हास आज्ञापत्र पेशजी सादर होऊन गेलीच आहेत व इकडे धारवाडासही आजम ताकरीन बहादर यासी थैली व राजश्री गोपालराव गोविंद यासी आज्ञापत्र यैसी स्वारासमागमे रवाना करून दिली होती त्यासी उत्तरांची थैली व मशारनिल्हेच विनंतीपत्र येणेप्रमाणे रोजगुदस्त हुजूर आली त्याच्या नकला दोन पाटविल्या आहेत त्याजवरून कलो येईल घोरपडे याचे बंदोबस्ता-करिता हुजूरून पागा टाकवडेस रवाना होऊन गेल्या आहेत व लाट रांगोली दोनी ठाणी घालणेविशी आज्ञा होऊन लोक रवाना जाहाले आहेत ठाणी बसतील येविसी पेशजी तुम्ही साहेबाचे शेवेशी विनंती केलीच आहे त्याचप्रमाणे त्याजकडून आभरयादा जाहली सबब दोनी ठाणी बसावयास आज्ञा जाहाली आहे तरी तुम्ही श्री स विनंती करून श्री व तुम्ही आजम गौरनर बहादर यासी बोलोन दोनी ठाणी हुजूर काईम राहत येसा बंदोबस्त करून घेऊन विनंतीपत्री लिहून पाटवणे येविसी तुम्हास आज्ञापत्री आज्ञा होऊन कलवावे ऐस नाही यातील सर्व परियाये तुम्हास दखलच आहेत तरी तुम्ही श्री स जसे बोलावयाचे तसे बोलान घेऊन दोन्ही ठाणी बसत आहेत ही काईम राहत आसे ठरवून घेऊन विनंतीपत्री लिहून पाठवणे घोरपडे याणी हुजूरचे तालुकेत पेंढार वगैरे सोडून सिलसिला लाविलेस येविसीचा बंदोबस्त त्याचे कुमकेस पटवर्धन याणी वगैरे यानी कुमक देऊ नये याप्रमाणे त्याजकडील वकीलास बाहादर याजकडून ताकीद होऊन कुमक न देणेविसी त्यास वगैरेस चकल्या येऊन बंदोबस्त व्हावा येसे करणे जाणिजे सु॥ इसन आशरीन मयातैन व आलफ रवाना छ २ माहे रबिलाखर बहुत काय लिहिणे.

पौ छ ६ माहे रबिलाखर

सु॥ इसने आशरीन मया-	लेखन	बार
तैन व आलफ.	सीमा	

लेखांक ११ तारीख ३१-१२-१८२१

श्री

राजमान्य राजश्री शंकरराजीराव घोरपडे यासी आज्ञा केली यैसीजे इचलकरंजीकर घोरपडे याणी हुजूरचे तालेकेत उपद्रव केला आहे सबब तुम्हास सरंजाम सुधा हुजूर निघोन येण्याची आज्ञा होऊन आज्ञापत्र सादर जाहाले आसे तरी आज्ञे प्रो सदरहू सरंजाम घेऊन हुजूर करवीरचे मुकामी निघोन येणे. सु॥ इसने आशरीन मयातैन व अलफ रा॥ छ ५ माहे रबिलाखर बहुत काय लिहिणे मोर्तब आसे.

लेखांक १२

तारीख ३१-१२-१८२१

श्री

अ. नं. ४२०

रु. नं. २

सेवेशी विनंती सेवक आपाजीराव जाधव मु॥ टाकवड कृतानेक सेवेशी विनंती विज्ञापणा तागायत छ ५ माहे रबिलाखर पावतो साहेबाच कृपावलोकनेकडून पागच व शेवकाच वर्तमान यथास्थित असे शेवेसी प्रार्थना येसीजे पेशजी साहेब याची आज्ञा जे इचलकरंजीकर यासी गवतासिवाय उपद्रव करू नये येसी आज्ञा आज्ञे प्रो त्यास गवता-शिवाय व हरयेक × × उपद्रव केला नाही हाली आज्ञेवरून इचलकरंजीकर याची कई पाडतो आतामात्र कई पाडलेनंतर खटला होईल आज्ञा होईल तैस आज्ञे प्रो वर्तनूक करू हुजूरचे आज्ञेवरून आम्ही स्वस्थ होतो आता खटला पडल मौजे लाट येथील वल काढतात पेंढारी याची इचलकरंजीकर याणी हजरी घेतली पांचपनास पेंढारी येऊन पोहचल शिलेदारही पाचपनास जमले आहेत पायदल वरचेवर दहापांच नवे येत आहे याप्रमाण बातमी वर्तमान आहे कांहीं पायच लोक पाटऊन देणेची आज्ञा व्हावी. सेवशी श्रुत होय ही विज्ञापणा.

लेखांक १३

तारीख ३१-१२-१८२१

श्री

रु. नं. २

अ. नं. ३९१

शेवेसी विनंती शेवक गोपाळराव गोविंद कृतानेक विज्ञापना ता। पौष शु॥ सप्तमी इंदुवासरे पावतो स्वामीचे पुण्यकरून मु॥ नवलगुंद वर्तमान येथास्तित असे विज्ञापना इचलकरंजीकराचे थैलीचे उत्तर अद्याप दिली नाही काल दुसरी थैली आली आहे परंतु अद्याप प्रविष्ट जाहाली नाही हुजूरचे जमाव जाऊन कही बांधून रानातील दाणे लुटली व गोर-गरीब बहुत नागविले त्याची यादी करून पाटविली आहे ती बजीनस याद पाहिली थैली व चपरसी पाठवणेविसी वरचेवरी लिहितात परंतु कांहीं होणे दिसत नाही प्रयत्नास कमी करीत नाहीत पटवर्धन इलाखे वकीलाकडोन बोलतात मजकडेही एक दोनवेळा आले होते याउपरी हुजूर लिहून पाटवून आज्ञा येईल त्याप्रमाणे उत्तर सांगू या प्रमाणे सांगितले उदेख येथून कूच होऊन बागलकोटाकडे जाणार होत म्हणाला आज पुढे गेले रामदुर्गकर याची खेडी जप्त केली त्याची सुटका होणार नजरेब॥ तेबीस हजार रुपयेची निशा देणार साहुकार आले आहेत बाबाच ऐवज एक साला साडेतीन हजार रुपये रोख दिले वरकड वर्तमान चिरंजीव राजश्री श्रीपतराव याचे पत्री लि॥ आहे शेवेसी विनंती करतील त्याजवरून निवेदनात येईल शेवेशी श्रुत होय हे विज्ञापना. पौ॥ छ १६ माहे रबिलाखर सु॥ इसने असेरीन मयातेन व अलफ.

लेखांक १४ तारीख ८-१-१८२२

श्री

रु. नं. २

अ. नं. ३४२

श्रीमन्महाराज मातोश्री आईसाहेब याणी राजमान्य राजेश्री बालाजी बाजीराव चिटणिवीस यासी आज्ञा केली ऐसीजे साहेबाचे शेवेसी तुम्ही विनंती पत्र पाटविलें ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ निवेदन जाहला इकडील मजकुराची विनंती श्री याचे विनंतीपत्री सविस्तर लिहिली आहे त्याप्रमाणे श्री व तुम्ही अजम गोरणर बाहादर यासी बोलोन बंदोबस्त करून घेणे हा योग आनियासे आला आहे असा पुढे यावयाचा नाही हे तुमचे ध्यानातच आहे तरी येविषी तुम्ही श्रीसी बोलोन इचलकरंजीकर याचा बंदोबस्त श्रीचे पत्री लिहिला आहे त्याअन्वये करून घेऊन विनंतीपत्री लिहून पाटवणे मौजे दानवाड या गावची सनद श्रीचे नांवे लिहून त्याजकडील वो राजश्री आपा भटजी याजकडे दिली आहे त्याची तालीक श्रीकडे पाटविली आहे श्रीकडील खानापूरची सनद हुजूर पाटवून द्यावी हेविसी आपा भटजी यासी श्रीचे पत्र पाटवून देणे श्रीचे काम इकडून करून दिले आहे तरी श्रीनी लाट व रांगोळी व पेशजी कागलचे तिन्ही गावात टाणी घालावी याप्रमाणे ठरलेच आहे ती तीन ठाणी ऐसी पांच गावात ठाणी हुजूरून घालणेचा उद्योग केला आहे तरी येविसीचा बंदोबस्त तेथे राखावयाचा तसा राखून विनंतीपत्री विनंती लिहून पाटवण जाणिजे सु।। इसन आशेरीन मयातेन व आलफ. रवाना छ १३ माहे रबिलाखर बहुत काय लिहिणे.

लेखांक १५ पौ तारीख ११-१-१८२२

निवडी दप्तर

रु. नं. ३

अ. नं. ५३४

श्रीमन्माहाराज छत्रपति दाम हू

नियाजमंद मेस्तर ताकरीन सो बहादूर आकटिंग सर कलकटर व पोलटक्याल येजंट सुभा धारवाड नियाज मारुज आंके नियाजमंदेची खैरीयेत रोषन होऊन हमेषा अल्ताफनामा सादर होऊन सरफराज करीत असाव दरीवला इजत दस्तगाहा नारोपंत वकील याणी रूसखत घेऊन गेले ते अजुनी आल नाहीत करिता हरयेक कामकाजास दिकत पडते याकरिता माहाराजास पेषज इल्तीमास केली व वकीलाच्या नांवच्या याद्या पाठविल्या वकील रवाना होत आहे म्हणून जेवाब आला लेकीन त्याच येणे जाहल नाही आणि मेहरबां नारायेणराव घोरपडे इचलकरंजगीकर याणी बेअदबी केली म्हणोन टाकवाड येथ माहाराजाची फौज तयार जाहली म्हणून अवाई आहे याची कैफीयत जेव्हाच तेव्हा

मोफसल समजावीत जाऊन येथून नियाजमंदाची अरज माहाराजाकडे पोहचावणेस वकील नेहमी राहावयाच जरूर आहे यैसीयास दरोब्रस्त कैफियत जाणणार मोख्तयार वकीलास जलद रवाना केले पाहिजे. जियादा
मुदाम बाद रा।ना ६ माहे जनवारी १२३१ फसली.

(सही इंग्रजी)

पौ छ १६ रा।खर
सनइसन आशरीन मयातैन व अलफ.

लेखांक १६ तारीख १४-१-१८२२

श्री

अ. नं. ५३५

भाऊ माहाराज
अजम मेस्तर ताकरीन बाहदर
आकटिंग सर कलकटर व पोलटक्याल
यजंट सुभा धारवाड कामयाब
बाशंद

रफिअत व आवाली पनाह बिसाल्त व आयाल्त दस्तगाह बाआदज इस्तियाक फिरावा मशहूद आंके दरिविला हुजूर फरनुरात आ रफाआत पनाहानो छ ६ ज्यानेवारीचे फिरिस्ताद केले ते छ १६ रबिलाखरी रसीद होऊन बयावार मजमून इजहार जाहाला राजश्री नारो गिरमाजी वकील रुखसत घेऊन गेले ते ताहाल आले नाहीत सबब हरयेक कामकाजास दिकत पडती बईसबब माहाराजास जाहीर केले व वकील याचे नांवच्या यादी इबलाग केल्या दराबस्त वकील मोमिईले इरसाल होत आहे म्हणोन जवाब येऊन रसीद जाहाला लेकीन त्याचे येणे जाहाले नाही आणि राजश्री नारायणराव व्यंकटेश घोरपडे इचलकर्जीकर याणे बेआदबी केली सबब टाकवडे येथे हुजूर ची फौजे तयार जाहाली आहे म्हणोन आवाई आहे त्याची कैफियत हरवख्त मुफसील माआल्म करणेबाबे वकील हमेशा राहणेचे जरूर तर आहे लेखना दरोबस्त कैफियेत वाकीफगार मुख्तीयार वकीलास जुदतर केले पाहिजे म्हणोन आ आवाली पनाहनी निगारीष कलम केले ते जाहीर जाहाले नारो गिरमाजी वकील श्री याचे स्वारी हमराह मुंबईस रवाना त्यास येणेबाबे आज्ञापत्र रवाना जाहाले आहे येताच आ बिसाल्त पनाहकडे रवाना होत आहेत घोरपडे मशारुनइले हुजूर चा हुकूम दरोबस्त मानीत नाहीत हा आंजी आ आयाल्तपनाहस माआलूम होऊन आ रफअत पनाहानी घोरपडे मौसूफ यास हुजूर सर।।चे हुकुमावाकीफ चालणेबाबे ताकीद

केली असता फिलहाल घोरपडे मोमइले याणी बेंआदबी करून मौजे जखेवाडी व मौज तारदाल या गावावरी स्वारी करून आदमी जखमी केले व गावच्या रयेता धरून नेऊन कैदत ठेविल्या बाआदज मौज टाकवडे येथे पागा व लोक फिरिस्ताद जाहाले आहेत घोरपडे मशारुनइले याचा बंदोबस्त हुजूर हून होत आहे म्हणोन पेशआजी आ आवाली पनाहस तह कलम जाहाले होतें त्याचा जवाब येऊन रसीद जाहाला बाअदज घोरपडे मोसूफ यास हुजूर चौकसी करिता येणबाबे आज्ञापत्र कारकून व हुजूरे याहमराह रवाना होऊन बारा दिवस जाहाले त्यास कारकून व हुजरे यास गावाबाहेर ठेऊन हुजूर न येता स्वार व लोकाचा जमाव करून खटला करणेचे तदबीरीत आहेत याबमोजीब बेआदबी करीत आहेत बइसबब घोरपडे मोमीइले याजकडील सरंजाम जप्त करणेचा इरादा आहे आ बिसालत पनाहस माअलूम व्हावे बाईसबब जाहाले असे इचलकर्जीकर घोरपडे यास कोणी कुमक देऊ नये व परइलाखेतील स्वार व पायदल व पंढारी मदतीस येऊ नये येबाबेचा बंदोबस्त आ आयालत पनाहाकडून जाहाला पाहिजे वरकड मजकुराची आज्ञा आज्ञापत्री राजश्री गोपालराव गोविंद यास फर्माविली आहे जुबानी सांगतील त्यावरून आ रफअत पनाहस मअलूम होईल सु॥ इसने अशरीन मयातैन व अलफ रवाना छ १९ माहे रबिलाखर जियादयेचे निगाष्त आयद आयाम मुदाम बाद.

लेखांक १७ तारीख १४-१-१८२२

श्री

रु. नं. २

अ. नं. ४२४

सेवेसी विनंती शेवक गोपालराव गोविंद कृतानेक विज्ञापणा ता॥ पौष्य व॥ ७ पावेतो मुकाम बागलकोट वर्तमान येथास्थित आसे विज्ञापणा छ ६ रोज सफरचे आज्ञापत्र दोन व छ ७ रोज सफरचे येक येसी तीन आज्ञापत्र जासुदा बा॥ सादर जाहाली ते पावली त्याची उत्तर बी तपशील

१ धारवाडाहून जाहीरनामा चोर पळून गेले त्याजपैकी पाच आसामी प्रसिद्धगडास पता लागले चोर सिंदुदुर्गास रवाना जाहालेचे आर्जी गडकर याची आली त्याची तालीक पाटविली आहे बाहादर यासी दाखवावे म्हणून आज्ञा आशे प्रो मजकूर समजाविले व तालीकही दाखविलेवरून आणिखी पता लाऊन चोर सांपडल्यास धरावे याप्रमाणे उत्तर जाहाले. कलम

१ मौजे तारदालची आर्जी हुजूर आली त्याची तालीक पाटविली तेही दाखविले व निपाणकर याजकडील कुमक व मिर्जकराकडील चारणी बा॥ पागा आली आहे राजश्री

चिंतामणराव आपा याजकडील व जमखंडीकराकडील वगैरे कुमक व आजरेतून लोक आले ते लाट रांगोलीत जमाव कलल तपशीलवार मजकूर सांगितले व नकलाही दाखविले त्याजवरून उत्तर जाहाले कीं पेंढारी जमा करणेचे कारण नाही राजश्री नारोपंत नाना येऊपर्यंत खटला करू नये याजप्रो राजश्री चिंतोपंत आकबरनिस यास पत्रे गेली आहेत व घोरपडे इचलकरंजीकर यासीही ताकीद केली आहे नाना आल्यावरी उभयताचा मजकूर समक्ष ठरावात येईल दंगा करू नये याप्रमाणे उत्तर जाहाले घोरपडे याजकडील कारकुनासही सांगितले आकबरनीस याणी हुजूर काय विनंती केली असेल ते समज नाही येथे मी शोध घेतला सदरी लिहिल्याआन्वये सांगितले. ——— कलम

१ इचलकरंजीकर घोरपडे यासी हुजूरून आज्ञापत्र येणेविसी सादर जाहाले आहे त्याची नक्कल पाटविली ती पावली आज्ञे प्रमाणे मजकूर समजाविले. ——— कलम

१ राजश्री परशराम जनार्दन ठाणे शिरगूर याणी महादाजी नारायण कुलकर्णी मौजे मजकूर याचे घर लुटून जिनजीरुब घेतले त्याजविसी बहादर याची यादी राजश्री नारो गिरमाजी यांचे नांवे आले त्याजवरून सिरगुरकर यासी आज्ञापत्री सादर होऊन त्याची उतराची आर्जी मशारनिलेनी हुजूर पाटविली त्याची नकल व कुलकर्णी याची जिनजितराब काय होते ते शिरगुरकर याणी त्याचे बंधु चिंतो कुलकर्णी याचे स्वाधीन करून त्याची पावती व माहादाजी नारायण याची पावती येशा उभयताच्या पावल्या घेतल्या त्याच्या नकला तुम्हाकडे पाटविल्या आहेत सविस्तर मजकूर बहादर याचे काणावरी घालोन विनंतीपत्र पाटवणे म्हणोन आज्ञा त्याजवरून आज्ञे प्रमाणे नकला दाखविले वरचेवरी जाबसाल होत असावे याप्रमाणे उत्तर जाहाले. ——— कलम

१ कसबे आसुचे बैला करिता आज्ञापत्र सुभा मनोलीस सादर जाहाले ते पत्रच दाखविले परंतु बैलाची मोकलीक चिठी आली परंतु पाटीलाचे म्हसुलाविसी लिहिले नाहीत त्यास मी उत्तर केले कीं पाटील गैरहुकूमी दाणे नेहले आहेत याजकरिता करवीरास जाऊन बोलोन घ्यावे त्यास उत्तर जाहाले कीं बजिनस हुजूरचे व सुभेचे आज्ञापत्र म्हसुल पदरी घालाव आस आसता गैरहुकूमी म्हसुलास नेहले आज्ञापत्राप्रो म्हसूल पदरी घालवावे आणि थल नेमून घ्यावे. बोलोन घेतील येस उत्तर जाहालेवरून सेवेशी विनंती लिहिली आहे. ——— कलम

१ पटवर्धन व निपाणकर यांसी कुमक देऊ नये म्हणून चक्ती देणेविसी विनंती केली आहे. ——— कलम.

१ पटवर्धन व निपाणकर वगैरे सरंजामी चाकरीस जावयास तयारी होते आहे म्हणून वर्तमान आहे. ———

१ श्रीमन्माहाराज राजश्री——बालासाहेब छत्रपति यास गोवर ऊठून ते कापशीस शांत जाहाले म्हणून आकबरी वर्तमान डाके वरून लिहिणे आले काल जासूद जोडी हुजरून आले त्याणीही वर्तमाण सांगितले मोटी आणुचित गोष्टी जाहाली होणारास उपाय नाही वर्तमान साहेबास कलविले त्याजवरून किती वर्षे दुखणे काय किती दिवस

निजल होते म्हणून विचारिले त्याजवरून मी उत्तर केले जे दोन वर्षे जाहाले गोवर निघून दाहा बारा दिवस होते मध्ये पोटातील दुखणे येऊन आस्त जाहाले सारकाचे वर्तमान सांगितले थैलीही साहेबास मागाहून येईल म्हणून विनंती केली फार श्रमी जाहाले.

कल्म

१ येथे मुकाम आमवाश्या पर्यंत होईल पुढे गदगास जाणार. कलम

—

९

येकून कलमे नव सेवेशी लिहा आहेत मनन होऊन समर्पक उत्तर लिहिणेस आज्ञा करणार धणी समर्थ शेवेशी श्रुत होय हे विज्ञापणा.

पौ छ २३ माहे रबिलाखर
पौष वद्य १० भरगुवार सन
इसने अशरीन मयातेन व आलफ.

लेख्यांक १८ तारीख २१-१-१८२२

श्री

अ. नं. ५६३

श्रीमन्माहाराज छत्रपति दाम मोहबत हू नियाजमंद मेस्तर ताकरीन सो बाहादूर आकटिंग सर कलेकटर पोलटक्याल येजंट सुभा धारवाड नियाज मारुज आंके येथील खरीयत रोषन होऊन हमेषा पाठऊन सरफराज करीत आल पो दरिविला

पोहचून सरफराज जाहल मेहरबा नारायणराव घोरपडे याणी बेअदबी केली याच सरंजाम जप्त करणे जरूर आहे घोरपडे मौसुफास कोणी कुमक देईनास ताकीद व्हावी मोख्तयार वकीलास बादज पाठविल जाईल तूर्त हे कैफीयेत गोपालराव गोविंद याजकडून समजून घ्याव म्हणून याजवरून इलतीमास केल जाते जे माहाराजानी पेंढारी वगैरे फौज जमविली घोरपडेचे मुलकात कहीकबाड चालिल आहे यैस यैकणेत येत आहे सरकारी तालुकेची लगत येणेप्रमाणे जमाव होतील तरी इजानीबानी काये म्हणून समजावे यैस प्रकर्णी येतबारी वकील मोख्तयार इजानीबाकडे पावणे जरूर आहे गोपालराव याणी वकीलाकडील कारकून याजमारिफत भारी काम कसे उलगडू सकेल? यैसीयास मोख्तयार वकील जलद रवाना केल पाहिजे वकील येईपर्यंत पेंढारी वगैरेचा जमाव होऊ नये व परभारे खटलाही होऊ नये वकील आल बादज मजकूर समजून घेऊन जे अर्ज करणे ते केल जाईल जियादा मुदाम बाद. रवाना २१ माहे जनवारी १२३१ फसली.

(सही इंग्रजी)

पौ॥ छ ४ माहे जे॥वल माघ शु॥ ६
सु॥ इसने आशरीन मयातेन व अलफ
मु॥ करवीर

लेखांक १९ तारीख २८-१-१८२२

श्री

अ. नं ५३८

यादी राजश्री नारायणराव घोरपडे इचलकर्जीकर याचा इलाखा आजरे महालात करवीरकर याच्या आश्रयाने काटकाई जाली येवीसाचा बंदोबस्त होणे

१ करमली निसबत दुतर्फा अमल बारा खेडी आजऱ्याकडून विवटतात त्याजकड पटीचा ऐवज येणे याजकरिता सालगुदस्ता पटीच्या ठरावाचे वेलेस करवीरास श्री भाऊ माहाराज याजकडे फिर्याद करून बखेडा केला तेव्हा भाऊ माहाराजानी मनास आणोन + + पटीचा ऐवज देणे म्हणोन ताकीद केली तेव्हा कबूल करून ऐवज गुदस्ता दिल्हा सालमा।।री करमली खेडेकेरी यास चिठी करुन आजऱ्यास आणोन जीवनमाफक पटी ठराऊन दिल्ही खेडेकरी कबूल जाहाले त्याचे वसूलास गावगना प्याद पाठविले असता मौजे कडलगे हा गाव देसाई याचा त्याजकडे पटीचे ऐवजास रोखा केला त्याणी चिठी न मानिता वरातदार बाहेर घातले नंतर आणखी च्यार प्यादे पाठविले त्यासही मारामार करून बेकैदी केली सबब कारकून व पच्येवीस आसामी प्यादे पाठविले तत्राप जाबसाल न करिता गावाबाहेर घातले आणि देसाई याचे कुमकेस करमलीकरानी शेदीडशे लोक पाठवून आजरेचे लोकावर चालून आले सालगु।। आसाहेबाचा हुकूम जाहाला होता कीं करवीर इलाखदारानी अगलीक केली तरी तुम्हाकडून होऊ नये याजकरिता इकडील लोकानी छत्रपति माहाराज याची व सरकार कुंफणीची द्वाही घातली असता ती न मानिता लोकाची हत्यारे काढून घेऊन घोडीवगैरे वाटसरचे बैलसुद्धा व येक कारकून सिपाई आा २ करमलीस नेऊन ठेविल आहेत येविसी करवीरकराकडील वकीलास निक्षून ताकीद होऊन कारकून वगैरे जराब्राजरा सोडून द्याव व पुढे हरविसी खटला होऊ नये याप्रमाणे हुकूम जाहाला पाहिजे.

१ सामानगडकर व करमलीकर वगैरे

इलाखा करवीर छत्रपति याज्कडील गावात तली करणार राहून तल्या करतात गुरे नेतात गाव जालतात येविसी साहेबाजवल अर्ज केल्यावरून वकीलास ताकीद जाहाली तेव्हा गुर परतून दिल्ही परंतु तलीखोराच पारपत्य जाहाले नाही याजकरिता हाली तली करून आणि दोन गाव जालले व गुरे नेली येविसी वकीलास निक्षूण ताकीद होऊन तलीचा बंदोबस्त जाहाला पाहिजे गुरे माघारी देवावी.

सदरहू यादी घेऊन जाऊन माहाराज छत्रपति यास दाखवावी म्हणिजे माहाराजानी वाजबी चौकसी करून तंटे करणार लोकास नसीहेद करवून बंदोबस्त करून देवितील फिरून बोभाट येऊ देणार नाहीत.

ता।। छ २८ माहे जेनवारी १२३२ फसली

(सही इंग्रजी)

या पत्रावर आरंभीं उजव्या बाजूस कोपऱ्यात धारवाड सर कलक्टरचा शिक्का आहे

लेखांक २० तारीख १४-२-१८२२

अ. नं. ५३९

श्रीमन्माहाराज छत्रप-

ति साहेब दाममोहबत

अज नियाजमंद ग्रांट साहेब बाहादूर बादइबराज मरासीम नियाजमक श्रुफराय मेहरइजलाय गरदानीद मेआयद खैरयत इज्यातसऊर करून साहायः मिजाज दरयाफ मरकुम होत अम्रावी दिगर मेहेरबा विठलपंत दिवाण निसबत श्रीमन्माहाराज छत्रपतिसाहेब हे कोल्हापुरास श्री देवीचे दर्शनास जात आहेत बरोबर स्वार वगैर खटल आहे देवीचे दर्शनास जातील येतील त्यास येविसी हरकत न होई असे व्हावे म्हणजे बहुत मेहेरबानगी होईल हमेशा खत येऊन दोल आराम होत असावा रा। तारीख १४ फेब्रुवारी सन १८२२ इसवी मु।। (मुसलमानी) छ २१ जमादिलवल ज्या

कामरानी मुदाम बाद पौ।। छ २४ माहे जोवल सन इसने अशरीन मयातेन व अलफ माहे माघ ब।। ११ शके १७४३ मकान करवीर.

लेखांक २१ तारीख २५-२-१८२२

श्री रामचंद्र

रु. नं. २

अ. नं. ४२९

श्रियासह चिरंजीव सुंदराबाई वहिनी यासी अनेक आसीरवाद येथील कुशल ता। छ २ जा।।खर पर्यंत मुकाम पुणे वर्तमान यथास्तित असे विशेष आपण छ २८ जोवलचे तेरखेचे पत्र पाठविले ते छ मजकुरी पावोन लिहिला मजकूर निवेदनात आला अजम आदम बहादर सातारे इलाखे + + कर्नाटकातून करवीरास येऊन पद्मालेवर उतरले होते त्याकडे लबे वगैरे फड फर्मास देऊन चिरंजीव राजेश्री नारो गिरमाजी यासी पाटविले ते देऊन खैरखुषीची बोलणी जाहाली नंतर किल्ल पनाळा व किल्ले विशाळगड पाहावा हे मनात आहे परंतु कुंपणी सरकारचा हुकूम नाही सरकारचा हुकूम जाहालेवर पाहू याप्रमाणे बोलल्या वरून मशारनिलेस बो पनाळ्यास पाठविले व राजश्री माधवराव पंडित प्रतिनिधि यासही विशाळगडास पत्र दिले आहे पन्हाळा दाखवून मशारनिले माघारे आले म्हणोन लिहिले ते कळले चिरंजीव राजश्री बळवंतराव चिटणीस येऊन पोहोचले मजकूर समजोन घेतला त्याची उत्तरे मागाहून लिहून पाटवू म्हणोन लिहिले त्याप्रमाणे सविस्तर लिहून पाटवावे श्रियासह चिरंजीव विजयीभव राजश्री राजे बावासाहेब छत्रपति याचा विवाह फाल्गुन शु।। द्वितीया मंदवार योजून वधू राजश्री जीवनराव शिरके याची कन्या नेमस्त केली आहे म्हणोन लि।। ते कळले उत्तम आहे योजिल्या मुहुर्ते कार्यसिधी जाहालेचे सविस्तर लिहून पाठविले पाहिजे अमारत पन्हाहा

अजम चापलीन बाहादर पाटसचे मुकामास आले आहेत एक दोन दिवसी येथे येणार आहेत आपणास कळावे + + चा ऐवज मागाहून पाठवितो म्हणोन आपण पेशजी लिहिले परंतु ऐवजाची चिटी येऊन पोचली नाही आपण तो लिहिल्या प्रमाणे पाठविलीच असेल नसली पाठविली तरी पत्र पावताच ऐवज रवाना करावा येथील खर्चाची अडचण आहे ती पत्री काय ल्याहावी बलवंतराव चिटणीस यानी सांगितले असेल सारांष ऐवज सत्वर येऊन खर्चाच्या अडचणी दूर होणे ते करणे आपणाकडे आहे बहुत काय लिहिणे हे आसीर्वाद. पौ छ ८ माहे जमादिलाखर सु॥ इसने आशेरीन मयातेन व आलफ मु॥ करवीर.

लेखांक २२ तारीख ५-४-१८२२

हुजूर

रु. नं. २

अ. नं. ४३० तालीक.

जाहीरनामा सरकार दौलतमदार कंपणी इंग्रज बहादर तमाम लोकास महशुर व्हाव या करिता लिहिले जाते जे श्रीमन्माहाराज छत्रपति साहेब राज्य सातारा यास कंपणी सरकारतून राज्य देऊन तहनामा जाहला त्यावेलेस येसे ठरले होते कीं मुलकाचे आबादी व बदोबस्ता करिता आमाहाराज याचे आ हाककार लोक बंदोबस्ताचे कामास वाकब व्हावा या करिता कांहीं दिवस वहिवाट माहाराजाचे नांवाने व माहाराज याचे मसलतीने इंग्रजी सरकारचे सरदार करतील त्यास हली माहाराज याचे सरकारातून बंदोबस्त वहिवाट आजपासून होत जाईल येस ठरले त्याजवरून उलियेम च्यापलीन साहेब कमिशनर बाहादूर याणी सातारियास येऊन माहाराजाचे दरबारात मोठे सरदार व जाहागीरदार वगैरे सारे लोक जमाव होऊन राज्याची वहिवाट माहाराजाचे सरकारात सुपूर्द केली असे तरी सरदार व जहागीरदार लाहणमोठे जे माहाराजाचे इलाकेत आहेत त्याणी व तमाम रयेत वगैरे हरयेक लोकानी माहाराजाचे सरकारचे लक्ष ठेऊन त्याचे हुकूमाने वागत असावे ये सरदार व जहागीरदार याणी आपलाले यादी प्रमाणे वागावे सरकारातूनही या लोकास हुकूम होतेवेलेस यादी प्रमाणे होत जातील सर्वांनी जाहीरनामा समजोन वागत आसावे जाणिजे ता ५ येप्रेल सन १८२२ इसवी मुताबिक छ १२ रजेब सु॥ इसने आशरीन मयातेन व आलफ.

लेखांक २३ तारीख ८-४-१८२२

अ. नं. ५५२ १३-७-१८२२

श्रीमन्माहाराज छत्रपति दाम मोहबत हू

नियाजमंद मेस्तर ताकरीन सो बाहादूर आकटिंग सर कलकटर व पोलटक्याल येजंट

सुभा धारवाड नियाज मारुज आंके दरिविला नियाजमंदेची खैरीयत रोषन होऊन हमेषा रवाना करून सरफराज करीत आल पो दरिवला मौजे माहालुंगे येथील रानात दोन तीनशेह पायदेल व स्वार दोनशेहे चोरटे आहेत यैस खबर लागले-वरून कलमी केली अस माहाराजानी याची बंदोबस्तीस स्वार व लोक रवाना करणे जाहल असेल आणखी या कामास पाटवणारास पाठऊन जलदीने बंदोबस्त करविल पाहिजे अगर येथून कुमक जरूर असल्यास कुमक पुरऊन देईन आणखी करवीर प्रांतात चोऱ्या व दरोडया बहुतन्द होत जातात याचा पता लागून चोरास व चोरटेस आसरा दिल्ह त्यास देखील नसीहद होऊन तलायुष होत नाही येंदा येणे प्रो होइनास पुरा बंदोबस्त होऊन नियाजमंद यास सादर व्हावा जियादा

मुद्दाम बाद

थैली रवाना ८ येप्रेल १२३१ फसली

(इंग्रजी सही)

पौ छ २० माहे रजेब
सु॥ इसने अशरीन मयातैन व अलफ
चैत्र व॥ ७ मु॥ करवीर.

लेखांक २४ तारीख २३-५-१८२२

श्री व्यंकटेश

अ. नं. ४८६ २३-५-१८२१

सो मेहेरबा करम फर्माय दोस्ता आजम ताकरीन सो बाहादूर सलमुला हुताला आज दिल येखलास नारायणराव व्यंकटेश घोरपडे सलाम आके येथील खैरखुषी छ. २७ शाबान जाणून कलमी करुन दिल आराम करीत असाबे दरिविला साहेबी थैली छ १३ माहे मे तारीखची पाठविली ती राजश्री आणाजीराव वकील याणी कुरुंदवाडाहून आम्हाकडे पोहचती केली तेथे हुकूम कलमी केलाजे आ साहेब माहाराजाचे इलाखे[१]-तील याकरिता कांहीं काम असल्यास माहाराजास आर्ज करून बंदोबस्त करून घ्यावा ते न करिता लोक मेळवून लडाई केली त्यास माहाराज जसा पाहिजे तसा बंदोबस्त करितील म्हणोन त्यास आम्ही माहाराजाचे इलखेतील त्याजकडून आम्हास कांहीं उपद्रव जाहाला आसता करवीरास वकील आहेत त्यास लिहून विनंती करीत आसतो परंतु ध्यानी घेऊन पेशजीपासून चालत आले प्रो। चालवावे ते न होंता नवीन पटीचे खटले उत्पन्न करून आजरे तालुकियात दुतर्फी आमलाचे निमित्य वार्सा[२] लिहून स्वाऱ्या करून गांवखेडयाची घरे जालली व गुरे लुटून नेहली व ठाण्यावरहि चालून येऊ लागले

१ प्रांत, ताबा, अवलंबून. २ हक्क, मालकी.

सबब तेथे नवे लोक ठेविले व येथून कांहीं लोक पाठऊन माहलचा बंदोबस्त केला त्याची फौज ठाण्यावर चालून आली तेंव्हा आम्हाकडील लोक बाहेर पडोन त्याची व याची गोलागोली होऊन तिकडील व इकडील लोक जखमी जाहाले त्यामुळे करवीराहून खासा स्वारी येऊन मौजे रांगोली हा गाव घेऊन गाव लुटिला इकडील लोक गावात होते त्याणी खासा स्वारी आली आसे पाहून गोली मारली नाही आम्हाकडीलच दोन आसामी मारली गेली त्यानंतर शहे दोनशहे स्वार नदी उतरोन इचलकर्जीच्या रानांत चालून आले उपरांत आम्हाकडील लोक गावातून बाहेर निघून तिकडील व इकडील गोलागोली जाहाली आम्हाकडील च्यार आसामी जखमी व येक ठार जाहला तिकडीलही येक दोन जखमी जाहाले म्हणोन येकिले नंतर स्वारी माघारी गेली दुसरे दिवसी लाटेवर स्वारी जाऊन गाव घेणार तोफा व सिड्या स्वारीसमागमे आणिल्या होत्या आसे समजल्यावरून रातोरात सांगली व मिरज व कुरुंदवाड येथे कारकून पाठवून नवे लोक उमेदवार शे दोनशेह पर्यंत चाकरीस ठेऊन लाट इचलकर्जी वगैरे गावचा बंदोबस्त केला नंतर रांगोलीच्या ठाण्यात त्याणी दोनशेह लोक व शंभर स्वार ठेऊन गावचा बंदोबस्त करून स्वारी निघोन करवीरास गेली हा मजकूर साहेबास जाहीर व्हावा याकरिता थैली पाठविली व इकडील वकीलासहि जाहीर केले हली साहेबाचा हुकूम याप्रो आला त्यास आमचा उपाय काय आहे? आम्हाकडून माहाराजाचे पायासी तिलप्राय आंतर नाही येविसीचे सविस्तर राजश्री आणाजीराव वकील येथे आले होते त्यास समजून दिल्हे आहे ते साहेबास जाहीर करतील साहेबानी आर्ज खातरेस आणून या संस्थानाविसी माहाराजास थैली येऊन बंदोबस्त जाहालेसिवाय आमचे परिणाम लागत नाही. ज्यादा काय लिहिणे

+ प्यार मोहबत आसो दीजे हे किताबत

ता।। २३ माहे मे सन १२३१ फसली.

तारीख २६–५–१८२२

लेखांक २५

भाऊ महाराज

श्री रामचंद्र

नकल रु. नं. २ अ. नं. ३४३

शौकत व अवाली पनाहा दस्तगाहा

आजंम मेस्तंर ताकरीन साहेब बहाद्दर आकटींग

सर कलकटर व पोलटक्याल येजंट सुभा धारवाड

कामयाब बाषंद

यास आसिर्वाद उपरी येथील खैरीयत जाणोन अ शाकत पनाहानी आपली खेरखुषी हमेशा कलमी करून दिलआराम करीत असावे दरविला शौकत पनाहानी ता ११ माहे मे चे तारीखेचे खत फिरस्ताद केले ते रसीद होऊन मजमून मालूम जाहाला

श्रीमन्माहाराज छत्रपति याणी सिकरींचे निमित्त करून भारी फौज वगैरे घेऊन इचलकरंजी इलाखा शिरदवाड व रांगूली दोन्ही गावची ठाणी घेतली त्यास असे भारी कामास आपणाकडून खत आले नाही व वकीलाकडोनही मजकूर समजला नाही यास्तव कलमी केले आहे इचलकर्जीकरावर स्वारी करणेचे निमित्य कोणत्ये व लढाई कसी जाहाली व छत्रपति याजकडील व त्याजकडील लोक किती होते व पुढ इरादा काय आहे छत्रपति याची स्वारी कोणते ठिकाणी आहे कलमी होणे म्हणोन लिहिले त्यास इचलकरंजीकर महाराज छत्रपति याचे नोकर आसोन सरकार हुकूम न मानिता गैरसिरस्तेची वर्तनूक करून सिलशिला आजरे तालिकेत लाविला येविसीची जसाजसा मजकूर जाहाला तसा वरचेवर वकीलास लिहिण्यात गेला त्यानी आपणास सांगितलाच आसील हाली रांगोलीत ठाणे छत्रपति याणी घातले नंतर इचलकर्जीकर याजकडून बोलणे हिकडे येताच इकडून महाराजास लिहिणे जाऊण दुसरीकडे उपद्रव होऊ नये असे ठरोन दुसरे रोजी स्वारी करवीरास दाखल जाहाली हे विसीचे सविस्तर वकीलास लिहिले होते त्यानी शौकत पनाहास सांगितलेच असेल पुढे इचलकरंजीकर याजकडून सरकारी जाबसाल व्हावेयाचे त्याची याद छत्रपति याजकडून इकडील विद्यमाने त्याजकडे तुम्ही दिल्ही आहे त्याप्रमाणे जाबसाल फैसल होऊन शेवकपनाचे ईराद्याने वागलेस उत्तम नाहीपक्षी त्याचा बंदोबस्त करावा येसा छत्रपति याचा इरादा दिसण्यात आहे यास्तव मजकूर जसा होईल तसा वरचेवर वकीलास लिहिण्यात येईल ते शौकत पनाहास समजावितील दोस्तीचे दरजागा हर हमेशा खत फिरस्तद करून शादिमानी हासील करीत असिले पाहिजे रा। छ ४ माहे रमजान सु॥ इसन अशरीन मयातैन व आलफ ज्यादा काय लिहिणे मोर्तब असे.

लेखांक २६ तारीख ८–६–१८२२

श्री

रु. नं. २
अ. नं. ३४८

पौ छ २३ माहे जिल्काद सु॥
सलास आशरीन मयातैन
व आलफ श्रावण व॥ ९
शके १४९ चिकोडी

श्रीमन्माहाराज राजश्री छत्रपति
स्वामीचे शेवेशी

विनंती सेवक दौलतराव शिंदे कृतानेक विज्ञापणा ता। छ १७ रमजान पावेतो स्वामीचे कृपेकरून सुखरूप असो विज्ञापणा येसीजे चिरंजीव सकुबाई याचे लग्नाचा निश्चय जेष्ट कृष्ण ९ गुरुवारी करून शरीरसंमध आनंदराव पवार धारकर याचे चिरंजीवासी नेमस्त केल आहे त्यास सहपरिवारे येऊन मडंप शोभिवंत करणार स्वामी समर्थ आहेत सेवेशी श्रुत होय हे विज्ञापणा.

लेखांक २७ तारीख २२-६-१८२२

अ. नं. ५५१

फयुजात इलाही व तवजेहात नामत
न्हाही शामिल हालआजम हनरबाल
मोट इष्टुवर्ट इलफिष्टन पजिदेत
गवरनर बाहादर जंजिरे मुंबई रोज
आफजुबाद

अजीसौब श्रीमन्माहाराज मातुश्री महाराजगिराणी सुंदरा आईसाहेब बाआदज दुवा आंके दरिवला आबाहादरानी फिरिस्ताद केले ते रसिद होऊन बयावार मजमून इज्रहार जाहाला करवीरकर माहाराजे बुलंददरजे व त्याचे वारीष याच्या आणि इतर कोण्ही संवस्थानिक याच्यामध्ये कांहीं यक तफावत पडला असता त्याची फैसल करून द्यावयास येकबालपनाह इंग्रजी सरकारानी दखलगिरी करावी म्हणोन करवीरकर महाराज छत्रपति याजबरोबर तह ठरला आहे त्याचे नवे कलमात करार आहे कोटकिले स्वाधीन घ्यावे वकील याचे खर्चाबा। तनखा तोडून वसूल दिल्हा होता तो आदा व्हावा यविशाई करवीरकर व संवस्थान वाडी यामध्ये लडा पडोन कितेक साले वैमनस्व व लडाईचा मुकदमा चालला होता तो फैसल करून घ्यावा बईसबब सदरहू यख्तियाराप्रमाणे बिसयार रोज सरकार इंग्रेजा कडून तजवीज चालली आहे बहुत दिवस प्रेत्न आहे लेकीन त्या लडयाविशाई कोणतेही संवस्थानाकडून वाजबी हिशेब मिळाले नाहीत म्हणोन इज्यानीबास जरूर होऊन तनखा न द्यावयाचा दावा व ज्याकडे प्राचीन भोगवटा त्याकडे चालवावे हे मनास आणून हाली सेवटची कितेक साले भोगवटा चालला तो वाजबीचे रुईने इनफीसाल होऊन खचित केला आहे किले नरसीगड व प्रसिद्धगड व भरतगड हे करवीरकर याचे यैसे ठरवून दिल्हे ते तहाचे नवे कल्माचे करारावा। व वाजबी प्रमाणे आहे फिलहाल किल्याचे खर्चास कितेक तर्फेतील वसूल होतो त्याचा सरासरीमात्र वसूल कोल्हापुराकडे लाऊन द्यावयाचा तो न देता वांध्याचे गावचे नेकी वसूला पैकी किल्यास दरसालचे उत्पन्न किंवा गावचे आकाराचे बेरजेपैकी निमोनिम हिसा द्यावा हे गफलतीने ठरले होते त्यास मरकुम कल्म करिता जे सदरहुप्रमाणे फैसला करून घ्यावे म्हणोन सरकार निसबत वकीलास निक्षून ताकीद इबलाग व्हावी त्यामध्ये कांहीं तफावत होणार नाही किल्यास यैवज किती द्यावयाचा ठरल तो साल दरसाल आदा होय याचा बंदोबस्त केला जाईल कदाचित खातीरखा।। हामीदार मिळून तसा बंदोबस्त न जाहाल्यास मुलुक लावून देविला जाईल इनामदाराचा बंदोबस्त अजम रीड बाहादर यास मिलोन करून द्यावयाकरिता सरकार निसबत वकीलास ताकीद इरसाल व्हावी म्हणोन आबाहादरानी निगारीष केले त्यास पुण्यात शौकत व आवाली पनाह अजम उलीयम चाप-

लीन कमिशनर बाहादर याही ठरविले त्याबमोजीब इनफीसाल होत नाही की हाल आजीपासून हुजूर सरकार व वाडीकर हिसेदार यामवाफिक ताआलुकेची वहिवाट असता फिलहाल दुसरी तराह होण्याचा भाव दिसण्यात आला व नख्ती यैवज द्यावा म्हणतात यात सरकारची नुकसानी बिसयार आहे फिलहाल आणखी येक वेल आबाहादरानी दर्याफ्ती जंजिरे मुंबई मुकामी आगर पुणे मुकामी करावी ही ख्वाहीष आहे बइसबब कारकुनाची रवानगी होत आहे रुबरु दर्याफ्ती होऊन जवाब सवाल ठरून आबहादर सांगतील त्यामवाफीक फैसल करून घेणेबाबे आज्ञा होईल सरकारचे राज्याची सर्वोपरी हमीयत व शरम आबाहादरास आहे आखलखसुस आजपर्यंत सरकारचे राज्याची जियादती व तरकी करणे ती आबाहादरानीच केली आहे व पुढेही सरकारचे राज्याची जियादती व तरकी करणे ती लाजीम

असतां मरकुम कलम काये आहे फकेफा मुफसील मजमून वकील आबाहादाराचे नजदीक जहूर करतील

सुहूर सन सलास अशरीन मयातैन व आलफ रवाना छ २ माहे शौवाल जियादा काय लिहिणे.

लेखांक २८ तारीख ३०-६-१८२२

रु. नं. २

अ. नं. ३४५

श्रीमन्माहाराज छत्रपति साहेब दाम मोहबत हू

नियाजमंद उलियम च्यापलीन साहेब बहादर कमिशनर बाद नियाज मारूज खैरीयेत रोषन होऊन हमेषा फिरिस्ताद करून सरफराज करीत असिले पाहिजे दरविला छ १० सवालचे इनायतनामा पोचऊन मजमूत त्यातील हसील कीं वाडीकर याच कजिया खरमरीत फैसला होण्याविषई साबक तीन कलमाची खत फिरिस्ताद करण्यात आले त्याप्रमाणे वकीलास सरदार अजम रीडसाहेब याजकडे रवाना केले तेथ पोहचले चौकशी होऊन नवीन दुसरी तरहा देणार म्हणून वकीलाचे पत्र आले तसे होऊ नये पेशजी ठरले प्रमाणे उलगडा व्हावा म्हणून गौरनर सो बहादूर जंजिरे मुंबई याणी हालीं चौकशी करून ठरविले कीं नरसिंव्हगड व प्रसिद्धगड याजकडून तकरार गावचे वसूलीवर बेरीज दामाशाई करून बेरजा प्रो गाव लाऊन देण्यास होणारे नाही त्याजकडून खरसे बहुत पडत आहेत म्हणोन लागाईत पासोन माहाराजाकडे वसूल जसजसा आला असे ते मजकूर सर्वही ध्यानात आणून जितका येवज माहाराजाकडे वसूल पडला त्याचे सरासरी प्रो वसूल येण्यास गाव तोडून ध्यावे म्हणोन याजवरील आमाहाराजास कलमी करण्यात येत आहे कीं हे ठराव गौरनर साहेब बाहादर

याणी करून हुकूम फर्माविले आहेत त्याप्रमाणे उलगडा करून घेण्यास वकीलास ताकीद करून फैसले व्हावे असे करविले पाहिजे ज्यादाचे मेहेरबाननी मुदाम

(सही इंग्रजी)

पौ छ १४ माहे सवाल सुा सलास
आसरीन मयातेन व आलफ शके १४९
चित्रभानुनाम संवत्सरे आषाढमास

लेखांक २९ तारीख १८-१०-१८२२

अ. नं. ५५४

भाऊ महाराज

अजम हलराबल मोट इष्टुवर्ट
इलफिष्टन प्रजिदेत गवरनर बाहादूर
जंजिरे मुंबई कामयाब बाशंद

आमारत व आयाल्त पनाह शोकत व हशमत दस्तगाह बाआदज इफ्तीयाक फिरावा मशहूद आंके हुजूर ची कैफीयत जहूर व्हावी बइसबब्र खास दस्तुरचे निगारीष होऊन पेशआजी राजजी आनंदराव त्रिंबक वकील यास फिरिस्ताद केले आहे याणी बयावार मजमून इजहार केलाच्च असेल

मजकूर वकील मौसुफ यास कलमी फर्माविला आहे जुबानी मजमुन करितील

सु॥ सलास आशरीन मयातैन व अलफ र॥ छ २ माहे सफर जियादेयव निगास्त आयद आयाम.

लेखांक ३० तारीख २-१२-१८२२

अ. नं. ५५४

श्रीमन्माहाराज छत्रपति सा
हेब दाम मोहबत हू

नियाजमंद उलीयम च्यापलीन साहेब बाहादूर कमिशनर बाद नियाज मारुज आंके नियाजमंदाची खैरीयत रोषन होऊन हमेषा फिरिस्ताद करुन सरफराज करीत असिले पाहिजे दरिविला आमाहाराजानी मा। आनंदराव त्रिंबक याचे विद्यमाने इलताफनामा मरकूम केले ते पोहचले.

१ येक दोनी असामी कामदार यानीं येलीकड बखेडा हरतऱ्हेने केले व पुढेहि करीत आहेत याजकरिता येविसीचे मजकूर मा।।रनिलेनी जाहीर करतील म्हणून छ १७ माहे मोहरमचे तारीखेत कलमी करणेत आले ऐशास सरंजामीदार व कामदार लोक कदीम दौलतीचे आहेत यास मामूल मवाफीक चालविले असता बखेडा कांहीं होणार नाही यैस मालूम होत आहे.

१ श्री भाऊ माहाराज यानी दौलतीची तमा ठेऊन बखेडा केले व करणार आहेत म्हणोन छ २ माहे सफरचे निगारीष केले ते मालूम जाहाले यानी आमाहाराजाचे दौलतीचे कामकाजात बहुत इतबारीने केले आहेत यैस सरकार खातरजमा आहे यास कारभारात दाखल असावे म्हणोन कांही इरादा नाही लेकीन आमाहाराजाचे मेहेरबानीस वाकीफ होईल यैस उमेद आहे.

जियादचे आयाम शादमानी मुदाम बाद.

(सही इंग्रजी)

पै।। छ माहे रबिलावल

सु।।सलास आशरीन मयातैन व अलफ

लेखांक ३१ तारीख २-१२-१८२२

भाऊ माहाराज

आजम हनरावल मोट इष्टुवर्ट इलफिष्टन प्रजिदेत गवरनर बाहादर जंजिरे मुंबई कामयाब आमारत व अयालत पनाह शौकत व हशमत दस्तगाह

बाआदज इस्वीयाक फिरावा मशहूद आंके श्री याणी सत्कर्म आचरण सोडून बदराह चालणेची खुषी मानून दौलतीची तमा करून हुजूर ची बदनामी व माहाल मुलकातील रुसूम घेऊन बिसयार नुकसानी केली आहे लेहाजा[1] बइसबब त्याजकडील वकीलाचे काम बरतर्फ होऊन हुजूर हून राजश्री आनंदराव त्रिंबक वकील याहमराह इबलाग जाहाले

श्री वाडीस जाऊन ब्राह्मण समाराधना करावयाची आहे म्हणोन जाहीर करून रुखसत घेऊन निघोन गेले बाआदज हुजूर चे रुखसती खेरीज तेथून परभारे पुणेस जाऊन हुजूर चा जहूर करावा हा इरादा करून

१ लेहाजा = म्हणून, सबब

आले आहेत. रुसूम खाऊन माहाल मुलकाची नुकसानी करणेत कसूर केला नाही सबब याजकडून वकीलीचे काम घेणेचा अर्थ राहिला नाही अवाली पनास मालूम व्हावे बईसबब मरकुम कलम जाहाले आहे

श्री यासी रुखसत देऊन हुजूर फिरस्ताद करावे सु॥ सलास अशरीन मयातेन व अलफ रवाना छ १७ माहे रबिलावल जियादयेच निगाष्तं आयद आयाम मुदाम बाद;

लेखांक ३२ तारीख २०-१२-१८२२

श्री

रु. नं. २

अ. नं. ४३६

श्री मन्माहाराज राजश्री छत्रपति स्वामीचे

शेवेशी

विनंती शेवक बालाजी बाजीराव चेरणावरी मस्तक ठेऊन कृतानेक सेवेशी विनंती विज्ञापणा ता॥ छ ५ माहे रा॥खर पर्यंत स्वामीचे कृपावलोकने करून सेवकाचे वृत येथास्थित असे शेवेशी विज्ञापणा येसिंजे पुणेहून आलंदीस येऊन तेथून श्रीचे स्वारीसुद्धा मुंबईस येणेस निघालो त्या मजकुराची विनंती पत्रे मार्गाहून सेवेशी पाटविली होती त्यावरून निवेदनार्थ आलेच असेल पौष्य शु॥ २ तिसरे प्रहरा मुंबईस येऊन दाखल जाहालो नंतरी चुर्थीस मेहरबान गौरनल बहादर याचे भेटीचा सिधात ठरोन त्याच दिवसी परोलच बंगलेत साईकालचे तीन घटिका दिवसास भेटी पुर्वपधति प्रमाणे जाहाल्या नंतर दोन दोन घटिका पर्यंत बसून खैरखुशीच्या गोष्टी श्रीमन्महाराज मातुश्री-साहेब याच्या व माहाराजाच्या विच्यारिल्या धाकटे माहाराज किती वर्षाचे आहेत हे विचारिले व माहाराजास दगाफटका कैसा जाहाला हा मा॥र काढून बहुत विस्मित जाहाले नंतर समाधानाच्या गोष्टी बोलोन दुसरे बैटकीत सविस्तर मजकूर समजोन घेऊ याप्रो बोलोन नंतर श्री स गौरनर बहादर याणी सांगितले कीं कुंपणी सरकारात विदीचा दिवस आहे त्या दिवशी सर्वत्र साहेब लोक येऊन रात्रौ तमाशा होत असतो त्या दिवशी आपणास बोलावणे पाटवितो आपणही समारंभास यावे याप्रमाणे बोलिले नंतर श्री नी उत्तर केले कीं आपले मर्जीशिवाय दुसरे काय आहे येसे उत्तर जाहाले नंतर उत्तम आहे म्हणोन बोलोन निरोप दिल्हा नंतर श्रीचे स्वारीसुधा बिराडास आलो विदीचा समारंभ होऊन नंतर दुसरे बैटकीत बोलणेचा मा॥र होईल तो मागाहून सेवेसी विनंती पत्र लिहून पाटवितो वरकड सविस्तर श्री नी हुजूर कलमबंदीची यादी व आसीर्वाद पत्र पाटविली

आहेत त्यावरून निवेदनात येईल सेवेशी श्रुत होय हे विज्ञापणा.
पौ छ १५ माहे रबिलाखर सुा सलास आशरीन
मयातैन व आलफ मु।। करवीर पौष्य बद्य ४

लेखांक ३३ तारीख १२-३-१८२३

श्री

पौ छ २ माहे रजब सु।। सलास अशरीन मयातेन व अलफ अज मकाना करवीर

अ. नं. ५५९

श्रीमन्माहाराज छत्रपति दाम मोहबत

नियाजमंद मेस्तर ताकरीन सो बाहादूर सर कलकटर व पोलटक्याल यजंट सुभा धारवाड मारूज आंके नियाजमंदीची खैरीयत रोषन होऊन हमेषा
पाठऊन सरफराज करांत आल पाहिजे दरिबिला रामापूर हा गाव
भाऊ माहाराज याजकडे धर्मादाव चालत आहे त्यास भाऊ घोरपडे सेनापति याणी लोक घेऊन जाऊन जबरीने ठाणा घातले यैस जाहिरेत आलेवरून कलमी केली अस सेनापति याणी माहाराजाच्च इलाकेतील आहेत करिता याची बंदोबस्ती ताहाल माहाराजाकडून जाहाल असेल अगर न जाहाल असता जलदीने करून देविली पाहिजे तेथून बंदोबस्त न जाहाल्यास माहाराजाच्च इतिल्यानच्च हे काम जाहाल आहे म्हणून समजाव लागेल माहाराजास व माहाराजाच्च इलाकेतील लोकास खटला पडून मुलक खलल होणेच्च षकल दिसे जो परियेत सरकार दरम्यान येणार नाहीत यैस कितेक प्रकरणी माहाराजास मेस्तर चापलेन सो बहादूर कमिषनर याच्च पत्र आल त्यात दाखला असेल बिल फैल या कामाची बंदोबस्ती न जाहल असता सरकारातून होणे जरूर पडेल इतिल्ला असाव म्हणून मारूज केल अस जियादा बाद खरिता रवाना
१२ मार्च १८२३ इसवी.

(सही इंग्रजी)

लेखांक ३४ तारीख ११-५-१८२३

रु. नं. २

अ. नं. ३५४

यादी आनंदराव वकील नि।। महाराज छत्रपति

बार

१ आपाजीराव सितोळे याचा इलाका सरकारच्च आहे माहाराज छत्रपति याचा इलाका नाही रोखा वगैरे होऊ नये म्हणून रुबरु तुम्हास लेहून पुणे दप्तरच्च यादी आले तेही

दाखलेस दिल्ही होत याकरिता कलमी केल जात जे माहाराज छत्रपति यास लिहून पाटऊन पुणे दत्फरच यादी बा। चालवितेस बंदोबस्त करवणे फिरून बोमाट येऊ नये कल्म

ताा छ ११ माहे मे १२३२ फसली

व मुनषी हुजूर मेाा (मुकाम) जुन हुबली

(सही इंग्रजी)

लेखांक ३५ तारीख ६–७–१८२३

श्री

रु. नं. ३

अ. नं. ५६६

पौा छ २७ माहे शोवाल सुाा आर्बा अशरीन
मयातेन व आलफ

तीर्थरूप श्रीमन्महाराज मातोश्री आईसाहेब

वडिलाचे शेवेसी

आपत्य राजे बावासाहेब छत्रपति चरणावरी मस्तक ठेऊन शेवेशी विज्ञापना ताा छ २६ माहे शवल रविवासरे पर्यंत बालकाचे सकलवृत यथास्तित असे विज्ञापना ऐसीजे आज लाटेच्या मुकामाहून कूच करून चिकोडीचे मुकामास हुजूरची स्वारी जाहाली वाटेस येते समयी चिकोडीचे डोंगरास जाळीत डुकर आहेत ऐसी बातमी आली त्याजवरून खासा स्वारी तेथे जाऊन डुकर वेढून उठविले ते वेळेस चौहोकडून गोळ्या डुकरावरी उडाल्या ते समयी मुराररराव घोरपडे यासी गोली लागून मृत्यू पावले वरकड माार चिरंजीव राजेश्री दिनकरराव गायकवाड यानी विनंतीपत्री लिहिले आहे त्याजवरून निवेदन होईल शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक ३६ तारीख ६–७–१८२३

श्री

रु. नं. २

अ. नं. ४३८

पौं छ २७ माहे शौवल सुाा
आर्बा आसेरीन मयातैन व आलफ

तीर्थस्वरूप श्रीमन्माहाराज मातुश्री आई
साहेब साहेबाचे शेवेशी

विनंती शेवक दिनकरराव गाईकवाड कृतानेक सेवेशी विज्ञापणा ताा छ २६ माहे शौवल

रविवासरे पर्यंत मोकाम चिकोडी येथे बालकाचे वृत यथास्थित असे सेवशी विज्ञापणा येसीजे आजच हुजूरचे खासा स्वारीचे कूच होऊन चिकोडीचे मुकामी मुकाम जाहाला लाटेहून येतेवेलेस चिकोडीचे डोंगरात जालीत डुकर आहेत येसी बातमी आली त्याजवरून हुजूरची स्वारी जाऊन डुकर वेढले आणि स्वार पायदल सभोवते उभे केले ते वेलेस हुजूरचे हातात बंदूख होती सन्निध मुरारराव घोरपडे उभे होते ते वेलेस घोडेची दांडी बंदुखीस लागून किटाल पडून बार जाहाला ती गोली घोरपडयासी लागून मृत्य पावले सेवेशी निवेदनार्थ विनंती लिहिली आसे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापणा.

लेखांक ३७ तारीख २६-७-१८२३

श्री

रु. नं. ४
अ. नं. १९८

श्रीमन्माहाराज राजश्री बावासाहेब
छत्रपति स्वामीचे सेवेशी

विनंती सेवक जयसिंगराव घाटगे सर्जेराव वजारतमाब दोनी कर जोडून विज्ञापणा ताा छ १७ माहे जिल्काद पर्यंत स्वामीचे कृपेकरून शेवकाचे वर्तमान क्षेम असे विज्ञप्ती यैसीज स्वामीनी बहुता दिवशी सेवकावर कृपालु होऊन आज्ञापत्र पाा ते उतम समई प्राा होऊन मस्तकी वंदोन सनाथ जाहालो आज्ञापत्री आज्ञा केली त्याप्रोा जिनसा दसरा जाहाल्यावर राजश्री बापू पाटील भोसले या समागमे पोषाक सुधा रवाना करून देतो सेवेशी येऊन प्राा होतील स्वामी कडून राजश्री दिनकरराव काकरे आले त्याज समागमे आज्ञा सांगो पाटविली ती मशारनिले याणी समजाविल्यावरून बहुत आनंद जाहाला स्वामीनी या प्राा आज्ञा करावी आणि सेवकाकडून सेवा घडत नाही येविसी बापू पाटील मोा स्वामीस आर्ज करतील तो सेवकाचे मुखाचा अर्थ जाणून हुजूरून आज्ञा होणे ती व्हावी वडिलार्जीत साधनसूत्र जे करणे ते स्वामीच्या सेवेकरिता हे सर्व विदित आहे इकडील विनंती लिहून सुचवावी अर्थ नाही स्वामीचे चरणाचे दर्शन होईल तो सुदीन तीर्थरूप मातुश्री नानीसाहेब तेथे आहेत ते स्वामीच्या भरवशावर आहेत सोईपरी सांभाळ करणार स्वामी समर्थ तेथील पदरची मानूश गैरमाहित आहेत क्षमा कर्णे स्वामीचे शेवेशी श्रुत होय विज्ञापणा.

लेखांक ३८ तारीख २०-१-१८२४

श्री

रु. नं. ३
अ. नं. ५७८

पौ छ २१ रोज भ्रगुवार माहे जा।बल सन आर्बा आशरीन मयातेन व आलफ
निवळहाळ नजीक

श्रियासह चिरंजीव विजयीभव राजश्री राजे बावासाहेब छत्रपति यासी अनेक आसीरवाद उपरी येथील क्षम तागायत छ १८ जमादिलावल पर्यंत सकलवृत यथास्तित असे विशेष साहेबाचे सेवेसी आपण विनंती पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ श्रवण जाहाला खडकचे वाडेहून कूच होऊन निवळहाळ येथे स्वारीचा मुकाम जाहला स्वारी येणेचे पूर्वी प्रसिद्गडकरी व मालवणकरी यांनी तोफा घाटावर चढविल्या बाकी पांच चार राहिल्या त्या एकदोन रोजी घाटावर चडतील म्हणोन विनंतीपत्री लिहिल निवेदन जाहाले कलावे बहुत काय लिहिणे हे आसीरवाद.

लेखांक ३९ तारीख १५-२-१८२४

श्री

रु. नं. ३
अ. नं. ५७९

दरिविला राजश्री कृष्णराव गोपाळ आपणाकडे आले आहेत त्यास कागल तालुक्याची व सेनापतीकडील तालुक्याची वगैरे माहितगारी मा।रनिले यास आहे येविसीचा मजकूर आपणास मशारनिले सांगतील त्यावरून माआलूम होईल घाटगे व सेनापति निपाणकर यास सामील होऊन राज्यास आपाय केला त्याजमुले आपला आश्रय केला आहे त्यास आपणाकडून नसीहत न पोहचल्यास हुजूरचा नक्ष कसा राहील सर्वोपरी हुजूरचे राज्याचे उभारणीचा भार आपणावरी आहे त्या अर्थे निघारीष होणे लाजम

श्री व राजश्री मोरो बाजीराव चिटणीस याजकडे तुलोजीराव घाटगे सरज्याराव यानी बिनंतीपत्र कागलचे ठाणे जे वेंलेस आज्ञा होईल ते समयी हुजूर देऊ म्हणोंन लेहून दिल्हे आहे त्या विनंतीपत्राची तालीकही रवाना जाली आहे.
सु॥ आर्बा अशर मयातेन व अलफ रवाना छ १४

जमादिलाखर—

लेखांक ४० तारीख ३०-४-१८२४

श्री

रु. नं. २
अ. नं. ४४७

यादी राजश्री हिंदूराव घाटगे सज्याराव कागलकर याचा जाबसाल सुा आर्बा अशरीन मयातैन व अलफ
१ हुजूर बदमामली करून निपाणीकर याचे फंदात सिलोन हिंदुस्थानात शिंदे याजकडे

घाटगे मशारनिले गेले त्यासाला पासून सरंजामाचा ऐवज हुजूर यावा ———— कलम
१ घाटगे मशारनिल्हे यानी स्वार शंभर व पायाचे लोक दोनशेहेनिसी हुजूरची चाकरी करीत जावी ———— कलम
१ घाटगे याचे बा भाऊ हुजूरची चाकरी करीत आहेत त्याचे मामुल प्रमाणे चालावे ———— कलम
१ घाटगे मशारनिले यानी हुजूर दोन महिन्यात येऊन हाजीर होऊन सदरहू कलमा प्रमाणे वर्तणूक करून चाकरी करावी ———— कलम

४ येकूण कलमे च्यार तेरीख छ २९ माहे शावान

लेखांक ४१ तारीख १–६–१८२४

श्री आई आदिपुरुष

रु. नं. ३

अ. नं. ५८३

पौ छ ८ शोवल सुा खमस अशरीन मयातेन व आलफ मुकाम मनोली

श्रीमन्महाराज राजश्री छत्रपति स्वामीचे

सेवेसी

विनंती सेवक माधवराव भगवंत कृतानेक बिज्ञापना विनंती तागायत छ ३ सवाल पा × स्वामीचे कृपावलोकन करून सेवकाचे वर्तमान जे सेवक शेवेसी दाखल होऊन मेहनत करुन शेवाधर्मांने कृपा संपादावी हा मनोधर्म वक्त पहिल्याप्रमाणेच होती सेवकाचे तात्पर्य धनी यानी यानी समक्ष ऐकूण घेऊन वरद हस्त मस्तकी ठेविला इताकियात काळदसेनुरूप मर्जीस व्यत्यय कोणी आणिल्यावरून शेवकावर अवकृपेचे भाव उत्पन्न होऊन शेवकाची कोणतीही विनंती न चाले असे होऊन येणे जाणे राहाणेचीही आज्ञा सांप्रदायानरूप न होता स्वारीचे कूच जाहाले तेथे सेवकाचा उपाय काय येथे माणसास कांही उपद्रवाची भावना उत्पन्न होऊन दोन माणसे जाया जाहाली व खर्चास ही न × × लोक न विचारिता उठोण गेले प्रस्तुत कोंणत्याही प्रकारे सेवकाची निभावणी नाही यास्तव शेवकाचे जाणे मलकापुरास जाहाले स्वाम सर्वजाण तेथे सेवकाने विस्तारे विनंती लिहिणेची शक्ती नाही व कृपेशिवाय दुसरी इच्छाही नाही शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक ४२ तारीख १६-६-१८२४

श्री

रु. नं. ३

अ. नं. ५८५

पौ छ १९ माहे शवाल सन खमस
आशरीन मयातेन व आलफ

श्रियासह चिरंजीव किजयीभव राजश्री राजेबावासाहेब छत्रपति अनेक आसीरवाद उपरी येथील आत्रत्य कुशल तागाईत छ १८ माहे शोवाल रोज सोम्यवासर सायंकाल दोनतास दिवसपर्यंत सकलवृत्त यथास्तित असे विशेष आपण राजश्री बाळोजी निक्कम हुजरे व मोरो चिकटोपंत नांवे आज्ञापत्र पाटविले ते छ मजकुरी सायंकाळचे प्रहर × × विष्ट होऊन लेखनार्थ × × × × माघार दिले सबब × × × × होऊन प्रहर दिवसास मुंगलीहाल येथे गोला गोळी जाहाली व नाथाजी शिंदे हावलदार यासी गोळी लागून ठार जाहाले व राजश्री जोतीराम घाटगे झुंझारराव यास तीन चार जखमा लागल्या आहेत एक दोन बारगीर यासही जखमा लागल्या आहेत म्हणोन लिहिले ते निवेदनात आले अशासही भसलतीचे विनंतीपत्र साहेबांचे सेवेसी न येता ऐसे केले त्याजवरून चिरंजीव राजेश्री जिजाजीराव खानवेलकर यासी सहिता मजकुराची आज्ञा होऊन आपणाकडे रवाना केले आहेत आज्ञेअन्वये विनंती करतील ही लक्षात आणून जे करणे ते करावे बहुत काय लिहिणे ह आसीरवाद.

लेखांक ४३ तारीख ८-७-१८२४

श्री

रु. नं. ३

अ. नं. ५८६

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १५१ तारणनाम संवस्तरे आषाढ शुद्ध द्वादसी गुरुवासरे क्षत्रिय कुलावतंष श्री राजा शहाजी छत्रपति स्वामी यानी राजश्री सरदारानी व पागा सिलेदारानी व ठाणेदारानी व कमाविसदारानी व मोकदमानी देहाय गावगन्नानी व घाटमेटानी व चवकीदारानी व रहदारीयानी व अंबी व जकायत माहालानिहाय यास आज्ञा केली यैसीजे तपोनिधी हरिलालपुरी गोसावी हे करवीराहून तीर्थयात्रा करणेस जात आहेत बरोबर गोसावी व माणसे दाहा व घोडी व बैल येणेप्रमाणे जात आहेत त्यास मार्गी जकायेतीविसी व हरएकविसी उपसर्ग न करिता जाऊ देणे आणि ज्या गावी

वस्तीस राहातील तेथे रखवाली रात्रो करून आणलेली हद्द पार करून देत जाणे जाणिजे निदेश समक्ष-

रुजु समत ता॥ तेरीख छ १०

मंत्री सरकार

माहे जिल्काद सुा खमस अशरीन मयातेन व आलफ बार सुरु सुद्र बार समत सुद्र बार बार-

लेखांक ४४ तारीख २५-८-१८२४

श्री गैबी द्या॥

रु. नं. ३

अ. नं. ५९१

यादी ठराव हुजूर देणेचा करार सुा खमस आशरीन मयातेन व आलफ माहे जिल्हेज छ २९ रोज

१ शीरपेच मजपासी आहे तो देतो. कलम

१ हत्यारे दाहा १० त्याजपैकीं आम्हापासी खासेचे हातील आहेत ती शेपतेपुररकर देतो. कलम

१ घोडी रास माद्या व नर दहा १० देऊ. कलम

१ हत्ती नग दवलतीस एक आहे यांजमुळ दौलतीत हाती असाव ऐसी माझी इच्छा आहे पूर्ण करणार साहेब कलम

४

एकूण कलम च्यार छ मजकूर रुजू.

लेखांक ४५ तारीख ८-११-१८२४

श्री

रु. नं. २

अ. नं. ४४१

पौ छ १९ माहे रबिलावल सुा खमस अशरीन मया अलफ

सेवेसी आज्ञाधारक आपाजी देसाई ता चांदगड कृतानेक विनंती विज्ञापना ता छ १६ रा॥वल पावेतो साहेबाचे कृपेकटाक्ष करून सेवकाचे वर्तमान यथास्तित अस × × असीजे साहेबी कृपाळु होऊन आज्ञापत्र पाठविल ते मस्तकी वंदून सनाथ जाहालो तेथे आज्ञा जी कितूरकर यानी ल्ढाई केली आहे याजकरिता तुम्हाकडील स्वार

व लोक त्याजकडेसच + + + स जातील त्यास न जाणेविसी ताकीद देण्याविसी निरोप दिले त्यास आज्ञापत्राप्रमाणे सेवकाने ताकीद केली आहे सेवेसी श्रुत होय ही विज्ञापना.

लेखांक ४६ तारीख ११-११-१८२४

श्री

रु. नं. ३
अ. नं. ६००

पौ छ १९ माहे रबिलावल सुा खमस अशरीन मयातेन व आलफ

श्रीमन्महाराज राजेश्री छत्रपति स्वामीचे चेरण शेवेसी

विनंती शेवक नरसिंगराव शिंदे चेरणी मस्तक ठेऊन सीरसाष्टाग दंडवत विनंती विज्ञापना × × × × × स्वामीचे कृपेकडोन सेवकाचे वृत यथास्तित अस प्रार्थना असो जे स्वामीनी आज्ञापत्र पाटविल ते मस्तकी वंदून सनात जाहलो तेथ आज्ञा केली जे कितूरकराकड चाकरीस आम्हा नि॥ इलाखेतील स्वार अगर लोक जातील तरी न जाणेविसी ताकीद करावी ऐसी आज्ञा निरोपिली त्यास आज्ञेप्रमाणे ताकीद केली आहे विशेष काय लिहिण शक्त नव्हे हे विज्ञापना.

लेखांक ४७ तारीख १३-११-१८२४

श्री

रु. नं. ३
अ. नं. ६०१

पौ छ २१ माहे रबिलावल सुा खमस अशरीन मयातेन व आलफ रोज रविवार

शेवेसी विनंती सेवक दवलतराव जाधव ठाणे शिरोले दोनी कर जोडून कृतानेक शेवेसी विनंती विज्ञापना तागायत छ २१ रबिलावल पर्यंत स्वामीचे कृपावलोकन करून शेवेकाचे वर्तमान यथास्तित असे शेवेसी प्रार्थना ऐसीजे अजम चापलन साहेब याचा मुकाम काली भृगुवारी कसबे कासेगावास जाहला होता अज मंदवारी प्रातकाली तेथून कूचैकरून इसलामपुरचे मुकामी येणार याप्रमाणे वर्तमान आन समागम पाचचारशेहे फलटणचे लोक आहेत व स्वार पाच सातसेहे व वकील मंडळी आहेत आणखी बातमीस गडी पौ आहेत काय वर्तमान येईल ते शेवेसी विनंती लिहितो शेवेसी निवेदनार्थ विनंती शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक ४८ तारीख १४-११-१८२४

श्री

रु. नं. ३

अ. नं. ६०३

पौ छ २२ माहे रोवल सन खमस अशरीन मयातेन

आलफ रात्र सात तासी रोज रविवार

सेवेसी विनंती शेवक सखाराम माणकेश्वर देशपांडे मुा दुधगाव दोनी कर जोडोन कृतानेक शेवेसी विनंती विज्ञापना ता। छ २२ माहे रोवल रोज रविवार संध्याकालपावेतो स्वामीच कृपावलोकन करून शेवकाच वृत यथास्तित असे शेवेसी विज्ञापना ऐसीजे आजी संध्याकाळचे दीड तास दिवसास आजम च्यापलेन साहेब बहादर याची भेट घेतली आणि हुजूरचे आज्ञ प्रमाणे मजकूर कानावरी घातला हुजूरचे प्रगतीस स्वास्त्य नाही याविषी बहुतबहुत × × बाहादरानी केली आणि ज्वरावंश होऊन किती दिवस जाहले हे पुढे × बारा दिवस जाहाल ऐसे सांगितले कीं चिती आराम जालेच वर्तमान विनंती पत्र पाटवून आणोन कळवाव ऐस सांगितल सरंजाम कांही पाटवणेविसी सांगितलेस कोणी सरदार बरोबर देऊन पाटवण्याचा येविंसी पुसाव म्हणोन आज्ञा आहे म्हणोन विचारिल त्यास सरकार बिलोखत बंदोबस्त राखोन स्वास्त असाव तूर्त सरंजाम न्याव्ह ऐसी विनंतीपत्री विनंती लिहावी अस उत्तर जाल कितूरकराचे कारकुनास धरून पाटविला मजकूर सांगितला त्याविषी बहुत मर्जीची खुशालात जाहाली नीट केले अस उत्तर जाल्या प्रभाणे बोलणे जाले ते स्वामी सेवेसी निवेदनार्थ विनंती लि। अस भेटीही सरकार निरोंदे प्रमाणे यथास्तित जाहाली सरकार याचाच पुण्ये समर्थ येथ सेवकान विनंती लि। प्रकृतीस किंचित आराम तेच वृत्त आज्ञापत्री आज्ञा जाली पाहिजे रात्रंदिवस लक्ष लागल आहे मजला बरोबर राहून रोजचे रोज विनंती पत्र पाटवीत जाणेविसी सरकारआज्ञा होऊन पाटविल आहे म्हणोन बहादरासी बोलला ऐकोन घेतल अजी डेरे व खटल पुढ चालते जाहाल चंद्रोदई निघोन मुकाम नांदणीचा होणार येविसीच मा।रच विनंती पत्र सातवे तासी हुजूरच शेवेसी पाटविले ते प्रा होईल मीही आज्ञे प्रो बरोबर निघोन नांदणी मुकामास जातो पुढ आज्ञा आलप्रमाणे शेवकाकडून वर्तणूक नव्हव्हेल आज्ञोत्तरपणेस आज्ञा व्हावी सेवेसी निवेदनार्थ विनंती लि। अस विदित होय हे विज्ञापना.

लेखांक ४९ तारीख १५-११-१८२४

श्री

रु. नं. ३

अ. नं. ६०२

पौ छ २४ माहे रबिलावल सुा खमस
आषरीन मयातेन व अलफ दोनप्रहर

शेवेसी विनंती सेवक दौलतराव जाधव मारे नांदणी कृतानेक शेवेसी विनंती विज्ञापना ता। छ.२३ रोज सोमवार संध्याकाळ रात्र चार तास पर्यंत स्वामीचे कृपाअवलोकन करून शेवकाच्च वृत यथास्तित असे विशेष प्रार्थना ऐसीजे अजम चापलन साहेब बहादूर याचे लष्कर आज चांद उगवलेवरी कूच होऊन दानवाडास उदियेक प्रातकाली मुकाम होणार आणि तासगावच्च मार्गा फौज चार हजार तोफ चार × प्रमाणे यद्वरच्च मार्गान जात आहेत छ मारच्च वर्तमान आम्ही साहेबाकड व राजश्री माणसिंगराव घोरपडे भिळून भेट घेतली भेटीची इतमाम यथा पद्धतीन यथास्तित जाहाला हुजूरून लब्र आलेली व ठाणे शिरोलच्च लब्र साहेबाकडे गुदरली साहेबाची मरजी लबा पाहून खूष जाहाली आम्ही साहेबाबरोबर दानवाडच्च मुकामास जातो पुढ मार होईल तो सेवेसी विनंती लिहितो राजश्री आपाजीराव शिरके यानी

१ नांदणीकडून सामानाचा पुरावा
२ साहेबाचे आज्ञा
३ देशपांडे सरकार काम बहुत

नांदणीकडून सामानाचा पुरावा चांगला केला सेवेसी निवेदनार्थ विनंती लिहिली असे आम्ही साहेबाच्च आज्ञा साहेबाबरोबर आहो थैली दिलेली प्रविष्ट केली दाजी सखाराम पंत देशपांडे सरकार काम बहुत ते आहेत मारनिल्हेवर साहेबाच्च मर्जी खूष असे शेवेस श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक ५० तारीख ५-१२-१८२४

श्री

रु. नं. ३
अ. नं. ६०४

पौ छ १३ राकर रोज रविवार सुा खमस
आश्रीन मयातैन व आलफ

शेवेसी अर्जी भरमोजी सिदराम जाधव देसाई नाडगोडा प्रांत रायबाग व हरि जाधव हुजूरे मुकाम भिरडी चेरणावरी मस्तक ठेऊन सां विनंती विज्ञापना ता रोज सनिवार दोनप्रहर रात्र पो साहेबाच्च कृपावलोकनेकडून शेवकाच्च वर्तमान यथास्तित अस यानंतर हिकडील सहेविस्तार मार हुजूर अर्ज करणबद्दल दाजीबा जाधव यासी शेवेसी पा आहे सविस्तर मार अर्ज करील त्याप्रमाण लोक सरंजाम शिड्यासुद्धा रवाना करून देणेविसी आज्ञा जाली पाहिजे तीा राजश्री बहिररजी बापू याजबरोबर सरंजामसुद्धा लोक देऊन पाठांवणेविषी आज्ञा व्होवी आज्ञा करणार धनी मायबाप समर्थ आहा शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक ५१ तारीख ६-१२-१८२४

श्री

रु. नं. ३

अ. नं. ६०६

पौ छ १५ रबिलाखर
भोमवासर सुा खमस
आषरीन मयातेन व
आलफ.

सेवेसी अर्जी भरमुजी सिदराम जाधव देसाई

नाडगोडा प्रांत रायबाग व हरि जाधव हुजूरे चरणावरी मस्तक ठेऊन स।। वि।! विज्ञापना ऐसीजे त।। रोज सोमवार तिसरप्रहर पैकी सेवकाच वर्तमान साहेबाचे कृपावलोकनेकडोन यथास्तित अस विज्ञापना असीजे तोंफा व सरंजाम व सिडया सुद्धा दोनप्रहरच्या आत येऊन पोहचे ऐसे पोविसी आज्ञा व्होवी शेवकानी ठाणे सभोवत वेडा घालून मोर्चा बसऊन ठाणे जेरीस आणिल आहे मौजे मजकूरच गावकर व रयता व सनदी यास धीर भरवसा देऊन आणोन ठेवणेविसी आज्ञा त्याप्रमाण गावकर व रयता व प्यादे वगैरे आज्ञेप्रमाण आणऊन ठेविली आहे लोक व स्वार दल ठेऊन ठाणेस वेढा देऊन बसलो आहो सेवेसी निवेद्नार्थ विनंती लि।। अस शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक ५२ तारीख १३-१२-१८२४

श्री

रु. नं. ३

अ. नं. ६०७

पौ छ २२ माहे रबिलाखर
रोज भोमवार सन खमस
असरीन मयातेन व आंलफ

तीर्थरूप श्रीमन्माहाराज मातुश्री
आईसाहेब वडिलाचे शेवेसी

आपत्य राजे बावासाहेब छत्रपति चरणावरी मस्तक ठेऊन कृतानेक सेवेशी विज्ञापणा तागाईत छ २१ माहे रबिलाखर पावेतो वडिलाचे आशीर्वाद प्रभावे करून मुकाम हुकेरी येथे सकलवृत यथास्थित असे शेवशी विज्ञापना यैसीजे आजम ऊलीयम च्यापलीनसाहेब बहादर कमिशनर याजकडून राजश्री आनंदराव त्रिंबक व बालकृष्ण बाबूराव वकील छ मजकुरी प्रातःकालचे तास दिवसास लस्करचे मुकामी आले त्याजबरोबर थैली

व रहदारीचे दस्तक आले त्याचा तालका वडिलाचे शेवेशी निवेदनार्थ पाटविल्या आहेत बालकाची स्वारी आज चंद्रोदई हुकेरीहून कूच करून ठाणे बागेवाडीस होत आहे जो मजकूर होईल तो मागाहून शेवेशी विनंतीपत्री लिहितो शेवेशि श्रुत होय हे विज्ञापणा.

लेखांक ५३ तारीख २८-१२-१८२४

श्री

रु. नं. ३

अ. नं. ६०८

पौ छ १२ माहे जमादिलावल सु।। खमस आसरीन मयातेन व आलफ रोज रविवार पूर्वप्रहर रात्र

तीर्थरूप श्रीमन्महाराज मातोश्री आईसाहेब वडिलाचे शेवेसी आपत्य राजे बाबासाहेब छत्रपति चरणावरी मस्तक ठेऊन कृतानेक शेवेसी विज्ञापना तागाईत छ ७ माहे जमादिलावल रोज भोमवासर प्रहररात्र पर्यंत वडिलाचे असीरवाद प्रभावे करून मुकाम नरेंद्र नजीक किल्ले धारवाड येथे बालकाचे सकलवृत यथास्तित असे शेवेसी विज्ञापना ऐसीजे आज तिसरेप्रहरी आजम उलीयम चांपलीन साहेब बहादूर याजकडून हुजूरची स्वारी आपले डेरेस नेणेकरिता कमिशनर याचा दुयम बारडीन बाहादर व वाकरीन बहादर तुरपाचा सरदार शंभर तुरपानिसी यानी व लाला बिक्रमाजीत मुनसी असे हुजूरचे डेरेचे सुमारे येताच हुजूरून राजेश्री बाळकृष्ण बाबूराव वकील व कृष्णराव माधव गद्रे या उभयतास डेरेबाहेर पाटवून त्यास डेरेत आणिले हुजूरचे सनिद्ध बाहादर येताच टोपी काडली नंतर उजवे बाजूस बैसविले नंतर टोपी घातली दुयम बहादर यानी लाला मुनसीस सांगितले जे माहाराजाची स्वारी घेऊन येणेकरिता कमिशनर बहादर यानी पाटविले आहे म्हणोन अर्ज करविला नंतर आज्ञा जाली जे उत्तम आहे नंतर बहादर यासी आतरगुलाब व विडे देऊन हुजूरची खासा स्वारी सदरेवरून उठून डेरेबाहेर येऊन स्वारी घोडेवर होऊन चालती जाली स्वारीचे उजवे बाजूस दुयम बहादर होते तुरपाचे सरदार तुरपामध्ये हुजूरचे खासबारदार व बंदुकबारदार जिलिबीस होते त्याचे आघाडीस चालले होते स्वारी समागमे जरीपटका व साहेब नौबत व अंबारी-व पागा वगैरे सरंजाम होता बहादर याचे लष्करा नजीक जाताच पागा हत्ती व मानकरी व पायदळ दोनी बाजूस कोरबंदीने उभे करून बेताप्रमाणे माणकरी वगैरे स्वारीसमागमे घेऊन डेरे नजीक पनास हातावरी जाताच डेरेबायेर कमिशनर बहादर लोकानिसी टोपया काडून सामोरे येऊन डेरेत घेऊन गेले आणि खुरसीवर हुजूरचे सदरेचा गादी किनकाफी भरगच्या घातली होती त्या खुरसीवर हुजूरची स्वारी जाहाली नंतर कमिशनर बहादर व बहादर लोक असे हुजूरचे डावे बाजूस खुरशावर बसले हुजूरचे मानकरी उजवे बाजूस खुरशावर बैसविले त्याची नांवनिसी बी ता

२ हुजूरचे पाठीमागे
१ हिंदुराव गाईकवाड सरख-
वास त्याचे डावे बाजूस
आनंदराव त्रिंबकराव वकील
१ दिनकराव गाईकवाड

—

२

२३ हुजूरचे उजवेबाजूस
१ माधवराव पंडित प्रति-
निधि त्याचे पाठीमागे
सदासिव गोडे
१ अमात्य पंत याचे चिरंजीव
गोविंदराव पंडित त्याचे
पाठीमागे रामचंद्र गुंडो
१ संताजीराव घोरपडे
सेनापति
१ नारायणराव पंडित
राजाज्ञा
१ नारायणराव पाटणकर
सरलष्कर
१ सुबराव घोरपडे इंदूराव
१ सदासिवराव जोसी
१ रघुनाथराव निंबाळकर
सरनोबत
१ हणमंतराव नाईक निंबाळकर
बहादूर
१ जिजाजीराव खानवेलकर
१ अनंत शास्त्री शिराळकर
१ गोविंदराव नाईक निंबाळकर
१ आपाजीराव जाधव
१ सयाजीराव जाधव सरनोबत
१ खंडोजी भोसले हवलदार
१ केदारजी मोहिते सरनोबत
१ धोंडजीराव नाईक निंबाळकर

हुजूरचे डावे बाजूस
१ कमिशनर बहादर त्याचे पाठीमागे
कृष्णराव हणमंत दिवाण व लाला
बिक्रमाजीत मुनसी लाहाण खुर्चीवर
बसले होते
१ मेस्तर बेबर बहादर सरकलक्टर
धारवाड सुबेस राहाणार
१ वारडीन बहादर कमिशनर याचा
दुयम
१ इडीज बहादर धारवाड सुभेस
न्यायधिशीचे काम पाहाणार
१ स्टील बहादर कमिशनर बहादर
याचे दुयम
१ स्टिवीसन बहादर आगटिंग
धारवाड सुबेकडील
१ प्रीस बहादर धारवाड सुबेकडील
१ वाकरीन बहादर तुरपाचा
सरदार कमिशनर बहादर याज-
कडील
१ मालोजी घोरपडे अमिरूलउमराव
दत्तवाडकर.
१ व्यंकटराव घोरपडे मुदोळकर
१ नरसिंगराव घोरपडे दत्तवाडकर मालोजी
घोरपडे यांचे बंधु
१ कृष्णसिंग रिसालदार
५ हुजुर निसपत
१ महिपतराव गोपाळ पारसानिवीस
१ राघो व्यंकटेस नि॥ सरलष्कर
१ कृष्णराव माधव गर्दे
१ बाबाजी विचारे
१ दौलतराव जाधव

—

५

—

१७

१ आपाजी यादव हवलदार
१ बहिरजी भोसले
१ जिवाजी जाधव हवलदार
१ भवानराव गाईकवाड
१ बचा
१ चिमाजीराव भोसले सुभेदार
—
२३

येणे प्रमाणे बसले नंतर खैरखुषीची बोलणी जाल्यावर उदेक हुजूरच्या डेऱ्यास बाहादराचे येणे व्हावे म्हणोन आमंत्रन केलेवर आच्छा म्हणोन बोलले नंतर गुलाब अतर व पुष्पाचे हार तुरे व विडे ऐसी तबक भरून आणून हुजूरचे पुढे ठेविली नंतर दिवाण यानी उठोन अत्तर व गुलाब व हारतुरे व विडेची तबके हाती घेतली आणि बहादर यानी आपले हातून अतर गुलाब व पुष्पाचे हारतुरे व विडे हुजूर प्रथम दिलेवर दुयम बाहादर यानी उठोन अत्तर व गुलाब व पुष्पाचे झेले व विडे उजवे बाजूचे मंडळीस निमे दिल्हे पुढे लाला मुनसी व गणेश दप्तरदार व दुयम बहादर याजकडील भिमराव मुनसी यानी अत्तर गुलाब पुष्पाचे झेले व विडे दिले नंतर स्वारी निघाली समागमे कमिशनर बाहादर बाहादर लोकानिसी डेरेबाहेर दाहा हात पर्यंत स्वारीस पोचवणे करिता टोपया काढून आले होते स्वारी घोड्यावर होईपर्यंत उभे राहून स्वारी समागमे पोचवणेस मोगली स्वार पनास व रिसालदार देऊन बाहादर यानी हुजूरचा निरोप घेऊन टोपया घालून आपले डेरेत गेले बाहादराकडील स्वार हुजूरची स्वारी डेरेस पोहोचऊन हुजूरची आज्ञा घेऊन आपले ठिकाणास गेले वडिलाचे सेवेसी निवेदनार्थ विनंती पत्री विनंती लिहिली असे शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक ५४ तारीख १०–१–१८२५

श्री

रु. नं. ३
अ. नं. ६१२

पौ छ २१ माहे जमादिला
वल सन खमस आसरीन
मयातैन व आलफ

सेवेशी आर्जी सखोजी बुना हुजूर व रामचंद्र शेट पाथरे ठाणे चिकोडी दोनी कर जोडून चेरणावर मस्तक ठेऊन विनंती विज्ञापणा तागायत छ २० माहे जावल पावेतो सेवकाच वृत येथास्थित असे विज्ञापणा प्रार्थना ऐसीजे काल इंदुवारी आजम चापलन

साहेब बहादर याचे मुकाम कब्नूरच्या वेसवर जाहाला होता प्रहर रात्रीस कूच होऊन नगर मनोलीवरून केरुरच्या मार्गान येड्डरावर आज मुकामास गेल बरोबर पांचसेय तुरक स्वार आहेत वरकड येकंदर दोन हजाराचा सुमार आहे शेवेशी निवेदनार्थ आर्जी लिहिली आहे. सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक ५५ तारीख १६–२–१८२५

श्री

रु. नं. ३

अ. नं. ६१३

छ २७ माहे सन

खमस आशरीन मया

तेन व आलफ

सेवेशी रघुनाथराव चवाण ठाणे कोगनोली कृतानेक सेवेशी विज्ञापणा येसीजे ताा छ २७ माहे रोज बुधवार प्राथकालपावेतो सेवकाचा ठाणे माारच वर्तमान यथास्थित आस सेवेशी विज्ञापणा हिकडील वर्तमान काली चिकलीहून श्वार पनास व आरबा पन्नास घेऊन कारकून कागलास आला सेवेसी निवेदनार्थ विनंती लिहिली आस सेवेशी श्रुत होय ही विज्ञापणा.

लेखांक ५६ तारीख २८–२–१८२५

श्री

रु. नं, ३

अ. नं. ६१६

सेवेशी आर्जी आबाजी भोसले मोकाम ठाणे आदूर कृतानेक सेवेसी विनंती विज्ञापणा यैसीजे मौजे बस्तेवाड व सोनग व कुरुकली येथे तीन गावात आजी इंदुवारी ठाणी सुरू करून प्रहर रात्री ठाणे माारास आलो नवीन तिनी ठाणेत लोक पाहिजेत येविसीची आज्ञा व्हावी सेवेशी श्रुत होय ही विज्ञापणा.

लेखांक ५७ तारीख १३–५–१८२५

श्री

रु. नं. २

अ. नं. ३७६

श्रीमन्महाराज छत्रपति साहेब दाम मोहबत हू

नियाजमंद बुलीयम चापलीन साहेब बहादर कमिशनर हुजूर पुणे बाद नियाज मारूज

आंके नियाजमंदाची खैरियत रोषण होऊन फिरस्ताद करून सरफरोज करीत असिले पाहिजे दरविला नबाब
गोरणेर साहेब बहादर याचे ह्या बमोजीब छ ९ माहे मार्ची तारीखचे कागलकर याचे मोकदमेस खत फिरस्ताद करण्यात आले होते याचा जबाब ज्या कलमी करणेचा असता तोही न आला सबब बहुत ताजुब्र जाले ऐशास आमाहाराजास इतला करावयासी गोवरणार साहेब बाहादर याचा हु॥ सादर जाहाला आहे कीं साहेब मेहरबान दौलतराव सिंदे अलिजा बाहादर यानी आपले मेव्हने मेहरबा हिंदुराव घाटगे याचे जहागिरीवर आ माहाराजानी जुल्म जबरदस्ती केली ती खबर ऐकूण रजिंदा खातर असल्या जाले कीं × × फौज जमा करून पेशजी मरहूम-माहादजी सिंदे यानी आ माहाराजाचे तीर्थरूप मरहुम राजेसाो याचे वक्ती फौज जसी पाठविली होती त्याप्रमाणे पाठवाबी म्हणोन करार आमाहाराज व सरकार इंग्रज बहादर याचे दरम्यान तहनामा जाला आहे सबब त्याजवर नजर ठेऊन अजत लडा तहमूल करून हात राखिला अगरच्च अलीजाबाहादर यानी आ माहाराजावर फौज पाठवावी असी सरकार इंग्रज बहादर याची मर्जी नाही लेकीन त्या दरबारातील जाबसालाचा रंग पाहता सरकार इंग्रज बहादर यास असे जाहीर जाले कीं आ माहाराजानी पराई दवलतीचे इलाखेच्च कामे दमेत पेदरचे इंग्रज बहादर याचा साहेबाचे सन आणिता बोज्गाई काम चालविले ते तहनामेतील मतलबस ब्रिलकूल खिलाप आहे व मेहरबा हिंदुराव घाटगे यानी आजपावेतो सबूरी केली ती पाहाता नम्रतेने सवाल करून अ। माहाराजाकडून आपले हकास पोहोचले असी सरकार इंग्रज बहादर यासी उमेद आहे लेकीन आ माहाराज्यास मालूम असावे कीं मेहरबा घाटगे मवसुफ यानी आपली जाहागीर यंदा सुपूर्द करून घेणे सकस्त केलीया आ माहाराजास सरकार इंग्रज बहादर याची कुमक हरगीज होणार नाही व आ माहाराजानी लेकीन आ पाहावे कीं या मुकदम्याचे दरम्यान ते सिंदे अलीजाबहादर यासी ठेऊन घेणार नाही लेकीन मेहेरबा हिंदुराव घाटगे खुद भारी फौजस जमाऊन आणतील अस जाले असता आ माहाराजास गैरराजी असणार बिसीयार लोक नमूद होऊन घाटगे मवसुफ यासी कुमक करून आ माहाराजास बहुत बखेडया आणितील याजकरिता आ माहाराजानी जाहीर करण्याविसीची गोरणेर साहेब बहादर यानी एखलास मंदास मरकूम केला आहे कीं पेशवे यानी आ माहाराजावर हमेशा बहुत हुकमत करीत होते और पेशवे याचे जागी हली सरकार इंग्रज बाहादर आहेत आ माहाराजाचे दिमत खासगत असावे कीं कांहीं येक वर्षामागे आ माहाराजाची दौलत फक्त निपाणकर याजकडून बहुत खराबीत आली होती हे तमामास × × पत्रेत आणोन सरकार इंग्रज बहादर त्या वतनी येहसान केले ते और असरा दिला ते स्मरणात ठेवणेचे मसलत मालूम बोली आहे ऐस आ माहाराज कांही उमेद ठेविलिया सरकारच्या सनद्याप्रमाणे चालावे लागेल ऐसीयासी बिलापूर सदयी सिवदान

कागलचे जहागीर हिंदुराव घाटगे याचे सुपूर्द करावे म्हणजे

ते सरकारास येकसू मालूम होईल जीयादाचे आयाम शादमानी मुदाम

बाद पौ छ २४ माहे रमजान सन खमस आशरीन मयातेन व अलफ शके १७४७ पार्थीवनाम संवत्सर वैशाख व॥ ११ रोज शुक्रवार मु॥ निपाणी.

सही मोडी

कारभारी

मु. पाहणार

आणाजी बाजी कारकून संस्थान कागल

लेखांक ५८ तारीख २६-६-१८२५

श्री शंभु प्रसन्न

रु. नं. ३

अ. नं. ६२०

श्रीमंत माहाराज मातुश्री आईसाहेब

साहेबाचे शेवेशी

विनंती आज्ञाधारक गंगाधर दामोदर कृतानेक सेवेसी विज्ञापणा त॥ छ ९ माहे जिलकादपावेतो मुकाम मनोली सेवकाचे वृत यथास्थित असे विज्ञापणा साहेब कृपालु होऊन सेवकास आज्ञापत्र सादर जाहले ते मस्तकी वंदन करून समृद्ध जाहालो तेथे आज्ञा जे हुकेरी प्रांतदेखील चिकोडी येथे सरकारँची ठाणी जाऊन खालसा जाहाली आज्ञेप्रमाणे खुशाली होऊन पागा व लष्कर सर्वत्रास गुल साखर विडे वाटून दिल्हे साहेब धनी समर्थ मायबाप आसेत साहेबाचे पुण्य विचित्र सेवेशी श्रुत होय हे विज्ञापणा.

लेखांक ५९ तारीख २०-८-१८२५

हु॥

रु. नं. ६

अ. नं. ७७७

अजम गिलबर्ट मार इस्कोवर बाहादर कालेक्टर व माजिस्रेट जिल्हा दक्षिण प्रांत कोंकण अज मकान रत्नागिरी कामयाब बाशंद

रफआत व आवली पनाह तहऊर व जलादत दस्तगाह बाअदज इस्तियाक आंके दरिविला राजश्री माधवराव पंडित प्रतिनिधि यानी हुजूर ची स्वारी किले विशाळगड पाहण्याकरिता सडेनिसी हुजरे मात्र समागमे घेऊन पुढे जाहाली असता बेअदबी करून चौकीदारानी गोल्या मारिल्या सबब स्वारीची मुकाम गजापुरास होऊन आज्ञापत्रे हुजूरेया हमराह व आज्ञा करून इबालाग केले त्यास जे रवाना जाहाले त्याजवरही गोल्या

घालून बदमामली केली बईसबब पंडित याजकडील सरंजामाचा तालुका जप्तीस ठेवला आहे अजीसबब हुजूर

थैली मरकुम जाली आहे त्यास घाटाखालील किले मजकुराकडील अमल आहे तो आ आवाली पन्हाहानी जप्तीस ठेऊन वसूल पंडित याजकडे न देणे बाबे अमलदारास ताकिदी रवाना फर्माऊन ऐवज आणऊन परजबाबाची थैली हुजूर इरसाल करावी वरकड मजमुनाची आज्ञा राजश्री आबाजी यशवंत यास फर्माऊन आ जलादत्त पनाहाकडे रवाना जाले आहेत त्यास मोमिइले जुबानी बयावार मजमुनाची करतील त्याजवरून आ रफआत पन्हाहास जऊर होईल सु॥ सीत आशरीन मयातेन व आलफ रवाना छ ५ मोहरम जादा आयाम मुदाम बाद.

लेखांक ६०

माहे डिसेंबर इ· स. १८२५

श्री

रु. नं. ६

अ. नं. ७७३

यादी कुंपणी सरकारातून दाहा कलमाची याद आली त्याची पोटची कलमाचा तपसील सवालजबाब सुा सीत आषरीन मयातेन व आलफ माहे जमादिलावल कुंपणी सरकारातून दहा कलमाची याद आली त्याची पोटची कलमाची फिर्यादीच सवाल कलम

इचलकरंजीकराच प्रकरण

१ शिवापूर गाव आपला महाराजाकडे आहे तो आपणास चालवावा म्हणतात म्हणोन फिर्याद

१ देशमुखी व सरदेशमुखीचा अमल हुजूर सरकारातून चालला आहे जहागीरदार व दुमालदार याजकड गाव वगैरे आहेत ते चालवीत नाहीत त्यास आज्ञा व्हावी म्हणोन फिर्याद.

१ अरजुनी गाव पेशजी सरकारात जप्तीस होता तो गाव दुमाला केला त्यास जप्तीचा वसूल परत द्यावा म्हणून फियाद.

इचलकरंजीकराच प्रकरणाचा उत्तर

१ त्यास करबीर मुकामी मेस्तर ताकरीन साहेब आले समयी अर्जुनी व शिपूर दोन्ही गावाविसी इचलकरंजीकराच बोलणे पडल त्या वेलेस वकील आनंदराव व बाळकृष्ण वर उभयतानी जबाब दिले आहे कीं अर्जुनी सोडून देऊन शिपूर हुजूर सरकारात तालुक आल्या तागायत चालल नाही व पेशजी निपाणीकर यानी चालविले आहे सबब तो गाव चालवावयाचे नाही पुढे कुंपणी सरकारातून चवकसी होऊन ज्याप्रमाण सांगणे पडेल त्या प्रमाण करू

१ दुतर्फी अमलास माहाराजाकडून इजा होती ती होऊ नये म्हणून फिर्याद.

१ रांगोलीचे शिवेच्या खटल्या करिता फिर्याद.

१ अजरे तर्फेतील चोर तलीखोर सामानगड तालुकेत आहेत त्यास धरून द्यावे म्हणोन फिर्याद.

१ रांगोळी गाव पेशजी हुजूर सरकारात जप्ती होता तेव्हाचा वसूल याचा म्हणून फिर्याद.

१ आजरे तर्फेतील अमल मनोहरगडाकड चालत आहे त्यास जाजती मागतात म्हणोन फिर्याद.

————————————कलम २

३ भाऊ माहाराज व बाबा माहाराज याच फिर्यादीच

१ इंग्रेजी बुकामध्ये बाबा माहाराज व भाऊ माहाराज या उभयताचे नांव आहेत हिंदवीमध्ये चुकल असल म्हणून सांगितल

१ बाबा माहाराज यास मोकली जागा थोरले माहाराजानी इनाम पत्र करून दिली त्यास हुजूरुन वाडा बांधविला.

१ भाऊ माहाराज याचे गाव मौजे शिरोली व बाबा माहाराज याचे गाव बुजवडे मांगेवाडी येकूण तीन गावास रोखे होऊन आकराशेहे रुपये घेतल आहेत ते परत द्यावे म्हणोन फिर्याद.

१ वतनदार वगैर यानी व हुजूरने जमीन बाब माहाराज (अपूर्ण)

१ जहागीरदार व दुमालदार यास चालवणेविसी ताकीद होईल त्यानी साडेबाराशे रुपये देतात त्याप्रमाण देत जाव.

१ गाव जप्त होणे तो आफराधा शिवाय होत नाही सबब वसूल परत द्यावयाचा नाही. याजवर कुंपणी सरकारातून चौकसी होऊन सांगणे पडेल त्याप्रमाण होईल.

१ एक गावात दोन अमल जाहाल असता खटला होतो त्याजकरिता कुंपणी सरकारातून उभयताची बेरीज समजून घेऊन एकतर्फेन अमल करून घ्याव.

१ कुंपणी सरकारातून एक कारकून येऊन चौघ आसपास गावकरी मिळून चौकसी करून कुंपणी सरकारातून ठरविल त्याप्रमाण करू.

१ ज्या गावी आहेत तेथ पत्ता लाऊन धरून स्वाधीन केलेस धरून देऊ.

१ सदर्हू अमलास जवाब दिला आहे तोच जबाब

१ एकतर्फा अमल जाहाल्यावर कलमे उलघडत आहे.

————————————कलम

जवाब पुसिले त्यास

१ दहा कल्माचे यादीत बाबा माहाराजाचे नांव नाही म्हणून जवाब दिला.

१ मेहरबा साहेबा जे सांगतील तेच मान्य आहे

१ जेवढी जागा सरकारात
इमारतीस लागली असेल त्याच्या
मोबदला किलेचे बाहेर जागा देऊ
बाकीची मोकली जागा असल ती
बाबा माहाराज यानी
घ्यावी आम्ही देऊ.

१ वाजबी घेतल असल त्याची
चौकसी करून देवऊ पुढेही उपद्रव
होणार नाही.

लेखांक ६१

इ. स. १८२५

श्री

रु. नं. २
अ. नं. ३३१

कैलासवासी श्रीमन्महाराज शंभु छत्रपति याचे आखरपर्यंत घाटगे कागलकर हे माहाराज सरकारचे हुकमात पूर्वीपासून चालत आले प्रमाणे चालले पुढे कैलासवासी श्रीमन्माहाराज शिवछत्रपती साहेब याचे कारकीर्दीत राणोजी घाटगे याचे भाऊबंदी खटले आपसात लागून हुजूर फिर्याद केली त्याजवरून हुकूम केले ते अमान्य केलेमुळे घाटगे याचे देशमुखीचे वतन व त्यासंबंधे गाव ७ त्याजकड चालाव असे ठरून पेशवे याचे विद्यमाने कागल वगैरे गावे शके १६८५ साली घेतली ठरले प्रमाणे देशमुखी व गाव त्याजकड न चालल बद्दल त्यानी पेशवे याजकडे फिर्याद केली त्याजवरून पेशवे यानी गोविंद हरी पटवर्धन मिरजकर यास पत्र दिलेवर घाटगे यानी त्याचे आश्रयाने खटला करणेस आरंभ केला सबब माहाराज सरकारातून येसाजी सिंदे सुभेदार याजबराबर फौज रवाना करून शके मजकूर ता॥ शके १६९९ पर्यंत दोन लढाया जाहाल्या. नंतर शके मजकुरी माहादजी शिंदे याचे विद्यमाने तह जाहालेवर कैलासवासी श्रीमन्महाराज मातोश्री जिजाआईसाहेब याचे वक्ती चालत आले प्रमाणे चालवावे असे ठरून घाटगे हुकुमात वागू लागले पटवर्धन वगैरे माहाराज सरकारासी लढाया करीत होते ते समयी घाटगे हुजूर नोकरीस हजर होते जे समयी स्वार व पायदळ कारण पडल तैसे घेऊन येत होते सबब त्याचे ठरावाचा दाखला बराबर नाही पूर्वीपासून आज्ञापत्र कारण लागेल तसी जाऊन अमल चालत होता तो निपाणकर यानी माहाराज सरकारासी खटला करून लढाया केल्या शके १७३१ साली त्यापासून त्याचे आश्रयाने आमर्यादा करून वहिवाट करू लागले पुढे सन १८१३ इसवीत नवंबरचे साली हानराबल गौरनर साबाकडून थैली माहाराज सरकारात आल्यापासून पूर्ववत प्रमाणे वहिवाट करू लागले पुन्हा शके १७४६ पासून तक्रारीस आरंभ केला तो आजपर्यंत चालू आहे.

लेखांक ६२ पै।। तारीख ९-३-१८२६

श्री

रु. नं. ६

अ. नं. ७७४

बारनिशी मु।। कागल सुा सीत आशरीन मयातैन व आलफ शके १७४७ पार्थीव नाम संवत्सरे मार्गेषीर्षमास जा।।खर जबानी आबाजी येशवंत म्हसकर

१ छ २१ रोज मंदवारी कागल मुकामी आजम बेबर साहेब बहादुर याचे कचेरीस राजश्री रावजी वाकणीस व गणपतराव बाबा गर्दे व याजबरोबर कचेरीस गेले जेथे राजश्री दिवाण व श्रीनिवासराव हणमंतराव होते गणपतराव याणी मुनसी यासी सांगितले कीं प्रसिधगडचे कागद आणिले आहेत त्याजवरून दिवाण याजकडे मजकूर समजून दिल्हा त्यात कलम इनामदार वाडी मौजे दुबार खर्ची येवज हुजूरचे येवज पैा पडला त्याविसी समजून दिल्हे दिवाण याणी इंग्रजी सहीचे कागद पाहून बोलिले की यादी नीट आहेत आम्ही बोलिलो कीं दुबार कलम पडोन इनामदारास उपद्रव होतो त्यानी सांगितले कीं इंग्रज लोक चुकतात कीं काय आम्ही सांगितले कीं यांत येसे जाहाले आहे त्याजवरून साहेब यानी सही केली कोणी ती पाहावयाची कागद आपणाकडे घेतला पाहूण बोलिले कीं उणलोप साहेब याची सही खरी त्याजवरून दिवाण आम्हाबरोबर न बोलता रावजी वाकनीस यासी पुसो लागले त्यानी सांगितले की सर्व माहित त्यासच आहे त्याजवरून आम्हास पुसिले आम्ही दुबार कलम पडले ते समजून दिल्हे त्याची खातरी जाहाली त्याजवरून त्यानी साहेबास समजून दिल्हे साहेबानी सांगितले कीं तालका करून देणे म्हणजे मुंबईस रवाना करितो येणे पा। जाहाले पांडोबा तात्याही तेथे आले होते येणे प्रमाणे प्रथम मजकूर जाहाला. कलम

१ छ २८ रोज रविवारी राजश्री रावजी वाकनीस येकटेच गेले त्याजबरोबर गेलो तेथे राजश्री श्रीनिवासराव मुनसी येकटेच होते त्याजकडे सांगितले कीं कालच्या तालका आणिल्या आहेत त्यानी सांगितले जे दिवाण साहेबाकडे देणे नंतर मजकूर रावजी यानी मुनसी यासी सांगितला कीं मोर साहेब याची थेली ह्या आली आहे ती पाहावी नंतर साहेबास सांगितले वाचून मुनसीची दाखविली साहेब याणी सांगितले कीं वाडीकर याणी तुम्हास येवज दिला असता घेणे आम्ही सांगणार नाही आम्हास मुंबईहून व मोर साहेब याचे पत्र येऊन येक महिना जाला तुम्हा थैली आली त्याची तालीक आम्हास काढून देणे म्हणजे मोर साहेब याजकडे लिहून पाटऊ नंतर साहेब उठोन बाहेर येक घटका दिवस संद्याकालचा होता तेव्हा निघोन गेले कलम

१ इंग्रजी पत्राच्या तालका व थैलीची तालीक व प्रसिद्धगड नि।। इनामदार चुकले होते त्याच्या तालका करून दिवाण याजकडे न्हेऊन दिल्हा निरोप पौष श्रु।। ४ गुरुवारी घेतला. कलम.

हुजूर विनंती करावयाची.

१ सात हजार आठशेह सवाच्चवतीस रुपये चवल बाहादर रघुनाथ नारायण शेट म्हापशेकर याजकडून दरसाल दाहा वर्षे देणेविसी नंबर ७ दिल्हा आहे त्याप्रमाणे ऐवज देणेविसी हुजूरची आज्ञा जाहाल्यास दाहा साला नंतर बहादर यासी बोलणे करावयासी येईल मुलुक वरघाटी घेतलेवर बोलणे होणे कठीन पडणार येविसिची आज्ञा.

पौ छ २९ माहे रजब सुा
सीत सलासीन मयातेन
व आलफ.

लेखांक ६३ तारीख १३-४-१८२६

श्री

रु. नं. ३
अ. नं. ६१७

पौ छ ७ माहे रमजान
सु॥सीत आसरीन
मयातेन व आलफ

सेवेशी आर्जी यशवंतराव विचारे कृतानेक सेवेशी विज्ञापणा त॥ छ ५ रमजान पावेतो स्वामीचे कृपावलोकन करून ठाणे हुकेरी येथ सेवकाचे वृत यथास्थित आस सेवेशी विज्ञापणा इंग्रजबहादर याचा मुकाम मौजे बस्तवाड येथ होता त्यास भृगुबारी प्रातःकाली तुमचे होऊन त्यांत घन तुरब स्वाराची तुकडी होती ती बेलगावास गेली आणि बरकड बाखाले वगैरे फौजसुद्धा मेस्तर कर्णेलसाहेब कलादगीस जाणे करिता कोट-बागी मुकामी गेले आहेत पुढे तुमचे करून जाणार म्हणोन वर्तमान आहे सेवेशी निवेदनार्थ विनंती लिहिली आहे आम्ही पेटसुद्धा काली गुरुवारी संकेश्वर वगैरे चौकशी करून हुकीरी मुकामी आलो येथील चौकशी करून पुढ सेवेशी निघोन जातो सेवेशी श्रुत होय हे विज्ञापणा.

लेखांक ६४ पौ तारीख १६-४-१८२६

रु. नं. ६
अ. नं. ७७८

श्रीमन्महाराज छत्रपति साहेब दाम येकबाल हू

नियाज मंद मेस्तर थामस हरवी बेबर साहेब बहादूर सर क्लक्टर व पोलिटिक्याल येजंट

सुभा धारवाड नियाज मारूज आंके नियाज मंदाची खैरियत रोषण होऊन हमेशा अलथापनामा सादर करीत आल पाहिजे दरिविला माहाराज छत्रपति साहेबाची स्वारी भारी जमीयेतनसी मुतसील बिशाळगड येथ मोकाम आहे ठाणा मल्कापूर हा माधवराव साहेब पंतप्रतिनिधि याचा गाव ठाणा घेतला माहाराजाची स्वारी गडास जाऊ लागली तेव्हा दुतर्फा गोलागोली जाहली व विशाळगडकर याच्या चौक्या जाळल्या येणे प्रमाणे समजेत आल्यावरून इलतीमास कर्णंत येत आहे की कंपणी सरकारासी व माहाराज छत्रपति साहेबास तहनामा जाहला त्यातील २ कलमात आपले मुल्कातील व मुल्का बाहीर जे लोक हावलजाला होतील तितकी फौज ठेविणार नाही हरदो सरकारच्या मुलुकचे आबादी व आरामी बाबे सरकार इंग्रज बहादूर सलाह देतील त्याप्रमाणें वहिवाट ठेवण्यात येईल ऐस आहे अशास प्रतिनिधि विशाळगडकर हे कदीम सं॥नीक आबरुदार याजवरी कांही गैरवाजवी दस्तदराची जाहल्यास त्यानी व दिगर सरंजामीदार वगैरे मुतफिक होऊन काय तंटा चालवितील व त्याकडून काय नुकसान येईल हे आता समजणार नाही प्रतिनिधि मोसूफ यासी कांही खटला असल्यास लढाईची मुकदमा न करता आपसेत किंवा कंपणी सरकारचे विद्यमान फैसल करून घेणे बेहतर आहे सरकार मारिफत फेसल करून घेणेचे सोयीस असलेस त्याकडून माहाराजाची नुकसानी व जलल होणार नाही व प्रतिनिधि मोसूफ याजवरी कांही गैरअमल दरपेष होणार नाही नियाज मंदास माहाराज छत्रपति साहेबाचे दौलतीची तरकी खोहीष आहे सबब बतरीक सलाह इल्तीस केली आहे जियादा कामरानी मुदाम बाद पो छ ८ माहे रमजान सु॥ सीत आशरीन मयातेन व आलफ आज मकान करवीर.

लेखांक ६५ पो तारीख १३–६–१८२६

रु. नं. १
अ. नं. ३८७

श्रीमन माहाराज छत्रपति साहेब दाम एकबा

ल हू

नियाजमंद मेस्तर थामस हरवी बेबर साहेब बहादूर सर कलक्टर व पोलटक्याल एजंट सुभा धारवाड नियाज मारूज आंके नियाजमंदाची खैरियत रोषन होऊन सादर होत आल पाहिजे वाडीकर सांवत भोसले सरदेसाई प्रांत कुडाल माहालानहाय व माहाराज छत्रपति साहेब याचा दुतर्फा अमल होता त्याविसी सरकार कंपणी इंग्रज बहादर याजकडून १८२२ इसवीत फैसल ठरविला त्या बोलानीब॥ चालणेस व त्याचा मुबेदला माहाराज छत्रपति साहेबास कंपणी सरकारातून धारवाड सुब्यात गाब वगैरे कांही लाऊन देतील ते घ्यावयास माहाराज

छत्रपति साहेबानी तहनाम्याचे पाचवा कलमात कबूल फर्मांविले ऐसीयास मोबदला गाव देणे ते माहाराज छत्रपति साहेबाचे इलाखेस लगत पाहून खंकणवाडी प्रांतचे गाव टाकला भरतीस पाच्छापूर माहालातील खेडी वगैर देणे ठरऊन पिरखानी रुपये ७८५७८=। चे बेरजेस माल १९ मजर १० याच्या सोडचिस्या नियाजमंदाचे रुजू व मोहरनिसी मलफूप केल्या आहेत पोहाचल त्याचे उत्तर अलाथापनामा वरून जाला पाहिजे जियादा व दुवलत रोज अफजुबाद.

(सही इंग्रजी)

पौ छ ६ माहे जिलकाद सु॥ सबा असरीन
मयातेन व अलफ आमकान करवीर

तारीख ३-७-१८२६

लेखांक ६६

श्रीरामचंद्र

रु. नं. ३
अ. नं. ६३४

श्रियासह चिरंजीव वहिनी यासी आसीर्वाद उपरी येथील कुशल ता जेष्ट वय १३ सोमवार मुा लस्कर नजीक हुबली वर्तमान यथास्तित असे विशेष आपण पत्र पाटविले ते पाऊन लि॥ मजकूर कल्ला इकडील सविस्तर मा॥र सांगोन चिरंजीव राजश्री नारो गिरमाजी याची पेशजी रवानगी करून पाटविले आहेत त्यानी सांगितल्यावरून सादयंत कललेच्च असेल व हली चिरंजीव राजश्री बलवंतराव चिा चे पत्री लिो आहे ते पत्र येकांती आपण व श्रियासह चिरंजीव विजईभव राजश्री छत्रपति बसून वाचून पाहून विसर्जन करावी पत्रातील मजकूर तेथे कोणायेकास सांगू नय चिरंजीव राजश्री आबाजीपंत व नारो गिरमाजी याजकडून वाचून पाहावी येथील कचा माार आपणास समजावया करिता आपणास लिा आहे मनोलीचे ठाणे स्वाधीन होऊन चिरंजीव राजश्री मोरो बाजीराव चिा याचे पत्र आले तेच्च बजिनस आपणाकड पाटविले आहे त्याजवरून सविस्तर माार समजेल सदरहू तालुके पैकी कांहीं गाव नवलगुंदाकडे लाविले आहेत त्याची तेथे जिकीर पडली आहे त्याचे बोलणे येथे होत आहे जाबसाल उलगडून घेऊन लिहून पाटवितो. बहुत काय लिा हे आशीर्वाद.

तारीख १०-७-१८२६

लेखांक ६७

श्री

रु. नं. २
अ. नं. ३८०

राजमंडळ सरलष्करीची वस्त्रे

राजेश्री हणमंतराव निंबाळकर बहादर यास देऊन सरलष्कर असे ठरले त्याचा मजकूर सुा सबा आशरीन मयातेन व आलफ छ ४ माहे जिल्हेज उर्फ आषाढ श्रु॥ ५ रोज सोमवार तिसरे प्रहरी दिवाणखानेचे वरते मजलेवर सरलष्करीचा हुद्दा कायम केला तो लिहिला असे.

१ कचेरी जाहाली त्यास हुजूरचे स्वारीची गादी उतराभिमुख समोर घातली होती दुघही सोपा लांबी उत्तर दक्षण आहे त्यात पूर्वेचे बाजूचे सोप्यात सदर होती तेथे दोन्ही बाजूस भललोक मानकरी बसले होते पश्चिमेचे बाजूस पूर्वेकडे तोंड करून मानकरी भलेलोक बसले होते पूर्वेकडे पाटीकरून भलेलोक बसले होते सदरचे पूर्वेस दुघई सोपा आहे त्यात दक्षणेचे बाजूचे सोप्यात कारकून मंडळी होती उत्तरेचे बाजूचे सोप्यात मानकरी होते त्या सोप्यात नाच कळवतिनीचा होत होता आणि सदरे समोर पूर्वेचे बाजूचे सोप्यात नाच होत होता कलम

२ हुजूरची स्वारी कचेरीत मानकरी वगैरे आले नंतर मागाहून येऊन सदरेवर जाहाली कलम

३ हुजूरची स्वारी सदरेवर बसले नंतर याकूब भालदार यास आज्ञा केली जे तू जाऊन हणमंतराव निंबाळकर बहादर यास घेऊन ये त्याजवरून भालदार जाऊन × × बहादर आपलेकडील भललोकसुद्धा बसले होते ते यास बोलाऊन आणिले ते मारनिले येऊन जोहार करून उजवे बाजूस जागा भलेलोकसुधा बसणेस पूर्वीच ठेविली होती त्या जागेवर येऊन बसले. कलम

४ निंबाळकर बहादर कचेरीत बसल्यावर हुजूरची आज्ञा जालेवरून राजश्री हैबतराव गाईकवाड विश्वासराव हे सणगाचा सरपोस व तरवार पडदाने घेऊन आले राजश्री सदासिवराव जोशी दिवाण हे जवाहिराचे तबक व शिकेकटारीचा ताम्हण घेऊन सरपोस झाकून घेऊन आले नतर सरकारची आज्ञा निंबाळकर बहादर यास आली जे तुम्ही पुढे येणे त्याजवरून ते पुढे येऊन जोहार करून उभे राहिले.

कलम

५ निंबाळकर बहादर पुढे येऊन उभ राहताच सरपोसातील तिवट काढून सरकारचे हातात गाईकवाड विश्वासराव यानी दिले हुजूरुन निंबाळकर बहादर यास देऊन बसणेविषयी आज्ञा जाली त्याजवरून बसले आणि तिवट बांदिले त्यास देणगीचा तपसील

४ वस्त्रे सरलस्करीची

१ तिवट	१ दुपटा पैटणी
१ फेटा ×	१ किनखाप

४ चार

३ जवाहीर

१ शिरपेंच १ कलगी

१ मोत्याची कंठी

१ जरिपटका हत्तीसुद्धा

१ बादली पदरात घातला

१ फौजदार यास आज्ञा जाली कीं हत्ती समागमे जरिपटक्याचा हेणे हत्ती तयार होऊन खाली उभा होता

—

२

१ ताम्हणात शिक्केकटार मोर्तबा रुमाल पिवले ताफ्त्याचा तरवार तामडे मखमाली व पडदाणेही तामडे मखमली होते.

लेखांक ६८ पौ तारीख १०–८–१८२६

रु. नं. ६

अ. नं. ७८४

श्रीमन्महाराज छत्रपति साहेब दाम यकबाल नियाज मंद थामस हरवी बेबर साहेब बहादूर सर कलक्टर पोलटक्याल येजंट सुभा धारवाड वगैरे नियाज मारुज आंके नियाज मंदाचि खैरियत रोषण होऊन हमेशा सादर होत असाबा दिगर राजाराम भोसले याने मौजे आनूर प्रांत कागल हा गाव आपला कदीम इनाम होता एलीकडे घाटगे यानी तसरुफेत आणिला म्हणोन नियाज मंदाकडे जाहीर केले व या कामाची चौकशी करणेस माहाराज छत्रपति साहेब याही फर्माविले सबब गावास कारकून पाठवून इजहार करविली इहिदे मयातैनात छत्रपति साहेब यानी सदरी गाव सखाराम घाटगे यास देवविला व सनदही त्याकडेस आहे माहाराज याजकडून भोसले याच गुजराणेस आदमापूर हा गाव चालतो सबब माहाराज मोसूफ यानी केले ते कामास बाद आल असता आ माहाराजाची नामोष्री आहेस समजून सदरी काम रद्द न करिता नियाजमंदानी फैसलनामा लिहवाहून त्याची नक्कल माहाराज छत्रपति साहेबानी भुताला कराव याबद्दल रवाना केला आशास राजाराम भोसले याचे बंधु आबा भोसले यानी मौजे मजकूराचा ठाणा काबीज केला बादज घाटगे याजकडील लोक आले त्यासी गोलागोली व तरवार वगैरेचा मारामारी बहुताद चालून सदरी आबा भोसले ठार जाहाले माहाराज छत्रपति साहेबानी भोसलेचा अदमापूर गावास शंभर सवासे लोक रवाना केल ऐस ऐकणत आहे तरी सदरी फैसलेस आनूर गाव भोसले यानी ठाणा घेणेस माहाराज छत्रपति साहेबानी जाहीर कुमक पोचविले नसतील लेकीन भोसले यानी नादानी सल्हेने ऐस कामा केला असेल हली माहाराज छत्रपति साहेबाकडून आदमापुरास लोक गेले हे कोणते

सबबेने गेले समजत नाही येकदा भोसले यासी कुमक गेले ऐस बोलणेस जागा होईल सबब परत बोलाऊ पाटवणे बेहत्तर आहे नियाजमंदाच सदरी लोक मदत करणेस माहाराजाकडून गेले नसतील व ऐस नालायकी कामास माहाराजानी कधी

फर्मावनार नाहीत व हे काम माहाराजास समजून जाहाल नाही ऐस येकीन आहे ज्या कामास कंपणी सरकार येथ ठरले गेले तैस कामास बरखिलाफ व सरकारच दोस्तीस खलल येईजोग काही कामास कोणी लोकानी सला देत गेलेस माहाराज छत्रपति साहेब यानी तैस लोकाच मंजूर करू नये बलके आपले नजरिकेतून दूर करून दुषमन व बागीच जागी समजावयात माहाराजाची तरकी आहे येणे प्रमाणे नियाजमंदानी सल्ला देणे लाजम व माहाराजाची बेहतरीचा खोईष बिसित्यार आहे सबब मारुज कले आहे जियादा बाद.

(सही इंग्रजी)

पौ छ ५ माहे मोहरम सु॥ सबा आशरीन मयातेन व आलफ अज मकान करवीर.

लेखांक ६९ तारीख २४-८-१८२६

श्री

रु. नं. २

अ. नं. ३३८

तालीक

यादी राजश्री रताजीराव चव्हाण हिमतबहादर याजकडील याद आली त्याचे क्लमान्चा ठराव सुा सबा आशरीन मयातेन व आलफ १ श्री स्वामी जगद्गुरु याजकडून सरंजामाचे मोकलीक सरकारातून करून घेतली त्याजबद्दल सावकारी येवज घेऊन त्यास सरकारची आज्ञापत्रे करून घ्याव्याविशी आज्ञा जाहाली पाहिजे

१ यैवजास खातरीचे पत्र

१ इनाम गाव दिल्हे ते गावचे पत्र

१ गावास आज्ञापत्र

३

आज्ञापत्रे करून देणेची आज्ञा केली जाईल.

१ प्राचीन सरंजाम पेशजी वेवटीप्रमाणे आमचा आम्हाकडे मोकळा करून देणेची आज्ञा व्हावी. पेशजी वहिवाटी प्रमाणे मोकळीक सरंजाम करून देणेची आज्ञा होऊन गावगन्ना आज्ञापत्रे करून देणेची आज्ञा जाहाली असे तुम्ही हुजूर पंचवीस स्वारानिशी शेवाचाकरी करीत जाणे.

१ साल मजकुरचा वसूल मामलेदार याणी घेतला असेल अगर खत घेतली असतील ती परत देणेची आज्ञा जाहाली पाहिजे.

साल मजकूरची खत वसूल काय घेतला असेल तो परत घेणे आज्ञा नाही साल गुा बाकी त्याची काय माहालात निघेल ती देणेची आज्ञा केली जाहील.

१ ठाणे हलकर्णी व करमली ठाणीसुद्धा स्वाधीन करणेविसी व दुमाल आज्ञापत्र देणेविशी आज्ञा व्हावी.

आज्ञापत्रे देणेची आज्ञा केली नाही.

१ माार जिलेबी पागे पौा भले लोकांची आसामी पेशजी प्रमाणे चालवणेची आज्ञा व्हावी.

चौकशी करून जी आज्ञा करणे ती केली जाईल.

१ गावगनाच्या शेन्याची मोकलिकचे आज्ञापत्र देणेविशी आज्ञा व्हावी.

मोकलिकविशी आज्ञापत्र देणेची आज्ञा केली जाईल.

१ हुजूरुन गावगन्नानी आसाग्या नूतन देविल्या आहेत त्याची मनाईविसी आज्ञा व्हावी.

चौकशी करून आज्ञा केली जाईल.

१ दसरे बाा बकरी व खर्चास पेशजी प्रमाणे देणेची आज्ञा व्हावी.

शिरस्तेप्रमाणे देणेविसी आज्ञा केली जाईल.--------------------------

१ ताटे दोन चालवणेची व विडेची पान व सुपारी पेशजीचे दाखलेप्रमाणे चालवणेविशी आज्ञा व्हावी.

शिरस्तेप्रमाणे देणेविशीची आज्ञा केली जाईल.

—

९

एकूण कलमे नऊ लिहिले प्रमाणे करार छ १९ मोहरम.

लेखांक ७० तारीख ३१–८–१८२६

हू

रु. नं. २

अ. नं. ३८९

अस्मत पनाहु इजलाल मुवदत दस्तगाहा

सुंदराबाई घाटगे दाममोहबत हू

अजी सौहेब हनराबल मोठ इष्टवाट इलफीस्तन साहेब गवरनर बहादूर बाद सलाम खैरियत बादज आंके येथील खैरसला जाणून आपली शादमानी हमेशा कलमी करीत असावी दिगर आा अस्मत पन्हा कडून छ २९ जिल्हाजचे पत्र इबलाग जाले ते रसीद होऊन खुषी हासील जाली येसियास हमेशा आपले बाहदरीचे वर्तमान कलमी करून महसूर करीत जावे हली राजाराम भोसले आदमपूरकर याणी करवीर तालुक्यातील

से पनास लोक घेऊन छ २१ जिल्हाज रोज गुरुवारी रात्रौ मौजे आदनूर गौ कागल येथे दंग्याने गावात सिरून दोन तीन आसामी जखमी करून ठाण्यात शिरले त्यावरून कागलहून लोक गेले त्याचे व भोसले मजकूर याचे लोकाची हातघाई होऊन गोळा-गोलीचा प्रसंग जाला त्यात राजाराम भोसलेही तोडातोडीत पडले दुसरे करवीरकर महाराज जमाव करून कागलावर अगर तालुक्यात खटला वाढविणार असे वर्तमान आले त्यास येविसीचा बंदोबस्त व्हावा म्हणोन आ आस्मत पन्हा याही कलमी केले येसीयास सदरहु प्रकारे वर्तणूक भोसले याजकडून जाली ती केवल विरुद्ध असे जाहीरच आहे परंतु येविसी करवीर सरकाराकडून इशारा आहे असे बिल्कूल नमोद्यात येंत नाही वरकड येविसी जाबसाल करणे पुढ जरुर जाल्यास अलीज्याह बेब्र साहेब बाहादूर प्रनेसिपाल कलक्टर व पोलिटिकल येजंट सुभा धारवाड अ आस्मीत पन्हा सवे करतील हरहमेशा खत खतूत पाटऊन दिल आराम करीत जावे ता छ २६ सुा सबा इशरीन मयातैन व आलफ मु॥ ता ३१ माहे आगष्ट सन १८२६ इसवी ज्यादा काय लिहिणे. प्यार मोहबत असो दीजे हे किताबत

सही इंग्रजी अक्षराची

दामोदर रमातराव कारभारी, मु॥ पाहाणार आणाजी आजिर कुने रा॥ कागल.

लेखांक ७१ तारीख २५–९–१८२६

श्री

रु. नं. ३
अ. नं. ६४४

छ २२ सफर रोज
इंदुवार सुा सबा अशरीन
मयातेन व अलफ

सेवेसी अर्जी रघुनाथराव चव्हाण ठाणे कोगनोळी कृतानेक शेवेसी विनंती विज्ञापना असीजे ता॥ छ २२ माहे सफर जाणोन ठाणे मजकुरचे व शेवकाचे वृत यथास्तित असे शेवेशी विज्ञापना ऐसीजे अजम इंग्रज बहादूर याचे लष्कराचे बातमीचे मुकामाचे वर्तमान अणवणे करिता शिपाई होता पा॥ त्यास अर्जी प्रातकाली लष्करचा मुकाम निपाणीवरी आला आहे आणखी वरचवरी बातमी आणऊन शेवेसी अर्जी लिहून पाटवितो शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक ७२ तारीख ९-१२-१८२६

श्री

रु. नं. ३

अ. नं. ६५१

पौ छ. ११ जोवल मु॥
जेजोरी सन सबा
आसेरीन

यादी मामलो कोर्ट करवीर येथील जाबसाली कलमे हुजूर निवेदनार्थ माहे जमा-दिलावल छ ९ रोज मंदवासर

१ श्री त्र्यंब्रोलीस कांहीं लागून डाव्या बाजूस पायानजीक माजलेचा तुकडा निघाला होता म्हणोन समजले त्याजवरून राजश्री दाजी अनंत देशपांडे यास पाहाबयास पाठवून पुन्हा पूर्ववत प्रमाणे नीट करविले.
कलम

१ श्री कात्यायनीच्या मार्गाची झाडे लावणे + आज्ञे प्रमाणे डबरे खणतीच काम श्री + लागले आहे मागाहून झाड लाऊन गडग्याच कामही चालले आहे.
कलम

१ राजश्री हैबतराव गायकवाड विश्वासराव याजकडे चेंपाशष्टीच उत्साहाबद्दल आडिच-शेहे रुपये देणेविसीची पेशजी तहकूब स्वारी करवीरास होईजपर्यंत ठेवणेची आज्ञापत्री आज्ञा आली त्याजवरून शेवकाने आजपर्यंत दिवस घेतले हल्ली विश्वासराव याजकडील रुपये करिता तगादा बहुत केला त्याजवरून राजश्री पंडितराव नाना यासी तहकुबी प्रमाणे मजकूर बोललो त्याजवरून पंडितराव यानी आणखी हुजूर विनंती लिहून आज्ञा येईल त्याअन्वये करणेविषयी सांगितलेवरुन विनंती लिहिली असे करवीर मुकामीही स्वारीकडे ऐवज रवाना करणेविषीच्या वगैरे अडचणी आहेत त्या सर्व स्वामीस विदित आहेत तरी पेशजीचे तहकुबी प्रमाणे स्वारी करवीरास होईजे पर्यंत ऐवज न मागणेविसी आज्ञापत्र विश्वासराव गाईकवाड पाटविणार धनी समर्थ.

१ तट सोळणेच काम दिली दरवाजे पासून चनीहटीच्या बुरजापर्यंत काम जाहाले आहे व पुढेही चालत आहे.
कलम

१ लिंगोजी फाटक आबदार हिंग्लजस्थान याची जमीन पेशजीच्या सनदे प्रमाणे बिघे२॥ आडीच मौजे कोग × करू हवेली येथ चालत आहे शिवाय फाटक याने मौजे मजकुरी गावकराकडून कोल घेऊन आपली चिटी गावास देऊन तीन बिघे जमीन गावच्या पडी पैकी काढली त्या अन्वये सदरहू पडीचा महसूल कौलप्रमाणे गुदस्ता महसूल फाटक याने दिला तो मामलेकडे जमेस आहे हली दोन बिघे जमीन आणखी फाटक (अपूर्ण)

लेखांक ७३ इ. स. १८२६-२७

श्री

रु. नं. ३

अ. नं. ६६२

याद हुजूरची आज्ञापत्र तोरगलास पाठवणेची

सन सबा आशरीन

१ समस्त इतलाक लोक किल तोरगल यासी आज्ञा केली ऐसीजे राजश्री शंकरराव सिंदे व लक्ष्मणराव शिंदे सेनाखासकील उभयतानी हुजूर लष्कर मु॥ यावे ते न करिता किला सोडून पलीकड निघोन गेले म्हणोन हुजूरचे निवेदनार्थ आले त्याजवरून हुजूरची स्वारी किले मा॥रास होत आहे तर तुम्ही किलेच बाहेर येऊन रुजू होणे म्हणजे पेशजीप्रमाण चालविल जाईल हे न करिता दांडगावा करून गोळी उडविल्यास स्पष्ट मुलाइजा होणार नाही पारपत्य करणेच आज्ञा होईल हे समजून बाहेर येऊन रुजू होणे.

१ राजमाने राजेश्री समस्त भलेलोक किल्ल तोरगल यासी आज्ञा केली ऐसीजे सदरहू वरील मजकुराप्रमाण ल्याहवयाचे आणि तुम्ही बाहीर येऊन रुजू न जाहल्यास स्पष्ट मुलाइजा होणार नाही हे समजोन बाहेर येऊन रुजू होणे जाणिजे.

१ ता॥ समस्त सनदीलोक किल तोरगल यासी आज्ञा केली ऐसीजे इतला सण प्रमाणे लिहावयाचे.

१ समस्त वाणी व रयत व उदीमदार वगैरे पेट तोरगल यासी आज्ञा केली ऐसीजे राजश्री शंकरराव शिंदे व लक्ष्मणराव सिंदे सेनाखासकील हे किल्ला सोडून निगून गेले म्हणोन तुम्ही हावलदील जाहाला म्हणोन हुजूरचे निवेदनार्थ आले त्याजवरून आज्ञापत्र सादर जाहाले असे तरी तुम्ही बिनवसवसा सुखरूप राहाणे किले मजकुरास हुजूरची स्वारी होत आहे तरी तुम्ही पेटेचे बाहेर येऊन रुजू होणे किलेतून गोळी न उडाल्यास तुम्हास तोषीस कांही एक लागणार नाही हे समजोन सुखरूप बाहेर येऊन रुजू होणे अभय असे.

लेखांक ७४ तारीख १-२-१८२७

श्री

रु. नं. २

अ. नं. ३९०

यादी यमुना बागलकोटकर पालकी बायको मृत्यू पावली तिची चीजवस्त श्रीमारुती

दुसुखी याचे देवालय बांधणेस हुजूरुन देविला वि॥ बालोजी निकम हुजूरे सुा सबा आशरीन मयातेन व आलफ माहे रजब छ ४ रोज येकूण रुपये

४२८ नक्त ४८७   १

४८८

१० कापेजोड घाणवाट होता तो ज्याचा त्यास देविला त्याजबद्दल.

४९८

३१॥· खुर्दाटके ४६०·॥· पैकी वे॥ राजश्री महादेव भट परांडेकर यासी पालकी मजकूर इचे उत्तरकार्या बद्दल देविला ३५०·।· बाकी खुर्दा ११०·।· येकूण दर ३·॥· प्रमाणे रुपये

५३·२ भांडी मोडीस गु॥ अनसेट व चितुलगड यासी घातली त्याजबद्दल

३१·॥· प्रमाणे वजन ·१·८

१५॥= प्रमाणे घागर घंगाल ·।·

५३·२

२९॥· सोन्याचे दागिने किरकोळ होते बाजार निरखान प्राख्त

६·।॥· मोती नथीचे १ ये.

४ बुगडया जोडा १ ये.

२॥· गोटी जोडा १ ये.

३ भोकरे जोडा १ ये.

२ फूल येक १

१०·॥· रुपच्या ठाक अ॥ व॥ ३ ये.

१० वडण मासे ७.वे. १ प्रमाणे.

२९॥·

६१२-२

२९९.॥. छ २५ रजब गुा विठोजी मोहिते व व्यंकटराव भोसले व व्यंकटराव यादव

२६८ रोख पनाळी

३१॥. खुर्दा.

२९९॥

१०० छ १२ माहे रमजान गु॥ व्यंकटराव यादव आदा तिमा पाथरुट यासी

६७.२ छ. ७ माहे शवल दुतोंडी मारुतीचे देवालय ब॥

३०.२ आणापा कासार याजकड भांडी मोडी ब॥ हवाला

३७ रोख

२३ भांडी बद्दल

१४ शिल्लक पैकी रोक

———

३७

———

६७.२

३२.॥. किता दागिने बद्दल

४९९.२

लेखांक ७५ तारीख ६-२-१८२७

श्री

रु. नं. ३

अ. नं. ६६८

पौ छ १० माहे रजबा मु॥

करवीर सुा सबा आशरीन

मयातेन व आलफ

शेवेसी आबाजी पोवार हुजरे व नारो गंगादर कृतानेक शेवेसी विज्ञापना त॥ छ ९ माहे रजब रोज भोमवासरे परिवंत स्वामीचे कृपावलोकन करून सेवकाचे व लष्करचे वृत्त यर्थास्तत असे शेवेसी विज्ञापना ऐसीजे निपाणीकर आज लाटेच्या व गलतगेच्या सिवेवरून कृष्णास्नानास अंकलीस गेले समागमे स्वार दोन अडीचसेहे व पायदळ दोनशेहे व हत्ती ४ अंबारी जरिपटका असे घेऊन गेले बरोबर चपरासी आहेत रोजगुदस्ता बुनगे गेले असे वर्तमान आताच आलेवरून शेवेसी निवेदनार्थ विनंती लिहिली असे शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक ७६ तारीख २२-२-१८२७

श्र

रु. नं. ३

अ. नं. ६७३

यादी कटकोलचे ठाणे हुजूरून घेतले त्याची कलमबंदी ब॥ सुा सबा आशरीन मयातैन व आलफ

१ छ २१ रोज रविवार मौजे हुनशाल येथून बालकाचे स्वारीची ताट होऊन फौजसुद्धा

कूच करुन स्वारी निघाली मार्गास तोरगलकर याजकडील ठाणी होती ती सुरू केली कांहीं गुरेढेरे पेंढारी याजकडून आणऊन पूर्ण दोन तास रात्री मौजे चंदरगी येथेची यादी आलाहिदा शेवेशी पाटविली आहे त्यावरून निवेदन होईल.

१ छ २४ रोज सौम्यवारी प्रातःकालचे प्रहर दिवसास तोरगोलहून भुजंग रामाजी न येतो गोविंदराव शिंदे व नारो गिरमाजी हुजूर आले आणि गोली तहकूब करणेची आज्ञा व्हावी म्हणोन विनंती केली तेव्हा ठाण्यातील गोली बंद करणे म्हणजे हुजूरूने गोली बंद करणेची आज्ञा होईल तेव्हा मशारनिले ठाण्यात जाऊन गोली बंद केली नंतर हुजूरनेही गोली बंद करणेची आज्ञा जाहली सायंकाल पर्यंत गोली बंद होती सायंकाल पर्यंत ठाण्यांतून लोक न उतरता रात्री फेर × × × बंदुकबारदार व जासूद व लोक बीस ऐसे देऊन पाटबिले त्यानी गावात नेऊन हुजूरे व कारकून ब जासूद या त्रिवर्गास ठाण्यात नेहले व लोक पेटेचें दरवाजा-पर्यंत ठेविले नंतर स्वारी ठाण्याचे सभोवते गोलीचा मारा चुकवून ठाणेचा मारा पाहून परत मुकामास आली. ———— कलम

१ ता २३ रोज भोमवारी बोलण्याचा फेर करून रात्री गावातील गुन्हे काडऊन गोली मारणेचा बेत करून ठाण्यात हुशारी केली हुजूरे याची व लोकाची गाठ पड्र देईनात ऐसे पाहून जोतजी निकम याणी हुजूर आर्जी पाटविली त्याजवरून फौजेची तयारी तोफखानेसुधा करून कटकोल नजीक जाऊन × केल्या आणि ठाण्या सभोवते मोर्चे देऊन फौज उभी राहिली तेव्हा ठाणेतून मोर्चावर गोली उडाली नंतरी सायंकालचे दोन तास दिवसास तोफा सुरू जाहल्या सायंकाली तोरगलहून नारो गिरमाजी हुजूर येऊन दरम्यान पत्र देण्याची आज्ञा व्हावी म्हणोन भुजंग रामजीस उदैक हुजूर घेऊन येऊन जाबसाल उलगडतो म्हणोन विनंती केली त्याजवरून राजश्री सुबराव घोर-पडे हिंदुराव व कृष्णराव माधव गर्दे याचे दरम्यान पत्र देणेविसी घेणेविसी आज्ञा होऊन दरम्यान पत्र घेऊन गेले मोर्चेबंदीवर गोली चालली होती

(फाटलें आहे) ———— मुकाम जाहाला——कलम

१ छ २२ रोज इंदुवारी स्वारीची गाठ होऊन फौजेची तयारी करुन स्वारी निघाली ते समई तोरगलाहून राजश्री सेनाखासकील याजकडून राजश्री गोविंदराव शिंदे व नारो गिरमाजी यानी येऊन विनंती केली जे फौजेची तहकुबी आज व्हावी म्हणोन विनंती करणे ती करितो तेव्हा हुजूरने ठाणे जिमा करणे म्हणजे तहकुबीची आज्ञा होईल म्हणोन आज्ञा जाहाली तेव्हा हुजरे व जासूद व लोक देणेची आज्ञा व्हावी म्हणजे आज ठाण्यात नेइतो आणि उदैक प्रहर दिवसाचे आत ठाणे स्वाधीन करितो एसी विनंती केली त्याजवरुन (फाटलें आहे)

रुजाबाम नंतर मध्यरात्रीस दरम्यान देणेची आज्ञा व्हावी म्हणोन ठाण्यातून निघोन जातो म्हणोन बोलणे आलेवर हुजूरने राजश्री हैबतराव गाईकवाड विश्वास-

राव व खंडेराव निंबाल्कर धारराव हवालदार + + + स
दरम्यान देऊन ठाण्यातील लोकास पार करून दिल्हेनंतर हुजूरचे ठाणे सुरू जाहाले ———————————————————— कलम ४

येकून कलम च्यार जाणिजे रवाना छ २५ माहे रजब सु.

(शिका)
विलसति
लेखनाव
धीर

लेखांक ७७ तारीख –२८–२–१८२७

श्री

रु. नं. ३
अ. नं. ५६४

पौ छ ४ माहे साबान सुा सब आशरीन मयातेन व अलफ
मुा लाट

श्रियासह चिरंजीव विजयीभव राजश्री राजे बावासाहेब छत्रपति यासी अनेक आसीरवाद उपरी येथील क्षेम तागायत छ १ माहे शाबान सौम्यवार सायंकाळपर्यंत सकलवृत यथास्तित असे विशेष आपण विंनती पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ श्रिवण जाहला इंदुवारी दोनप्रहरा फौजसुद्धा स्वारी तलवेस तोरगलनजीक जाहाली आतून फौजेवर गोळी उडाली इकडूनही गोळागोळी जाहाली रामराव साळोखे पळूस-कर यासी गोळी लागून ठार जाहाले त्याजवर तेथून फौजेसुद्धा स्वारी मुकामास माघारी जाहाली म्हणोन विंनती लिहिली ती निवेदन जाहाली अशास आणखी होईल तो मजकूर वरचेवरी विंनतीपत्री लिहून पाटवीत असावे बहुत काय लिहिणे हे आसीरवाद

लेखांक ७८ तारीख ८–३–१८२७

श्री

रु. नं. ३
अ. नं. ६७६

शेवेशी आर्जी बाबाजी सुर्वे हुजरे व गणपतराव जाधव सरनाईक सेवेशी विंनती विज्ञापणा ऐसीजे ता छ ९ माहे साबनपावेतो ठाणे कडकोल येथे शेवकाचे व ठाणे मज-कूरचे वर्तमान यथास्थित असे सेवेशी विंनती काल बुधवारी रात्रौ तोरगलकरकडून जमाव घेऊन आमचे गावगना प्यादे ठेविले होते ते बाहेर घालवून आपले लोक गावगना

ठेविले मौजे सिदनाल येथें गाव कुसउ व बुरूज आहेत तेथे मात्र पनास भले लोक ठेऊन आम्हाकडील कारकून व लोक दाहाबारा आा धरून तोरगलास नेले हे वर्तमान मध्यरात्रीस कलले ते समईच येथून शे दिडशे लोक घेऊन गेलो नंतर गावानजीक गेल्यानंतर इंग्रज बहादर याची द्वाही त्याणी घातली आणि आम्ही गोली मारीत नाही तुम्हास करणे आसल्यास करावी येसे गुरुवारी संध्याकालचा प्रहरदिवस पर्यंत हर्शामर्शी जाहाली कडकोलकर लोकांचा आग्रह ठाणे घालणेविसी फारच पडला त्यास इंग्रज बहादर याचा हुकूम न मानावा तरी येविसी आज्ञा समक्षच जाहाली आहे त्यापेक्षा निरुपाय याजकरिता लोक घेऊन माघारे आलो मौजे मजकुरास गेलो ते समई त्याची कुमकेस लोक सिदनालास जात होती त्याज पैकी पाच चार आसामी धरून आणिल्या त्यास ठाणेसं आणून हत्यारे देऊन पाटविल्या व मौजे मजकूरचा केंचनगोंडा पाटील यास धरून नेऊन तोरगलास ठेविला आहे त्या गावच्या रयता एकदोन व पाटील याचा भाऊ आम्हापासी येऊन बसला आहे त्यानी गावगना आमचे होत ते लाऊन दिल्हे आणि आपले ठेविले पो गावकरी याचे मते जाहाले असे दिसते त्यानी पुन्हा घालणेविसी आज्ञापत्र सादर जाहाल्यास आज्ञेप्रमाणे ठाणी घालितो त्यास शेवकास आज्ञा व्हावी सुभा मनोलीस लोकाविसी साताघा नाईक लोकसुधा ठाणेकडे लोकास ठेवणेविसी आज्ञापत्र राजश्री व्यंकटराव हवलदार याचे नांवे साहेबी दिल्हे होते पाटविलेस × × लोकाची कमती येविसी हुजूर विनंतीपत्र पाटवितो पुन्हा आज्ञापत्रीं आज्ञा जाहाल्यास लेक पाटवितो याप्रो उत्तर सांगितले त्यास साहेबी कृपाळु होऊन हुजूर पतका पौ पन्नास लोकानिसी पेशजी विनंती केलीच आहे त्याप्रमाणे शेवकावर कृपाळु होऊन लोक पाटविणार धणी समर्थ आहा सरकारची जागा मी विनंती ल्याहावी ऐसे नाही याची फिकीर साहेब्रासच असावी शेतसंदी गावगन्नाचे लोकास तीन रुपये निलंकटी करून दिल्हेत पुरत नाहीत दररोज गावगना देतो आणि सिबंदी जदीद न दिल्यासी दरमाहा पाच करून दिल्हे आहेत त्यास पाचास कोणी राहात नाही त्याचा मज्कूर शे नरहरपंत यास माहित आहेत हुजूर विनंती करतील त्याप्रमाणे आज्ञापत्र आज्ञा व्हावी शेवेशी श्रुत होय हे विज्ञापणा.

लेखांक ७९ तारीख १२-८-१८२७

श्री

रु. नं. २

अ. नं. ४६०

पौ छ १९ रोज इंदुवार माहे मोहरम सुा समान अशरीन मयातेन व अलफ

सेवेसी आर्जी बलवंतराव घाटगे जुंजारराव व नरसिंगराव सुरवसी सरनोबत व विठलराव मोहिते व सुभानजी निकम मु॥ ठाणे अकीवाट कृतानेक चरणावरी मस्तक

ठेऊन सेवेसी विज्ञापना ऐसीजे येथील क्षेम ता। छ १८ माहे मोहरम पावेतो शेवकाच वृत्त यथास्तित अस विज्ञप्तीकाली सेवेसी अर्जी बापू सिंदे बरोबरी पाठविल आहे शेवेसी पोहोचलच असेल अलीकड वर्तमान आजच रात्रीस गणेशवाडीच मोकामस राहून आज मिरजस जाणार म्हणोन वर्तमान आल कुरुद्वाडात कुल म्हणोन कांही राहिल नाही आणि इचलकरंजी व कागवाड व शेडबाळ जागोजागी लोक ठेवतात आणि कुळ म्हणोन कांही राहिल नाही जिकडील तिकड अवाई खाऊन गडबड जाहली आहे आज उद्या माहाराज येणार फौजसुद्धा म्हणोन अवाई बहुबहुत आहे आम्ही बातमीस शिपाई पा। होत त्यानी वर्तमान आणिल कीं हुजूरची स्वारी लाटत आली आहे म्हणून सारी खेडी हवालदील होऊन गुल जाहाल साहेबास कलाव कारिता विनंतीपत्र शेवेसी लिहिली आहे. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक ८० तारीख २०–८–१८२७

श्री

रु. नं. ३

अ. नं. ७०८

पौ छ २६ मोहरम सन समान अशरीन मु॥ नांद्णी

शेवेसी विनंती सेवक हणमंतराव निंबाळकर बाहादूर सरलष्कर व रताजीराव चव्हाण हिमतबहादर व राघोजीराव निंबाळकर सरनोबत कृतानेक शेवेसी विज्ञापना तागाईत छ २६ रोज इंदुवार छ पर्यंत स्वामीचे कृपावलोकने करून शेवकाचे व्रत यथास्तित असे शेवेसी विज्ञापना ऐसीजे अजी प्रातःकाळचे साहा घटिका बावन पले दिवसास वो राजश्रीं लक्ष्मण शास्त्री शिराळकर यानी मुहुर्त सांगितलेवेलेस श्रीस नारळ ठेऊन सर्व मंडळी माणकरीसुद्धा आज्ञे प्रमाणे जाऊन नेमिल्या जागेवर डेरे व ढाला दिल्ह्या व तोफा पाच केल्या श्रीस नारळ ठेऊन प्रासाद घेऊन निवताचे दरवाजात सवास्न पुडे आली व ढाला उचलते समयीही भरली घागर घेऊन सवास्न आली नंतर वेसीच्या दरवाज्यात राजश्री सुभानजी निकम हुजरे य.जकडील रजपूत पूजेचे ताहित्य पांच नारळ फुले तांदूळ कुंकू × × गावात येत होता तो व डेरे ढाला देतेतमयी धान्याच्या गोण्या बैलावर भरताडीच्या त्या ठिकाणी आल्या या प्रमाणे स्वामीचे पुण्यप्रतापे करून सुप्रश्न झाले शेवेसी निवेदनार्थ विनंती शेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक ८१ तारीख २०–८–१८२७

श्री

रु. नं. २

अ. नं. ३९२

पौ छ २९ मोहरम सुा समान

आशरीन मयातेन व आलफ
मु॥ वाडी
सेवेशी अर्जी लहूर्जी पोवार हुजरे चेरणावरी मस्तक ठेऊन सिरसाष्टांग दंडवत विनंती विज्ञापणा तागायत श्रावण व॥ १३ त्रयोदशी पावेतो साहेबाचे कृपे करून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे साहेबाची आज्ञे प्रमाणे लोक संभर दिडशे पर्यंत हजरी घेऊन जमविल आहेत आणखी वरचेवर जे येतील ते हजरी घेतो चहूकडे लोकाविसी सांगू पाटविले आहे कल्लेस येऊन पोहचणेचपूर्वी येकरोज पटेवाले याजला हुलस्वार येऊन संकेश्वर येथील घोडी धराधर केली त्यास भेट करून श्री स्वामीनी पेटकरी वाणी व थोरथोर ग्रहस्त होत त्यासी बोलाऊन सांगितले जे तुम्ही कोणी राहू नये जिकड सोय असतील तिकडे निघोन जाणे त्या वरून पेटकरी चांगली कुल येकंदर निघोन गेली ती बातमी समजताच आम्ही जाऊन पाहारा घ्यावा म्हणोन बेत केला तो इतकेत बिरापा मूर्ती याणी पत्र पा॥ जे बा॥ राजश्री शिवराम भट व भाऊ कुलकर्णी व मडवा अया व महालिंगापा हे चौघे माज्या लगस आहेत या चौघाचे विचार चांगली चांगली कुले धरितो आणि शेवटी या चौघाशीही धरितो परभारे उपद्रव तुम्हा या प्रा॥ पत्र आलेवरून आम्ही मुहुर्तासकडून होऊ नये रावकडून आणऊन सांगितले जे जे करण ते पकेपना करावे हुजूरचा शब्द न ये आणि सरकार काम व्हाव यास हयगई जाहालेस तुजा मुलाजा सरकारतून होणार नाही आशी निक्षून ताकीद केली या उपरी संकेश्वरास शंभर लोक बरोबर घेऊन गेला आणि त्यासी येण्याविशी श्री स्वामीच पत्रही होत जाऊन दोन तीन रोज जाहालेनंतर खुणेच पत्र लिहून मूर्ति याजकडे संकेश्वरास पाटविल त्याच उत्तर इंदुवारी आजीच आले कीं शिवराम भट व भाऊ कुलकर्णी यासी पाहरा दिल्हा आहे व रयता परागंदा जाहाल्या त्यासी आणवणेविसी श्रीनी पत्र पाटविल आहे त्या प्रा॥ पत्र आले बहुतेक बोलणे ठरावत येईल असे दिसत वरकड मजकूर किरकोल एक दोन जागी लोक पा॥ पु॥ विनंती विज्ञापणा ऐसीजे ठेविले आहेत बातमी पाहून आज्ञा प्रा॥ चांगली कुल पाहून लोक पाटवितो येक दोन जागी लोक बसविल आहेत त्याची फिर्याद हुजूर कित्येक येईल येविसी आज्ञा जी होणे ती व्हावी संकेश्वराचे दंग्यामुळे कुल हावालदिल होऊन जिकडी तिकड गेली कांहीं छपून आहेत त्याची बातमी आणऊन काम आज्ञे प्रमाणे करितो नेसरीकर यासी आणऊन तिकडे येका ग्रहस्त आहे त्यासी आणणेविसी सांगितले आहे त्याशिवाय आणखी लगेलगेन शोध चालला आहे बहुतेक काम साहेबाचे कृपेकरून होतील ती करितो शेवकाकडून प्रयत्नास आलश व्हावयाचा नाही जितवर हात पोचतील तितवर आनमान व्हावयाचा नाही सामानगडचा मजकूर किलेवरी जाऊन पाहिला तो जखीरा म्हणोन गल्यासुधा कांही नाही व तट पाच साहा ठिकाणी पडला असे त्यास कुंप लाविला आहे तालुकेत लावणी जाहाली नाही नूलची मात्र जाहाली आहे वरकड नूल तर्फेची पांच साहा गावची लावणी जाहाली नाही व गावातून देखील नाहीत आम्ही किलेस आल्यानंतर चिठ्यापाट विल्या आहेत लावणी कसी होईल तसी करवितो राजश्री सेखोपंत याणी

उच्यापत घेऊन खातात वरातदार साल्गु।। बाकीचा साल मारचा म्हणोन पाचपचवीस आसामी जमले आहेत त्याच्या तगादयाखाली कांहीं सुचून लावणीच काम व हिशेबाच कांहीं जमत नाही याजकरिता विनंती लि।। आहे एक महिना वरातदारास मनाई होणेविषयी आज्ञा जाहाल्यास हिशबाच व लावणीच काम होत येविसी आज्ञा जाहली पाहिजे. सेवेशी श्रुत होय हे विज्ञापणा.

लेखांक ८२

तारीख २६–८–१८२७

श्री

रु. नं. २

अ. नं ४६३

पौ छ २ सफर सन समान आशरीन मयातेन व आलफ मुा चिंचवाड

शेवेसी रामाजी यशवंत दि।। मोपागा श्रीबालकृष्ण मो रुकडी कृतानेक सवेसी विनंती विज्ञापना ताा छ २ माहे सफरपावेतो स्वामीचे कृपावेलोकन करून सेवकाचे वृत येथास्तित असे विज्ञापना असीजे हुजूरची आज्ञा घेऊन आलो ते दोन तास रात्री रुकडीस पोहोचलो आजी प्रातःकाली माणगावात ठाणे घालून मौजे रुईस लोक व राजश्री देवराव नाईक यासी पाा आहेत रुईस ठाण घालून नंतर मौजे कबनूर यासी घालणेस सांगितल आहे माणगाव येथील बंदोबस्त करून शेवेसी निघोन येतो तिनी गावात ठाणी घातली म्हणजे निघोन येतो सेवेसी निवेदनार्थ विाा आहे श्वयंपाकाचे काम चालीस लावले. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक ८३

तारीख १–९–१८२७

श्री

रु. नं. २

अ. नं ४७५

पौ छ १० सफर बुधवार
दरजागा लस्कर नजीक
कोटतीर्थ मु।। करवीर समान
अशरीन

शेवेशी अर्जी लहूजी पवार हुजरे चरणी मस्तक ठेऊन विनंती विज्ञापणा ताा छ ८ सफर पावेतो साहेबाचे कृपावलोकने करून सेवकाचे वृत येथास्थित असे विज्ञापणा येसिजे श्री भाऊ महाराज याजकडील गावे ठाणे घालणेविसी आज्ञा आली त्यावरून तिकडे ठाणेस गेलो मोर्या यास ती गाव ठाणे घालणेची आज्ञा होऊन त्याने येऊन

ठाणी घातली आम्ही जमावसुद्धा जे गेलो होतो ते हिरमोड होऊन माघारे येऊन मती-वडे येथे आलो साहेबाचे पुण्यप्रतापे करून ठाणे सुरू जाहाले गोळीचा प्रसंग नाही चार रुपये येवज सरकारी पोहचून इकडील खर्च भागावयाचे आस जे होते ते त्याकड पडले गोलीसी गाठी आणि खर्चाची आंच हा प्रसंग इकडे पडला यास्तव मजला तिकडेच येण्याविसी आज्ञा आलेस आज्ञेप्रमाणे येतो सेवेसी श्रुत होय हे विज्ञापणा.

लेखांक ८४

तारीख २-३-१८२७

श्री

रु. नं. २

अ. नं. ४७२

पौ छ ९ सफर रविवार सन सबान अशरीन मयातेन व अलफ

शेवेसी विनंती शेवक सयाजीराव जाधव सरनोब्रत ठाणे सिरोल कृतानेक शेवेसी विनंती विज्ञापना तागायत छ ९ माहे सफर पावेतो स्वामीचे कृपावलोकने करून सेवकाच व ठाणे मजकूरच × ×

ऐसीजे इचलकरंजीस शंभर स्वार व पायच लोक चटेकरी शंभर दीडशेहे गुरु-वारीच्या घटका रात्री सांगलीहून येऊन इचलकरंजीकर याची मुलमाणस सांगलीस घेऊन गेले येक मुलगा राहिला आहे म्हणोन वर्तमान आहे आणखी त्याचे बातमीस गडी पाा आहेत काय वर्तमान येईल ते सेवसी विनंती लिहून पाटवितो मिरजकर याची नाव दोन-रोज चालती जाहाली आहे नावेत दाहा असामी लोक बसून एल्कड पैइल्कडे जात असतात मिरजत व सांगलीत भललोक ठेवीत आंहेत व रात्री सबिनही उभ राहत असतात शेवेसी निवेदनार्थ विनंती. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक ८५

तारीख २-९-१८२७

श्री

रु. नं. २

अ. नं. ४१८

पौ छ १२ सफर भाद्रपद शुा। १५ बुधवार सुा समान आशरीन मयातेन व आलफ मुा। लस्कर नजीक

शेवेसी विनंती सेवक आनंदराव त्र्यंबक व बालकृष्ण बाबूराव मुा। धारवाड कृता-नेक विनंति विज्ञापना ताा छ ९ सफर पो स्वामीचे कृपाकटाक्षावलोकने करून शेवकाचे वर्तमान यथास्तित असे विज्ञापना असीजे स्वामी आज्ञे प्रमाणे धारवाडास येऊन पोहो-चलो हुजूरच्या स्वाऱ्या शिकाऱ्या होऊ लागल्या व शिरढोण वगैरे ठाणी घालणेची सुरू

जाहालेचे वर्तमान दाट ऐकूण भाद्रपद शु॥ ६ मंगळवार मेहरबा निसबट साहेब बहादूर सरकलेक्टर पोलटक्याल एजंट सुभा धारवाड हे अस्तमानी डाकेवरून निकडीने बेल-गावास जाऊन तेथील साहेबासी खलबत मसलत होऊन फौजेच्या तयारीविषयी हुकूम जाला व तमाम सोलापूर कलादगी हकरी वगैरे म्हैसूरसुद्धा जलद दोन फौजा अनव-नव्यास हुकूम × करून बेलगावचे सामान दारूगोळी आदि × शिद करून नवा बागात उतरविल × तयार आहेत आणखी ठोकरे तयार करवणेची कारखाना मनस्वी चालीस लाविला आहे आठ दिवसाचे आत बेळगाव मुकामची व आवंतर पलटणे तुरुप वगैरे जितका जमाव जमेल तितका फौजातोफा सुद्धा राजमंडलात चालू होणेची शिघता जाहाली परवाचे रोजी भ्रगुवारी प्रातकाली येथे येऊन येथील लोकास व मंडलीस तयारीचा हुकूम जाहाला रोजगुदस्त भाडेची तटे बैलही सिद्ध केले सदरहू अन्वये आठ दिवसात फौजा चालू होणार हेविषी हुजूर (फाटलें.) समवेत गेली आहे परंतु त्याचे दर जवाबाचा मार्ग पाहातील असे बहुधा वाटत नाही निघणेची त्वरा बहुत दिसती काल श्रीचे गावगन्ना जप्ती आलेली वगैर आवंतर कागाल्या बहुत आल्या सर्वांचे मजकूर दरोबस्त समजूत घेतले नद्याच उतार वगैर बातम्या मजकूर येकंदर मिळून आमचेच प्रकर्णी तूर्त दुसरा मनुष्य नाही बंदोबस्ताचा इरादा भारी आहे स्वामी × पुण्यप्रतापे घडेल ते खरें शेवकाची लिहिणेची शक्ती नाही निवेदनार्थ शेवेसी विनंती शेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक ८६ तारीख २-९-१८२७

श्री

रु. नं. ३

अ. नं. ७००

पौ छ ११ माहे सफर भाद्रपद मास सन समान आशरीन मयातेन व आलफ मु॥ लस्कर नजीक कोर्टतीर्थ

श्रीमन्माहाराज राजेश्री छत्रपति स्वामीचे शेवेशी विनंती सेवक रताजीराव चव्हाण हिमतबहादर कृतानेक सेवेसी विज्ञापना ऐसीज येथील क्षेम तागायत छ ९ सफर पावेतो स्वामीचे कृपावलोकन करून शेवकाचे वृत यथास्तित असे विज्ञापना ऐसीजे इचलकरंजीत पेंढारी व स्वार शेदीडसेहे जमला आहे म्हणून बातमी आली त्याजवरून सेवेसी निवेदनार्थ विनंती लिहिली आहे आम्ही आज बारवाडची नदी उतरून निघोन गेलो वडगाव नि॥ स्वार सनदी अद्यापी आले नाहीत पाटवून देणेची आज्ञा व्हावी शेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक ८७ तारीख ३-९-१८२७

श्री

रु. नं. २

अ. नं. ३९५

पौ छ १० माहे सफर समान आशरीन

शेवेसी अर्जी विठोजी मुर्ते मु॥ ठाणे आवरगोल कृतानेक दंडवत विज्ञापना ता॥ छ १० माहे सफर रोज रविवार प्रातःकाल पो स्वामीचे पुण्यप्रतापे करून शेवकाचा वर्तमान यथास्थित असे विज्ञापना इकडील सविस्तर मजकूर हेबाल व कोपरी वगैरे आज्ञे प्रमाणे ठाणी बसवून येविसी सेवेसी विनंती लिहून पेशजी पाठविल आहे ते निवेदनात आलच असल त्यानंतर × × खटला होता यास्तव जमाव सुधा राजश्री आपाजीराव × × आडकूरकर व आम्ही मिळून मौजे मजकुरास आलो तेथील खटला उलथडून खणी दोन हजार रुपये मखलासी करून निघोन मौजे आवरगोल नि॥ निरलीकर याचा गाव ठाणे घातल इतकेच हुजूरून आज्ञापत्र गावकराच नांव घेऊन राजश्री माधवराव घाटगे नि॥ पंचवीस स्वार व पाचपन्नास लोक ऐस येऊन हेबाळ व कोछरी व कुरणी वगैर गावचे वेशीच आत शिरून आतील लोकास व गावकरी यासी मारामारी करुन बसले आहेत मी आज्ञ प्रमाण जमा करून येकंद्र ठाणी बसऊन रयत गावकर यासी आणून गावी वसूल वासुलात चालीस लाविले होत इतक्यात हा दंगा जाहला त्याजमुळ गावकरी हावलदील होऊन तोंड न देता निघोन गेले सायबास कलावे करिता शेवेसी विनंती लिहल आहे इकडील वर्तमान मा॥र तरी इंग्रजाकडील बेलगावाहून छेपरस व स्वार मौजे घोडगिरी येथील रानात दक्षणेस बेडे नजीक जागा पाहून गेले आहेत आणि पाच्छापुरास ठोकरे दाहा तयार करावयास लागले आहेत त्या पैकी तीन तयार जाहले आहेत बाकी सात तयार करणेस लागले आहेत घोडगिरीस व पाच्छापुरास दीड कोस अजमास अंतर आहे अवरगोल ठाण घातल हा गाव घोडगिरी नजीक आहे इंग्रजाकडील छेप्रस व स्वार जागा पाहावयास आलेल त्याजसमागमे हे गावकर × × × × व गोकाक प्रांत पटवर्द्न × + + मान ऐकूण जरार जाले आहेत यास काय ते साहेबी आज्ञा निरोपी त्याप्रमाणे वर्तनूक करीन मागाहून जे होईल ते विनंती लेहून शेवेसी पाठवितो शेवेसी श्रत होय शक्ती नसे हे विज्ञापना·

लेखांक ८८ तारीख ५-९-१८२७

श्री

रु. नं. ३
अ. नं. ७०१

पौ छ १२ सफर सुा समान एसेरीन
मयातेन व आलफ

श्रीमन्महाराज राजे श्री छत्रपति स्वामीचे

शेवेसी
विनंती सेवक रताजीराव चव्हाण हिंमतबहादर कृतानेक शेवेसी विज्ञापना ऐसीज येथील क्षेम तागायत छ १२ सफरपावेतो स्वामीचे कृपावलोकने शेवकाचे वृत यथास्तित असे विज्ञापना ऐसीजे हुजूरची आज्ञा घेऊन आलो ते इंदुवारी दोन प्रहरा सिपुरास येऊन पोचलो एक रात्र गोली मारुन प्रहररात्रीचे सुमारे ठाणेतील लोक पळून गेले ठाणेचा बंदोबस्त करून पुढे कूच करून गेलो दिमत साठीचे पतका पैकी बाबाजी आयरकर यासी गोली काहारी उजवे हाताचे पोटरीस लागली आहे व जिवाजी यादव लबेकरी यासी नाकावरी गोली चाटोन गेली परंतु खर आहेत आम्ही येणच पूर्वी मतीवडस लहूजी पवार हुजूर याजकडून ठाणे पडले राजेश्री लिंगोपंत सोलापूरकर यांचा चिरंजीव ठाणेत होता त्याचे चिरंजीवास लोकसुद्धा उतरून घालविले शेवेसी निवेदनार्थ विनंती लिहिली असे शेवेसी श्रत होय हे विज्ञापना.

लेखांक ८९ तारीख ६-९-१८२७

श्री

रु. नं. २
अ. नं. ३९७

पो छ १५ सफर समान आशरीन मयातेन व आलफ मु॥ कोगनोळी

शेवेसी अर्जी लहूजी पोवार हुजरे मु॥ हेरलग त॥ आजरे दोनी कर जोडोन चरणी मस्तक ठेऊन विनंती विज्ञापना तागायत छ १३ सफर रोज गुरुवार प्रातकाल पावेतो साहेबाचे कृपावलोकन शेवकाचे वर्तमान यथास्तित असे यानंतर मौजे मतीवड व अर्जुनीचे ठाणे बैसविल उपरी व त॥ मा॥रच वतनदार याजकडून सनधान आणऊन कोलीम × × कडगावच मुकामास आलो बेटाप्रमाणे गावगनाचे व गडकरी व सनदी पाटवून मौजे बेलगुंदी व निगुडग सरोली व गजर गाव मलीगर व जाधववाडी येथ ठाणी बसविली तेचदिवसी सरमलवाडीस लोक पाटवून ठाणे बैसविल तेथ अजरेची कुमक आली सबब नासाडी होऊन लोक जखमी व मयत जाहाले ती व मतीवडेचे ठाणेस मयत व जखमी जाहाले त्याची यादी आलाहिंदा करून शेवेसी पा आहे जी

ठाणी बसतील ती शेवकाकड असावी म्हणोन आज्ञापत्री आज्ञा त्याप्रमाणे लोक घाल × × × × कडील लोक पाठवून आमचे चिटीचा हुजूर ता आम्हा-कडील लोक टाणेतील उटवून घालविल गडकरी व गावगना व इतलाख व देसक व वल्लभगडकरी वगैरेसुद्धा लोक जमविल आहेत त्याजविसी यकंदर लोकास आज्ञापत्र नांवनिसीवार हुजूरची आणली आहेत त्याजप्रमाणे स्वाधीन करावे नाहीपेक्षा परभार गावगना रोख करून गडकरी व गावगणेच वगैरे लोक झाडेनिसी आणून घेऊ आणि ज्या गावच लोक असतील त्यानी व गडकरी याणी मामलेकडून व × × कडून येक महिनेची पोटची बेजमी करून परभार आपणाकड हजरी देऊन चाकरी करावी ऐस म्हणून रोखा करितात त्यास मामलेकडून + + + खोडयाकडून ऐवज सिबंधी खर्च केला असता होते दाखल जाहाला आजीवरी स्वारी बाहीर निघाली असता परभारे ऐवज उत्पन्न करून शिबंदी खर्च चालवून उरल तो ऐवज सरकार पोतेस यावा असा सिरस्ता आहे ते न होता तालुकेवारी रोखा होऊन जमेचाच ऐवज खर्च करणार तेव्हा पोतेपैकी ऐवज खर्च केला अस जाहाले खेडयास × × ठाणी होती त्याज पैकी मतीवड व गल × खेडयास ठाणी हिंमतबहादर यानी बैसविली भादवण व खेड व मडलगे या तीन गावच सनधान मजकड आली होती ठाणी बसवावी इतकेत हिंमतबहादर यानी ठाणी बसविली आज्ञापत्री आज्ञा हिंमतबहादर याजकड जमावसुधा असणेस आज्ञा त्याजप्रमाणे आठवे आणखी ठाणी घालवयाची आहेत ठाणी पडताच शेवेशी × × वाईटपणा मजकडे येतो परंतु वास्तविक असल ते लिहाव लागत शेवेसी निवेदनार्थ विनंती लिहिली आहे आजरेस जमाव पांचशेहे व उंदूरास दोनशेहे व बहिर-वाडीस दांडगेसुधा दोनशेहे सवादोनशेहे सुमार आहे शापुराकडून वरचेवरी जमाव येतो असी बातमी आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक ९० तारीख ७-९-१८२७

श्री

रु. नं. २
अ. नं. ४९०

पौ छ १६ माहे सफर सुा समान आसेरीन मयातेन व आलफ

राजश्री छत्रपति स्वामीच शेवेसी विनंती शेवक गणोजी नाईक निंबाळकर नामजाद व कृष्णाजी नाईक निंबाळकर किल्ले प्रसिद्धगड कृतानेक सेवेसी विज्ञापना ऐसीजे ताा छ १४ माहे सफर पावेतो स्वामीच्या कृपावेलोकने करून किल्ले मजकूरच व सेवकाच वर्तमान यथास्तित असे विज्ञापना ऐसीजे घाटाखाली वेंगुर्ले येथे या आठ चार रोजापलीकड इंग्रजी पलटणीतील लोक पाचपनास पर्यंत होते हल्ली या दोन रोजात दोन पलटणे येऊन वरघाटी जाणार ती रांगणे घाटानें व हणमंत घाटाने चढोन शाहापूर बेळगावास जाणार

ऐस आजच वर्तमान आलेवरून मुदाम वर्तमान आणवणेस मनुष्ये रवाना केली आहेत आढळ वर्तमान होईल ते माघाहून शेवेसी विनंतीपत्री लिहितो किल्लानजीक घाटाने पलटणे वरती जाणे येणेस आलेस घाट चडो द्यावा किंवा कैस करावयाचे यातील आज्ञापत्री आज्ञा होईल तैसी वर्तणूक सेवक करील वाणीउदमी याचे बैल धराधर करून नेत आहेत सेवक किले मारी आलंग नोबत घस्त पाहारा करून हुशारीन आहे शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक ९१ पौ तारीख ७-९-१८२७

श्री

रु. नं. २

अ. नं. ३९६

पौ छ १४ माहे सफर सन समान आशरीन मयातेन आलफ मु॥ कोगनोळी

शेवेसी अर्जी हरि जाधव हुजूरे व याकुब भालदार व बाळाजी माहादेव मु॥ मौजे सावगाव कृतानेक सेवेसी विनंती विज्ञापना ऐसीजे रोज गुरुवार प्रहर रात्र पावेतो शेवकाचे व सर्वत्र लोक स्वार सुधा मौजे मजकुरी हुशारीने आहो स्वारी कोगनाळीस गेली त्यावेळेस आज्ञा जाहाली त्याप्रमाणे स्वार व पायेचे लोक घेऊन आठ तास पर्यंत उभे राहिले याजकडील बाहीर प्रथम आले होते ते किलेचे आश्रेस गेले आणि त्याजकडील स्वार किलेचे रवानगीस तीन ३ बाहीरले बाजूस उभे होते ते व एकंदर स्वारी होती तेवेळेस बाहेर आलेलेसुद्धा साहावे तासी किलेचे आश्रेस गेले आणि किलेतून बंदुकीचे बार तीन काढले याप्रमाणे जहालेला मजकूर शेवेसी निवेदनार्थ विनंती लिहिली आहे आठवे तासी का मजकुरी सर्वत्र आलो नंतर जेवणखाने व चंदी वैरण एकवार जिकडे तिकडे पावते करणेसही वेले आली नंतर विनंती लिहिली आहे शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना सदरहु दारुगोळी बाणदार याजबरोबर का मजकुरी येऊन सूर्यअस्तमानी पावली शेवकानी विनंती लिहिली आहे याचे आज्ञोतर देविनार धनी मायबा समर्थ आहेत. शेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक ९२ तारीख ८-९-१८२७

श्री

रु. नं. २

अ. नं. ४८३

पौ छ १५ सफर सन
समान आशरीन मयातेन व
आलफ मु॥ कोगनोली

श्रीमन्माहाराज राजश्री———————छत्रपति स्वामीचे
शेवेशी

विनंती सेवक संताजीराव घोरपडे सेनापति व रताजीराव चवाण हिमतबहादर कृतानेक विज्ञापणा येसीजे येथील क्षेम तागायत छ १५ सफर पावेतो स्वामीचे कृपावलोकने शेवकाचे वृत यथास्तित असे विज्ञापणा येसीजे हुजूरने छ १३ सफरचे आज्ञापत्र रवाना जाहाले ते छ १५ रोजी दोनप्रहरा हिरलगेच मुकामी येऊन पोहचले आज्ञापत्री आज्ञा जे इंग्रज बहादूर याजकड छपा घालण करिता तुरुक रवाना दोन हजार जाहाले आहे तरी तुम्ही लष्कर सुधा हुशारीने राहाणेची आज्ञा आज्ञे प्रमाणे बातमी राखून हुशारीने आहो इकडूनही बातमीस पाटविले आहेत वरचेवर बातमी आणऊन हुजूरचे शेवेशी विनंती पत्र लिहितो सेवेसी निवेदनार्थ विनंती लिहिली आहे सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक ९३ तारीख ८–९–१८२७

श्री

रु. नं. २

अ. नं. ४८४

श्रीमन्माहाराज राजश्री———————छत्रपति स्वामीचे
शेवेशी

विनंति सेवक संताजीराव घोरपडे सेनापति व रताजीराव चव्हाण हिमतबहादर कृतानेक सेवेशी विज्ञापणा येसीजे येथील क्षेम तागायत छ १५ सफर पावेतो स्वामीचे कृपावलोकने करून सेवकाचे वृत यथास्थित असे विज्ञापणा येसीजे हुजूरचे शेवेशी पेशजी विनंती पत्र पाटविले होत त्यात ठाणी पडलेल्या गावची याद व सरंब्रलवाडीवर जखमी व ठार जाहाले त्याची याद पाटविली म्हणोन लि॥ होत परंतु राजश्री लहूजी पवार हुजरे याजकडून यादी आल्या नाहीत याजकरिता पाटविल नाहीत याजकरिता राहिल्या त्या हली शेवेशी पाटविल्या आहेत इंग्रज बहादर याजकडील तुरुक दोन हजार रवाना जाहाले आहेत तुम्ही हुशारीने राहाणेविशी आज्ञा त्यास लष्करची जमेत पायदल व स्वार मिलोन पाचशेहे पर्यंत आहे बाकीचे पायदल दोन चारसेहे पर्यंत ठाणी घातली त्यात नेमणूक करून ठेविली आहे घातलेली ठाणी झाडनिशी राजश्री लहूजी पवार हुजरे याचे स्वाधीन जखेरेसुधा केली आहेत राजश्री नारायणराव मगदूल पत्र पाटऊन आणविलेत हुजूरचे सेवेशी आले आहेत त्याचा बंदोबस्त करून देणेची आज्ञा व्हाबी सेवेशी निवेदनार्थ विनंती. सेवेशी श्रुत होय हे विज्ञापणा.
पौ। छ १६ माहे सफर सुा समान
आसरीन मुकाम कोगनोली.

लेखांक ९४ तारीख ९-९-१८२७

श्री

रु. नं. ३

अ. नं. ७०५

पौ छ २० सफर सन

समान आसरेन

सेवेशी आर्जी बाबाजी सुर्वे हुजूर ठाण कडकोळ सेवेशी विज्ञापण येसीजे तागायत छ १६ माहे सफर पर्यंत सेवकाच्या ठाण मारचे वृत यथास्थित आसे सेवेशी विज्ञापणा ठाणे मजकुरावर तोरगलकर यानी सिबंदीन दररोज गोलागोली होत आहे ठाण मार निसबत खेडी तोरगल नजीक होती ती मारून नेहली आणि यविसीचा मार पेसजीचे विनंतीपत्री लिहिलच आहे त्यावरून निवेदन जाहालाच आसल हली दररोज आम्हावर येतात त्याची आमची गोलागोली दररोज चाललीच आहे त्याचही दाहा पाच माणूस खर्च जाहाले आमचेही सातआठ आा जखमी जाहाली आहे खरे आहे ते निवेदन व्हाव परंतु खर्चाची सोय आगदी नाही नवी वसूल कांहीं करावा तर परज्यन्ये आगदी नाही (ओळ फाटली आहे) तन करून रयत झाडून बेदील नय केलेस कोणी रयत टिकत नाही येसा विचार पडिला आहे तशात दोन महिने तैस ढकलीत नेहल राजेश्री मामलदार कोणी इकड यावयाचे राहिल कागदपत्र पा। आगर आम्ही जाऊन पाहिल तर हारकोणी गैरमाहित कारकून पाटवितात त्याने येऊन येथ काय कराव लोकाचा पोटाचा गवगवा पत्री कोटवर ल्याहावा येविसी राजश्री मामलेदार यास आज्ञापत्र खर्चास वरचेवर घेत जाणेविसी जाहलेस साहेबी ठाणेची व आमची आबरु रक्षण केलीसी होईल मग आम्ही गनीमास कांही वचकत नाही हुकमाप्रमाणे सेवा करू ऐसा हेतू आहे चालविणार धनी समर्थ आहेत येश निकडीत राजेश्री गणपतराव जाधव यास हुजूर येणेविशी आज्ञापत्र आले त्याजवरून ते निघोन सेवेशी आले आहेत त्यास ते विनंति इकडून करिता सेवेसी सर्व निवेदन होईल त्यास आज्ञा होऊन बराबर कांहीं लोक देऊन रवानगी सत्वर करून द्यावी ते येणेस दिरंग करतील परंतु हुकूम होऊन निकडीन पाटऊन द्यावा आणि खर्चाची सोय होऊन पाटवून देवविणार धणी मायबाप समर्थ आहेत विस्तार लिहिण माझी शक्ती नाही हुकुमाप्रो वर्तणूक करीन येथील प्रकारचा मा॥र राजेश्री सुलबाजी खोपडे हुजूर यानी पाहून यादी करून घेऊन गेले आहेत त्यावरून निवेदन होईल सिबंदी जमाव साहा सातशे पर्यंत आहे परंतु पोटगीस ठिकाण नाही आमचेकडील म्हटल तर सिबंदी कोणी नाहीत आम्ही व रामाजी बाबाजी कौटीवकर कारकून येस आहो सर्व सेवेशी निवेदन व्हाव म्हणोन विनंती लिहिली आहे क्षमा करणार धनी मायबाप समर्थ आहेत सेवेशी श्रुत होय हे विज्ञापणा.

लेखांक ९५ तारीख १०-९-१८२७

श्री

रु. नं. २

अ. नं. ३९८

पौ छ १८ माहे सफर रोज
भोमवार प्रातकाली घटका
दिवसास सन समान आशरीन

शेवेशी माधवराव घाटगे शेवेशी विज्ञापणा ता।। भाद्रपद व।। ५ रोज इंदुवासर पावेतो शेवका वृत येथास्थित असे विज्ञापणा इकडील म।। इंग्रज बहादर याचे लष्कर आजमासे चार पलटणे व तोफा सुमारी २५ येणे प्रमाणे आजरात्री कोटबागीवर उतरले आहे ही बातमी मुदाम शिपाई पाटऊन आणऊन शेवेशी विनंती लिहून सुभानजी सालोखे दि।। खासपागा यास पाटविले आहे शेवेशी निवेदन होईल आम्हावर चालून आलेस हुकूम काय तो आज्ञा व्हावी गोली मारावयास आज्ञा जाहालेस मारतो विरापा मोर्ती याचे लोक येथे आम्ही कांहीं बसविले नाहीत जे समई आमचेकडील टाणे बसले ते समईचे त्याचे लोकास आम्ही निरोप दिल्हा व त्याचे बासन येथे होते तेही त्याचे त्यास पावते केले राजश्री माणकोजी सुरवशी हुजरे येवजा करिता आज्ञा होऊन पाटविले त्यास जो येवज जमेल तो कांही शेवेशी रवाना करितो व येथील लोकास कांही रोजमारेस देतो शेवशी श्रुत होय हे विज्ञापणा.

लेखांक ९६ तारीख ११-९-१८२७

श्री

रु. नं. २

अ. नं. ४९३

पौ छ १९ सफर सन समान अशरीन

शेवेसी माधवराय घाटगे सेवेसी विज्ञापना ता। छ १८ रोज भोमवासर पावेतो मुकाम ठाणे कोचरी येथे साहेबाचे कृपावलोकने करुन शेवकावृत्त यर्थास्तत असे विज्ञापना इंग्रज बहादर याचे लष्कर कोटबागीवर आले आहे येविसीचे वर्तमान ठाणे मजकुरचे सनदी × × आणविले ते रोजगु।।चे विनंतीपत्री लिहून शेवेसी निवेदर्थ पा। आहे याजवर खासबारदार याचे पतकातील रामा लबेकरी यास पाटवून वर्तमान आणविले बी तपसील लस्कर नंदगावर कोटबागी नजीक इंदुवारी सायंकाळीं मुकामास आले तोफा सुमारी पांच व छकडे सुमारी १२ व तंबू डेरे १२ व थोरले डेरे २ व तुरूप स्वार सेहे सवासेहे व सोजर साठ सुमारी व साहेब २ येणे प्रमाणे अजमासे दोन हजार पर्यंत एकंदर लस्कर आहे त्यासमागमे राजश्री पटवर्धन याजकडील वकील

व भाऊ माहाराज याजकडील राजश्री नारो गिरमाजी आहे ठोकर ८ आहेत मोकल बैल सेहेदोनसेहे आहेत ठाणे घोटगिरी येथील ठाणे मोकले करून देणे म्हणोन ठाणे पर्यंत गेले त्यानी त्यास उत्तर केले जे हुजूरचे आज्ञापत्राविना ठाणे द्यावयाचे नाही ठाणेचा दरवाजा लावितास माघारे जाऊन मुकामास उतरले याप्रमाणे वर्तमान आहे ठाणे कोचरी येथे आणखी पेवे सुमारी ५ उमगली आहेत त्याचा गला हुजूर रवाना करावा परंतु येथे भाडेचे बैल मिलत नाहीत त्यास फ्रोक्त करावयाची आज्ञा जाहलेस गिराईक पाहून फ्रोक्त करून ऐवजे जमयेवून हुजूर रवाना करितो येविषीची आज्ञा काय ती व्हावी शेवेसी श्रुत होय ही विज्ञापना.

लेखांक ९७ तारीख ११-९-१८२७

श्री

रु. नं. ३
अ. नं. ७०४

पौ छ २० सफर सुा समान आशरीन

शेवेसी अर्जी लहूजी पोवार हुजूर दोन्ही कर जोडोन चरणी मस्तक ठेवून बिनंती विज्ञापना तागायत छ १८ सफर रोज भोमवार पूर्वप्रहर रात्रपावेतो साहेबाचे कृपावलोकन शेवकाच वर्तमान यथास्तित असे विज्ञापना ऐसीजे रोज गुा इंदुवारी दोनप्रहरा नंतर राजश्री हिमतबहादर कूच करून कोवाडाहून कडगावचे मुकामी आले मी कांहीं कामा करिता तेथून सडेनिसी कांहीं कामा करिता माहगावास गेलो होतो तेथून रोज मजकुरी कडगावचे मुकामी यावयासी येत होतो तो राजश्री रावसाहेब याचे पत्र घेऊन स्वार आला तो मार्गास गाट पडिली स्वारसुद्धा रावसाहेब याच्या डेरेस गेलो भेट जाहाली भेटी नंतर आज्ञापत्राचा मजकूर समजाविला त्यात उदईक प्रातकाली आम्ही कूच करणार तुम्हीही निघावे याप्रमाणे सांगितले त्याजबरोबर निघावे तरी आजरे तालुकेतील बारा खेड्याच्या ठाणेत किले सामानगड येथील गडकरी व तनखेतील लोक ठेविले आहेत आणि ठाणेत जागाजागा गल्ला मोठा थोडाबहुत आहे तो गल्ला काढून किलेस आणवून मागाहून ठाणेतील लोक आज्ञापत्रा प्रमाणे उटवून आणवितो मतीवड व सिपूरचा बंदोबस्त करवून आज्ञा प्रमाणे शेवेसी निघोन येतो ऐतेवेळेस गडकरी व लोक तनखेतील घेऊन येणेविसी आज्ञा आल्यास घेऊन येतो गडकरी व लोक घेऊन आले असता आजरेकर किल्ले नि।। गावगना सिलसिला करतील येविसीची आज्ञापत्री आज्ञा येईल त्याप्रमाणे शेवेसी येतो इंग्रज याजकडील जमाव कोटबागीवर येऊन उतरला आहे दोन हजार सुमार एकंदर कचेरासुद्धा आहेत बरोबर तोफाही आहेत असी बातमी आणून शेवेसी निवेदनात विनंती लिहिली असे मामे गोकाकेस व पाच्छापुरास

आहेत म्हणोन वर्तमान आल त्याजवरून बातमीस पाठविले आहेत मागाहून बातमी येताच लिहून तो हा जमाव आला तो बेलगावकडून आला आहे गोकाक व पाच्छापूर येथ आला ते धारवाडा कडून आल आहेत याप्रमाणे बातमीचा गडी आला त्यान जबानी सांगितली त्यावरून आणखी बातमीस पाठविले आहेत मागाहून काय बातमी येईल ते शेवेसी विनंती लिहीतो सेवेसी श्रुत होय ही विज्ञापना.

लेखांक ९८ तारीख १२-९-१८२७

श्री

रु. नं. २

अ. नं. ३९४

पौं. छ २० सफर सन समान आशरीन मयातेन व आलफ मुा करवीर

शेवेशी विनंती शेवक सयाजीराव जाधव सरनोबत ठाणे शिरोल कृतानेक सेवेशी विनंती विज्ञापणा तागायत छ१९माहे सफर पावेतो स्वामीचे कृपावलोकने करून शेवकाचे व ठाणे मारच वर्तमान यथास्थित अस शेवेशी प्रार्थना येसीजे बातमी वर्तमान राजश्री केशवराव कुरुंदवाडकर भिरजेस जाऊन राहिल होत ते काली संध्याकाली कुरुंदवाडास येऊन पोहचले समागम सेंभर स्वार व सेंभर पायच लोक आहेत शेवेशी निवेदनार्थ विनंती सांगलीहून लोक येऊन हरिपूरचे नावेन उतरून पुढे इचलकर्जीला गेले. शेवेशी श्रुत होय हे विज्ञापणा.

लेखांक ९९ तारीख १४-९-१८२७

श्री

रु. नं. २

अ. नं, ४९७

पौ छ २१ माहे सफर सुा समान असेरीन मयातेन व आलफ

शेवेसी विनंती शेवक सखाराम माणकेश्वर देशपांडे दोनी कर जोडून कृतानेक सेवेसी विनंती विज्ञापना ताा छ सफर रोज गुरुवार पावेतो स्वामीचे कृपावलोकने करून सेवकाच वृत यथास्तित अस सेवेसी विज्ञापना ऐसीजे इकडील वर्तमान निपाणीस इंग्रज बहादर याजकडील चपरासी पाच असामी आले याच कारण कागलकराची व पटवर्धनाकडील ठाणी हुजूरची बसली आहेत ती उठवून त्याची त्यास जिमा करावी याजबा त्याजवरुन निपाणीहून आताच पन्नास लोक व चपरासी आा दोन चिखलीच ठाण घालणे बद्दल आल आहेत ठाणेत कुरलीच व हमदेवरच लोक आहेत त्यानी सांगितल मुरगुडास शिपाई पाठविले आहे तिकडून निरोप येईल त्याप्रमाणे करू अस म्हणताच चपरसी × ×

बसल आहेत गोली मारावयाची असलेस तसच सांगावे आम्ही जाऊन आपले सरदारास कलवू ऐस चपरासीयाच म्हणण आहे जेव्हा एकसंबेस ठाणी बसवणे बद्दल चपरसी व गोककच लोक दोनशेहे आजीच गेले याप्रमाणे बेतमी आताच आली पलटण तीन घोडगिरी व कोटबागेवर आहेत ती उद्या अगर परवाचे रोजी रामापूर निपाणीचे मध्यभागी ओढयास मुास येणार निपाणकर यानीही आपला नेहमीचा जमाव पेंढार सुद्धा जो आहे तो आणविला आहे आणि नवीन पायदळ येण्यास प्रारंभ केला आहे सेरा सात आठ रुपये पर्यंत करितात परंतु माणूस नाही पाच पन्नास ठेविली आहेत बाहादर याच खटल निपाणीस वेसीपासी आज आगर उद्या येणार असी बातमी आहे नेहमी बातमीस ठेविल्या + + असाला मजकूर हुजूरच शेवेसी वरचेवर विनंतीपत्री + + लिहितो हुजूरुन शेवकास रामापूर संकणवाडीचे कामास हु + + रवाना जाहल आहेत ते तुम्ही येक विचार राहून खंडणीच ऐवजाचेकाम करणेविसी आज्ञापत्र सादर जाहाल ते काली प्रातकाली सेवकास पोहोचून मस्तकी वंदून सनाथ जाहालो ठाण आज्ञप्रमाण घालून रयत + + गावी यावी ऐवजाची तोड करावी असा करार करून आलो काम सोयीस लागाव इतकेत हुजरे आज्ञापत्र वेऊन आले तेव्हा ठाण जिमा करून तेथ मजकडील लोक व बंधूस ठेविल होत त्यासी हुजरे यानी निरोप देऊन पाा हल्ली आज्ञापत्र सादर जाहाल त्यास गाव निखालस उजाड निपाणीस जाऊन राहिले आहेत निपाणीस सेवकान जाण येणेस देखील संकोच हे सर्व हुजूरचे निवेदनातच आहे कोडणीचे सनदी नांगनुरचे ठाणेस गेले आहेत तारेसिखरे सनदी लोक गावी राहाणेची आज्ञा जाहाली पाहिजे स्वामी कार्यावरी आज्ञप्रमाण वर्तणूक सेवकाकडून होईल आणखी लागल ते बातमी वर्तमाने हुजूरच सेवेसी लिहितो खोडगाव कागद खासा समयास नव्हता + विनंती लिाा असं शेवेसी श्रुत होय ही विज्ञापना.

लेखांक १०० तारीख १४-९-१८२७

श्री

पौा छ २१ माहे सफर सुाा
समान आसरीन मयातेन
रोज मंदवार

रु. नं. २

अ. नं. ४००

शेवेसी धोंडजीराव नाईक निंबालकर व जीवराव जाधव हवलदार शेवेसी विज्ञापना ताा छ २१ माहे सफर रोज भरगुवार रात्र प्रथमप्रहर पर्येत मुाा लष्कर नजीक बारवड येथे स्वामीचे कृपावलोकन करून सेवकाचे फौजेसह वर्तमान यथास्थित

असे विज्ञापना मौजे भोजहून राजश्री जोत्याजीराव घाटगे झुंझारराव याचे बातमी वर्तमानाचे पत्र आले तेव्हा पत्र स्वामीचे शेवेसी आवलोकनार्थ पाटविले आहे बातमीचे पत्राचे आन्वये इंग्रज येऊन उतरले आसता शेवकाणी तयारीनिशी नदी पैलकडे जावे किंवां ते नजीक येऊ लागलेस गोली बाजवावी याची काय ती आज्ञा व्हावी येथील फौजेचे जमावाची माहितगारी राजश्री आबाजीपंत दि।। लष्कर यास आहे त्याप्रमाण स्वामीस निवेदन करतील पुढे स्वामी कृपाळु होऊन आज्ञा करणार स्वामी धनी समर्थ दारू गोली रवाना करून देणेची आज्ञा व्हावी शेवशी श्रुत होय हे विज्ञापणा.

लेखांक १०१ तारीख १४–९–१८२७

श्री

रु. नं. २

अ. नं. ३९९

पौ छ २२ सफर सन
समान अशरीन मयातेन
आलफ

शेवेसी अर्जी लहूजी पोवार हुजरे चरणावरी मस्तक ठेऊन विनंती विज्ञापणा तागायत छ २१ सफर मु।। किले सामानगड पेट येथे साहेबाचे कृपेकरून शेवकाचे वृत येथास्थित असे विज्ञापना यैसीजे इंग्रजाच लष्कर नदी उतरून कोटबागी नजीक निम उतरले आहे निम आजी उतरावयाच त्यास टोकरेत तोफा घालऊन उतरलेमुळे टोकरे फाटल ते नीट करून तेही आजीच उतरणार धारवाडचा साहेब कचेरीसुधा बेलगावास आल आहेत तेही पाच्छापुरास येणार यास्तव जागा जुगा व फडफर्मास याची तरतूद चालली आहे बेलगावावर कांही जमाव नाही जो येणे तो धारवाडकडून येत आहे याप्रमाणे बातमी आलेवरून सेवेशी निवेदनार्थ विनंती लि।। असे आजरेकराचा जमाव आरदाल व कोलिंद्रे या दोनी जागा पाच साहासेहे जाहला आहे राजश्री रावसाहेब हिंमतबहादर तिकडे कूच करून गेले आम्ही किल्ले मजकुरी काली निघोन आलो तेव्हा त्यानी जमाव केला आहे याप्रमाणे बातमी आली आजरें निमा गावच्या ठाण्यातील लोक काढून आणवणे ही आज्ञा त्यास आजीच काढून आणवणे तरी किले मजकुरच्या खेडीयासी सिलसिला होईल यास्तव सोईच्या विचार त्याचा सुमार पाहून आंणवितो ठाणी घातली आहेत त्या पैा कांही खेड्यानी गला कांही आहे त्यांपैकी निमा किलेस आणविला आहे बाकीचा आणवणेस वेटीची माणशे व भाडेचें बैल प।। आहेत हिकडील जमाव पैकी थोडेबहुत लोक रावसाहेब याजबरोबर गेले आहेंत बाकीचे लोक किलेकरीं व तनखेतील व इतलाक ठाणेशी ठेविले आहेत तिकडील आजमास पाहून वरचेवरां काढून आणऊन आज्ञाप्रमाणे निघोन येतो इंग्रजाच्या मुकाम कोटबागीवरी आल्या-

मुळे जिकडील तिकड खेड्यानी मनुष्य हुशार आहेत आठ-पंधरा दिवस लष्करचा मुकाम आला नसता तरी खंडणीचा व हरएक येवज कांही जाहला असता शेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक १०२ तारीख १४-९-१८२७

श्री

रु. नं. २
अ. नं. ४९६

पौ छ २१ सफर सन
समान आशरीन

शेवेशी विनंती शेवक आपाजी वणजरे हुजूरे मुकाम आमीनभाव शेवेशी विज्ञापना येसीजे सारापूर व आमीनभाव ही दोनी गाव दरोबस्त वसाड जाहालेला शेवेशी विनंती लिहिली होती त्यासी धीर भरवसा देऊन गावी आणवणेची आज्ञा जाहाली त्याजवरून आमीनगाव येथील गोरगरीब चार गावी आणविली होती आणि थोडीबहुत कामही चालीस लाविले होते इतकेच लष्करातून वरात होऊण पाच आसामी वरातदार आले ते व रघोजी राऊत हुजरे यासी सारापूर येथे येऊन मी मंगलवारी लष्करात आमीनभाव येथील थोडाबहुत येवज घेऊन गेलो नंतर हिकडे कोटबागी येथ इंग्रज याचे लष्कराचा मुकाम जाहाला त्यात सारापुरकर पाटील लष्करात होता त्याने दोनशे माणूस इंग्रजाकडील घेऊन गाव वेढून सारापुरात ठाण घातले गावी वडाऊड कांहीं नाही गावही वसाड होता आमची मात्र चार आसामी गावी होती त्यासी धुडकाऊन ठाण घातले नंतर बुधवारी तेथील लोक अमीनभावीस आले नंतर आमीनभाव येथे चार आसामी गोरगरीब होती त्यानी तिकडील वर्तमान येकोन यकंदर पळून गेली गाव निखालस वसाड आहे त्यासी शेवेशी विनंती लिहिली आहे अमीन येथेही आसरा म्हाणावा तरी ठाण अगर वाडाहुडा नाही माळावरी बसलो आहे लोकास पोटगी खर्चास सुद्धा गावी नाही शवेशी विनंती लिहिली आहे शेवेशी श्रुत होय हा विज्ञापणा.

लेखांक १०३ तारीख १५-९-१८२७

श्री

रु. नं. २
अ. नं. ४०९

पौ छ १ रबिलावल सन समान आशरीन मुकाम करवीर शेवेसी विनंती

शवक आनंदराव त्र्यंबक व बालकृष्ण बाबूराव मुकाम बेळगाव कृतानेक विनंती विज्ञापना ता। भाद्रपद वद्य दशमी भानुवार पावेतो सेवकाकडील वर्तमान तरी उदईक मेहरबा निसब्रट साहेब ब्राहादूर सर कलक्टर व पोलटक्याल येजंट सुभा धारवाड हे निघोन कोटबागी लष्कर मुकामी जावयासी जातात तेथे गेलेवर दिवसगतीचा पर्याय दिसत नाही तूर्त लष्कर सरहदेश उतरुन अटनऊ दिवस मार्ग मार्ग अवंतर फौजा येणेची पाहून सामुग्री सिद्ध केली व सेबकानीही विनंतीपत्र राजेश्री रावजी × × व्हावी मशारनिले परतोन हुजूरचे शेवेसी येईतोपावी × चे अंत फौजा बहुदा चालणार नाहीत हाही प्रयत्न त्यानीही येऊन जाणेचे दिवस गुदरले परंतु मशारानिले सर कामास गेलेमुळे येणे जाले नाही असो समय पाहता परम कठीण चौहूकडून पलटणे तोफा सुधा नजीक आली मुलाखातेचे तुरुप स्वार हजार बाराशे व रिजमीट एक दोन व × × विलायती गोलंदाज शंभर येणे प्रमाणे तासगावचे आसपास दाखल जाहालेची लिहीणी सरकारी व घराऊ बहुताप वर्तमान आली सर कलक्टर फौजत पोहोचल्यावर तालुकेचा प्रथम बंदोबस्त करून फौजा पुढे चालल्या करतील या पुढे बहुधा (फाटलेलें) न होणे कठीण दरकूच करवीरासच येती × × वारवाडावर व आजरे तालुकेत गेल्याल्या परतून माघारी चालल्या व स्वारीही करवीरी ऐसी वर्तमान ऐकूण अंतकरणी सुखास पडत नाही परिणाम धोरणा केला द्रिष्टी दुघट वाटतो शेवकानी आज्ञे प्रमाणे वर्तणूक करुन असावे त्याअर्थी लोक द्रष्टी अथवा मनू पाहून अगर आपले बुधीन कांही येक विचार सुचवावे तरी दुसरा कोणताही विचार करावयाचा नाही व बोलावयाचा नाही मनातदेखील आणू नये निग्रहाचीच निष्कर्स आज्ञेत त्या आज्ञेत आज्ञेपुढे लाचारता तथापि अल्प स्वल्प नाप × × पाहिला या मुकामीही जबानी आज्ञा तीच तेव्हा × निश्चयाची पाहून नाद सोंडाव लागला उपाय नाही दिवसापासून पटवर्धन इत्यादि जहागीरदार इनाम सरंजामी वगैरे यासी आपआपले जागी जमाव करून तयारी हुशार राहणेविसी हुकूम गेले श्री व इचलकरंजीकर वगैरेची हुजूरून ठाणी घातली होती त्यास कुमक होऊन परत ठाणी देवावयाची ठरली यात कोठे तरी गोळागोळी जाहालिया कठीण आहे यकदम कवचाल उटले आता उपाय नाही तो हे लिहिले हे समग्र अशुद्ध प्राणावर हुशार होऊन लिहिले परंतु स्वामी राज्याची अभिष्टचिंत × × अवज्ञ न अर्ज केलेचा दोष विसेस नसेल ऐस बुधीमत येऊन येतार्थ जाहाले आढळले मजकुराची विनंती लिहिली आहे याजवर स्वामी मनोगतानुरूप आज्ञा तदनुसार वर्तणूक करणे प्राप्त येकंदर मजकूर लिहिणेमुळे तपसील फार जाहला याची क्षमा करून अपराध माफ करणार स्वामी समर्थ शेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक १०४

तारीख १५-९-१८२७

श्री

रु. नं. २

अ. नं. ४०२

पौ छ २३ सफर सन
समान आसरीन

शेवेशी धोंडजीराव नाईक निंबालकर व जिवराव जाधव हवलदार सेवेशी विज्ञापणा ता छ २२ माहे सफर रोज मंदवार संध्याकाल पर्यंत मु॥ लस्कर नजीक बारवड येथे स्वामीचे कृपावलोकने करून शेवकाचे व फौजसह वर्तमान येथास्थित असे विज्ञापणा स्वामी कृपाळु होऊन आज्ञापत्र सादर केले ते मस्तकीं वंदून सनाथ जाहालो आज्ञापत्री आज्ञा जाहाले प्रमाणे शेवकानी सिर्सावंदन केली इकडील मजकूर का॥ येकसंबे येथे इंग्रज याजकडील वगैरे कोणाकडील ठाणे न घेता आवईवरी निघोन राजश्री जोत्याजीराव घाटगे झुंझारराव भोजस आले गावात कोणाचे ठाणे नाही गाव हूड दांडग आहेत येसे पत्र राजश्री बाजीपंत कराडकर याचा कारकून याचे यडूर व कांडालपुराहून आले इंग्रज याचा मुकाम आद्यापि यडूरावरी आहे नदी आलीकडे कांही आला नाही येसी कांहीं आज्ञा होईल त्याप्रमाणे वर्तनूक करू का॥ लाटेहून राजेश्री जिवाजीराव खानवेलकर याचे पत्र आले तेच पत्र स्वामीचे शेवेशी अवलोकनार्थ पाटविले आहे रोज गुदस्ता स्वामीनी आज्ञापत्री आज्ञा केलेप्रमाणे गावगन्ना ठाणीयास पत्र रवाना केली ज इंग्रज याजकडून नवे बसलेस ठाणे स्वाधीन करावी आवंतर कोणी आलेस ठाणी स्वाधीन न करिता जरब पोहचवावी येसी पत्र रवाना केली आहेत लोकाकडून बातमी आताच इंग्रज याच लष्कर आद्यापि येडूरावरी आहे नदी येलकडे कांही उतरले नाही दतवाडकर घोरपडे याचे मूल लष्कर मु॥ आहे येविसीची विनंती करणेस्तव स्वामीचे शेवेशी आहादरले आहेत खर्चास येथे मागतात आज्ञा होईल त्याजप्रमाणे वर्तनूक करू घोरपडे याजबराबर स्वारे आा पाच व लोक आसामी दहा लष्कर मु॥ आहेत शेवशी निवेदनार्थ विनंती लिहिली आहे शेवशी श्रुत होय हे विज्ञापणा.

लेखांक १०५

तारीख १६-९-१८२७

श्री

रु. नं. २

अ. नं. ४०३

पौ छ २४ सफर सन समान आशरीन

शेवेसी नारायणराव भो मुा वालव बुा दोनी कर जोडून कृतानेक शेवेसी विज्ञापना ता छ २३ माहे सफर पर्यंत स्वामीचे कृपावलोकन कडून सेवकाच वृत यथास्तित

अस विज्ञापना रोज रविवारचा जाहाला मा॥र राजश्री बाबाजी जगदाळ यानी शेवसी विनंतीपत्री लि॥ आहे त्याजवरून निवदनात येईल आमचेवर कागलकर याचा दात आहे पेशजी झुंज पडून खराबी जाहाली हाल्लीही करणार येविसी कुटुंब कोठे ठेवणची ती आज्ञा होऊन आज्ञापत्र सादर जाहाल पाहिजे सेवेसी निसबत पायेच लोका पैकी दोन आा जखमा लागल्या आहेत शेवेसी निवेदनार्थ विनंती सवेसी श्रुत होय ही विज्ञापना.

लेखांक १०६ तारीख १६-९-१८२७

श्री

रु. नं. २

अ. नं. ४९८

शेवेशी माधवराव घाटगे शेवेशी विज्ञापणा ता छ २३ सफर रोज रविवासर दोन प्रहर पावेतो साहेबाचे कृपावलोकने करून सेवकाचे वृत येथास्थित असे विज्ञापणा हुजूरचे शेवेशी ठाणे कोदरी पौ व मौजे कुरणी पैकी रुपये ५०० पाचशेह राजश्री मानकोजी सुरवशी हुजरे याजसमागमे पाटविले आहेत शेवेशी प्रविष्ट होतील पावतीची आज्ञा व्हावी हुजूरचे आज्ञे प्रमाणे आजम इंग्रज बहादर याजकडील चपराशी आले आसता ठाणी स्वाधीन करून शेवेशी निघोन येतो ठाणे हेबाल येथे रोज गु॥ चपराशी मा॥र आले होते त्यास त्याणी रात्री ठेऊन घेऊन आज वोढून घालविले म्हणोन वर्तमाने आहे शेवेशी श्रुत होय हे विज्ञापणा.

पौ छ २५ माहे सफर भाद्रपद वा॥ १३

रोज भोमवार सन समान आशरेन.

लेखांक १०७ तारीख १७-९-१८२७

श्री

रु. नं. २

अ. नं. ४०५

पौ छ २६ माहे सफर भाद्रपद व॥ १४ मुकाम करवीर सन तम्रान आशरीन

शेवेसी अर्जी विरापा मूर्ती ठाण यमकणमुरडी कृतानेक विनंती विज्ञापना ऐसीजे येथील क्षेम तागायत छ २४ माहे सफर रोज इंदुवार संध्याकालपर्यंत शेवकाच व ठाण्याच वर्तमान यथास्तित अस विज्ञापना ऐसीजे काली रविवार भडगावहून जमावसुद्धा ठाणे मकणमुर्डीस आज्ञा प्रमाण सरकार सेवाचाकरीच उपयोग कराव म्हणोन आलो अजी यइंदुवारी प्रातकाली × × गोळी उडतात म्हणोन वर्तमान कळलेवरून त्याचक्षेणी

जमावसुद्धा खानापुरास येऊन वेढा देऊन आतून बारीक बातमी आणविल बातमीदार सांगितल जे सुतकट व वंठमुरी वगैरे स्वार पांचपन्नास व काटक लोक पांचशेहे पर्यंत रात्री येऊन आंत पडले कशाकरिता पडल म्हणोन बातमीदारास विचारील असता सांगितल जे गावांत पैकेकरिता मारामारी होऊ लागल तेव्हा गावकर हे मसलत करून आणविल वंठमुरीकरही आपले कमत्या करिता त्याजबरोबर आले आहेत आत जाया जखमी जाहाले आहेत ऐस सांगितलेवरी आम्ही जमावसुद्धा जमून येका तोंडान हिरिरी करून हलथान आत उडी घातली तेव्हा काटक व स्वार आलेल जमावासुद्धा जमून निघून गेल त्याच पाटलाग करून गेलो इतक्यात हेबाळाकडून बातमी आली कीं निर्लीकराच जमाव व छेपरसी शिवेस आले येस ब.तमो येताच त्याच पाटलाग करावयाचे मान +

+ येथ जमावासुद्धा शेवेसी आहो राजेश्री कृष्णाजी जगताप याजकडून लोक व हुजूरे होत त्यापैकी चार असामी व कारकून दोन असामी ऐस साहा असामीस जखम लागून पडल होत त्यास वेटे देऊन हेबाळास पाटवण म्हणोन जगताप याजकडून जासूद आला त्याजवरुन जखमीदार यास वेटे देऊन हेबाळास घालविल बाहीरले लोकापैकी एक मुडदा पडला आहे तो वंटमुरीकराचा म्हणतात गाव रात्रीचा जरार होऊन गुरढोरसुद्धा चेहुकड गेले आहेत जाहालेल मजकूर श्रुत व्हावया करिता सेवेसी अर्जी लिहिली अस. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक १०८ तारीख १७–९–१८२७

श्री

रु. नं. २

अ. नं. ४०४

पौ छ २५ सफर सन समान आशरीन

सेवेसी विनंती सेवक सयाजीराव जाधव सरनोबत ठाणे सिरोल कृतानेक सेवसी विनंती विज्ञापना तागायत छ २४ माहे सफर पावेतो स्वामीचे कृपावलोकन करून सेवकाच व ठाणे मजकूरच वर्तमान यथास्तित असे शेवेसी प्रार्थना ऐसीजे मौजे सिरढोण येथील गवताची कही भरून न्याहावयासी आजी इंदुवारी प्राथकाली इचलकरंजीहून येऊन उभ राहिल आहेत आजी पोख्ता जमाव स्वार व लोक व येक तोफ घेऊन आल आहेत ते दीड प्रहर दिवस पर्यंत उभ राहिल आहेत मागाहून सर्व वर्तमान होईल ते सेवेसी विनंती पत्री लिहितो मौज मजकुरच ठाण त्याचे टपेतील आहे याजकरिता शेवेसी विनंती लिहिली आहे कांही स्वार व लोक पायेच पाटविणेची आज्ञा व्हावी शवेशी निवेदनार्थ विनंती. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक १०९ तारीख १७-९-१८२७

श्री

रु. नं. २

अ. नं. ५०७

पौ छ २५ माहे सफर

सुा समान आशरीन मया-

तैन व आलफ

सेवेशी विनंती सेवक सयाजीराव जाधव सरनोब्रत ठाणे सिरोले कृतानेक सेवेशी विज्ञापणा ताा छ २४ सफर पर्यंत स्वामीचे कृपावलोकन करून सेवकाच व ठाण मजकूरचे वर्तमान येथास्थित असे सेवेशी प्रार्थना येसीजे आजी सोमवारी इचलकरंजीकर याजकडील स्वार सेंभर सवेसेहे व पायेच लोक तीन चारसेहे पर्यंत येऊन मौजे शिरढोन ठाणे येथील कुरणातील गवत कापून कांही भरुन इचलकरंजीस रवाना करून दिल्ही आणि तेचे स्वार व लोक गावनजीक कुसवापर्यंत येऊन उभ राहिंले व्हते नंतर आतील लोकानी गोल्या घातल्या दाहापांच माणूस त्याजकडील जखमी जाहल्हे येक दोन माणूस ठार जाहाल्या प्रों मजकूर जाहाले नंतर माघार निघोन गेले दाहावीस माणूस जखमी जाहले म्हणून येकितो ब्रातमीस पाटविल आहेत खचित बातमी आले नंतर सेवेसी विनंती लिहितो मौजे नांदणी येथील निटव्या याचे घर जप्ती केले आहे त्यास आजी सकाली राजश्री व्यंकाजी भिवराव करवीराहून आल त्याणी सांगितले जे निटव्याच घरची चीज-बस्त झाडेनिसी ठाणेस आणऊन घेणेविसी हुजूरची आज्ञा जाहाली आहे म्हणोन सांगितेलेवरून आजी दोनप्रहरी नंतर नांदणी येथे येऊन निटव्या याच घरची कुलूप काढून चीजबस्त पाहिली पांचसाहा हाजार पर्यंत जिनगाणी आहे त्याचे कांहीं बोलणे आलेसे मखलासी ठरऊन घेऊन येवज पाटऊन देतो मखलासीच बोलणे न पटलेस चीजबस्त ठाणेस आज्ञे प्रा घेऊन जातो सिरढोण येथ कहीमुल खटला व्होणार त्यास रखवालीस स्वार व लोक पाटऊन देणेची आज्ञा व्होवी सेवेशी निवेदनार्थ विनंती सेवेशी श्रुत होय हे विज्ञापणा.

लेखांक ११० तारीख १७-९-१८२७

श्री

रु. नं. २

अ. नं. ५००

पौ छ २४ सफर सन

समान आसरीन

शेवेशी विनंती सेवक सयाजीराव जाधव सरनोबत ठाणे सिरोल कृतानेक सेवेशी

विंनंति विज्ञापणा तागायत छ २४ माहे सफर पावेतो स्वामीचे कृपावलोकनेकरून शेव-काचे व ठाणे मजकुरचे वर्तमान यथास्थित असे शेंवेशी प्रार्थना येसिजे आजी रविवारी प्रातःकाली इचलकर्जीहून शेंभर स्वार व दोनशेह प्रायेच लोक येऊन मौजे शिरढोनच्या कुरणातील गवत कापून कही भरूण घेऊन गेले कहीचे रखवालीस स्वार व लोक राहून पंचेवीस तीस स्वार व लोक गावनजीक येऊ लागले तेव्हा शिरढोणातील लोक बाहेर पडून त्याची व याची गोळागोळी जाहाली इचलकर्जीकर यांचे स्वारापौ येक स्वारास गोळीं लागताच माघारे निघोन गेले दररोज कही भरूण न्याहवयासी येणार सेवेशी निवेदनार्थ विंनती सेवेशी श्रुत होय ही विज्ञापणा.

लेखांक १११ तारीख १८-९-१८२७

श्री

रु. नं. ३
अ. नं. ७५४
पो छ २७ सफर सन
समान अशरीन व आलफ
मु॥ शिरढोन

शेंवेशी अर्जी लखूजी पोवार हुजूरे मु॥ पेठ किले सामानगड चरणी मस्तक ठेऊन विंनंती विज्ञापणा तागायत छ२५सफर रोज भोमवार पावेतो साहेबाचे कृपावलोकन वर्तमान यथास्थित असे विज्ञापणा इंग्रज बहादर याचे लष्करची बातमी आण (फाटलें आहे) न हजार असा पांच हजाराचा तल पडला आहे तोफा आठ आहेत पीकपाणी चारून जलनाकरिता गावातील घर मोडून नेहतात रात्रदिवस सावधपणा चौकी पाहारा किरान-रात्री तयार बुणगेसुधा असून गोर नदीपलीकडे नंदगाव खानापूर नजीक डेरे दिल्हा आहेत तेथे राहातात पुन्हा पाहाट दोनघटका रात्री लस्कर मुकामी येतात बरचेवरी तिकडून जमाव येतो हा भाव दाखविणे करिता कोटबागीकडून यासी न समजता पान्च-चारसेहे रात्रो निघोन जाउन गोकाकचे मार्गे फलटन आल असा भाव दाखऊन लष्करात येतात धारवाडीची कचेरी साहेब सुधा बेलगावास आली आज उद्या पाच्छापुरास येणार धारवाडास म्हणोन कांहीं जमाव नाही कुमार राज्याची पांचचार हजार फौज सुधा व कमतीहून दोन फलटन मागाहून येणार आहेत नंतर तुमच्या मुकामाचा बेत होणार असे वर्तमान लस्कराहून व बेलगावाहून आणविले आहे निपाणीकरास कागल प्रांतीची ठाणी घालवणेविसी सांगितले आहे आणि जमाव करणेविसी सांगितले आहे त्याबरून दोन हजार जमाव जाहाला आहे भाऊ महाराज यांजकडून ठाणी घालवणेविसी इंग्रज यांनी सांगितले आहे आजरेकडे दोनसहे चटेकरी येणार व वाडीकडील दोनशेह कुमक येणार असे वर्तमान आहे जासूद नाईक याजबरोबर आज्ञापत्री आज्ञा जासूद सांगतील त्याजवरून

कलेल त्यानी सांगितले त्या कामास स्वार व पेंढारी भले घोड दोनशेह प्रतापे काम

० ० ० ०

थोडीबहुत होतील आडकूरक्र देसाई याजपासी जमाव पांचपंचवीस आहे अधिक म्हणून नाही विरापा मूर्त्या इतलाख संभर आजमास आहे येंकनमोर्डी वगैरे खेडयाच थोडीबहुत आहेत गोठखिंडयावर मुरीहूण आपला येवज घेऊन मिरजस जाण्याकरिता

+ + हली येथे वस्तीस आला व्होता त्याची बातमी राखोन आपणा नाईक व विरापा मूर्ती व आडकूर देसाई यानी मोघ्याहलीस जाऊन नाडगोंडयाचे घरी धरिला त्याजपासी सोन व नक्त रुपये सापडल ते व गावात मारामारी करून दंडदोषही घेतल त्याशिवाय नक्त कांहीं सापडल व मागा भरलेला सापडला नाग व नागवीही केली येवि- सीच विनंतीपत्र परभारे आलच आसल दंडाची कुल मोठीमोठी पाहून दंड बांधला याशिवाय यमकनमोर्डी तनखेत पंधरा हजार रु॥ वसूल घेतला सरकारात काय दिल्हा ही चौकशी पाही असता × × सीच मानसीक आहता आपल्या

० ० ० ० ०

काडत मसलतीत + अस वर्तमान समजलेवरून सेवेशी निवेदनार्थ विनंती लिहिली आहे हा मार लिहू नये परंतु सरकार शेव्ध लागल याजमुळे सेवेशी विनंती लि॥ आहे हिकडून मजकूर जासूद नाईक याणी पाहिलाच आहे विनंती करतील त्यावरून निवेदनार्थ येईल मूर्त्या याज मागाहून राहाणेविसी हुजूरची आज्ञापत्र आली त्यावरून साखरा वाटल्या हे जासुदानी पाहिलच आहे दोनसेह स्वार चांगले पाटवून देणेविसी आज्ञा व्हावी स्वाराच व पेंढारी याच काम हिकडे आहे. सेवेशी श्रुत होय ही विज्ञापणा.

लेखांक ११२ तारीख १८-९-१८२७

श्री

रु. नं. ३
अ. नं. ७०७

पौ छ. २७ सफर सन समान
आसरीन मयातैन व आलफ

सेवेशी आर्जी लहूजी पवार हुजरे मु॥ पेठ किले सामानगड चरणी मस्तक ठेऊन विनंती विज्ञापणा ता। छ २५ सफर रोज भोमवार पावेतो साहेबाचे कृपावलोकन करून शेवकाचे वर्तमान येथास्थित असें विज्ञापणा करवीरास येणेविसी राजश्री हिंमतबहादर यास व भजद आज्ञापत्री आज्ञा त्याजप्रमाणे निघून यावयाचे त्यास इकडील ठाणी आजर तर्फातील घातली त्याचा बंदोबस्त करण्यास्तव गडच्या पेठस आलेया उपर आजरेकर यासी बातमी समजली कीं जमाव निघून करवीरास गेला नंतर त्यानी बहिरव- वाडी चारशे उत्तूर तीनशे व आरदाल शेंभर व भुपेबाडी पाऊनश व आजरे पांचशे

काळींद्र तीनशे व तर्फाच्या खेड्यानी चारशे येणे प्रमाणे जमाव जाहाला त्याच्या टोल्ह्या दोन प्रतेक प्रतेक करून रात्रौ निगुडव व सरवळी व सुल व मलीगर व कोपाड या गावास रात्रंदिवस नेहमी गोळागोळी होऊ लागली दम घेऊन देईनात त्यात सरकारची आज्ञा आजरे तर्फाची ठाणी घातली त्या ठाण्यातील लोक उठवून आणणेविसी आणावी तर नेहमी त्याचा जमाव येऊन गोळागोली चालली आहे त्यास खेड मडीलग ओसाड कडस आजरे जवल होती तेव्हा तेथ लोकाचा दम निघनासा जाहाला याजमुले त्यातील लोक काढून आणिल कोवाड्यावर येऊन दोन रोज गोळागाली चालविलीच होती इकडे मलीगीर व सरवली व निगुडग तिन्ही गावास लोक होत ते कोवाडच्या कुमकेस घालविले त्या ठाण्यात पांचचार होते त्याच्वा पांचच्चारशे जमाव कोळींद्रकडून येऊन तिनी गावास ठाणी आजरेकर याणी घातली कोवाड्यावर दाटी केली होती ती हिकडून लोक पाटवून मोर्चे उटऊन घालविले कोवाड एकच नदी पैलतीरी होते तशात त्यानी गाव जाळून वसाड केला होता याजमुल त्यातील लोक काढून आणून भादवण व वाडी व हिरलगे या तिनी गावात लोक भादवणात दीडशे व वाडीत पाऊंणशे व हिरलग किलेकडील त्यात सवाशेये माणूस किलेकडील त्यात पन्नास घातल गजर गावचें ठाणे नदीच्या पैलकडे होते त्यानी रात्रौ नदीपार होऊन येऊन गोळागोली करून लोक धुडावून घातल ऐसे आम्हास रात्री समजले नंतर लोक जमाव करून सूर्य उघण्यापूर्वी दोनघटका रात्री गजर गावास ठाणे घातल गजरगावास दोनशे लोक ठेविले आहेत मतीवड व शिपूरचा बंदोबस्त करणेविसी आज्ञा त्यास शेंडूर लोक शिपुरास ठेविले आहेत कणगल्याचे लोक व गडइंग्लज व इतलाख मतीवड्याचे ठाण्यात ठेविले आहे खणदाल्चे लोक गजर गावात ठेविले होत त्यानी धुडकावताना निघून परभार आम्हाकडे न येता खणदाळास गेलेनी त्यानी गोळीशी गाठ घडलीं आहे खाणीदणी रहावी तर आजरेकर याच्या व आमच्या सिलशिल्यामुळे गाव वसाड आहेत याजमुले खर्चाची आडचण पडून लोक धरणीपारणीची गाठ पडली आहे कुमकास लोक घेऊन जावे तर ठाण्यानी लोक रुदवले आहेत किलेच्या तणखेतील दाबेवाडी देसाई याची त्यातील दोनशे गुर आजरेकर घेऊन गेले दुतर्फाची खेडी किले निम गुल जाहाली आहेत दोनचार ठाण्यातील लोक आहेत ते काढून आणून जमाव आम्हाजबळ करून तेथे त्याचे लोक येतील त्याजवर जावे आसे केले आसता गजरगाव इचनाल ही दोन्ही ठाणी लोक कासल्याचे ठेऊन बलकावतील आणि किल्यापावेतो सिलशिला करू जातात याजमुले ठाण्यातून लोक काढावयास येत नाहीत सुल्याचे ठाणे महागावचे लोकाचे स्वाधीन होते त्यानी चारशे जमाव गावचे संधान करून काल्च्या रात्री त्यानी ठाणे घातल त्यास कुमक करावी तर लोक ठाण्यात जिकडील तिकडे गुंतले रिकामे नाहीत हालेवाडी व वडकशिवले दोनी गावे किलेच्या हिशत आसता मनोहरगडास देणेविसी आज्ञा आज्ञापत्र घेऊन शंभर मानशे बसून दंगा केला आहे टरावाची यादी किलेकडील कारकून हुजूर येऊन समजाऊन विनंती करीजे पे ठेत मनोहरगडा कडील लोकास ऊठून जाणेविसी आज्ञापत्री आज्ञा व्हावी आम्ही किले

नि॥ कारकुनास हुजूर जाणेविसी सांगितले होते परंतु आजरेकराचे सिलसिलमुळे राहविल आहेत आजरेकराचा सिलसिला आम्हाही बरोबरच आहे भुदरगडकरी व मनोहरगडकरी व हिंमतबहादर हे कांहीं उपराल्यास येत नाहीत व त्या सरदेस त्याची खेडी आहेत त्यासही सिलसिला करीत नाहीत चौहुकडून सिलसिला लाविला असता आजरे पेटेत दम खाणार नाहीत याजकरिता भुदरगडकरी व मनोहरगडकरी व हिंमतबहादरी या त्रिवर्गास आज्ञा व्हाबी शेवेशी निवेदनार्थ विनंती लिहिली आसे शेवेशी श्रुत होय हे विज्ञापणा.

लेखांक ११३ तारीख २०-९-१८२७

श्री

रु. नं. २

अ. नं. ४०८

पौ छ २९ सफर सन समान आसरीन मयातेन व अलफ मु॥ करवीर आश्विन शु॥ १

शेवेसी अर्जी विरापा मूर्ती ठाणे यमकनमुरडी कृतानेक शेवेसी विज्ञापना ता छ २७ सफर रोज गुरुवार प्रहररात्र पावेतो स्वामीचे कृपेकरून शेवकाच वर्तमान यथास्तित असे विज्ञापना आज वंटमुरीकर यानीं आपले तालुकयातील काटक दोन हजार अजमासे घेऊन ठाणे यमकणमुर्डीवर आले आमची त्याची लढाई जाहाली तिकडील दोन असामी ठार जाहाल एक असामी जखमीं जाहाला तेव्हा माघारी फिरोन गेले आम्ही त्याचे पाट लागोन वंटमुरीचे नदीपावेतो गेलो त्याच जमाव नदीपलीकड जाऊन गावातून पाच जेजाल आणोन मारावयास लागल आम्ही अस्तमान पाठविल तेथ राहोन रात्र जाहाली म्हणोन ठाणे मजकुरास आलो आम्हाकडील येक सिपाई यास गोळी लागली जखम हलकी आहे गावास आला इतकीयात साहेबाकडून पाच असामी स्वार रोखा पाच हजार रुपयेचा घेऊन येऊन आम्हास रोखा दिला पाच हजार रुपये घेऊन मग कंबर सोडाव याप्रमाणे आज्ञा आहे म्हणोन आम्हास बसविल आहे येताक्षणी शंभर रुपये कंबरछयोडी बद्दल सिवने रोख बद्दल रुपये २५ व घोडयास चंदी वाजवे सात आसामीचा घेतल इकड दंगा लागोन झाडून तालुका जरार जाहला पैसा हातास लागत नाही शिबंदी खर्च मनस्वी चडत चाललेला आहे खानापुरास ठाणे आम्ही घातल होत ते गाव राजश्री कृष्णाजी जगताप यानी लोक व जासूद मौजे हेब्बाळ-हून हा गाव आम्हाकडे आहे तुम्ही ठाणे घातल सरकार चाकरी केली आमचे ठाणे आमचे जिमा करा म्हणू लागले सरकारचा शब्द लागल म्हणोन ठाणे स्वाधीन केले स्वामीस कलाव करिता विंनती लिहिली असो स्वारास मनाई द्याव्यात आज्ञा व्हाबी दररोज पंचवीस घेतात स्वारास दोन रोजात मनाई आणून द्याव नाहीपेक्षा पाच हजार रुपये द्यावे म्हणोन स्वारानी करार केल आहे खंडणीचा ऐवज पाच हजार रुपये देणे-

विषयी आज्ञा जाहाली मौंजे हेब्बाळ व कोपरी वगैरे गावास ठाणे घालून मदहलीस गेलो तो इतकीयात स्वामीकडून ठाणेस राजश्री × × नि।। लोक यानी ठाणे स्वाधीन केले मौजे मदहलीस दोन हजार रुपयेची खंडणी जाहाली अद्यापी वसूल आले नाही वरात तेथे बसविली आहे ऐवज येताच हुजूर पाटवू देतो स्वारास मनाई द्यावयास आज्ञा व्हावी वरातदार फार दंगा करितात वंटमुरकर यानी तालुकीयात फार बखेडा करितात वंटमुरीस ठाणे घालावयास तोफा दोन पाहिजेत म्हणजे स्वामीचे आज्ञा जाहल्यास ठाण घालीन त्याचा जमाव त्याचेवर जमवितात नेर्लीकर वंटमुरीकर व गुरुनाथ पंत संकेश्वर स्वामीचे एक दोन खेडी येकंदर सर्वत्राची एक दील होऊन गलीमाईचे प्रारंभ केला आहे त्याचे पारपत्य करणार स्वामी समर्थ आहा मजकडून होईल तितकी सेवा चाकरी स्वामीचे चरण स्मरण करितो इंग्रज याचे लष्कर कोटबागीवर आहे रात्र सारी निजत नाही आमचे जमाव जमले आहे म्हणोन संकेस्वरकर यानी इंग्रज बाहादर यास कागद लिहून लखोटा करून पाटविला होता तो वाटत आमची डाक होती त्यानी झाडा घेताना सापडला तेथ आमची फिर्याद भारी लिहिले होत स्वामीस निवेदनार्थ विनंती लिहिले असे सर्व प्रकार सांभाळ करणार स्वामी समर्थ आहा. विशेष लिहिणे शेवेसी शक नव्हे हे विज्ञापना.

लेखांक ११४ तारीख २१-९-१८२७

श्री

रु. नं. २

अ. नं. ४०६

पौ छ २९ सफर सन समान आसेरीन

शेवेसी आपाजीराव जाधव जप्तनमुलुख व मानसिंगराव घोरपडे कृतानेक सेवेसी विज्ञापना ताा छ २८ माहे सफर रोज भृगुवासर पूर्व पांच घटका रात्रपर्यंत स्वामीचे कृपावलोकने करून लष्कराचे व सेवकाचे वृत्त यथास्थित असे शेवेसी विज्ञापना आज इचलकरंजी नजीक लस्करात तलाव्यास गेले होते परंतु आतील लोक काही बाहेर आले नाहीत व तोफेचे गोलेही उडाले नाहीत तलावेचे स्वार बागेतून आले परंतु तिकडील कोणी आले नाहीत चटेकरी लोक पाटवणेची आज्ञा आज्ञे प्रमाणे शेख मोहिद्दिन सुभेदार व धोंडो शामराव याजसमागमे चटेकरी झाडेनिसी शेवेसी पाठविले आहेत शेवेसी निवेदनार्थ विनंती लिहिली आहे शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक ११५ तारीख २१-९-१८२७

श्री

रु. नं २

अ. नं. ४०७

पौ छ २९ माहे सफर सुा

समान आशरीन मयातेन व आलफ रोज मंदवार

शेवेशी विनंती सेवक सखाराम माणकेश्वर देशपांडे दोनी कर जोडोन कृतानेक सेवेसी विनंती विज्ञापना ता छ २८ सफरपावेतो स्वामीचे कृपावलेकरून शेवकाच वृत येथास्तित असे सेवेसी विज्ञापना ऐसीजे इकडील मजकूर इंग्रज बहादर याजकडून निपाणीस स्वार येऊन ठोकर करवणेविसी ताकीद करवून ठोकर करणेचे बेताची काठी मोजणीची तेथून पाठविली आहे ती देऊन गेला त्याजवरून ठोकरच साठ दाहा तयार करविले आहेत आद्याप कातडी मडविली नाहीत हुजूरचे शेवेसी परवा विनंतीपत्री बहादर याचा मु॥ रामापूर निपाणीचे मध्यभागी ओढ्यावर येणार असी विनंती लि॥ होती चपरासी येऊन जागा पाहून गेले परंतु नद्या दोन उतराव्या लागतात हा अंदेशा घेऊन भोजस मु॥ याव ऐसा बेत जाहला आहे साहेब बेळगावहून शनिवारी निघोन भोजचे मु॥सच पावणार याप्रमाण वर्तमान आताच निपाणीकडून बातमीस पाठविल होत ते वर्तमान घेऊन आले निपाणीकर याजकडील वकील राजेश्री लिंगोपंत भोमवारी दोनतास पूर्व रात्रीस निपाणीस येऊन पोहोचले बरोबर तुरुक स्वार दोन आा आहे रात्रौ वाडयात गेले नाहीत प्रातकाली जाऊन चार सहा घटीका येकात होऊन बाहेर आले परंतु अंतर्यामी निपाणकर याचे व लिंगोपंत याचे मनस्ताप आला आहे ऐस ऐकणेत आले हे प्रमाण दिसणेचे कारण राजश्री नरहर पंत यासी पंधरा दिवस तगादा सक्त होऊन पाहाऱ्यात होत दुसरा मजकूर राजश्री नारोपंत घाटगे तोरगलकर यासी ममईस बोलण्या प्रकणी रवानगी करून अबदागीर वगैरे सरंजाम देऊन प्रंत नशारनिले बेलगावहून निपाणीस येणेच पूर्वीच पाठविल असे सांप्रदाय नहुत आणि जाहाले तेव्हा लागल हे वर्तमान प्रमाण आस दिसते ममईस पाटवणेचे कारण तूर्त गलबल जाहाली आहे यात सतावीस खेडच प्रकर्ण पाडाव या उमेदीत आहेत दुसरा मजकूर कुरबेटाहून आताच गडी आला कोटबागीस इंग्रज बाहादूर याकडील पलटणचा मुकाम आहे त्यास जमाव पोक्त दिसण्यात परंतु बहुत करून बाकर फार आहे. रात्रो हुजूरची स्वारी

+ + + (अपूर्ण)

लेखांक ११६ तारीख २३-९-१८२७

श्री

रु. नं. २

अ. नं. ५१४

पौ छ २ रा।वल सन
समान आसेरीन

श्री त्र्यंबुलीचे

सेवेशी संताजीराव घोरपडे सेनापति व रताजीराव चवाण हिंमतबहादर व आबाजी सदाशिव कृतानेक सेवेशी विज्ञापणा ता। छ १ माहे रोावल सायंकाल दोन तास दिवस पावेतो स्वामीचे कृपाआवलोकने करून मुकाम शिरढोण येथे सेवकाचे वृत यथास्थित असे सेवेशी विज्ञापणा येसी श्री--------पंचमीस तोफा व कदीमबिदेसी व कदीम पतके घेऊन येणेविसी आज्ञा आज्ञे प्रमाणे येत आहो करवीराहून तोफा व हुजूरची स्वारी होणार म्हणोन परभारे करवीरहून येणार याणी वर्तमान सांगितले परंतु आज्ञापत्री आज्ञा जाहाली नाही याजकरितां आपाजी नलगे व कृष्णाजी शिंदे हुजूर यासी मुदाम शेवेशी पाटविले आहेत विनंती करतील उदैक इंदुवारी सायंकाळचे प्रहर दिवसास येथून आज्ञे प्रमाणे कूच करून रुकडीचे मुकामास येतो शवेशी निवेदनार्थ विनंती लिहिली असे शेवेशी श्रुत होय हे विज्ञापणा.

लेखांक ११७ तारीख २५-९-१८२७

श्री

रु. नं. २

अ. नं. ४१२

पौ छ ४ रबिलावल सन समान आसरीन

शेवेसी विनंती सेवक आनंदराव त्रिंबक व बाळकृष्ण बाबूराव मुा। लष्कर नजीक रक्षी सिरगाव कृतानेक विनंती विज्ञापना ता। आश्विन शुा। ५ मंगळवार पदे स्वामीचे कृपाकटाक्षावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान यथास्तित असे विज्ञापना प्रार्थना ऐसीजे परवाचे रोजी गुरुवारी इ रोजी मूर्त्या यासी आणवणेस स्वार दोन असामी गेले तो न येता धटाई केलेस मागून बंदोबस्त करावा ऐसी याचेना जाहालेचे वर्तमान समजताच यमकनमरडीस सूचना पाा परंतु गेलेले स्वारास पाहारात दिले असे वर्तमान अस्तमानी आले काल प्रातकालचे प्रहर रात्रीस तयारी करून कांही तुरुप स्वार व बारचे लोक व सोजर लोक घेऊन मेहरबा कर्नेल साहेब व सर कलक्टर साहेबाकडून मेस्तर इलीयाट साहेब प्रीस साहेब व लष्करचे मेस्तर ली इत्यादी लाहाण थोर तीस सरदार सुमार चार तोफा घेऊन जाऊन बोलणे जे राजश्री रंगराव मुनसी मुनरगी याचे मार्फतीने केल

हत्यार सुधा उतरऊन पार करून ठाणे घातले गावास पेटेस कांहीयेक उपसर्ग नाही मूर्त्या बोलावणे प्रो आला असता म्हणजे तूर्त ठाणेवर जमाव जात नव्हता आपणा नाईक हुकेरी यासी येणेविसी तार्कीद गेली होतीं तो येऊन रुजू होऊन गेला सबब अद्यापि त्या ठाणेस कोणी गेले नाही यमकनमडीचे ठाणे सर करून हेब्बालास आले तेथे जगताप कोण होते त्यानी बोलणेचे देखील पुरसद न धरिता गावाबाहेर निघोन बगल देऊन जात होते मुनसी याजबरोबर दोन स्वार होते त्यासुधा त्रिवर्ग पाटी लागताच फार जलदी करून पार जाहाले इतकेत तुरपाचीही दऊड निघाली परंतु सरदारानी थोपविले खोचरीस आले तेथील तो जमाव पूर्वीच बगल देऊन पार जाहाले यमकन-मरडी वरील तोफ़ा बुनगे व तुरुप स्वार सरदार लोक सुध्दा परत आले पटाल्मचे लोक मात्र + ठेविले दारुगोळी वगैर सामान पोक्त रवाना जा + + दच रवाना जाहाली काल + + विचारीत होते कोणीकडे जातात पाहावे कट-कोलचे ठाणे सोडून देणेविसी काल ताकिदी लिहिल्या आहेत मनोलेकडेसही उपसर्ग होईलसा आहे उदईक येथून कूच खरोषीचे मार्गे सारांष निकस फार दिसतो सर्व राजेश्री रावजी वाकनीस यानी स्वामीचे शेवेसी अर्ज केलाच असेल शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक ११८ तारीख २५-९-१८२७

श्री

रु. नं. २

अ. नं. ४१०

पौ छ ४ रोवल सन समान असरीन

शेवेसी आपाजीराव जाधव जप्तनमुलूख व मानसिंगराव घोरपडे कृतानेक शेवेसी विज्ञापना ता छ ३ माहे रोवल रोज भोमवासर प्रातकाल पर्यंत मुकाम सेरढोण येथे लस्करचे व सेवकाचे वृत्त यथास्तित असे सेवेसी विज्ञापना ऐसीजे रोजगुदस्ता आठवे तासी राजश्री सेनापति व हिंमतबहादर यास × × करिता स्वार देऊन रवाना केले आणि आम्ही तलाशेस इचलकरंजी नजीक गेलो आणि आगाडीस इचलकरंजीचे पश्चिमेस स्वार पाचपंचवीस पाठविले होते आतूनही कांही पायदल व कांही स्वार येऊन गोलागोली जाहाली त्यात त्यानी तोफेचे गोलेही दाहापाच टाकिले कोणास काही लागले नाही पेंढार यानी सहा गुरे आणिली त्यापैकी दोन रेडे व एक पाडा पळून गेली बाकी तीन राहिली चार सहा घटका तलावा करून दोन घटका रात्री मुकामास आलो तलावेस जाणेचे पूर्वी पेंढारी टाकवडेनजीक उभे केले होते त्यातून तीन आा अगाडीस रोज सोडवणेकरिता जाऊन गुरावर तोंड टाकिले तेव्हा इचलकरंजीकराकडील स्वार त्याचे पाटीवर तुटून त्यातल मालोजी देशमुख हिंदापुरकर याजवर तरवारीचा वार डोईवर मारून माघारे

गेले आतून गोले मारिले त्यातील गोला राजश्री रामाजी घोरपडे याणी आणिला तो शेवेसी पाठविला आहे शेवेसी निवेदनार्थ वि॥ लिहिली असे घोडे बचाऊन आलो शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक ११९ तारीख २६-९-१८२७

श्री

रु. नं. २

अ. नं. ४१५

पौ छ ५ रबिलावल सन समान आशरीन मयातेन व अलफ

शेवेसी धोंडजीराव नाईक निंबाळकर व आबाजीराव जाधव सेवेसी विज्ञापना ता। छ ४ माहे रबिलावल रोज सौम्यवासर रात्र दुसरा प्रहरे पर्यंत स्वामीचे कृपावलोकन करून फौजेस शेवकाचे वर्तमान लष्कर मु॥ नर्जीक बारबाड येथे यथास्तित असे विज्ञापना स्वामी कृपाळु होऊन आज्ञापत्र सादर केले ब मस्तकी वंदून सनाथ जाहालो आज्ञापत्री आज्ञा आज + + तुम्हाकडे बातमी व जाहीर + देणे करिता + + तेथे स्वार आल्यास जाहीरनामा न घेता परत निघोन आपले लष्करास जावे म्हणोन त्याजला सांगोन स्वारास लावून देणे लष्करात घेऊन न येणे ऐसी आज्ञापत्री आज्ञा जाहाली ऐसेयासी आज्ञेप्रमाणे स्वारीस लष्करातच घेत नाही त्यानी कांही आग्रह केल्यास स्वामीचे शेवेसी विनंतीपत्री विनंती लिहितो पेस्या पैकी राजेश्री माधवराव घाटगे व कृष्णराव जगताप वगैरे कोणी आल्यास स्वारसुधा ठेऊन घेणे पायदल लोक झाडेनिसी माधवराव घाटगे यासी येकटे हुजूर करवीरास रवाना करून देणे येसी आज्ञापत्री आज्ञा जाहाली येसीयासी मशारनिले परभार गेले हे वर्तमान राजश्री बालाजी सिवदेव टाणे हलकर्णी व सोलापूर याजकडून गडी राजेश्री हिंमतबहादर याजकड गेला त्याने वर्तमान सांगितलेवरून स्वामीचे शेंवेसी विनंती लिहिली आणखी स्वार व पायदळ लोक ठेऊन घेऊन स्वार लष्कर मु॥ ठेऊन घेणे आणि पायदळ लोक करवीरास रवाना करून देणे येसी आज्ञापत्री आज्ञा जाहाली आज्ञे प्रा॥ जे येईल ते ठेवून घेऊन स्वार लष्कर मु॥ ठेऊन घेतो आणि पायदळ लोक स्वामीचे शेवेसी पाठवितो लष्कर मुकामी स्वार व पायदळ लोक जमाव आहे तो स्वामीचे सर्व निवेदनात आहे इंग्रज बहादर यानी गैरजाबिता आरंभिल तशात शेवकानी गोली मारू नये ऐसी आज्ञा एसीयासी स्वामीचे ध्वज सेवकाचे ताबिनत आहे त्याचे संरक्षण + सेवकाचा प्राण सदका आहे परंतु सेवकाचा बदनकश व येसीयासी स्वामी कृपाळु होऊन इंग्रज याचा गैरजाबता वर्तणूकेस आम्हाकडून आगली न होता ध्वज संरक्षण होणे आणि सेवकाचा बदनकशा न व्हाव ऐसी आज्ञा करणार स्वामी समर्थ इंग्रज बहादर नदी उतरून मार्गाने सोयीचे वाटन गेलेस उत्तम आणि नदी उतरून गैरजाबिता आरंभिलेस स्वामीचे सेवेसी विनंतीपत्र

पाठवणेस अवधी नाही ते समयी गोळींचे कारण प्राप्त ऐसीयासी दारुगोळी पाटवणेची आज्ञा करणार स्वामी समर्थ मोज व बारवाडचे संगमास नदीस उतार जाहाला आहे शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक १२० तारीख २८-९-१८२७

श्री

रु. नं. २
अ. नं. ४१३

पौ छ ६ रोवल सन समान अशरीन

शेवेसी अर्जी सखोजी म्हाउम हुजरे व रामचंद्र सेट पाथरे ठाणे चिकोडी दोनी कर जोडून चरणावरी मस्तक ठेऊन विनंती विज्ञापना ऐसीजे तागायत छ ६ माहे रोवल पावतो सेवकाचे वृत्त यथास्तित असे विज्ञप्ती प्रार्थना आजी गुरुवारी प्रहर दिवसास इंग्रज बहादर याच मुकाम करोसीच्या आलीकडील अंगास उतरल आहे अजमास दोनएक हजार येऊन उतरल आहेत आणखी मागून वरचेवर येतच आहेत मागाहून काय वर्तमान होईल ते वरचेवरी शेवेसी विनंती लिहितो शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक १२१ तारीख २९-९-१८२७

श्री

रु. नं. ३
अ. नं. ७१३

पौ छ ११ रबिलावल सन समान आशरीन

शेवेसी अर्जी बाबाजी सुर्वा हुजूर ठाण कडकोल सेवेसी विज्ञापना ऐसीजे तागायत छा ७ माहे रबिलोवल पावतो सेवकाचे व ठाण मजकूरचे वर्तमान यथास्तित असे शेवेसी विज्ञापना ऐसीजे ठाण मजकुरच वर्तमान तर छ ४ रोज बुधवारी तोरगलकर चालून स्वार दोनअडीचसेहे नरगुंद व रामदुर्ग व बनूरकर व मुधोळकर ऐस जमवून व लोक दीड हाजार पर्यंत जेजाला घेऊन चालून आले तो ठाण मजकुरचा जमाव ठाणातील बंदोबस्त राखून पुढ दोनतीनचारशेह + जमाव पुढ जाऊन आमची व त्याची गाटी पडोन हातमिसली जाली तेव्हा त्याजकडील जमाव फार तेव्हा आम्हाकडील लोकाची खराबी फार जाहाली त्याजकडीलही खराबी अजमास स्वार व लोक जाया फारच जाहाले घोडा एक पडिला व लोकही जाया जाहाले आम्हाकडील वीस असामी जखमी जाहाले पाच सात अ॥ ठार जाली नंतर विहीर पाणीयाची होती ती धरली तेव्हा आमची निकस धरून चालून घेऊन उटवून पिटोन काडिले मागती चालून जाऊन त्याची माग सारून

उटवोन लाऊन दिले तेव्हा माघारी आपल मुरद उचलोन घेऊन गेले येथ जमाव तळीर-कर देसाई व येरगटेकर जमाव वगैरी कालेकर नाईक ऐस ठाण मजकुरी आहेत त्यास राजश्री वीरभद्र आपा देसाई देशपांडे नाडगोडा हे येथ उपयोगी आहे निवेदन व्हाव त्याजलाही आज्ञापत्र असाव म्हणजे आमचे उपयोग आहे येविषी सर्व साहेबाचा आसीरवाद आहे तो कालजी काही नाही येविसी जी आज्ञा होण ती होऊन राजश्री गणपतराव सरनाईक यास आज्ञा होऊन सत्वर रवाणगी करून देणार धनी मायबाप समर्थ असत शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना मुरगोड तालुकेचा राजश्री भिवराव देशपांडे हे तोरगलकर याजकडे मिलाला आहे तो नाश करीत आहे निवेदन व्हाव. सेबेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक १२२

तारीख २९–९–१८२७

श्री

रु. नं. २
अ. नं. ४१४

पौ छ ७ रोवल सन समान आशरीन

शेवेसी विनंती सेवक सदासिवराव रामचंद्र कृतानेक सेवसी विज्ञापना ता छ ७ रोवल पावेतो स्वामीचे कृपेवलोकन करून सेवकाच वृत यथास्तित असे विज्ञापना ऐसीजे काली भ्रगुवारी प्रहर दिवसास सेकेमालावरील साहेब खानवडीच्या व बेडकीहलच्या मधी मालास येऊन उतरला ते वर्तमान टाकोटाक लस्करात पोचविल नंतर संध्याकालचे तास दिवसास लस्करातून दोन साहेब आत किलेत येणेकरिता आले तोच बाकीच्या लोकानी आडविले नंतर लष्करात सरदार करणेल साहेब म्हणोन आहे त्याचा हुकूम आत जाऊन पाऊदेत असा आणून किल्यात येऊन सवाई बुरुजावरी चढून दुर्भिण लाऊन बारवाड मुकामच लस्कर पाहिल लस्कर घोडी पाचशेहे व बार पांचशे येकूण हजार शिवाय केचरा एक हजार ऐस आहे आजी मोकाम आहे शेवेसी निवेदनार्थ विनंती लि॥ आहे शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक १२३

तारीख १–१०–१८२७

श्री

रु. नं. २
अ. नं. ४१६

छ ९ रोज इंदुवार रावल सन समान आसेरीन.

शेवेसी अर्जी जिजाजीराव खानवलकर व आबा निकम हुजूर कृतानक शेवेसी

विनंती विज्ञापना ता। छ ८ माहे रबिलावल पावेतो साहेबाचे कृपेकरून सुखरूप असो विसेस इंग्रज बहादर याजकडील कोणी आला असता कैस करावयाचे ती आज्ञा व्हावी आज्ञे प्रमाण वर्तणूक करू त्यास धुडवाव किंवा ठाणी स्वाधीन करावी याची आज्ञापत्री आज्ञा सत्वर व्हावी आणि कुरुंदवाडचे मु॥ पटवर्धन याची फौज घोडदल एक हजार व पायदल एक हजार कुरुंदवाडकर याची दोन हजार येकून हाली चार हजाराचा जमाव जाहाला आहे आणि राजश्री चिंतामणराव आपा याजकडील दोन हजार फौज उदईक येणार आहे कलाव इकडील मजकूर जबानी नागोजी हुजूर विनंती करतील शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक १२४ तारीख २-१०-१८२७

श्री

रु. नं. २
अ. नं. ४१७

पौ छ १० रोवल सन समान आशरीन

सेवेसी विनंती शेवक व्यंकटराव बळवंत ठाणे बागेवाडी कृतानेक विज्ञापना ता। छ १० रोवल पावेतो स्वामी कृपेकरून सेवकाचे वर्तमान यथास्तित असे सेवेसी प्रार्थना ऐसीजे इंग्रजाचे लष्कर कोटबागीहून करोसीस गेले तेथून शिरगावचे मुकामी गेले ते दिवसी आमचे चकती व चपरासी लोक ठाणेस येणेविसी तयार जहाले इतक्यात राजश्री आनंदराव आणा व बाळ कृष्णराव नाना वकील यास वर्तमान समजले त्यानी लोक राहाते करून चकती आम्हाकडे पाठवून दिली आणि जुज्यापा पाटील बागेवाडीकर यास कैद करून ठेवणेविसी सांगतले चकती प्रमाणे न करावे तर कसे पडते न कले यास्तव जुजापास आणोन बसऊन ठेविल्यासारिखे केले आहे आणि सेवेसी विनंती लिहिली असे चकतीची नकल आलाहिदा हुजूरचे शेवेसी निवेदनार्थ पाटविली आहे येविसीची आज्ञा येईल त्याप्रमाणे करितो सिरगावचे मुकामाहून आज पुढे गेलेचे वर्तमान आहे कोटबागीचे ठाणेच्या भिती नीट करून तेथे दोन साहेब व दोनशेहे लोक आहेत आज बेलगावाकडून पंधरा वीस तोफा थोरले पल्याच्या व दोन आडिचशे लोक कोटबागीचे नदीपलीकडे आले असे वर्तमान आहे येथून आणखी बातमीस पाठविला आहे तोफा वगैरे किती आहेत हे खास वर्तमान येईल त्या प्रमाणे मागाहून शेवेसी विनंती लिहितो शेवेसी श्रुत होणेकरिता लिहिले असे येथील ५।४ वाणी खेलेखोर आहेत दोहोचे समजुतीचा जाबसाल एकदोन स्थलात टरला असता आजपर्यंत आले नाहीत चार महिने होत आले एक पैसा वसूल हाती लागू दिला नाही असा खेळ करून हली इंग्रज याचे लष्करात फिर्यादीस जाऊन नेट लाविले आहे येविसी जसी आज्ञा येईल त्याप्रमाणे करू शेवसी श्रुत होय हे विज्ञापना-

लेखांक १२५ तारीख २-१०-१८२७

श्री

रु. नं. २

अ. नं. ४१९

पौ छ १० रोवल सन समान आशरीन

शेवेसी आपाजीराव जाधव जप्तनमुलूख व मानसिंगराव घोरपडे कृतानेक शेवेसी विज्ञापना ताा छ १० माहे रोवलपावेतो मु॥ लष्करनजीक रुकडी येथ फौजसुद्धा सेवकाचे वृत यथास्तित अस विज्ञापना ऐसीजे छ मजकुरी मौजे सिरढोण येथून कूच करोन येतसमयी झाडेनिसी बुनग शाहापूरच मार्गांन रवाना करोन सडे स्वारानिसी इचलकरंजीचे तोंडावर तलावेस उभे राहिलो तो इचलकरंजीकडील कांही स्वार व पायदळ पुढ येऊन आाकडील स्वाराची व त्याजकडील स्वाराची गोळागोळी होऊन जखमी जाहाले त्याची यादी आलाहिदा हुजूरचे सेवेसी पाठविली आहे गोंळागोळी होऊन इचलकरंजीकर याजकडील दोन आा भलेलोक ठार जाहाल त्याजपैकी घोडा एक जरदा पाडाव करोन आणिला एक घोडा ठार जाहला व एक त्याजकडील लोकात माघार गेला भले लोका पैकी बंदुक एक आणली आणि त्याजकडील पायच लोकापैकी दोन तीन आा जखमी जाहाले फौजसुद्धा दोनप्रहरा येऊन मु॥ केलो हुजूरोन ठाणे शिरोळ पायदल पांचशेहे चिरंजीव राजश्री सयाजीराव याजबराबर देऊन ठाणे मजकुरी पाा देणेची आज्ञा आशे प्रमाणे पांचशेहे लोक देऊन पाटवाव परंतु लोक निवडल नव्हत सबब चांगल निवड करण्यातून दोनशेहेची भरती देऊन पाा आहेत शेवेसी निवेदनार्थ वि॥ आहे शेवेसी श्रुत होय ही विज्ञापना.

लेखांक १२६ तारीख २-१०-१८२७

श्री

रु. नं. २

अ. नं. ४२०

पोा छ १० रबिलावल भोमवासर सु॥ समान आशरीन मयातेन व आलफ

सेवेशी आपाजीराव जप्तनमुलूख व मानसिंगराव घोरपडे कृतानेक शेवेसी विज्ञापना ताा छ १० माहे रबिलावल रोज भोमवार अस्तमान मु॥ लस्करानजीक रुकडी येथ फौजसुध्दा शेवकाच वृत्त येथस्थित अस विज्ञापना ऐसीजे श्रीमंत राजेश्री चिंतामणराव आपा वगैरे पटवर्धन फौज अदमास दोन हजारपर्यंत कोथळींच उतारास उतरून गावचे नजीक मुकाम केला आहे आणखीही वरचेवर उतरत आहेत ऐस वर्तमान दानोलीहून राजेश्री सरलष्कर याजकडील भले लोक पागची घोडी घेऊन आल त्यानी सांगितलेवरून हुजूर सेवेसी विनंती लिहिली आहे सेवेसी निवेदनार्थ विनंती शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

को. घ. ६....७

लेखांक १२७

तारीख ३-१०-१८२७

श्री

रु. नं, २
अ. नं. ४२१

पौ छ ११ रोावल सन समान आशरीन

शेवेसी आपाजीराव जाधव जसनमुल्क व मानसिंगराव घोरपडे कृतानेक शेवेसी विज्ञापना ता छ ११ माहे रबिलावल रोज सोम्यवासर मुकाम लस्कर नजीक रुकडी येथे सेवकाचे व लस्करचे वृत्त यथास्तित असे शेवेसी विज्ञापना ऐसीजे आळत्याहून राजश्री गंगाधरपंत याचे बातमी वर्तमानाचे पत्र आले तेच शेवेसी पा आहे निवेदन होईल दऊ व धनाजी पांचच्यार + + + + +

सडेनिसी जाऊन ठाणी उटवितो त्याजकडील इचलकरंजीस आला आहै जमाव थोडा आहै तरी आज्ञा सडी फौज तयार करून दबा घालून उद्योग करितो शिरढोण मुकामी खर्चास सात हजार रुपये पाटविले होते त्याची वाटणी राजश्री आबाजी पंत दि॥ लस्कर यानी करून गेले त्यास आठ दिवस जाहाले खर्चाविसी गवगव पडत आहे त्यास लोकाचे खर्चास पाटवणेची आज्ञा करणार स्वामी समथ शवशी श्रुत होय है विज्ञापना

लेखांक १२८

तारीख ३-१०-१८२७

श्री

रु. नं. २
अ. नं. ४२३

पौ छ १२ माहे रबिलावल सुा समान आशरीन मयातेन व आलफ
रोज गुरुवार प्रातकाल

शेवेसी आपाजीराव जाधव जसनमुल्ख व माणसिंगराव घोरपडे मुा लष्कर नजीक रुकडी कृतानेक शेवेसी विनंती विज्ञापना ऐसीजे ता छ ११ माहे रबिलावल दोनप्रहर रात्रपर्यंत साहेबाचे कृपावलोकने करून फौज सुद्धा; शेवकाच वृत्त यथास्तित असे विज्ञापना ऐसीजे हुजूरून पायदळ झाडेनिसी पा देणेची आज्ञा जाहाली होती त्याप्रमाणे झाडेनिसी पाटवावे परंतु मौजे आळत येथ गलीमाची फौज येणार म्हणोन बातमी आली त्याजवरून दीडशेहे पायदळ पा दिले आहे बाकीच झाडनिसी हुजूरचे सेवेसी पाटविले आहे तेही पायदळ पाटवून देणेची आज्ञा जाहालेस हुजूरचे शेवेसी मागाहून आणवून पा देतो निवेदनार्थ विनंती लिहिली आहे वक्त पडल्यास दारूगोली मागतात फौजत दारूगोली नाही याजकरिता विनंती लि॥ आहे थोडीबहुत दारुगोली पा देणेची आज्ञा व्हावी शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक १२९ तारीख ५–१०–१८२७

श्री

रु. नं. ३

अ. नं. ७१४

पौ छ २१ माहे रबिलावल सुा समान असेरीन मयातेन व आलफ रोज मंदवार

श्रीमन्महाराज राजश्री छत्रपति स्वामी

स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक व्यंकटराव नलवडे हावलदार कृतानेक शेवेसी विज्ञापना ताा छ १३ माहे रबिलावल पर्यंत स्वामीचे कृपावलोकनेकडून सेवकाचे व सुभा मनोलीच वृत यथास्तित असे शेवेसी प्रार्थना ऐसीजे इकडील मजकूर रोज गु॥ छ १२ रोज बुधवारी कसबा कडकोळावर तोरगलकर जमाव पायदळ व स्वार व एक तोफ याप्रमाणे सरंजामानिसी येऊन पेठेत कोतवाल चावडीपर्यंत मारीत आले त्याचे तोफाचा आवाज येथे ऐकतेक्षणी अस्तापदार्थी पो राजश्री बाबाजी भोसले हुजूरे व इंद्रसिंग जमादार याजबरोबर कांही जमाव देऊन कुमकेस पाटविले तेव्हा सुबाहून कुमक आली ही तोरगलकरानी पाहून धास्त खाऊन माघारे निघाले तेव्हा आतून कडकोळ येथील लोक व चार देसकतीचे लोक बाहीर निघोन मारामारी चांगलीच जाली तेव्हा तोरगलकराचा मोड होऊन तोफानिसी जमावासह माघारी निघोन गेले इकडे सिलसिल्यामुळे कडकोळास कुमक करणे व येथील बंदोबस्तास लोक पाहिजेत त्यास जदीद लोक येऊन त्यास पोटगी देणेविसी हुजूरचे सेवेसी मामलेदार आहेत त्यास आज्ञा होऊन सुभा आज्ञापत्र सादर करणार धनी मायबाप समर्थ आहेत तोरगलकरास इंग्रजबहादर याचे तालुकेतील संवदती वगैरे गावगन्नाचे लोकाचा जमाव करून वरचेवर कुमकेची पुरवणी चालली आहे स्वामीस श्रुत व्हाव सेवकास सालाबाद दसरेची सनग दोन हुजूरून येत असतात आज तीन साल येत नाहीत स्वामी कृपाळु होऊन देणार धनी समर्थ आहेत शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक १३० तारीख ६–१०–१८२७

श्री

रु. नं. २

अ. नं. ४२२

पौ छ १४ रोवल सन समान आशरीन

शेवेसी आपाजीराव जाधव जप्तनमुलूख व मानसिंगराव घोरपडे कृतानेक शेवेसी विज्ञापना ताा छ १४ माहे रबिलावल रोज मंदवासरे पर्यंत स्वामीचे कृपावलोकन करून

फौजेचे व सेवकाचे सकलवृत्त यथास्तित असे विज्ञापना यसी स्वामी कृपाळु होऊन सेवकास आज्ञापत्र सादर जाहल ते मस्तकी वंदून सनाथ जाहालो आज्ञापत्री आज्ञा जे फौजचे कूच करून वडणगे मुकामी जाणेची आज्ञा आज्ञेप्रमाणे कूच करून ठाणेचे मुकामास गेलो शेवेसी निवेदनार्थ विनंती शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक १३१ तारीख ८–१०–१८२७

श्री

रु. नं. ३
अ. नं. ७३२

पौ छ २० सोवल सन समान आसरीन

शेवेसी अर्जी बाबाजी सुर्वा हुजूर व गणपतराव जाधव सरनाईक ठाण कडकोल सेवेसी विज्ञापना ऐसीजे तागायत छ १६ माहे रबिलावल पावेतो शेवकाच व ठाण मजकुरच वृत्त येथास्तित असे सेवेसी विज्ञापना ऐसीजे ठाण मजकुरचे वर्तमान तर आश्विन शुद्ध ५ बुधबारी प्रातःकाली तोरगलकर याची व आमची ल्ढाई जाहाली ही विनंती पेशजी लिहिली आहे त्याप्रो निवेदन जाहाल्च असल त्यानंतर आश्विन शुद्ध सप्तमी गुरुवारी निरोप घेऊन आलो ते बारवाडास राजश्री जिवबा नाना हावलदार
७
यानी मार्ग चालना याजमुळे मध्य दोनप्रहर पर्यंत ठेऊन घेतल नंतर निरोप घेऊन रातबिरात करून कडकोलास रविवारी येऊ पावलो नंतर आश्विन शुद्ध १२ सोमवारी तोरगलकर ठिकाणहून उठोन जमावसुद्धा दोन अडीच हजारापर्यंत लोक व स्वार तीनसेह पर्यंत जमऊन पूर्वस जिवापूर तोरगल कडकोल ऐसी सिववर तळ आहे तेथ मुकाम करून बुधवारी प्रातःकाली सूर्योदय येऊन समागम तोफा दोन घेऊन तोफा घेऊन चाल्डन गावानजीक येऊन तोफा लाऊन मार लाविला तो दोनप्रहरपर्यंत त्याची आमची गोळागोळी जाहाली नंतर त्यानी हला केली ते समयी आम्ही लोकसुद्धा राखीत राखीत आश्रा धरून ल्ढाई होत होत श्री मरीमाचे देवळापर्यंत माग सरून आलो रांग लोकासी बकसीसी × × देतो ऐस करार करून लोकाची पाटी थापटून टाव्या करून त्याजवर चाल्डन घेतल समयी आम्हाकडील पाच सात आा जखमी जाहले त्याची आमची ल्ढाई पेठतील चावडीपासी जाहाली ते समयी त्याजकडील दाहापंधरा आा ठार जाहाली व जखमी दाहा आा जागेसच राहिली कांही जखमी व मुरद पांचचार घेऊन गेल आम्ही गाव सोडून गोळीची टप्यात त्याची पाटी लागोन त्याची मानखंडन पाटी लागलो नंतर तेसमयी बाणदार त्याच जिलिबीच निशाण पाडाव करून घेतल त्यावरून माग फिरून तोफा सांभाळीत निघोन गेले नंतर दुसरे दिवसी मुरद नेहणेस त्याची मुलमाणस येऊन आपलआपल वळखून घेऊन गेले एक दुसरा जखमी अद्यापि पर्यंत पडले आहेत

सेवेसी श्रुत व्हाव याजकरिता विनंती लि॥ आहे साहेबी खर्चास देणेविसी राजश्री मामलेदार यास आज्ञापत्र दिले व दुसर आज्ञापत्र समक्ष आज्ञे प्रो पावत केल परंतु खर्चाची पुरवणी होत नाही येथील सिलसिला या प्रकारचा तशात आम्हास लोकाच धरण दोन रोज बसल आहे सुभेकडून खर्चास मिळत नाही त्यास राजश्री मामलेदार यास खरपूस ताकीद होऊन एक महिना तरी पदरी पड ऐसे व्हाव येविसी सर्व रक्षण करणार धनी मायबाप समर्थ आहेत तोरगलकर आणखी जमाव वरचेवर करीत आहे निवदन व्हाव वरकड वर्तमान खंडोजी जाधव निवेदन करिता श्रुत होईल येथील लोकानी काजकाम गावगन्नाच व शिबंदीचे व गावच लोकानी काम राजश्री लक्ष्मणराव देसाई व लोक यानी काम केली ती पत्री कोठवर ल्याहावी शक्ती नाही शेवेसी समक्ष विनंती करीन त्याप्रमाण चालविणार धनी मायबाप समर्थ आहेत सेवेसी श्रुत होय ही विज्ञापना.

लेखांक १३२ तारीख २१-११-१८२७

श्री

रु. नं. ३

अ. नं. ७२७

पौ छ २ माहे जोवल सुा समान आसेरीन

मयातेन व आलफ

शेवेशी अर्जी बाबाजी सुर्व हुजूर ठाण कडकोल शेवेसी विज्ञापना ऐसीजे तागायत छ १ माहे जमादिलावलपावतो यथास्थित अस सेवसी विज्ञापना ऐसीजे साहेबी आज्ञोतर पाटविल ते मस्तकी वंदून सनात जाहालो येथील मजकूर तर आजी आठनऊ रोज वेढा घालून बसलो आहे त्यास दुसरकडून कुमक कोटलाई येऊन आमचे समाचारास ठिकाण नाही व खर्चाही एक पैसा नाही आणि मनोली सुभेतील लोक गावगन्नाच होत तेही वरच वर चालल राजश्री श्रीनिवासराव संवदतीहून मनोली सुभेस आला आहेत त्यानी गावगन्न ताकिदी व आम्हास पत्र पा। आहे जे आमच तालुकेतील लोक झाडून पा। देणे म्हणोन पत्र आले त्याजवरून लोक चालल जवळ लोकही नाही आणि आहेत त्यास पोटास नाही वेढा तो नहमी आहे तो नेहमी आहे त्यानी मुकाम येथ करून रोज गोलागोली चालली आहे अशा येथील अडचणी जाणोन सेवसी विनंती पत्र लि॥ आहेत ती सेवसी पावली असतील येथ तो गोली वाजताना मानुस जाया जखमी होत त्यास पैसा द्यावयास ठिकाण नाही ऐस जाहालेस ठाणचा आमचा बच्याव कैसा होईल याजकरिता विनंती लिहिली आहे तर साहेबी कृपालु होऊन खर्चाचा बंदोबस्त व लोक कांही पाटवले तर आधी येऊन पावलेस सेवकास व ठाणेस दम लागल तसच तोरणगटी तोरणगटी तलाव ठाण खाली आहे त्याजवर सेनीवरी प्रातकाल पासून आवसीचे प्रहररात्र पर्यंत लढाई जाहाली तेव्हा येथील लोक व ठाणेतील लोक याची बळकटी पाहून माघार उटोन गेलेत तळावर उतरोन

उदईक आम्हावर येऊन गोलागोळी चाललीच आहे त्यास गनीमाविसी आम्ही गडबड नाही परंतु पोटाचा बंदोबस्त करणार धनी मायबाप समर्थ आहेत तोरणगटेच ल्ढाईत दोन आा ठार जाहाली व जखमी पांचसहा जाले ऐस जखमी पराजी पासून एकंदर माणूस शंभरपर्यंत जाले आहे ऐशा सर्व अडचणी पडिल्या आहेत यास पार करणार धनी समर्थ आहेत येथ समयास बहुत उपयोगी राजश्री वीरभद्र आपा नाईक देसाई सर्वविसी पडत आहे त्यास हुजूरच आज्ञापत्र येक करून पास आम्हास बरे आहे आणि वरकड त्याजविसी विंनतीस राजश्री सरनाईक करतील त्याजवरून सर्व कलल निवदन व्हाव सेवसी श्रुत होय ही विज्ञापना.

लेखांक १३३ पौ तारीख १९–१२–१८२७

श्री

रु. नं. २
अ. नं. ४२४

पौ छ २९ जोवल सु।। ×

शेवेसी विज्ञापना ऐसीजे नागाव्याच्या जिनसास निरख इचलकरंजीकर वगैरे यानी लाऊन यादी राजश्री दिवाण याजकडे दिल्या त्याजवरून निरख लिहून शेवेसी अवलोकना करिता यादी पाठविल्या आहेत निरखा करिता व ज्यानी यादी दिल्या त्याजपासी उत्तर प्रत्योतर करीत आहोच यादी अवलोकन होऊन आज्ञा येईल त्याप्रमाणे करितो विरोजी-मुत्येत येऊन पोचले शेवेसी निवेदनार्त विंनंती शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक १३४ तारीख २०–१२–१८२७

श्री

रु. नं. २
अ. नं. ४२५

पौ छ जार रोज गुरुवार प्रातकाल सुा समान आशरीन

शेवेशी आनंदराव त्रिंबक व बाळकृष्ण बाबूराव सु।। किल्ले पनाळा कृता-नेक साष्टांग नमस्कार वि।। विज्ञापना ता छ १ जार प्रहररात्र पर्यंत आपले कृपेन बृत्त उत्तम असे विज्ञापना ऐसीजे आताच डेरेहून बिन्हाडी आलो तोरगलकर याजकडील जमाव येऊन तोरणकटेस ठाणे घातलेला मजकूर व कटकोळावरी गोलागोली करितात हा मजकूर कानावर घालून दुसरी थैली फेर ताकिदीची इतपर तंटा केलेस कुंपणी सरकारातून बंदोबस्त केला जाईल ऐसी तयार करून राजश्री रामराव जिकडे तोरगलास डाकेवरून निकडीन रवाना करणेस परवाणगी जाहाली मौजे सापडले येथे तोरणकटीतील

लोकास अडथळा जाहला आहे त्यास सोडून देणेविसी मनोलीचे मामलेदारास हुकूम जाहला लुकसानी प्रकरणी रुजू रुजवाती चालिल्या आहेत त्याशिवाय आजी दोनप्रहरा बोलाऊन नेऊन तमाम पर इलाखेदाराचे तालुकेत दरवडे व लुकसानी जाहाली आहे. त्याच्या यादी देऊन जबाब मागितला त्यास त्याचे खते मुद्देची पुरवणी व्हावी लागेल म्हणोन उत्तर केल त्यास ऐसेच जबाब लेहून द्याव म्हणणे पडले त्यास ऐसी तरी दस्ता-ऐवज आज्ञेशिवाय जबाब लेहून कैसा द्याव याजकरिता यादीच्या तालका हुजूरचे शेवेसी पाटवून आज्ञेआन्वये जबाब देतो ऐसे ठरवून यादीच्या तालका त्याहावयासी लाविल्या आहेत उदईक पा। देतो जबाबची आज्ञा त्वरीत आली पाहिजे येथील निकड तो पत्री लिहिता पुरवत नाही चिलोजी बिन जोतजी + + वाडी का। चरण याचे घरावर दरवडा पडला त्याचा पत्ता माग मौजे रेटर येथे आला येविसीची यादी आली ती पा। आहे त्यास यादी अन्वये मौजे मजकुरास आज्ञापत्र उदईक दोनप्रहरा पूर्वी येऊन पोहो-चले पाहिजे कचेरीचे वेळेस गुदरले पाहिजे त्यास सत्वर पा। द्यावे या आज्ञा आसावी. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

तारीख २१-१२-१८२७

लेखांक १३५

श्री

रु. नं. २

अ. नं. ४२६

पौ छ ३ जाकर सु।। समान आशरीन मयातेंन व आलफ

रोज मंदवार तासगाव

शेवेसी विनंती शेवक आनंदराव त्र्यंबक व बालकृष्ण बाबूराव कृतानेक सेवेसी विज्ञापना ता। छ २ जा।र पर्यंत स्वामीचे कृपावलोकने करून शेवकाचे बृत्त यथा-स्तित असे विज्ञापना प्रार्थना ऐसीजे ठाणे कटकोळ तालुकेतील तोरणगटे तोरगलकर यानी केला × × येऊन गोलागोली केली तोरणगटीतील लोक मौजे सोपडलेत अटकाविले हेविसीचा सविस्तर मजकूर राजेश्री गणपतराव माधव सरनाईक यानी सांगितला त्याचप्रमाणे मेहरबा साहेब याचे कानावर घालून तोरगलकरास थैली व सोपडलेकरास ताकीद जाहालेला मजकूर सविस्तर डाके वरून विनंतीपत्री सेवेसी लिहिला आहे त्याजवरून निबेदनात आलाच असेल शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

पौ तारीख २७-१२-१८२७

लेखांक १३६

श्री

रु. नं. २

अ. नं. ४२७

पौ छ ८ जाखर रोज गुरुवार दोन तास रात्र सन समान आसेरीन

विनंती शेवक रामाषा मु॥ कोलापूर कृतानेक सिरसां॥ नमस्कार विज्ञापना ता॥ छ २७ माहे दुसंबरपावेतो आपले कृपेन उत्तम असे यानंतर राजश्री लक्षुमणराव सिंदे सेनाखासकील तोरगलकर याजकडून दरजबाब थैली आले ते इकडे रवाना जाहाली ते बजिनस थैली हुजूर पोहचता करणेस आले त्यातील हासल हुकूमाप्रा॥ कडकोळास लोक वगैरे गेले त्यास वापस आणऊन घेऊन वकीलास हुजूर पाटवणेत येत आहे या अन्वये मा॥र होत करिता कडकोलहून विनंतीपत्र आलेला मजकूर ज्याहीर केली नाही अशास अलीकडे कडकोलाहून वर्तमान काय आले आहेत तोरगलकर याचे लोक वगैरे उठोन गेले कीं नाही याची वर्तमान कलविले पाहिजे सण कदी होत ते लिहिणेचे आहे म्हणून आज्ञा त्यास आज गुरुवारपासून साहावे रोजी मंगळवारी छ १ जेनवारी होत ते दिवसी सन आहे चितास श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक १३७ तारीख १२-५-१८२८

श्रीराम

रु. नं. २

अ. नं. ४३१

तीर्थरूप श्रीमन्महाराज राजश्री बावासाहेब राजे

वडिलाचे शेवेसी

बालके लक्ष्मणराव राजे घोरपडे मुधोलकर चरणी मस्तक ठेऊन साष्टांग दंडवत विज्ञापना तागायत छ २७ शोवल पावतो वडिलाचे आसीरवादे करून सुखरूप असो विशेष आम्ही बडोदेहून येऊन पुणे मुकामी तीर्थस्वरूप राजश्री गोविंदराव बाबासाहेब राजे हे आमच वडील बंदु याचे भेटी घेतली हाली मांजरीचे मुकामास आलो तेथून निघोन मुधोल माचनुराहून धारवाडास जात आहो आमचा सापत्न बंधु दवलतीचे लोभाने वादास प्रवंतणार ऐसे ऐकण्यात आले त्यास येविसीचा अभिमान धरून पेशजी पुणे मुकामी गोरनेर साहेब बहादूर याची व बाबा साहेबाची भेटी करविली ते सेवटास नेहणेस वडील मालक अधिकारी आपणच आहा त्यापेक्षा तपसीलवार लिहिणे नलगे इकडील सर्व मजकूर चिरंजीव येसवंतराव घोरपडे व राजश्री गंगाधर लक्ष्मण हे उभयता विनंती करतील त्या अन्वये बुद्धीवाद निरोपून सांभाले जाहला पाहिजे वडिलाप्रति विशेष काय लिहिणे शेक्तिग नव्हे हे विज्ञापना.

पौ॥ छ ४ माहे जिलकाद सु॥ समान आशरीन मयातेन व अलफ रोज

लेखांक १३८ तारीख ७-८-१८२८

श्री

रु. नं. २

अ. नं. ४३३

राजमान्य राजेश्री खंडेराव नाईक निंबाळकर यासी आज्ञा केली ऐसीजे नागाव्याचा ऐवज इंग्रज बहादर याजकडे द्यावयाचा त्या बद्दल शिरोळ वगैरे गावगना ठाणी घातली आहेत त्यास नागाव्याबद्दल दरसाल पनास हजार रुपये दिले असता शिरोळ वगैरे गावगना ठाणी बाहादर यानी घातली ती सुटून येतात असा ठराव जाहला आहे त्यास दरसाल पन्नास हजार रुपयेची निशाचिटी नागाव्याची ऐवज फिटे पर्यंत राजश्री जोत्याजीराव नाईक निंबाळकर याची द्यावी ऐसे बोलणे ठरवून तुम्हास आज्ञापत्र सादर जाहाले आहे तरी सदरहू निशाचिटीचे काम तुम्ही करून देवावे त्याचे रद्दकर्जास शिरोळ वगैरे बहादर यानी गावगना ठाणी घातली आहेत हा तनखा लाऊन घेऊन रद्दकर्ज होईपर्यंत तनख्याची वहिवाट मशारनिलेनी करावी तनख्यावर हुजूरने रोखापत्र वगैर हरयेकविसी उपसर्ग होणार नाही वरकड मजकुराची आज्ञा राजश्री नारायणराव पंडित राजाज्ञा व जिवराव जाधव हवलदार व अंताजी रघुनाथ गोखले यासी जाहाली आहे आज्ञेअन्वये तुम्हास लिहितील त्याप्रमाणे निशेचे काम पतकरून हुजूर विनंतीपत्र पाठवणे पूर्वीपासून सरकार कामाचा उपयोग तुम्हाकडून होत आला आहे आणि पुढेही सरकार कामाचा उपयोग तुम्हासच करणे प्राप्त आहे हे जाणोन आज्ञापत्र सादर जाहाले आहे तरी या समयी कोणताही अंदेशा न घेता निशाचिटी देण्याचे पतकरून सत्वर विनंती पत्र पाटवणे जाणिजे सुा तिसा आसरीन मयातेन व अलफ रवाना छ २५ माहे मोहरम बहुत काय लिहिणे मोर्तब असे.

लेखांक १३९ तारीख १७-६-१८२९

श्री

रु. नं. २

अ. नं. ५७२

पौा छ १८ जिल्हेज सन सलासीन मयातेन व आलफ

शेवेसी विनंती शेवक रामाजी भिमराव कृतानेक शेवेसी विज्ञापना ऐसीज ताा छ १७ माहे जूनपावेतो धारवाड येथ स्वामीचे कृपाकटाक्ष सेवकाच वृत्त येथास्थित असे विज्ञापना प्रार्थना ऐसीजे स्वामीनी कृपाळु होऊन छ ८ जिल्हेजच आज्ञापत्र रवाना केल ते छ १२ मिनहूस येऊन पोहोचली मस्तकी वंदून सनाथ जाहालो आज्ञापत्री आज्ञा जे सुभानजी निकम हुजुऱ्या यानी कैदेत होता त्यानी लबाडी करून कोतवाल घोडा २ घेऊन गेला त्या विसीईच मजकूर सविस्तर आज्ञाप्रमाणे हजूर अर्ज करून सर ताकीदा

घेऊन मागाहून शेवेसी रवाना करीत असे परंतु सदर निकम मजकूर यास हरतरतुदीने तलाष लाऊन दस्तगीर करणेविसी विश्वासुक लोकास आज्ञा होऊन पता लावतील तेथून धरून घेऊन येणेस अथवा कोणी लोक अडथळा करतील त्याचे जिमेस देऊन इकडून गेले ते लोकसुधा तेथ राहाणेविसी आज्ञा व्हावे इतकीयात हुजूरची सरताकीदाही येऊन हुजूर पोचतील सारावश निकम मजकूर याचे पता जलदीने लाऊन दस्तगीर करावयास आज्ञा निक्षून व्हावी शेवेसी विशेष विनंती करणेस शेक्त नव्हे हे विज्ञापना.

लेखांक १४० तारीख १७–६–१८२९

श्री

रु. नं. २
अ. नं. ५७३

सौ आबई साहेब

पौ छ १८ जिल्हेज सुा
सलासीन मयातेन व अलफ रोज रविवार मु॥ करवीर शेवेसी विनंती सेवक रामाजी भिमराव कृतानेक शेवेसी विज्ञापना ऐसीजे ता १७ माहे जून पावेतो धारवाड येथ स्वामीचे कृपाकटाक्ष सेवकाच वृत्त यथास्तित असे विज्ञापना प्रार्थना ऐसीजे स्वामीनीं कृपाळु होऊन छ ८ जिल्हेजचे आज्ञापत्र रवाना केल ते छ १२ मिनहूस येऊन पोहोचली मस्तकी वंदून सनाथ जाहालो आज्ञापत्री आज्ञा जे हुजूरची स्वारी वाडीस आल्यानंतर सातवेवाडीयात एक दोन रोज अंगात समंधाचा संच्यार जाहाला आज गुरुवारी सातवे तासी अंगात संचार होऊन गत घेतली संचार होऊन बोलला त्याची यादी आलाहिदा सादर जाहाली आहे बाबाजी जगदाळे याची अडगर घोडा एक व माणूस एक सापडला तो मौज चिपरीचे रानातून धरून आणिला आहे त्याची चौकसी मागाहून होऊन जबान्या वगैरे तुम्हाकडे रवाना करणेची आज्ञा जाहाली आहे असी आज्ञा होऊन समद गत घेतल्याची सविस्तर मजकुराचे यादीसुद्धा सादर जाहाली ती पाहून बहुत संतोष पावलो तीर्थस्वरूप श्रीमत सकल सौभाग्यादिसंपन्न वज्रचुडेमंडित मातोश्री साहेब यासी सेमंधाचे उपद्रवाने नानाप्रकारे विकार होऊन वारंवार प्रकृतीस बहुत अयास होत होती ऐसीयास श्रीकृपेन लवकरच परिहार जाहाली याजवरून अत्यत संतोष प्राप्त जाहाल ते शेवेसी विनंतीपत्री विस्तार विनंती करावयास शक्त नव्हे बाबाजी जगदाळे याचा अडगर घोडा येक व माणूस सापडला असल तो जगदाळे मजकुरास धारवाडास हुजूर पाटवणेत येईल त्यासमई सदर घोडा व माणसासमुधा पाठवावेविषी आज्ञा होऊन रवाना जाहाली पाहिजे येविषीयीच मजकूर हजरत खाबंदासही अर्ज करणेत येत आहे शेवेसी विशेष विनंती करणेस शक्त नव्हे हे विज्ञापना.

लेखांक १४१ तारीख ३०-६-१८२९

श्री

रु. नं २

अ. नं. ५७४

पौ छ १ माहे मोहरम सन सलासीन
मयातेन व आलफ

शेवेसी विनंती शेवक रामाजी भिमराव कृतानेक विज्ञापना ऐसीजे ता। छ २७ जिल्हेज मु॥ छ ३० माहे जून पावेतो धारवाड येथ स्वामीचे कृपाकटाक्ष सेवकाचे वृत यथास्तित असे विज्ञापना प्रार्थना असीजे हुजूरची स्वारी श्रीचे वाडीहून करवीरास येऊन दाखल जाहाली व बाबाजी जगदाळे याजबरोबर स्वार व लोक देऊन बंदोबस्तीने धारवाडास रवाना करावविसी आज्ञा होऊन थैलीसुद्धा रवाना जाहाल्याचा मजकूर आज्ञापत्री आज्ञा निरोपिल प्रमाणे शेवेसी हुजूर जाहीर केल आहे जगदाळे मजकूर येथ येऊन पोचताच आज्ञा प्रमाणे हजुरात हजर करून दरजबाब थैली घेऊन सेवेसी रवाना करीत असो सुभानजी निकम हुजऱ्या यास दस्तगीर करणेविसी स्वार व लोकास आज्ञा होऊन रवाना जाहल्याची व हुजऱ्या मजकुर यानी कोणीकडे गेलेची वगैरे खबर अलीकड हुजूर जाहिरेत आल असतील त्यास आज्ञापत्री आज्ञा व्हाव हजरत यजमान साहेबाची मर्जी येथास्तित आहे येविसी विस्तार विनंतीपत्री विनंती करावयासी शेवेसी शक्त नव्हे शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक १४२ तारीख २४-८-१८२९

श्री

रु. नं. २

अ. नं. ५७६

पौ छ २६ माहे सफर सु॥ सलासीन
मयातेन व आलफ रोज गुरुवार संध्याकाळ

शेवेसी विनंती शेवक रामाजी भिमराव कृतानेक विज्ञापना ऐसीजे ता। छ २३ सफर मु॥ छ २४ माहे आगष्टपावेतो धारवाड येथ स्वामीचे कृपाकटाक्ष शेवकाच वृत्त येथास्तित अस विज्ञापना प्रार्थना ऐसीजे किले प्रसिध्धगड उर्फ रांगणा येथील कृष्णाजी नाईक अडवे याणी आबा कोचरेकर व त्याचे बंधु पांडोबास सुधा बेडया घाल्रून सदर आबा कोचरेकर यास जीवानिसी मारिल आणखी कित्येक जुलमजबरदस्ती काम चालविला आहे म्हणोन राजश्री आत्माराम पंत मस्कर यानी हजूर फिर्याद अर्जी गुजराविल्यावरून या मुकदमेचे चौकसीबद्दल सदर कृष्णाजी आडवे यास हजूर आणवणेविसी

हुकूम होऊन दोघ चपरसी रांगणेस रवाना जाहल्यावरून या मोकदमेस हुजूरची आज्ञापत्र रांगणेस पाठवून सदर आडवे मजकूर यास धारवाडास रवाना होणेविसी राजश्री पंत राजाज्ञास पत्र लिहिल असता तेनप्रमाणे रवाना होऊन न येता आडवे याने आमर्यादा करून चपरसीपासी होत ते हजूरचे ताकीदा जबरीने काढून घेऊन बाहीर घातल्याची वगैर कैफीयत हजूर निसबत चेपरसीकडून व हुजूर निसबत जासुदाकडून आल ते व या मोकदमेस परभारे रत्नागिरीहून आल ते देखील कागदपत्र हजूर सुनावणी जाहाल्यानंतर या प्रकर्णास हुजूर व राजेश्री पंत राजाआज्ञास थेली व सदर कागदपत्राची नक्कल सुधा खास सेन होऊन आल ते बजिनस थैली २ व सदर कागदपत्र वगैरे प्रत ८ येणे प्रो शेवेशी पाटविली आस तर आथपर दिनमेक न होता सत्वर सदर आडवे मजकूर यास दस्तगीर होऊन धारवाडास पाठविणेविसी आज्ञा होऊन रवाना व्हावी शेवेसी श्रुत होय ही विज्ञापना. पौ छ २७ माहे सफर मो करवीर सन सलासैन मयातैन व आलफ.

लेखांक १४३ इ. स. १८२८–२९

श्री

रु. नं. ३

अ. नं. ७५६

यादी सु॥ तिसा आशरीन मयातेन व आलफ

१ कोनेरराव गणपत पटवर्धन याची व येसाजी सिंदे याची लढाई मौज भोज येथे जाहाली शके १६९६ कार्तिकमास ते समयी पटवर्दन याच्या तोफा दोन पंचरसी आणिल्या.

२ भवानराव प्रतिनिधि कराडकर व भगवंतराव इटेकर फौज सुधा कसबें वडगांव येथे आलेवर लढाई जाहाली ते समयी हुजूरचे फौजेचा मोड जाहाला शके १६९६ ते समयी हाती दोन व जरिपटका नेहला.

३ रामचंद्र गणेश कानडे मौजे कवटे येथे लढाई जाहाली ते समयी येसाजी सिंदे याचा मोड जाहाला व कोनेरराव पटवर्दन याचा वेढा करवीरास आला सात रोज होता नंतर उठोन गेला शके १६९६ फाल्गुण मास

४ माहादजी शिंदे फौजसुधा येऊन करवीरास वेढा घातला माहे सु॥ ३ तीन शके १६९९ माघमास हेमलंबीनाम संवत्सरे

५ मौजे वाघापूर येथे येसाजी सिंदे याचा मोड जाहाला सके १७०१

१ शके १७०३ चैत्र वद्य आमावशा येसाजी सिंदे याचा काल जाहाला.

१ रामचंद्र परशराम यासी आलते मुकामाहून लडाईत धरून करवीरास आणिले शके १७१५ मार्गसीर्षमासी पुढे परशराम रामचंद्र करवीरास येऊन श्री टेंबलाई नजीक उतरले फौजसुद्धा माघशुद्ध सप्तमीस लढाई होऊ लागली नंतर खंडणीचे बोलने होऊन ओली घेऊन चैत्रमासी माघारी गेले.

१ परशराम रामचंद्र लढाईत ठार झाले सु॥ मयातेन आलफ भाद्रपद वद्य ४ शके १७२० नंतर पुढे रामचंद्र परशराम फौज व पलठणे घेऊन बतिसशिरालेवरी आले तेथे लढाई होऊन माघ शुद्ध सप्तमी रविवारी लढाई चोफाले नजीक जाहाली नंतर वेढा तीन महिने बसून नाना फडणीस याचा काळ जालेवरी वेढा उठून गेला.

१ रामचंद्र परशराम यासी अळते मुकामाहून धरून आणिले शके १७१५ मार्गसीर्स शुद्ध १० स करवीरास घेऊन आले नंतर पंधरा दिवस जोसीराव याचे घरी होते नंतर भवानी कोटी हिमतबहादर याचे घरानजीक होती तेथे ठेविले तेथे दोन महिने सुमार होते स्वारी दो च्यो रोजी जात होती जखमा नीट जालेवर आजपासून कांही एक उपद्रव करणार नाही म्हणोन क्रिया घेऊन तासगावास रवाणगी केली तेसमयी त्यास मौजे दानवाड हा गाव हुजूरून दिला.

लेखांक १४४

तारीख २५-४-१८३०

श्री

अ. नं. ७६०

पुण्यसील लक्ष्मीबाई घोरपडे यासी आज्ञा केली ऐसीजे राणोजीराव घोरपडे याजकडे हुजूरने सरंजामाबदल मौजे निनहाल व हसूर व बोळावी क॥ कापसी व इनामगाव मौजे नागनूर का नूल हे च्यार गाव हुजूरने चालत असता सालगुदस्ता घोरपडे याचा काल जाहाला सबब गाव जप्त जाहाले त्याजवरून तुम्ही हुजूर येऊन विनंती केली जे वडिलाजींत पदरची मनुष्ये व श्री   चा उत्साह याचा खर्च चालला पाहिजे त्याजवरून स्वामी तुम्हावरी कृपालु होऊन तुम्हाकडून नजराणेबद्दल रु॥ २५०० अडीच हजार हुजूर घेऊन सदरहू च्यार गावचे जप्तीची मोकलीक करून देऊन मौजे मजकुरास आलाहिदा आज्ञापत्रे सादर जाहाली असे तरी सदरहू गाव तुम्ही स्वाधीन करून घेऊन स्वामीशेवा करून सुखरूप राहाणे जाणिजे सु॥ सलासीन मयातेन व अलफ रवाना छ १ माहे जिल्काद बहुत काय लिहिणे.

बार

विलस
तिलेख
नावधि
("विलसतिलेख नावधि")

लेखांक १४५ तारीख १८-४-१८३१

श्री

अ. नं. ७७२

यादी राजमंडल दि॥ चिटणीसी सु॥ इहिदे सलासीन मयातेन व अलफ
माहे जिल्काद ऊर्फ अधिक वैशाखमास

छ १ ता॥ छ ३ रोज मंदवार

छ ४ ता॥ छ ५ रोज भोमवासरे

रसानगी सदासिवराव जोसी दिवाण व आंताजी येशवंत श्रीआवदुंबर आंकलखोप येथे दत्तात्रेय याच्या पादुका आहेत त्याचे पूजा व नैवद्य व नंदादीपाबद्दल मौजे भादोल व मौजे खोची येथे जमीन बिघे दाहा कालीकीर्द करार करुन दिल्ही आसे तरी चतुःसीमा करून देऊन सालदरसाल चालवीत जाणेविसी आज्ञापत्रे

५ मौजे खोची का॥ उद्गाव येथे
 १ मौजे मजकुरास आज्ञापत्र
 १ मो खास पागेस आज्ञापत्र
 ———
 २

५ मौजे भादोले ता॥ वडगाव येथे
 १ मौजे मा॥रास आज्ञापत्र
 १ मो वडगाव पागेस आज्ञापत्र
 ———
 २
———
१०

लेखांक १४६ इ. स. १८३०-३१

श्री

रु. नं. २

अ. नं. ४३५

यादी श्रीक्षेत्र करवीर येथील कोटाचे आत रस्ते झाडोन स्वच्छ राखावे याजबद्दल ठराव सु॥ इहिदे सलासीन मयातेन व आलफ एकंदर घर अजमास सुमारी———सुमार
२२००

त्यासी खर्चाबद्दल दरमहा दरघरास घेणेचा शिरस्ता प्रतवार

२३ उत्तम घरे १०० दरघरास पैसे १२ प्रमाणे

३०।॥· मध्यम घर २०० दर घरास पैसे ८ प्रमाणे

३८॥· कनिष्ट उत्तम घर ५०० दर घरास पैसे ४ प्रमाणे

२८।॥· कनिष्ट मध्येम घर ५०० दर घरास पैसे ३ प्रमाणे

३४।॥· कनिष्ट कनिष्ट घर ९०० दर घरास पैसे २ प्रमाणे

———

१५५।॥·

खर्च १ माही रुपये बद्दल मुशाहिरा

२० कारकून असामी दोन

१२ प्रत दरमाहा आ १ रुपये

८ प्रत आ १ दरमहा रुपये.

—

२०

१६ शिबंदी असामी ४ दरमहा रुपये

४ प्रमाणे रुपये.

४ जासूद आ १

१२ शिपाई आ ३

—

१६

१०५ हलालखोर रस्ते झाडणार व केर भरून बाहेर टाकणार

आसामी तीस ३०

एकूण रुपये.

६० प्रत असामी १५ दरमहा रुपये ४

४५ प्रत असामी १५ दरमहा रुपये ३

——

१०५

——

१४१

११ खेरीज मुशाहिरा

९ रेडेस ६ यास वैरण एकमाही दरसरी १॥ प्रमाणे रुपये

२ केरसुन्या व पाट्या

—

११

॥· दप्तर खर्च व रोषनाई खर्च दरमाहा

———

१५२॥·

यासी वहिवाटीची कलमे-

१ सदरी लिहिल्याप्रमाणे महिन्याचे महिन्यास वसूल घेऊन खर्च करावा आणि हिशेब महिन्याचे महिन्यास फंडास गुदरीत जावा

१ दररोज रस्ते झाडीत जावे रस्त्यात लोक केर वगैरे टाकतात कोणास मनाई करू नये

१ वसूल देणेस खलेल केल्यास शिरस्ते प्रमाणे देणेविसी सरकारातून ताकीद केली जाईल.

१ वसूल घेणे तो ठरावा प्रमाण ध्याव जाजती कोणापासून घेऊ नये

१ केर बाहेर भरून टाकणेस रेडेस ६ व त्यास मुठ व गोणते वगैरे जो लागवड खर्च होईल तो उत्पन्ना ऐवजी खर्च करणे

१ जमेत व खर्चात कमजाजती होईल ते समजवीत जावे.

१ कोटाबाहेर पेठेचे थोरले रस्ते आहेत त्याचा तपसील

१ गंगावेसीपासून श्रीचे मठा पावेतो

१ विजापूरवेसीपासून चावडी पावेतो

१ शनवारवेसीपासून आडवा रस्ता शुक्रवार चावडीस जातो तेथेपावतो व शनवार पेठेचे चावडीपर्यंत

१ पद्‌माळेवेसी पासून मंगळवार पेठेचे शेवट पावेतो.

—

४

सदरहू उभे रस्ते पेठेचे आहेत यासी आपलाले दारा फुडून दररोज झाडून रस्ता स्वच्छ राखाव याप्रमाणे घरोघर ताकीद रस्तेत घाण पडू नये असी एकवेल दोनवेल करावी ताकीद जाली असता केर अगर घाण पडल्यास ज्याचे दारापुढे घाण पडेल त्याजपासून च्यार आणे गुन्हेगारी ध्यावी तो मजकूर सरकारात समजाऊन नंतर

१ आपआपले घरची मोहरीच पाणी रस्ततून थोरली मोहरी आहे त्यात मिलऊन द्यावी रस्तेत पाणी सोडू नये याप्रमाणे ताकीद करणे

१ नंदराम गिरी गो। याच मटापासून माहाराजाचे देवालयापर्यंत सोमवार भ्रगुवार दोनवार आठवडा लाऊन कामदार यानी काडवावे ———————— कलम

१ श्री महालक्ष्मीचे अवारात व कासी मणकरणीकडे कोणासही शवचास बसू देऊ नये रात्रंदे रखवाली प्यादे यानी करावी.

लेखांक १४७ तारीख ११-१२-१८३२

श्री

रु. नं. २

अ. नं. ४३७

पौ। छ १९ रजब सन सलास सलासीन मयातेन व अलफ

मु।। कुंभोज

शेवेसी विनंती शेवक जिवराव जाधव हवलदार व नरसिंगराव रामाजी कृतानेक विज्ञापना ताा छ १८ माहे रजब पावेतो स्वामीचे कृपावलोकने करून शेवकाचे बृत यथास्तित असे विज्ञापना प्रार्थना असीजे बेलगावाहून सांडणीस्वार आला त्याजबरोबर पत्र आली त्यात हजरत गव्हरनर साहेब बहादूर याची स्वारी बेलगावाहून पुढे गेली हजरत अंडरसन साहेब बहादूर यासी आता थोड पुरसत जाहाली आहे येक दोन कामे आहेत ती मर्जी पाहून विचारून घेऊन लिहून पाठवितो म्हणून पत्रात मजकूर लिहिला आहे सावंतवाडी इलाखेत बंड जाहाल आहे त्याचे कुमकेस नेसरी वगैरे इलाखेतील लोक गेले आहेत त्यास येविसीचा मजकूर साहेब बहादूर याचे हुकूम सादर जाहाले आहे त्याची तालीक सेवेसी पाठविली आहे त्याप्रमाणे नेसरीकर यासी आता लोक गेले असतील त्यास परत आणवाव पुढ कोणी नेसरी इलखेच लोक तिकड गेल असता याची जबाबदारी तुम्हाकडे आहे म्हणोन नेसरीकर यासी हुजूरून आज्ञापत्र पाटवून बंदोबस्त करणेस स्वामी समर्थ आहा लखोटे दोन आले ते हुजूर पाटविले आहे पाहाता मजकूर शेवेसी निवेदनात येईल इकडोन बेलगाबास पत्रही रवाना केल आहेत शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक १४८ तारीख २७-१२-१८३२

रु. नं. २

अ. नं. ४३८

श्रीमन्महाराज छत्रपति साहेब दाम एकबाल हू
नियाजमंद मेस्तर अंडरसन साहेब बहादूर सर कलक्टर व पोलटक्याल एजंट सुभा धारवाड नियाज मारूज आंके येथील खैरियत रोषन होऊन हमेशा
सादर फर्मावीत असले पाहिजे दरिविला फोंड सांवत तांदुलवाडीकर यानी सांवतवाडीकर दादीबाईस शामिलात होऊन बंडाई माजऊन सांवतवाडीकर राजे खेम सांवत भोसले याचे इलाखा महादेवगड नारायणगड ठाणा घाल्न काटकाई पुरा केलेवरून सरकारचे लेषकर जाऊन याचे तंबी पोहोचाविले आहे सदरी फोंड सांवतानी तेथून पळून गेले आहे याणे महाराज छत्रपति साहेबचे इलाकेत आले असतील तरी याचे बातमी राखून दस्तगीर करणेविसी आमाहाराजाचे इलखेच गावकर वगैरेस ताकीद होऊन दस्तगीर जाहाले मजकूर इनियाजमंदास इतिला दिले पाहिजे याशिवाय सदरी खेरबादल माहाराज छत्रपति साहेब याचे इलाखा नेसरी या दोनच लोक कांहीं गेल आहेस जाहीर होऊन त्याच बंदोबस्ती बद्दल आमाहाराजास अर्ज करणेस छ ५ माहे डिसेंबरास सरकार वकील राम यास ताकीद लिहून पाटविल होते ते अर्ज केल असतील त्याप्रमाणे कोणी

लोक तिकड गेल असलेस माघार आणऊन घेऊन पुढ कोणी जाईनास बंदोबस्त जाहाला पाहिजे जियादा मुदाम बाद.

(सही इंग्रजी)

पौ छ ८ माहे शाबान सु॥ सलास सलासीन मयातेन व अलफ थैलीचे चिटीची तारीख छ २७ माहे दिसेंबर सन १८३२ इसवी.

लेखांक १४९ तारीख ९-१-१८३३

ह

रु. नं. २

अ. नं. ४४०

आजम मेस्तर ज्यार्ज उलीयेम आंडरसन साहेब
बहादूर सर कलकटर व पोलिटीक्याल यजंट सुभा
धारवाड कामयाब बाशंद--- ---------

रफआतव आवाली पनाह मुवदत व आयालत दस्तगाह---------
बाआदज इस्तियाक फिरावा मशहूद आंके दरिविला हुजूर आ रफआत पनाहानी यखलास मजमून बमै थैली छ २७ माहे दिसबंरचे फिरिस्ताद केले ते छ ८ माहे शाबानी रसीद होऊन बयावार मजकूर इजहार जाहाला दरिविला फोंड सांवत तांबुलवाडीकर याणी सांवतवाडीकर आसमत पनाही दादीबाई यासी षामिलात होऊन बंडाई सुरू करून महादेवगड व नारायणगड यास ठाणी घातली बाद एकबाल पनाह कंपणी सरकारचे लस्कर जाऊन त्यास तंबीह पोहचवली दरावख्त फोंड सांवतानी तेथून पलून गेले आहेत त्याणे आ माहाराज छत्रपति साहेबाचे इलखेत आले आसतील त्याची बातमी राखून दस्तगीर करणे बाबे आमाहाराज छत्रपति साहेबाचे इलाखेचे गावकरी वगैरे यास ताकीद फर्माऊन दस्तगीर जाहाल्याचे मजकूर आ आवाली पनाहास इतीला दिल्हे पाहिजे याशिवाय सदरी खटले बदल आमाहाराज छत्रपति साहेबाचे इलाखा नेसरी माहालचे लोक कांहीं गेले आहेस जाहीर होऊन त्याचे बंदोबस्तीबदल आमाहाराज छत्रपति साहेबास आर्जे करणेस छ ५ माहे दिसंबरास सरकार वकील रामापास ताकीद लेहून पाटविले होते ते आर्ज केले आसतील त्याप्रमाणे कोण्ही लोक तिकडे गेले आसलेस माघारे आणऊन घेऊन पुढ कोण्ही जाईनास बंदोबस्ती जाहाली पाहिजे म्हणोन आ बिसालत पनाहानी कलमी केले त्या मवाफीक हुजूर हून गावकरी वगैरे यास हुकूमनामा सादर फरमाविला आहे त्यास फोंड सांवत याचा तलास लागताच दस्तगीर होऊन आ आयालत पनाहास इतीला होईल हुजूर चे इलाखा नेसरी चे लोकाविसी बंदोबस्त होणे बाबे आ रफआत पनाहानी निगारीष केले त्याबमोजीव हुजूर हून राजश्री नरसिंगराव

शिंदे यास आज्ञापत्र सादर जाहाले आहे त्यास शिंदे कोण्ही कोणी लोक तिकडे गेले असलेस वाफस आणऊन घेऊन पुढे कोण्ही लोक तिकडे जाईनासे बंदोबस्त करितील आवाली पनाहास मजमून महसूर होण्याकरिता मरकूम कलम जाहाले असे. सु॥ सलास सलासीन मयातैन व आलफ रवाना छ १७ माहे शाबान जीयादयचै निगास्त आयद आयाम मुदाम बाद.

लेखांक १५० तारीख २-२-१८३३

श्री

रु. नं. २

अ. नं. ४४१

जाहीरनामा सरकार दौलत मदार

हनराबल कंपिनी इंग्रज बहादूर विद्यमान अजम जान साहेब इस्कोयर बाहादूर कालेक्टर व माजिस्त्रेट जिल्हा दक्षीणप्रांत कोंकण सु॥ सलास सलासीन मयातेन व अलफ फोंड सांवत तांबोलकर देसाई याचे मुलगे बंडवाले असामी पाच त्याची नांवनिसी बी तपसील

१ जयराम सांवत बिन फोंड सांवत तांबुळकर देसाई उमर वर्षे अजमासे ३५

१ नाना सांवत बिन फोंड सांवत तांबुळकर देसाई उमर वर्षे अजमासे ३३

१ बाबा सांवत बिन फोंड सांवत तांबोळकर देसाई उमर वर्षे अजमासे ३१

१ आपु सांवत बिन फोंड सांवत तांबुळकर देसाई उमर वर्षे अजमासे २९

१ हणमंत सांवत बिन फोंड सांवत तांबुळकर देसाई उमर वर्षे अजमासे २७

५

सदरहू पांच असामी यानी लोकाचा जमाव मिळवून महादेवगड किल्ला वाडीकर सरकार याचा घेऊन संस्थान मजकुरचे मुलकात बंडावे करून लूट लबाडी आणि दंगा केला तो मजकूर वाडीकर यानी सरकारात जाहीर केल्यावरून त्याचे बंदोबस्तास सरकारातोन लष्कर रवाना केले होते त्याजवर येकायेक गोळ्या घालून कांही लोक जाया केले नंतर सरकार लोकानी हला करून किला घेतला परंतु सदरी लिहिले असामी हस्तगत जाहाले नाही पळून गेले त्यास सदर्हू पाच असामीस जो कोणी दस्त करून सरकारात आणोन हजर करील त्याजला कंपीणी सरकारातून इनाम रुपये २००० दोन हजार दिले जातील जाणिजे छ ११ रमजान मिती माघ शुद्ध १२ शके १७५४ इंग्रजी तारीख २ फेबरवारी १८३३

(सही इंग्रजी)

लेखांक १५१

पौ तारीख १९-२-१८३३

श्री

रु. नं. २

अ. नं. ४४३

श्रीमन्महाराज छत्रपति साहेब दाम येकबाल हू

नियाजमंद मेस्तर अंडरसन साहेब बाहादूर सर कलक्टर व पोलटक्याल येजंट सुभा धारवाड बाद नियाज मारूज आंके नियाजमंदेची खैरियत रोषन होऊन हमेशा फिरिस्ताद होत असला पाहिजे दरविला फोंड सांवत देसाई याची मुले व जयराम सांवत वगैरे ५ असामी यानी सांवतवाडी इलाखा माहादेवगड घेऊन बंड लबाडी वगैर करून बादज सरकार लष्कर गेलेवेळी गोल्या घालून लोक जाया करून फरारी जाहाले आहेत सबब सदरी पाच असाम्यास दस्तगीर केलीया २००० रुपये इनाम मिळतील म्हणून कोकणच कलक्टर साहेब याजकडून जाहीरनामा आला त्याची नक्कल हली पाटविली आहे मुताला फर्माऊन सदरहू असाम्यास धरण्याविसी ताकीद होऊन बंडवाले लोक दस्तगीर जाहालेले मजकुरास सादर जाहाला पाहिजे जियादा बाद

(सही इंग्रजी)

पौ छ २८ माहे रमजान सु॥ सलास सलासीन मयातेन व अलफ थैलीचे चिठीवरी तारीख व सन इसवी लिहिले नव्हते.

लेखांक १५२

तारीख १५-५-१८३३

हुजूर

तालीक

रु. नं. ६

अ. नं. ८७५

आजम मेस्तर ज्यार्ज उलीयम आंडरसन साहेब बहादूर सर कलक्टर व पोलटक्याल येजंट सुभा धारवाड कामयाब बाशंद

रफअत व अवाली पनाह बिसालत व अयालत दस्तगाह—————————

बाआदज इस्तियाक फिरावा मशहूद आंके दरविला हुजूर आ रफअत पनाहानी मकतुब यखलास मजमून बमै थैली छ २ माहे मेचे फिरिस्ताद कले ते छ १७ माहे जिलहेजी नेकवख्ती रसीद होऊन बयावार मजकूर इजहार जाहाला त्याजवरून हुजूर शादमानी हासील जाहाली दरी आयाम विशालगडकर प्रतिनिधीचे दत्तक प्रकर्णी तजवीज होऊन बंबई सरकारास लेहून गेला त्यास सरकारचा हुकूम तारीख २५ माहे येप्रेल सन १८३३ इसवीचा सादर जाहाला कीं हली जो दत्तक जाहाला तो कायम करण्यास अगर दुसरा दतक करण्यास आमाहाराज छत्रपति साहेब मुखत्यार

आहेत कोंकण प्रांती विशालगड इलाखाचा अमल आहे तो जप्तीस होता तो करण्याविसी तेथील कलेकटर साहेबास सरकारचा हुकूम गेला आहे म्हणोन त्याजवरून आमाहाराज छत्रपति साहेबास जाहीर होण्याबद्दल इतलीमास केला आहे म्हणोन आवाली पनाहानी कलमी केले त्याजवरून हुजूर खुषवख्ती हासील जाहाली

असमतपनाही राधाबाई जन भगवंतराव पंडित प्रतिनिधि यास करवीर मकानी आणऊन स्वगोत्री लडका हिवरेतून आणिलेला त्याचे दत्तविधान जातरिवाज मवाफीक छ २१ माहे जिल्हेजी होऊन त्याचे नांव राजश्री अमृतराव भगवंत पंडित ठेऊन हुजूर मौफुसुल प्रतिनिधीचे पदाधिकाराची वस्त्रे दिल्ही आ बिसालत पनाहास मजमून जहूर होण्याकरिता निगारीष जाहाले असे वरकड मजकुराची आज्ञा राजश्री रामराव भिमाजी अखबारनवीस यास कलमी फरमाविले आहे त्यास मुफसील मजमून मोमिईले अखबारनवीस आं अयालत पनाहास मारुज करितील सुहुर सन सलास सलासीन मयातैन व आलफ रवाना छ २४ माहे जिल्हेज जियादयचे निगास्त आयद अयाम मुदाम बाद.

लेखांक १५३

तारीख ५-११-१८३३

श्री

रु. नं. २

अ. नं. ४४५

यादी चोपडे माहाल प्रांत खानदेश हा परगणा नाना फडणीस याजकडे खासगीस होता तो माहाल हिंदुराव घाटगे सरज्याराव यास दौलतराव सिंदे यामी दिला होता तो माहाल इंग्रज बाहादर यास कागलचे मोबदला देऊन कागल तालुका घाटगे यानी सोडून घेतला आहे सु॥ आर्बा सलासीन मयातेन व आलफ छ २२ माहे जमादिलाखर उर्फ आश्विन मास शके १७५५

लेखांक १५४

तारीख २५-८-१८३४

श्री

अ. नं. ७९६

चरण सेवेसी विंनंती सेवक आपाजीराव जाधव जप्तन्नमुलुक कृतानेक चरणी मस्तक ठेऊन विज्ञापना ता॥ छ १९ माहे रा॥खर इंदुवार चवथाप्रहर पर्यंत स्वामीचे कृपावलोकने करून ठाणे यसर्डे (वेसर्डे) येथे सेवकाचे वृत यथास्थित असे विज्ञाप्ती प्रार्थना यैसीजे स्वामीचे आज्ञे प्रो किले मनोहरगडचे बंदोबस्ता करिता निघालो मार्गी प्रकारांतर किलेचा मा॥र यैकणेत आला नंतर येक मुकाम सेवगाव येथे करून मौजे वेंगरुलास येऊन ठाणे यसर्डेस चिठी पाठविली त्याणी जमाव करून बसले आणि किलेस पत्र पाठविले

आहे दोन मु।। येथेच करावे नंतर किलेचा हुकूम येईल त्याप्रो आपण यावे यैसे नरम-गरम बोलणे लाविले आद्यापि त्याची दंडेली जात नाही सबब येकदिवस राहून कांहीं लोक जदीद जमा करून आजी दोनप्रहरी ठाणेस येऊन दाखल जाहलो फंदखोर होते ते पळून गेले ठाणेत लोक घालून बंदोबस्त केला व मुकाम करून राहिलो मागाहून होईल तो मा।।र सविस्तर विनंती पत्री विनंती लिहितो गडकरी याचा पका बंदोबस्त जाहालेविना परिणाम नाही स्वामीचे आज्ञेप्रमाणे वर्तणूक करीन सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

पौ छ २१ माहे रा।।खर सन खमस

सलासीन मयातैन व अलफ.

लेखांक १५५

तारीख २३-१०-१८३४

श्री

अ. नं. ७९९

चरण सेवेसी विनंती शेवक आपाजीराव जाधव जप्तनमुलुक कृतानेक चरणावरी मस्तक ठेवून सिर स।। दंडवत विज्ञापना तागाइत छ १९ माहे जमादिलाकर गुरुवार तिसराप्रहर पर्यंत स्वामीचे कृपावलोकने करून सेवकाचे वृत्त येथास्थित आसे विज्ञाप्ती प्रार्थना यैसीजे स्वामीचे आज्ञेप्रमाणे किले मनोहरगडकरी लोक यासी हुजूरचे अभयपत्र व खात्रीपत्रे पाठऊन ठाणे यसर्डे मुकामी आणविले आज्ञेप्रमाणे सेवकास किला देऊन जाणार उदइक येथून जाणेचा बेत केला आहे येविसी गडकरी याची ही आर्जी हुजूरचे सेवेसी आली आहे वरकड किला जाऊन सविस्तर विनंती लिहितो सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक १५६

तारीख २७-११-१८३४

श्री

रु. नं. ६

अ. नं. ९११

श्रीमन्महाराज छत्रपति साहेब संस्थान कोलापूर सलेमुहू ताला हशमत व अवाली पना खुल्त व मवाल्त दस्तगाहा अजी ज्यार्ज यलियटसाहेब इस्कोहर बहादूर कलेक्टर व माजिस्त्रेट जिल्हा दक्षिण प्रांत कोकण मुकाम रत्नागिरी बाआदज

दरविला संस्थान गगनगड उर्फ बावडा याचा सालसी माहाली हिसा आहे त्याचा मोबदला करण्याचे काम पेशजी तकूब राहिले होते तें पेशजीचे ठरावा प्रमाणे पुरे करावयासाठी संस्थान मजकुराहून छ ७ माहे रजबच्या थैली खता सोबत अजम बिटल दादाजी वकील आले आहेत त्याचे समजुतीने मोबदल्याचा ठराव होत आहे मालूम व्हावे ज्यादा काय

लिहिने रवाना छ २४ रजब मिती कार्तिक वा। ११ शके १७५६ इंग्रजी तारीख २७ नवंबर सन १८३४ इसवी हे किताबत.

सही इंग्रजी

पौ छ २ माहे शाबान सु।। खमस सलासीन मयातेन व आल्फ.

लेखांक १५७ तारीख २३-१-१८३५

रु. नं. ६

अ. नं. ९१९

श्रीमन्महाराज छत्रपति साहेब
दाम एकबाल

नियाजमंद मेस्तर बेबर साहेब बहादूर सरकलकटर व पोलटक्याल येजंट सुभा धारवाड नियाज मारुज आंके येथील खैरियेत रोषन होऊन हमेशा अल्ताफनामा सादर होत असली पो दरिविला आ माहाराज छत्रपति साहेबाच इलाखा तोरगल पेट्यातील होसूरकर देसाईनी होसूरकर प्यादे सणतमा व लक्ष्मणा या दोघास पूर्वीपासून चालणेच सेत न चालविता बाहीर घातल्यावरून तोरगलकर सिंदे सेनाखासकील यानी ताकीद पाठविली असताही धडाई केली सबब त्या प्यादेस दुसरी जमीन देऊन ठेविले असता होसूरकर देसाईने लोकसुद्धा येऊन लक्ष्मणाच लेक ३ तिघे व सणतमाच लेक १ व मायेणाचा लेक १ येणे प्रमाणे पांच असामीस तोडून भारी जखमा केल्या त्यापैकी दोघ षकस वाचणेच डोल नाहीत म्हणून तोरगलकर लक्ष्मणरावकडून खत इनीयाजमंदास आले यावरून इल्तीमास करितो जे देसाई मजकूर सिंदेच पोटसी जमीदार व सिंदेही आमाहाराज छत्रपतीच इलकेदार उभयताच आपसेत कांही खटला असल्यास आ माहाराजास इतल्ला कराव नहून ऐस परभारे तंटा व मुनाकषा चालवणेचा मुनासफ नव्हे करिता ऐसा इनी दुसरेच जिवास अपाय व्हावे याजोग करणेच ताजुब्र आहे याज विषयीची आमाहाराज छत्रपति साहेबानी जलदीने दरियाप्त फर्माऊन याच बंदोबस्त करून पुढ असी आगलीक न करी ऐस तकयुद करिविले पो अगर ऐस न जाल्यास बंबई सरकारास ल्याहाव लागेल जादा बाद

(सही इंग्रजी)

पौ छ. २८ माहे रमजान सु।। खमस सलासीन मयातेन व अलफ. थैलीचे चिटीची तारीख छ २३ माहे जनवरी सन १८३५ इसवी.

लेखांक १५८ तारीख २०-२-१८३५

रु. नं. ६

अ. नं. ९२५

तालीक

साहेब मुश्फेक मेहरबा करम फरयाये दोस्तान
सर्वोत्तम बाबूराव आमात्य हुकुमतपनाह साहेब
सलमुला हू ताआला

आज मेस्तर बेबर साहेब बहादूर सर कलकटर व पोलटक्याल येजंट सुभा धारवाड सलाम आंकी येथील खैरियत जाणून आपली शादमानी कल्मी करीत असले पाहिजे दरिविला आसाहेबानी छ २५ रमजानचे खत इबालाग केले ते पावले बावडे इलाखा मौजे कोकसर हा गाव पूर्वीपासून इनाम आहे तेथील दिवाणी पोलिस वगैरे काम पूर्वीपासून आसाहेबाचे भारफत चालत असता आलीकडे मेहरबान गोविंदराव आमात्य बावडेकर याजकडून उपसर्ग होऊन हली तेथील वहिवाटदार धरून नेऊन कैद करून ठेविले आहेत म्हणोन मोफसील कल्मी केले होते तेविसी सदरहू बावडे इलाखा श्रीमन्महाराज छत्रपति साहेब करवीरकर याजकडे पत्र इलाखेच्या कामास पहिले श्रीमन्माहाराज छत्रपति साहेबास इतिला होऊन इनसाफ जाहाला अगर नाही हे कांहीं आसाहेबाचे पत्रावरून समजले नाही तेथे पूर्वी इतला होऊन चौकशी जाहाली नसलेस इकडे कलविल्याने सरकारातून खता प्रमाणे बंदोबस्त होऊन सल्हा दिल्हा जाईल श्रीमन्महाराज छत्रपति साहेबाकडे दस्तुरा प्रमाणे कलविले असता बंदोबस्त होईल तिकडून न जाहाल्यास सरकारातून केला जाईल आसाहेबास मजदार आहा जियादा लिहिणे काय असे हमेशा खैरियेतनामा पाठऊन दिलखुशी करीत असिले पाहिजे व तारीख छ २० माहे फेबुरवारी सन १२४४ फसली मु॥ सन १८३५ इसवी मु॥ धारवाड

सही इंग्रजी

पौ॥ नकलेची छ २७ माहे जिलकाद फालगुनमास सुा॥ खमस सलासीन मयातैन व आलफ मुा॥ करवीरी राजश्री गणेशपंत मराठे नि पंत मारनिले याजवल नकल होती त्याने केले वरून.

लेखांक १५९ तारीख ५-७-१८३५

श्री

रु. नं. २

अ. नं. ४४९

श्रीमन्महाराज छत्रपति साहेब दाम यकबाल

हू

नियाजमंद मेस्तर बेबर साहेब बहादुर सर कलेक्टर व पोलिटकल एजंट सुभा

धारवाड नियाज मारुज आंके येथील खेरियत राखोन हमेशा आल्ताफनामा सादर होत असी (फाटलें आहे) देसाई तांबुळवाडीकर याचे मुलग्याचा बंदोबस्ती बद्दल कसबा वाडीकर खेम सांवत भोसले याचे इलाखेचे लोक सबब का। सांगवी येथे बसविले असता त्या लोकास याद पडाव म्हणून मनोहरगड येथील हवलदार कारकून नाईकवाडी यानी लिहिले आहेत आणि पेशजे सन १८२० इसवी मार्च महिने छ २० ता स त्यावेळी पोलिटिकल येजंटच कामावरी होते ते असिष्टंट साहेब यानी लिहिले' ते कागदपत्रावरून सांगवी हा गाव दूतर्फीत दाखल आहे तेथील वहिवाट वाडीकर राजा साहेबानी कराव असे साफ लिहिले आहे राजेसाहेबानी आपले इलाखेचे कामास आपण बंदोबस्त करीत असता गडकर यानी ऐस हरकत घेणेचे कारण नाही म्हणोन रत्नागिरी येथील असिष्टंट कलेक्टर काळे साहेब याचे खत आले आहे आशास पेशजी ठरावास हली गडवालेनी आक्षेप विा घेणेचे कारण दिसत नाही वाडीकर यानी आपले तालुकेचा आपण बंदोबस्त करून (फाटलें आहे) मनोहरगडवालेनी इतपर वाडीकर याचे आमलेत दखलगिरी न कराव याजागे मनोहरगडवालेस ता करणेस अमल जाहाला पाहिजे आणि या नियाजमंदेची जबाब सादर जाहाला पाहिजे जादा

बाद.

(सही इंग्रजी)

पौ छ ८ माहे रबिलावल सुा सीत सलासीन मयातेन व आलफ थैलीचे चिटीवरील ता छ १ जुलई १८३५ इसवी.

लेखांक १६०

तारीख ५-८-१८३५

रु. नं. २

अ. नं. ४५०

श्रीमन्महाराज छत्रपति साहेब

दाम यकबालहू

अजनियाजमंद मेस्तर बेबर साहेब बहादूर सर कलक्टर व पोलटक्याल एजंट सुभा धारवाड नियाजमारुज आंकी येतील खैरियेत रोषण होऊन हमेशा अल्ताफनामा सादर होत असिला पाहिजे दरिविला फोंड सांवत देसाई तामुलवाडीकर याचे पांच ५ मुलगे सुधा लोक जमऊन बंडाई करणेची तजवीज कडून आ माहाराज छत्रपति साहेबाचे इा मनोहरगड व सामानगडाकडे आहे त्याचे बंदोबस्ती बदल सांवतवाडीकर राजासाहेब कडून लोक जाणार त्यास मदत होऊन बंडगार दस्तगीर जाहाले पाहिजे म्हणून रत्नागिरी कलेक्टर साहेब कडून खत आले आहे कारण इलतीमास करणेत येतो जे फोंडसांवत व त्याचे लेकसुध्धा बहुत दिवसापासून खटला चालवीत आहेत त्यास दस्तगीर होऊन तंबी पोहोचणेचे आहे त्या लोकास दस्तगीर केलीया बकषीस सुध्धा मिलेल म्हणोन पेशजी

सरकारात जाहीरनामा जाहाला आहे परंतु अद्यापि दस्तगीर जाहाले नाही हल्ली मनोहरगड व सामानगडाकडे आहे म्हणे त्यास धरणेबद्दल सांवतवाडीकराकडील लोकही त्या प्रांतात येणार त्यास बंडगार दस्तगीर होणेसारखे मदत देणेविषयी मनोहरगड व सामानगडवालेस ताकीद जाहाली पाहिजे आणि आमाहाराजाकडून हरदो गडचे इलाखावालेस ताकीद होऊन त्याचे जमाव फूट करवून बंडगार दस्तगीर करवणेस अमल जाहाला पाहिजे ऐसे तंटेचे लोकास हरगीज असरा न मिळता दस्तगीर होणेची मदत होत आहे ऐसी इनियाजमंदास पुरा उमद आहे जियादा बाद

(सही इंग्रजी.)

पौ छ १४ माहे राखर सुा सीत सलासीन मयातेन व आलफ थैलीचे चिटीची तारीख छ ५ माहे आगष्ट सन १८३५ इसवी.

लेखांक १६१ तारीख ६–९–१८३५

रु. नं. ६

अ. नं. ९४६

श्रीमन्महाराज छत्रपति साहेब दाम यकबालहू नियाज मंद मेस्तर बेबर साहेब बहादूर सर कलक्टर व पोलटक्याल येजंट सुबा धारवाड नियाज मारुज आंके येथील खैरियत रोषण होऊन हमेषा अलथापनामा सादर फर्माविल्या पैकी दरिविला विशालगड व भरतगड येथील इलाकेच गावगन्नेत आमाहाराज छत्रपति साहेब्राच व कंपणी सरकारच ऐस दोनी अमल आहे त्याचा मोबदला करणे बाबे पेसजी मरहूम निसबट साहेब बहादूर यानी सरकारचे हुकूम प्रमाणे आ माहाराज छत्रपति साहेब यास इलतीमास केले होते कीं अशास हल्ली बैबई सरकारातून छ. १८ माहे डिसेंबर १८३४ इ. चा हुकूम नियाजमंदास आला आहे जे भरतगड इलाखेच गावात दुतर्फा अमल असलेवरून सरकारच कामास हरकत यावी येक गावात दोघाच हुकूम जाहालेस रैत लोकास बहुत इजा होत आहे यास्तव आमाहाराज छत्रपति साहेब्राच अनुमतेन दूतर्फा अमलच गाव सरकारात घेऊन भरतगडकरास कसबा मसूर हा गाव धर्मादाव वगैर शिवाय मुबादला बेरीज कडील द्याव म्हणून त्याजवरून इलतीमास करणेच ऐसज भरतगड इलाका दूतर्फा अमल असणेच गावगनेच मौजवार अंदाजे बेरीज व त्याचा मोबदला देणेच कसबा मिरत गावचा बेरीज सुद्धा जाणून यादी १ या विषयी कमते बषर्त बंदी होणेच ४ कलमाची यादीसुधा कोकण साहेबकडलील आहे त्यास तालीका करवून यानी कैफीयत आमाहाराज छत्रपति-साहेब्रानी मुजाफा फरमाहून याविषयी आमाहाराज छत्रपति साहेब्राच मनोगत काय असणेच नवजसनामा सादर फर्माविल पैकी येक गावात दोनी अमल असलेकडून हमेशा हरयेक जिकर पडलीन काम सलीस न चालता लोकास तसदीमात्र होतो ऐसे राहाणे परीस

येकतर्फा होऊन मोबादला होणेंच बहुत उत्तम आहे व येकंदरच इरादा प्रमाणे आमाहाराज छत्रपति साहेब यानी कबूल करतील म्हणून इनियाजमंदास पुराऊ उमेद आहे याचे जेंवब सादर जाहाले असता बैबाई सरकारास लिहिल जाईल जियादाच बाद

(सही इंग्रजी)

पौा छ १९ माहे जमादिलावल सु।। सीत सलासीन मयातैन अलफ थैलीचे चिटीची तारीख छ ६ माहे सपटंबर सन १८३५ इा

लेखांक १६२ तारीख ३०-९-१८३५

रु. नं. ६

अ. नं. ९४९

अजम मेस्तर तामस हरवी बेबर साहेब बहादूर सर कलक्टर व पोलटक्याल येजंट सुभा धारवाड कामयाब बाशंद

रफअत व अवाली पनाह बिसालत व आयालत दस्तगाह बाअदज इस्तियाक फिरावा मशहूदआंके हुजूर चिरंजीव राजेश्री भवानराव बाजी घाटगे याजकडे मौजे नसलापूर प्रांत रायबाग हा गाव सरंजामात चालत आहे आणि हुजूर तून राजश्री आपाजीराव शितोले याजकडे मौजे अंकली प्रांत मजकूर हा गाव सरंजामात आहे अशास हरदो गावचे सीमांतर खटले नवीन पडले आहेत फैसल होण्या विसी पेशअर्जी आ रफअत पनाहास हुजूर तून तलदुफनामेच्या थैल्या इरसाल जाहाल्यावरी आवाली पन्हाहाकडून रामचंद्र कृष्ण मामलेदार तालुके चिकोडी यास हुकूमनामे हरोदो गावचे सीमांतर खटलेच्या फैसल वाजबी करणेबाबे सादर जाहाले बाद मौजे नसलापुरकर व अंकलीकर गावकर मोमिइले मामलेदार याचे नजदीक जाऊन दीड महिना राहिलेवरी मवसुफ मामलेदार यानी हरदू गावकरास पंच नेमून दिले असता अंकलीकर गावकर यानी सीमांतर खटले पंचात फैसल करून न घेता आपली जमीन दांडगाईने पेरली नंतर नसलापूरकर गावकर यानी मोमिइले मामलेदार यास आपली जमीन पेरणेविसी विचारिलेवरी मामलेदार मजकूर यानी सांगितले जे मशारुनइल शितोल व आंकलीकर गावकर धारवाड सुबेस गेले आहेत त्यास तुम्ही तिकडे जावे येथे कांही फैसल व्हावयाचे नाही म्हणोन हुजूर रोश्रण जाहाले बईसबब सदहू मजमून आ बिसालतपनाहास जहूर होण्याकरिता निघारीश जाहाले आहे त्यास आ आ आयालत पनाहा कडून मोमिइले शितोले व अंकलीकर गावकर यास ताकीद बालीग होऊन नसलापूरचे जमीनीचा जाबसाल वाजबीचे रुईने इनफीसाल होय ते आ रफअत पनाहानी करावे सु।। सीत सलासीन मयातेन व अलफ रवाना छ ७ माहे जमादिलाखर जियादयेच निगास्त आयद आयाम मुदाम बाद.

लेखांक १६३ तारीख ३-१०-१८३५

रु. नं. ३

अ. नं. ८१६

श्रीमन्माहाराज छत्रपति साहेब दाम

यकबाल हू

अजनियाजमंद मेस्तर तामस हार्वी बेबरसाहेब बहादूर सर कलक्टर व पोलटक्याल यजंट सुभा धारवाड बाद नियाजमारूज आंकी नियाजमंदेची खैरियत रोषन होऊन हमेषा सादर फर्मावीत आसिला पाहिजे दरिविला आमाहाराज छत्रपति साहेब याजकडून पेशजी कितेक गैरवर्तणूक वगैरे घडली त्यावरून याविसी साबक कंपनी सरकारास व आमाहाराज छत्रपतिसाहेबास तहनामा आखेरचा जाहाला त्यात तेथील कारभार चांगलया रीतीनें चालविण्याकरिता येक लायक आसामी कंपिणी सरकारचे पसंदीस जो येईल त्यास नेमावे म्हणोन तहनामेचे आठवे कलमात षरत होऊन त्यास तेथील दौलतीचे कदीम कारभारी मेहरबा नारायणराव पंत राजाज्ञा यास मोकरर करून ठेविले होते त्यानी कामकाज यथास्थित चालवीत होते बादज मरहूम निसबट साहेब बहादूर यानी मेहरबा राजाज्ञा यावरी कांहीं नालिष्ती सरकारास लिहून पाटविली त्यावरून कारभारी याची नेमनूक करणेस व काटण्यास महाराज छत्रपति आसाहेब मुखत्यार आहेत असा हुकूम आला आहे त्यात राजाज्ञा यास काढावे म्हणून कांहीं नाही येसीयास राजाज्ञे याचा कारभार निघाल्यावर आलीकडे आमाहाराजाचे दौलती पैा बहुतक + + वगैरेस गाव व जमीन वगैरे इनाम दिले आहे त्याचा आजमास पाहाता एक लाख रुपये जास्ती नमूद जाहाले आहे इतके भारी इनाम वगैरे देणेचे कोणते कारण आहे कीं ते समजत नाही हली माहाराजाची दौलत बहुत तंग चाल्हत आहे आकदणी जुजवी खर्च भारी आहे त्यात इतके भारी इनाम वगैरे द्यावे म्हणजे बहुत ताजूब वाटते याजकडून दौलत पुढे बखेडा होणेस कारण आहे याशिवाय अलीकडे आमाहाराजाचे इलाखेचें इनामदार व शिक्की जागीरदार वगैरे सरंजाम वगैरेचे सबब लाऊन नजराणा व पटी म्हणून कितेक येवज घेतला व लोकास इजा पोहचली आसे जाहीर जाहले त्यास येथून सल्ला दिल्हा तत्राप खातरेस आले नाही एकंदर हकीकत बंबई सरकारास लिहिले आहे तेथून काय लिहून येईल ते समजत नाही परंतु दौलतीत आसे खलेल व बखेडा न होता काम यथास्थित चालावे याजबद्दल मेंहरबा राजाज्ञे यास पहिलेप्रमाणे मोकरर करून ठेविले आसता त्यानी दौलतींचे कदीम कारभारी हरयेक कामकाज चांगल्या रीतीने चालवितील आसे इजानिब्रास मालूम पडते इकडून सिलाह आमाहाराज छत्रपति साहेबानी खातरेस आणिले आसता सार उत्तम आहे

१ यैन कलम

२ सदरी नवे इनाम पौ बहुत करून जिवराव जाधव व आबा खासबारदार व जोत्याजी-राव निंबालकर आसे तिघास व त्याचे निसबतीचे लोकास जमीन वगैरे दिल्ही आहे अशास सदरी कारभारी लोक आमाहाराजास बदसल्हा देणार व माहाराजाचे दौलतीस आपाय आणनेची तजवीज पाहतील शिवाय त्याची सल्हा यैकल्याने दोलतीस चांगले होणारे नाही आसे बदसल्हा देणारास जवल न ठेविता दूर करुन आवल कलमात घरत केल्याप्रमाणे इजानिबाचा सल्हा खातर-मुबारकेस आणून भेहरबा राजाशे याजकडून कारभार चालवितील असी उमेद आहे.

जियादा मुदामबाद

सई इंग्रजी

पौ छ १० माहे जमादिलवर सुा
सीत सलासीन मयातैन व आलफ
थैलीचे चिठीची तारीख छ ३
माहे आकटवर सन १८३५ इसवी

लेखांक १६४ तारीख ९-१-१८३६

रु. नं. २

अ. नं. ४५१

श्रीमन्महाराज छत्रपति साहेब दाम
यकबाल हू

नियाजमंद मेस्तर डडलोप साहेब बाहादूर आकटिंग सर कलेक्टर व पोलिटक्याल येजंट सुभा धारवाड नियाजमारुज आंके येथील खेरियेत रोशन होऊन हमेषा अलताफनामा सादर फर्माविल पो दरिविला आनियाजमंद करवीर मुकामी येऊन आ माहाराज छत्रपति साहेब याचे मुलाकात घेतली येथील दौलतीच काम पाहिला मुख्य आ माहाराज छत्रपति साहेब याची बेहतरी व्हावी या इरादेन आणि स्नेहभावेन आमचे कल्पणेकडून हल्ली ६ कलमाचा यादी इनीयादनामे बरोबर पाटविले आहे मुलाहिजेत आणून या प्रमाणे केल असता आ माहाराज छत्रपति साहेब याचे दवलतीच कल्याण होईल दवलतीच काजकाम चालवणे बदल मोख्तियार कारभारी कोणास नेमणेत येत आहे त्याच नांव लिहून पाटवणेस अमल फर्माविल पाहिजे नियाज मंदाची सुद्धा आ माहाराजानी खातरेस आणतील ऐसी उमेद आहे यात खुषी आहे जियादच मुदाम बाद

सही इंग्रजी

पौ छ १९ माहे रमजान सु॥ सीत सलासीन मयातेन व अलफ थैलीचे चिटीची तारीख छ ९ माहे जनेवारी सन १८३६ इ थैली राजश्री पांडुरंग भास्कर जोग आखबार नवीस याने आणून गुजरली.

लेखांक १६५ तारीख ९-१-१८३६

श्री

रु. नं. २
अ. नं. ४५२

श्रीमन्महाराज छत्रपति साहेब
यादी

१ श्रीमन्महाराज छत्रपति साहेब यासी समक्ष सांगितले त्याप्रमाणे येथील दौलतीचे येकंदर कामकाज चालिवणेबद्दल येक मोखतियार नेमून ठेवावा.

२ दौलतीत हरएक हुदेदाराचे काम मुक्रर नेमिले असावे व दौलतीसंबधे कागदपत्र सालोसाल तयार होऊन ज्याचे हुद्दा असेल त्यानी कागदावरी सह्या करावे मुख्यानी तपासणी करून आपले दस्तुराप्रमाणे शिके करवावे.

३ दौलतीत जमेचे अंदाजा पाहून पेशजी कंपणी इंग्रज बहादूर याचे सरकारातून तहनामा जाहाला आहे त्याजवर नजर देऊन दौलतीस कर्ज न होता चालवावे.

४ न्यायाधिसी बरहक इनसाफ व्हावे त्याचे जुजरसीविसी मुख्यानी कमीजास्ती जाहल्यास तपास पाहावा.

५ रयत लोकाचे वाजवी आकार प्रमाणे ठरवून त्याचे प्रतिपालण कराव जुलूम जाजती होऊ नये.

६ श्रीमन्महाराज छत्रपति साहेब याचे दौलतीतील कारपरदाज लोक आहेत त्यास अपराधावाचून बाहाली बरतर्फी केले असता त्याणी निष्काळजीने राहाणार नाही आणि महाराजाचे येकनिष्टेने चाकरी होणार नाही ब तारीख ९ माहे जानेबारी सन १८३६ इसवी मुकाम करवीर पौ छ १९ माहे रमजान सुा सीत सलासीन मयातेन व आलफ

लेखांक १६६ तारीख १९-१-१८३६

श्री

रु. नं. २
अ. नं. ५८६

पौ छ ४ माहे शोवाल सुा सीत सलासीन मयातेन व अलफ

शेवेसी अंताजी भवानराव कृतानेक शेवेसी विज्ञापना ता। छ २९ माहे रमजान पावेतो साहेबाचे कृपेकडून सेवकाच व्रत यथास्तित असे विज्ञापना ऐसीजे कृष्णाजी जाधव हा मौजे हेरल ता। ठाण यथ येऊन दावा करितो त्याचा बंदोबस्त करणेविसी आज्ञा आशास कृष्णाजी हा पहिलेपासून असाच फंद करीत फिरतो इंग्रजी तालोकेत देखील तली चिठ्या बांधल्या आहेत तालुकेत तली करणाराचा बंदोबस्त साहेबानी करावयाचा त्याकरिता साहेबास लिहिलेवरुन तालोकेचे मामलेदार यास हुकूमही आला आहे तो नेहमी वागापूर चिंचवाड येथे असतो करवीरातही हमेशा येत आहे असी बातमी पकी आहे स्वामीनी मजवर कृपा करून त्यास धरवाव अगर त्यास अभयपत्र देऊन हुजूर आणवून चवकसी करवावी त्यात जसी आज्ञा होईल तस करीन मी इकडूनही यत्न करीत आहे मला रक्षण करणार स्वामी शिवाय कोण आहे तलीखोराचा बंदोबस्त सरकारानी केल्याशिवये दुसरेचे हातून कसा होईल हे लक्षात आणणार धनी समर्थ. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक १६७ तारीख १६-९-१८३८

श्री

रु. नं. ६
अ. नं. ९५७

श्रीमन्माहाराज राजश्री छत्रपति
स्वामीचे शेवेशी

विनंती शेवक रघुनाथराव पडवल हवालदार व आपाजी रवलनाथ सबनीस किले विशालगड कृतानेक विज्ञापणा विनंती तागायत छ २९ मोहरम पावेतो स्वामीच्या कृपाअवलोकने करून शेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष पेशजी किले मजकूरी राजश्री आपाजीराव जाधव दप्तनमुलोक व आबाजी सुरवशी हुजरे व रावजी वाकनीस व आबाजीपंत व रामाजीपंत येथे येऊन करवीरास गेले त्या समई दरवाजाची परवानगी तुम्ही पाहात असोन स्थली सावधपणे राहोन हुजूरच्या हुकमाने वागणूक करीत जाणे मागाहून तुम्हास येविसीचा हुजूरून हुकूम येऊन लागेल त्याप्रमाणे कर्णे म्हणोन सांगोन गेले त्या हुकुमाने आजपर्यंत चालविले आलीकडे कांही विपर्यास येऊन गेल्यावरून सेवेशी विनंती लिहिली आहे तरी येविसीचा बंदोबस्त हुजूरून व्हावया आज्ञा व्हावी नाहीतरी शेवकाची परिणाम नाही येविसीची आज्ञा करणार स्वाम धनी मायबाप समर्थ आहेत सेबेशी श्रुत होय हे विज्ञापणा.

लेखांक १६८ तारीख २६-७-१८३६

रु. नं. ६

अ. नं. ९६२

श्रीमन्महाराज छत्रपति साहेब दाम यकबाल हू अजनियाज मंद ज्यान येर्द्री मुंडीकन साहेब बाहादुर अगटींग सर कलक्टर व पोलीटक्याल येजंट बा अदज नियाज मारुज आंके येथील खैरियेत रोषन होऊन हमेशा अलथापनामा सादर फर्मावीत असिले पाहिजे दिगर इनत दस्तगाहा सखाराम पंत देशपांडे बकील निसबत मेहरबा येसवंतराव साहेब घाटगे यानी यादी दिली आहे की मौज निगव प्रांत कागल येथील देशमुखी बाबत कमत व हकाच्या ऐवज तो गाव माहाराजाकडे गेल्यापासून चालत नाही म्हणून त्याजवरून इलतीमास करण्यात येतो जे सदरहू हक्क व कमत कीं निमित्य चालले नाही मेहरबानगी करुन याचा जबाबाची अलथापनामा फर्माविला पाहिजे जियां॰ दाचे बाद

सही इंग्रजी

पौ छ १६ माहे रविलाखर सुा सबा सलासीन मयातैन व आलफ थैलीचे चिटीची तारीख छ २६ माहे जुलई सन १८३६ इसवी.

लेखांक १६९ तारीख ८-८-१८३६

हु.

रु. नं. १

अ. नं ९६३

श्रीमन्महाराज छत्रपति साहेब दाम यकबाल हू
नियाजमंद मेस्तर जयान अदरीयू डनलाप साहेब बहादूर अकटिंग सर कलेक्टर व पोलटक्याल यजंट सुभा धारवाड नियाज मारूज आंके येथील खैरियत रोषण होऊन हमेशा अलताफनामा फरमाविले पाहिजे दरिविला अस्मत पन्हा राधाबाई साहेब संस्थान रामदुर्ग यानी इनीयाजमंदास पत्र पाठविले त्यात तोरगलकर मेहेरबा लक्ष्मणराव शिंदे यानी कांही जबरी चालविल आहे किरकोळ उपद्रव होत असतो म्हणोन तपसीलवार लिहिल पत्राच तालीक या नियाजनामा बरोबर पाठविल आहे मुतालेत आणोन याचा वाजबी इन्साफ आ माहाराज छत्रपति साहेबकडून जाहाल जियादाचे बाद

(सही इंग्रजी)

पौ छ ४ जावल सुा सबा सलासीन मयातेन व आलफ थेलीचे चिठी तारीख ८ आगष्ट १८३६ इ॥

श्री

साहेब मेहरबा करम फर्याय दोस्ता मेस्तर ज्यान यैद्रीयु डनलाप साहेब बहादूर सर कलक्टर व पोलटक्याल येजंट सुभा धारवाड सल्महू अजी सौबा राधाबाई संस्थान रामदुर्ग सलाम आंके येथील खैरियत ता। छ माहे रबिलाकर जाणून आपली शादमानी निवस्तन कलमी करून दिल आराम करीत गेले पाहिजे दरवील तोरगल इलाखेवालेनी इकडील इलाखेतील गावबार वगैर दांडगावा चालविला तपसील

१ एकोपागोडा चिन्या मौजे सोपडेल इ।। संस्थान मजकूर याजकडून गोविंदा लोहार दोडभावी इ।। तोरगल याने करजाऊ रुपये घेतले त्याच्या मुदती एक दोन होऊन गेल्यामुळे गोडची मा। लोहाराकडे रुपये मागावयास दोडभावीस गेला असता धटाईच उत्तर सांगितले तेव्हा गोडची मजकूर परत सोपडल्यास आला पुढे चार आठ दिवसी लोहार मजकूर याने देण्यापैकी कांही रुपये घेऊन सोपडल्यास येऊन गोडची मा।र यास रुपये दिले ते घेऊन बाकींचे ऐन रुपये व व्याजच रुपये देणे असे गोडची मजकूर लोहारास म्हणाला त्यास उत्तर आणखी कांही देणे नाही असे धटाइन सांगून घोंगडी टाकून दोडभावीस गेला पुढे चारआट दिवसी भगवंता आपा देशपांडे दोडभावीकर याने लोहार मजकूर व प्यादे बतनदार येणे प्रमाणे बरोबर घेऊन सोपडल्यास येऊन गोडची यास धरून लोहार वतनदार यास देशपांडे यानी तुम्ही गोडची याचे घरी जाऊन जे सापडेल ते घेऊन येणे म्हणोन पाठविले त्यावरून लोहार वतनदार यानी गोडची याचे घरातील जिंदगी कांही नेहली त्यासुद्धा गोडचे यास घेऊन देशपांडे दोढभावीस गेले तेथे दोन तीन दिवस उपोषीत गोडची बसला तेव्हा चौघ मिळून मजकूर मनास आणिता देशपांडे गैर ठरल्यामुळे गोडची याची मोकलीक करून गावी जाणेस सांगितले नंतर गोडची निघोन तोरगलास गेला हे समजोन देशपांडेही गेले तेथे चवकसी जहाली देशपांडे याजकडे गैर ठरून गोडची यास निरोप दिला परंतु जिंदगीचा व कर्जा पैकी बाकीचा उलगडा व्हावा तो जाहाला नाही हेविषीचा मजकूर गोडची याने येथे समजाविल्यावरून तोरगलास पत्र पाटविले त्याचे उत्तर देशपांडे गावी नाहीत आल्यानंतर चवेकसी होईल असे पाठविले त्यास एक महिना होऊन गेला उलघडा जाहला नाही परभारे उघवणीचा विचार होईल परंतु कर्ता येत नाही आ साहेबानी हुकूम पाठवून गरिबाचे जिंदगीचा वगैरे उलघडा होई ते केले पाहिजे.
१ पेशजी तोरगल इलाखात गुरे वगैरे चुकून गेली त्याचा पत्ता तोरगलकर याजकडे शाबूत असता जाबसाल आजपर्यंत उलघडला नाही शिवाय तमसुक बाबत तोरगलकराकडे ऐवज येणे त्याचाही जाबसाल न उघडता तसेच राहिले आहे असे मजकूर आ साहेबास जाहीर होणे करिता सविस्तर लिहल आहे.

२

को. घ. ६...९

येकूण कल्मावरून सर्व मजकूर दिलात येईल तोरगलकर शिवसेजारी याजमुळे इकडून तंटा वाढवू नये सबब पाटीवर ताकीद असता बारंवार नवीन खटली करितात हे दरवख्त आसाहबास लिहावे तर जिकर वाटणार परंतु न लिहावे तख्त त्याजकडील जाबसाल उलघडात नाहीत याजकरिता विस्तारे लि॥ आहे याचा विचार होऊन त्याजकडून जाबसाल उलगडत असा हुकूम जाहाला पाहिजे हमेशा खत पाठवून दोस्तीची तरकी असो ग्याबी जियादा काय लिहिणे प्यार मोहबत असो दिली पाहिजे हे किताबत.

(सही इंग्रजी)

लेखांक १७० तारीख १२-८-१८३६

रु. नं. ६

अ. नं. ९६४

श्रीमन्महाराज छत्रपति साहेब

दाम यकबाल अज नियाजमंद मेस्तर दडलाप साहेब बहादूर अक्टिंग सर कलेक्टर व पोलिटिक्याल एजंट सुभा धारवाड नियाज मारुज आंके येथील खैरियेत रोषन होऊन हमेशा अलथापनामा सादर फर्मावीत आल पो दरिन्विला किले विशालगड येथे गर्दी जाहाली त्यावेळीं माहाराजाच नांव घेऊन करणारानी केला ते माहाराज छत्रपति साहेब याचे नांव न सांगाव म्हणून मेहरबानगी करून सखो केशव परांजपे वगैरेस कललेवरी मोहर पाटविल आहे त्याजबराबर पंडितराव गेला व माहाराजाकडील हुजरे तेथ आहेत असे विशालगडकराकडील कारकून यादी दिली सबब दोस्तीची जागा जाणून इलतीमास केल जात जे अस माहाराजाकडील लोक राहिले असता फिरून माहाराज छत्रपति साहेब यांचे नांव घेतील करिता त्यास आणविले असता कोणासही बोलणेस ठिकाणा राहणार नाही त्यासाठी किलेवरून मोहर आणाऊन घेव हे इजानमंदास बर दिसत आहे आणि पहिले इलतीमास केल्या अन्वये माहाराज छत्रपति साहेबाच नांव करून ज्यानी कृत्य केले आहे त्यासी नसीयेत होऊन अलथापनामा सादर जाहाला पाहिजे ज्यादाच बाद

(सही इंग्रजी)

पौ छ ९ माहे जमादिलावल सु॥ सबा सलासीन मयातेन व अलफ.
थैलीचे चिठीची तारीख छ. १२ माहे आगष्ट सन १८३६ इ॥

लेखांक १७१ तारीख १७-८-१८३६

श्री

रु. नं. ३

अ. नं ८२३

पौ छ ८ माहे जमादिलवल
सु॥ सबा सलासीन मयातैन
आलफ

सेवेशी विनंती शेवक रामाजी भिमराव कृतानेक विज्ञापणा त॥ छ४ जोवल मु॥ छ १७ माहे आगष्टपावेतो धारवाड येथे स्वामीचे कृपावलोकने करून शेवकाचे बृथ यतास्थित असे विनंती ऐसीजे स्वामीनी कृपाळु होऊन छ २४ रा॥करी आज्ञापत्र पाटविले ते छ २८ राकर मु॥ १२ आगष्ट मिनहूस पोहचून मस्तकी वंदून समाधान जाहालो आज्ञापत्री आज्ञा किले मनोहरगड येथील गडकरीलोक याणी हुजूरच्या हुकमतीस धटाई करून मामलेदार यासी व पेशजीपासून किलेवर नामजाद लोक होते त्यासुधा किलेवरून खाली घालविले वगैरे गैरपधतीने वर्तनूक करितात याजकरिता तेथील बंदोबस्ताबदल किले मजकुरी हुजूरची खासास्वारी होत आहे येविसीची तुम्हास समक्ष आज्ञा जाहाली आहे व हली आजम जान अद्रीव डनलाप साहेब बहादुर अगटिंग सर कलेक्टर व पोलकट्याल येजंट सुभा धारवाड यासी थैली व थैलीची तालीक तुम्हास पाहाणे करिता पाटविली आहे तालीक पाहून थैली साहेब बहादूर याजकडे गुदरणे म्हणोन आज्ञा आज्ञेप्रो हुजूरचे शेवेशी सदरहू बजिनस थैली छ १३ आगष्ट तारखेस हजरत ज्यान अद्रीव डणलाप साहेब बहादूर याचे हुजूरात प्रविष्ट करुन आज्ञे प्रो मा॥रही समक्ष विदित केली आहे करिता हुजूरचे शेवेशी निवेदनार्थ विनंतीपत्री विनंती लिहिली असे शेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक १७२ तारीख ३०-८-१८३६

श्री

रु. नं ३

अ. नं. ८२४

पौ छ २६ माहे जावल
सुा सनसबा सलासीन
मयातेन व आलफ श्रावण
व॥ १३

सेवेशी विनंती शेवक रामाजी भिमराव कृतानेक विज्ञापणा
ता।। छ १७ जावल मुा छ ३० माहे आगष्ट पावेतो धारवाड येथे स्वामीचे कृपावलोकने सेवकाचे वृत येथास्थित आसे विज्ञापणा प्रार्थना ऐसीजे स्वामी कृपाळु होऊन छ ९ जोवलचे आज्ञापत्र पाटविले ते मस्तकी वंदून सनाथ जाहालो आज्ञापत्री आज्ञा स्वामीचे सेवेशी तुम्ही छ ४ जावलचे विनंतीपत्र पाटविल ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ श्रीव जाहाला हुजूरची खासा स्वारी किले मनोहरगडास व्हावयाची येविसीचे माारांची थैली आजम डनलाप साहेब बहादूर आगटिंग सरकलकटर व पोलटक्याल येजंट सुभा धारवाड यासी हुजूरून आली ती गुजरान देऊन माार जाहीर केला म्हणोन विनंती लिहिली ती निवेदन होऊन आजी इंदुवारी खासा स्वारीचे कूच होऊन मौजे तुरंबे येथे स्वारीचा मुक्राम होत आहे म्हणोन आज्ञा आज्ञे प्रमाणे हुजूरचे शेवेशी सविस्तर हजरत जान अद्रीव दंडलप साहेब बहादूर पोलटक्याल येजंट यास विनंती केली आहे यैसीयास हुजूरची खासा स्वारी मुकामी मनोहरगड प्रकर्णी जे काय विचार होईल ते वरचेवरी आज्ञापत्री आज्ञा करावयासी स्वामी समर्थ असता हुजूरचे शेवेशी विनंती

विसेस विनंती करावयासी शक्त नव्हे सेवेशी श्रुत होय हे विज्ञापणा.

लेखांक १७३

पो तारीख १९-९-१८३६

हु

रु. नं. ६

अ. नं. ९६६

श्रीमन्महाराज छत्रपति साहेब दाम यकबाल हू
भज नियाजमंद मेस्तर जान अद्रयू डनलाप साहेब
बहादूर आा सर कलक्टर व पोलटक्याल एजंट

सुभा धारवाड बादज नियाज मारुज आंकी येथील खैरीयत रोषण होऊन हमेषा अलथापनामा सादर जाहल पो दिगर इनत दस्तगाहा येसाजीपंत वकील नि।। कागलकर यानी यादी दिले सां।। कागल इ।। चिमणगाव येथील शीव जमीन मौजे गंगापूरकर यानी पेशजी जबरीने नांगरली व चाळीस पन्नास माणसे बंदुकेचे तोंडे पेटवून जमीन जबरीने पेरल म्हणोन त्यावरून इलतीमास होत आहे कीं याजविषयी १५ जुलाईस आमेहरबानाचे वकीलास याद जाहाली यात सदरी जमीन लिंगोधर गंगापूरकर लावणी न करिता हल्ली नवीन कुळविले असलेस ती त्याजकडून काढून कागलकरास द्यावा लागेल म्हणोन असे असता हल्ली या प्रकारे गावकर यानी केले आहेत सबब आमाहा-

राजानी याची चवकसी करून गावकरास नसीयेत होऊन बंदोबस्त जाहाला पाहिजे जादाचे बाद

सही इंग्रजी

पौ छ ७ माहे जमादिलाखर सु॥ सबा सलासीन मयातेन व अलफ. थैलीचे चिटी.

लेखांक १७४ तारीख ५-११-१८३६

रु. नं. ३

अ. नं. ८२८

श्रीमन्माहाराज——————छत्रपति साहेब

दाम यकबाल——————————

अज नियाजमंद ज्यान अद्रीन डनलाप साहेब बहादूर पोलटक्याल यजंट प्रांत कर्नाटक बाआदज नियाज मारुज आंके येथील खैरियत रोषन होऊन हमेषा आल्ताफनामा सादर फर्मावीत असिले पाहिजे दिगर आमाहाराज छत्रपति सोकडून १७ माहे रजबचा नवाजषनामा सादर जाला तो पोहोचून सरफराज पावलो खास खबरी किले मनोहरगड येथील बंदोबस्ती बदल जाऊन परत करवीरास दाखल जाल्याची कलमी केली वरून आमाहाराज छत्रपतिसोचा मनोगाताप्रो बंदोबस्त जाहाला इसबब नियाजमंदास फार संतोषास कारण जाहाले जियादाचे बाद

(सही इंग्रजी)

(पो. यजंट)

पौ छ २९ माहे रजब सुा सबा सलासीन मयातैन व आलफ थैलीचे चिटीची तारीख छ ५ माहे नवबंर सन १८३६ इसवी सु॥ सन १२४६ फसली.

लेखांक १७५ तारीख १३-१-१८३७

रु. नं. ६

अ. नं. ९७०

श्रीमन्महाराज छत्रपति साहेब दाम यकबाल

हू नियाजमंद जान अदरीव दडलाप

साहेब बहादुर पोलटक्याल येजंट प्रांत कर्नाटक नियाज मारूज आंकी येथील खैरीयेत रोषन होऊन हमेशा अलथापनामा सादर फर्माविला पाहिजे दरिविला गणेश

लक्ष्मण आपटे खोत वाडी मालप मौजे पोबुर्ले तर्फ खारेपाटण ताा विजेदुर्ग यानी अर्जि दिली त्यातील मजकूर भिमराव पंडित व माधवराव पंडित इनामदार यानी आमच्च चालत वहिवाटीस बालाजी विठल व तातो विठल आपटे वगैरेनी नवेसी खटला उत्पन्न करून गैरवाजबी उपद्रव देतात हेविसी पहिले आलीशान बेवर साहेब बहादूर याजकडे फिर्याद केलेवरून आ माहाराज छत्रपति साहेबास थैली त्याजवर आ माहाराजानी ताकीद केली परंतु कांहीं बंदोबस्त जाहल नाही म्हणून त्याजवरून आ माहाराज छत्रपति साहेबास इल्तीमास करितो कीं मेहेरबानगी करून बावडेकर यास लिहून याच्च बंदोबस्त करविल पाहिजे जादाचे बाद

(सही इंग्रजी)

पौ छ ५ माहे शोवाल शुाा सबा सलासीन मयातेन व आलफ थैलीचे चिठीवर तारीख व सन नव्हते लेकीन ब ताा छ १३ माहे जानेवारी सन १८३७ इसवी पुरू महीनेत येऊन रसीद जाहाली.

लेखांक १७६ तारीख १३–१–१८३७

रु. नं. ३

अ. नं. ८३६

श्रीमन्माहाराज छत्रपति साहेब दाम
यकब्राल हू

नियाजमंद ज्यान आद्रीव दडलापसाहेब बहादुर पोलटक्याल येजंट प्रांत कर्नाटक नियाज मारुज आंकी नियाजमंदाच खैरीयेत रोषन हमेशा आलताफनामा सादर होत आसिल पाहिजे दरिविला आमाहाराज छत्रपति साहेबानी छ २७ माहे रमजानचनवाजषनामा पाटविल तें पो किले मनोहरगडकरी लोक याणी गैरराहा वर्तणूक करून काही गडकरी लोक फरारी होऊन पारगड व हेर व सुंदरवाडी तनखेत आहेत याच्च यादी पाटविल आहे इलाखदारास लिहिणे जाऊन स्वाधीन जाहाला पाहिजे म्हणून त्याजवरून आमाहाराज छत्रपति साहेबानी इषदी केले प्रो त्या त्या इलाखदारास असा हुकूम दिला आहे कीं ते लोक काईद प्रो जामीन न दिल्हेस माहाराज छत्रपति सोच्च स्वाधीन कराव लागल म्हणून हा मार आमाहाराज छत्रपति साहेबास रोषन होणेवद्दल इल्तीमास केल आसे जियादा सुंदरवाडीच इलाखेत आसणार आसामीविसी रत्नागिरी साहेबास इंग्रजी पत्र लिहिले आहे.

(सही इंग्रजी)

(पो. एजंट)

पौ छ ८ माहे शौवाल सुाा सब्रा सलासीन मयातेन व अलफ थैलीचे चिटीची तारीख छ १३ माहे जनवारी सन १८३७ इसवी

लेखांक १७७ तारीख ८-२-१८३७

रु. नं. ६

अ. नं. ९७२

श्रीमन्महाराज छत्रपति साहेब

दाम यकबालहू

अजनियाजमंद जान अद्रीव डनलाप साहेब बाहादूर पोलिटिक्याल यजंट प्रांत कर्नाटक बाअदज नियाजमारुज आंके येथील खैरीयेत रोषण होऊन हमेशा आलथापनामा फर्मावीत असिले पाहिजे दरिविला तोरगल ईाा बनूरकर हणमपा देसाईवरी तोरगलकर यांनी दोनीचारीशेहे लोक व स्वार पाठवून होसूर कामनकोप निा देसाई याचे इनाम येथे येऊन गोळागोळी चालविल आहे शिवाराची खराबी होत आहे म्हणोन मेहरबा गिरधरराव शिंदे बनूर यांनी इनीयाजमंदास पत्र लिहिले आहे कारण सदरहू इलाखा आमाहाराज छत्रपति साहेब याजकडील करिता माहाराज छत्रपति साहेबकडून याचा बंदोबस्त जाहला पाहिजे जियादाचे बाद

(सही इंग्रजी)

पौ। छ २ माहे जिल्काद सुाा सबा सलासीन मयातेन व आलफ मुाा छ ८ माहे फेबुरवारी सन १८३७ इसवी थैलीवर तारीख चिटीवर तारीख व सन नव्हते.

लेखांक १७८ तारीख १३-२-१८३७

श्री व्यंकटेश प्रसन्न

रु. नं. ६

अ. नं. ९७३

पो छ १२ माहे जिल्काद सुाा सबा सलासीन मयातेन व आलफ माघ शुाा १४ रोज मंदवार

राजेश्री महिपत रावजी पारसनवीस गोसावी यासी अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्रे॥ लक्ष्मणराव सिंदे सेनाखासकील रामराम विनंती उपरी येथील कुशल ताा छ ७ माहे जिल्काद जाणून स्वकीय कुशल लिहीत असावे विशेष आलीकडे तुम्हाकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाही तर वरचेवर पत्र पाठवून चित्त संतोषवीत असावे इकडील मजकूर राजेश्री केशवराव यास मुक्ता सांगून पाठविले आहेत समजून त्याप्रमाणे संवस्थानाचे आगत्य धरून कामे होय ती करावी हे विनंती.

लेखांक १७९ तारीख १७-१२-१८३७

श्री

रु. नं. ३

अ. नं. ८५३

आज्ञापत्र राजमंडल ताा मोकादमानी कसबे शिरोल प्रांत रायबाग सुा समान सलाशीन मयातैन व आलफ कसबा माा व गावगना देहाय याचे याजकडून सालाबाद प्रमाणे श्रीदत्तजयंतीचे उच्छाबाबत वे।। राजश्री कृष्णभट पुजारी वाडीकर याजकडे रुपये ५०० पांचशेहे व कालेहून तांदूळ आणणेस बैलसर १० दहा व × बैलसर २ दोन ताटमुटसुध्दा वेटेस पोटगी देऊन व शाकभाजी व कुभारकाम व पत्रावली व फाटी भारे व जाग व जागा निट करणेस वेटे व थोरल समापश्वने दिवसी फोडीव लाकडे येणेप्रमाणे देविल आस तरी आज्ञेप्रमाणे पावते करणे गावगना

बी तपसील

१ का मार	१ मौजे घालवाड का सिरहटी
१ का सिरहटी	१ मौजे कुटवाड का सिरहटी
१ मौजे अर्जुनवाड	१ मौजे धरणगुती का शिरहटी
प्रा रायबाग	---
---	३
३	

येकून गाव साहा आज्ञ प्रमाणे रुपये वगैरे देणे जाणिजे रा छ १८ माहे रमजान प्रो हजर.

विलस
तिलाख

लेखांक १८० तारीख ३-८-१८३८

रु. नं. ६

अ. नं. ९८६

श्रीमन्महाराज छत्रपति साहेब दाम यकबालहू नियाजमंद इडवार्ड ह्यु टोनसंड साहेब बहादूर फर्स्ट असिष्टंट कलेक्टर इंच्यार्ज पोलटक्याल येजंट प्रांत कर्नाटक बाद नियाज मारुज आंकी येथील खैरयत रोषण होऊन हमेशा अलतापनामा सादर फर्मावीत असिल पाहिजे दरविला रामचंद्र बाबूराव काळे निसबत बापूजी गोपाळ परांजपे सराफ बंदर राजापूर याचे येजमान बापूजी गोपाळ परांजपे याच वगैर सराफ मंडळीच ऐवज

मिरजेहून राजापुरास पाटवित असतां तारीख १५ फेब्रुवारी सन १८३८ इसवीच रोजी अनुस्कूर घाटच्च माथ्यावर माहाराज छत्रपति साहेब व विशाळगडकर याच अमलात गड्यास चोरट्यानी ठार मारून रुपये ४२९९॥ रुपयेचा विषय घेऊन गेले याजबद्दल बंबईत फिर्याद होऊन येविषयी रत्नागिरी माजिस्त्रेट सो। याजकडून विशाळगडकरी यास सूचना जाहाली तथापि कांही बंदोबस्त जाहला नाही म्हणोन फिर्याद जाहाल त्याजबद्दल रत्नागिरी माजिस्त्रेट साहेबकडून विशालगडकरास पत्र छ १४ अप्रैल सन १८३८ इ॥ स गेल त्याचे उत्तर छ. २७ मोहरम सन समान सलासीन मयातेन व अलफच्च जबाब आला त्याच्च सुद्धा तालीक इंग्रजी पत्राबराबर इनीयाजमंदाकड आल आहे त्यांत सदरहू चोरी आमल मौजे कानटे या गावचे नदीवर जाहल असे ऐकीवात आहे कानटे हा गाव दुतर्फा करवीर व विशाळगडच्च अमल आहे ते गाव व त्याच्च लगत गावच्च पाटील वगैरे माणसे पाटवून चोकसीच्च राहिल आहे व चैत्रमासी मालेवाडे तर्फे मलकापूर येथ दरोडा घालून पळून जात होते त्याच्च पाठलागावरी लोक गावकर जाऊन वारणे पलीकड कणदूर येथ चोरटे पैकी चार असामी चोरटे धरून करवीरास नेले आहेत म्हणोन वगैरे मजकूर मेहरबा अमृतराव साहेब पंत प्रतिनिधि विशाळगडकर याचे पत्रात लिहिल आहेत सबब-माहाराज छत्रपतिसाहेब यास इलतीमास केल आहे येविसी पहिल बागलकोटच्च भाउ नाईक जोरापूर यानी आपला ऐवज राजापुरास मिरजेच्च सावकाराच्च मारिफत पाटविल असतां कोल्हापूर इ॥ भोगांव कट्यायथ रानात दोघ जासुदास जिवानसी मारुन ऐवज घेऊन गेले म्हणोन छ १० मारची सन १२४७ फसलींची अर्जी इनीयाजमंदाकडे दिलेवरून त्याची तालीक समेत माहाराज छत्रपति साहेबकड पाटवून गावकरास ताकीद देऊन चोराच्च पता लावणेस हुकूम होऊन तेथील दस्तुर प्रमाणे बंदोबस्त जाला पाहिजे म्हणोन छ २७ मार्ची सन १८३८ इसवीस नियाजनामा लिहिल आहे त्यास ही वेळ पर्यंत चोराचे पता मिळून बंदोबस्त जाहालच्च हुकूम सादर जाला नाही हें काम चालून पांच महिने जाहाली कांही असाम्या कोलापुरात सापडले आहेत म्हणोन रत्नागिरीच्च पत्रांत आहे सबब माहाराज छत्रपति साहेबानी खातर मुबारकेस आणोन गावकर वगैरेस निक्षून ताकीद होऊन बंदोबस्त पक्केपणाने होऊन अलथापनामा सादर होई असे इनीयाजमंदाच्च उमेद आहे जियादाचे

(सही इंग्रजी)

पौ॥ छ १४ माहे जमादिलाव्वल सु॥ तिसा सलासीन मयातेन व अलफ थैलीचे चिटीची तारीख छ ३ माहे आगष्ट सन १८३८ इसवी मुा॥ सन १२४८ फसली.

लेखांक १८१

तारीख २०-८-१८३८

रु. नं. ६

अ. नं. ९८७

श्रीमन्महाराज छत्रपति साहेब दाम यकबाल

हू नियाजमंद उलीयम सीमसेन साहेब

बहादूर अक्टिंग पोलिटक्याल येजंट प्रांत कर्नाटक नियाज मारूज अंकी थेथील खैरियत रोषन होऊन अलथापनामा सादर फर्मावीत असले पो दरविला बावडेकराचे दुतर्फा सालसी माहालात जकात कवी पासून घेत येतात आणि त्याच्च ऐवज किती आहे कोणते सालापासून घेतात याचे मजकुरास उत्तर लिहून याव म्हणून आमाहाराज छत्रपति साहेब याचे कारकून गुरुनाथ पंत याचे नांव तारीख ९ माहे सपटंबर सन १८३७ इसवीस यादी पाटविली त्याचे उत्तर ताहाल आले नाही याजमुळे त्याचे जबाब जाणेस हरकत आहे सबब माहाराज छत्रपतिसाहेब यास इलथीमास केल आहे छ ९ माहे सपटंबरची यादी प्रमाणे जकात संबध दाखले वगैरे होऊन माहितगार माणसास इनीयाजमंधाकड पाठवणेस अमल जाहाला पाहिजे येविषीच दिवसगत न होय असा मेहरबानगी करून पाटविल पाहिजे जादाच

सही इंग्रजी

पौ. छ. २. माहे जमादिलाखर सु॥ तिसा सलासीन मयातेन व आलफ थैलीची चिटीची तारीख छ. २० माहे आगष्ट सन १८३८ इसवी

लेखांक १८२

तारीख १३-१०-१८३८

रु. नं. २

अ. नं. ९९१

श्रीमन्महाराज छत्रपति साहेब दाम यकबाल अज नियाजमंद उलीयम सीमसन साहेब बहादूर अक्टिंग पोलिटक्याल एजंट प्रांत कर्नाटक बाआदज नियाजमारूज आंके येथील खैरियत रोषण होऊन हमेशा अलथापनामा सादर होत असिला पाहिजे दरविला दस्तगाहा चेदोपंत वकील निसबत संस्थान रामदुर्ग यानी तारीख २० रजबची याद दिली त्यात रामदुर्ग इलाका पंचगाव व तोरगल इलाका बिडकी येथील सीव खटला पंचमारिफतफैसल होऊन हदीस दगड रोविले असता साल मजकुरी आश्विनमासी बिडकीकर चार आसामी सीमांतरास येऊन दगड काढू लागले तेव्हा पंचगावकर दोन असामी जाऊन दुहाई दिलिया न ऐकता धकाबुकी करून चार दगड काढून गेले दुसरे दिवसी शेपनास लोकानी येऊन येकंदर दगड काढून टाकून गावाजवळ येऊन

पंचगावकरास लढाईस बोलाविले असे दांडगाई करितात याविषयी पहिले माहाराज छत्रपति साहेबास इकडून पत्र गेले परंतु कांही बंदोबस्त जाला नाही म्हणून वगैर तपसील वार लिहिले आहे सबब माहाराज छत्रपति साहेबास इलतीमास करणेच आहे कीं हा खटला सरकारचे कामदार व पंचायतदार सुध्धा मिळून फैसल करून सरहदेस दगड रोविले असता बिडकीकर सदरहू दगड उपटून टाकावे हे फार आश्चर्याची गोष्ट आहे याचे बंदोबस्तीबाबतीत पहिले आ माहाराज छत्रपति साहेबास छ ९ माहे मार्च सन १८३८ इसवीस एक पत्र पाटविले आहे त्याप्रमाणे बंदोबस्त जाल्याचे अलथापनामा सादर जाहला नाही हल्ली फिरून बिडकीकर असे जबरी चालऊन दगड उपटून टाकणे म्हणजे फार चमत्कार आहे माहाराज छत्रपति साहेबानी खातरमुबारकेस आणून मेहेरबा डनकन साहेब बहादूर यानी इलतीमास केल्याअन्वये पुरा बंदोबस्त होऊन इनायतनामा सादर जाहला पाहिजे आणि तोरगल इलाखेवाले असे खटला बारदिगर न करीतेस तलायुद व्हावी असे इनीयाजमंदाचा उमेद आहे जियादाचे बाद

(सही इंग्रजी)

पौ छ २७ माहे रज्ब सु॥ तिसा सलासीन मयातेन व आलफ थैलीचे चिटीची तारीख छ १३ माहे अगटंबर सन १८३८ इसवी.

लेखांक १८३ माहे नोव्हेंबर इ. स. १८३८

श्री

निवडी दप्तर रु. नं.४

अ. नं. ८७७

गंगाधर रावसो मिरजकर यास ता कार्तिक व॥ ७ रोज गुरुवार पावेतो स्वामीच्र कृपेकडून येथास्थित असे विनंती ऐसीजे श्रीमन्माहाराज छत्रपति करवीर याचे स्वारी श्री तुळजापुरनिवासिनीची दर्शनास जावयास मिरज अगर माल्गावचे मोकामी येणार येथे सरबराईची बंदोबस्त व्हावे लागेल करिता सूचिनार्थ विनंती लिहिली आहेत गवत सर्पण वगैरे वाजबी खरदीस मिलाव असे पूर्वींच तरतूद ठेवणेविसी येथील कमाविसदार वगैरे लोकास आज्ञा करणार स्वामी समर्थ आहां. शेवेसी श्रुत होये.

लेखांक १८४ तारीख २४-११-१८३८

मु॥ लस्कर नजीक श्री

अ. नं. ८७९ पंढरपूर

१ छत्रपति साहेब याचे सासू मोहितीबाई स्वारीबरोबर आली होती त्यासी वाग्वा

होऊन कालचे रोजी मेली लस्कर मुकामी पटकीच आजारसारखे उपद्रव होऊन मनुष्यास आपाय घडत आहे. (ता. २४-११-१८३८)

१ कर्नल वोवानसाहेब बहादूर रसिडेंट सातारा यास ताा छ २७ माहे नवंबर रोज मंगळवार सन १८३८ इसवी सन १२४८ फसली पो मु॥ लस्कर नजीक श्री पंढरपूर येथे सरकार कामावर हजर असो गरीबपरवर सलामत श्रीमन्माहाराज राजे छत्रपतिसाहेबास ज्वराअंश जाला होता ते किंचित स्वास्त पडलेवरून आजचे रोजी श्री पांडुरंगाचे दर्शन घेऊन लागलेच येथून स्वारी निघोन चालता जाहाली छ मार मौज येवतीच मुकामास जात आहे बंदगीस रोशन होये.

१ ज्यान अद्री व दडलापसाहेब बहादूर दरइजलास कोनसल मुंबई ताा छ २९ माहे नवंबर रोज गुरुवार सन १८३८ इसवी सन १२४८ फसलीपावेतो मुकाम लस्कर नजीक येवती इ॥ सोनीकर पटवर्धन येथे सरकार कामावर हाजर आसो गरीबपरवर सलामत श्रीमन्माहाराज छत्रपतिसाहेब यास ज्वराअंश जाहाल होत ते किंचित स्वस्त दिसलेवरून माहे नजकूर छ २७ तारीख रोज मंगळवारी पंढरपुराहून स्वारी निघोन मौजे येवती इ॥ सोनीकर पटवर्धन येथे संध्याकाली येऊन पोहोचले तेच दिवसी रात्रौ ज्वराअंश जाजती होऊन खफ वायू होऊन येकायेकी आज गुरुवारी पाहटेच प्रहर रात्रीस श्रीमन्माहाराज छत्रपतिसाहेबानी स्वर्गस्त जाहाले फार अनुचित घडली ईश्वर इछेस उपाये नाही स्वारी मुकामी श्रीमन्माहाराज छत्रपतिसाहेब याची भावजेही दिवाणसाहेब माहाराज व छत्रपति साहेबाचे राणीसाहेब व धाकटे माहाराज सहित आहेत आणि पदरचे लाहानमोठे तमाम लोक स्वारी मुकामी आहेत त्यापेक्षा कोणते बिसी कमजाजती वगैरे कांहींयेक पडणार नाही सर्व प्रकार जपून आहो कोणते आंदेषा नाही खातरजमा जाणून शेवेसी विनंती लिहिल आहे कोलापुरास माहाराजाकडील कामदार आहेत त्यासहि येथून बंदोबस्तासाठी लिहून गेले आहे आणि तूर्त प्रसंगी सर्व जिकडील तिकडे बंदोबस्त पक्केपणी निट आहे सर्वोपरी राजेधानी दौलतचे साभिमान पूर्वीपासून खुदावदास असता जियादा अर्ज करणेस मगदूर नाही सरकार मेहरबानगीकडून माहाराजानी मला पुत्रवत प्रमाणे संवरक्षण करीत आल ते चितास निवेदन असता विस्तार विनंति करावयास शक्त नव्हे ताजा कलम माहाराजाची राणीसाहेब पैकीं श्रीमंत बाबैयसाहेब सती जाऊन म्हणून दुराग्रहास पडली आहे बहुतेकप्रकारे समजून सर्वत्रानी येत्न पराकष्टा करीत असो परंतु आपले जीवास काय अपाये करून घेतील याचे भरवसा लागत नाही परंतु समजून सांगणेस येत्न करणेस कमती करीत नाही आ पनास रोशन होये.

सूची भाग ६

व्यक्तीपुढील आंकडे लेखांकांचे आहेत

इरसनसाहेब इंग्रज बहादर पोलिटिकल एजंट सुभा धारवाड सांवतवाडी इलाख्यांतील बंडवाल्यांना कुमक न करण्याबाबत १४७, १४८, १४९, १५१; विशाळगड प्रतिनिधीचे दत्तक प्रकरणाबाबत १५२

अंताजी भवानराव तलीखोरांचा बंदोबस्त १६६

अंताजी रघुनाथ गोखले, नागाव्याचा ऐवज इंग्रज बहादरास देण्याबाबत १३८

अमृतराव भगवंत पंडित प्रतिनिधि १५२, १८०

आकाराम यादव, हवालदार, महायात्रेस जाणे ५, ७

आणाजीराव, वकील इचलकरंजीकराकडील २४

आदम, इंग्रजबहादर करवीरास भेट २१

आनंदराव त्रिंबक वकील २९, वकिलीचे कामावर नेमणूक ३१, आपाजीराव सितोळ्यावर रोख होऊं नये ३४ हुजुरांचे लष्करास आले ५२, हुजुरांच्या स्वारीशिकारीस तोंड देण्यास इंग्रज बहादराची लष्करी तयारी ८५, १०३ ११७, १२४, १३४, १३५

आनंदराव पवार, धांरकर विवाह २६

आंताजी येशवंत श्री आवदुंबर आंकलखोप येथील दत्तात्रयाच्या पूजा, नैवेद्य, नंदादीपाबद्दल जमीन इनाम १४५

आपा भटजी १४,

आपाजी देसाई, चांदगड कितूरकरांच्या लढाईस स्वारलोक न पाठविण्याची आज्ञा ४५

आपाजी रवलनाथ सबनीस, किल्ले विशालगड हुजुरांच्या हुकुमाप्रमाणे चालविण्यास अडचणी १६७

आपाजी वणजरे, आमीनभावीहून बातमीपत्र, इंग्रज वगैरेच्या लष्करी हालचालीबाबत १०२

आपाजीराव जाधव, जप्तनमुलख इचलकरंजीकराच्या फौजेच्या हालचालीची हकीकत, ११२, ११४, ११८, १२५, १२६, १२७, १२८, १३०; किल्ले मनोहरगड स्वाधीन होण्याबाबत १५४, १५५, १६७

आपाजीराव सितोळे, इंग्रज सरकारचे इलाख्यातील ३४, सीमांतर खटल्याबाबत १६२.

आपु सांवत, सांवतवाडी इलाख्यांत बंड १५०, १५१

आबा खासबारदार, कारभारी महाराजांस बदसल्ला देणारे १६३

आबा निकम, इंग्रज पलटणांच्या हालचालीचें बृत्त १२३

आबाजी पोवार, निपाणकरांची बातमी ७५

आबाजी भोसले, ठाणे आंदूर बातमीपत्र ५६

आंबाजी यशवंत ५९

आबाजी सदासिव ११६

इलफीष्टन, मोट ईष्टुवट, प्रजिदेत गवरनर बहादर जंजिरे मुंबई, छत्रपति आबासाहेब महाराजांच्या मृत्यूबाबत १, प्रसिद्धगड सोनगड किल्ल्याच्या तनख्याच्या ठरावाबाबत २, करवीर महाराजांचे जाबसाल इचलकरंजीकर वगैरे बाबत इंग्रजबहादराकडून उलगडून घेणें १०, २९, करवीर छत्रपति महाराज व वाडीकर सांवत यांच्या लढयाबाबत २७, २८, करवीर छत्रपति महाराजांचे जाबसाल उलगडणें ३२ कागल जहागीर हिंदुराव घाटगे सर्जाराव यांच्या स्वाधीन करण्याबाबत करवीर छत्रपति महाराजांना पत्र ५७, छत्रपति महाराजांनी कागल तालुक्यांत तंटा न वाढविण्याबाबत ७०, कागल तालुक्याबाबत, १५३

एकोपागोडा चिन्या १६९

कृष्णाजी जगताप १०७, ११९

कृष्णाजी नाईक निबाळकर किल्ले प्रसिद्धगड इंग्रजी पलटणांच्या हालचाली ९०

कृष्णभट पुजारी, वाडीकर वेदशास्त्रसंपन्न दत्तजयंतीचे उत्सवाबाबत १७९

कृष्णराव गोपाळ-घाटगे व सेनापति यांनीं निपाणीकरास सामील होऊन राज्यास अपाय केला ३९

कृष्णराव माधव गद्रे करवीर छत्रपति महाराज व च्यापलीनसाहेब यांच्या भेटीचा समारंभ ५३, कटकोलचे ठाणें हुजूर स्वाधीन होण्याबाबत ७६

केशवराव कुरुंदवाडकर फौज जमावसुध्दां कुरुंदवाडास आगमन ९८, १७८

खेमसांवत भोसले, राजे सांवतवाडीकर बंडवाल्यांचा उपद्रव १४७, १४८, १४९, १५०, १५९, १६०

खंडोजी नाईक भोसले यात्रेस जाणे ७

खंडेराव नाईक निंबाळकर, नागाव्याचा ऐवज इंग्रजबहादरास देण्याबाबत आज्ञा १३८

गणपतराव जाधव, सरनाईक कडकोल, तोरगल तालुक्यांतील बातमी ७८, ९४, १२१, झुंजाची हकीकत १३१, १३५

गणेश दप्तरदार ५३

ग्रांटसाहेब, रसिदेंटबहादर, सातारा ६, सातारा छत्रपतिमहाराज कोल्हापुरास देवीचे दर्शनास जाणार २०

गिरधरराव शिंदे, बनूर १७७

गिलबर्ट, बहादर, कलेक्टर जिल्हा दक्षिण प्रांत कोंकण करवीर छत्रपतिहाराजांविरुद्ध प्रतिनिधि विशाळगडकरांची तक्रार ५९

गोपाळराव गोविंद करवीर महाराजांचे जाबसाल इचलकरंजीकर वगैरे बाबत इंग्रजबहादराकडून उलगडून घेणें ९, १०, १३, १६, १७, १८

गोविंदराव अमात्य, बावडेकर, आपसांतील खटल्यांच्या निवाडयाबाबत १५८

गोविंदराव बाबासाहेब राजे घोरपडे १३७

गोविंदराव शिंदे कटकोलचे ठाणें हुजुरांचे स्वाधीन करण्याबाबत ७६

गोविंदा लोहार १६९

गंगाधर दामोदर मनोली हुकेरी प्रांत देखील चिकोडी हुजुरांना मिळाली ५८

गंगाधर रावसाहेब मिरजकर १८३, करवीर छत्रपतिमहाराजांची तुळजापूर यात्रा १८३

गंगाधर लक्ष्मण १३७
च्यापलीन उइल्यम कमिशनर बहादूर करवीर महाराजांच्या किल्ल्यांच्या तनख्याच्या ठरावाबाबत मुंबई गव्हर्नरांचा हुकूम २; करवीर छत्रपति महाराजांचे जाबसाल उलगडणे ६, २१, २७, २८, ३०, साताराराज्याची वहिवाट सातारा महाराजांचे सुपूर्द २२, फौज, पलटणे वकील मंडळीसुद्धां, इसलामपूर मुक्कामीं येणे ४७, ४८, ४९, ५२, धारवाड नजीक करवीर छत्रपतिमहाराजांची समारंभाने भेट ५३, ५४, कागलची जहागीर हिंदुराव घाटगे यांच्या सुपूर्द करण्याबाबत करवीर छत्रपतिमहाराजांना पत्र ५७.
चिंतामणराव आपा पटवर्धन इचलकरंजीकरांस करवीर छत्रपति महाराजांविरुद्ध कुमक १७, १२३, १२६
चिमणाजी सखदेव ६
चेदोपंत वकील निसबत संस्थान रामदुर्ग सीवखटल्याबाबत १८२
जयराम सांवत, सांवतवाडी इलाख्यांत बंड १५०, १५१
जयसिंगराव घाटगे, सर्ज्याराव वजारतमाब स्वामीसेवेस उत्सुक ३७
जिजाजीराव खानवेलकर, मुंगलीहालच्य झुंजाची हकीकत ४२; इंग्रज पलटणांच्या हालचालीचें वृत्त १०४, १२३
जिवराव जाधव, हवालदार इंग्रज वगैरेच्या लष्करी हालचालीबाबत बातमीपत्र १००, १०४; नागाव्याचा ऐवज इंग्रज. बहादरास देण्याबाबत १३८; सांवतवाडी इलाख्यांतील बंडवाल्यास कुमक न करण्याबाबत छत्रपति महाराजांन पत्र १४७; महाराजांस बदसल्ला देणारे १६३
जीवनराव शिर्के २१
जोतीराम घाटगे झुंजारराव, मुंगलीहालच्या झुंजांत जखमी ४२
जोत्याजीराव घाटगे झुंजारराव, भोजहून बातमीपत्र १००, १०४
जोत्याजीराव नाईक निंबाळकर, नागाव्याचा ऐवज इंग्रजबहादरास देण्याबाबत १३८; महाराजास बदसल्ला देणारे १६३
टोनसंडसाहेब इडवार्ड ह्यु पोलिटिकल एजंट प्रांत कर्नाटक चोरी वगैरे बाबत करवीर छत्रपति महाराजांकडे चौकसी १८०;
डनलोपसाहेब ज्यान अदरियू पोलिटिकल एजंट सुभा धारवाड, करवीर छत्रपति महाराजांनीं कारभारी नेमण्याबाबत १६४; करवीर इलाखेदारांच्या आपसांतील खटल्यांच्या निवाड्याबाबत १६८, १६९, १७३, १७५, १७७; तोरगल इलाखेवाले जाबसाल उलगडून देत नाहींत १६९; किल्ले विशाळगड येथें गर्दी झाली त्याबाबत जाबसाल उलगडणें १७०; किल्ले मनोहरगड येथील गडकऱ्यांच्या गैरपद्धतीच्या वर्तणुकीबाबत १७१, १७२, १७४, १७६, कौन्सल मुंबई हुद्दयावर १८४; करवीर छत्रपतिमहाराजांच्या मृत्यूचे वृत्त १८४
ताकरीनसाहेब इंग्रजबहादूर इचलकरंजीकर घोरपडे यांनीं करवीर छत्रपति महाराजांच्या आज्ञेत वर्तणूक करण्याबाबत ३, ९, १०, १५, १६, १७, १८, २४, २५; करवीर राज्यांत चोर चोरट्यांच्या बंदोबस्ताबाबत २३, ३३

तुलोजीराव घाटगे, सर्ज्याराव, कागलचे ठाणे हुजूरची आज्ञा होतेक्षणीं हुजूर देऊ याबाबत करार ३९
तोरगल इलाखेवाले इंग्रजांकडील जाबसाल उलगडून देणें १६९, १७७, १८२
दाजी सखारामपंत देशपांडे ४९
दादीबाई सांवतवाडीकर, बंडवाल्यास सामील १४८, १४९, १५०
दिनकरराव गायकवाड, मुरारराव घोरपड्यांच्या मृत्यूचे वृत्त ३५, ३६
दिवाणसाहेब महाराज, करवीर छत्रपति महाराजांची भावजय तुळजापूर यात्रेस १८४
देवराव नाईक रुई, कब्नूर येथे हुजूरचें ठाणें घालण्याबाबत ८२
दौलतराव जाधव, ठाणे शिरोले च्यापलीन साहेबाची फौजेसुद्धा हालचालीचे वृत्त ४७, ४९
दौलतराव शिंदे आलिजाबहादर, कन्येच्या लग्नाचे करवीर छत्रपति महाराजांना आमंत्रण २६, कागल जहागीर हिंदुराव घाटग्यांना मिळण्याबाबत ५७, १५३
धोंडजीराव नाईक निंबाळकर लष्करांतून बातमीपत्र, इंग्रज वगैरेच्या लष्करी हालचालींबाबत १००, १०४, ११९
नरसिंगराव रामाजी, सांवतवाडी इलाख्यांतील बंडवाल्यांस कुमक न करण्याबाबत १४७
नरसिंगराव शिंदे, कितूरकराकडील चाकरींत स्वारलोक न पाठविण्याची आज्ञा ४६, सांवतवाडी बंडवाल्याना कुमक न करण्याबद्दल १४७, १४८, १४९
नरसिंगराव सुरवसी, सरनोबत; ठाणे अकीवाट ७९
नरहरपंत निपाणीकरांकडील इंग्रजांचे पहाऱ्यांत ११५
नाथाजी शिंदे, हवालदार मुंगलीहालचे झुंजांत ठार ४२
नाना फडणीस १५३
नाना सांवत, सांवतवाडी इलाख्यांत बंड १५०, १५१
नारायणराव घोरपडे, इचलकरंजीकर करवीर छत्रपतिमहाराजांच्या आज्ञेंत वर्तणूक करण्याबाबत ३, ६, ९, १०, ११, १२, १३, १४, १५, १६, १७, १८, १९, २४, २५, ६०, १०३, १०८, झुंजाची हकीकत १०९, ११०, ११४, ११८, १२५, १२६; १२७
नारायणराव पंडित राजाज्ञा नागाव्याचा ऐवज इंग्रज बहादरास देण्याबाबत १३८, १४२; कदीम कारभारी १६३
नारायणराव भोसले १०५
नारायणराव मगदूल ९३
नारो गिरमाजी वकील ६; वकिलाचे कामावर रुजू होण्याबाबत पोलिटिकल एजंट सुभा धारवाडचें पत्र १५, १६, १७; १८; २१; ६६, कटकोलचे ठाणे हुजुरांचे स्वाधीन करण्याबाबत ७६, ९६
नारो गंगाधर निपाणकराची बातमी ७९,
नारोपंत, निपाणकरांच्या वतीने सरंजामाबाबत बोलणे करण्यास मुंबईस रवाना ११५
निपाणकर पाहा सिदोजी नाईक निंबाळकर देसाई सरलष्कर निपाणी
निसबट साहेब, पोलिटिकल एजंट, सुभा धारवाड करवीर छत्रपति महाराजांच्या स्वारीशिकारीस तोंड देण्यास इंग्रजांची

लष्करी तयारी ८५, ८७, ९०, ९२, ९७, ९९, १००, १०१, १०२, १०३, १०४, १०६, १११, ११५, ११७, ११९, १२०, १२४, १६१, १६३
प्रतापसिंग महाराज छत्रपति सातारा, कोल्हापुरास देवीचे दर्शनास २०; राज्याची वहिवाट सुपूर्द २२
पांडुरंग भास्कर जोग, आखबरनवीस १६४
फोंडसांवत तांबूळकर, सांवतवाडी इलाख्यांत बंड १४७, १४८, १४९, १५०, १५१, १५९, १६०
बच्याजी अनंत वकील, प्रसिद्धगड व सोनगड किल्ल्यांच्या तनखेच्या बोलण्याबाबत २
लवंतराव चिटणीस हुजुरांचे कामगिरीवर पुणे मुक्कामी २१; ६६
बळवंतराव घाटगे झुंजारराव, ठाणे अकीवाट ७९
बहिरजी बापू सरंजामसुद्धां लोक पाठविण्यास आज्ञा ५०, ५१
बहिरजी मोहिते, करवीर छत्रपति महाराजांच्या गांवास उपसर्ग ६
बापूजी गोपाळ परांजपे, सराफ १८०
बापूजी सिवराम १, ६
बाबामहाराज श्री यात्रेस जाणें. ७
बाबा सांवत, सांवतवाडी इलाख्यांत बंड १५०, १५१
बाबाजी जगदाळे १०५
बाबाजी सुर्वे; ठाणे कडकोल व तोरगल तालुक्यांतील बातमी ७८, ९४, १२१; झुंजाची हकीकत १३१, १३२,
बाबासाहेब छत्रपति राजे पाहा शहाजी ऊर्फ बुवासाहेब महाराज छत्रपति (इ. स. १८२१ ते १८३८)
बाबूराव अमात्य हुकमतपन्हा आपसांतील खटल्यांच्या निवाड्याबाबत १५८
बाबैयसाहेब महाराज छत्रपति शहाजी उर्फ बुवासाहेब महाराजांचे कुटुंब सती जाण्याचा दुराग्रह १८४
बालकृष्ण बाबूराव वकील, च्यापलीन बहादराकडून हुजुरांचे लष्करास आले ५२, करवीर छत्रपति महाराज व च्यापलीन साहेबबहादूर यांच्या भेटीचा समारंभ ५३
हुजुरांच्या स्वारीशिकारीस तोंड देण्यास इंग्रजबहादराची लष्करी तयारी ८५, १०३, ११७, १२४, १३४, १३५
बालाजी सिवदेव ठाणे हलकर्णी ११९
बाळाजी बाजीराव चिटणीस भाऊमहाराज श्री यांचे मुंबईस जाण्याचें वृत्त ५, ७, ३२, इचलकरंजीकर घोरपडे यांच्या अमर्याद वर्तणुकीबाबत जाबसाल इंग्रजबहादराकडून उलगडून घेणें व करवीर छत्रपति महाराजांचे जाबसाल इंग्रजबहादराकडून उलगडून घेणें. १०, १४
बाळाजी महादेव, कोगनोळीच्या स्वारीची हकीकत ९१
बेबर, थॉमस हार्वे, साहेब बहादर विशाळगडकर प्रतिनिधीशीं हुजुरांनी केलेल्या तंट्याबाबत ६४, ६५, करवीर छत्रपति महाराजांचे जाबसाल उलगडणे ६८, ७०, १५७, १५८ ते १६३, १७५
भगवंता आपा देशपांडे १६९
भरमोजी सिदराम जाधव देसाई, नाडगौडा लोक सरंजामसुद्धा पाठविण्यास आज्ञा करणें ५०, ५१

भवानराव बाजी घाटगे सीमांतर खटल्याबाबत १६२
भाऊमहाराज श्री कैफियती, सरदार, सरंजामदार संस्थानिकांच्या लिहवून पाठविण्याबाबत ४, मुंबईस जाण्याचें वृत्त ५, ७, ३२, करवीर छत्रपति महाराजांचे जाबसाल इंग्रजाकडून उलगडून घेणे ६, १०, १४, १६, १९, ६०, ९६, १११, दौलतीची तमा ठेवून बखेडा केला ३०, वकिलीचे कामावरून दर ३१, ३३, कागलचें ठाणे हुजूरची आज्ञा होते क्षणी हुजूर देऊं, याबाबत करार ३९
भिमराव मुनसी, दुय्यम बहाहराकडील ५३
भुजंग रामाजी तोरगलकरांकडील ७६
महिपत रावजी पारसनवीस १७८
माणसिंगराव घोरपडे चापलीनसाहेब बहादरास भेटले ४९
माधवराव घाटगे कोटबागी येथील इंग्रज पलटणांना तोंड देण्याची तयारी ९५, ९६, १०६, ११९
माधवराव भगवंत प्रतिनिधि विशाळगडकर २१, करवीर छत्रपति महाराजांचे अवकृपेचे भाव ४१, अमर्यादा वर्तणुकेमुळे सरंजाम जप्त ५९, ६४,
मानशिंगराव घोरपडे इचलकरंजीकरांच्या फौजेच्या हालचालीची हकीकत ११४, ११८, १२५, १२६, १२७, १२८, १३०
मालोजी देशमुख, हिंदापूरकर इचलकरंजीकरांच्या लढाईत जखमी ११८
मुरारराव घोरपडे मृत्यु ३५
मोरो बाजीराव चिटणीस कागलचे ठाणे हुजूरची आज्ञा होते क्षणीं हुजूर देऊं, याबाबत करार ३९, ६६
यमुना बागलकोटकर ७४
यलियट जॉर्ज, साहेब कलेक्टर, जिल्हा दक्षिण प्रांत कोंकण रत्नागिरी सांवतवाडीतील बंडखोरांबाबत १५१, संस्थान गगनगड ऊर्फ बावड्याबाबत १५६
यशवंतराव विचारे बातमीपत्र ६४
याकुब भालदार, कोगनोळीच्या स्वारीची हकीकत ९१
येशवंतराव घाटगे, कागल देशमुखी बाबत १६८
येशवंतराव घोरपडे १३७
येसाजीपंत वकील निसबत कागलकर १७३
रघुनाथराव चव्हाण, ठाणे कोगनोळी बातमीपत्र ५५, इंग्रजांचे लष्कराचा मुक्काम निपाणीवर ७१
रघुनाथराव पडवल हवालदार, किल्ले विशालगड हुजुरांच्या हूकूमाप्रमाणे चालविण्यास अडचणी १६७
रताजीराव चव्हाण, हिंमतबहादर हूजुरांकडून सरंजामाबाबत कलमें करार ६९, स्वारीवर निघाले ८०, ८६, हुजुरांचीं ठाणीं बसविलीं ८८, ८९, इंग्रज पलटणांना तोंड देण्याची तयारी ९२, ९३, ९७, १०१, ११२, ११६, ११९ इचलकरंजीकरांच्या झुंजाची हकीकत ११८
राघोजीराव निंबाळकर, सरनोबत स्वारीवर निघाले ८०
राजे बाबासाहेब छत्रपति पाहा शहाजी ऊर्फ बुवासाहेब महाराज छत्रपति
राजे बालासाहेब छत्रपती संभाजी ऊर्फ आबासाहेबमहाराज छत्रपती यांचे पुत्र १; मृत्यूचेंवृत्त १७

राणोजी नाईक निंबाळकर, नामजाद किल्ले प्रसिद्धगड इंग्रजी पलटणाच्या हालचाली ९०
राणोजीराव घोरपडे, मृत्यूचें वृत्त १४४
राधाबाई भगवंतराव पंडित प्रतिनिधि, दत्तविधानाबाबत १५२
राधाबाईसाहेब संस्थान रामदुर्ग, तोरगलकर सेनाखासखेलकडून उपद्रव १६९
राबिसनसाहेब, बहादर ६
रामचंद्र कृष्ण मामलेदार, चिकोडी सीमांतर खटले पंचात फैसल करून घेण्याबाबत १६२
रामचंद्र धोंडी चिटणीस ३
रामचंद्र बलाल, प्रसिद्धगड व सोनगड किल्ल्यांच्या तनखेच्या बोलण्याबाबत २
रामचंद्र बाबूराव काळे १८०
रामचंद्रशेट पाथरे, ठाणें चिकोडी बातमीपत्र ५४
रामराव साळुंखे; पळूसकर तोरगलानजीक गोळी लागून ठार ७७
रामाजी भिमराव वकील, धारवाड १३९, १४०, १४१, १४२, सांवतवाडी इलाख्यांतील बंडाबाबत १४९, किल्ले मनोहरगड येथील गडकऱ्यांच्या गैरपद्धतीच्या वर्तणुकीबाबत १७१, १७२
रामाजी यशवत रुई, कबनूर येथे हुजूरचें ठाणे घालण्याबाबत ८२
रायबलवंतराव विठल मोहोलकर ५
रावजी वाकनीस किल्ले विशाळगडच्या बंदोबस्ताबाबत हुजुरांचा हुकूम १६७
रीडसाहेब, इंग्रजबहादर करवीर महाराजांच्या कोंकण मुलुखाच्या बंदोबस्ताचे जाबसाल उलगडणे ८, २७, २८
लहूजी पवार, संकेश्वर; सामानगड; नूलभागांतील बातमीपत्र ८१, श्री भाऊमहाराजांकडील गांवांत हुजूरचें ठाणें घातलें ८३, ८८, ८९, ९३, ९७, किल्ले सामानगडाहून बातमीपत्र १०१ १११, हुजूरची ठाणीं घालणे ११२
लक्ष्मणराव राजे घोरपडे, मुधोळकर १३७
लक्ष्मणराव शिंदे, सेनाखासखेल, तोरगल हुजूर आज्ञा पाळली नाही ७३; कडकोल व तोरणगटे येथील झुंजाबाबत १३६, रामदुर्गकरास उपद्रव १६९, १७८
लक्ष्मणशास्त्री शिराळकर, स्वारीचा मुहूर्त सांगणार ज्योतिषी ८०
लक्ष्मीबाई घोरपडे,राणोजीराव घोरपड्यांची पत्नी, सरंजामाबाबत १४४
लाला विक्रमाजित मुनसी करवीर छत्रपति महाराजांच्या भेटीचा समारंभ ५३
लिंगो नरसिंव्ह ९
लिंगोधर गंगापूरकर १७३
लिंगोपंत, निपाणीकराकडील वकील ११५
व्यंकटराव नलवडे हवालदार, सुभा मनोली तोरगलकरांच्या फौजेच्या झुंजाचे वृत्त १२९
व्यंकटराव बळवंत, ठाणे बागेवाडी, इंग्रज पलटणांच्या हालचालीचें वृत्त १२४
व्यंकाजी भिवराब १०९
वाकरीन बहादर करवीर छत्रपति महाराजांच्या भेटीचा समारंभ ५३
वाडीकर सांबत, करवीरकरांचे जाबसाल इंग्रज बहादराकडून उलगडून देणें २७, ६५, सांवतवाडी इलाख्यांत बंड १४७ ते १५१, १५९, १६०
वारडीनबहादर, दुय्यम कमिशनर करवीर छत्रपति महाराजांच्या भेटीचा समारंभ ५३

विठल दादाजी वकील, संस्थान गगनगड १५६
विठलराव मोहिते, ठाणे अकीवाट ७९
विठोजी मूर्ते ८३, ८७
विरापा मोर्ती बातमीपत्रे ९५; हुजुरांचीं ठाणीं घालण्याबाबत १०७, १११, ११३, ११७
विसाजी नारायण ६
वीरभद्र आपा देसाई देशपांडे; नाडगौडा तोरगलकराबरोबर झालेल्या झुंजाची हकीकत १२१
बोवानसाहेब, कर्नल रेसिडेंट सातारा, करवीर छत्रपति महाराजांच्या प्रकृतीबाबत बातमी १८४
शहाजी ऊर्फ बुवासाहेब महाराज छत्रपति (इ. स. १८२१ ते १८३८)
१ इचलकरंजीकर घोरपडे यांनी महाराजांचे रजातलबेंत चालणें ३, १५ १८, १९, २४, २५, ६०, १०९, ११०, ११४, १२५
सातारा छत्रपति महाराज कोल्हापूरचे देवीदर्शनास २०, लग्नवाङ्निश्चय २१, राज्यांतील चोर-चोरट्यांचा बंदोबस्त २३
करवीर छत्रपतिमहाराज व वाडीकर सांवत यांच्या लढ्याबाबत २७, २८ ६५; २६
करवीर छत्रपति महाराजांचे जाबसाल इंग्रज बहादराकडून उलगडून घेणे ३०, ३२, ३३, ६०, ६८, ७०; ३५, ३७, ३८, ४१, ४३, ५२
मुरारराव घोरपड्यांचा मृत्यु ३५, ३६, हिंदुराव घाटगे, सर्ज्याराव यांजकडून स्वामीसेवेची कलमें करार करून घेणे ४०; मुगलीहाल येथील झुंजाची हकीकत ४२, च्यापलीनसाहेबबहादराच्या समारंभाने झालेल्या भेटीचें वर्णन; हुजुरांच्या बरोबर होते त्या अष्टप्रधान, सरदार, सरंजामदारांचीं नांवें तपशीलवार ५३, कागलची जहागीर हिंदुराव घाटगे सर्जाराव यांच्या सुपूर्द करण्याबाबत इंग्रजबहादराकडून पत्र ५७, प्रतिनिधींनी बदनामली केली सबब त्यांचा सरंजाम जप्त. ५९, ६४ कागलकर घाटगे घराणे व करवीर छत्रपति महाराज यांच्यामध्यें पूर्वापार निर्माण झालेल्या शत्रुमित्रत्वाबाबत हकीकत ६१, सरलष्करचीं वस्त्रें देण्याचा समारंभ ६७
हिंमतबहाद्दरांचा सरंजाम करार करून दिला ६९, तोरगलास पाठविण्याचे हुजूरांचें आज्ञापत्र ७३, कटकोलांत हुजूरचें ठाणे सुरू झालं ७६, ९४, तोरगलानजीक मुक्काम ७७, ७८, ७९ शिरढोण वगैरे भागांतील स्वाऱ्यांना आळा घालण्यास इंग्रज बहादराची लष्करी तयारी ८५, ८६, ८८, ९० ९२, ९३, ९७, ९९, १००, १०१ १०३, १०४, १०६, ११०, १११ ११५, ११६, कोगनोलीच्या स्वारीची हकीकत ९१, ११७, ११८, ११९, १२४, १३४, कडकोळ येथें झालेल्या तोरगलकरांच्या फौजेच्या झुंजाचें वृत्त १२९, १३१, तोरणगटेच्या लढाईची हकीकत १३२, १३४, १३५, १३६, १३७, ऐतिहासिक प्रसंगांचें टिपण (इ. स. १७७४ ते १७९८) या कालांतील १५३, श्रीक्षेत्र करवीर

येथील नगरपालिकेबाबत हकीकत १४६
सांवतवाडी इलाख्यांतील बंडवाल्यास आश्रय व कुमक न करण्याबाबत इंग्रज बहादराकडून बोलणें १४७, १४८, १५९, १५१, १५९, १६०, विशाळगड प्रतिनिधीच्या दत्तकप्रकरणावाबत १५२
किल्ले मनोहरगडच्या बंदोबस्ताबाबत १५४, १५५
संस्थान गगनगड ऊर्फ बावडा याबाबत १५६
करवीर इलाखेदाराचा आपसांत खटला असल्यास महाराजांनी इत्तल्ला करण्याबाबत १५७, १५८, १५९, १६०, १६१, १६३, १६८, १६९, १७३, १७५, १७७, १८०
कारभाऱ्याच्या नेमणुकीबाबत १६४
दौलतीचें कामकाज चालविणेबद्दल यादी १६५
तलीखोरांचा बंदोबस्त १६६, किल्ले विशाळगडचा बंदोबस्त १६७, १७० मनोहरगडास जाणे १७२, १७४ १७६, तुळजापूर निवासनीची यात्रा १८३, मृत्यु १८४; १८१, १८२
शंकरराव शिंदे सेनाखासखेल, तोरगल हुजूर आज्ञा पाळली नाही ७३
शंकरराजीराव घोरपडे इचलकरंजीकर पारिपत्य करण्याबाबत हुजूर आज्ञा ११
सकुबाई सिंदे दौलतराव सिंदे आलिजाबहादरांची कन्या-विवाह २६
सखाराम माणकेश्वर देशपांडे हुजूर आज्ञेप्रमाणें चापलीन साहेब बहादरास भेटले ४८, ४९; इंग्रजबहादरांच्या लष्करी हालचालीची बातमी ९९, ११५
सखारामपंत देशपांडे वकील, कागलकर घाटगे यांजकडील १६८
सखो केशव परांजपे किल्ले विशाळगड येथे झालेल्या गर्दीबाबत १७०
सखोजी बुवा, ठाणें चिकोडी बातमीपत्र ५४
सदाशिव रामचंद्र इंग्रज लष्करी अधिकाऱ्याच्या हालचालींचें वृत्त १२२
सदाशिव आनंत ६
सदाशिवराव जोसी, दिवाण दत्रात्रयाच्या पूजानंदादीपाबद्दल जमीन इनाम १४५
सयाजीराव जाधव, सरनोबत ठाणे सिरोल, इचलकरंजीकरांबाबत बातमी ८४, ९८, १०८, १०९, झुंजाचें वृत्त ११०, १२५
सिदोजी नाईक निंबाळकर देसाई सरलष्कर निपाणी ७५, फौजेच्या तयारीबाबत वृत्त ९९, १११, ११५
सिमसनसाहेब इंग्रजबहादूर, पोलिटिकल एजंट प्रांत कर्नाटक फिर्यादी व खटल्याबाबत करवीर छत्रपतिमहाराजांकडे चौकशी १८१, १८२
सुबराव घोरपडे, हिंदुराव कटकोलचें ठाणें हुजूर स्वाधीन होण्याबाबत ७६
सुभानजी निकम, ठाणे अकीवाट ७९, स्वारीवर निघाले ८०
सुभानजी निकम हुजऱ्या, पत्ता लावून दस्तगीर करावयास आज्ञा १३९, १४१
सुभानजी सालोंखी, इंग्रज पलटणांना तोंड देण्याची तयारी ९५
सुंदराआईसाहेब महाराणी श्रीमन्महाराज मातोश्री छत्रपति आबासाहेब महारा-

जांच्या मृत्यूबाबत मुंबई गव्हर्नरास पत्र १, कैफियती लिहिण्याबाबत ४, भाऊमहाराज श्री यांचें मुंबईस जाण्याचें वृत्त ५, ७, ३२, कोंकण मुलुखांच्या बंदोबस्ताचे जाबसाल इंग्रजबहादराकडून उलगडून घेणें ८, करवीरमहाराजांचे जाबसाल इचलकरंजीकर वगैरे बाबत इंग्रज बहादराकडून उलगडून घेणे १०, १४, मुराराव घोरपडयाच्या मृत्यूचें वृत्त ३५, ३६, ५२; धारवाडनजीक समारंभानें भेटी,च्यापलीनसाहेबबहादर व करवीर छत्रपतिमहाराज यांच्या झाल्या ५३;हुकेरी प्रांत देखील चिकोडी करवीर राज्यास जोडली ५८

सुंदराबाई ऊर्फ नानीसाहेब घाटगे ३७, कागल तालुक्यांतील खटल्याबात ७०

सुदराबाई वहिनी करवीरमहाराजांच्या वकीलाचें पुण्याहून बातमीपत्र ६, २१, हुबळीहून बातमीपत्र ६६

संताजीराव घोरपडे, सेनापति इंग्रज पलटणांना तोंड देण्याची तयारी ९२, ९३, ११६; इचलकरंजीकरांच्या झुंजाची हकीकत ११८

हणमंत सांवत, सांवतवाडी इलाख्यांत बंड १५०, १५१

हणमंतराव निंबाळकर सरलष्करीचीं वस्त्रें देण्याचा समारंभ ६७, स्वारीवर निघाले ८०

हरी जाधव ५०, कोगनोळीच्या स्वारीची हकीकत ९१

हरिलालपूर गोसावी,करवीराहून तीर्थयात्रेस जाणार ४३

हिंदुराव घाटगे सर्ज्याराव, कागलकर स्वासेवेचीं कलमें करार करून देणें ४०, ४४; जहागीर स्वाधीन होण्याबाबत ५७; घराण्याचा इतिहास ६१, १५३

हैबतराव गायकवाड, विश्वासराव सरलष्करची वस्त्रें देण्याचा समारंभ ६७, ७२

करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाचीं साधनें

(भाग सातवा)

कोल्हापूर स्टेट रेकॉर्डांतून निवडलेले कागद

छत्रपति शिवाजी ऊर्फ बाबासाहेब महाराजांची कारकीर्द

इ. स. १८३८ ते इ. स. १८६६

व

कालखंड इ. स. १८६७ ते इ. स. १८७८

संपादक

मा. वि. गुजर, बी. ए.

शके १८८४ इ. स. १९६२

प्रस्तावना : ७

करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाचीं साधनें, भाग सातवा यांत कोल्हापूर स्टेट रेकॉर्डातून निवडलेले कागद छापले आहेत. ही पत्रसंख्या ८४ आहे. त्यांपैकी ले. १ ते ८१ हे लेख छत्रपति शिवाजी ऊर्फ बाबासाहेबमहाराज यांच्या कारकीर्दीतील आहेत. बाकीचे तीन लेख कालखंड इ. स. १८६७ ते १८७८ या कालांतील आहेत. या लेखांतील ऐतिहासिक मजकुरासंबंधीं सारांशरूपानें दिग्दर्शन पुढें केलें आहे.

कैलासवासी छत्रपति शहाजी ऊर्फ बुवासाहेबमहाराज यांच्या अस्थींबरोबर श्रीमन्महाराज बाबैसाहेब यांचा सती जाण्याचा अत्याग्रह होता. त्यांच्या निग्रहापुढें कोणाचा इलाज नव्हता, हें वृत्त ले. १ मध्यें आहे. बिदेसी व कराबिनवाले परदेसी वगैरे लोकांना नोकरींत ठेऊं नये; ठेविले असतील त्यास आजपासून तीन रोजांत निरोप देऊन रवाना करावे. त्या लोकांनीं कोल्हापुरांत न राहतां आपआपले ठिकाणीं घरीं जाऊन रहावे. याचें कारण हुजूरचे व कुंपणी सरकारचे दोस्तीमुळे हल्ली हुजुराजवळ जाजती सिबंदीचें कारण नाहीं; व हुजूरच्या पदरच्या लोकांनीं नवीन जाजती सिबंदी ठेवण्याचा रिवाज नाहीं ही माहिती ले. ५ व ६ मध्यें आहे. घाटमाथ्यावर चौक्या ठेवून बंदोबस्त करण्याबाबत इंग्रजसरकारकडून यादी आली. त्याप्रमाणें फोंडे घाटास पन्नास आसामी लोक व एक हुशार कामदार पाठवून बंदोबस्त राखण्याबद्दल हुजुराची आज्ञा झाली यासंबंधी माहिती ले. ७, ३, ४ व ३७ मध्यें आहे. इंग्रज सरकारच्या हुकुमाप्रमाणे अमृतराव प्रतिनिधि संस्थान विशाळगड, यांच्या संस्थानची मुखत्यारी मातुश्री राधाबाईसाहेब प्रतिनिधि यांच्यांकडे दिली, हें वृत्त श्रीमन्महाराज छत्रपति महाराजांच्या वकिलाच्या यादींत व इतर लेखांत आहे (ले. ८, ९, १० २०, ३८). छत्रपति महाराज सरकारांतून आपले कामकाज करण्यास बंदी झाली ही हकीकत हणमंतराव निंबाळकर, सरलष्कर यांनीं हुजुरांना समक्ष सांगितली (ले. ११). कागल तालुका महाराज छत्रपतिसाहेब यांचा इलाखा म्हणण्यास संशय राहिला नाही; कागलकरांनीं महाराजांच्या आज्ञेप्रमाणें वर्तणूक करावी याबाबत इंग्रज सरकारचें पत्र तारीख १७ जानेवारी १८४० इसवीचे आलें, ही माहिती ले. १२ मध्ये आहे. अशीच माहिती ले. १३, १८, ५४ या लेखांत आहे.

सर्वांनीं चांगल्या रीतीनें वर्तणूक करावी याबद्दल ठराव करून त्या ठरावाची अंमलबजावणी व्हावी या हेतूने श्रीमन्महाराज मातुश्री दिवाणसाहेब यांनीं आज्ञा केली, ही माहिती ले. १४, १५, ४७ व ५२ या लेखांत आहे; इचलकरंजीकर घोरपडे हे छत्रपति महाराजसाहेब यांच्या इलाख्यांतील आहेत याबाबत पत्र इंग्रज

सरकारबहादर यांजकडून तारीख ७ मार्च सन १८३९ इसवी रोजीं आलें, हा उल्लेख ले. १६ मध्ये आहे. किल्ले मनोहरगड येथील गडकऱ्यांनीं अलीकडे पांचसहा वर्षांपासून सरकार हुकुमास विरुद्ध वर्तणूक करून. हुजूरच्या मामलेदारास किल्ल्याखालीं घालवून बंडाचा इरादा धरला सबब शके १७५८ मध्ये हुजूरची खासास्वारी किल्ल्यास फौजसुद्धां जाऊन, किल्ल्याचा बंदोबस्त करून, तेथें मामलेदार ठेवून, गडकरी कैद करून व कांहीं मख्तेसर आसामी करवीरास आणून कैदेंत ठेविले. किल्ल्यावर मामलेदार याजपाशी हुजूरचे लोक ठेवून बंदोबस्त केला, यासंबंधीं माहिती ले. १९, ३३, ३४, ३५ व ४८ या लेखांत आहे. नरसिंगराव सिंदे, नेसरीकर यांजकडील सरंजामाचा ठराव झाला. त्या ठरावाची यादी ले. २४ व ले. ४५ या लेखांत आहे. श्रीमन्महाराज छत्रपति सातारा यांची स्वारी साताऱ्याहून करवीरास श्रीचे दर्शनास आली. त्या समयीं हुजूरांच्या भेटी झाल्या. त्या भेटीची एक विस्तृत हकीकत देणारी एक यादी उपलब्ध आहे (ले. २६). गांवगन्ना मनुष्यें खरेदी घेऊं नये व विकूं नये असा सरकारांत ठराव केला. त्या ठरावाची अंमलबजावणी होण्याबाबत हुजुरांनीं रताजीराव चव्हाण हिंमतबहादर व रघुनाथराव पंडित अमात्य यांना आज्ञापत्रें पाठविलीं (ले. ३०, ३१). रघुनाथराव नलवडे यांनीं कैदी सुबराव यास आश्रय दिला. त्याबाबत पक्की हकीकत राजमंडळ हुजूर करवीर सरकारनें अंडरसनसाहेबबहादर असिस्टंट पोलिटिकल एजंट प्रांत कर्नाटक यांना कळविली (ले. ५९). तसेंच गावगन्ना रात्रीं दरवडे पडून चोरांचा उपद्रव होतो तो न व्हावा म्हणून बंदोबस्त ठेवण्याबद्दल जी योजना ठरविली त्यासंबंधीं माहिती ले. ६० मध्यें आहे. किल्ले भुदरगड येथील पथकाचे लोक सरकार आज्ञेप्रमाणें वर्तणूक करीत नाहीत; तरी त्या लोकांनीं किल्ल्याच्या तनख्यांत राहू नये अशी ताकीद करून त्यांना घालवून देण्याबाबत हुजूरांनीं रेखोजी जाधव नामजाद व समस्त गडकरी लोक यांना आज्ञापत्रें पाठविलीं (ले. ६२ ते ६६). कोल्हापूर इलाख्यांत बंड होऊन तेथील मुख्य कारभारी यांजवर गर्दी झाली त्या प्रसंगी सरकारांतून त्या बंडाच्या बंदोबस्ताची तजवीज चालू असतां त्या तजविजीचे कामांत कर्नल ओटरॅमसाहेब बहादर यांनीं खानबहादूर गुलाम गोषसाहेब निसबत सुंदराबाईसाहेब घाटगे सर्ज्याराव यांनीं मदत केली ही माहिती ले. ६७ मध्यें आहे. हुजुरांचे प्रांतांत निपाणीकर देसाई व नारायणराव घोरपडे, सेनापति यांनीं बेआदबी करून ठाणी घातली त्यासंबंधी हकीकत ले. ६९ मध्यें आहे. अंडरसनसाहेब बहादर ऑफिशिएटिंग पोलिटिकल सुपरिंटेंडेंट यांनीं रावबहादूर दाजी कृष्ण पंडित मुख्य कारभारी निसबत श्रीमन्महाराज छत्रपति सरकार करवीर यांना एक यादी पाठविली

(ले. ७२). तोरगल संस्थानची मर्यादा चालवावी याबद्दल हकीकत लक्ष्मणराव सिंदे, सेनाखासखेल यांनीं अंडरसनसाहेबबहादर पोलिटिकल सुपरिंटेंडेंट इलाखा कोल्हापूर यांना पाठविलेल्या पत्रांत आहे (ले. ७५, ७६, ७७).

कैसर इ हिंद व्हिक्टोरिया महाराणीसाहेब यांना श्रीमन्महाराज राणी सकवार-बाईसाहेब, कैलासवासी छत्रपति राजारामहाराज यांचे कुटुंब यांनीं लिहिलेलें एक पत्र उपलब्ध आहे (ले. ८४). अशा रीतीनें या पुस्तकांत आलेले ८४ कागद मी वाचकांपुढें मांडीत आहें.

१३२१ कसबा पेठ, पुणें, २.
विजया दशमी शके १८८४
तारीख ८-१०-६२

मा. वि. गुजर

श्रीमन्महाराज सर श्री शहाजी छत्रपति, जी. सी. एस. आय., बी. ए.,

हिंदुपदपातशहा महाराज सरकार करवीर



जन्म :

फाल्गुन कृष्ण ९ शके १८३१

समर्पण

श्रीमन्महाराज सर श्री शहाजी छत्रपति, जी. सी. एस्. आय्., बी. ए

हिंदुपदपातशहा महाराज सरकार करवीर

यांना

महाराजांच्या प्रतापशाली राज्यकर्त्या

पूर्वजांसंबंधीं ऐतिहासिक माहिती देणारीं

करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाचीं साधनें, भाग ७

हें पुस्तक

संपादकानें प्रेमादरपूर्वक समर्पण केलें असे.

मा. वि. गुजर.

करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाचीं साधनें

(भाग सातवा)

कोल्हापूर स्टेट रेकॉर्डांतून निवडलेले कागद

लेखांक १ तारीख ७-१२-१८३८

अ. नं. ८८० १४२ :

१४२ : ता॥ छ ७ माहे डिसेंबर रोज भृगुवार सन १८३८ इसवी १३४८ फसली मुकाम करवीर गरीबपरवर सलामत श्रीमन्माहाराज आईसाहेब व सर्वत्र राणीसाहेब व श्रीमन्माहाराज छत्रपति साहेबासहित येकंदर जमीयत सलतन वगैरेसुधा काल दोन तास रात्रीस कोलापुरास येऊन पोहचले किलेबाहीर रविवार पेठेतचे वाडयात राहिले आहेत कारण कीं कैलासवासी छत्रपति साहेबाचे उत्रकार्य उरकोन मुहूर्तांने किल्यातील राजवाडयात जावयाचे सयुक्त जाणोन तसा करणेत येत आहे गरीबपरवार सलामत अज भृगुवारी णवा दिवस उत्रकार्यास प्रारंभ आहे ऐसीयास छत्रपतिसाहेबाचे आस्ती बरोबर श्रीमन्माहाराज बाबैसाहेब सती जावयाचे अतिआग्रह आहे त्याची निग्रहापुढे कोणाच इलाज नाही परंतु आजपावेतो हरकसे राहत केल प्रो पुढही करीतच आहो ऐसियास कितीयेक मोठेमोठे मानकरी वगैर लोकाच डौल पाहता बाबैसाहेब पूर्वीपासून मोठी पतिव्रता धर्म चालवीत आली आणि छत्रपतिसाहेबाचे काल जाहालेपासून अनपाणी भाषण वगैर कांहीयेक नसता अजगेर बृतीसारख त्याची देहयाची व्यवस्ता जाल ते सर्वत्राची द्रिष्टोपत्यास येऊन त्यास हरकत कर्णे हे कांहीं स्त्रधर्म दिसत नाही अश्याप्रकार म्हण्यातील भाव आहे परंतु बाबैसाहेब तेथ व येथ सती जाणेत कितीयेक प्रकारचे पेचअंदेशा आहेत कागदोपत्री लिहू सकत नाही ते मार समक्ष निवेदनात येतील हरकसे बाबैसाहेब जगणे कठीण × × निरधार खरी आहे त्यास अयुषमर्यादा आहे तसा घडेल ईश्वर इछा प्रमाण परंतु सती जावयाचे बिलकूल घडू देऊ नय असी येत्न पराकष्टेची आहे आणि स्वारी लौकर करवीर येथ येऊन पोहचल ते सर्वोपरी चांगल जाले चितास श्रुत होये. बंदगीस रोशन होय जियादा लिहिणेस ताखत नाही.

लेखांक २ तारीख १३-१२-१८३८

अ. नं. ८८० १४८

ताा छ १३ माहे डिसेंबर रोज गुरुवार

सन १८३८ इ॥ मु॥ सन १२४८ फसली

गरीबपरवर सलामत आजचे रोजी श्रीमन्माहाराज आईसाो व सर्वत्र राणीसो व श्रीमन्माहाराज छत्रपति सो सहित कोलापुर किलेचे राजवाडयात आले ते समई सांप्रदाये प्रमाणे श्रीमन्माहाराज सिव छत्रपतिसाहेब व श्रीमन्माहाराज शाहू छत्रपतिसाहेब श्री चे दर्शन घेऊन गादीवर बसले तेव्हा अष्टप्रधान व कार्याकारण मानकरी वगैर लोकानी नजरसल्का केले व सर्वत्रास विडा वाटले व गडकिलेस आज्ञापत्र सादर होऊन तोफेचे बार वगैरे जाले. बंदगीस रोशन होये जियादा लिहिणेस ताखत नाही.

लेखांक ३ तारीख ३१-३-१८३९

श्रीआई आदीपुरुष

अ. नं. ८८५

पौा छ १७ माहे मोहरम

मु॥ तिसा सलासीन

मयातैन व अलफ

श्रीमन्माहाराज राजश्री

छत्रपति

स्वामीचे शेवेसी

विनंती शेवक अमृतराव भगवंत प्रतिनिधि कृतानेक विज्ञापना विनंती तागायत छ १५ मोहरम पावेतो स्वामीचे कृपावलोकने करून शेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष स्वामीनी आज्ञापत्र छ ११ मोहरमचे पाठविले ते सादर होऊन आज्ञादिक मजकूर कळो आला रहिमानखान पठाण वगैरे चोरटे घाटखाली जाण्याचे घेताने गेले ते घाटाखाली उतरून मालवणचे तिजोरीवर गोळागोळी करून धांदल करीत होते त्याज पैाा कांहीं ठार जाहाले व कांहीं जखमी जाहाले व कांहीं पळाले आहेत तरी सदरहू चोरटे पळाले त्या पाो घाटाने व पांजेने रात्री दिवसास येतील व कोठे छपून राहतील त्याची फार बारकाईने बातमी राखोन जे जे मार्ग असतील तेथे चौक्या बसऊन चोरटे धरून सापडतील तेच्च वेळेस हुजूर पाठवणे म्हणोन आज्ञा त्यास आज्ञे प्रमाणे घाटपांजाचे बंदोबस्ताकरिता येथून लोक व कारकून रवाना होऊन गेले आहेत सर्व प्रकारे सांभाळ करणार स्वाम धणी मायेबाप समर्थ शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक ४ तारीख ९-५-१८३९

श्री

रु. नं. २

अ. नं. ४७२

यादी घाटाचे बंदोबस्ताबद्दल चौकीस लोक ठेवणेचे सुा तिसा सलासीन मयातेन व आलफ

नंबर	राजश्री आमृतराव पंडित प्रतिनिधि			
	घाटाचे नांव	कोश	लोक आा	निसबतीचे नांव
१	चांदेलचा घाट	पासून	१०	पंत प्रतिनिधि
२	आंबा घाट	७	५०	पंत प्रतिनिधि
३	दंवडे घाट	नजीक	१०	पंत प्रतिनिधि
४	प्रभावली घाट	६	१५	पंत प्रतिनिधि
	हुजूर आमल			
	घाटाचे नांव	कोश	लोक आ॥	निसबतीचे नांव
५	अणसकुरा घाट	६	५०	रताजीराव च्वाण हिमत बहादूर
६	काजीर्डा घाट	३	१०	जोत्याजीराव च्वाण ममलकतमदार
	राजेश्री रघुनाथराव पंडित अमात्य			
	घाटाचे नांव	कोश	लोक आ॥	निसबतीचे नांव
७	बावडा घाट	३	३०	पंत आमात्य
८	सिवगडा नजीक मार्ग	३	१५	पंत आमात्य
	किल्ले प्रसिध्धगड			
	घाटाचे नांव	कोश	लोक आा	निसबतीचे नांव
९	फोंडा घाट	२	५०	हाणमंतराव निंबाळकर बहादूर सरलष्कर
१०	बहिरवगड नजीक	३॥	१०	किले बहिरवगडाकडील
११	सावर्देघाट	१॥	१०	भवानराव घाटगे बाजी
१२	सोनगड नजीक घाट	२॥	१०	किल्ले सोनगडाकडील
१३	रांगणा घाट	२॥	१०	किले प्रसिध्धगडाकडील
१४	हणमंत घाट	३	२५	आपाजीराव जाधव

				जप्तनमुल्क
१५	खरवता घाट	४	१०	रामचंद्रराव पाटणकर
१६	पोरपाली घाट	३	४०	केशवराव नारायण घोरपडे

तारीख छ २४ माहे सफर सदरी लिहिले प्रमाणे चौकीस लोक नेमून देऊन रवाना होणेस आज्ञा जाहाली आहे.

लेखांक ५ तारीख १५-८-१८३९

श्री

अ. नं. ८८८

यादी श्रीमन्माहाराज राजश्री छत्रपति हुजूर सरकारातून सर्वत्र लोकास आज्ञा जाहली जे सु॥ आर्बैन मयातैन व अलफ हुजूरचे सेवक लोक जाहगीरदार व मानकरी सरंजामी इनामदार व फुटसिलेदार याज पै॥ हरकोणी सरकारात जरूर नसता नवीन सिबंदी बिदेसी लोक व करबिनवाले परदेसी वगैरे ठेऊ नये ठेबिले असतील त्यास निरोप आजपासून तीन रोजात देऊन रवाना करावे व त्या लोकानी कोलापुरात न राहता आपआपले ठिकाणास घरी जाऊन रहाणे याचे कारण हुजूरचे व कुंपणी सरकारचे दोस्तीमुले हुजूर जाजती सिबंदीचे कारण नाही व पदरचे लोकानी आपहुकमतीने नवीन जाजती सिबंदी ठेवणेचा रिवाज नाही निसकारण सिबंदीची तलबेबदल कर्जाचे पेची येऊन खराबीत पदरचे लोक येऊ नयत आगर तलबेबदल वगैरे लोकाचे तंटे बखेडे होऊन सरकार सिक्षेत येतील सबब आज्ञे प्रो बिदेसी परदेसी वगैरे नवीन जाजती सिबंदीस दरोबस्त रजा देऊन रवाना करणे व लोकानीही आज्ञेप्रो आजपासून तीन रोजात आपआपले ठिकाणी निघोन जाणे यास ज्याजकडून अंतर पडल त्यास सरकारातून सिक्षा होईल जाणिजे र॥ छ ५ माहे जमादिलाखर.

रुजू

बिलस
तिलेख
नावधि

लेखांक ६ तारीख २३-८-१८३९

श्री

रु. नं. १
अ. नं. २३०

श्रीमन्महाराज राजश्री छत्रपति स्वामी स्वामीचे सेवेसी विनंती सेवक रामचंद्रराव घोरपडे सेनापति दोनीकर जोडोन सिर सा॥ दंडवत विनंती विज्ञापना तागायत श्रावण

शुद्ध चतुरदसी भ्रगुवासर पावितो स्वामीचे कृपावलोकन करून सेवकाचे वृत यथास्थित अस सेवेसी विज्ञापना ऐसीजे स्वामीनी कृपाळु होऊन आज्ञापत्र पाठविल ते मस्तकी वंदून सनाथ जाहालो तेथे आज्ञा जे हुजूरून नवीन बिदेसी परदेसी चाकरी ठेऊ नयेत येविसीचे मजकुराची यादी जाहल्या त्या अन्वये आपणाकड आलाहिदा यादी सादर जाहाली आहे त्याप्रमाणे करून हुजूर विनंती पत्र ल्याहव ऐसी आज्ञा त्यास आज्ञा प्रमाणे नवीन बिदेसी परदेसी लोक ठेविल असतील त्यास निरोप देतो सेवसी निवेदनार्थ विनंती लिहिली अस सर्व रक्षपाल करणार स्वामी समर्थ सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक ७ तारीख ७-९-१८३९

श्री

निवडी दप्तर
रु. नं. ४
अ. नं. ८९०

यादी राजश्री हणमंतराव निंबालकर बहादूर सरलस्कर यासी हुजरून आज्ञा सु॥ आर्बैन मयातैन व अलफ श्रावण वद्य ३० मंदवारी हुजूरचे स्वारीसमक्ष कचेरीत घाटमाथे चौक्या ठेऊन बंदोबस्ताविसी इंग्रजीतून थैली व यादी आलेल्या वाचून दाखऊन पेशजी आज्ञापत्र सादर जाहले आहे त्याप्रमाणे फोंडघाटास पनास आसामी लोक व हुशार कामदार आसामी येक पाठऊन बंदोबस्त राखणेविसी आज्ञा जाहाली त्याआन्वये चौकीस लोक व कामदार कोण पाठऊन बंदोबस्त कसा केला त्याचे तपसीलवार विनंती पत्री लिहून पाठविणे सदरी आज्ञा जाहली त्या प्रो तुम्हाकडून बंदोबस्त न ठेविता फोंडया घाटाने चोरटे वगैरे धांदलीमाणसे कोणी घाटाखाली जाऊन आगर वरघाटी येऊन त्याजकडून कांही चोरी दरवडा धांदल नुकसानी वगैरे होऊन बोभाट हुजूर आल्यास त्याचा जाबसाल तुम्हाकडून उलघडोन घेणेची आज्ञा होईल. जाणिजे र॥ छ

माहे रजब.

लेखांक ८ तारीख १-१०-१८३९

श्री

रु. नं. ७
अ. नं. ११४०

जाहीरनामा सरकार श्रीमंत मातोश्री राधाबाई साहेब प्रतिनिधि मुकत्यार संस्थान विशालगड सु॥ आर्बैन मयातैन व आलफ सर्व लोकास महशूर होणेकरिता लिहिला जातो ऐसाजे बखेडेखोर लोकानी चिरंजीव राजेश्री अमृतराव यासी बदसला देऊन आम्हाकडे संस्थानची मुखत्यारी असता आमचे हुकमाशिवाय करबीरास घेऊन गेले

आणि शिकेकट्यार बरोबर नेहली नंतर हा मजकूर मुंबईस आम्ही लिहिल्यावरून तेथे आम्हाकडे मुखत्यारी कायम होऊन पोलटक्याल एजंट साहेब बहादूरसुधा बेलगांव यास हुकूम आला त्याजवरून साहेब मवसुफ याचे रत्नागिरी येथील कलेक्टर साहेब यास लिहून आल्यावरून त्यानी प्रांतातील वसूल आमचे तर्फेकडे देणेविसी गावगन्नास ताकीद करणे म्हणून मामलेदार यास हुकूम जाहाले आहेत तरी चिरंजीवापासी मोर्तब व शिकेकट्यार आहे त्यास बखेडेखोर भलती सल्ला देऊन रोखापत्र अगर पावत्या वगैरे हरयेक कागद देतील ते मंजूर पडणार नाही जाणिजे. छ २२ रजब मोर्त सुद्र मोर्तब्रा असे.

लेखांक ९ तारीख २९-१०-१८३९

रु. नं. ७

अ. नं. ११३८

यादी सदासिव पंत वकील नि।। श्रीमन्महाराज छत्रपति साहेब यासी १ विशाळगडचे किलेवरी विठल पंत जमनीस व बाळकृष्ण सेट बिन भिकसेट वायकुल व यज्ञेश्वर दिक्षीत वगैरे यांनी राहून अस्मत पनाह राधाबाई साहेब याची हुकमत न चालविता पंताचा हुकूम चालवीत आहेत असे परभारे विदित जाहाले अशास तुम्ही हुजूरात वरचेवर जाहीर करणे ते बाईसाहेबाची हुकमत यथास्तित चालत आहे त्यात व्यतर्थ नाही म्हणून हुजूरून आम्हास जी बातमी लागली ती वास्तविक बातमी आहे त्यात संषय नाही परंतु तुम्ही सांगणे येक आणि तिकडे अमल चालणे येक असे जाहाले तरी आपण जे बोलता त्याजवरी विश्वास तरी कसे ठेवणे ? सरकारचे हुकमा प्रमाणे बाईसाहेब याची अखत्यारी स्वादीन न होता असे हरकत दिली आहे म्हणोन
गवरनरसाहेब बहादूर याचे हुजूरास जाहाली असता या गोष्टीस फार आश्चीर्य मानतील सबब ही याद पावताच हल्ली बाईसाहेबाचे हुकमतीस हरकत न होई ऐस सदरी जमेनीस वगैर तिघास कोलापुरास आणवून घेतले असता उत्तम आहे नाहीतरी येथील सल्लेस अंतर आणीत आहेत म्हणोन येकंदर मजकूर मुंबई सरकारास रपोट करणेस येईल हे नीट लक्षात आणून माहाराज छत्रपति साहेब याचे दरबारात अर्ज करून आम्ही लिहिलेअन्वये बंदोबस्त जाल्याचे उत्तर लवकर कलमी केले पाहिजे सदरी तिघे माणूस कोलापुरास आणविले असता कोणते तारखेस करवीरास पोन्चले तस लिहून पाठवी तसे कराव. तारीख २९ आक्टोबर सन १८३९ इ।। मु।। १२४९ फसली विकारेनाम संवत्सरे आश्विन व।। ७ मंगळवार मुकाम रामघाट.

सही (सही साहेबाची इंग्रजी)
(हणमंतराव नेटीव्ह
येजंट)

लेखांक १०

तारीख १७-१२-१८३९

रु. नं. ७

अ. नं. ११४६

श्रीमन्माहाराज छत्रपति साहेब दाम यकबाल हू

येखलासमंद हनराबल सरजेमस रिविट कर्नक बारोनेटसाहेब गवरनर बहादूर बाद इजहार येखलास आंके मोहिबाची खैरियेत रोशन होऊन हमेशा तलदूफनामा फिरस्ताद होत असिला पाहिजे दरविला विशालगड येथील पंतप्रतिनिधि हे आपले वडिलाचे संस्थानची मुखत्यारी हस्तगत व्हावी म्हणून दावा करीत आहेत याची बेलगाव येथील अर्कटिंग पोलिटिक्याल येजंट साहेब याजकडे तजवीज होत आहे व वख्तसीर याचा डलगडा होईल लेकीन दरम्यान विशाळगड येथील किल्ल्याची व त्याचे ताबेतील मुलकाची वहिवाट राधाबाई साहेब करीत आहेत ती त्याचे ताबेत राहील व पंत साहेब याणी अथवा त्याजकडील मंडळीनी दांडगाई करून अथवा तरकट करून राधाबाई साहेब याचे वहिवाटीस खलेल केली तर त्याजवर इंग्रज सरकारची इतराजी होईल हरहमेषा आ माहाराजाची खैरअफीयेत व तनदुरुस्ती कलमे होऊन दिल आराम होत असिला पाहिजे ज्यादेचे अयाम मेहरबानी मुदाम बाद

पौ छ २६ शोवाल सु॥ आरबैन मयातैन आलफ थैलीचो तारीख १७ दिजंबर १८३९ इा

लेखांक ११

तारीख २-१-१८४०

अ. नं. ८९७

यादी हणमंतराव निंबाळकर, सरलश्कर याणी हुजूर समक्ष माहाराज सरकारातून आपले कामकाजाचे बंदी जाहली त्याचे मजकूर सांगितल ते

१ आम्हास पंधरा हजार रु॥चा सरंजाम चालत आहे.

१ आम्हास सरंजाम कदीमपासून चालणेच कुल २२००० रुोच होते त्यापौ वलभगड ता॥ कुंपणी सरकारात घेतला त्याबाबत १०००० रुपये गेले ते जाता आम्हाकडे हाली चालणेच १२००० रुपये

१ आम्हास सरलस्करचा हुदा होऊन सुमार चवदा वर्ष जाहला.

१ सदरी सरलष्करबदल मनोली मुरगोड ताळुक पौ पाच हजाराची होती ते कुंपनी सरकारात गेलेपासून चालत नाही त्याचे ऐवजी माहाराजानी नवेसीर तीन हजार रु॥च दिल्हे आहेत.

१ मुगेवाडी गाव १८०० रुपयेच आजमास सन समान साली दिल्हे होते

१ आलीकडे पाच वर्षाखाली मौजे कनगे गाव ८०० रुपय बेरिजीचे व कोथोलीचे नाईकी ४०९ रुपयेच

———

येणे प्रमाणे दिल्हे होते.

१ आम्हास सरंजाम चाकरीबदल चालत नाही माहाराजाची स्वारी निघाली आसता बरोबर सुमार बीस स्वार घेऊन जात होतो.

१ सदरी वलभगड तालुका कुंपणी सरकारात गेलेपासून आम्ही माहाराजाचे स्वारीबरोबर गेले असता खर्चास दरमाहा ४०० रुपये आजमास देणेचा सांप्रदाय होता.

१ हाली आम्हास फोंडे घाटास रखवालीबदल पनास आसामी पायदल द्यावे म्हणोन निरोप जाहला त्यास आम्हास खर्चास देणच सांप्रदाय आहे त्याप्रा।ो हाली खर्चास न मिळालेस १५ आसामी पायदल देतो म्हणोन माहाराज सरकारास विनंतीपत्र पाठविले आहे.

१ तोफखाना याचे काम आम्हाकडे माहाराजानी सांगून तीन वर्ष जाहले त्याचे तैनातीबदल दाहा माणसाची नेमणूक आजमास पाचसेह रुपये करून दिल्हे होते त्याप्रमाणे तोफखान्याचे काम आम्हाकडून हाली घेत नाही बंद होऊन साहा महिने जाहाले.

१ पहिलेपासून माहाराजाचे फौजेवर हुकूम आम्हाकडे स्वारी बाहेर गेले असता लष्करावर जे हुकूम करणेचे ते आम्ही करीत होतो कोलापुरात स्वारी आसलीया सिबंदी वगैरे लोकास कामगिरी सांगावे जाहलेस त्याजवरी हुकूम आमचा होता हाली चालवीत नाहीत बंद होऊन आठ महिने जाहले.

———

येणे प्रमाणे आमचे मजकूर आहे तारीख २ माहे जनवारी सन १८४० इसवी सन १२४९ फसली विकारी नामसंवत्सर शके १७६१ मार्गश्वर व।। १३ गुरुवार रुजू हनमंतराव निंबाल्कर बहादूर सरलस्कर दस्तुर खुद.

लेखांक १२

तारीख २३-१-१८४०

हु

रु. नं. २

अ. नं. ४७४

तालीक

श्रीमन्माहाराज —— छत्रपति साहेब दाम यकबाल हू

अज नियाजमंद इडवर्ड ह्यूमटौनसेंड साहेब बहादूर पोलटक्याल येजंट प्रांत कर्नाटक बआदज नियाज मारुज ब असूल आंके येथील खैरियेत रोषन होऊन हमेशा आलताफनामा सादर होत असिला पाहिजे दरिविला कागल तालुका कोलापुर इलाखा

नव्हे म्हणोन आसमत पनाह सुदंराबाई साहेब याणी तकरार केले प्रकर्णास सरकारात तजवीज होऊन दाखला पाहून कागल तालुका आमहाराज छत्रपति साहेब याचे इलाखा म्हणनेस संवशेय राहिला नाही कागलकरानी महाराजाचे आज्ञे प्रमाणे वर्तणूक करावे म्हणोन सरकारचे पत्र छ १७ जानेवारी १८४० इसवीचे आलेवरून त्या हुकुमाचा तर-जामा या नीयाजनाम्याबराबर पाठविला आहे मुलाहिजा फर्मावला आसता चितास श्रुत होईल आणि या विषई कागलकर आसमत पनाह सुंदराबाई साहेबास पत्र लिहिले त्याची तालीकही पाठविली आहे रोषने होय जियादा बाद

(सही हणमंतराव नेटीव्र येजंट) (सही इंग्रजी)

लेखांक १३ तारीख २३–१–१८४०

श्री

तालीक

अ. नं. ४७४ चे पोटी

सरकारचा हुकूम आला त्याचा तरज़मा

१ कागल तालुका श्रीमन्महाराज छत्रपति साहेब करवीर याचे इलाखा म्हणणेस उभायतामध्ये विवाद उत्पन्न जाहालेवरून त्याची तपासणी येथ करून छ १० माहे आक्टोबर सन १८३९ इसवी व छ २ नवबर छ ३० माहे नवबंर सन १८३९ इसवी असे तीन वेळा सरकारास लिहिले होते याचे उत्तर तारीख १७ जानवारी सन १८४० इसवी आला त्यात

१ तुटक कलमात अभिप्राय कीं सदरी येथील पत्राबरोबर मागील दाखला आले ते यासिवाय आणखी कितींयेक दाखला सरकारी दप्तरी होते ते येकंदर पाहाता कागलकर याणी कोलापुर इलाखा नव्हे म्हणोन जी तकरार करीत आहे तेच वृथा व निरनिमित्य आहे आणि महाराजाची आज्ञा कागलकर यानी मानायासे गौरनर साहेब बहादूर याची खातरी होऊन निसंशय ठरला.

१ तिसरे कलमात यास्तव हा मजकूर श्रीमन्माहाराज छत्रपतिसाहेब यास व कागलकरआसमत पनाहा सुंदराबाई साहेब यासी सुदा विदित करावे.

येणे प्रमाणे लिहून आले आहेः--

आसमत पनाहा सुदंराबाई साहेब घाटगे यासी पत्र गेले याची तालीक दरविला कागल तालुका कोलपूर महाराज छत्रपति साहेब याचे इलाका नव्हे म्हणोन आपले दारमदार होतो त्याजवरून याची तपासणी होऊन कागल तालुका करवीर इलाका म्हणनेस संवशये राहिला नाही महाराज छत्रपति साहेब याचे आज्ञा प्रमाणे आपण वर्तनूक केले पाहिजे म्हणून सरकारचा हुकूम छ १७ माहे जनवारी सन १८४० इसबीचा सादर जाहाला

वरून त्या हुकूमाचा तरजुमा हाली या पत्रा बरोबर आसमत पन्नहा याजकडे विदित असावा याबद्दल पाठविले आहे.

१ येन कलम

२ आसमत पनाहा याणी महाराज छत्रपति साहेब याची आज्ञा मानून त्या प्रो वर्तणूक केले पाहिजे यास्तव व्यत्य पडो नये आणि यामध्ये महाराजाचे आज्ञापत्र माघारे टाकिले आहेस विदित जाहाले आहे अशास सदरी माघारे टाकिले ते पत्र परत आणून घेऊन आणखी कामाविषई महाराजाचे हुकूम येईल त्याप्रमाणे उलगडा महाराज सरकारातून जाहाला पाहिजे जर करिता आसमत पनाहा याणी आमान्य करून तकरार कराल तर महाराज छत्रपति साहेब याचे विरुद्ध व कुंपणी सरकारचे सुलहान ऐकिले असे राजी प्राप्त होईल त्यातून आसमत पनाहा याणी नुकसान व व्यसन प्राप्त होईल त्यास आपण भोगणे प्राप्त होईल पूरवीच आसमत पनाहा यास विदित आसावे म्हणून इज्यानींबानी सुलाह कलमी केली आहे न पावली श्रम वाटेल तेव्हा आम्हास समजले नव्हते असे म्हणू नये सूचनार्थ लिहिले आहे ज्यादा काय लि॥ हामेशा खत पाटऊन दिलखुशी करीत असले पाहिजे तारीख छ २३ माहे जनवारी सन १८४० मु॥ सन १२४९ फसली शके १७६१ विकारीनामसंवत्छरे पौष व॥ ५ रोज गुरुवार मु॥ कोलापूर.

(सही हनमंत नरसिव यजट.)

(इंग्रजी सही येडवर्ड साहेब
बहादूर पोलटक्याल येजंट
प्रांत कर्नाटक.)

लेखांक १४ — तारीख २८–१–१८४०

श्री

रु. नं. ७
अ. नं. ११५१

दिवाण साहेब

यादी राजमंडल हुजूर करवीर सरकारातून राजेश्री अमृतराव पंडित प्रतिनिधि यासी आज्ञा सुा आर्बेन मयातेन व आलफ तीर्थस्वरूप श्रीमन्महाराज मातोश्री साहेब याचे आज्ञेवरून दौलतीत व्यवस्था सर्वांनी चांगले रीतीने वर्तणूक करणेविसीचा प्रकार ठरविण्यात येऊन ठरावाची यादी होऊन आपणास आज्ञा जाहाली आहे जे आपणाकडील सरंजाम किल्ले विशाळगड व येकंदर तनखेतील रयतावर व पदरच्या माणसावर जुलूम जोरा न चालविता इन्साफाने वर्तावे गैरवाजवी वहिवाट केल्याचा बोभाट हुजूर येऊ देऊ नये तसा बोभाट आला असता त्याची चौकसी हुजूरून होणेविसी ज्यानी जुलूम चालविला त्यास हुजूर आणवणेविसी अगर हरयेक चौकसीस कारण जाहाले असता आज्ञापत्र सादर होईल ते क्षणी त्या आस हुजूर रवाना करावे व जाबसालास

आपणाकडील कारकून हुजूर राहावे ते न होता आज्ञापत्रास अमान्य केले तर पुन्हा एकवेळ दुसरे आज्ञापत्र आपले नांव असे होईल कीं आपण आज्ञापत्र अमान्य केले याची तजवीज सरकारातून कांहीं होईल याप्रमाणे आज्ञा पत्र दुसरे जाउनही पहिले आज्ञापत्रा प्रो वेवाटीत न आले तर फिर्यादीचा फैसल जारे हुकूम देऊन दोनवेळा अमान्य केल्याब्बद्दल मुनासब पाहून कांही त्याच सरंजामा पैा जप्त करून तो अमल सरकारात राहील नंतर सुरळींत वर्तणूक करणेचे सेवकपणाचे इरादेने कबूल करून सरकार मर्जीप्रसन्न करून घेतली तर कांही नजराणा ठरवून घेऊन जप्ती केले त्या आमलाची मोकलीक करून त्याप्रो सुफूरदेत दिल्हे जाईल जाणिजे रवाना छ २२ माहे जिलकाद शके १७६१ विकारीनावसंवत्सरे रुजू.

विलस
तीलेख
नावधि

लेखांक १५ तारीख २८-१-१८४०

श्री

अ. नं. ८९९

दिवाणसाहेब

यादी राजमंडल हुजूर करवीर सरकारातून राजश्री लक्षमणराव सिंदे सेनाखासकील यासी आज्ञा सु॥ आर्बैन मयातैन व अलफ तीर्थस्वरूप श्रीमन्माहाराज मातुश्री साहब याचे आज्ञेवरून दौलतीत व्येवस्था व सर्वानी चांगले रीतीने वर्तणूक करणेविसीचा प्रकार ठरविण्यात येऊन ठरावाची यादी होऊन आपणास आज्ञा जाहाली आहे जे आपणाकडील सरंजाम किल्ले तोरगल वगैरे गावगना एकंदर येथील रयतावर व पदरच्या माणसावर जुलूम करून न चालविता इनसाफाने वर्तावे गैरवाजबी वैवाट केल्याचा बोभाट हुजूर येऊ देऊ नये तसा बोभाट आला असता त्याची चौकसी हुजरून होणेविसी ज्यानी जुलूम चालविला त्यास हुजूर आणवणेविसी आगर हारयेक चौकसीस कारण जाहाले आसता आज्ञापत्र सादर होईल तेक्षणी त्या आसामीस हुजूर रवाना करावे व जाबसालास आपणाकडील कारकून हुजूर राहावे ते न होता आज्ञापत्रास अमान्य केले तर पुन्हा येकवेल दुसरे आज्ञापत्र आपले नांव असे होईल कीं आपण आज्ञापत्र अमान्य केले याची तजवीज सरकारातून कांहीं होईल याप्रमाणे आज्ञापत्र दुसरे जाऊनही दिले आज्ञापत्राप्रो वैहिवाटीत न आले तर फिर्यादीचा फैसल फेरहुकूम देऊन दोनवेला अमान्य केल्याबदल मुनासब पाहून कांहीं याच सरंजामा पै॥ जप्त करून तो अमल सरकारात राहील नंतर सुरलीत वर्तणूक करणेचे सेवकपणाचे इरादेने कबूल करून सरकार मर्जी प्रसन्न करून घेतली तर कांहीं नजराणा ठरऊन घेऊन जप्ती केली त्या आम-

लाची मोकलीक करुन त्याप्रमाणे सुफुरदेत दिल्हे जाईल जाणिजे रवाना छ २२ माहे जिल्काद शके १७६१ विकारीनामसंवछरे रुजू.

विलस
तिलेख
नावधि

लेखांक १६ तारीख १३–२–१८४०

श्री

रु. नं. ७

अ. नं. ११५३

यादी श्रीमन्महाराज छत्रपति साहेब दरबारास कर्नाटक पोटलक्याल येजंट इडवर्ड टोनसन साहेब बहादूर याजकडून लिहिले जाते ऐसीजे

१ बालाजी खंडेराव ओक याचे नातू नारो गोविंद यानी इचलकरंजीकर रावसो कडून कर्जाऊ ऐवज यावे म्हणून सरकारात फिर्याद केले त्याजबद्दल प्रथम छ १३ माहे मार्च सन १८३९ इसवी माहाराजास थैली पाठविली त्याचे उत्तर न आलेवरून परतून छ ८ आगष्ट तारखेस दुसरी थैली पाठविली त्याचे उत्तर अजुनी आले नाही आणि इन्साफ जाहाले नाही यास्तव अर्जदार यानी परतून बंबई सरकारात अर्जी केली व × × छ ८ माहे फेब्रुवारी सन १८४० इसवीचे षरा आला आहे यास्तव हली कलमी केली जात जे सदरी खटला माहाराज छत्रपतिसाहेब याचे दरबारात इन्साफ जाहाला पाहिजे कारण कीं इचलकरंजीकर माहाराज छत्रपति साहेब याचे इलाखेतील म्हणून छ ७ मार्च सन १८३९ इसवीचे सरकारचे पत्र आले आहे त्यास अजुनीपर्यंत इन्साफ न जालेवरून गोरनर साहेब बहादूर यास फार आश्चर्य दिसून परतून हाली छ ८ माहे फेब्रुवारीचे षेरा आला आहे इतपर विलंब होईनासे मेहरबानगी करून याचे तपासणी होऊन इन्साफ जाहालेचे उत्तर आला पाहिजे याबद्दल इचलकरंजीकरास पत्र येथून लिहिल ते यात × × × × आहे त्यास पावते जाहाला पाहिजे रवाना छ १३ माहे फेब्रुवारी सन १८४० इसवी शके १७६१ विकारीनाम संवत्सरे माघ शु॥ ११ गुरुवार सन १२४९ फसली मु॥ संपगाव

(सही हणमंतराव नेटीव्ह) (सही साहेबाची
एजंट. इंग्रजी)

लेखांक १७ तारीख ७–६–१८४०

रु. नं. ७

अ. नं. ११५५

यादी राजमंडल हुजूर करवीर सरकारातून अजम आदम क्यामल साहेब बहादूर इंचार्ज पोलटक्याल येजंट प्रांत कर्नाटक यांसी सुा इहिदे आर्बेन मयातेन व अलफ तारीख ६ माहे मे सन १८४० इ॥ची याद आली त्यात नारो गोविंद वोक पुणेकर यानी अर्जी दिली त्यात इचलकरंजीकराकडे कर्ज येणे त्याचा उलगडा जाहाला नाही त्यास येविषीचे उत्तर पो म्हणोन कलमी केले त्यास सदर्हू मुकदमेविषयी पेशजी पासून इचलकरंजीकरास वाजबी प्रमाणे उलगडून देणेबद्दल आज्ञा जाली आहे हल्ली वोक म॥र हुजूर येऊन हजर जाहाले म्हणजे इचलकरंजीकर यास पुन्हा निक्षून ताकीद करणेत येईल रवाना छ ६ रा॥र शके १७६२ शार्वरीनाम संवत्सर जेष्ट शु॥ ८ रुजू मोर्तब असे.

लेखांक १८ तारीख १७–७–१८४०

रु. नं. ३

अ. नं. ६३१

यादी सदाशिवपंत वकील निसबत श्रीमन्माहाराज छत्रपतिसाहेब करवीर यास इडवर्ड ह्युम टौनसंड साहेब पोलटिकाल यजंट प्रांत कर्नाटक याजकडून येसीजे
१ मेहरबा यशवंतराव घाटके कागलकर याणी कागल तालुक्यात आपले देशगतीचा हक्क मागील बाकी आहे ती देवावी म्हणोन फर्याद केली त्या प्रकर्णी हाली असमत पनाह सुंदराबाई सो याजकडील वकील इजदस्तगाह रंगोपंत यानी सदरहू हक बारा वर्षा खाले तेव्हा तालुक्यात महाराजाकडून धांदलेचा कुल बखेडा जाला होता नंतर कौल करार देऊन गाव वस्तीस आणोन त्या वेलचे भर आकारावर हक कसे येईल म्हणोन सालबार नमोद करून वसूलबाकीची याद सन मजकूर आषाढ व॥ २ चीं दिल्ही तिची नकल या यादी बरावर पाटविली आहे त्यावरून कलेल

———

तारीख १७ माहे जुलई सन १८४० इसवी मु॥ सन १२५० फसली शके १७६२ शार्वरीनाम संवत्सरे आषाढ व॥ ३ शुक्रवार मु॥ बेलगाव

(सही इंग्रजी)

नकल

यादी कागल तालुके पैकीं गावगनानी देशमुखीचे हकास ऐवज पोहचावयाचा त्यास करवीर माहाराज्याणी तालुकेत सन खमस अशरीन साली येक वेल दंगा केला

दुसरे वेळा सन समान असेरीन साली दंगा केला असे दोन वेळा दंगा करून गाव लुटून नेहले व आगी लाविल्या व कुलासी दंड बांधोन व नागऊन जबरीने येवज नेला त्याजबद्ल तालुकेतील कुले उठून देशांतरास गेलेमुळे लावण्या पडल्या त्याजबद्ल लावण्या समई कांहीं कुले होती त्यास व परागंदा होऊन गेली त्यातून आली तसी आणऊन त्याजला कांहीं घेतलेला येवज परत देऊन व खराब जाल्याबद्ल ज्या ज्या गावीची जसीजसी खराबी जाली तसतसी पाहून सूट देऊन कौलकरार दिल्हे त्याजबद्ल सदर देशमुखीचे हक्काचे रकमेस सुटीमुळे यैवज कमी होऊन पोहचला तपशील

....

१ कसबे कागल हा गाव सन खमस आशरीन शके १७४६ साली भरलेला गाव दरोबस्त लुटून नेला व घरे आगी लावून जाळली गावातील रयत वाणी बकाल बाईका सुद्धा लुटोन नागऊन खराबी केली याजबद्ल प्रथम सन सबा आशरीन सक १७४८ सालापासून जकायतीसुद्धा सूट देऊन सात वर्षांचा कोल दिला व ज्याचे घर जाळली त्यास कांही समजी बद्ल ऐवज देऊन वसात कर्णेस कुले आणऊन घेतली तो पुन्हा दुसरेवेळा सन समान असरीन शके १७४९ साली दंगा केला त्यावेळी गावातील रैयत कुल गुळेस सभोवत गावी निघोन गेली त्यास धरोण मारहाण करून आबरू घेऊन दंड बसवून येवज घेतला त्याचे बद्ल आणखी कौल येक वर्ष दिल्हा त्याजमुळे येकून जकायती सुद्धा आठ वर्षे कौल दिला त्याजमुळे देशमुखीचे हकास यैवज कम पोहचावयाचा तो

....

लेखांक १९ तारीख २८-८-१८४०

श्री

अ. नं. ९२०

यादी राजमंडल हुजूर करवीर सरकारातून अजम इडवड ह्यूम टोनसड साहेब बहादूर (एडवर्ड ह्युम टाऊन शेंड) पोलटक्याल येजंट प्रां। कर्नाटक यासी सु॥ इहिदे आर्बैन मयातैन व अलफ आबाहादराकडून तारीख २४ माहे आगष्ट सन १८४० इसवी नंबर ७३ ची यादी राजश्री सदासिव अनंत वकील याचे नांव होऊन त्या सोबत आजम उलीयेम कारेटणीसाहेब इस्कोयर बाहादूर याजकडून यादी आलेली पाठविली ती वकील याजकडून हुजूर आली त्यातील मजकुराविसीची हुजुरून कलविणेची कलमे.

१ किले मनोहरगड येथील गडकरी याणी आलीकडे पाचसाहा वर्षापासून सरकार हुकुमास बरजीद वर्तणूक करून हुजूरचा मामलेदार यास किलेखाली घालऊन बंडावेचा इरादा धरला सबब शके १७५८ साली हुजूरची खासा स्वारी किलेस फौजसुधा होऊन किलेचा बंदोबस्त करून तेथे मामलेदार ठेऊन गडकरी कैद करून त्यापै॥ कांही मखतेसर

आसामी कैदेनिसी करवीरास आणून कैदेत ठेविले बाकीचे गडकरी याणी किलेवर न जाता किलेखाली राहावे असे ठरऊन किलेवर मामलेदार याजपासी हुजूरचे लोक ठेऊन बंदोबस्त केला होता.

१ पुढे येक वर्षांन मख्तेसर गडकरी कैदेत करवीरास होते त्याणी तंटा बखेडा बंड न करता किलेखाली राहावे असा ठराव होऊन त्याचा खुलासा जाहाला आहे.

१ शके१७६०पौष महिन्यात पुन्हा गडकरी याणी बंडावयाचा इरादा धरून येकायेकी किलेवर चढून हुजूरचे लोकास किलेखाली ढकलून किलेवर जाऊन राहून फोंड सांवत तांबुलकर यासी मिलाफ करून त्याचा लेक किलेवर आणिला होता व तनखेतील वसूल घेऊ लागले येविसी तांबुलकर याचे पत्र बजिनस आहे त्याचे हसीलावरून व हली त्याणी आसाम्या काढून घेतल्यावरून ध्यानी येईल.

१ मनोहर किलेचे गडकरी हुजूरचे चाकर त्यास फोंड सांवत तांबुलकरवाडी आमलातील याणे आश्रा देऊन त्याणी बंडाईचा इरादा धरिला याजमुले आलीकडे सालगु।।पासून हुजूरचे आमलाच गैरनुकसान जाहाले व किलेवरील हवालदार किलेखाली कधी येणेचा नव्हे त्याजपासून सिके हिराऊन घेऊन किलेखाली घालविला याप्रमाणे भारी बेकैदी केली हली त्या लोकास किलेचे तनखयात धरिल जाऊन किलेचा बंदोबस्त जाहाला होता त्यात तांबुलकर याणे धादल करून काढून घेतल्यामुळे बंडाई कायम राहिली याजकरिता काढून घेतले ते आसामी व तांबुलकर बेलगावास आणून चौकसी होऊन हुजूरचे चाकर गडकरी लोक बंडखोर कैदेनिसी हुजूर येऊन पोहोचले पाहिजेत.

१ येविसी आवकाश न होता सत्वर बंदोबस्त साहेब मवसुफाकडून होईल आसा हुजूरचा पूर्ण भरवसा आहे.

येणेप्रो कलमे + + मिती शके १७६२ शार्वरी नामसंवत्सरे भाद्रपद श्रु।। १ भृगुवासरे छ २९ माहे जा।।खर रूजू मोर्तब आसे.

लेखांक २० तारीख २७–९–१८४०

रु. नं. ७

अ. नं. ११५९

श्रीमन्महाराज छत्रपति साहेब दाम एकबाल हू

नियाजमंद इडवार्ड हयू टोनसड साहेब पोलटिक्याल येजंट प्रांत कर्नाटक बाद नियाज मारूज आंकी येथील खैरियत रोषण होऊन हमेशा अलथापनामा सादर फर्मावित असिल पाहिजे दिगर विशाळगड दवलतीच वहिवाट अस्मत पनाह राधाबाई साहेब प्रतिनिधि याजकड असणेच माहाराज छत्रपति साहेबानी सरकारच सनद न घेता नुसता बाई साहेब याजकडील वहिवाट दूर करून मेहरबा अमृतराव साहेब प्रतिनिधि याजकड सांगितलेवरून याच मजकूर गवरनर साहेब बहादूर याचे हुजुरास जाहीर होऊन माहा-

राजानी सरकारच सल्लेवाचून केल ते काम नामंजूर होऊन परतून बाईसाहेबकड दवलतीच वहिवाट चालवाव म्हणोन सरकारच हुकमावरून इनीयाजमंदानी छ १ माहे जुलई सन १८३९ इा पत्र पाठविल आहे प्रमाण अशास या प्रकर्णी हल्ली छ १५ माहे सपटंबर सन १८४० इ च सरकारच पत्र आल त्यात विशाळगड येथील दवलत मेहेरबा अमृतरावसाहेब प्रतिनिधि याजकड सांगाव म्हणोन त्याजवरून इलतीमास कले जात जे विशाळगडच दौलत सरकारच सल्ला प्रमाणे आ माहाराज छत्रपति साहेब याजकडून कांहीं अभ्यंतर नसलेस मेहरबा अमृतराव साहेबाच स्वाधीन जाहाल पाहिजे परंतु अस्मत पनाह राधाबाई साहेब याच मर्यादस अंतर न पडता व त्यास दुख न होता अमल रावसाहेबच जिमा होईल असे इनीयाजमंदाच उमेद आहे आणि अलीकड विशाळगड इलाखा मलकापूर येथ खती जाहालेल मजकूर गवरनर साहेब बहादूर यास जाहीर जालेवरून याविषी फार दिलगीर आहेत जियादाचे आयाम बाद

(सही हणमंतराव) नेटीव्ह येजंट

(सही इंग्रजी)

पौ छ ३० रजेब सन इहिदे आर्बेन मयातेन व अलफ

लेखांक २१ तारीख ३०-१२-१८४०

श्री

अ. नं. ९३५

सेवेसी आर्जी विनंती सेवक नाइकवाडी व गडकरी लोक निसबत जंजिरे सिंधुदुर्ग मुकाम किले भूदरगड कृतानेक दोनी कर जोडोन सेवेसी विज्ञापना तागाइत छ ५ माहे जिल्काद पावेतो स्वामीचे कृपावलोकने करून सेवक लोकाचे वृत्त येथास्थित असे सेवेसी विज्ञापना येसीजे सुबानजी बिन बालोजी निकम किले मजकुरी कैदेत होता त्याणे फंद केला हा मजकूर सवे लोकास समजताच राजश्री हवालदार व मामलेदार यासी समजोन देऊन फंदातील मिलाफी आसामी धरून आणोन कैद केले येविसीचे चौकसी करिता श्रीमंत राजश्री आनंदराव पंडित मंत्री किल्यां आले त्याजकडे सर्व मजकूर समजोन दिल्हा आहे हुजूरचे सेवेसी निवेदन करितील जागेस इमानइतबारे सेवाचाकरी करू सरकारचे चरणासी प्रतारणा होणार नाही येविसी खातरी श्रीच्या अंगारा बेलभंडार सर्वत्रानी करून दिल्हा आहे सेवकलोकास सरकारचे पायासी दुसरा विचार नाही. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक २२ इ. स. १८४०

श्री

रु. नं. २
अ. नं. ४५४

यादी मेस्तर डणलाप साहेब बहादूर पोलटक्याल एजंट प्रांत कर्नाटक याच्या थैल्या सन १८३८ इसवी सन १२४७ फसली सन समान सलासीन मयातेन व आलफ.

१ रामदुर्ग इलाखा हाच गाव व तोरगल इलाखा बिडकी येथील सिमांतर प्रकरणी थैली पा। छ १५ जिल्हेज थैलीचे चिटीची तारीख छ २ माहे मार्च सन १८३८ इसवी श्री वाडी मुकामी आली

मेस्तर इडवर्ड ह्युम टवसन साहेब बहादूर इंच्यार्ज पोलटकयाल येजंट प्रांत कर्नाटक सन तिसा सलासीन मयातेन व आलफ जेष्ट शु॥ १४ गुरुवार छ १२ माहे रबि-लावल सन १२३८ इसवी सन १२४८ फ मेस्तर दडलाप साहेब बहादूर याच्या थैल्या

१ थैली छ १२ मोहरमची पाटविली ती.

छ २४ सफरी सन तिसा सलासीन मयातेन आलफ रसीद जाहाली दरिविला इलाखेचे जाबसाल प्रकर्णी चौकसी होणे जरूर आहे सबब मुक्तियार माणसास दाखला वगैरे देऊन पाटवावे म्हणोन कागलकर व तोरगलकर व इचलकरंजीकर यास आलाहिदा खत मरसुल केली आहेत सबब आ माहाराज छत्रपति साहेब याही मेहरबानी करून आ माहाराज छत्रपति साहेब याजकडील मुक्तीयार माणसास व दाखलेचे कागदपत्र देऊन इनियाजमंदाकडे रवाना होण्यास हुकूम जाहाला पाहिजे म्हणोन

१ इचलकरंजीकरानी बेळगाव सुभेस आपले कैफीयतीची याद दिली आहे त्यातील मजकूर सन आर्बेन मयातेन व आलफ ८ कलम आठवेत पेशवे याचे देणे बहुत होते त्याची सनदापत्रे आहेत परंतु बाजीराव साहेब यानी जप्त केले बाकी पुणे प्राच्या बागा चालत आहेत.

सदर कलमात देशमुखी व सरदेशमुखीचे वतन सेनापति घोरपडे यानी आम्हास दिलेले त्याजवर जुडी नाही मिरज प्रांत बारा कर्याती कृष्णा उत्तरतीर बाजीराव पेशवे यानी सालबाब नसता जप्ती केली आहे पेशवे याची मर्जी कसी जाहाली हे सर्वत्रास दखल आहे वतनाची वहिवाट सुरळीत चालली पाहिजे त्याजवर नजर देऊन श्रीभाऊ माहाराज याजकडे कारकून पा। त्याचे विद्यमाने बोलणे असे ठरविले कीं आमचे वतनाचे आकारा प्रमाणे हक्क हक्क व कमते पूर्ववत प्रा। चालवावे आम्ही दरसाल रुपये १२५० साडेबाराशे द्यावे याविसी कांहीं दाखला नसता नवीन कबूल करून पत्र लिहून दिले आहे कीं दरसाल आमचे वतनास खलेली करताती निर्वधपणे चालवावी म्हणजे आम्ही रुपये साडेबाराशे देत जाऊ आपले खलेलीमुळे गांवगन्ना जी बाकी राहिली यास ती साडेबाराशात वजा यावी बाकी रुपये देऊ असे कलम ठरवून

गावगन्नास ताकिदी दिल्या व आम्हास आज्ञापत्र लिहून दिले कीं साडेबारासे रुपये दरसाल देत जाऊन आपले वतन सुरक्षित अनभवावे

१ थैली सन इसन आशरीन मयातेन व आलफ.

छ १ रविलाकर उर्फ पौष शु॥ २ मु॥ ता॥ छ २४ माहे दिजंबर सन १२३१ फ. ची थैली माहाराज सरकारात ताकरीन साहेब बहादुर याची आली त्यातील हसील नारायणराव घोरपडे इचलकरंजीकर यानी माहाराजाचे इलाखेदार यानी जखेवाडी येथे गोळागोळी करून माणसे जखमी केली व पाटील धरून नेला व तारदाळ येथे जमाव पाठवून गुरे व मसरे रानातील वलती केली ल्ढाई होऊन माणसे जाया व जखमी जाहाली याजकरिता बंदोबस्त केले जाईल म्हणोन अलताफनामेत कलमी जाहाले आहे असीयास घोरपडे मोसुफ माहाराजाचे इलाखेतील त्यानी गैर केले असले तरी चौकसी करून वाजवी तऱ्हेने बंदोबस्त जाहाला पा म्हणोन.

लेखांक २३ — इ. स. १८४०–४१

श्री

रु. नं. ३

अ. नं. ६३९

यादी हुजूरून राजश्री सदाशिव आनंत वकील

यासी

अजम येजंट साहेब प्रांत कर्नाटक याजकडे वकीलीचे कामास नेमिले संमंधे ठराव सुा इहिदे आर्बैन मयातेन व आलफ

३०० घोडी रास थोर तट्टु एकूण दरमहा रुपये २५ प्रो

२ १

१२० कारकून आसामी १ दरमाहा रुपये १० प्रो

४८ आब्यारी आसामी १ दरमाहे रुपये ४ प्रमाणे

७२ शागीर्द आा २ दरमाहे रुपये ३ प्रमाणे

४४ मोतदार आसामी १ दरमाहे रुपये ४ प्रो

४४ आबदागिऱ्या आसामी १ दरमाहे रुपये ४ प्रमाणे

३३ कामाटी आसामी १ दरमाहे ३ प्रमाणे

४४ मशालची आसामी १ दरमाहे रुपये ४ प्रमाणे

१३२ जासूद असामी ४ दरमाही दरअसामीस ३ प्रमाणे सनदी सबब

८८ बाबू इतलाख आसामी १ दर ८ प्रमाणे

७७ किता माणसे आा २ दोन दरमाहे ३॥ प्रो

५५० भोई आसामी ९ नाईकसुधा दरमाहे रुपये ५० प्रमाणे

२४ भाडे खर्च घर राहाणेबद्दल रुपये २ प्रमाणे
४८० भोजन खर्च दरमाहे रुपये ४० प्रमाणे
१२० धर्मादाय दरमाहे रुपये सरासरी रुपये १० प्रमाणे

२१७६

३२६।. बटा सदरी रुपये शाहापुरी सबब पनाली चा दरसदे रुपये १५ येकून
१००० घर बेगमीकडे

३५०२।.

येणे प्रमाणे पस्तीससेंहे सावादोन रुपये सलीना करार करुन दिल्हे आसेत. रुजू मोर्तब. असे.

लेखांक २४ तारीख १४-१-१८४१

श्री

रु. नं २
अ. नं. ४७६

यादी राजमंडळ हुजूरने राजश्री नरसिंगराव सिंदे याजकडील नेसरी वगैरे सरंजामाचा ठराव सुा इहिदे आर्बैन मयातेन व आलफ राजश्री दाजीराव व सुलतानराव व अमृतराव सिंदे यानी शके १७६२ शार्वरीनामसंवत्सर श्रावणमासी नवसीर लोकाचा जमाव करून नेसरीच्या ठाण्यात शिरुन धांदल केली येविसीची खबर अजम इलवर्ड ह्यूम टौनसड साहेब बहादूर पोलटक्याल येजंट प्रां कर्नाटक यासी कळले वरुन हुजूरचे वकील राजश्री सदासिव अनंत याजसमागम महमद गवस रिसालदार व स्वार देऊन सिंदे यास तबी पोचवून मोहसलनिसी बेळगावास नेऊन हुजूर करवीर मुकामी पाठविले आणि तारीख २४ माहे आगष्ट सन १८४० इ ची थैली हुजूर पाठविली त्यात सिंदे यानी बेकेदी केली याजविसी शासन व खटलेचा इनसाब करावा म्हणोन कलमी केले आहे त्यास येविसीची चौकसी पाहता १ त्रिवर्ग सिंदे यास सवाल केला कीं एक वर्षात तुम्हास कित्येक आज्ञापत्रे कांही मजकूर बोलणेचा असेल तो हुजूर येऊन समजावणे येविसी सादर जाहाली असता तुम्ही अमान्य करून सरकार हुकमास बारजीद नवसीर लोक जमऊन ठाण्यात हुजूरचा कारकून असता असी धांदल करणेची सबब काय व तुमचा मजकूर कसा आहे म्हणोन विचारिता बरोबरन × × ठाण्यात आमचे वादी नरसिंगराव सिंदे याजकडील कारकून वहिवाट करितात सबब आम्ही हे काम केले व सन इहिदे सलासीन साली आमचे बाप सुबराव सिंदे यास नेसरी सरंजामात वाटणी दिली आहे ती नरसिंगराव चालू देत नाहीत ती देवावी म्हणोन आशय लिहिण्यात आहे.

१ नरसिंगराव सिंदे याजला माार विच्यारिता त्याचे लिहिण्यात आमचे आजे नरसिंगराव यास पुत्र पाच याचा तपसील

१ नारायणराव सिंदे याचे नकल जाहले
१ दुर्गोजीराव सिंदे मुंगळीहाळास दत्तक दिल्हे
१ गोविंदराव सिंदे याचे नकल जाहाले
१ सुबराव सिंदे याचे सदर तीन आसामी
१ जिवराव सिंदे याचे पुत्र आम्ही

५

या पौ नारायणराव व सुब्राव याणी च्यालीस वर्षा पाठीमागे हुजूर सरकारचे व पटवर्धन याचे विरुद्ध तेवेळी पटवर्धन यास मिलाफी होऊन सरकारासी फंदीपणा केला सबब राज्यातून दोवास हाकून दिल्हे आणि सरंजाम आमचे बाप जिवराव यासी हुजूरून दिल्हा व त्याचे नांवे सनदा करून दिल्हया व पुढे आम्हास वस्त्रे देऊन आमचे नांवे सनदा करून दिल्हया त्याप्रमाणे आम्ही सरास भोगवटा करीत असता आलीकडे सन इहिदे सलासीन साली सुबराव सिंदे सरकार हुकमा खेरीज करवीरी येऊन रामराव भिमाजी आकबरी कामावर होते त्याचा आश्रा केलेवरून रामराव याणी आम्हावरी भारी सक्ती चालऊन आमची गैर आबरु करून हुजूर सरकारचे आज्ञेइतीले खेरीज सुबराव यास नेसरी सरंजामात निमे वाटणी देणेविसी यादी केली आणि त्यात आपसात समजूत होऊन आले असी न्यायाधिसीकडून यादी जाहाली असे लिहिले परंतु न्यायाधिसीकडून याद चौकसी होऊन हुजूर आज्ञेने जाहाली नाही मजवर सक्ती रामराव यानी चालविली येविसी गवरनर साहेब याचे हुकूम जमेस धरून बेबर साहेब यानी थैली सन १८३५ इसवी मु॥ सन १२४५ फसली ताा ३ माहे सपटंबरची मजला लिहिली त्याजवरून दाखला पाहावा म्हणोन येणे प्रमाणे उभयताकडील मजकुरावरून विचार पाहता नारायणराव व सुबराव सिंदे यानी पटवर्धन याजकडे मिळोन राजकारणात फंद केल्यामुळे हुजूरचे राज्यातून बाहेर घालून दिल्हे याचे दाखले व दरबारात सर्वास महसुर आहे जिवराव सिंदे यास हुजूरून नेसरी सरंजाम सन खमस आशर मयातेन व आलफ छ १ माहे मोहरम तेरखेस देऊन सनदा सादर जाहाल्या नंतर पुढे जिवराव सिंदे मृत्यु पावले त्याचे पोटी पुत्र नाही सबब नरसिंगराव शिंदे यास दत्तक देऊन सन आशरीन मयातेन व आलफ छ ७ माहे रबिलावल तेरखेस हुजूरून वस्त्रे व सनद दिली आहे त्याप्रमाणे भोगवटाही सतत चालला आहे दरम्यान अलीकडे नारायणराव सिंदे व सुबराव सिंदे यानी सरकार हुकमाशिवाय येऊन सन इहिदे सलासीन मयातेन व आलफ साली जोर तलबेने सरंजामात निमी वाटणी घेतली ती याद न्यायाधिसीकडून जाहाल्यासारखी आहे परंतु त्याजवर शिरस्ते प्रमाणे निशान मोर्तब रुजू नाही व नरसिंगराव सिंदे त्यावळेपासून जुलूम चालले मजकुराचा अर्ज करीत आहेत हुजूरच्या सनदा

व भोगवटा नरसिंगराव याचा साफ आहे व दाजीराव वगैरे त्रिवर्ग यानी वारसा करणेस कांही साधन अगर वहिवाट नसता आणि याचे चुलते नारायणराव व बाप सुबराव यास फंदाचे कारणाने चालविले व या त्रिवर्गास करवीरास येगेविसी हुजूरून आज्ञापत्रे पाठविली ती अमान्य करून बावसीर जमावानिसी नेसरी ठाण्यावर काटकाई केली असे पुस्तदरपुस्त फंदी मनुष्य व यास सरंजामा चालणेची नाही नरसिंगराव सिंदे याचे नांवे हुजूरून वस्त्रे व सनदा होऊन भोगवटा चालत आला त्याप्रमाणे आनभव करून सरकार सेवा करावी दाजीराव व सुलतानराव व अमृतराव सिंदे इतःपर हरयेक तंटा बखेडा करणार नाही ऐसा जामीन देऊन सरलपणे वर्तणूक करून राहातील तर हली सरकारातून याजवर मेहरबानी करून नरसिंगराव सिंदे याजकडे सरंजाम रुपये ३६०० तीन हाजार साहासेहेआकाराचा आहे त्यापैकी या त्रिवर्गास पोटगी वगैरे चालणेबद्दल नेमणूक सालीनासालाचे सालास पोहोचणेजोगे गावावर अगर सेत नेमून द्यावी याप्रमाणे हरदो जनाकडील लिहिण्या बोलण्यावरून व साधनसूत्र जिवराव व नरसिंगराव सिंदे याचे नांवे सरंजाम मुकरर हुजूरून होऊन वस्त्रे जाहाल्याची असल आज्ञापत्रे त्याजकडे हजर आहेत याजवरून व दाखले भोगवटेवरून चौकसी करून ठराव जाहला असे शके १७६२ शार्वरीनाम संवत्सरे पौष व॥ ७ छ. २० माहे जिल्काद रुजू मोर्तब असे.

लेखांक २५ तारीख १९–१–१८४१

रु. नं. ७
अ. नं. ११७२

श्रीमन्महाराज छत्रपति साहेब दाम यकबाल हू

अज निअज नियाजमंद आलेकजांडर निसब्रट शा साहेब बहादूर अक्टींग पोलिटक्याल येजंट प्रांत कर्नाटक बाआदब नियाज मारुज आंके येथील खैरियत रोशन होऊन हमेषा अलथापनामा सादर होत असिला पाहिजे दरविला कंपणी सरकार इंग्रेज बहादुर यानी रहदारीचे जकात हसल माफ आपले इंग्रजी सरकार इलाख्यात कराव आणि चांगले वाट कराव म्हणोन काय इरादा केले ते आ माहाराज छत्रपति साहेबास विदितच आहे हा इरादा सरकारानी दवलतदार लोकास हे चांगले उपयोगीचे काम म्हणून समज आहे व त्याप्रमाणे चालावे म्हणोन त्यावरून सरकारचे इरादा प्रमाणे न करिता याजबद्दल दावा चालू आहे असी मर्जी असलेस त्याचे मुबदला सरकारातून देविले जाईल सातारेकर माहाराज छत्रपति साहेबानी ही गोष्ट आपली ध्यानी आणून संतोषाने कबूल करून सरकारचे इलाख्यात जसे चालत आहे त्याप्रमाणे चालविली आहेत यास्तव सरकारचे फार दिलगीर आहे कीं आ माहाराज छत्रपति साहेबानी याबाबदीत लिहिले प्रमाणे कबूल केले नाही म्हणून व सरकारानी ज्यावेळीं नवी वाट बनावणेचे इरादा आणि रहदारीचे हसल माफ करणेचे हे बहुत तजविजीने केले तेव्हा बहु तसनईत आणून

असे समजले कीं मुलकात लोकास फायदा होऊन आमदरफ्त जास्ती होऊन कित्येक सालानंतर वसलही जास्ती होईल कारण कीं असे केल्याकडून याचे फायदा बेपारी यास व रयतास व वसुलीस सुद्धा होईल याप्रमाणे आ माहाराज छत्रपति साहेब हे सरदारास व रयतास सुद्धा फायदा होईल यास्तव गवरनर कवसल याची उमेद असी आहे कीं माहाराज छत्रपति साहेबानी सरकारचे कलागत पुरा आपले ध्यानात आणतील म्हणोन जियादाचे बाद

(सही इंग्रजी)

(सही हणमंतराव
नेटीव्ह येजंट).

लेखांक २६

तारीख २१-२-१८४१

श्री

रु. नं. २
अ. नं. ४७७

यादी सातारेहून श्रीमन्माहाराज राजश्री ——— ——— छत्रपति याची स्वारी करवीरास श्रीचे दर्शनास जाहाली तेव्हा हुजूरच्या भेटी जाहाल्या त्याची बारनिशी सुा इहिदे आर्बैन मयातैन व आलफ शके १७६२ शार्वरीनाम संवत्सरे राज शके १६७ माघ मास माहे जिल्हेज

१ सातारेहून दरमजल वारणा नदीपलीकडे मौजे यैतवडे येथे स्वारीचा मुकाम जाहाला तेथपर्यंत सामोरे हुजरून आज्ञा होऊन राजश्री आमृतराव पंत प्रतिनिधि व आनंतराव येशवंत मंत्री व दिवाण व दाजी जोशीराव व हणमंतराव निंबालकर सरलष्कर बहादूर व नारो चिटको दि।। हुजूर बाजार व गोविंदराव गाईकवाड वगैरे मानकरी व पागा स्वार व पायचे लोक खासबारदार व बंदुकबारदार वगैरे येकंदर आदमासे दीड हजार पर्यंत मौजे पारगाव नजीक वारणा नदी आलीकडे सरहदेस डेरे देऊन उतरले दुसरे दिवशी यैतवडे मु।। माहाराजाची भेट डेरेत जाहाली डेरेचे बाहीर स्वारी येऊन भेटी जाहाल्या नजरा व सदका पद्धती प्रमाणे जाहाले तिकडून चादरा प्रतिनिधि पंत व पंत मंत्री व सरलष्कर यासी भरजरी व वरकड मंडलीस दुपेटे पधती प्रो। घातले नंतर आंतःपुरात श्रीमन्माहाराज मातुश्री सकल सौभाग्यसंपन्न राणीसाहेब याचे दर्शनास गेले पंतप्रतिनिधि व पंत मंत्री व सरलष्कर व गोविंदराव गाईकवाड यास चादरा पधती प्रमाणे घातल्या व विडे देऊन निरोप दिले इकडूनही सदके केले नंतर कचेरीस येऊन माहाराजानी उजवे बाजूस इकडील सर्वत्र मानकरीसह बसवून घेतले त्यास विडे आपले हाते देऊन निरोप दिल्हे माघ व।। ४ रोज भौमवार दिवशी पारगांव मु।। येऊन सायंकाली मु।। केला

कलम

१ वद्य बुधवार ५ स हुजूरची फौज सुधा पंत प्रतिनिधि व पंत मंत्री व सरलष्कर करवीरास हुजूर येऊन दाखल जाहाले माहाराजाची स्वारी येतवडे मुक्कामीहून कूच होऊन मौजे बावडेनजीक करवीर दीड कोसावर मौजे सिवे नजीक आदमासे मुकाम जाहला.

कलम

१ वा ६ गुरुवारचे दिवशी करवीर शाहराचे बाहीर चौफोल्चे माळानजीक हुजूरून डेरे देऊन ठेविले होते तेथे हुजूरची स्वारी जाहाली बरोबर पिलखाना पागा व पायदल मानकरीसह समारंभाने स्वारी डेरे दाखल जाहाली तिकडून महाराजाची स्वारी समारंभाने मानकरी स्वार व पायदलसह येऊन डेरेचे बाहेर हुजूरची स्वारी व श्रियासह चिरंजीव विजयभव राजेश्री चिमणासाहेब महाराज यासह येऊन भेटी जाहाल्या परस्परे सद्के केले व सोनरूपेची फुलाची वृष्टी केली नंतर परस्परे हातात हात धरून डेरेत सदरा केल्या होत्या तेथे बसले हुजूरचे स्वारीचे डावे बाजूस चिमणासाहेब महाराज उजवे बाजूस माहाराज छत्रपति असे तीन सदरा प्रथम केल्या होत्या त्याजवर बसले तिकडून आष्ट प्रधान पंत प्रतिनिधि व सचीव पंत भुवरकर व शिरके म्हाडीक मानकरी लोक व भले लोक व कारभारी बाळाजी नातू व येशवंतराव फौजदार वगैरे दरखदार कारकून मंडळी हुजूरचे उजवे बाजूस उपाध्य बाबा व जोशीराव व इकडील आष्टप्रधान पंत प्रतिनिधि व आमात्य पंत व पंत मंत्री व पंडितराव गोपाळाचार्य व श्रीकराचार्य न्यायाधीश व पंत सुमंत व – ——सेनापति व सरलष्कर व रताजीराव चव्हाण हिंमतबहादर व उमदेतुलउमराव बहादर व ममलकतदार व भिमबहादर व जप्तंनमुलीक व दताजीराव गाईकवाड विश्वासराव व हिंदुराव गाईकवाड सरखवास व आष्टप्रधानाचे मुतालीक महिपतराव गोपाळ पारसनिविस व बाबाजी आपाजीपंत मुजूमदार व केसो आबाजी वाकनीस व आताजी जिवाजी मुतालीक प्रतिनिधि व बाबाजी नरहर सुरनिवीस वगैरे नामांकीत लोक मरातबेच व दिनकरराव गाईकवाड कारभारी सर्वत्र डावे बाजूस सदरहू सर्व मंत्री व दिनकरराव गा व सरखवास हुजूरचे मागे सनिध बसले सकल सौभाग्यादिसंपन्न मातुश्री राणीसाहेब याचा डेरा आंतःपुरचा प्रथक दिला होता तेथें श्रियास चिरंजीव आऊबाई आका व बाळाबाई आका उभयता येऊन त्याची भेट घेतली सद्का केल्यानंतर कचेरीस विडेपान होऊन येका आंबारीत बसून शाहरांत स्वारी चालती जाहाली खवासखाणेत पंत प्रतिनिधि विशालगडकरी व सरखवास बसले भेटीसमई

तोफाची सरबत्ती जाहाली समारंभाने दोहीकडून फौजसुधा नदीचे दरवाजेने बाजार रस्तेतून मशाली व हिलाल हवया चंद्रजोती लाऊन स्वारी वाडीयात दाखल जाहाली देवघरात श्रीचे दर्शन घेऊन कचेरीस बसून नंतर आंतःपुरात तीर्थस्वरूप श्रीमन्माहाराज मातुश्री दिवाणसाहेब व मासाहेब व बयासाहेब व बाबाईसाहेब व आमकाबाईसाहेब व कमलजाबाईसाहेब याची भेट घेऊन परस्परे सद्के होऊन माहाराजानी मातोश्री साहेब याचे पायावर डोई ठेऊन कचेरीस येऊन विडे पधती प्रमाणे होऊन पंचगंगा

नदी उत्तरतीरास मुकामाचे डेरे दिल्हे होते तेथे स्वारी दाखल जाहाली सदरहू वाडीयात ताटे होऊन स्वारी मुा जाहली असे सदरहू रात्री साहेब वाडीयात येऊन सर्वत्रास भेटून मु।।स गेली.

१ व।। ७ भ्रगवारी महाराजानी श्रीस अभिषेक व ब्राह्मणभोजन करविले ते दिवशी वाडीयात येऊन उपहार करून गेले. कलम

१ व।। ८ मंदवार इकडील मेजवाणीचे आमंत्रणास हुजूरची स्वारी नदीपलीकडे डेरेस जाऊन आमंत्रण केले नंतर दुसरे दिवशी महाराजाची स्वारी वाडीयात येऊन ताटे सर्वत्र तिकडील व इकडील मानकरी भले लोकसह होऊन कचेरीस येऊन विडे व नाचरंग यथापधती होऊन सकल सौभाग्यादिसंपन्न राणीसाहेब व मानकरी याच्या स्त्रियासह आंतःपुर वाडीयात येऊन ताटे होऊन दागिने जवाहीर व दुस्त व मानकरी याच्या स्त्रियासह लुगडी व खण दिल्हे त्याची व माहाराजास दागिने जवाहीर दिल्हे त्याची याद अलाहिदा जामदारखानकडे वसनागर रत्नशाळेकडे असे नंतर स्वारी माहाराजाची राणीसाहेबासह मु।।चे डेरेस दाखल जाहाली सदरहू मेजवाणीचे आमंत्रणास राणीसाहेब याकडे उभयता आकासाहेबाची स्वारी जाहाली होती. कलम

१ व।। ९ रविवार माहाराजाची स्वारी हुजूर वाडीयात आमंत्रणास मेजवाणीचे राणीसाहेबासह येऊन हुजूर व आंतःपुरात आमंत्रण करून गेली. कलम

१ दुसरे दिवशी हुजूरची स्वारी व चिरंजीव राजश्री चिमणासाहेब माहाराज व उभयता आकासाहेब व श्रीमन्माहाराज मातोश्री यासह व मानकरी भलेलोक व मानकरी याच्या स्त्रियासह समारंभाने नदीपलीकडे डेरेस जाऊन ताटे होऊन कचेरीस विडे नाचरंग यथापधती जाहाला व अंतःपुरात ताटे होऊन दागिने व जवाहीर व दुस्त व मानकरी याच्या स्त्रियास लुगडी खण व हुजूर व चिमणासाहेब महाराज यासी दागिने जवाहीर व दुस्त दिल्हे त्याची यादी जामदारखानेकडे असे नंतर हुजूरची स्वारी समारंभाने वाडियात दाखल जाहली. कलम

१ दुसरे दिवशी हुजूरचे वाडीयात माहाराजाची स्वारी येऊन आंतःपुरात उपहार होऊन दिवाणखाणेत हुजूरची स्वारी व चिमणासाहेब माहाराज व महाराज त्रिवर्ग खुरशावर बसून वाडेपुढील मैदानात तिकडील व इकडील घोडी पाहून चाबुकस्वाराकडोन घोडी फेरून दाखविली व हत्तीही पाहिलेनंतर आस्तमानी माहाराजाची स्वारी बाहेर डेरेदाखल जाहाली. कलम

१ दुसरे दिवशी प्रातःकाली दाहा घटिका दिवसास महाराजाची स्वारी हुजूर वाडीयात येऊन आंतःपुरात ताटे होऊन हुजूरचा व चिमणासाहेब माहाराज याचा व श्रीमन्माहाराज मातुश्रीसाहेब याचा निरोप घेतला व राणीसाहेब याणीही आंतःपुरात ताटे करून निरोप घेतला ते समई माहाराजास व राणीसाहेबास दुस्त दिले त्याची याद आलाहिदा जामदारखानेकडे आसे माहाराजाची स्वारी वाडेबाहेर आली तेथे पर्यंत

हुजूरची व चिमणासाहेब माहाराजाची स्वारी येऊन माहाराजास पोहचविले माहाराजाची स्वारी चालती जाहाली नंतर हुजूरची स्वारी वाडीयात जाहाली बराबर पोहचवणेस पंत मंत्री व दिनकरराव गाईकवाड व मानकरी पागालोक श्री वाडी नजीक शिरोल येथ पर्यंत गेले माहाराज याणी शिवरात्र वाडी मुा करून आमवाश्येदिवशी कूच करून पुढे स्वारी चालती जाहली मंत्री व गाइकवाड वगैरे सर्वत्रास तेथूनच निरोप होऊन करवीरास हुजूर आले. कलम

१ माहाराजाचे स्वारीचा मुा। करवीरी होता तोपर्यंत दररोज श्री चे दर्शनास व हुजूर वाडीयांत स्वारी येत होती कलम

१ वाडी रत्नागिरीस श्री—चे दर्शनास माहाराजाची स्वारी जाऊन सायंकाली परत मुकामास आली. कलम

१ माहाराजाचे पायावर डोई हुजरून व चिमणासाहेब माहाराज व उभयता आकासाहेब याणी ठेविली व आंतःपुरात श्रीमन्माहाराज मातुश्रीयासाहेब याचे पायावर डोई माहाराज व राणीसाहेब याणी ठेविली आसे. कलम

१ सातारेहून स्वारी बरोबर वोवीनसाहेब बहादूर रसिदंट आले होते त्याचा सत्कार प्रथम पद्धतीप्रमाणे जाहाला आसे. कलम

१ आंतःपुरात माहाराजा बरोबर बाळाजीपंत नातू श्रीमन्माहाराज मातुश्रीयासाहेब याचे दर्शनास आले होते दखलबाद. कलम

१ तोफाची सरबती भेटी समई व वाडीयात माहाराजाची स्वारी जाहाली तेसमई जाहाली असे. कलम

१ माहाराजास करवीरी मेजवान्या जाहाल्या त्याचा तपशील

१ पंत प्रतिनिधि
१ पंत अमात्य
१ वाकेनीस
१ सरलस्कर
१ दिनकरराव गाईकवाड
१ न्यायाधीश दादाचार्य पंडित
१ ——————
१ ——————
१ ——————

—————————— कलम

१ हुजूरून माहाराजास हत्ती व घोडे दिल्हे व माहाराजानी हुजूर हती व घोडे दिल्हे व परस्परे हत्यारे दिल्ही त्याची याद पागा व पीलखाना व शिलेखानेकडे यादी असत. कलम

१ आष्टप्रधान व मानकरी तिकडील व इकडील परस्परे हुजरून व महाराजाकडून बहुमान व्हावयाचे ते पोषाख वगैरे देणेचे राहिले दखलबाद कलम

१ हुजूरची व चिमणासाहेब माहाराजाची स्वारी मेजवाणीस महाराजाचे डेरेस जाहाले दिवशी ताटाचेवेलेस सोवली नेसावयास व शालजोडया पांघरणेस दिल्या त्याचा दाखल जामदारखानेकडे आसे. कलम

१ तीर्थरूप मातुश्री श्रीमन्माहाराज मासाहब याचे निरोपास माहाराज गेले तेवेलेस मोर्च्यल दोन महाराजास दिल्ही. कलम

येणे प्रमाणे समारंभ जाहाला असे माघ वा। ३० पर्यंत.

लेखांक २७

तारीख १९-३-१८४१

श्री

रु. नं. ४

अ. नं. ९३८

चिरंजीव राजमान्य राजश्री दिनकरराव गाईकवाड यासी आज्ञा केली ऐसीजी किले भरथगड तनख्यात दुतर्फी आमल आहे तो यकतर्फी करून घेणेविसीं व किले मार-कडे येक तर्फीस आमल ठरेल त्या आमलात दिवाणी फौजदारी आमल कंपणी सरकारचा राहील म्हणोन इंग्रज बाहदुर याजकडून थैल्या व यादी हुजूर आल्या व एक तर्फीचे आकाराची गावे वरघाटी घेतलेस दिवाणी फौंजदारी सुद्धा दरोबस्त आमलाचे गाव मिलतील येसे हुजूरचे वकीलापासी आजम येजंट साहेब बहादूर प्रांत कर्नाटक याजकडून बोलण्यात आले त्याजवरून तुम्हास आज्ञापत्र सादर जाहाले आहे तरी एकंदर किले माराकडे आमल चालत आहे त्याचे आकार बरहुकूम येवजाचे गाव वरघाटीं दिवाणी फौजदारी सुद्धा दरोबस्त आमलाचे करून घेऊन किलेदाराचे दुतर्फीत आमल चालत आहे तो इंग्रज बहादर याजकडे स्वाधीन करणे जाणिजे सु॥ इहिदे आर्बैन मयातेन व आलफ रवाना छ २५ माहे मोहरम बहुत काय लिहिणे

मोर्तब

शिका.

लेखांक २८

माहे मे इ. स. १८४१

श्री

अ. नं. ९४२

यादी राजेश्री केशवराव नारायण घोरपडे इचलकर्जीकर याचे मूल पुरुष नारो म्हादेव पासून श्रीमन्माहाराज राजेश्री छत्रपति सरकार करवीरच्या राज्यातील शेवक

आहेत आसे असता मेहरबा टोनसड (टाऊनशेंड) साहेब बहादूर पोलटकयाल येजंट प्रां क्र्नाटक याजकडे बेलगाव मुान आरबैन मयातैन आलफची यादी तेवीस कल्माची मारनिल्हे याणी दिल्ही ती हुजुरे पाहावयाकरिता आम्हाकड दिल्ही आशास केशवराव घोरपडे हे कदीमपासून हुजूर इलाखेतील शेवक आहेत येविसीची वहिवाटे समजावयाकरिता लिहिले आहे सु॥ इहिदे आर्बैन मयातैन व अलफ.

१ नारायणराव व्यंकटेश याचे नांवे चाकरीचा तैनात जाबता सन सीत सलासीन साली त॥ आहे व दुसरा व्यंकटराव याचे बाप नारायणराव याणी राजश्री चिंतामणराव आपा सांगलीकर याचे विद्यमानचा तैनातजाबता संन इसने आशर साल्चा करून घेतला असे असता आपण माहाराज सरकारचे इलाखेतील नव्हे म्हणतात आणि सदर जाबदे आपले तेवीस कल्माचे यादीत नमुद करीत नाहीत याजवरून सर्व मतलबी लिहितात असी खातरी होईल

सेनापति याजकडून माहाराज सरकारातून नजराणा घेऊन पदाधिकाराची वस्त्रे देतात ते समई सेनापति आपले दिवाणगिरीच्या बहुमानाची वस्त्रे इचलकरंजीकर घोरपडे यास देऊन त्याजपासून सेनापति नजराणा घेत असतात व त्यास सेनापति जिरंजीव म्हणोन पत्रे लिहितात व सेनापतियास वडिलाचे शेवेसी म्हणोन इचलकर्जीकर पत्रें लिहितात अशाप्रकारे पूर्वीपासून मर्यादेन वागत आसता हाली केशवराव आपण सेवक नव्हे म्हणोन लिहितात हे गैर आहे कलम

मागील कागदपत्र माहाराज सरकारात होतें ते पेशजी सरकारच्या वाड्यात दग्ध जाहले पेशवे अखेर जाहल्यावर कंपणी सरकारचा अमल जाहला त्यासमई इचलकर्जीकर घोरपडे हे माहाराज सरकारच्या इलाखेतील आहे म्हणोन कंपणी सरकारच्या थैल्याहि माहाराज सरकारांत व घोरपडे यासही गेल्या आहेत व धारवाड व बेलगाव दोन तुकड्या जाहाल्या तेव्हा इचलकर्जीकर हे इकडील मांहाराज सरकारचे इलखेत लिहिले आहेत. कलम

लेखांक २९ तारीख २५-६-१८४१

श्री

रु. नं. ३

अ. नं. ६३७

समस्त सेनाधुरंदर विश्वासनिधि राजमान्य राजेश्री रामचंद्रराव घोरपडे सेनापति यासी आज्ञा केली ऐसीजे वो राजश्री दामोदर भट मुनीश्वर श्रीपूजक याचे वडिलास नारायणराव घोरपडे सेनापति यानी पेशजी कसबा लाट प्रांत हुकेरी येथे जमीन बिघे १० दाहा देऊन पत्र करून दिले आहे व त्याप्रमाणे हुजूरनेही सनदा सादर जाहल्या

त्याअन्वये जमीन चालत असता यलीकडे आपण चालवीत नाही म्हणोन हुजूर विदित जाहाले त्याजवरून आपणास आज्ञापत्र सादर जाहाले असे तरी पेशजी भोगवटे प्रो सदरहू जमीन दामोदर भट याजकडे चालवीत जाणेविसी आपणाकडील ताकीद कामारास देऊन जमीन स्वाधीन करून पेशजी प्रमाणे चालवीत जावी जाणिजे सुा इसने आर्बैन मयातैन व आलफ रवाना छ ५ माहे जाावल बहुत लिहिणे तरी सुज्ञ असा.

लेखांक ३० तारीख ३–८–१८४१

श्री

रु. नं. ७

अ. नं. ११७५

समस्त राजकार्य धुरंदर विश्वासनिधि राजमान्य राजेश्री रताजीराव चव्हाण हिंमतबहादर यासी आज्ञा केली ऐसीजे आपणाकडील गावगन्ना मनुष्ये खरेदी घेऊ नये व प्रोख्त करू नये असी सरकारात ठराव जाहाला आहे तरी कोणीही हुजूरचे राज्यात अगर दुसर इलाखेतून विकावयासी आल्यास मनुष्य खरेदी घेऊ नये व विकू नये व पर इलाखेत जाऊन मनुष्य खरेदीचा व प्रोख्ताचा व्यवहार करू नये असी आज्ञा जाली आहे तरी त्याप्रमाणे सर्वत्रानी वर्तणूक करावी यात गफलतीने मनुष्य कोणी खरेदी घेतले अगर दिले असे मामलेदार व कमाविसदार व गावकरी किंवा हरकोणासही समजताच तेथील अमलदारास खबर द्यावी त्यानी घेणार देणार याचा बंदोबस्त ठेऊन हुजूर तेच क्षणी अर्जी पाठवावी यात ज्याजकडून सुस्ती होईल त्याचा मुलाहिजा होणार नाही जाणिजे सुा इसने आर्बैन मयातेन व आलफ रवाना छ १५ माहे जाार बहुत लिहिणे तरी सुज्ञ असा.

लेखांक ३१ तारीख ३–८–१८४१

श्री

रु. नं. ७

अ. नं. ११९२

चिरंजीव समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजेश्री रघुनाथराव पंडित अमात्य यासी आज्ञा केली ऐसीजे मनुष्य खरेदी घेऊ नये व प्रोख्त करू नये असा सरकारात ठराव जाहला आहे तरी कोणीही हुजूरचे राज्यात अगर दुसरे इलाखेतून विकावयासी आल्यास मनुष्य खरेदी घेऊ नये व विकू नये व पर इलाखेत जाऊन मनुष्य खरेदीचा व प्रोक्ताचा व्यवहार करू नये असी आज्ञा जाहाली आहे तरी त्याप्रमाणे सर्वत्रानी वर्तनूक करावी यात गफलतीने मनुष्य कोणी खरेदी घेतले अगर दिले असे मामलेदार व कमाविसदार व गावकरी किंवा हरकोणासही समजताच तेथील

अमलदारास खबर द्यावी त्यानी घेणार देणार याचा बंदोबस्त ठेऊन हुजूर तेच क्षणी अर्जी पाठवावी यात ज्याजकडून सुस्ती होईल त्याचा मुलाहिजा होणार नाही जाणिजे सु॥ इसन आर्बैन मयातेन व आलफ रवाना छ १५ माहे जमादिलाखर बहुत लिहिणे तरी सुज्ञ असा.

लेखांक ३२ तारीख ७-८-१८४१

श्री

रु. नं. ७

अ. नं. ११९३

श्रीमन्माहाराज छत्रपति साहेब दाम

यकबाल हू

नियाजमंद अलकज्यांडर निसबट शा साहेब बहादूर अगटिंग पोलिटक्याल एजंट प्रांत कर्नाटक बाद नियाज मारुज आंके येथील खैरयेत रोषण होऊन हमेशा अलथापनामा सादर फर्मावीत असिल पाहिजे दरविला कोकण प्रांती विशाळगडच्च दुतर्फी अमल आहे कीं त्या गावगनेत दिवाणी फौजदारी अमल सरकारचे आहे करिता त्या गावगनेत विशाळगड निसबतीचे माणसावर कांहीं खटला असलेसंही त्याचा इन्साफ सुधा सरकारात होईल याविषयी सरकारचे हुकूम आला आहे करिता आ माहाराज छत्रपति साहेबास इलतीमास केल आहे याजविसी विशाळगडकर मेहरबा पंत प्रतिनिधि यास आ माहाराज छत्रपति साहेबकडून सूचना जाली पाहिजे जियादाचे आयाम शादमानी मुदाम बाद

सही इंग्रजी

सही हणमंतराव
नेटीव्ह येजंट

पै. छ. १९ जा॥खर सन इसने आरबेन. मयातेन व आलर्फ.

लेखांक ३३ तारीख २२-१०-१८४१

अ. नं. ९२३

यादी श्रीमन्माहाराज छत्रपति साहेबाचे दरबारास कर्नाटक प्रांत अगटिंग पोलिटक्याल येजंट अलेकज्यांडर निसबट शासाहेब बाहादूर याजकडून कलमी करणेच ऐसीजे

१ मनोहरगड सांवतवाडीस जवल आहे करिता माहाराज छत्रपति साहेबास व मनोहरगडकरास काय तकरार असणेच ते चौकशी करणेबदल सांवतवाडीच सोस हुकूम केला आहे करिता माहितगार कारकून आसाहेबाकड पाठविल पाहिजे म्हणोन सरकारच

पत्र छ १६ आकटबरचे आले आहे कारण कलमी करण्यात येतो जे आपणाकडील माहितगार कारकुनास सांवतवाडीच साहेबाकड पाठविल पाहिजे.
रा। छ २२ माहे आकटबर सन १८४१ इ॥ मु॥ १२५१ फसली शके १७६३ प्लवनामसंवत्सर आश्विन शु॥ ७ शुक्रवार मु॥ बेलगाव
(सही हणमंतराव नेटिव्ह)

(इंग्रजी सही)

पै॥ आश्विन शु॥ ११
रे॥ सोमवार सु॥ इसने अर्बैन मयातैन व अलफ शके १७६३.

लेखांक ३४ तारीख ४-११-१८४१

श्री

रु. नं. ४
अ. नं. ९४६

यादी राजमंडळ हुजूर करवीर सरकारातून किले मनोहरगड येथील गडकरी लोकाचा ठराव विदयमाने राजश्री आनंदराव पंडित मंत्री सुा इसने अर्बैन मयातैन व आलफ

१ गडकरी लोक याणी किले मजकुरी तंटा बखेडा कांहीं न करिता हुजूरची शेवा किले मजकूरी करुन आसावे ते न करिता भवानराव घाडगे किले मजकुरी हुजूरून किलेचे बंदोबस्तास पेशजी ठेविले होते त्यानी किले मजकुरचे वहिवठदारावर आदावत खाऊन गडकरी यास वहिवाटदारापासी दांडगाई करावी अशी मसलत देऊन वहिवटदार व किलेचे हवालद्गार किलेचेखाली घालविले याप्रमाणे वहिवटदार याचे विनंतीपत्र हुजूर आले त्याजवरून वहिवाटदार याचे अर्जीवरून व गडकरी याचे जबाण्यावरुन पाहाता घाटगे किले मजकुरी बंदोबस्तास हुजूरून ठेविले आसता त्यानी गडकरी लोकास बदसला देऊन तंटा वाढवणेची उमेद दिल्ही यात मोठा गुन्हा घाटगे याचा आहे.

१ गडकरी यास गैर चालीची वर्तणूक करणेस उमेद व कुमक करणार दुसरे फौंड सांवत तांबोलकर व त्याचे लोक किले मजकूर व सुंदरवाडी दुतर्फी आमली सागेली तर्फेत गडकरी लोक याची बातमी हुजूरच्या वहिवाटदारानी लाऊन आदमासे सतावीस आसामी गडकरी धरले आसता फौंड सांवत याचा लेक तान सांवत याणे काढून घेतले ते वाडीचे साहेब बहादूर यास लिहून जाऊन कैदी गडकरी हुजूर स्वाधीन व्हावे येविसीचे हुजूरचे वकीलानी आजम पोलटक्याल येजंटसाहेब बहादूर याजकडे यादी श्रावण वाा आष्टमी सन १८४१ इसवीस दिल्ही त्याप्रमाणे गडकरी स्वाधीन जाहाले नाहीत याप्रमाणेच फोंड सांवत याचे कुमकेवरून हुजूरचे

दास्तानचा गला दुतर्फी आमलात होता तो गडकरी याणी दांडगावा करून नेहला येविसी येजंटसाहेब बहादूर याजकडून दुतर्फी आमलात गडकरी थाणी बेकैदी धांदल केली त्याचा बंदोबस्त व्हावा असे लेहून आले नंतर त्याचे बंदोबस्तास फौजसुधा मंत्री यासी रवाना केले त्यानी जाऊन तजवीज पाहता पर्जन भारी ते लोक गैरसमज भयस्त होऊन झाडीत राहिले आणि समजुतीवर येणेचा मार्ग बोलत आसता खराबीची मसलत करू नये आसे समजोन त्यानी गडकरी याचे बोलणेचा मार समजोन घेऊन हुजूर विनंती लिहिली त्याजवरून विचार करिता हा त्याजकडून गुन्हा जाहला परंतु मानशे जुनाट प्राचीन चाकर आणि रानवट कमी आकलेची घाटगे सरकारच चाकर त्याची वगैरे तसे माणसाची गैरचालीची सला ऐकून येही समजूत न घडता गडकरी लोकानी हुकुमास आमर्यादा केली व हाली त्याणी कबूल केले की इतःपर सरकारानी आम्हास सालाबाद पोटगी पोहोचवणेची ती घेऊन सरकार आज्ञे प्रमाणे चाकरी करून राहू तंटा बखेडा करनार नाही व फंदी माणसाचे नादास लागणार नाही हरकोणी आम्हा लोकात तसे चालीचा मनुष्य आढळ होईल तरी त्यास कैद करून सरकारात हजीर करू आसे खात्रीपत्र लिहून देऊन चांगले वर्तनुकेविसी जामीन दिले याजवरून पाहाता बहुता दिवसाचे चाकर आणि घाटगे याचे मसलतीवर तंटा चालविला पुढे इमाने वर्तणुकीविसी कबुलायत केली याजकरिता यावेली त्याजला शिक्षा महकुब करून याजउपरी त्यानी गैरचालीची वर्तणूक केली तरी त्या लोकाचा भारी अपराध जाहाला ते जुने चाकर म्हणोन त्याचा मुलाहिजा न होता पारपत्य करून चाकरी मना करावी आसा ठराव जाहला आहे.

१ हा तंटा चालला यात सरकार चाकर आसून घाटगे होते ते तंटेबाज मनुष्य आसे हुंजूरचे नजरेस पुरे आलेवरून त्याजला चाकरीवरून दूर केले होते पुढे पुरी दर्यांत होऊन सिक्षा होणेची इतकीयात घाटगे याणी करवीरी तंटा केला सबब त्यास शिक्षा साहा महिने कैदेत ठेऊन राज्यातून हाकलून दिल्हे.

येकून कलमे तीन मितीं सके १७६३ पलवनाम संवत्सरे आश्वीन वा ६ छ १९ माहे रमजान रुजू.

मोर्तब
शिका

लेखांक ३५ तारीख ६--११--१८४१

श्री

रु. नं. ४
अ. नं. ९५४

यादी राजमंडळ हुजूर करवीर सरकारातून अजम अलेकज्यांडर निसबट शा साहेब

बहादूर पोलटक्याल यजंट प्रांत कर्नाटक यासी सुा इसने आरबैन मयातेन व अलफ आसाहेबाकडून ता २२ माहे अक्टंबर सन १८४१ ची इसवीची यादी आली त्यात मनोहरगड हा सांवतवाडीस जवळ आहे करिता माहाराज छत्रपति साहेबास व मनोहरगडकरास काय तक्रार असणेचे ते चवकसी करणेबद्दल सांवतवाडीचे साहेबास हुकूम केला आहे करिता माहितगार कारकून त्या साहेबाकडे पाटविला पाहिजे म्हणोन सरकारचे पत्र छ १६ अगटंबरचे आले आहे कारण कलमी करण्यात येतो जे आपणाकडील माहितगार कारकुनास सांवतवाडीचे साहेबाकडे पाठविला पाहिजे म्हणोन असीयास मनोहरचे गडकरी हुजूरचे नोकर त्यानी गैर समजुतीने हुजूरचे आज्ञेस बारजीद वर्तणूक केलेबद्दल हुजूरून राजश्री आनंदराव पंडित मंत्री फौजसुधा रवाना जाहाले आहे नंतर गडकरी यानी पंडित मशारनिले याजपासी रुजू होऊन सुरळीत वर्तणूक करणेचे कबुल केलेवरून किलेचा बंदोबस्त करून मंत्री हुजूर फौजसुधा आले हुजूरच्या नोकरमाणसानी आमर्यादा वर्तनूक केलेस पुस्तपन्हा ठेऊन हुजूरून बंदोबस्त व्हावा असी तजवीज ठेवणेचे कुंपणी सरकाराकडे आहे त्याप्रमाणेच कंपणी सरकारानी बंदोबस्त होणेविसी नजर ठेविले वरून बंदोबस्त जाहला आहे मिा शके १७६३ प्लवनाम संवत्सरे आश्विन वा। ८ छ २१ माहे रमजान रुजू मोर्तब असे.

लेखांक ३६ इ. स. १८४१–४२

श्री

अ. नं. १०१४

यादी राजमंडल चिटणिसी सु॥ इसने आर्बैन मयातैन व अलफ राज्याभिषेक शके १६८ शालीवाहन शके १७६३ प्लवनाम संवत्सरे

....

१५ राजमंडल चिटणिसी राजशक १६८ शालिवाहन १७६३ सु॥ इसने आर्बैन मयातैन व अलफ प्लवनाम संवत्सरे

श्रीमन्माहाराज मातुश्री साहेब याची नांवे

१ तीर्थस्वरूप श्रीमन्माहाराज कैलासवासी राजे आबासाहेब छत्रपति याच्या राण्या

१ खानवेलकर याची कन्या

१ निंबालकर धारराव याची कन्या

३ रुई

४ श्रीमन्माहाराज मातुश्री सईबाईसाहेब जीवनराव शिर्के याची कन्या दिवाणसाहेब

५ श्रीमन्माहाराज मातुश्री जिजाबाईसाहेब त्र्यंबकराव खानवेलकर याची कन्या बयासाहेब

———

१ तीर्थरूप श्रीमन्माहाराज कैलासवासी राजे बावासाहेब छत्रपति याच्या राण्या

१ ती।। आंबिकाबाईसाो आपाजीराव नाइकनिंबाळकर याची कन्या

२ ती।। सकवारबाई साो दौलतराव मोहिते हंबिरराव याची कन्या आबाईसाो

३ रुई

४ ती।। म।। सगुणाबाई साो जीवनराव सिर्के याची कन्या बाबईसाो

५ ती।। मातुश्री आनंदीबाईसाहेब जोत्याजीराव पाटणकर याची कन्या

६ ती।। म।। राजसबाईसाहेब मन्याजीराव खानवेलकर याची कन्या

७ ती।। नर्मदाबाई साो माधवराव घाटगे याची कन्या

८ ती।। उमाबाईसाहेब येशवंतराव घाटगे सर्जेराव याची कन्या

९ ती।। म।। कमलजा बाईसाहेब मन्याजीराव इंगले याची कन्या

लेखांक ३७ तारीख ४-२-१८४२

श्री.

रु. नं. ४

अ. नं. ९६७

छ. २२ तेरीखेची

यादी दोन

यादी राजमंडळ हुजूर करवीर सरकारातून आजम हेनरी विल्सन रीव्हीस साहेब बहादर अगटिंग पोलिटक्याल येजंट प्रांत कर्नाटक यासी सुा इसने आर्बैन मयातेन व आलफ आसाहेबाकडून तारीख २४ माहे जानेवारी सन १८४२ इसवी नंबर २७ ची यादी हुजूर दरबारचे नांवे आली त्यात कोलापुर इलाखेतील आणसकुरा वगैर घाटावर चोरटे फार उटले आहेत तेणेकडून वाटसरूलोक लुटले जातात असे विदित जाहालेवरून कलमी करणेत येत जे घाटाच बंदोबस्तीस लोक ठेवणेचे बाबदीत पहिले अजम समसीन साहेब बहादूर व टोनसड साहेब बहादूर याचेवेळेस ठरले प्रमाणे लोक येऊन बंदोबस्त ठेवणेस सरदार लोकास सरकारातून ताकीद जाहाली पाहिजे म्हणोन कलमी केले त्यास घाटमाथाचे चौक याचा बंदोबस्त हुशारीने ठेवणेविसी ज्याकडे जे घाट नेमिले आहेत त्याचे नांवे आज्ञापत्रे रवाना जाहाली आहेत व चोरटे लोकाची वगैर चौकसीस स्वार व लोक रवाना होत आहेत मिती शके १७६३ पौष वाा ९ शके १७६३ प्लवनाम संवत्सरे छ २२ माहे जिल्हेज रुजू मोर्तब असे.

को. घ. ७...३

लेखांक ३८ पौ तारीख ९-२-१८४२

रु. नं. ७

अ. नं. १२०४

श्रीमन्महाराज छत्रपति साहेब

दाम यकबाल हू

नियाजमंद हेनरी विल्सन रीवीस साहेब बहादूर अगटिंग पोलटक्याल येजंट प्रांत कर्नाटक बाद नियाज मारुज आंकी येथील खैरियत रोषन होऊन हमेशा अलथापनामा सादर फर्मावीत असिल पाहिजे दरविला अस्मत पनाह राधाबाई साहेब प्रतिनिधि विशाळगडकर यास खर्चाचा बंदोबस्त जाहल नाही म्हणोन वगैर बाई यानी यजंट साहेबास व सरकारास जाहीर केलेवरून याच हकीकत मेहरबा साहेब बहादूर यानी छ २८ आगष्ट सन १८४१ इ च रिपोर्ट केले असता सरकारातून छ २४ जनेवारी सन १८४२ इ॥चा हुकूम आला त्यावरून कलमी केले जाते जे मेहरबा शाहा साहेब बहादूर यानी लिहिल ते कायम जाहल आहे त्याप्रमाणे तपसील

१ अस्मत पनाह राधाबाई साहेब यास खर्चाबद्दल वेतन रुपये ८४०० प्रमाणे दर-साल पंताकडून पोहचल पाहिजे करिता तो ऐवज रोख पोहोचाव अथवा तितका ऐवजास गाव नेमून द्याव असा पंताचा मनोगत असलेस त्याप्रमाणे गाव नेमून द्याव गाव देणे ते रत्नागिरी इलाखेपैकी सरकार काईदेत दाखल असणेच जे गाव विशाळगड इलाखेच असतील तो गाव पैकी नेमून दिला पाहिजे त्या गावचा वसूलमात्र बाईसाहेबाकड पोहोचतील वरकड तेथील पोलिस वगैर सरकारच विद्यमान चालेल

२ विशाळगड दवलतीस कर्ज जाल आहे म्हणोन तक्रार त्यास या कर्जाच मजकूर माहाराजाच दरबारात तपासणी व्हाव बाईसाहेब याच कालकीर्दीत दवलतीच खर्चाबद्दल कर्ज केले असतील ते ऐवज दवलतीकडून पावला पाहिजे सबब तसल कर्ज दवलतीकड कायम असाव कदाचित बाईसाहेबानी आपले खासगीबद्दल कर्ज केले असलेस ते बाई-साहेबानी पाहून घ्यावा हे लोक थोर व अब्रूची आहे करिता याजबद्दल वाजवी इन्साफ जाहल पाहिजे.

३ बाईसाहेबानी कासी वगैर जागेस जाणेचा इरादा असलेस मना होऊ नये परंतु विशाळगड व कोल्हापूर इलाख्यात पहिला असता पुढे दरबात्प तक्रार उत्पन्न होईल यास्तव सरकारच अभिप्राय असे कीं सदरी दोन्ही इलाखा सोडून दुसरे ठिकाणी राहाणे उत्तम होईल म्हणोन.

४ जुने नोकर वगैरे लोकाकडून मेहरबा अमृतराव साहेब प्रतिनिधि यानी काम वेत नाही त्याजकडील कारभार काढिल आहेत म्हणोन वगैर तक्रार आहे अर्थात प्रतिनिधि यानी कारभारी कोणास नेमाव व कोणाकडून काम घ्याव हे प्रतिनिधि मोखत्यार आहेत या गोष्टीविसी सरकार कांहीं सांगत नाही परंतु नोकर लोकाकड प्राचीन मिळवल इनाम

जमीन व घर जिनगी वगैर पंत प्रतिनिधि यानी घेतल असेल ते घेऊ नये असी गैरवाजबी काम होऊ नये आणि गैरवाजबी काम पंताकडून घडू देऊ नये आणि ज्याच त्याजकड चालवाव असी माहाराज सरकारातून तजवीज असावी.

५ विठल आपाजी व सखो केशव परांजपे हे दोघे माणसास सरकारचे लिहिणेवरून व हुकमावरून कोल्हापुरात कैद केले त्यास सरकारात न कलविता मोकलीक केले यावरून या दोघास आ माहाराज छत्रपति साहेबानी विशाळगडच कामकाजात बिलकुल हात लाऊ देऊ नये त्यानी कांही विशालगड दवलतीच काम करू नये आणि तिकडे राहू नये असी सरकारच निकडीच अगत्यवादच हुकूम आहे.

६ बाईसाहेबाच व पंत याच तकरार फार दिवसापासून आहे पुढे उभयतामध्ये तकार उपक्रम न येई याजोग श्रीमन्महाराज छत्रपति साहेब व माहाराजगी राणी दिवाणसाहेब यानी मनावर घेऊन सरकारच ठराव बरहुकूम बंदोबस्त हर प्रयत्नाने करतील असी सरकारच फार उमेद आहे.

ज्यादाचे बाद

(सही इंग्रजी)

(सही हणमंतरावे नेटी-)
व्ह येजंट.

पौ छ २७ जिल्हेज सन इसने आरबेन मयातेन व आलफ.

लेखांक ३९ तारीख ११-२-१८४२

श्री

रु. नं. ४
अ. नं. ९६९

पौ छ ३० माहे जिल्हेज सुा
इसने आरबैन मयातैन व आलफ

श्रीमन्महाराज राजेश्री छत्रपति स्वामीचे शेवेसी विनंती सेवक रेखोजीराव जाधव नामजाद व चिंतामण जोसीराव किले भुदरगड कृतानेक शेवेसी विज्ञापना तागाईत छ २९ माहे जिल्हेज पावेतो स्वामीच्या कृपावलोकने करून शेवकाचे व किले मजकूरचे वृत्त यथास्तित असे विज्ञापना ऐसीजे. राजी कोम रामजी भोसले हुजूरे इणे खासे स्वयपाकात पाहारा घालणे करिता आणवून मसालेत पारा घातला हा अपराध तिजकडून मोठा जाहाला सबब नऊ वर्षे कैदेत ठेवणेची ठेप टरवून किले मजकुरास बरोबर लोक देऊन पाठविली आहे तरी एक पायात वाला घालून बंदोबस्तीने कैदेत ठेवणेविसी आज्ञापत्री आज्ञा आज्ञेप्रमाणे राजी भोसली इचे पायात वाला घालून बंदोबस्तीने कैदेत ठेविली आहे सेवक किल्ले मजकुरी घस्त पाहारा अलंग नोबत करून हुशारीने आहो. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लखांक ४०　　　　　　　　　　　　　　　　　　तारीख ११-२-१८४२

श्री

रु. नं. ४

अ. नं. ९६०

छ २९ तेरीखेचे यादीच्य

यादी राजमंडळ हुजूर करबीर सरकारातून अजम हेनरी विल्सन रीवीस साहेब बहादूर अगतिंग पोलिटक्याल एजंट प्रांत कर्नाटक यासी सु॥ इसन आर्बैन मयातेन व आलफ आसाहेबाकडून तारीख २४ माहे ज्यानेवारी सन १८४२ इ ची यादी आली त्यात श्रीमन्महाराज राजेश्री छत्रपति व माहाराज मातोश्री साहेब याच्या पोटात पारा जाणेची तजवीज कुणबिनीने केली हे दरबारात समजलेवरून चवकशी चालली आहेसे विदित जाहाले त्यास फार चांगले बारीक रीतीने तपासणी होऊन उतर मेहरबानगी करून पाठविले पाहिजे आणि माहाराज छत्रपति साहेब व मातोश्री साहेब याचे कांहीं नुकसान होईनासे नीट ठेवणे वेस्था करणेचे आपणाकडे आहे म्हणोन कलमी केले अशास सदर मजकूर समजताच चवकसी करिताना राजी बाईको कुणबीण इणे स्वयपाकाचे मसालेत पारा घातला असे तिनेच कबूल होऊन लेहून दिलेवर चौकसी जाहाले प्रकरणी सर्व मजकूर आसाहेबास समजोन देणेविसी राजेश्री सदासिव अनंत वकील यासी सरकारातून आज्ञा जाहाली त्याप्रमाणे वकील यानी समजाऊन दिले त्याजवरून आसाहेबानी वकीलाचे नांवे तारीख २६ जानेवारी सन मजकूरची यादी आली तो मा॥र वकील याजकडोन हुजूर विदित जाहला अशास सदरी गुन्ह्याबद्दल राजी इजला नऊ वर्षाची ठेप ठरऊन कैदेत देवणेबद्दल किले भुदरगडास रवाना करणेची आज्ञा जाहाली आहे व हारएकविसी माहाराज छत्रपति व मातोश्री साहेब याचे कल्याणाची इच्छा धरून सर्वदा इश्वरापासी प्रार्थना करून तदन्वये आचरण होत आहे मिती शके १७६३ प्लवनाम संवत्सर माघ शुद्ध येक भ्रगुवार छ २९ माहे जल्हेज रुजू मोर्तब असे.

लेखांक ४१　　　　　　　　　　　　　　　　　　तारीख १४-२-१८४२

श्री

रु. नं. ७

अ. नं. १२०२

यादी श्रीमन्माहाराज छत्रपति सोच दरबारास कर्नाटक प्रांत आगटिंग पोलेटक्याल एजंट हेनरी विलसन रीव्हीस साहेब बहादूर याजकडून

१　रत्नागिरी इलाखेत चोरी वगैरे करून बावडे इलाखेत येतात त्यास दस्तगीर करणे बदल माहालकरी वगैरे आलेस मदत असाव म्हणोन रत्नागिरीहून छ ३ फेब्रुवारीच याद आलेवरून मेहरबा रघुनाथराव साहेब आमात्य यास मदत करणेबद्दल थैली लिहून

खुला पाठविला आहे ते माहाराजानी पाहून त्यात लिहिले प्रमाणे बंदोबस्त होणेची तजवीज होऊन मेहरबाणगी करून उत्तर पाटविल पाहि तारीख १४ माहे फेब्रुवारी सन १८४२ इसवी मु॥ १२५१ फसली शके १७६३ प्लवनाम संवत्सर माघ श्रु॥ ४ सोमवार मुकाम बेलगांव

(सही इंग्रजी)

(सही हणमंतराव नेटीव्ह)
येजंट

पौ फाल्गुन श्रु॥ १० शके १७६३ प्लवनाम संवस्तर सन इसने आरबेन मयातेन व आलफ.

लेखांक ४२ पौ तारीख २५-२-१८४२

श्री

रु. नं. ३

अ. नं. ६४०

अस्मत पनाह इजलाल दस्तगाह
तवज्य हात नामत माहाराज दिवाण सो दाम यकबाल हू

नियाज मंद हेदरी विल्सन रीव्हीज साहेब बहादूर अकटिंग पोलटिक्याल एजंट प्रांत कर्नाटक नियाजमारुज नियाजमंदाच खैरयेत जाणोन हमेशा तलुफनामा फिरस्ताद करून सरफराज करीत असिल पाहिजे दरिवला कबूल करार येथील मजकुराविषयी छ २९ जिलेजच पत्र व मेहरबा गव्हरनर साहेब बहादूर याच नांव पत्र पाठविल ते पोहोचल गव्हरनर साहेबाच थैली सिरस्तेप्रा॥ रवाना करीत आहे परंतु कबूलकरार येथ मरहूम गव्हरनर मयाक मोटन साहेब बहादूर यास विश्वास देऊन तिकडून जखलगास छावणीतील लष्कर जाताना वाटत फार अडचणीच जागा बसायास सुद्धा मिळत नाही तसले ठिकाणी दगा करून फार नाश केले यास्तव आणखी सरकारच भारी फौज याच बंदोबस्ती बद्दल रवान झाल आहे आ मेहरबानास विदित असाव जियादाचे आयाम

सुदाम बाद

(सही इंग्रजी)

१३ मोहरम इसने आरबेन मयातेन व आलफ

(सही हणमंतराव नेटीव्ह यजंट)

लेखांक ४३ तारीख २७-२-१८४२

श्री

रु. नं. ४

अ. नं. ९६६

यादी राजमंडल हुजूर करवीर सरकारातून अजम हेनरी बिल्सन रीव्हीस साहेब बहादूर अकटिंग पोलटक्याल एजंट प्रांत कर्नाटक यासी सुा इसने आरबैन मयातैन व आलफ तारीख २२ माहे फेब्रुवारी सन १८४२ इ ची यादी आली त्यात हसील राजी कुणबिन इने स्वयपाकात पारा घातलेला कबूल केलेबद्दल नऊ वर्षाची ठेप देऊन कैदेत ठेवणेबद्दल भुदरगडास रवाना केली परंतु राजीने आपणास श्रीमन्माहाराज मातुश्री दिवाण-साहेब माहाराज याचे कुणबिनीने सांगितले होते त्या कुणबिनीवर संशय असलेस तिला चाकरीतून दूर केले पाहीजे म्हणोन अशास राजीने माझी आई सगणी इने पारा आणोन देऊन घालणेस सांगितला व दुसरी रखमी इणेही घालणेस सांगितला असे सांगितले परंतु त्या दोघीने कबूल केले नाही व पुरावा जाहाला नाही व त्या दोघीही सरकारानजीक चाकरीच्या बायकोत त्याची नेमणूक पहिलेपासून नाही येकंदर कुणबिनी पांचचारशेहे सुमार हरयेक कोठ्या वगैरे कारखानेकडे आहेत त्या श्रीमन्माहाराज मातोश्री, दिवाणसाहेब माहाराज याच्या कुणबिणी म्हणवितात त्यातील सगणी कोटीकडे व रखमी खर्ची मुदब्राकाचे दलणकांडण वगैरे काम करून होती त्या दोघीही सदर गुमानी बद्दल त्या दिवसापासून आलाहिदा पाहारेत ठेविल्या आहेत त्यास चाकरीतून दूर करणेचे ठरले आहे मिती शके १७६३ प्लवनाम संवत्सरे माघ वा ३ रविवार छ १५ माहे मोहरम रुजु मोर्तब आसे.

लेखांक ४४ तारीख २-३-१८४२

श्री

अ. नं. ९६८

यादी राजमंडल जाहीरनाभा-

समस्त लोकास कळावयाकरिता आज्ञा केली ऐसीज सु॥ इशेन आरबैन मयातैन व आलफ कोणी आरब लोक व बिदेसी वगैरे चाकरीचे उमेदीने हुजूरचे प्रांतात आले असता त्या लोकाकडे हत्यार असो केव्हा नसो त्या लोकास तेक्षणी अटकाव करून धरून सरकार इलाखेचे मामलेदार कोणी जवळ असतील त्याचे स्वाधीन करविले पाहिजे म्हणोन तारीख २५ फेब्रुवारी सन १८४२ इसवीस आजम इंग्रज बहादूर याजकडून हुजूर लेहून आलेवरून जहागीरदार व सरंजामी व इनामदार व मामलेदार व कमाविसदार यासी आज्ञा जाहाली आहे तरी या सर्व लोकानी सदरी आज्ञेप्रमाणे अरब व बिदेसी वगैर चाकरीचे उमेदीन येतील ते आढळ होताच कैद करून हुजूर रवाना करीत जाणे जाणिजे रवाना छ १८ माहे मोहरम रुजू मार्तब.

लेखांक ४५ तारीख ५-३-१८४२

श्री

रु. नं. २ तालीक

अ. नं. ४८०

शिवछत्रपति

यादी ठाणे नेसरी वगैरे गाव राजश्री नरसिंगराव शिंदे याजकडे चाकरी बद्दल सरंजामात चालत आहेत येविसीचा ठराव जाहाला तो सुा इसने आर्बैन मयातेन व आलफ

१ नरसिंगराव सिंदे याचे बाप जिवराव सिंदे हे बंधु ५

१ नारायणराव सिंदे
१ दुर्गोजीराव सिंदे
१ गोविंदराव सिंदे
१ सुबराव सिंदे
१ जीवराव सिंदे
५

पो नारायणराव व सुबराव हे दोघे यानी पेशजी कैलासवासी श्रीमन्माहाराज ———— छत्रपति राज्य करीत असता रखमाजी भोसला म्हणोन बंड उत्पन्न करून दोन हजार फौज जमविली तेव्हा छत्रपति माहाराज याणी भारी फौज पाटऊन भोसला बंड यासी धरून जीवनिसी ठार मारिला व हरदो सिंदे यासी सन समान तिसेन मया व अलफचे साली राज्यातून हाकून दिल्हे येविसी आज्ञापत्र रवाना जाहाले असे त्यास वर्षे चवेचालीस सुमार जाहाली. कलम

१ सदर पांच बंधु पौ तिघे राहिले

१ दुर्गाजीराव शिंदे मुगलीहलकर शिंदे यास दत्तक जाहाले
गोविंदराव शिंदे यास संतान नाही.
१ जीवराव शिंदे यासी नेसरी सरंजाम चालविला
३

३ सदर नारायणराव व सुबराव शिंदे यासी राज्यातून घालविले नंतर परशराम रामचंद्र पटवर्धन याजपासी व आणखी हरयेक जागा चाकरी करून होते हुजूरचे राज्यात येऊन दिले नाहीत. कलम

४ पुढे सरंजामाची वहिवाट जीवराव शिंदे याजकडे चालली.

५ नंतर हुजूरचे तालुके निपाणीकर याणी घेतले त्यात नेसरी वगैरे गावगनाची वहिवाट जीवराव याजकडे चालत होती. ———————— कलम

६ सिदोजीराव निंबालकर निपाणीकर याजकडून हुजूरचे तालुके परत आलेवेली जिवराव शिंदे हुजूरचे शेवेसी रुजू जाहालेवरी ठाणे नेसरी व गावगन्नासुधा चाकरी बदल सरंजामाची सनद सन खमस आशर मयातैन आलफचे साली आज्ञापत्र सादर जाहाले आहे त्यास वर्षे सत्तावीस जाहाली.——————————कलम

७ जीवराव शिंदे सरकार कामावरी हुजूरचे स्वारीत समक्ष लाटेचे मुकामी खर्च जाहाले त्याचे पोटी पुत्र संतान नाही सबब हुजूरुन त्याची स्त्री अहिल्याबाई शिंदे याचे ओस्यांत दुर्गोजीराव शिंदे याचे पुत्र नरसिंगराव यासी घालून दत्तविधान करून नेसरी सरंजामची वस्त्रे देऊन येविसी हुजूरुन आज्ञापत्रे सन आसरीन मयातैनात दिली आहेत त्यास वर्षे तेवीस जाहाली.——————————कलम

८ जिवराव शिंदे यासी सरंजाम मुकरार करून देऊन आज्ञापत्रे करून दिल्हे प्रमाणे त्याजकडे चालला ते सरकार कामावर ठार जाहालेवर त्याचे बायकोचे वोटयात नरसिंगराव यासी घालून सरंजामाची वस्त्रे देऊन आज्ञापत्रे करून दिली त्याप्रमाणे नरसिंगराव याजकडे शके १७५२ सन इहिदे सलासीन आखेर पर्यंत सररास सरंजामाचा भोगवटा चालत होता सुब्राव नारायणराव हूजूरचे राज्यात आले नवते.——————————कलम

९ सदर साली राजाज्ञा कारभार करीत होते त्याजकडे उभयता आले असता त्यानी त्याजला तुम्हास मोठे आपराधाबद्दल राज्यातून घालविले तुम्ही येथे राहू नये आसी ताकीद करून घालऊन दिल्हे ते वेलेस नारायणराव शिंदे यासी आजार होऊन करवीरी मेले

सुब्राव शिंदे निघून गेले.——————————कलम

१० शके १७५३ इसने सलासीन साली रामराव भिकाजी अकब्रनिस याणी सुब्राव याचे तर्फे शरी करून नरसिंगराव यासी जरब देऊन सरंजामात वाटणी सुब्राव याजला देणेविसी यादी केली ती परभारे जाहली असे सरकार आज्ञेने जाहाली नाही येविसीचे दाखलेस हुजूरची थैली जाहाली होती तिची व बेब्र सो याची थैली हुजूर आली त्याची नकले येकून दोन.

११ त्या दिवसापासून आठ वर्षे पर्यंत नरसिंगराव याची फिर्याद हुजूर व कुंपणी सरकारात बाहल असता माजी आकब्रनीस याचे मदतगिरीने निमे सरंजामात भोगवटा केला तो नरसिंगराव याचा नेहमी वेध असून जाहाला.——————————कलम

१२ शके १७६१ साली सुबराव मेलेवेलेस हुजूरून त्या वहिवाटीची जप्ती होऊन ठाण्यात हुजूरचा कारकून होता.——————————कलम

१३ सुब्राव याचे लेक दाजीराव व सुलतानराव यासी हुजूर येणेविसी तीन आज्ञापत्रे सादर जाहाली आसता न येता नवसीर लोक ठेऊन बंडाईचे इरादेने ठाणे नेसरीत शिरोन ठाणे घेतले.——————————कलम

१४ आजम टौनसड साहेब बाहादूर यजंट याणी महंमद गोसा रिसालदार व स्वार पाटऊन ठाणे घेऊन त्रिवर्ग शिंदे यांसी बेलगावास धरून नेहून हुजूर पोहचविले

येविसी थैली पाठविली असे त्यात या आपराधाची नसियेत होऊन भाऊबंदी खटलेच इनसाफ व्हावा असे लिा असे. ——————————————————— कलम

१५ सदरहू चौकशी करिता त्रिवर्गास हजीरजामीन घेऊन विचार ठरला जे याचे बापाने बंडाई केली सबब राज्यातून बाहीर घातले ते आद्याप चालीस वर्ष बाहीर होते त्याचे लेकही त्रिवर्ग याची चाल तसीच बंडाईची व नेसरी सरंजामात अधिकारी जीवराव सिंदे व त्याचा लेक नरसिंगराव शिंदे ठरोन त्याजला आज्ञापत्रे दरपुस्त जाहाली आहेत सरं· जाम चाकरीचा दाजीराव वगैरे हे बंडखोर यास चाकरीस ठेऊन सरंजाम चालवणे नापसंद सबब येकंदर सरंजाम अजमासे रुा ३००० तीन हजार पौ त्याणी नीट वर्तणुकीस जामीन देऊन चांगले रीतीने राहतील तर दरसाल रुपये ६०० साहाशेहे मिलतील बाकी सरंजाम नरसिंगराव याणे अनुभऊन सरकार शेवा करावी असा ठराव जाहाला असे. ——————————————————— कलम

१६ सेवकलोकास सरंजाम चालऊन उपयोगी असेल त्याजकडून शेवा घेणे अगर रजा देणे हे सरकार मर्जीवर आहे त्याजविसी भाऊबंद याचा शक नाही. ———— कलम

१७ हुजूरून ठराव जाहाले प्रो नरसिंगराव याजकडे वहिवाट चालत असे.

येकून कलमे सतरा मिा शके १७६३प्लवनाम संवछरे फालगुन बाा ९ छ २१ सफर रुजू मोर्तब असे.

लेखांक ४६ तारीख ७-३-१८४२

श्री

रु. नं. ४

अ. नं. ९६८

यादी राजमंडल हुजूर करवीर सरकारातून अजम हेनरी विलसन रीवीस साहेब बाहादूर आगटिंग पोलिटिक्याल यजंट प्रांत कर्नाटक यासी सुा इसने आर्बैन मयातेन व आलफ आसाहेबाकडोन ता २५ माहे फेब्रुवारी सन १८४२ इा ची यादी आली त्यात कोणी आरबलोक व बिदेसी वगैरे चाकरीचे उमेदीने आमाहाराजाचे इलाखेत आले असता त्या लोकाकडे हत्यारे असो किंवा नसो त्या लोकास ते क्षणी अटकाव करून धरून सरकार इलाखेचे मामलेदार जवळ असतील त्याचे स्वाधीन करावे येसा बंदोबस्त व्हावे म्हणोन कलमी केले आज्ञाप्र हुजूरचे राज्यातील सरंजामी व जाहागीरदार व इनामदार व मामलेदार वगैरे तमाम लोकास सदरहूचा बंदोबस्त ठेवणेविषयी आज्ञापत्र सादर जाहाली आहेत मिा शके १७६३ प्लवनाम संवत्सरे माघ वा॥ ११ इंदुवार छ २४ माहे मोहरम.

लेखांक ४७ तारीख ४-५-१८४२

रु. नं. ७

अ. नं. १२१५

आस्मत पन्हा फयुजात दस्तगाहा मुषफिक माहाराजगी गणी

सईबाई दिवाण साहेब माहाराज दामे षजाकत हू

नियाजमंद हेनरी विलसन रीवीस साहेब बहादूर आगटिंग पोलटक्याल एजंट प्रांत कर्नाटक आंकी येथील खैरीयत रोशन होऊन हमेशा अल्ताफनामा सादर फर्मावीत असल पाहिजे दरविला बावडे येथील दौलतीचा हिशोब तयार नाही म्हणोन बावडेच वकीलानी आम्हास सांगितल आहे असे हिशेब तयार नसले तर याप्रमाणे कारभारी याणी आ दिवाणसाहेब माहाराज यास अर्ज करणेच तसे केले नाही याजवरून कारभारी याणी बंदोबस्त चांगले केले नाही असे आम्हास वाटते सबब याची तपासणी बद्दल इजानिबानी बावडेस जाऊन तेथील सर्व हकीकत समजून घ्याव असे इछा होती परंतु उष्ण भारी यास्तव आमच येणे कानसिला करून हाली आमचे विश्वासुक राजेश्री राघोपंत परांजपे यास पाठविल आहे यानी आ दिवाणसाहेब माहाराज यास भेटून लागलच बावडेस जातील याचे विद्यमान तेथील दौलतीचे सर्व हकीकत व हिशेब समजून घ्याव बिलकुल हरकत न पडावयासारीख आ दिवाण साहेब माहाराज याजकडून नीट ताकीद असाव या कामास किमपी हरकत न पडाव जादाचे आयाम मुदाम बाद

(सही इंग्रजी)

(सही हणमंतराव नेटीव्ह येजंट)

पौ। छ २२ रावल सुा इसने आरबेन मयातेन व आलफ

रा छ ४ माहे मे १८४२ इसवी सन १२५१ फसली शक १७६४ शुभकृत संवछर चैत्र वद्य ९ बुधवार मु॥ बेलगाव.

लेखांक ४८ तारीख १४-७-१८४२

रु. नं. ४

अ. नं. ९७६

तालीक

माहाराजाचे नांवे ता। छ १४ जुलाई १८४२

दिगर मनोहरगडचे लोक बंडाई केले त्याचे बंदोबस्तीबद्दल रावजी वाकनीस यानी मनोहरगडास जाऊन त्याचे फैसल केले आहे म्हणोन प्लवनाम संवत्सरे आश्विन शुद्ध १२ ची यादी पाठविली ती तरजमा होऊन सरकारास पाठविला असता छ ३१ माहे मे सन १८४२ इसवीचे उतर आले ते पाहून कलमी केले जाते जे गडकरी लोकानी फार वाईट

काम केले त्या लोकास पुरा शासन होऊन पुन्हा त्याजकडून असी गैरवहिवाट होईनासे पका बंदोबस्त करणेस होते असे कांही येक बंदोबस्त व सिक्षा न होता जुने चाकर वगैरे म्हणून मोकळ करणे नमोद करून गैरहजर जाले ते भोवानराव घाटगेवरी आरोप ठेऊन गडकरीलोकास मोकलीक केले हे वर्तमान अलीशा गोर्नर साहेब बहादूर यानी ऐकूण फार बेमर्जी जाहाली अशा कामात या रीतीने बिलकुल बंदोबस्त न केले त्यावरून वरकड सर्व दौलतीचे व्यवस्था या मासले प्रमाणेच असेल असी खात्री जाहाली आणि या कामात वाडीकराचे व कोलापूर महाराज याचे व इकडून पत्र गेले त्या तिनी इलखेचे मर्यादा राहिली नाही याजवरून सरकारची फार नाखुषी जाहाली.

लेखांक ४९ तारीख २७–७–१८४२

रु. नं. ३
अ. नं. ६११

यादी सदासिव अनंत वकील निा श्रीमन्महाराजासे छत्रपतिसाहेब यास प्रांत कर्नाटक पोलिटक्याल येजंट इडवार ह्यूटोनसंड साहेब याजकडून लिहिले जाते जे
१ श्रीमन्महाराज छत्रपति साहेब यास इंग्रजी विद्या शिकवणेस मेज व खुरसी पाहिजे व पोथ्या अजुनी आले नाही हाली करवीरात रार सरकारातून नेमिले पंतोजी याने तारीख २४ जुलई सन १८४२ इ चे पत्र पाठविले आहे करिता तुम्हास कलमी केले जाते जे पोथा मुंबईहून आले त्या छ २० जुलैस आपणाकडे पाठविल्या आहेत लवकर कोलापुरास पाठवाव्या व मेज खुरसी बेळगावी मिळतील करिता सिध करून लवकर पाठवून द्याव्या.
ब तारीख २७ माहे जुल सन १८४२ इसवी.
मुा सन १२५२ फसली शके १७६४ सुबक्रुत नाम संवत्सरे आषाढ वा ५ बुधवार मुा बेळगांव
(सही हणमंतराव नेटिव्ह येजंट.) (सही इंग्रजी·)
पौ आषाढ वा ६ गुरुवार शके १७६४ मुा बेळगांव

लेखांक ५० तारीख २९–७–१८४२

श्री

रु. नं. ४
अ. नं. ९७७
पौ छ २१ माहे जोर सुा सलास आर्बैन मया·
तैन व आलफ

श्रीमन्महाराज राजेश्री छत्रपतिं स्वामीचे
शेवेसी

विनंती सेबक राणोजी दळवी नामजाद व हणमंत आबाजी किले पनाळा कृतानेक शेवेसी विज्ञापना तागाईत छ२० माहे जमादिलाखर पावेतो स्वामीच्या कृपावलोकने करून किलाचे व सेवकाचे बृत यस्थातित असे विज्ञापना ऐसीजे स्वामी कृपाळू होऊन छ २ जमा-दिलाखरचे आज्ञापत्र सादर जाहाले ते मस्तकी वंदोन सनाथ जाहालो आज्ञापत्री आज्ञा जे किले मजकुरी बंदीवान कयदेत आहेत त्यास दर असामीस दररोज नागली सवासेर व मीठ मिरशंगा सिरस्ते प्रमाणें देत जाणे बंदीवानात कोणी ब्राह्मण अगर आबरुदार असलेस त्यास जोरी अगर तांदुळ व दाळ देत जाणे आणि बंदीवानाचे नांवनिसीची याद पाटवून देणे म्हणोन आज्ञा आज्ञे प्रमाणे बंदीवान यासी नागली व मीटमिरसंगा आज्ञेअन्वये चालविली आहे बंदीवानाची याद आलाहिदा हुजूरचे शेवेसी पाठविली आहे शेवेसी निवेदनार्थ विनंती. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक ५१ तारीख ५-८-१८४२

श्री

यादी सदासिव पंत वकील नि॥ श्रीमन्महाराज राजेश्री छत्रपति महाराज सरकार करवीर सुा सलास आरबेन मयातेन व आलफ

१ ता २७ जुलाई सन १८४२ इसवी शके १७६४ आषाढ व॥ ५ बुधवारची यादी आली त्यात श्रीमन्महाराज छत्रपति साहेब यास इंग्रजी विद्या शिकवणेस मेज व खुरसी पाहिजे व पोथ्या अजुनी आले नाही म्हणोन करवीरात सरकारातून नेमिले पंतोजी यानी तारीख २४ जुलाई सन १८४२ इ. चे पत्र पाठविले आहे करिता कलमी केले जाते जे पोथ्या मुंबईहून आले त्या छ २० जुलाईस आपलेकडे पाठविल्या आहेत लवकर कोल्हापुरास पाठवाव्या व मेज व खुर्ची बेळगावात मिळतील करिता सिद्ध करून लवकर पाठवाव अस लिहिले अशास आसाहेबाकडून बुक पोत्याची पेटी आली ती पर्ज्यन्य फार करिता परवा बुधवारी रवाना केल्या आहेत मेज खुर्ची करवीरात आहेत व नवे लागले तरी तयार करणेस सुतारही आहेत याजकडोन तयार करून देवणेविसी सरकारात विनंती लिहिली आहे विद्याअभ्यासाविसी श्रीमन्महाराज मातोश्री दिवाण-साहेब महाराज यास फार संतोष आहे यात जे हरयेक जिनस लागेल त्यास पंतोजी यानी तेथे सरकारात श्रुत केला म्हणजे तयार करून देवितील याजकरिता पंतोजी यास सूचना जाली पाहिजे.

———

मिती आषाढ व॥ १४ शुक्रवार शके १७६४ शुभकृतनाम संवत्सरे मु॥ बेळगांव

रुजू सदाशिव पत वकील हुजूर सरकार करवीर.

लेखांक ५२ माहे सप्टेंबर इ. स. १८४२

श्री

रु. नं. ७

अ. नं. १२२१

चिरंजीव समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री रघुनाथराव पंडित अमात्य यासी आज्ञा केली ऐसीजे आपले दौलतीची आव्यवस्था फार जाहालेचें बोभाट पेशजी हुजूर आलेवरून तेथील बंदोबस्त करून येणेविसी चिरंजीव राजेश्री दिनकरराव गाईकवाड यासी सालगुदस्ता मार्गसीर्षमासी आज्ञा होऊन पाठविले होते त्यानी जाऊन आपलेकडील राजश्री रामचंद्र गुंडो व अंताजी बाबूराव यासी मागील हिशेब देणेस मुदत व पुढे नीट चालीने चालणेचे ठरावाची कलमवार यादी करून देऊन गाईकवाड परत आले त्यानंतर मुदत जाहालेवरी आपणास हिशेब पाठवून देणेविसी व उभयतास हिशेब सत्वर घेऊन येणेविसी साल गुदस्ता छ १६ रबिलाकर वैशाखमासी आज्ञापत्रे सादर जाहाली असता हिशेब आणून रुजू केले नाहीत व ठरावाचे यादीप्रमाणे व्यवस्था कांहींच चालली नाही हली हुजूरून आपलेकडील दौलतीचा बंदोबस्त ठेवणेबद्दल व बेलगावाहून अजम पोलटक्याल येजंट सो बहादूर प्रां कर्नाटक याजकडोन ता। च्या अशा दोन यादी कलमवार आल्या त्या यादीअन्वये आपले यकंदर दौलतीचा बंदोबस्त चौकसीने ठेऊन व्येवस्था पाहणेकरिता राजेश्री पाठविले आहेत हे आज्ञे प्रमाणे तेथील बंदोबस्त करतील त्यास कागदपत्र वगैरे पुरावा जो लागेल तो आपलेकडोन होत असावे जाणिजे सु॥ सलास आर्बैन मयातेन व अलफ रवाना छ माहे रजब बहुत लिहिणे तरी सुज्ञ असा.

लेखांक ५३ तारीख १५–११–१८४२

श्री

रु. नं. ४

अ. नं १०१२

पौ छ १३ माहे शोवाल सु॥ सलास

आर्बेन मयातेन व आलफ कार्तिक शु॥ १५

श्रीमन्महाराज राजश्री छत्रपति स्वामीचें

शेवेसी

विनंती सेवक राणोजी दळवी नामजाद व हणमंत आबाजी किले पनाळा कृतानेक शेवेसी विज्ञापना तागायत छ ११ माहे शोवाल पावेतो स्वामीच्या कृपावलोकने करून किलाचे व सेवकाचे वृत्त यथास्तित असे शेवेसी विज्ञापना ऐसीजे स्वामी कृपाळु होऊन छ २४ रमजानचे आज्ञापत्र सादर केले ते मस्तकी वंदून सनाथ जाहालो आज्ञापत्री

आज्ञा जे किल्ले मजकुरी बंदीवान याचे पायात बेड्या आहेत त्या कच्चे बारा सेर वजनापर्यंत असाव्या जाजती वजन असतील त्या काढून सदरहू बेड्या एकंदर बारा सेर वजनाच्या करून बंदीवान याचे पायात घालणे म्हणोन आज्ञा आज्ञेप्रमाणे बंदीवान याचे पायात ज्याजती वजनाच्या बेड्या होत्या त्या काढून बारा सेर पर्यंत वजनाच्या घातल्या-शेवेसी निवेदनार्थ विनंती शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक ५४ तारीख ३०-११-१८४२

श्री

रु. नं. २

अ. नं. ४८४

नकल

यादी राजमंडळ हुजूर करवीर सरकारातून आजम इडवार्ड ह्युम टोनसंड सो बहादूर पोलटक्याल येजंट प्रांत कर्नाटक यासी सुा सलास अर्बैन मयातैन व आलफ हेबालकडून ता ६ माहे आकदंबर सन १८४२ इा। ची यादी हुजूर दरबारास आली त्यात तारीख १० नवंबर सन १८१३ इा।चे पत्र आलीशान ईलफीसतन साहेब बहादुर याणी महाराज छत्रपति साहेब यासी लिा। तें नकल येथे आहे त्यात पाहाता कागलकर आमुक रीतीने चालवे व महाराजानी कागलकर याजवर आमुक पर्यंत चालवे आसे कांही लिा। नाही हाली कागलकरावर माहाराजाचे आमल कोठ परियंत व त्याणी कसे चालावे म्हणोन सरकारचा सवाल आहे करिता याबद्दल आपले उत्तर पुरावेचे दाखला-सुधा पाठवावे या अभिप्राये कलमी केले अशास आलीशान इलफीसतन साहेब बहादूर याचे थैलीत कागल तालुका माहाराजाचे मर्जी आसल्यास चालवावा अगर परत घ्यावा आसा दाखला आहे त्यात दोस्तीचे विचारे सलाह लिहिली आहे त्याजवरून कागलकरा-वर हुजूरचा आमल कोठपर्यंत हा पुरावा आसाहेबाचे नजरेस आलाच असेल हाली त्याणी कसे चालावे म्हणोन सरकारचा सवाल आहे त्यास प्राचीनपासून कागल तालुकेवर सर्व हुकुमत माहाराज सरकारची आसोन घाटगे हे माहाराज सरकारचा हुकूम होईल त्याप्रमाणे वर्तणूक करून शेवा चाकरी करीत आले आहेत असुकच स्वार व लोकसुधा चाकरी करावी आसा ठराव नाही आजवर चालला मा।र कलमी केला आहे कागल-कर याणी हुजूरची चाकरी वगैरे हुकुमतीत राहून वर्तणूक कशी करावी व हुजूरने कागलकर यास कसे वर्तवावे याची सलाह लिहिणेत यावी महाराज सरकारचा भरवसा आवहादराचे सल्हेवर आहे मि।। शके १७६४ शुभकृत नाम संवत्सरे कार्तिक व।। १३ छ २६ माहे शौवाल रुजू मोर्तब असे.

लेखांक ५५ तारीख ९-१-१८४३

श्री

रु. नं. ३
अ. नं. ६४४

पौ छ ५ रबिलोवल सु॥ सलास अर्बैन मयातेन व आलफ
चैत्र शु॥ ६

चिरंजीव राजेश्री दिनकरराव गायकवाड यासी प्रती बायजाबाई सिंदे अलीजाबाहादर आसीरवाद उपरी येथील कुशल ता॥ छ ७ जिल्हेज पावेतो यथास्तित जाणून स्वकीय कुशल लिहीत असावे विशेष इकडून चिरंजीव राजेश्री खंडेराव दौलत व चिरंजीव रामचंद्रराव घाटगे झुंजारराव तिकडे रवाना केले आहेत त्यास श्रीमन्महाराज छत्रपति याची भेट करून देवावी इकडील मजकूर मशारनिले आपल्यास जाहीर करितील त्याअन्वये चित पुरवून नमोद्दात आणिले पाहिजे व श्रीमन्महाराजाची भेट व चिरंजीव ताराबाई साहेब राणी माहाराजाची भेट व दिवाण साहेबाची भेट बखुबी करून देवणे आपलेकडेस आहे. बहुत काय लिहिणे हे विनंती.

लेखांक ५६ तारीख २०-३-१८४३

श्री

रु. नं. ३
अ. नं. ६४७

पौ छ २५ माहे सफर फाल्गुन व॥ १२ सु॥ सलास अर्बैन मयातेन व आलफ शके १७६४ शुभकृतनाम सवत्सरे

श्रीमन्महाराज क्षत्रियकुलावतंस राजश्री छत्रपति स्वामीचे शेवेसी विनंती सेवक रघुनाथराव गोविंद कृतानेक शेवेसी विज्ञापना तागायत छ १८ सफरपावेतो स्वामीच्या कृपावलोकने करून सेवकाचे वृत्त यथास्थित आहे विज्ञापना ऐसीजे कृपाळूपणे आज्ञापत्र सादर जाहाले त्यात भगवंतराव सिंदे कवटेकर हे लढाईत कोणते साली मयत जाहाले ते लेहून पाठवणेविसी अजम पोलटक्याल येजंटसाहेब बाहादूर याजकडून याद हुजूर आली त्याजवरून आपणास आज्ञापत्र सादर जाहाले असे तरी सिंदे कोणते साली कोणते महिनेत कोणते शकात व कोणते तारखेस मयत जाहाले हे तपसीलवार विनंतीपत्री लिहून पाटवणे म्हणोन आज्ञा त्यास भगवंतराव सिंदे सन मयातेन व आलफ शके १७२१ सिधार्थी नाम संवत्सरे मिती मार्गसीर्ष शु॥ ३ तारीख छ २ माहे रजब रोजी खारेपाटण येथील लढाईत बंदुकीची गोळी लागोन मयत जाहले शेवेशी निवेदन व्हावे शेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक ५७ तारीख २८-५-१८४३

श्री

रु. नं. ४ नरसिंह सरस्वती

अ. नं. १०२१

पौ छ २७ माहे रार सुा सलास आर्बैन मयातैन व आलफ वैशाख वद्य ३० रविवार शेवेसी विनंती सेवक सखारामराव नरसिंव्ह व सुभानजी मिसाल हुजूरे ठाणे सिरोल कृतानेक शेवेसी विनंती विज्ञापना तागाईत छ २७ राकर पर्यंत स्वामीचे कृपावलेकने करून सेवकाच व ठाणे मजकुरच वृत्त येथास्तित असे स्वामीनी कृपाळू होऊन छ मा॥र मिनहूच आज्ञापत्र सादर केले ते मस्तकी वंदून सनात जाहाले आज्ञापत्री श्रियासह चिरंजीव विजयीभव राजश्री राजे चिमणासाहेब छत्रपति याचे शरीर प्रकृतीस स्वास्त नाही याजकरिता वेदमूर्ति राजेश्री भाऊभट पुजारी वाडीकर याचे माहितगिरीन वाडीतील दोन ब्राह्मण चांगले पाहून श्रीजवळ अनुष्ठानास घालणेची आज्ञा जाहाली आहे तरी आज्ञेप्रमाणे दोन ब्राह्मण चांगले पाहून त्यापैकी येक ब्राह्मणाकरवी दररोज तीनशेहे प्रदक्षणा व दुसरे ब्राह्मणाकरवी दररोज एक एकादसीचा अभिषक येणे प्रो दोन ब्राह्मणाकरवी उदयेक अनुष्ठान चालीस लाऊन विनंतीपत्र पाठवणे आणि देवाचा तीर्थअंगारा नरू ब्राह्मण याणी आणीत असतो त्याजबरोबर देऊन सत्वर हुजूर पाठवून देणे ऐसी आज्ञा आज्ञेप्रमाणे वेदमूर्ति याचे माहितगिरीन वाडीतील दोन ब्राह्मण पाहून श्रीजवळ एक ब्राह्मणाकरवी दररोज तीनशेहे प्रदक्षणा व दुसरे ब्राह्मणाकरवी दररोज एक एकादसीचा अभिषेक येणे प्रो दोन ब्राह्मण आम्ही वाडीस जाऊन अनुष्ठानास घालून सेरीरप्रकृतीस आरोग्य पडाव हेविषयी श्रीस प्रार्थना करून ब्राह्मण याजसमागम तीर्थअंगारा हुजूरचे शेवेसी पा॥ आहे ब्राह्मण आजच अनुष्ठानास घातले शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक ५८ तारीख ५-१-१८४४

श्री

रु. नं. ३

अ. नं. ४९२

पौ छ १६ माहे जिल्हेज सुा
आर्बा आर्बैन मयातेन व आलफ

श्रीमन्माहाराज राजेश्री——————छत्रपति स्वामी
चे शेवशी
विनंती शेवक रताजीराव चव्हाण हिमतबहादर कृतानेक दंडवत विज्ञापणा ता छ १४

माहे जिल्हेज रोज भगृवार पावेतो स्वामीचे कृपावलोकन करून सेवकाचे वृत यथास्थित असे विज्ञापणा येसीजे स्वामीनी छ ८ रोजचे आज्ञापत्र पाठविले ते मस्तकी वंदून सनाथ जाहालो तेथे आज्ञा जे राजश्री काशिनाथ केशव आकबरनीस याणी हिमतबहादर कांहीं लोकानिसी हाल्कर्णीस जाऊन दंगा करणार आसे ऐकण्यात आले त्यास येविसीचा मजकूर कसा समजण्यात आला असल्यास कोणाकडून काय मजकूर समजला ते उत्तर लिहून पाठवावे समजला नसल्यास शोध आणऊन लिहून पाठविल पाहिजे नंतर सविस्तर रपोट करून हाली हिमतबहादर कोठे आहेत हे त्याजपासी बिदिसीहे आरबलोक आहेत किंव्हा नाहीत आसल्यास कधीपासून ठेविले आहेत हे लिहून पाठविल पाहिज म्हणोन लिहिले आहे त्याजवरून राजेश्री बालाजी रघुनाथ दिमत लष्कर यासी पाठविले आहेत तरी येविसीचा मा।र कसा आहे व बिदेसी व आरब किती आहेत व कधी पासून ठेविले आहेत कधी पासून ठेविले आहेत व कांहीं नबीन ठेविल आहेत हे तपशीलवार विनंतीपत्री लि॥ पाठवावे म्हणोन आज्ञा ऐसीयासी मार्गसीर्ष व॥ १० मंदवारी मातुश्री व बंधुचे भेटीस व घरगुती कामाकरिता हल्कर्णीस जाणेची आज्ञा घेऊन निघालो ते निडसोसीस आया स्वामीच दरशनास गेलो तेथे मातुश्री व चिरंजीव राजश्री बालासाहेब येऊन भेटले नंतर तेथून करबलीस आलो तेथे चिरंजीव सुधा होतो हलकर्णीस निघोन गेले आम्ही कापशीस आलो या प्रा मा।र आसता लोक जमऊन हलकर्णीस जाऊन दंगा करणार आसे आकबरनीस याणी सरकारास लि॥ त्यास हलकर्णी येथे सेवकाची मातुश्री आदीकरून घरमंडल आहे तेथे दंगा होणेस परकी आमलही नाही व अशी गोष्ट शेवकाकडून घडावयाचीही नाही हे स्वामी चरणास विदितच आहे येसी भारी गोष्ट विचार केलेवाचून कुंपणी सरकारचे कामांत कोणी कशावरून लि॥ हे न कले परंतु येस भलतेच तुफाणी लोक समजाऊ लागलेस आबरुदार मनुशास आडचण व सरकारातून अशी आज्ञा जाहालेस सेवकाचा उपाय नाही येविसीचा विचार करून बराबर तलाशणार स्वामी समर्थ बिदेशी व आरब लोकाविसी सदरी आज्ञा त्यास या देशातील राहाणार मुसलमान च्यार आ। आजमासे दोन तीन वर्षापासून जमीन देऊन ठेविल आहेत ते व रजपुत यक आ। येसी पांच आसामी करवीराहून येताना बरोबर आहेत तितकेच आहेत नबीन कांही ठेविल नाहीत येविसी मा।रची विनंती मा।रनिले करितील त्याजवरून निवेदन होईल सेवेशी निवेदनार्थ विनंती लि॥ आसे सेवेशी श्रुत होय हे विज्ञापणा.

लेखांक ५९ माहे मार्च इ. स. १८४४

श्री

रु. नं. ४

अ. नं. १०३२

यादी राजमंडल हुजूर करवीर सरकारातून आजम अंडरसन साहेब बहादूर असिस्टंट व इंच्यार्ज पोलटक्याल येजंट प्रांत कर्नाटक यासी सु॥ आर्बा आर्बैन मयातेन

व आलफ आसाहेबाकडून हनमीनहल येथील रघुनाथराव नलवडे याणी कैदी सुब्राव यास आश्रा दिला त्यास दस्तगीर करणेचे प्रकर्णी ता. २ फेब्रवारी व ता. ४।११ माहे मार्च सन १८४४ इसवी आज्ञा तीन यादी आल्या त्यात सेवटी ता. ११ मार्चचे यादीत हनमीनहलचे गडीचे सभोवते वेढा राहिला आसता किलेहून सर्व पळून गेले सबब याचे पके मार समजणेचे आगत्य आहे कोलापुराकडील जमाव व स्वारसुधा किती होते कोणकोणते ठिकाणी किती मानसाची नेमनूक जाहाली होती आतील लोक बाहीर पळून जाईनासे आपणाकडील मोत्खेसरानी काय बंदोबस्त केले होते गडीतील लोक पळून जाणेचे कोलापुरकराकडील लोकास कसे समजले नाही कसे जाऊ दिले याविसी आपणाकडून कोण मुख्य हनमीनहलास गेला होता त्याजकडून पुरा जबाब घेऊन उत्तर पाठविले पाहिजे सदरी पळून गेलेले लोक कोठे गेले आहेत त्याचे पता लावणेविसी काय बंदोबस्त केला आहे हे लिहून पाठवावे म्हणोन वगैरे कलमी केले आशास कैदी सुब्राव म्हणणारास रघुनाथराव नलवडे यानी आश्रा देऊन गोली मारणेची तजवीज केलेचा मा। आसाहेबास माघ व॥ ९ सन मारचे नवाबाचे यादीत कलमी जाहालाच आहे हनमीनहलास इकडील लोकांचा जमाव पाचशेह सुमारे होता व स्वार वीस आसामी होते त्यात मुखत्यार राजश्री आपाजीराव निंबालकर व आन्याजीराव मोहिते होते त्यास मजकूर विचारिला असता त्याचे सांगणेत आम्ही हनीमहलास गेलेवर गावाभोवते लोकाच्या चवक्या बसविल्या होत्या नंतर फाल्गुन शु॥ ६ सन मजकूरी आजम महंमद गौसखा रिसालदार स्वारसुधा हनमीनहल मुकामी दाखल जाहाले तेवेलेस नलवडे याणी रिसालदार याचे स्वाराचे जमावावर गोली मारली तेव्हा रिसालदार परत येऊन ठिकाणास उतरून नलवडे याजकडे रिसालदार याणी बोलावणेस काका लाड म्हणणार यास पाठविले होते ते परत येऊन संध्याकाली रिसालदार व लाड व कारकून असे त्रिवर्ग गावात मारुतीचे देवलात नलवडे याजकडे बोलणेस गेले होते ते नलवढे यास बोलून परत आले त्याजवर फाल्गुन शुध ८ सोमवारी नलवडे हे रिसालदार याजकडे बोलणेस आले होते त्या वेलेपासून रिसालदार याजकडे नलवडे याणी बोलणेचा नाद लाविला होता फाल्गुन शु॥ ११ गुरुवार सायंकाली तुमचे लोकाचे दहशतीमुळे नलवडे बाहेर येणेस दिकत घेऊ लागले आहेत याजमुळे तुम्हाकडील लोकाच्या चवक्या उठवाव्या म्हणोन रिसालदार याणी आम्हास सांगितलेवरून चवक्या उठविल्या होत्या नंतर फाल्गुन शुद्ध १३ शनिवारी प्रातःकालचे प्रहर दिवसास तुमचे लोकाची तयारी आसावी म्हणोन रिसालदार याणी सांगून पाठविले त्याप्रो। लोकाची तयारी ठेविली होती इतकेत रघुनाथराव नलवडे ठाणेतून निघोन रिसालदार याजकडे बोलणेस म्हणोन आल ते रिसालदार याजपासी जाऊन तसेच परत ठाणेत पळून जाऊ लागले तेव्हा रिसालदार याणी आपले स्वारासुद्धा नलवडे याचा पाठलाग केला तेसमई आम्हीही लोकाचे जमावसुधा रिसालदार याजपासी गेलो इतकेत ठाणे नजीक नलवडे याचे लोक होते त्यात नलवडे जाउन गोली मारली तेव्हा गोलागोली

जाहली त्यात इकडील पांच आसामी लोक जखमी जाहाले व नलवडे याजकडील येक आसामी ठार जाहाला तें दिवशी प्रातःकालचे चार तास दिवसापासून मध्यरात्र पर्यंत गोलागोली चालली होती ठाणेतील गोली मध्यरात्रीचे सुमारे बंद जाहली सबब बाहीरलीही गोली बंद जाहली नंतर सूर्योदय जालेवर गोलीही सुरू नाही व कांहीं हाल-चालही नाही याजकरिता ठाणेत शोधास पाटवून शोध पाहाता ठाणेत लोकसुधा नलवडे नाहीत याप्रमाणे मजकूर जाहाला म्हणोन इकडील सदर कामदार याणी पत्रे पाठविली व लिहूनही दिले सदरी पळून गेलेले लोक व नलवडे याचा पता लावणेविसी हुजूरून हुजूरचे प्रांतात जाहीरनामे पाठविले आहेत व बारकाईने पता लावणेची तजवीज चाल-विली आहे व कांही मुक लागलेवरून शोधास कारकून व लोक चैत्र श्रु।। रवाना जाहाले आहेत आसाहेबास जाहीर व्हावे र।। मिती शके १७६६ क्रोधनाम संवत्सरे चैत्र शुद्ध——छ----माहे रबिलावल रुजू.

(मोर्तब)

लेखांक ६०

माहे एप्रील इ. स. १८४४

श्री

रु. नं. ४

अ. नं. १०२५

यादी राजमंडल हुजूर करवीर सरकार इलाखेतील गावगना रात्रो दरोडे पडण्याचा वगैर चोराचा उपद्रव फार होऊन बोभाट येतात व अर्जदार लोकाची जेथील तेथे दाद न लागता मामलेदार करवीर मुकामी नेहमी राहातात याजमुळे रयतेस हरकत होत आहे व लावणी पडीची तजवीज होत नाही याजमुळे सरकारी नुकसान दरसाल होत आले यास्तव तूर्त सध्या बंदोबस्त जरूर जाहला पाहिजे ती कलमे सुा आर्बा आर्बैन मयातेन व अलफ सन १२५३ फसली

१ दरवडे पडण्याचे कारण काय ज्या गावचे रखवालदार त्या गावी राहून बंदोबस्त काय सबब करीत नाही व दरवडे घालणार लोक कोणीकडून कोण किती जमावाने फिरतात याजब।। बारकाईने चवकसी करून पत्ता लागताच हुजुरास पत्र जेव्हाचे तेव्हा लिहीत जावे आणि स्वार सिपाई व रखवालदार लोक गावोगाव नेमून त्यानी निरंतर चवकी पाहारे व घस्त फिरवणेची तजवीज ठेऊन त्याजवर नजर राखण्यासाठी तुम्ही गाव-गना फिरत जावे सारांश पुन्हा उपद्रव न होईल असा बंदोबस्त ठेवणे.

२ तुम्ही हल्ली करवीर मुकामी येक घटकाभर न राहाता हे पत्र पाहाताच आपल्या मामल्यावर जाऊन पाहिले कलमात लिहिल्या मजकुराचा प्रथम बंदोबस्त होण्याची तजवीज करावी या कामास जरा आळस करू नये.

३ परइलाख्यातील चोरलोक येऊन चोऱ्या करीत असतील तरी त्याचा शोध करून त्याहावे म्हणजे त्या इलाख्यास लिहिले जाऊन चोराचा बंदोबस्त करविण्यात येईल.

४ दरवडया प्रकरणी जवळ विषेस मजकूर जसा नजरेस येईल तसा दररोज वर्दी लिहून पाठवीत जावी.

५ तुमचे इलाख्यातील गावी काम चालिवणार वतनदार पाटील असतील त्यास तूर्त ताकीद द्यावी कीं तुमचे गावात चोरी मारामारी वगैर हरयेक फौजदारी तंटे होतील त्याजबद्दल तुम्ही तजवीज ठेऊन मामलेदार यास जेव्हाचे तेव्हा रपोट करीत जावे व गावात रखवालीचा वगैर बंदोबस्त त्याजकडोन ठेवावे आणि त्याजवर पाटील यानी हमेशा नजर ठेवीत जावी या कामात पाटीलकुलकर्णी याजकडोन सुस्ती जाहाली असता त्याचे वतनापासून जबाब घेण्यात येईल गावी वतनदार रखवालदार नसेल तर त्याजबा।। गावात रयत लोक यानी दररोज पालीप्रमाणे रखवालीचा बंदोबस्ता ठेविला पाहिजे

६ हरयेक मुलकी किंवा फौजदारी अथवा न्याया प्रकरणी रयतलोक अर्ज्या करितात त्यास तुमचे मामलतीन लोकाच्या अर्ज्या तुम्ही घेऊन त्याची व्यवस्था कसी होणे त्याबद्दल त्याखाली रपोर्ट लिहून अर्जी इकडे पाठवीत जावी म्हणजे त्याजबद्दल इकडून लिहून जाईल त्या अन्वये अमलेत आणीत जावे.

७ साल मजकुरी लावणीची तरतूद अद्यापि जाहाली नाही पडित फार पडले असे वाटते यास्तव त्या पडीची लावणी रयत लोक मामुल दरा प्रो कबूल करीत नसल्यास दर कमी करून देणे किंवा इस्तावा देणे लागेल येविसीचा कुळवार तपास करून आपला अभिप्राय कसा असेल तो हरयेक गावचे यादीखाली लौकर लिहून आला म्हणजे त्याबाबद जबाब पाठविण्यात येईल तसे न होता हल्ली लावणीचे दिवसात ढिलाई जाहाली असता सरकारचे नुकसान विनाकारण यास्तव या कामाचा बंदोबस्त त्वरित जाहाला पाहिजे.

८ हली अखेर साल तुमचे ताब्यातील गावचा सर्व बंदोबस्त ठेवावे आणि साल आखेर पुरे होताच कचा हिशेब म्हणजे गावचे कच्चे हुबाबली अन्वये तयार करून येकंदर गोषवारासुद्धा त्या हिशेबास बेहडयाची कमजाजती जमाखर्चाचा दाखऊन पाटविला पाहिजे त्यात अगदी तफावत राहू नये तफावत राहिली असता जबाब घेतला जाईल व फुडे तुम्हाकडे काम राहाणार नाही.

९ सदरी आट कलमी मजकूर तूर्त अखेर साल पर्यंत सध्या काम चालविण्या करिता लिहिण्यात आले आहे पेस्तर सालास या सर्व मजकुरा प्रकर्णी आलाहिदा पका ठराव होणे तो होईल.

येणे प्रो अमलात आणावे ता।। मिती वैशाख शु।। शके १७६६ क्रोधीनाम संवत्सरे छ. माहे रा।।खर.

लेखांक ६१ तारीख ५-९-१८४४

श्री

रु. नं. ७
अ. नं. १२५७

यादी विठल आपाजी सबनीस किले विशाळगड सुा खमस आर्बैन मयातेन व आलफ श्रीमंत राजेश्री पंतप्रतिनिधि संस्थान किले विशाळगड याजकडे कर्ज रुपये एक लक्ष सवीस हाजार पांचसेहे येणे त्याचे कागदपत्र व दस्ताऐवज प्रतिनिधि याचे
१२६५००
आहेत आणि सदर्हू रुपयास बहादरी आज्ञापत्र माझे नांवे श्रीन्महाराज सरकारचे आम्हापासी आहे मेहरबान येजंट साहेब याजकडे आम्ही अर्ज केले त्याजविसी आपले-कडे हुकूम काय आले ते आम्हास समजले नाही आम्ही येथे येऊन चार महिने राहिलो आम्हास देणेदार याचे तगादे व सर्व तापत्रय वरचेवर आपल्यास विनंती करावी तरी जिकीरी दिसते जाणोन विनंती करण्यासुद्धा मी लाचार आहे श्रीमंत मातोश्री लक्षुमबाई प्रतिनिधि विशाळगड यास आमचे रुपयाविसी आज्ञापत्र कसे गेले व त्याचा जाब काय आला तोहि आजपर्यंत मजला समजला नाही व विशाळगडचे कारभारी यावे तेही आले नाही करिता सूचनार्थ विनंती लिहिली आहे तेरीख छ २१ साबान रुजू विठल आपाजी सबनीस विशाळगड सुा करवीर दस्तुर खुद.

लेखांक ६२ तारीख ३०-१०-१८४४

श्री

रु. नं. ७
अ. नं. १२६२

राजमान्य राजेश्री रेखोजी जाधव नामजाद व समस्त गडकरी लोक किले भुदरगड यासी आज्ञा केली ऐसीजे पतकाचे लोक यास अजम कर्णल साहेब याच सले प्रमाणे कांही आंदेशा न घेता हुजूर येणे याप्रो समंजस माणसे व आज्ञापत्रे चारवेळ पराकाष्टेने लिहून समजूत दिली असता समजूत न घेता सरकार आज्ञे प्रो वर्तणूक करीत नाहीत सबब तुम्हास आज्ञापत्र सादर जाहाले आहे तरी त्या लोकास तुम्ही किलेवर न घेता किलेच्या तनख्यात त्यानी राहू नये असी ताकीद करून घालवून देणे आणि तुमचे जे काय बोलण असेल ते मख्तेसर गडकरी व कारकून हुजूर येऊन समजाऊन देणे वाजबी प्रो ठरविण्यात येऊन पहिले वहिवाटी प्रो चालविल जाईल याप्रो तुम्ही वर्तणूक न केल्यास इतःपर तुमचा मुलाजा न होता कंपणी सरकारची फौज येऊन तुमचा नाश होईल जाणिजे सुा खमस आरबैन मयातेन व आलफ रवाना छ १७ माहे शोवाल.

लेखांक ६३ तारीख ३०-१०-१८४४

हु

रु. नं. ७

अ. नं. १२६१

अजम उटरुम कर्णेल साहेब बहादूर काम

याब आशंद्

रफअत व अवाली पनाह बिसालत व आयालत दस्तगाह बाअदज इष्ती-याक फिरावा मशहूद आंके दरिविला हुजूरून किले भुदरगड येथील गडकरी लोकास आज्ञापत्र·पतकाचे लोकास किलेवरी घेऊ नये वगैरे मजकुराचे व पतकाचे वगैरे लोकाचे नांवे जाहीरनामा रवाना जाहाला आहे व घाटानिहायचे चौकीचे लोकास आज्ञापत्र सादर जाहाले आहे अशा तीन कागदाच्या नकला आबाहादरास पाहण्या करिता या थैली समागमे पाठविल्या आहेत सु॥ खमस आर्बैन मयातेन व आलफ रवाना छ १७ माहे शोइाल मु॥ तारीख ३० माहे अक्टांबर सन १८४४ इसवी जियादयचे निगास्त आयद् आयाम मुदाम बाद.

लेखांक ६४ तारीख ३१-१०-१८४४

श्री

रु. नं. ४

अ. नं. १०२८

पौ छ २० माहे शोवाल आश्विन वा ७ शके १७६६

श्रीमन्महाराज राजश्री छत्रपति स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक रेखोजीराव जाधव नामजाद व समस्त नाइकवाडी गडकरी लोक किल्ले भुदरगड कृतानेक सेवेसी विज्ञापना ता। छ १८ माहे सवाल रोज गुरुवार तास रात्र-पावेतो सेवकाचे व किल्ले मजकुरचे वृत्त यथास्तित असे विज्ञापना ऐसीजे, स्वामी कृपाळु होऊन आज्ञापत्र सादर जाहाले ते मस्तकी बंदोन सनाथ जाहालो आज्ञापत्री आज्ञा जे हुजूरची पतक येथे आली आहेत त्यास किलावर घेऊ नये व किलाचे तनखेत राहू देऊ नये व मख्तेसर नाईकवाडी व कारकून पाटवून देणे म्हणोन ऐसीयास आम्ही शेवकलोक वाडवडिलार्जीत पासोन स्वामी सेवा एकनिष्टपण करीत आलो सेवक लोका-कडून सरकारचे चरणासी दुसरा विचार किमपि नाही स्वामीचे चरणासी अर्ज मिलोन पूर्ववत वहिवाट आहे ती चालवावी नाईकवाडी व कारकून पाटवणेविसी आज्ञा त्यास अजम इंग्रज बाहादर याचे डेरे नूल कडगावचे मालावर येऊन लष्कर उतरले त्यातील स्वार आज दोन असामी येऊन मौजे चिमणेचा मार्ग पाहून गेले रात्री तल पुढे येणार आणि आज्ञापत्री आज्ञा हुजूर येणेविसी यात सेवक लोकाचा उपाय काय धन्यानी

कृपाळु होऊन सेवकाचा अर्ज ध्यानी घ्यावा इकडून व किले सामानगडकरी याची विनंतीपत्रे दाहावीस पर्यंत सेवेसी गेली ऐसी असून धन्यानी निराशा केली आम्हा सेवक लोकास दैवत सरकारचे चरण त्या ठिकाणी अर्ज करू नयेत कोटे कराव विनंती ध्यानी घेऊन कृपाद्रष्टी शेवकावर व्हावी हुजूरची पतके आज्ञापत्र सादर होणेचे पूर्वी किलाचे माचीस व तनखेत उतरली आहेत हली स्वामीची आज्ञा कीं त्यास जागा देऊ नये त्यास तेही धन्याचे सेवक त्यासही दैवत सरकारचे चरण त्यानी स्वामीचे चरणाशिवाय दुसरे ठिकाणी कोठे अर्ज करावयाचा सर्वत्र मिलोन सरकारची लेकर याचा सांभाळ धन्यानी कराव पेशजी विनंतीपत्र सेवेसी गेली असता दाद घेतली नाही ऐसी निराशा केलेस सेवकाचा उपाय काय सर्वत्राचा अर्ज ध्यानी घेऊन पूर्ववत प्रो बंदोबस्त करून देणार धनी मायबाप समर्थ सेवक किले मजकुरी आलंग नोबत घस्त पाहारा करून हुशारीने आहो शेवेसी श्रुत होय ही विज्ञापना.

लेखांक ६५ तारीख ४-११-१८४४

श्री

रु. नं. ४

अ. नं. १०२९

पौ छ २४ माहे शोवाल सु॥ खमस आर्बैन मयातेन व आलफ आश्विन वं॥ ११

श्रीमन्महाराज राजश्री छत्रपति स्वामीचे शेवेसी विनंती सेवक रेखोजीराव जाधव नामजाद व समस्त नाईकवाडी गडकरी लोक किले भुदरगड कृतानेक विज्ञापना तागायत छ २२ माहे शवल रोज इंदुवार प्रातकाल प्रहर दिवसपर्यंत सेवकाचे व किले मजकुरचे बृत यथास्तित असे विज्ञापना ऐसीजे स्वामीचे आज्ञेप्रमाण कारकून व नाईकवाडी सेवेसी पाटऊन दिले व इकडे राजश्री आबाजीराव जाधव याचे पत्र आले याजवरून त्याजकडेही दोन आसामी नाईकवाडी पाठविले यस असोन इंग्रज बहादर याजकडील लस्करचे लोकानी मौंजे बेलेवाडी मौजे चिमणे व मौज आरळगुडी व मौज पांगिर हे गाव किलाकडील येथील रयत लोकाची घरेदारे मोडामोडी करून पिकाची नासाडी करीत चालले व बेलेवाडी येथील रयतेनी भात कापून होल्या रचल्या होत्या त्या मळून नेहल्या मर्यादा कोणते गोष्टीची राहिली नाही व किला नजीक सडेस येणेचा मार्ग बोणीत चालले आहेत त्या तोंडावर आम्हाकडीलही लोक गेले आहेत परंतु अद्यापि सेवकलोकाकडून आगळीक कांही जाहाली नाही इकडेस बोलणेस येणेचा मजकूर हे काय आणि इकडे नासाडी करितात याचा विचार काय हे ध्यानी घेऊन बंदोबस्त व्हाव नाहीपेक्षा इकडील लोकाची व त्याची गोलागोली होईल याजकरिता सेवेसी निवेदनार्थ विनंती लिहिली आहे स्वामीनी

सेवकाचा अर्थ ध्यानी घेऊन सर्व बंदोबस्त पूर्ववत प्रमाणे करून देणार धनी मायबाप समर्थ सेवक किले मजकुरी आलंग नोबत घस्त पाहारा करून हुशारीने आहो शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक ६६ तारीख ९-११-१८४४

श्री

रु. नं. ४

अ. नं. १०३०

पौ छ २९ माहे शोवाल शके १७६६

श्रीमन्माहाराज राजेश्री छत्रपति स्वामीचे शेवेसी विनंती सेवक रेखोजीराव जाधव नाना जाधव समस्त नाईकवाडी गडकरी लोक किले भुदरगड व समस्त पतक दि॥ हुजूर कृतानेक विज्ञापना ता छ २७ माहे सवल पर्यंत सेवकाचे व किले मजकूरचे वृत यथास्तित असे शेवेसी विज्ञापना ऐसीजे राजेश्री माणकोजी गाईकवाड हावलदार व हुजूरे येऊन बोलणेस पतकाचे लोक व नाईकवाडी लोक घेऊन गेल ऐस असता इकडे अजम जनराल साहेब बहादूर याची मोहीम आम्हावर होऊन गोलागोली जाहाली त्यास बोलणेचा भाव दाखवून धन्यानी सेवकाचे पारपत्य करणेचे धरलेस शेवकाचा उपाय काय आहे ऐसी निराशा सेवक लोकाची धन्यानी करू नये आमचे पारपत्य दुसरेकडून जाहालेस जगत्रयी कीर्ती धन्याची होईल हा मजकूर ध्यानी घेऊन गोलागोली होत आहे ती बंद व्हावी इकडून राजश्री भुजंग नाईक व गडकरी सेवेसी पाठविले आहेत निवेदन करतील शेवकाचा अर्थ ध्यानी ध्यावा शेवक किले मजकुरी आलंग नौबत गस्त पाहारा करून हुशारीने आहो. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक ६७ तारीख १७-१२-१८४४

नकल

रु. नं. २

अ. नं. ४९३

साहेब मुषफक मेहरबा दोस्ता आजम
गुलाम गोष सा। खानबहादूर नि॥ सुंद-
राबाई साहेब घाटगे सर्ज्याराव सलम हु

आजीसौब उटरूम कर्णेल साहेब बहादूर सलाम बादज सलाम आंकी दिगर मजमुन कोलापुर इलाख्यात बंडाई होऊन आजम मुख्ये कारभारी याजवर गर्दी जाहाली त्या बडाईचे बंदोबस्ताची सरकारातून तजवीज चालत असता त्या तजविजीचे कामात आपण

प्रथम कागल व चिंचवाड मुकामी आम्हास मदत दिल्ही नंतर कोल्हापुरास आपल्यास बराबर आणिले तेथेही या बंदोबस्ताचे कामात आपणाकडून मदत होत गेली त्यानंतर मेहरबा रसिडेंड साहेब बाहादूर सातारा यासी पनाळा पावणगडकरी याणी आटकाव केला त्यास तेथून आणविण्याचे कामातही आपण मेहनत करीत होता या सर्व कारणा वरुन आम्हास फार संतोष जाहला आसा कीं आपले थोरपणाची तारीफ आम्ही उमेदीने सरकारात लिहू ते पाहून सरकार आपल्यावर व आपली येजमानसाहेब याजवर फार खुषी होतील कळावे तारीख १७ माहे दिजेंबर सन १८४४ इसवी ज्यादा काये लिहिणे प्यार मोहबत आसो दीजे हे किताबत

(इंग्रजी सही)

लेखांक ६८ तारीख १०-५-१८४५

श्री

रु. नं. ३

अ. नं. ६४८

सरकार श्रीमन्महाराज श्री छत्रपति

स्वामी कोल्हापूर

यादी खुमानपुरी महंत इनामदार मौजे नांदोषी पेटा खानापूर सुा खमस आर्बैन मयातैन व आलफ शके १७६७ मौजे शाहापूर ताा रुकडी हा गाव आमचे मठाचा अन् भंडारा चालवणे अवश्य जाणोन राजशक ११७ साली संस्थानाकडे शिष्य परंपरा इनाम कैलासवासी माहाराज सरकारानी दिला आमचे मटशिष्यसांप्रदायाप्रमाणे मटाचा अधिकार महंत गुरु ज्यास अधिकारी करितल त्यास मिळणेचा त्याप्रमाणे आम्हास महती मिलाली व मठ संस्थानचा अधिकार आला त्याजवरून आम्ही उत्पन्न वहिवाटीत आहो हल्ली मौजे शाहापूर हा गाव लालगिरी गोसावी याचे बंडास चिरंजीव रामपुरी सामील असावा असा वहिम धरून सरकारानी रामपुरीस अटकेत ठेऊन गाव जप्त करून मटातील जिनगी जप्त केली आहे तरी रामपुरी हा येक माझा शिष्य असून त्यास मी तेथील पोलिसाचे काम पाहाणेस ठेविला आहे तो त्या गावचा धनी नाही त्याची व लालगिरीची जानपिछान नाही व त्याचे बंडात अंग नाही तथापि सरकारानी अंदेशा धरून त्यास अडकवून ठेविले आहे खरे खोटे निवडणार सरकार समर्थ आहे परंतु रामपुरी बंडास सामील जाहला म्हणोन शाहापूर हा गाव जप्त करणे मटातील जिनगी जप्त करणे न्याय नाही रामपुरीचा या गावासी व मटातील जिनगीसी कारणाकारणी कांहीं संबंध नाही तो दोषी ठरेल तर सरकार त्यास शिक्षा करील सरकारास प्रार्थना असी आहे कीं या गावचा मी मालक आहे रामपुरीवरी आले आरोपावरून सरकारात घेतलेली

जिनगी आम्हास परत मिळोन गावची मोकलीक व्हावी हा अर्ज मनास आणून पूर्ववत चालवणे सरकाराकडे आहे हे आसीरवचनता माहे जो॥वल छ ३.

(सही खुमानपुरी)

(महंत दा॥ खु॥)

लेखांक ६९ तारीख १९-१-१८४७

श्री

रु. नं. ४

अ. नं. १०३९

यादी हुजूरचे प्रांतात निपाणकर याणी व नारायणराव घोरपडे सेनापति याणीं बेआबदी करून ठाणी घातली याची कैफीयत सु॥ सबा आर्बैन मयातेन व आलफ छ १ माहे सफर उर्फ माघमास शके १७६८ पराभवनाम संवत्सरें.

१ सन आर्बा मयातेन व आलफचे साली जनराल वसळीं साहेब बहादूर चेनापटणाहून पलटणे घेऊन धोंडजी वाघाचे बंदोबस्तास धारवाड नजीक आलें ते समई धोंडजी वाघ याणी आपले फौजच्या दोन तुकडया केल्या त्यापैकी बुनगे बाजार मनोलीचे मार्गाने आले त्या बुनगच्या पाटलागावर पलटणे आली तेव्हा भाद्रपदमास मलप्रभास प्रजेन्यकालचा पूर आला होता आणि पाठलाग करीत इंग्रेज सरकारची पलटणे आली या धास्तीमुळे बुनगेवाले लोक कांहीं नदी उतरून पार जाहाले व कांहीं बुनगेवाले लोक नदी उतारता बुडून मेले. बाकीचे बुनगे पलटणाचे कबजेत सांपडल्यामुळे पलटणे नदी उतरून आली नाहींत माघार फिरोन जनरल साहेबाचा मुकाम होता तेथें परत पलटणे गेली तेसमई खंडेराव भोसले माहाराज सरकारातून मनोलीचे ठाण्यात मामलेदार होतें त्यानी इंग्रजी पलटणाची धास्त खाऊन मनोलीचे ठाणे सोडून निघून गेले मनोलीचें ठाणेत मामलेदार नाही ठाणे मोकले आहे म्हणोन बालकृष्णपंत भाऊ लागू याजकडे सरसुभेचे काम होते त्यास कल्लेवरी सरसुभेदार याणी आपलेकडील हरिपंत फालके कारकून याजबरोबर दोनशेहे लोक देऊन मनोलीचे ठाण्यात पाठविले त्यानी मनोलीचे ठाण्यात येकून चार महिने राहून सुभेकडील आमल चालविला नंतर जनरालसाहेबास निपाणकर यानी सर्व मजकूर जाहीर करून मनोलीचे ठाणे आपलेकडे घेतले ते मनोलीचे ठाणे हुजूर न देता मनोलीचे ठाण्यात निपाणकर यानी अमलदार व लोकाची सिबंदी ठेऊन मनोली तालुकेत आमल चालविला ते समई जनराल साहेब याचा मुकाम पलटणेसुधा मौजे संगोली तालुके कितुर येथे होता तेथूनच दरकूच जाऊन दौलतराव शिंदे आलिजाबाहादर याचे फौजेबरोबर लढाई जाहाली जनराल साहेब समागमे बापू गोखले व निपाणकर हे आपले फौजचे जमावानिसी गेले होते जनरोल वसलीसाहेब बहादूर याचे फौजेची व दौलतराव शिंदे आलिजाबहादूर

याचे फौजेची लढाई घाटयेजंट अजांटा नजीक भाद्रपदमध्ये ७ शके साली जाहाली त्या लढाईत यादवराव भास्कर कारभारी शिंदेकडील फौजेचे दवडीत घोडयावरून पडले तेव्हा घोडयाचे तुडवणीत काल जाहाला त्याचे बंधु गोपालराव भास्कर याजकडे शिंदेकडील बक्षिगिरीचे काम होते.

१ सन खमस मयातैन व आलफ छ २२ माहे रबिलावल उर्फ-----महिनेत हुजूरून थैली जनराल वसली साहेब बहादूर यास रवाना जाहाली जे आसाहेब बहादूर याचे आगमन पुण्यास जाहाले त्यास पुनेतून पटणास जाणेचा कस्त ठरून यद्गूर मांजरीचे मार्ग नदी उतरुन पुढे जाणेचा बेत आहे म्हणोन हुजूर इजहार जाहाले याजकरिता हुजूरून चिरंजीव राजश्री हैबतराव गाईकवाड विश्वासराव यास आज्ञा फर्माऊन आसाहेब बहादूर यास हुजूरच्या मुलाकतीस घेऊन येण्याकरिता रवाना जाहाले आहेत त्यास आसाहेब बहादूर याणी यामार्ग येऊन हुजूरची मुलाकत हासील करुण जाणेचे करावे म्हणोन.

लेखांक ७० तारीख २-१०-१८४८

श्री

रु. नं. ७

अ. नं. १२७६

यादी श्रीमंत अमृतराव पंडित प्रतिनिधि यासी अधिकार समयी माहाराज सरकारातून पोशाख वगैरे जाहला ते सुमार सन तिसा आर्बैन मयातैन व अलफ

१ प्रथम दर्शन समयी

 १ चादर म्हणजे दुपेटा

१ अधिकारची वस्त्रे जाली त्यावेली दिले ते

 १ पोषाक सनगे पांच

  १ मंदील १ दुपेटा

  १ किनखाप थान १ सगल भरगची

  २ माहामुद्या

 ५

१ दाली म्हणजे पडदले व कराचली

 १ दागिने

  १ कंटी मोत्याची

  १ जडावाची कडी २ एकूण जोडहिऱ्याची

  १ शिरपेच

 ३

१ शिकेकटार

१ सिकादान रुपयाची त्यात कोरीव अक्षरे आई अधी पुरुष श्री राजा शाहा छत्रपति स्वामी कृपानिधी अमृतराव भगवंत प्रतिनिधि सिक्याची मुठ सोन्याची

१ मोर्तब दोन रुपयाची त्यात कोरीव अक्षरे राजतेलेख नावधी.

१ मोर्तबाची मूठ सोन्याची.

१ कटार सोन्याचे मुलाम्याची

३

१ हुदा रुमाल तांबडा

१ जरिपटका बादली.

---

१ मेजवानी बद्दल रुपये १०० व मिठाई व विडे सामान पावयाचे

१ निरोपासमई सणगे तपसील तिवट १ व दुपेटा १ व किनखाप

५

महासुद्या २ एकूण

मुख्य कारभारी याजकडे रवाना तारीख २ अकटंबर सन १८४८ इसवी.

(गणेश विठल अक्टिंग कारभारी.)

लेखांक ७१

इ. स. १८४८–४९

श्री

रु. नं. ४

अ. नं. १०४७

फे. नंबर ३०

यादी नेसरीकर शिंदे याचे घरची माहिती सु॥ तिसा आर्बेन मयातेन व आलफ मुल नरसिंगराव शिंदे यास पुत्र खाली लिहिल्या प्रमाणेः—

१ वडील बाईकोस नारायणराव हा वडील

४ दुसरे बायकोस

१ दुर्गाजीराव

१ गोविंदराव

१ सुब्राव

१ जीवणराव

४

—

५

यास संतती तपशील

० नारायणराव यास पुत्र नाही.

१ दुर्गाजीराव यास

१ व्यंकटराव १ नरसिंगराव

—

२

पौा नरसिंगराव हा जीवणराव यास दत्तक दिला बाकी

गोविंद्राव यास पुत्र नाहीः—

३ सुबराव यास पुत्र तिघे

१ दाजीराव

१ सुलतानराव

१ अमृतराव

—

३

१ जीवनराव यास आवरस पुत्र नाही दत्तक नरसिंगराव दुर्गाजीराव याचा घातला आहे.

—

५

यासी वहिवाट

१ श्रीमन्माहाराज शिव छत्रपति याचे कारकीर्दीत नारायणराव व सुभराव शिंदे यानी बेमानी वर्तनूक केली सबब त्याजकडून नेसरी तालुका काढून घेऊन गोविंदराव शिंदे याचे स्वाधीन केला नंतर याचे पाठीमाग त्याचे बंधु जीवनराव शिंदे याजकडे वहिवाट चालली.

१ श्रीमन्माहाराज आबासाहेब छत्रपति याचे कारकीर्दीत का। लाटेचे मु। स्वारी आसता लष्करात जीवणराव शिंदे याचा काल जाहाला त्यास दत्तक दुर्गाजीराव शिंदे याचे धाकटे चिरंजीव राजश्री नरसिंगराव यास सन आशरीन मयातेन व आलफचे साली दत्तक देऊन नेसरी तालुका स्वाधीन केला श्रीमन्माहाराज बाबासाहेब छत्रपति याचे कारकीर्दीत सन समान आशरीन साली बेलगाव मु। नारायणराव पंडित राजाआज्ञा बेलगावी होते तेसमई आँताजी पंत गोखले नि। वटारकर याचे विद्यमाने नारायणराव व सुब्राव शिंदे येऊन भेटले राजाआज्ञा करवीर मु। आलेबराबर उभयता शिंदे आले नारायणराव शिदे याचा काल करवीरी जाहाला पुढे सुब्राव शिंदे याणी भाऊबंदी तंटे चालविले होते याची पंचाईत महाराज सरकारात रामराव आखबरनिवीस यानी न्यायाधिशी

फडास जबरीने निमा हिसा द्यावा आसा फैसला केला परंतु हिसा निमा जाहाला नाही.

१ अलीकडे पेशजी फैसला जाहाला हा दाखला बेलगावास दाखऊन वाटणीविसी हुकूम आणोन वाटणी घेतली.

लेखांक ७२ तारीख ७-३-१८४९

रु. नं. ४

अ. नं. १०४८

मुा जा. नंबर नकल

५०

यादी लियाकत व माआव दाजी कृष्ण पंडित मुख्य कारभारी रावबहादूर नि॥ श्रीमन्माहाराज छत्रपतिसाहेब सरकार करवीर याजकडे हेनरीलेकान अंडरसन साहेब इस्कोयर ऑफिसिटींग पोलिटीक्याल सुपरिटेंडंट इ॥ मजकूर याजकडून पाठविण्याची येसीजे आपणास लिहिण्यात येते ते कलमवार खाली लिहिल्या आन्वये

१ विशाळगड संवस्थानाकडून कोल्हापूर सरकारास दंडा बदल रुपये ५०००० पनास हजार नजरे बदल रुपये ३५००० पस्तीस हजार मिळोन येकंदर पंच्यायेसी हजार रुपये येणे तो अैवज पंतप्रतिनिधींचे घाटाखालील आमलाची जमाबंदी रत्नागिरी जिल्याचे मेहरबा कलेक्टर साहेब बहादूर याजकडून जाल्या पौ॥ घेऊन इंग्रज सरकारचे कोल्हापूर सरकारकड कर्ज येणे त्या कर्जाऐवजी वसूल लिहिविला आणि तों ऐवज बेलगाव खजिन्यात पावल्याची × त्रिपलीकेट पावती मेहरबा म्यानसन साहेब शकंड असिटेंट कलेक्टर इंच्यार्ज जिल्हा बेलगाव याजकडील तारीख ९ माहे दिशंबर सन १८४८ इसवीची आलेली यादी सोबत खजिन्यात राहाण्यासाठी पाठविण्यात आली आहे.

२ कोल्हापूर सरकारास बावडे संवस्थानाकडून नजराणेबाबत ३०००० तीस हजार रुपये येणे हा ऐवजी घाटाखालील बावडे आमलाची जमाबंदी मेहरबान कलेक्टर साहेब बहादूर जिल्हा रत्नागिरी याजकडून आल्यापैकी घेऊन बेलगावच खजिन्यात इंग्रज सरकारचे रद कर्जाऐवजी भरणा जाल्याची पावती सदरहू तीस हजार रुपयाची त्रिपलीकेट बेलगावचे सेकंड असिस्टेट कलेक्टर साहेब बहादूर याकडून ता। ९ दिशंबर सन १८४८ इसवीची आलेली खजिन्यात राहाण्यासाठी याबराबर पाठविली आहे.

३ सदरहू शिवाय बालाजी हणमंत सिखरे याणी मेहरबा पुणे कलेक्टर साहेब बहादूर याजकडेस इंग्रजी सरकारच रद कर्जाऐवजी ५०००० पनास हजार रुपयाचा भरणा केला त्याजबदल साहेब मौसुफ याजकडील आलेल्या पावत्या हली आपणाकडे आहेतच.

४ सदरी तीन कलमात तीन रकमा लिहिल्याची येकंदर बेरीज एक लक्ष पासष्ट हजार या रुपयाचा सदरहू अन्वये जिकडील तिकडे जमाखर्च करवून हली पाठविलेल्या पावत्या साहा व पेशजी पुणे कलेक्टर साहेब याजकडून आलेल्या रसिदा मिलोन येकदर कोल्हापूर खजिन्यात ठेवाव्या.

येकून च्यार कलमी लिहिल्याप्रमाणे तजवीज व्हावी कलावे रा। ता। २४ माहे फेब्रवारी सन १८४९ इसवी.

(सही इंग्रजी)

पौ ता। मजकूर

नंबर ४२५ खजिन्याकडे

सदरहू पावत्या पाटविल्या आहेत खजिन्याकडे ठेऊन जमाखर्च व्हावा आणि कलवावे या यादीची प्रतही दाखल्यास घ्यावी आणि याखाली जमेनिशीकडे लिहून पाठवावे म्हणजे ते यादीची नकल घेऊन इकडे कलवितील कलावे तारीख २४ फेब्रवारी सन १८४९ ता।

सदरी लिहिल्या रकमा पैकी पुण्याचे कलेक्टर सा। कडील पन्नास हजार रुपयेचा जमाखर्च उलगडला असेल तर बाकी रकमा जमा करून येकंदर कंपणी सरकारचे रद कर्जा बा। खर्च पडावयाचे कलवे ता मजकूर सन मजकूर.

दाजी कृष्ण पंडित मुख्य कारभारी

अख

३४४ जमेनिशीकडे

सदरहु हुकुमाप्रो। हिकडे जमाखर्च करून यादीची नकल आपल्याकडे घेण्याकरिता पाठविली आहे कलावे रवाना तारीख ४ माहे मार्च सन १८४९ इसवी दसतूर आबाजी कृष्ण कारकून नि। हुजूर खजाना

नीलंकठराव जाधव जप्तन्नमुलीक

अ. ख.

११३३ हुजूरास विज्ञापणा

सदरहुचा दाखला घेऊन जाहीर होण्यास विनंती लिहिली आहे तारीख ७ मार्च सन १८४९ इसवी.

रामचंद्र त्रिंबक हुजूर जमेनीस

असलबरहुकूम नकल रुजु पाहाणार

सिताराम पाडुरंग कारकून

लेखांक ७३ तारीख ७-४-१८४९

श्री

रु. नं. ४

अ. नं. १०४९

चैत्र शु॥ १५ शके १७७१

राजश्री रावसाहेब खर्डेकर सरलस्कर बहादूर रामराम विनंती विशेष श्रीमंत मातोश्री बाईसाहेब सिंदे अलिजाहाबहादूर उजनीहून बालंतविडयाचा सरंजाम वगैर जिन्नस राजेश्री बाळासाहेब राजे भोसले मुंगीकर याजबरोबर पाठविला तो दरबारात प्र॥ जाहाल्यावर उष्णकालाचे दिवस रा।गी लवकर करावी म्हणोन बोल्यावरुन इकडील मंडळीची यादी मागितली ती देऊन बालासाहेब यास पाच वस्त्रे कंठी शिरपेंच शिंदे सरकारात लागत असतो म्हणून कलविल्यावरुन आपले म्हणणे कीं येथे माहाराजाशिवाय दुसरे कोणासच पांच वस्त्रे नाहीत व साडेतीन वस्त्रे ज्याचे दाखले आहेत त्यासच मिलतात नाहीतर दुपटा व पागोटे हा मा॥र बालासाहेब यास कलविता त्याचे म्हणे कीं आम्ही या दरबारचे भाऊबंद येक मोर्चेल आमचे घराण्यास येविसीचे दाखले पुण्यास व सातान्यास व या दरबारात पूर्वी आमचे आजे आले होते सत्कार जालेला आहे दाखले पाहावे म्हणजे लक्षात येईल समजोन व्हावे केवळ साडेतीन वस्त्रे कंटी शीरपेच आल्याने जन्म गुदरेल असे कांहीं नाही मानात कमी होऊ नये यात दरबारचेही भूषण पाठविणारास संतोष यास्तव समजोन व्हावे म्हणोन वारंवार राजश्री दाजीपंत यास कलवितो परंतु स्वच्छ जाब समजोन येत नाही येथे आठ दिवस राहावे म्हणोन यजमानाचा हुकूम त्यास एकमास आला जबाब याविसीचा सत्वर आज लेखही यावा उदईक कूच करण्याचा विचार आहे दाजीपंत याजपासी स्मरणार्थ यादी दिली आहे सरंजाम प्र॥ जाहाल्याची पत्रोत्तरे वगैरे कागद यावे आपण मेहरबानगी करुन श्रीमन्महाराज मातोश्री आईसाहेब यासी विनंती करुन उत्तरी कलवावे बहुत काय लि॥ लोभ निरंतर असावा हे विनंती.

विनायक रामचंद्र नि॥ शिंदे
आलिज्याबहादूर.

लेखांक ७४ तारीख ९-४-१८४९

श्री

रु. नं. ७

अ. नं. १२८२

यादी राजमाने राजेश्री दाजीपंत दादा पंडित मुख्य कारभारी रावबहादूर याजकडे हणमंतराव निंबाळकर बहादूर सरलष्कर याजकडून पाठवावयाची ऐसीजे राजेश्री विनायकपंत नि॥ शिंदे अलिजाबाहादर याजकडून आमचे नांवे पत्र आले ते व आम्हाकडील या पत्राचे उत्तर गेल्याचे तालीक असे

दोन कागद या यादी सोबत पाठविले आहेत आपणास कळावे तारीख ७ माहे एप्रील सन १८४९ इसवी

हणमंतराव निंबाळकर बहाद्दर
सरलष्कर.

राजेश्री महिपतराव गोपाळ पारसनवीस यास सदर्हुविसी कसा दाखला आहे तो याखाली कलवाव पोटकागद दोन पाठविले आहेत. तारीख मजकूर छ १३ जावल १७७१

दाजी कृष्ण पंडित मुख्य
कारभारी

गोविंद अमृत
जबाबणीस.

उतरी विज्ञापना तारीख ९ माहे एप्रेल सन १८४९ इसवी छ. १५ माहे रबिलाखर शके १७७१

राजेश्री बालासाहेब भोसले मुंगीकर हे माहाराज सरकारचे आठ घराणे पैकी पांचवे बंधुचा वंश म्हणोन वंशावलीचे यादीत लिहिले आहे निवेदन केलाच आहे माहाराज सरकारातून पेशजी मशारनिले भोसले याचे आज्यास वस्त्रे मिळाली असल्यास त्याचा दाखला आम्हाकडे नाही. वस्त्राचा दाखला मा। जामदारखाणेच्या यादीस असणेचा शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

महिपतराव गोपाल पारसनवीस

लेखांक ७५ तारीख ३०-७-१८४९

रु. नं. ७

अ. नं. १२८६

साहेब मुषफक मेहरबा कर्म फर्याय दोस्ता हेनरीलेकाज अंडरसन साहेब बहादूर इस्कोयर पोलिटिक्याल सुपरिनटेनडेंट इलाखा कोल्हापूर सलम हुताला आजी दिल एकलास लक्ष्मणराव सिंदे सेनाखासकील संस्थान तोरगल सलाम आंकी येथील खैरखुषी ता छ ३० माहे जुलाई सन १८४९ इसवी शके १७७१ जाणून आसाहेबाची खैरखुषी लिहून दिल आराम करीत आसावे दरिविला मेहेरबा ग्राम साहेब बहादूर पोलिटिक्याल सुपरिनटेनडेंट प्रांत कोल्हापूर याजकडून अवल दरजितील यास अक्तयारी फौजदारी व दिवाणीची देऊन त्याजविसी वहिवाट चालून महिने माहाल रिपोर्ट करणेस्तव सर्वत्रास थैल्या गेल्या त्याबराबर आम्हासही थैली आली त्याजवरून साहेब बहादूर यास इकडून थैलीचे उत्तर पाठविले कीं पूर्वी संस्थान संपादिले पासून माहाराज सरकारातून फौजदारी व दिवाणी अखत्यारी आमची आम्हाकडे चालविली आहेत इकडील संस्थान तीन तोरगल व नरगुंद व रामदुर्ग असी तीन संस्थाने याची मर्यादा कुंपणी सरकारातून (फाटले आहे) दोन संस्थानास (फाटले आहे) आहेत त्या प्रमाणे आमच

(फाटलें आहे) चालवावी म्हणोन छ ११ माहे जिल्काद शके १७७० ची थैली पाठविली त्याचे उत्तर मेहरबान कप्तान कलाक साहेब बहादूर असिस्टांट पोलिटिक्याल सुपरिनटेनडेंट इन्छोर्ज कोल्हापूर याचे उत्तर आले त्यात आपणास दिवाणी व फौजदारीची अखत्यारी देण्यात आला तो सरकारी हुकमाचे आधारानेच आहे म्हणोन लिहिले आहेत त्यास आम्हास माहाराज सरकारातून पूर्वी पासून सर्वत्रा बरोबर आम्हास मिलविले नाही आमची संस्थान मर्यादा पूर्वीपासून सांप्रदाया प्रमाणे चालवीत आले आहेत त्याप्रमाणे ऑ साहेबानी चालविले पाहिजे येविसी इकडील मजकूर जाहीर करणेबद्दल राजेश्री व्यंकाजी पंत वकील यास पाठविले आहे जाहीर करतील त्याप्रमाणे ऑसाहेबानी मनावर घेऊन आमची संस्थानची मर्यादा चालवणे ऑ सोकडे आहे हमेषा खत खदूत पाठवून देतील खुषी करीत असावे जादा काय लिहिणे प्यार मोहबत असो दीजे हे किताबत.

लेखांक ७६ तारीख २५-७-१८५०

रु. नं. ७

अ. नं. १२९०

साहेब मुषफक मेहरबा कर्म फर्याय दोस्ता हेनरी लेकान अंडरसन साहेब बहादूर इस्कोयर असि॥ पोलिटक्याल येजंट इा कोलापूर सलम हुताला अजी दिल एकलास लक्ष्मणराव सिंदे सेनाखासकील संस्थान तोरगल सलाम आंकी येथील खैरखुषी ता १८ जुलाई सन १८५० इसवी जाणोन आसाहेबाचे खैरखुषी लिहून दिल्ह आराम करीत आसाव दरिविला इकडील संस्थानातील कडकोल व खोची नंदनवाड वगैरे उत्पन्न करवीर सरकारानी विनाकारण घेतल्यामुळे दवलतीची हलाखी फार जुजबी उत्पन्न राहिले त्यात लाचारीने दिवस घेत आहो तशात संस्थान मजकुरात एक कारकून हुजूरून येणार आहे असे ऑ सा.नी सांगितले अभिप्रायाची खबर राजश्री व्यंकाजीपंत वकील कळवितात तेव्हा कारकून पाटविणजोग इकडून कोणती गैर राहा ऑसोचे नजरेस आलेस इकडे न कलता परभारे नेमणेची तजवीज होणार नाही परंतु लौकिकी सर्व संस्थान मंडलीत आमचा आभास होईल हे चितात याव याकरिता कलमी करण्यात येते कीं या संस्थानची मर्यादा चालविणे आसोकड आहे हली नवीन कारकून आल्याने माहाराज सरकाराकडून बंदोबस्त ठेवण्याचा दाखला ऐनदा दिसेल या करिता रहित असले पाहिजे आम्ही स्वतंत्रपणे वागले असोन दरम्यान एक दोनवेळा जिकीरी पडू लागल्यावरून ऑसाहेबाचे लिहिण्याअन्वये फोजदारी दिवाणीचे काम व फिर्यादी लोकाच निकालही चालविले आहेत असे असोन येकायेकी इकड कारकून नेमण्याचे ऐकल्यावरून सविस्तार लिहून कळविल आहे त्यास या संस्थानचा साभिमान

ऑसाहेबास आहेच आम्हावर परभारे जुलूम होऊ लागल्यास आमचा इलाज नसल्या-वरून ऑ साहेबाचे विचारे   गवरणर साहेब बहादूर इजलास कौसलास कलवणेचे जरूर दिसेल तर मेहेरबानगी करून हीच थैली रवाना करून दिल्यास ही खुषी आहे आमचे कल्याण ज्या रीतीने होईल त्या रीतीने ऑसाहेब बहादूर साभि-मानपूर्वक संरक्षण करतील असा भरवसा आहे येविसी जादा काय लिहिणे प्यार मोहो-बत असो दीजे हे किताबत डेरी पान ७५४
दा. ता. २५ माहे जुलई सन १८५०

लेखांक ७७   तारीख ३१-७-१८५१

श्री

रु. नं. ४
अ. नं. १०६२

यादी श्रीमंत राजेश्री लक्ष्मणराव साहेब सिंदे
सेनाखासकील संस्थान तोरगल याचे पूर्वजानी तोरगल संस्थान स्वपराक्रमाने मिळविले पासून कोणी कोणी किती दिवस दौलत अनभव केली ते मु॥ इसने खमसेन मयातेन व अलफ शके १७७३ विरोधीकृतनाम संवत्संर सन १२६१ फसली

२९ नरसोजी सिंदे यानी शके १६०१ सिधार्थीनाम संवत्सर ता॥ शके १६२९ सर्व-जीतनाम संवत्सर पावेतो संस्थान अनभव केले वर्ष.

३३ सुभानराव शिंदे सेनाखासकील नरसोजी शिंदे याचे पुत्र यानी शके १६३० सर्वधारी नामसंवत्सर पासून शके १६६२ रौद्रीनामसंवत्सर पावेतो अनभव केले वर्ष.

४२ लक्ष्मणराव सिंदे सेनाखासकील सुभानराव सिंदे याचे पुत्र यानी शके १६६३ दुर्मतीनाम संवत्सर ता॥ शके १७०४ शुभकृतू नामसंवत्सर पावेतो अनभव केले वर्ष.

४४ शंकरराव सिंदे सेनाखासकील लक्ष्मणराव शिंदे याचे पुत्र यानी शके १७०५ शोभन-कृतूनाम संवत्सर पासून शके १७४८ वेयनामसंवत्सर पावेतो अनभव केले वर्ष.

२५ श्रीमंत राजेश्री लक्ष्मणराव साहेब सिंदे सेनाखासकील शंकरराव शिंदे याचे पुत्र यानी शके १७४९ सर्वजीतनाम संवत्सर पासून अनभव करीत आहेत

१७३

येणे प्रमाणे अनभव केले आहेत तारीख ३१ माहे जुलई सन १८५१ इसवी.
ही यादी वकिलानी मु॥ नंबर ६ तारीख ३१ जुलई सन १८५१ इ.चे जबाबा बराबर पाठविली असे तारीख मजकूर.

जबाबनीस

लेखांक ७८ तारीख १६-८-१८५३

श्री

रु. नं. २

अ. नं. ५०३

चिरंजीव श्रीमन्माहाराज ताराबाई राणीसाहेब यासी प्रति बायजाबाई सिंदे अलिज्याबहादूर आशीर्वाद येथील कुशल तागाइत छ १० माहे जिल्हकाद पावेतो श्री आवंतीकाक्षेत्री यतास्थित असो विशेष आपली प्रकृती गुल्म वायूचे उपद्रवाने बिघडल्याचे वृत कळल्यावरून गबासून व साळु निंबाळकर यास रवाना केले याचे पत्र आपले प्रकृतीचे वृत जेष्टमासी लिहून आले त्याजवर त्याचे किंवा आपले पत्र येऊन कुशल समजले नाही हली अगबारीवरून समजण्यात येते कीं पोटातील गुल्म वायूची विकृती आहे ती कमी न होता जयास्त आसोन घबराट बहुत आहे हे ऐकून चित स्वस्थ नसून रात्रंदिवस चैन पडत नाही औषधी उपचार चांगले प्रामानिक वैद्याकडून करावे कोकनात आथवा सातारा वाई पुणे या ठिकाणी चांगले नामांकित परंपरा वैद्की करीत आलेत अशाचा शोध राजश्री दाजी कृष्ण पंडित यासही असेल सांगून आणून याचे औषध शेवण करीत असोन आरोग्य होईल ते करावे दोन रुपये खर्च पडल्यास चिंता नाही प्रकृती स्वस्थ असल्याचे आपले पत्र येईल तेव्हा चिताची स्वस्थता होईल इकडील लक्ष श्रीमन्माहाराज छत्रपति राजेसाहेब याजकडे व आपलेकडे आहिरनिशी आहे सत्वर कुशलता कळावितील बहुत काय लिहिणे हे आशीर्वाद.

दाखल ता २८ आगष्ट सन १८५३
श्रावण व॥ १० हैदरखा याने
कागलातून लि॥ले पत्र आणोन दिले.

लेखांक ७९ तारीख ११-७-१८५५

रु. नं. २

अ. नं. ५०४

यादी अजम जनार्दन हरि कीर्दने अगटिंग कारभारी नि॥

श्रीमन्माहाराज छत्रपति साहेब सरकार करवीर याजकडे मेजर जार्ज मालकम साहेब बहादूर अगटिंग पोलिटीकल सुपरींटेडेंट इलाका कोलापूर याजकडोन जाण्याची येसीजे थोडे रोज जाले मेहरबान नारायणराव साहेब घाटगे सर्जेराव कागलकर हे आमचे मुलाखतीस आल्यावेली पायात जोडे असिल्यासहीत बंगल्यात आले त्यावेली असी अमर्यादारपने म्हणोन त्यास सांगण्यात आले पूर्वी एकवेल कोल्हापुरात त्याची भेट आम्ही घेतल्यावेलीही असेच जाले होते त्यास सरदार

मानकरी लोक अशा वहिवाटीने वागतील तर फार नापसंतीची गोष्ट आहे करिता या उपर जर असे होईल तर आम्ही त्याची कधी भेट घेणार नाही व अशी वहिवाटही नसेल करिता येसीचा सांप्रदाय कसा आहे तो जरूर कलविण्यात याव माहाराज पायात जोडे घालोन बंगल्यात येतील तर अलाहिदा आहे तसा सरदार लोकाबदलचा प्रकार समजता येणार नाही तारीख ७ माहे जून सन १८५५ इसवी मु॥ बावडे पेटा करवीर

केशव भास्कर अ. का. (सही इंग्रजी)

मु. आ. नं. ५७४/१८५५

रिपोर्ट करितो येसीजे

सांप्रदायाबद्दल मेहरबान रावसाहेब हिमतबहादर व सरलष्कर बहादर व चिटणीस पारसनवीस यास यादी लिहून त्याचे जबाब घेतले ते तीन कागद अवलोकनास पाठविले आहेत त्यावरून विदित होईल तारीख ८ माहे जुलई सन १८५५ इसवी.

जनार्दन हरि कीर्तने अ. कारभारी

मु. जा. नं. ११६९

उत्तर

सदरहु कागद पाहाण्यात येऊन कलमी करण्यांत येते कीं पूर्वीचा सांप्रदायदेखील नसोन दुसरे सरदारलोक आहेत त्याहून जाजतीचा रुबाब नारायणराव साहेबचा नसल्याचे वगैरे असा प्रकार असीत बंगल्यात भेटीस आलेल्यावेली पायातील जोड्यासहित आमचे समोर खुरचीवर बसले व थोडे दिवसावर त्याची आम्ही करवीरी भेट घेतली तेव्हाही असेच जाले याप्रमाणे त्याजकडोन गोष्ट जाली असे होऊ शकेल तर त्याची भेट कांहीं घेण्यात येणार नाही.
त्यास आपणाकडोन या उपर असी रीत न होण्याविसीचे कलविण्यात यावे व हा प्रकार सर्व सरदार यासही समजाविण्यात यावा जर कोणाकडून असा अनर्थ होईल तर त्याची आम्ही मुलाखत घेणार नाही हेही त्यास समजेल असे व्हावे.

१ येक कलम

नारायणराव साहेब आमचे भेटीस बंगल्यात आले तेव्हा आणखी दोन आसामी त्याजकडील मनुष्ये खुरचीवर आमचे समोर बसली होती त्या पै॥ येक कारकून असावा ती गोष्ट वेगली आहे शिवाय दुसरा कोण होता त्याची पच्यान नसोन नांवाची माहिती नाही जर त्याची लायकी खुरचीवर आमचे समक्ष बसण्यासारखी नसेल तर ते कोण व काय अर्थी खुरचीवर बसले व नारायणराव साहेब याणी कसे बसऊन दिल्हे येविसीचा तपास होन कसे आहे तेही लौकर समजावे.

येकून दोन कलमी लिहिले आहे त्याजवरुन कलेल पोट कागद परत येणे आहेत ता ८ माहे जून सन १८५५ इसवी मु॥ बावडे पेटा करवीर.

(सही इंग्रजी)

मु. म. रा. नंबर
६१३

रपोट करितो येसीजे

दुसरा कारकुनाशिवाय कोण खुरचीवर बसला होता याचा तपास करिता तो गोपाळ यादव म्हणता त्याने खुरचीवर आसाहेबा समोर बसावयास लायकीचे प्रकाराविसी मेहरबान सरलष्कर बहादूर याचा जबाब आणविला तो व नारायणराव साहेब घाटगे याजकडून कारकून याची जबानी घेतली ते एन कागद व पहिले कागद दुसर आणोन यास पाठविले त्यावरुन विदित होईल योग्यता नसता नारायणराव सो याही

येविसी त्यास यादी पाठऊन जबाबविसी सांगून पा॥ तथापि त्याजकडून जबाब आला नाही मागाहून पाठवितो

आल्यावर पाठवीन ता २२ जून सन १८५५

जनार्दन हरि कीर्तने आा कारभारी

मु॥ रा॥ नंबर
१२८३

उत्तर

गोपाला यादव याची लायकी खुरचीवर आमचे समोरा बसण्या सारखी नसेल तर अशा मनुंष्यास यापुढे आमचे भेटीस कांही नारायणराव साहेब येतील त्यावेली त्यानी बराबर आणू नये बंदोबस्तची तजवीज त्यास आपण लिहून करावी तर जाले पोट कागद परत पा॥ आहे ता २२ माहे जून सन १८५५ इसवी मु॥ बावडे पेटा करवीर.

कृष्णाजी भास्कर (सही इंग्रजी)

नंबर
४२५

लष्करफडास रुजुवात यादीकडे

सदरहुविसी नारायणराव साहेब याच्याकडे यादी लिहून गेली आहे आता आपणाकडे दाखला घेऊन घेतल्याचे काम कागद यावयाचे होत ता २५ जून सन १८५५ इसवी

ताा फडास समजुत राहाण्याकरिता लष्करफडास लि॥ असे ता. म.

गोविंद अमृत जनार्दन हरि कीर्तने अ. का.

(ता. ७-७-१८५५)

पो ता १० माहे जुलई सन १८५५

यादी नंबर

६०८

उत्तरी विज्ञापणा

हुकुमा प्रमाणे चालो कामाचा दाखला घेऊन जाहीरास लिहिले आहे पोट कागद समागम पाठविले आहेत ता १० माहे जुलाई सन १८५५ इसत्री दस्तूर बालाजी सदाशिव कारकून विंनंती विज्ञापणा.

सही

लस्कर फडास

जाहीर केले तारीख ११ जुलई सन १८५५

नारायणराव हरी कारकून अ. कारभारी

लेखांक ८० तारीख ३१-१०-१८५८

श्री

निवडी दप्तर रु. नं. २

अ. नं. ४१९

स्मरणार्थ टिपण सन समान अशर मयातैन व अलफ सन १८१७ इसवी साली मरहूम मोरेश्वरराव पंडित अमात्य याणी चितात विकल्प आणून हुजूर हुकुमाविरुद्ध वागून हुजूर इलाखेचे गावगनेस उपद्रव करू लागले सबब त्याजकडील सालवण व रासीवडे हे दोनी ठाणी हुजूरून फौज पा। माहे जिल्काद भाद्रपदमासी घेऊन तेथील दारूचा वगैरे असलेला गला करवीरी कोठीस आणविला नंतर कार्तिकमासी हुजूरची स्वारी सालवणास आलेवरी पंडित अमात्य याजकडील माणसे येऊन गोळागोळी होऊन कांही माणसे जाया जखमी जाली त्यात तिकडील भिमाजीराव खानवेलकर पडले पुढे मार्गसीर्षमासी पंडित मा।रनिले याजकडून रामचद्र गुंडो येऊन समटाचे बोलणे होऊन मखलासी रुपये बीस हजार २००००घेणेचे ठरून त्याची निशा घेऊन दोनी ठाणी परत देण्याचे ठरून छ१७ रा।खर माधमासी दुमालचिठीसह आज्ञापत्रे होऊन ठाणी परत दिल्ही याप्रो दाखला असोन सन तिसा अशर साली सदरहू रुपये आल्येचा दाखला आहे व त्याजवरी खानवेलकर मैत जाले बा। त्याचे लेक आनंदराव यास कांहीं बक्षीस मिळावे म्हणोन मा।रनिल्हे पंडित याचे नांवे छ २६ शौवाल रोजी आज्ञापत्र जालेले बार न होता राहिलेले आहे असे माहितीत आहे पुढे इहिदे अशरीन साली पंडित अमात्य याणी खानवेलकर यास वाडी इनाम करून दिल्ही ती सनद मैत आनंदराव याचे कामात सन इहिदे अशर हस्तदोषाने पडला स। अंदेशा येऊन काम आल्येचा जवाब ता। ३१ अगटंबर १८५८ ई। नंबर १२४ चा दिल्हा आहे.

लेखांक ८१ तारीख २७-५-१८६६

श्री

रु. नं. २

अ. नं. ५१७

राजमान्य राजश्री तुकोजीराव होळकर यासी आज्ञा केली यैसीजे स्वामीचे सेवेशी आपण विनंतीपत्र वैशाख शुद्ध त्रयोदशीचे पाठविले त्यात राजश्री येशवंतराव होळकर याचे विवाहाचा निश्चय जेष्ठ शुद्ध सप्तमीस करून वधु राजश्री बलवंतराव भागवत याची कन्या नेमस्त केली असे म्हणोन विनंती लिहिली निवेदन जाली अशास आपण योजले सुसुहुर्ती कार्यसिद्धी करून घ्यावी हुजूरून अहेराची सनगे राजश्री रामचंद्र दाजी व लिंब्राजी तांबेकर हुजरे व जामदार याज समागमे देऊन पाठविली आहेत येऊन पोहचली याचे उत्तरी पत्र हुजूर पाठवावे जाणिजे सुा सीत सितेन मयातेन व आलफ रोज छ १२ माहे मोहरम बहुत काय लिहिणे मोर्तब असे.

२ राजमान्य राजश्री तुकोजीराव होळकर सुभेदार यासी आज्ञा केली येसीजे स्वामीचे शेवेशी आपण विनंतीपत्र वैशाख शुद्ध त्रयोदशीचे पाठविले त्यात राजश्री संक्राजीराव होळकर याचे विवाहाचा निश्चय वैशाख वा। दशमीस करवून वधु राजश्री विठोजीराव मतकर याची कन्या नेमस्त केली आहे म्हणोन विनंती लिहिली ती निवेदन जाहाली अशास आपण योजिले सुमूर्ते कार्यसिध्दी करून घ्यावी हुजूरून आहेराची सनगे राजश्री रामचंद्र दाजी व लिंब्राजी तांबेकर हुजरे व जामदार या समागमे देऊन पाठविले आहेत येऊन पोहचली याचे विनंतीपत्र हुजूर पाठवावे जाणिजे सुा सीत सितेन मयातेन व आलफ रवाना छ १२ माहे मोहरम बहुत काय लिहिणे मोर्तब असे.

लेखांक ८२ तारीख २०-३-१८६७

श्री प्रभु प्रसन

रु. नं. २

अ. नं. ५२१

श्रीमन्महाराज मातोश्री अहिल्याबाई सो माहाराज स्वामीचे शेवेशी आज्ञाधारक लखमगोंडा बसव प्रभु देसाई नाडगोंडा प्रांत हुकेरी सरदेसाई माहालनिहाय नाडगोंडा मामले मूर्तिजाबाद दोन्ही कर जोडून दंडवत विशेषे विज्ञापणा ता फागुन शुध्द १५ सके १७८८ क्षेयनामसंवत्सरे पावेतो माहाराजाचे कृपावलोकन करून वृत्त उत्तम असे विषेशे स्वामीनी छ ५ जिलकादचे आज्ञापत्र पाठविल त्यात श्रीमन्महाराज राजेश्री तात्यासाहेब माहाराज छत्रपति याचे विव्हा लग्न फाल्गुन वा। १ गुरुवारी करणेचे नेमस्त केले आहे तरी लग्नसमारंभास येणेविसी आज्ञा जाहाली त्याजवरून संतोष जाहाला आज्ञाप्रमाणे समयास येत आसो विशेष काय लिहीणे शक्ती नव्हे हे विज्ञापणा

लेखांक ८३

माहे नोव्हेंबर इ. स. १८७१

रु. नं. २

अ. नं. ५२५

ताइदार सबांनीवत फजुलात नील सुबदनी सर हेनरी बारटल यडवर्ड फ्रीयर साहेब बहादूर रोज आफजुवाद अजीसौब श्रीमन्महाराज मातुश्री माहाराजगीराणी अहिल्याबाईसाहेब बाआदज दुवा आंके दरविला कैलासवासी चिरंजीव राजे राजाराम साहेब छत्रपति महाराज याचे इतिहासाचे वर्णन करून परदेनशीन लेडी व्हरनेस सायबाई याजकडून आलेले पुस्तक आवाला शानानी मेहरबान करनेल आंडर्सन साहेब बहादूर पोलिटिक्याल यजंट याचे मारफतीने येऊन पोचले कैलासवासी छत्रपति साहेब विलायतेस असता त्याजवर आमेहरबानाचे लेडी व्हरनेस साहेब याचे अत्यंत प्रेम होते त्याजविषई इतके दूरदेशी हिरत्रर्ण ठेऊन हे बडी कृपा ठेविले येणे करून उभयाताचे इकडे फार आभार जाहाले आहेत.

गेले विजयादशमी दिवशी म्हणजे तारीख २३ आगटोबर सन १८७१ इसवी रोजी यथाविदी समारंभ होऊन इकडील गादीस दत्तक श्रीमन्माहाराज राजे शिवछत्रपति साहेब जाहाले त्याचे वय नऊ ९ वर्षाचे आहे.

इकडील राज्यघराण्याचे दौलतीचे कल्याणाविषई आपले सर्वाचे आंतःकर्ण तत्पर आहे व इकडे आसा आनंदाचा दिवस प्राप्त जाहाला आहे त्याचेच फळ आहे आजपर्यंत आमेहरबानाकडून चालत आलेले प्रेमाची उत्तरोउतर वृधी राहून वरचेवर समाचार घेणे होईल अशी इकडील उमेद व खातरी आहे सुा इसने सबैन मयातैन व आलफ रा छ माहे सुा ता माहे नवंबर १८७१ जादा काय लिहिणे.

तारीख२८-६-१८७८

लेखांक ८४

हु

रु. नं. २

अ. नं. ३२७

आजम आस्मत पनाही व ईफत दस्तगाहे
कैसरे हिंद व्हिक्टोरिया साहेब आदाम
सलमुल हुताला

येखलासमंद श्रीमन्माहाराज राणी सकवारबाई साहेब बाद इस्तियाक फिरावा मषहूद

आके येथील खैरियत ब ता २८ माहे जून सन १८७८ इसवीपावेतो खैर जाणोन आदोलत पनाहानी आपली खैर आफीयत कलमी करून हामेषा खुष नोंदी हासील होय ते करीत असावयाचे

आमचे कैलासवासी पती राजाराम माहाराज छत्रपति हे इंग्लडास सन १८७० इसवीसाली गेले तेव्हा आमाहाराणी साहेबानी तेथे त्याचा फार सदय अंतःकर्णाने आदरसत्कार केला व या घराण्याच्या हिताविषई मायाळूपणाने आमाहाराणी साहेब कळकळ बाळगतात हे जाणून हे पत्र आ माहाराणी साहेबास लिहिण्यास मला धैर्य वाटते.

आमचे यजमान साहेब कैलासवासी जाहाल्यावर आम्ही आपल्या कुळाच्या संप्रदायान्वय दायादा पैकी येका मुलास दत्तपुत्र करून घेऊन त्यास ह्या प्राचीन राज्याचे अधिकारी केले ह्याचे नांव (चवथे) शिवाजी माहाराज ठेविले आहे यास सोळावे वर्ष असून त्याचा इंग्रजी नीतीतत्वानुसार विद्याभ्यास चालला आसल्यामुळे आपल्या वडीलामागे राज्यकर्ते योग्य होतील असें दिसते गेल्या मे महिन्याच्या २१ वे तारखेस सातारा जिल्ह्यातील शिरके उपनामाच्या लौकीकवान घराण्यातील कन्येसी याचा विवाह जाहाला मुलीचे इकडील नांव व किताब श्रीमन्माहाराज आनंदीबाई साहेब राणी असें आहे याचे वय १० वर्षांचे असून विद्याभ्यास चांगला करवणेविषई काळजी घेत आहो

चिरंजीव छत्रपति याची मुलाखत हिजरायल हायनेस दी प्रिन्स ऑफ वेल्स थासी मुंबई मुकामी जाहाली त्यावेळी हिजरायल हायनेस याणी चिरंजीव छत्रपतीचा जो आदरसत्कार केला तेणेकरून आमचे कुटुंबातील सर्व मंडळीस आणि बहुशः आमच्या सर्व प्रजेस समाधान वाटले आलीकडे आमाहाराणी साहेबाही चिरंजीव छत्रपति यासी "नाईट कमांडर ऑफ दी स्टार आफ इंडिया" ही पदवी दिली ही गोष्ट आमहाराणी साहेबाच्या विशेष कृपेचे लक्षण आहे असे आम्ही समजतो. ————

आम्हास स्वतः इंग्लीशनीतितत्वानुरूप चांगले सिक्षण मिळावे असी आमच्या कैलासवासी पतीची इच्छा होती व ती पूर्ण करण्यास्तव मी कांहीं वर्षे पर्यंत येका इंग्लीशबाईजवळ विद्याभ्यास करीत आहे मला इंग्लीश भाषेचे ज्ञान थोडेबहुत जाहाले असून सोपी इंग्लीश पुस्तके वाचता येतात शिवाय माझी स्वभाषा जी मराठी तिचेही साधारणतः बरेच ज्ञान आहे व पुरसतीच्यावेळी तऱ्हेदार कसुद्याचे काम करीत असते यात माझे गम्य किती झाले आहे हे आमाहाराणी साहेबास प्रत्यक्ष दाखविण्या करिता मी स्वतः साहयावाचून तयार केलेला तक्या या पत्रासोबत सादर करीत आहे याचा स्वीकार आमाहाराणी साहेब करतील अशी माझी विनंती आहे ह्या तक्याच्या पुढील बाजूस जे काम केले आहे त्याचा नमुना "हर रायल हायनेस दी प्रिन्सेस लुईस" ह्यास पसंत पडेल असा मला भरवसा आहे तक्याच्या पाठीवर मी आपल्या स्वभाषेच्या अक्षरानी आमहाराणी साहेबाचे नाव विणले आहे हे पत्र मराठी भाषांतरासह मी स्वहस्ताने

लिहिले आहे व ते व तक्या असी सर बारटल फ्रीयर आणि त्याची पत्नी याच्याद्वारे पाठवावी असा माझा हेतु होता कारण उभयता माझे मित्र आहेत येवढेच नाही परंतु त्यास आमच्या घराण्याचा पूर्वापार सर्व इतिहास माहित आहे परंतु उभयता समक्ष हजर नसल्यामुळे तो योग घडून आला नाही

केसर ई हिंद माहाराणी साहेब
मी आपली विश्वासु आज्ञांकित
(सकवारबाई राणी)

सूची भाग ७

व्यक्तीपुढील आंकडे लेखांकाचे आहेत.

अहिल्याबाईसाहेबमहाराज महाराणी-शिवाजी ऊर्फ बाबासाहेब महाराज छत्रपति यांचें कुटुंब-८२; सर एडवर्ड फ्रीयर साहेबास पत्र ८३

आदम कॅमलसाहेब इनूचार्ज पोलिटिकल एजंट प्रांत कर्नाटक १७

आनंदराव पंडित मंत्री, भूदरगड किल्ल्यांतील गडकऱ्यांचे एकनिष्ठ सेवेबाबत वचन २१; किल्ले मनोहरगड- बंडा बाबत ३४, ३५

आण्याजीराव मोहिते, हनमीनहलच्या गढीच्या वेढ्याची हकीकत ५९

आपाजीराव जाधव जप्तनमुलक घाटांचे बंदोबस्तास चौकी ठेवणें ४

आपाजीराव निंबालकर, हनमीनहलच्या गढीच्या वेढ्याची हकीकत ५९

उटरूम कर्णेल इंग्रजबहादर भूदरगड किल्याच्या रयतेची इंग्रजी पलटणाकडून नासाडी ६२, ६३, ६४, ६५; कोल्हापूर इलाख्यांतील बंडाचें वृत्त ६६, ६७

अंडरसन इंग्रज बहादर पोलिटिकल एजंट प्रांत कर्नाटक, हनमीनहलच्या गढीच्या वेढ्याची हकीकत ५९

अँडरसन ऑफिसियेटिंग पोलिटिकल सुपरिन्टेंडेन्ट कोल्हापूर, राज्याचे कारभाराबाबत ७२, दिवाणी फौजदारीची अखत्यारी तोरगल संस्थानांत पूर्व संप्रदायाप्रमाणें चालविण्याबाबत ७५, ७६, तोरगल संस्थानाची हकीकत ७७, ८३

अमृतराव भगवंत प्रतिनिधि, चोरटे धरून हुजूर पाठविण्यास आज्ञा ३, घाटांचे बंदोबस्तास चौकी ठेवणें ४, ३९; विशाळगड संस्थानच्या राज्यकारभाराच्या मुखत्यारीबाबत तंटा ८, ९, १०, २०, ३८; करवीर राजमंडळांत सर्वांनीं चांगली वर्तणूक करण्याबाबत ठराव १४; छत्रपति महाराज सातारा करवीरास श्रीचे दर्शनास २६; कर्जाबाबत ६१, ७२; अधिकार देतेसमयीं पोशाख वगैरे नजर ७०

कारनॅक सरजेम्स रिविट गव्हर्नरबहादूर मुम्बई, विशाळगड संस्थानच्या मुखत्यारी बाबत ८, ९, १०, २०; कागल तालुका करवीर छत्रपतिमहाराजांचा इलाखा १३; इचलकरंजीकर करवीर छत्रपति महाराजांच्या इलाख्यांतील १६

काशिनाथ केशव आकबरनीस, हिंमतबहादरांनी दंगा केल्याचें वृत्त ५८

केशवराव नारायण घोरपडे इचलकरंजीकर, घाटाचे बंदोबस्तास चौकी ठेवणें ४; करबीर छत्रपतिमहाराजांचे सेवक २८

खुमानपुरी महंत, मठाचा गांव व जिनगी यावरील जप्ती उठविण्याबाबत ६८

गुलाम गौष खानबहादूर कोल्हापूर, इलाख्यांतील बंडाचे वृत्त ६७

चिंतामण जोसीराव, किल्ले भूदरगड ३९
चिंतामणराव आपा पटवर्धन सांगलीकर, इचलकरंजीकर घोरपड्यांच्या करवीर छत्रपति महाराजांच्या चाकरीच्या तैनात-जाबत्याबाबत २८
चिमणासाहेबमहाराज छत्रपति महाराज सातारा, करवीरास श्रीचे दर्शनास २६, इंग्रजी विद्या शिकण्याबाबत ४९, ५१; शरीरप्रकृतीस स्वास्थ्य नाही ५७
जनार्दन हरीकीर्तने, वहिवाटसांप्रदाय पाळण्याबाबत इंग्रज बहादराचे भेटीसमयीं ७९
जोत्याजीराव चवाण ममलकतमदार, घाटाच्या बंदोबस्तास चौकी ठेवणें, ४
टौनसेंडसाहेब, इडवर्ड ह्युम पोलिटिकल एजंट प्रांत कर्नाटक कागल तालुका करवीर छत्रपति महाराजांचा इलाखा १२, १३, १८, ५४, इचलकरंजीकर करवीर छत्रपति महाराजांच्या इलाख्यांतील १६, २२, २८
किल्ले मनोहरगडच्या गडकरीबंडाची हकीकत १९, ४८; विशाळगड दौलतीच्या वहिवाटीबाबत २०
तोरगलकर व रामदुर्गकर यांच्या सीमांतरप्रकरणी २२
नेसरीकर सिंदे यांच्या सरंजामाचा ठराव २४, ४५
घाटांचा बंदोबस्त व चोरटे लोकांच्या चौकसीबाबत हुकूम ३७
करवीर छत्रपति महाराजांना इंग्रजी विद्या शिकविण्याबाबत ४९, ५१
डनलॉपसाहब पोलिटिकल एजंट प्रांत कर्नाटक करवीर छत्रपति महाराज व रामदुर्गकर, तोरगलकर, इचलकरंजीकर, कागलकर यांच्यामधील जाबसाल उलगडणें २२
ताराबाई महाराणी–प्रकृतींत बिघाड ७८
तुकोजीराव होळकर सुभेदार–विवाह, आमंत्रणपत्रिका ८१
दत्ताजीराव गायकवाड, विश्वासराव छत्रपति महाराज सातारा करवीरास श्रीचे दर्शनास २६
दाजी कृष्ण पंडित, मुख्य कारभारी, कोल्हापूर इलाख्यांतील कारभाराबाबत ७२; दरबाराकडून होणाऱ्या सन्मानाच्या रिवाजाबाबत ७३, ७४, ७८
दामोदरभट मुनीश्वर श्रीपूजक, जमीन इनाम २९
दिनकरराव गायकवाड, कारभारी छत्रपति महाराज सातारा, करवीरास श्रीचे दर्शनास २६, भरतगड तनख्यांतील दुतर्फा अमलाबाबत इंग्रज बहादराशी बोलणें करण्यास आज्ञा २७
बावडा दौलतीचे हिशेब-हकीकत समजून घेण्याबाबत ५२, ५५
दौलतराव शिंदे, आलिजाबहादर ६९
धोंडजी वाघ ६९
नरसिंगराव सिंदे, नेसरी वगैरे सरंजामाचा ठराव २४, ४५; घरची माहिती ७१
नारायणराव घोरपडे इचलकरंजीकर करवीर छत्रपतिमहाराजांचे इलाखेदार १६, १७, २२, २८, २९
नारायणराव घोरपडे सेनापति, बेआदबी करून हुजूरांच्या प्रांतांत ठाणीं घातलीं ६९
नारायणरावसाहेब घाटगे सर्ज्याराव, वहिवाट सांप्रदाय पाळण्याबाबत इंग्रज बहादराचे भेटीसमयीं ७९

नारो गोविंद ओक सावकार, इचलकरंजी-करांकडे कर्ज येणें १६, १७
निसबट शा. आलेकजांडर पोलिटिकल एजंट प्रांत कर्नाटक करवीर छत्रपति महाराजांनीं रहदारीचे जकात माफ करण्याबाबत २५; विशाळगडचे दुतर्फी अमलाबाबत ३२; किल्ले मनोहरगड बंडाबाबत ३३, ३५
फ्रीयर सर हेन्री एडवर्ड करवीर राज्य घराण्याचे दौलतीचें कल्याणाविषयी तत्पर ८३, ८४
फोंड सांवत तांबुलकर, वाडीअमलांतील बंडाचें वृत्त १९, ३४
बापू गोखले ६९
बाबैसाहेब महाराणी छत्रपति शहाजीमहाराज यांचें कुटुंब सती जाण्याबाबत वृत्त १
बायजाबाई शिंदे, आलिजाबहादर ५५, ७०, ७३, ७८
बाळकृष्णपंत भाऊ लागू, सरसुभेदार ६९
बाळकृष्णसेट भिकुसेट बायकुल ९
बाळाजीपंत नातू, छत्रपतिमहाराज सातारा करवीरकरास श्रीचे दर्शनास २६
बाळासाहेब राजे भोसले मुंगीकर, करवीर दरबाराकडून होणाऱ्या सन्मानाच्या रिवाजाबाबत ७३, ७४
भगवंतराव शिंदे कवटेकर, लढाईंत ठार ५६
भगवानराव घाटगे वाजी, घाटाचे बंदोबस्तास चौकी ठेवणें ४, किल्ले मनोहरगड येथील बंडाचें वृत्त ३४, ४८
भाऊभट पुजारी वाडीकर, वेदशास्त्रसंपन्न ५७
भाऊमहाराज, श्री २२
मयाक मोटन बहादूर, गव्हर्नर ४२
महंमद गौसखा रिसालदार, हनमीनहलच्या गढीच्या वेढयाची हकीकत ७९
महिपतराव गोपाळ पारसनवीस ७४
माल्कम, जॉर्ज मेजर, ॲक्टिंग पोलिटिकल सुपरिटेंडेंट इलाखा कोल्हापूर सरदार मानकऱ्यांनीं भेटीसमयीं, बहिवाट सांप्रदाय पाळण्याबाबत ७९
मोरेश्वर पंडित अमात्य बावडेकर, हुजूर इलाख्याच्या गांवगन्नास उपद्रव ८०
यशवंतराव घाटगे कागलकर, कागल तालुक्यांतील कुल बखेडयाची हकीकत १८
यज्ञेश्वर दीक्षित ९
रघुनाथराव गोविंद ५६
रघुनाथराव नलावडे, हनमीनहलच्या गढीच्या वेढयाची हकीकत ७९
रघुनाथराव पंडित अमात्य, घाटांचे बंदोबस्तास चौकी ठेवणें ४, ४१ छत्रपति महाराज सातारा करवीरास श्रीचे दर्शनास २६, मनुष्य खरेदी न घेण्याबाबत ३१, दौलतीच्या अव्यवस्थेबद्दल बोभाटा ४७, ५२, कर्जाबाबत ७२
रताजीराव चवाण, हिंमतबहादर, घाटांचे बंदोबस्तास चौकी ठेवणें ४, छत्रपतिमहाराज सातारा करवीरास श्रीचे दर्शनास २६, मनुष्य खरेदी न घेण्याबाबत ३०, दंगा केल्याच्या आरोपाची खोटी बातमी ५८
राजारामसाहेब छत्रपतिमहाराज (इ. स. १८६६ ते १८७०) विलायतेस असतां ८३, मृत्यु ८४
राजी कोम रामजी भोसले स्वयंपाकाचे मसाल्यांत पारा घातला, त्या अपराधाबद्दल कैद ३९, ४०, ४३

राजे आबासाहेब छत्रपति– पाहा संभाजी ऊर्फ आबासाहेब महाराज छत्रपति, करवीर
राजे बाबासाहेब छत्रपति–पाहा शहाजी ऊर्फ बुवासाहेबमहाराज छत्रपति करवीर
राणोजी दळवी, नामजाद किल्ले पन्हाळा तुरुंगाचे, कारभाराबाबत ५०; ५३
राधाबाईसाहेब प्रतिनिधि विशाळगड संस्थानच्या मुखत्यारीबाबत तंटा ८, ९, १०, २०; खर्चाचा बंदोबस्त ३८
रामचंद्रराव घोरपडे सेनापति, नवीन विदेशी, परदेशी चाकरी न ठेवण्याबाबत आज्ञा ६, छत्रपतिमहाराज सातारा करवीरास श्रीचे दर्शनास २६, २९
रामचंद्रराव पाटणकर घाटांचे बंदोबस्तास चौकी ठेवणें ४
रामपुरी गोसावी, बंडाची हकीकत ६८
रामराव भिकाजी अकबरनवीस नेसरीकर शिंदे यांच्या सरंजामाबाबत ४५
रावजी वाकनीस, किल्ले मनोहरगड येथील बंडाचा बंदोबस्त ४८
रीव्हीस, हेनरी विलसन, पोलिटिकल एजंट प्रांत कर्नाटक करवीर इलाख्यांतील घाटांचा बंदोबस्त व चोरटे लोकांची चौकसी वगैरे करण्याबाबत ३७, ४१; विशाळगडकर प्रतिनिधींच्या खर्चाच्या बंदोबस्ताबाबत ३८, ४२, ४६, मसाल्यांत पारा राजवाड्यांतील कुणबिनीनें घातला त्या अपराधाबद्दल चौकसी व शिक्षा ४०, ४३
बावडा दौलतीचे हिशेब हकीकत समजून घेण्याबाबत ४७, ५२
रेखोजी जाधव, नामजाद किल्ले भूदरगड ३९, हुजूरचे पथक किल्ल्यावर न घेण्याबाबत आज्ञा ६२, ६३, ६४; इंग्रजी पलटणांकडून मुलुखाची नासाडी ६५
लक्ष्मणराव सिंदे सेनाखासखेल, तोरगल दिवाणी व फौजदारीची अखत्यारी वगैरे संस्थानांत पूर्वसंप्रदायाप्रमाणें चालविण्याबाबत ७५, ७६; तोरगल संस्थानाची हकीकत ७७
लक्ष्मीबाई प्रतिनिधि, कर्जाबाबत ६१
लालगिरी गोसावी बंडाची हकीकत ६८
वसलीसाहेब बहादूर जनरल ६९
विठल आपाजी सबनीस किल्ले विशाळगड ९, पंतप्रतिनिधीच्या कर्जाबाबत ६१
व्हिक्टोरिया महाराणी कैसरइ हिंदमहाराणी सकवारबाई करवीर यांजकडून पत्र ८४
शहाजी ऊर्फ आपासाहेब छत्रपति महाराज सातारा, करवीरास श्रीचे दर्शनास २६
शहाजी ऊर्फ बुवासाहेब महाराज छत्रपति, करवीर (इ. स. १८२१ ते १८३८) कुटुंबाची नांवनिसीवार यादी ३६
शाहूमहाराज छत्रपति धाकटे, कोल्हापूर किल्ल्याचे राजवाड्यांत आगमन २
शिवाजी ऊर्फ बाबासाहेब महाराज छत्रपति (इ. स. १८३८ ते १८६६) कोल्हापूर किल्ल्याचे राजवाड्यांत आगमन २, चोरट्यांविरुद्ध घाटपांजाचा बंदोबस्त ३, ४, ७, ३७, ४१, नवीन सिबंदी न ठेवण्याबाबत ५, ६, ४४, ४६, विशाळगड संस्थानच्या मुखत्यारीबाबत ९, १०, २०, ३८, कागल तालुका हुजुरांच्या इलाख्यांत १२, १३, १८, २२, ५४.

इचलकरंजीकर हुजुरांच्या इलाख्यांत १६, २२, २८, किल्ले मनोहरगडच्या गडकरी बंडाची हकीकत १९, ३३, ३४, ३५, ४८, भूदरगड किल्ल्यांतील गडकऱ्यांचे सेवेबाबत वचन २१, रहदारीचे जकात माफ करण्याबाबत २५, छत्रपतिमहाराज सातारा, करवीरास श्रीचे दर्शनास २६; भरतगड तनख्यांतील दुतर्फा अमलाबाबत इंग्रज बहादराशीं बोलणें २७, विशाळगडच्या दुतर्फा अमलाबाबत ३२, कुणबिणीनें स्वयंपाकाचे मसाल्यांत पारा घातल्याबद्दल चौकसी ३९, ४०, ४३

नेसरीकर शिंदे यांच्या सरंजामाबाबत तपशीलवार हकीकत २४, ४५,

इंग्रजी विद्या शिकण्याबाबत ४९, ५१

तुरुंगाचे कारभाराबाबत ५०, ५३, ५५, ५६.

हिंमतबहाद्दरावर दंगा केल्याचें तुफान ५८, चोरांच्या उपद्रवाच्या बंदोबस्ताचीं कलमें ६०

पंतप्रतिनिधींच्या कर्जाबाबत ६१, त्यांना अधिकार देण्याचा समारंभ ७०, भूदरगड किल्ल्यावर हुजूरचे लोक न घेण्याबाबत ६२, ६३, ६४, इंग्रजी पलटणांकडून मुलुखाची नासाडी ६५, कोल्हापूर इलाख्यांतील बंडाची हकीकत ६७, ६८, निपाणकर व घोरपडे सेनापति यांनीं बेअदबी करून हुजूरचे मुलुखांत ठाणीं घातलीं ६९, विशाळगड व बावडा दौलतीच्या कर्जफेडीबाबत ७२

वहिवाट सांप्रदाय पाळण्याबाबत इंग्रजबहादरांचे भेटीसमयीं ७९

बावडेकर पंतअमात्यांच्या उपद्रवाची हकीकत ८०, होळकर सुभेदार, इंदूर संस्थानाकडून विवाहआमंत्रणपत्रिका ८१,

शिवछत्रपति, श्रीमन्महाराज (इ. स. १८७१ ते १८८३) दत्तकसमारंभ ८३; नाइट कमांडर ऑफ दी स्टार ऑफ इंडिया पदवीप्राप्त, इंग्रजी नीतितत्वानुसार विद्याअभ्यास ८४

सईबाईसाहेब महाराणी ऊर्फ दिवाणसाहेब, संभाजी ऊर्फ आबासाहेब महाराज छत्रपति, यांचें कुटुंब, दौलतींत सर्वांनीं चांगली वर्तणूक करण्याबाबत ठराव १४, छत्रपति महाराज सातारा, करवीरास श्रीचे दर्शनास २६, ३६, प्रतिनिधि घराणें, राधाबाईच्या खर्चाच्या बंदोबस्ताबाबत ३८ कुणबिणीनें स्वयंपाकाचे मसाल्यांत पारा घातल्याबद्दल चौकसी ४०, ४३; बावडा दौलतीचे हिशेब हकीकत समजून घेण्याबाबत ४७, ५२, हनमीनहल्च्या गढीच्या वेढ्याची हकीकत ५९; ४२, ५५

सकवारबाईसाहेब महाराणी छत्रपति राजाराम महाराज कोल्हापूर यांचें कुटुंब, महाराणी व्हिक्टोरिया कैसर-इ-हिंद यांना पत्र ८४

सखो केशव परांजपे ३८

सदाशिवपंत अनंत बकील, पंतप्रतिनिधीच्या संस्थानच्या कारभाराबाबत हुजुरून बंदोबस्त करून घेणें ९, किल्ले मनोहरगडच्या गडकरी बंडाची हकीकत १९, बकिलीचे कामास नेमिलें २३, नेसरीक

सिंदे यांच्या सरंजामाचा ठराव २४,४० छत्रपति महाराजांना इंग्रजी विद्या शिकविण्याबाबत ४९, ५१

समसीन इंग्रज बहादूर घाटांचा बंदोबस्त व चोरटे लोकांच्या चौकसीबाबत हुकूम ३७

सिदोजी नाईक निंबाळकर सरलष्कर, निपाणीकर बेअदबी करून हुजुरांच्या प्रांतांत ठाणीं घातलीं ६९

सुबराव कैदी हनमीनहलच्या गढीच्या वेढ्याची हकीकत ५९

सुंदराबाईसाहेब घाटगे, कागल, कागल तालुका हुजुरांचा इलाखा १२, १३, १८, कोल्हापूर इलाख्यांतील बंडाचें वृत्त ६७

संभाजी ऊर्फ आबासाहेबमहाराज छत्रपति करवीर (इ. स. १८१३ ते १८२१) कुटुंबांचीं नांवनिसीवार यादी ३६

हणमंत आबाजी, किल्ले पन्हाळा तुरुंगाचे कारभाराबाबत ५०, ५३

हणमंतराव निंबाळकर, सरलष्कर घाटाचे बंदोबस्तास चौकी ठेवणें४,७,३७सरकारी सरंजाम व कामकाजाबाबत हकीकत ११, छत्रपति महाराज सातारा, करवीरास श्रीचे दर्शनास २६; दरबाराकडून होणाऱ्या सन्मानाच्या रिवाजाबाबत ७३, ७४

हिंदुराव गायकवाड सरखवास, छत्रपति महाराज सातारा करवीरास श्रीचे दर्शनास २६

हैबतराव गायकवाड, विश्वासराव ६९

